१२४२

म. ग्रं. सं. ठाणे

विषय चरित्र

सं. क्र. १५४०

REFBK-0003861

स्थळप्रत
भ.सं.सं.मं.

८८९०
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
अ.क्र.पं.नं. ३२७
२०-८-२८

# मुहम्मद पैगंबर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0003861

दा. क्र. ३८९

लेखक,

न.

परळ सुपारीबाग रोड, मुंबई.

हें पुस्तक रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे, यांनीं आपल्या ‘ इंदुप्रकाश ’ छापखान्यांत नं. ३८० गिरगांव रोड, मुंबई येथें छापिलें, आणि रा. एम्. व्ही. प्रधान यांनीं परळ सुपारीबाग रोड मुंबई येथें प्रसिद्ध केलें.

या पुस्तकाचे संबंधी सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........ वि. ५१२५
क्रमांक ५५२० ........ नों. दि. १०।६।७०

ही नम्र सेवा

# हजरत मुहम्मद पैगंबर

यांचे चरणारविंदीं

अर्पण.

ग्रंथकर्ता

मुंबई, ता. १ जानेवारी सन १९२९

# ग्रंथकर्त्याचे उद्गार.

मुंबई इलाख्यांत राहाणाऱ्या कांहीं मुसलमान लोकांना मराठी भाषा जवळ जवळ त्यांच्या मातृभाषेसारखी अवगत झाली आहे. त्यांना उर्दु, परशियन किंवा अरबी या भाषा बहुतेक अपरिचित झाल्या आहेत, आणि यामुळें त्यांना त्यांचे धार्मिक ग्रंथ दुसऱ्याचे तोंडून ऐकावे लागतात. भाषेची ही अडचण दूर झाल्यास कांहीं कांहीं अत्यंत महत्वाचे ग्रंथ समक्ष वाचून आपल्या मनाचें समाधान करून घेतां येईल, असें त्यांना वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. असे जे जिज्ञासु मराठी वाचक त्यांच्या इच्छेला मान देऊन हें " हजरत मुहम्मद पैगंबरचें चरित्र " मराठींत लिहिण्याचें मीं धाडस केलें आहे. मुसलमान समाजाला ही माझी वेडी वांकडी अल्पसेवा मान्य होईल अशी आशा आहे.

हें चरित्र लिहावयास घेतल्या दिवसापासून तों तें प्रसिद्ध होईपर्यंत त्यांत इतकीं विघ्नें व संकटें आलीं कीं, पुष्कळ वेळां तें अपुरें सोडून देण्यापर्यंत पाळी आली होती. परंतु ज्या हजरत पैगंबरनें आपलें इच्छित कार्य सिद्धिस नेण्यासाठीं जिवाची पर्वा केली नाहीं, त्यांचें चरित्र लिहि- णारानें हातपाय गाळून चरित्र लिहिण्याचें सोडणें म्हणजे पाण्यांत बुडी मारून कोरडें निघण्यासारखेंच झालें असतें. असो.

प्रस्तुत चरित्र लिहिण्याच्या कामांत ज्यांनीं मला शुद्ध हेतूनें मदत केली, त्यामध्यें मे. ए. आर. डिमटिमकर, जे. पी., सेक्रेटरी अंन्जुमान- इस्लाम मुंबई, यांचे प्रथम आभार मानण्यास मला अत्यानंद होत आहे. आमची अशी स्वानुभवावरून खात्री झाली आहे कीं, या कामांत मे. डिमटिमकरानीं शरीरानें व द्रव्यानें झीज सोसली नसती तर हें पुस्तक आमच्या वाचकांच्या हातीं पडलें असतें, असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं.

परमेश्वर अशीच त्यांना सद्बुद्धि देवो आणि त्यांच्या हातून अशीं आणखीहि सत्कृत्यें होवोत.

मे. महंमद इब्राहिम उर्फ बापुसाहेब तुंगेकर, मे. हुसेनभाई लालजी (एम्. एल्. सी.) मे. एस् . एल् . इनामदार इंपीरियल गॅझिटेड इन्कम टॅक्स, ऑफिसर, मुंबई. मे. शेक अब्दुल कादर इंजिनियर, इंप्रूव्हमेन्ट ट्रस्ट, मुंबई. व एम् . आय. फरूकी, बी. ए., पुणें, या सद्गृहस्थांच्या उदार आश्रयाबद्दल व त्यांनीं वेळोवेळीं आपला अमोलिक वेळ खर्चून उपयुक्त सुचना केल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

या ग्रंथाची हस्तलिखित प्रत माझे मित्र रा. सदाशिव वामन जयवंत व रा. व्यंकटेश गोविंद कुळकर्णी यांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून तपासून पाहिली याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचाहि फार आभारी आहे.

हें पुस्तक छापण्याचें काम इंदुप्रकाश छापखान्याचे मालक रा. दामोदर सावळाराम यंदे यांनीं माफक खर्चांत व योग्य वेळांत पुरें करून दिलें या त्यांच्या उपकाराबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार फार आभारी आहे.

छापण्याच्या कामांत बऱ्याच चुका दुरुस्त करावयाच्या नजर चुकीमुळें राहून गेल्या आहेत, परमेश्वराच्या कृपेनें पुढें दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आलाच तर त्या आवृत्तीमध्यें त्या सर्व दुरुस्त करण्याचें ठरविलें आहे. तूर्त वाचकवृंद या चुकांची आम्हांला माफी करतील अशी आशा आहे.

ग्रंथलेखक.

# मुस्लीम अभिप्राय.

मि. एम्. व्ही. प्रधान यांनीं लिहिलेलें हजरत "मुहम्मद पैगंबर" चें चरित्र आम्हीं वाचून पाहिलें. त्यांत आम्हांला कांहीं ठिकाणीं ज्या चुका आढळून आल्या, त्या आम्हीं त्यांच्या नजरेस आणिल्या व त्यांनीं शुद्धिपत्र जोडून त्यांची दुरुस्ती केली आहे. या शिवाय चुकीचीं अशीं तीन स्थळें आम्हांस आढळलीं. त्यापैकीं पहिलें हजरत पैगंबर साहेबांना ईश्वरी साक्षात्कार व आज्ञा होईतोंपर्यंतच्या त्यांच्या चरित्रांत त्यांनीं त्यांना बहुवचनाच्या ऐवजीं एकवचन वापरलें आहे हें होय. याचें कारण त्यांनीं आम्हांस असें सांगितलें आहे कीं, ईश्वरी साक्षात्कार व आज्ञा होईतोंपर्यंत हजरत पैगंबर साहेब हे सामान्य मनुष्य कोटींतील एक व्यक्ति होत, आणि त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाल्या दिवसापासून त्यांची योग्यता वाढून ते श्रेष्ठ पदाला पोंचले. या दोन स्थितींचा फरक मनाला पटावा ह्मणून प्रथमच्या त्यांच्या कालांत त्यांच्या करितां एकवचन व नंतरच्या कालांत बहुवचन घातलें आहे. मि. प्रधान यांनीं इंग्लिश ग्रंथकारांची पद्धत स्वीकारलेली दिसते. प्रस्तुतच्या चरित्राचे लेखक हे स्वतः हिंदु असून मराठी ही त्यांची मातृभाषा आहे; तेव्हां त्यांच्या दृष्टीनें पाहिलें असतां ही त्यांची अक्षम्य चुक आहे, असें म्हणतां येणार नाहीं. मि. प्रधान यांनीं दिलेलें कारण आमच्या समाजबंधूंना पटलें नाहीं तर त्याची ते दुरुस्ती करण्यास तयार आहेत. दुसरें स्थळ हजरत पैगंबर साहेबांच्या मातोश्रीच्या लग्नाच्या वेळची एक दंतकथा हें होय. धार्मिक ग्रंथांत दंतकथा कानाला गोड लागत नाहींत हें जरी खरें आहे, तथापि श्रेष्ठ व पूज्य विभूतींच्या चरित्रांत सत्याबरोबर मनरंजनासाठीं अशा दंतकथाहि देण्याची वहिवाट इंग्रजी व मराठी लेखकांची आहे. दंतकथा याचा अर्थ बिनआधाराच्या गोष्टी. अर्थात् अशा गोष्टींना कोणीहि फारसें महत्व देत नाहीं. तिसरें स्थळ लेखकानें हजरत पैगंबर साहेब हे बिबी खदिजाचे नोकर होते, असें विधान केलें आहे हें होय. ही त्यांची चूक होय. हजरत पैगंबर साहेब हे बिबी खदिजाचे व्यापारांत भागीदार असून व्यापारांत होणारा नफा तीं दोघे ठराविक प्रमाणांत वांटून घेत असत. हजरत पैगंबरसाहेब हे बिबी खदिजाचे नोकर होते, असें समजून त्यांनीं त्यांच्या संबंधानें पुढें ५१ पानावर लिहिलेली भाषा चुकीची ठरते. त्याचप्रमाणें त्यांच्या विवाहासंबंधानें लिहितांना बिबी खदिजाच्या वडिलांची संमति या विवाहाला

नव्हती असें जें विधान केलें आहे तेंहि चुकीचें आहे. कारण या विवाहप्रसंगीं बिबी खदिजाचे वडिल हयात नव्हते, असा आधार मूळ ग्रंथांत सांपडतो. त्या वेळीं त्यांचे चुलते हयात होते व त्यांनीं या विवाहाला आपली संमती दिली होती.

असो, आमच्या दृष्टीनें या ग्रंथांत ज्या चुका म्हणून किंवा फरक करण्यासारखी स्थळें आम्हांस आढळलीं तीं सर्व वाचकवृंदापुढें मांडलीं आहेत याशिवाय वाचकांना आणखीहि कांहीं महत्त्वाच्या सुचना करण्यासारख्या वाटल्यास त्या त्यांनीं लेखकाकडे कराव्यात. वर सांगितलेल्या स्थळांशिवाय धार्मिकबाबतींत हा ग्रंथ बिनचुक आहे. अशी आमची खात्री आहे.

महाराष्ट्रांत उर्दू, परशियन व अरेबिक, या भाषा किती थोड्या मुसलमान बंधूंना अवगत आहेत हें सर्वश्रुत आहे. त्यांना व्यवहारांत बरेच अंशीं मराठी भाषेवरच अवलंबून असावें लागतें; तेव्हां अशा लोकांना व हिंदु वाचकांना या ग्रंथापासून किती अमोलिक फायदा होणार आहे, हें आम्हीं न सांगता त्यांनींच याचा विचार करावा. या ग्रंथांतील बारिकसारिक चुकांकड नजर न देतां त्याच्या वाचनापासून होणाऱ्या ज्ञानलाभाकडे त्यांनीं नजर द्यावीं अशी आम्हीं त्यांस विनंति करतों.

आजपर्यंत प्रचारांत असलेल्या भाषांमध्यें हजरत पैगंबर साहेबांची अगणित चरित्रें झालीं आहेत, परंतु मराठी भाषेंत हें चरित्र लिहिण्याचें श्रेय मि. प्रधान यांनीं प्रथमच घेऊन त्यांनीं आम्हांला अत्यंत ऋणी करून ठेविलें आहे. मि. प्रधान हे स्वतः उच्चवर्गांतील हिंदु आहेत, परंतु आपल्या उदात्त विचारांनीं त्यांनीं पारमार्थिक जोड मिळविली असें म्हटल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. ही त्यांची कृती सर्वमान्य होऊन ती लोकाश्रयास पूर्ण पात्र होईल अशी आम्हांस आशा आहे.

मुंबई
१६-११-२८

मौलवी फत्तेह मुहम्मद
सय्यद सुलतान अली इनामदार
अबदुर रहीम डिमटिमकर
शेख अबदुल कादर

# शुद्धि पत्र.

## वारंवार येणारा अशुद्ध शब्द एकच वेळ शुद्ध करून दाखविला आहे.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १० | मुहजरीन | महाजरीन |
| ३ | १४ | मूटाची | मूताची |
| ,, | १९ | अल्र–लाट | अल्र–लात |
| ४ | ४ | शमझ | शमस |
| ,, | ८ | अफयान | अफफान |
| ,, | ९ | मरवाना | मरवान |
| १२ | १० | नोफल | नवफील |
| ,, | २१ | साबा | सबा |
| १९ | १० | यसरब | यसरीब |
| ,, | ११ | बनी नज्जारनामक सरदाराच्या | बनीनज्जार नामक कुळांतील एका सरदाराच्या |
| २५ | ५ | अबराह | अबराहा |
| ,, | ,, | टायफ | तायफ |
| ,, | ८ | हालीमा | हलिमा |
| ,, | १२ | साना | सनआ |
| ३१ | ३ | कोसाई | कुसई |
| ४० | ७ | थामूड | समूद |
| ४१ | ३ | वारक | वरका |
| ४६ | १३ | फारा | सारा |
| ४६ | २४ | बोसरा | बुसरा |
| ५० | १७ | नोकरीस ठेविले, पगार दिला, | मुस्लीम अभिप्राय पाहा. |
| ५४ | २१ | उमेकुल्युम | उमेकुलसुम |
| ५७ | ३ | मनुष्य आंत शिरतांना | मनुष्य उद्यां प्रथम आंत शिरतांना |
| ५७ | १४ | आंगांतील झगा पसरला | आंगावरील चादर पसरली |
| ६० | १ | मुहम्मद पगंबर | मुहम्मद पैगंबर |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७१ | १३ | पो भर सुक कोरडें | पोटभर सुकें कोरडें |
| ७४ | १७ | वा सव्वाहा | या सवाहा |
| ८५ | १० | ही गोष्ट त्यानीं | [ गाळलें आहे ] |
| ८५ | ११ | लिहून ठेविली | ,, |
| ,, | १६ | अल–अक्रम | अल–अरकम |
| ८६ | १८ | व तिचा नवरा...उभयतां | ( गाळलें आहे ) |
| ९९ | २५ | नसो | नसे |
| १०० | २५ | अर्चा पूजा | पूजा अर्चा |
| १०७ | २२ | हासम | हाशम |
| १०८ | १८ | अबुतालिचा | अबुतालिबचा |
| १०९ | १४ | हि | हजरत |
| १२१ | ६ | लॉत | लात |
| १२५ | २५ | औख | औस |
| ,, | ,, | खजूरस | खजरज |
| १२९ | २३ | इस्माल | इस्लाम |
| १३२ | ११ | आहे | नाहीं |
| १३६ | ८ | थार | सौर |
| १५२ | ४ | जुमा मशीद | क्कुबाची मशीद |
| ,, | २२ | अल–कास्वा | अल–कस्वा |
| १५८ | २३ | महजविन | महाजरीन |
| १६७ | ४ | मध्यरात्रीं | रात्रीच्या पहिल्या प्रहराच्या शेवटीं |
| १६८ | २ | असे | आहे |
| ,, | ४ | बाग पुरण्याकरितां | बांग पुकारण्याकरितां |
| १७५ | १७ | जनावर | जनावरावर |
| १८८ | ७ | सआदविन | सआद बिन |
| १९२ | १ | अबुजहाल | अबुजहल |
| १९४ | ५ | कॉफला | काफला |
| १९६ | १५ | काकल्याकडे | काफल्याकडे |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २०२ | २ | उरणीची | उतरणीची |
| २०५ | ८ | संकाटाच्या | संकटाच्या |
| २२२ | १८ | ताल्हा | तल्हा |
| २२६ | १ | त्यांचा एक दांत पडला | त्यांचे दोन दांत पडले |
| २३१ | १२ | राजी | रजीय |
| ,, | १२ | नेझिद | नइद |
| २४० | २४ | जयनबच | जयनबच्या |
| २४४ | २० | झोंपेची | ( गाळलें आहे ) |
| ,, | २१ | ते जागे झाले | ते भानावर आले |
| २४६ | २० | सुलैमान | सल्मान |
| २४९ | ३ | उमर | अमर |
| २५३ | ६ | हुदेबिबा | हुदैबिया |
| २५६ | १४ | सर्वांस | सर्वांत |
| ,, | १५ | व | ( गाळलें आहे ) |
| ,, | २० | हातांतीत | हातांतील |
| २४, | ३ | हजरत इब्राहिम...खात नाहींत व | ( गाळलें आहे ) |
| ,, | ५ | हलाहाल | हलाल |
| २६२ | ८ | घासान | गस्सान |
| ,, | ९ | यनामा | यमामा |
| २६३ | १० | अल्टारिक | अल्तारिक |
| २६४ | ९ | पगंबर | पैगंबर |
| १६७ | ६ | मारवा | मरवा |
| ,, | २२ | एकशें आठ | तीनशें साठ |
| २७० | २४ | विल्हळ | विव्हळ |
| २७१ | १ | सांतवन | शांतवन |
| ,, | १९ | बानु | बनु |
| २७२ | ११ | अबुसुयान | अबुसुफयान |
| २७५ | २४ | बोडोईन | बद्वी |
| २७७ | २५ | जोसेफ | युसुफ |
| २७९ | १६ | अकाबाजो | अकाबाच्या सारखी |
| २८२ | २ | हुनेन | हुनेनच्या लोकांचा |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २८४ | ४ | शाइमा | शइमा |
| २८५ | २० | येमेन | यमन |
| ,, | ,, | ओमन | उमान |
| ,, | ,, | सारिया | सिरिया |
| २८६ | २ | सारसन | सारासन |
| २८८ | २ | तावुक | तवुक |
| २९१ | १५ | धूल हिजा | जुल्हिज |
| २९१ | १६ | हीयात्रा रमजान | ( गाळलें आहे ) |
| २९२ | २५ | अराफट | अरफात |
| २९३ | २१ | मुजदलफा | मुजदलेफा |
| २९५ | १९ | समावून | समजून |
| २९७ | ९ | सुधारलेल | सुधारेल |
| ३०१ | ८ | कुळांत | स्थितींत |
| ३०२ | २३ | हवर | हव्वार |
| ३०३ | १६ | इक्रम | इक्रमा |
| ३०३ | २५ | अभिन | अमिन |
| ३०४ | १६ | अबुजंडाल | अबुजंदल |
| ,, | २० | वाशी | वहशी |
| ३०८ | २ | ह्मणतो | अबुदाउदमध्यें असें आहे कीं, |
| ३११ | ६ | रशी | रशी व कुऱ्हाड |
| ११७ | ५ | जहरला | जहलला |
| ३१८ | १४ | कुराणांत | ( गाळलें आहे ) |
| ३२० | १ | फरूक | फारूक |

# अनुक्रमणिका.

**भाग १ ला.—अरबस्थान आणि अरब लोक.** पान

(१) अरबस्थानच्या चतुःसीमा, (२) हवा व पाणी (३) अरबांची रहाणी, (४) वाळूचे सपाट मैदान (५) अरबांचा स्वभाव (६) अरबांचे औदार्य, त्यांची आवड, (७) अरबांचे काव्य (८) ईश्वराची कल्पना. ... ... १–११

**भाग २ रा.—पूर्ववृत्त.**

(१) मक्काशहरचें वर्णन (२) मक्केंतील व्यापार (३) जमजम विहीर (४) कावा मशिद (५) अरबस्थानांतील धर्म (६) कुरेश घराणें, मूळ पुरुष हाशम (७) हाशमचा धाकटा भाऊ (८) अबदुल मुत्तलिब हाशमचा मुलगा (९) नोफल, अबदुल मुत्तलिबचा चुलता (१०) अबदुल मुत्तलिबला बापाची मिळकत मिळते (११) जमजम विहीरीचा शोध (१२) विहिरींत सांपडलेल्या वस्तूंची वाटणी (१३) मुत्तलिबचा पुत्राकरितां नवस (१४) अबदल्लाचा प्राण वांचतो. १२–२४

**भाग ३ रा.—मुहम्मदाचा जन्म व बाळपण.**

(१) अबराह (२) टायफचा शेजार द्रोह (३) मक्केवर स्वारी (४) चमत्कार (५) अबदल्लाचें लग्न (६) मुहम्मदचा जन्म. (७) हालीमा (८) बाळपण. ... ... २५–३९

**भाग ४ था.—संसार प्रवेश.**

(१) जागृती (२) स्वाभिमान (३) व्यापाराकरितां सफर (४) थामुड लोक (५) खदिजाबरोबर लग्न. ... ४०–५४

**भाग ५ वा.—पारमार्थिक सिद्धि.**

(१) कावाची दुरुस्ती (२) पवित्र दगडाची स्थापना (३) मनः स्थिती (४) दिव्य प्रकाश. (५) आज्ञा (६) धर्मप्रसार. ५५–९०

**भाग ६ वा.—तुफानांत हजरत पैगंबर.**

(१) चमत्कार (२) हजरत जादुगार (३) मुसलमानांचा देश-

पान.

त्याग (४) ज्ञाति बहिष्कृत ठराव (५) करारनाम्याचा नाश (६) हजरतवर दुःखाचे पर्वत ७) दुर्दैवी टायफ (८) आकाबाची पहिली प्रतिज्ञा (९) पैगंबरची स्वर्गाला खेप. ... ९१–१३५.

भाग ७ वा.—हिजरी सन.

(१) ह. मुहम्मद पैगंबरास ठार मारण्याचा कट (२) कट फसतो (३) थार पर्वताच्या गुहेंतील वास्तव्य (४) त्यांचा शोध ५) कबुतरांची पवित्रता व त्याची कारणें (६) मदिना शहराला हिंजरत. हिजरी सनाची सुरवात. ... १३६–१४८

भाग ८ वा.—मनःशांति.

(१) इस्लाम नगर (२ अनसार आणि मुहजरीन (३) पहिली मशिद (४) बिबी आयेशा (५) हजरत पैगंबरची धार्मिक बंधनें (६) मुसलमानांची स्थिती (७), औदार्याचे महत्व... १४९–१७६

भाग ९ वा.—स्वराज्याचा पाया.

(१) राजकीय सत्तेचे बीजारोपण (२) जाहीर नामा (३) धार्मिक सुधारणा (१) मशिदींत दिशा समजण्याची योजना (२) मद्यपान निषेध (३) जुगाराचा प्रतिबंध (४) मशिदी नजिक पाण्याची आवश्यकता (५) पैगंबरचें साधें रहाणें (४) हातांत शस्त्र घेण्याची कारणें (५) नाखलाचें खोरें (६) लढाई करणें ही ईश्वरी आज्ञा आहे. .. १७७–१९३

भाग १० वा.—बदरची लढाई.

(१) मक्केतील व्यापारी कॉफला (२) कुरेश सैन्य मक्केतून निघतें. (३) हजरत पैगंबरची स्वारी (४) बदरची लढाई (५) मुसलमानांचा जय (६) लुटीची वांटणी (७) सविकची लढाई (८) तहाची वाटाघाट (९) गौरस पेलवान. ... १९४–२११

भाग ११ वा.—ओहदची लढाई.

(१) यहुदी लोकांचा बेइमानपणा (२) बिबी फातमाचें लग्न (३) आबासचें हजरत पैगंबरला पत्र (४) ह.पैगंबरचें स्वप्न (५) ओहदची लढाई (१) रणक्षेत्र (२) द्वंद्व युद्ध (३) ह.

मुहम्मद जखमी (४) मुसलमानांचा पराजय (५) हिंदबाईचें राक्षसी कृत्य (६) लढाईचा शेवट (७) यहुदी लोकांना शेवटचा खलिता. ... ... ... २१२–२३४

**भाग १२ वा.—खंदकाची लढाई.**

(१) अरब स्त्री समाज व त्याची सुधारणा (२) जैयनबचें लग्न (३) बिबी आयेशावर एक प्रसंग (४) मदिना शहरावर स्वारी (५) खंदकाची युक्ति (६) मदिना शहराला वेढा... २३५–२५२

**भाग १३ वा.—विजयाचीं पूर्व चिन्हें.**

(१) मक्केला हज करण्याची तयारी (२) हुदेबिया येथील मुक्काम (३) वृक्ष प्रतिज्ञा (४) शांततेचा तह (५) हजरत पैगंबरचे परराष्ट्रांना खलिते (६) खैबरवर मुसलमानांची स्वारी (७) मुसलमानांचा मक्केंत प्रवेश ... ... २५३–२६८

**भाग १४ वा.—विजय.**

(१) मूटाची लढाई (२) मक्केवर स्वारी (३) काबा मंदिर काबा शरीफ झालें. . ... ... २६९–२८०

**भाग १५ वा.—जन्मसाफल्य.**

(१) हुनेनची लढाई (२) लुटीची वांटणी (३) परराष्ट्रांशीं तह (४) टायफमधील लोकांचा ह. पैगंबरच्या कृपेकरीतां प्रयत्न. (५) अल्–लाट मूर्तीचा नाश. ... ... २८१–२९०

**भाग १६ वा.—स्वर्गारोहण.**

(१) ह. पैगंबरची शेवटची यात्रा (२) ह. पैगंबरचा शेवटचा उपदेश (३) अंतकाळ. ... ... ... २९१–२९९

**भाग १७ वा.—मधुपान.** ... ... ... ३००–३२२

Some of the views of the eminent European writers Concerning Mahomed Prophet ... ३२३–३२७

सनावळी. ... ... ... ३२८

हजरत पैगंबरची वंशवृक्षावळ. ... ... प्रारंभीं.

---

# हजरत पैगंबरची वंशावृक्षावळ.

कोसाई कुरेश, इ. स. ४००

अबदुल मनाफ

अबदुल शमझ — हाशम

उमिया — अबदुल मुत्तलिब

अबदुल, उज, हार्ब — अबदुल्ला, अबुतालिब, अब्बास, झुबेर

हाकाफा, अफयान

मरवाना ६८३, उस्मान ६४४

(लग्न) बिबी खादिजा बरोबर, मुहम्मद पैगंबर

बिबी फातेमा ( लग्न ) अलीबरोबर

हसन ६६१, हुसेन

# मुहम्मद पैगंबर.

## भाग १ ला.

## अरबस्थान आणि अरब लोक.

विषय


| | |
|---|---|
| १ अरबस्थानची चतु:सीमा. | २ हवा व पाणी. |
| ३ अरबांची रहाणी. | ४ वाळूचें सपाट मैदान. |
| ५ अरबांचा स्वभाव. | ६ अरबांचें औदार्य, त्यांची आवड. |
| ७ अरबांचें काव्य. | ८ ईश्वराची कल्पना. |


### १ अरबस्थानचा नकाशा.

वाचकहो, आशियाचा नकाशा उघडा; त्यांत तुम्हांला नैर्ऋत्य दिशेला पृथ्वींतील सर्वांत मोठें असें द्वीपकल्प दिसेल. हें अरबस्थान होय. याच्या पश्चिमेस तांबडा समुद्र, दक्षिणेस हिंदीमहासागर, पूर्वेस इरणचें आखात आणि युफ्रेटिस नदी, आणि उत्तरेस सिरिया देश आहे.

### २ हवा व पाणी

अरबस्थानांतील हवा उष्ण असून तो देश शुष्क व रखरखीत आहे. या देशांतील कांहीं भागांत पाऊस तर क्वचितच पडतो, आणि दक्षिणेकडील बहुतेक भागांत वाळुकामय अरण्यच आहे.

पूर्वेकडील प्रदेशाशिवाय, या देशांतील कोणत्याही प्रदेशांत वर्षभर सतत वाहात जाणाऱ्या नद्या नाहींत. ज्या थोड्याशा आहेत, त्यासुद्धां उन्हाळ्याच्या दिवसांत पर्वतावरून वितळून येणाऱ्या बर्फामुळें पाण्याची समृद्धि करितात; परंतु त्यांतील पाणी लवकरच कमीकमी होत जाऊन वाळूच्या अफाट प्रदेशांत त्या गडप होऊन जातात; व जिकडे तिकडे पुन्हा कोरडा रखरखीत असा प्रदेश दिसूं लागतो. अरब लोक फार पुरातन काळापासून या देशांत रहात आले आहेत, असा इतिहासाचा पुरावा मिळतो. व त्याच इतिहासावरून असेंही स्पष्ट कळतें कीं, हे लोक अद्यापपर्यंत कोणत्याही परक्या राजाच्या अमलाखालीं राहून त्यांनीं आपलें स्वातंत्र्य गमाविलेलें नाहीं.

## ३ अरबांची रहाणी.

अरबस्थान हें राष्ट्र निरनिराळ्या टोळ्यांचें बनलेलें आहे. प्राचीन काळीं सुद्धां या सबंध देशावर राज्य करणारा असा एकच राजा नव्हता. प्रत्येक टोळींत कोणी तरी एक मुख्य पुढारी म्हणून अधिकारी असे, व त्याचा अंमल त्याच्या टोळींतील लोकांवर चालत असे. जो सर्वांत शूर, बुद्धीनें हुशार व सर्वांचा पुढाकार घेण्याला योग्य असा असेल, त्याच मनुष्याची निवड त्या टोळींतील लोक आपला अधिकारी म्हणून करीत असत. कांहीं टोळ्यांनीं आपापलीं शहरें व लहान लहान गांव स्वतंत्र वसविले होते. ते धंदारोजगार करीत; परंतु कांहीं आपल्या पाळीव जनावरांना जिकडे चांगलें व भरपूर गवत खावयास मिळे, अशा निरनिराळ्या भागांत भटकत राहत असत. त्यांच्याबरोबर त्यांचे रहावयाचे तंबु असत, व ते जोंपर्यंत एका प्रदेशांत सुखानें रहातां येई, तोंपर्यंत तेथें राहून नंतर दुसऱ्या प्रदेशांत निघून जात. अशाप्रकारें स्थलांतर करतांना, त्यांना वारंवार अफाट व भयाण अशा वालुकामय अरण्यांतूनही प्रवास करण्याचा प्रसंग

पडे, व अशा वेळीं त्यांना फक्त आपल्या इमानी उंट या जनावराचा इतका उपयोग होई कीं, तो त्यांना आपल्या प्राणापेक्षांही प्रिय वाटत असे. समुद्रांतून प्रवास करण्याला ज्या प्रमाणें गलबत हें एक साधन आहे, त्याचप्रमाणें या वालुकामय अफाट मैदानांतून प्रवास करण्याला परमेश्वरानें मनुष्यमात्राच्या सोईकरितां उंट हें एकच साधन उत्पन्न केलें आहे. त्याला कांहीं दिवस पाणी न मिळालें तरी चालतें, आणि म्हणूनच या जनावराचा निभाव अशा निर्जल प्रदेशांत होऊं शकतो. याच्या पायाचा खालचा भाग बराच मोठा व सपाट असतो, आणि म्हणून वाळूवरून चालत असतांना त्याला अडचण पडत नाहीं.

## ४ वाळूचें सपाट मैदान.

वाचकहो, वालुकामय अरण्याची तुम्हांला काय कल्पना आहे ? वाळूचें हें एक अफाट मैदान असतें. समुद्रांत ज्याप्रमाणें वर आकाश व खालीं पाणी, याच्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं, त्याचप्रमाणें या भयाण मैदानांत वर आकाश व जिकडे तिकडे खालीं वाळू, याच्याशिवाय कोठेंही, ना झाड, ना झुडुप, ना पक्षी किंवा कृमी कीटक. अशा जमिनीवर फळझाड किंवा फूल दृष्टीसही पडणें अशक्य. मधून मधून टेंकड्या मात्र असतात, परंतु त्यासुद्धां वाळूच्या व उघड्या बोडक्या. जिकडे तिकडे शांततचें साम्राज्य. ज्या ठिकाणीं जिवंत प्राणीच असणें दुर्मिळ, त्या ठिकाणीं त्यांचा आवाज तरी कसा असूं शकेल ! वर दिसणारें आकाश व खालीं दिसणारी वाळू, या दोन वस्तु सोडून दिल्या, तर हें वाळूचें मैदान म्हणजे केवळ शून्याकार. समुद्र किनाऱ्यावर उभें राहिलें असतां, आपल्याला लांब अंतरावर जसें क्षितिज दिसतें, तसें या मैदानांतहि, लांबपर्यंत चोहोंबाजूला जिकडे जिकडे दृष्टी पोंचते तिकडे तिकडे क्षितीज दिसत असतें.

समुद्रांत वाऱ्याच्या योगानें जशा लहान मोठ्या लाटा उत्पन्न होऊन त्या योगें वाहून येणाऱ्या कचऱ्यानें पाण्यांत लहान मोठीं बेटें उत्पन्न होतात; त्याचप्रमाणें याही मैदानांत वाऱ्याच्या सोसाट्यानें जमिनीवरून वाळू वर उडून ती दुसऱ्या ठिकाणीं जाऊन पडते, व त्यामुळें जेथें मैदान सपाट होतें, त्या ठिकाणीं लहान मोठ्या वाळूच्या टेकड्या व उंचवटे, यांच्या रांगा होतात. एखादा प्रवासी या टेकड्यांच्या खुणांवरून वाट चालूं लागेल तर तो साफ फसल्याशिवाय रहाणार नाहीं. या मैदानांत एक प्रकारचा भयंकर वारा सुटत असतो. त्या वाऱ्याची माहिती त्याच लोकांना असते. हा वारा आतां सुटणार आहे, याचीं पूर्व चिन्हें दिसूं लागतांच वाटाडे वाटसरूंना जमिनीवर उपडे निजण्यास सांगतात व उंटांना वाऱ्याच्या दिशेकडे पाठ करून जमिनीवर खालीं बसवितात. अशा रीतीनें तो भयंकर वारा सर्वांच्या पाठीवरून निघून जातो. या वाऱ्याबरोबर जमिनीवरची वाळू वर हवेंत उडाल्यामुळें आकाशांत एक प्रचंड ढग आल्याप्रमाणें दिसून कांहीं वेळ सूर्यप्रकाश दिसेनासा होतो. या मैदानाच्या सीमेवर पाण्याचा पुरवठा चांगला आहे; व तेथून उदकानें समृद्ध झालेल्या अनेक नद्या वाहात असतात; यामुळें तेथें फळफळावळ, भाजीपाला, सुवासिक फुलें, यांची चांगली समृद्धि असते. या ठिकाणीं रहाणाऱ्या लोकांना, वरील अनुकूल परिस्थितीमुळें, आपल्यासारखे भाग्यवान प्राणी जगांत कोणी नाहींत असें वाटतें.

## ५ अरबांचा स्वभाव.

अरब लोकांची जन्मभूमी हींच वालुकामय मैदानें होत. मनुष्याच्या अंगांत कांहीं कांहीं गुण त्याच्या जन्मभूमीवरून येत असतात; त्याचप्रमाणें अरब लोकांच्या अंगांतील कांहीं विशेष गुण

त्यांच्या जन्मभूमीला योग्य असेच आहेत. त्यांच्या भटकण्याच्या प्रदेशाला मर्यादा नाहीं. त्यांत कोणा एकाची सत्ता नाहीं. अशा प्रदेशांत वाटेल तेथें रहावें, व लागेल तितके दिवस वस्ती करावी, अशाप्रकारें जन्मांत कोणाचा हुकूम किंवा सत्ता ज्यांनां माहीत नाहीं, त्यांना स्वातंत्र्य प्राणापेक्षांही प्रिय असल्यास आश्चर्य नाहीं. त्यांच्या त्या वालुकामय मैदानांतील आयुष्यक्रमामुळें त्यांच्या अंगांत कंटकपणा व शीघ्र जाणीवशक्ति, हे गुण आले आहेत. कारण या निर्जल अफाट मैदानांतून प्रवास करून पार पडणें, हा एक मोठा दिग्विजयच आहे. वाटेंत निरनिराळ्या प्रसंगीं अंगावर चालून येणाऱ्या प्रसंगांना तोंड देण्यासाठीं प्रवाशाला आपल्या सर्व युक्त्या, उपाय आणि शारीरिक कंटकपणा जय्यत तयार ठेवणें भाग पडतें. अरबलोक सरळ स्वभावाचे आहेत; परंतु भांडण किंवा तंटा म्हटला म्हणजे त्यांत अनेक वेळां प्राणहानि होऊन सुध्दां तें भांडण कित्येक पिढ्या पुरत असतें. या त्यांच्या विलक्षण स्वभावाचें कारण त्यांच्या या निष्ठुर प्रदेशांतील रहाणींत आहे. याच्या उलट अरब लोकांइतके अतिथि–सत्कार–प्रिय असे जगांत दुसरे लोक नाहींत. एखाद्या थकले भागलेल्या प्रवाशाला कोठें तरि निवाऱ्याची जागा, व पोटभर अन्न याची फारच जरूरी असते. असा प्रवाशी प्रसंगवशांत् एखाद्या अरबाच्या तंबूंत गेला, तर तो त्याचें मोठ्या आनंदानें इतकें आदरातिथ्य करतो कीं, तशा प्रसंगीं सुद्धां, इतक्या सज्जन मनुष्याला आपल्यामुळें इतका त्रास पडला, म्हणून प्रवाशी खजील होऊन जातो. पाहुण्यासाठीं अरब यजमान आपल्या जिवाची शिकस्त करितो, व अशा वेळीं आपल्याला उद्यां उपाशी राहण्याचा प्रसंग पडेल, याचें त्याला भानही रहात नाहीं. अरब लोकांचे आदरातिथ्याचे नियम फारच विलक्षण आहेत. अरबाच्या घरीं ज्यानें एक वेळ अन्नग्रहण केलें, ज्याला अरबानें आपला

स्नेही किंवा पाहुणा समजून मान दिला, तो पुढें कांहीं कारणावरून जरी त्याचा कट्टा शत्रू झाला, तथापि अरब आपला पूर्वीचा स्नेहभाव कधींही विसरत नाहीं.

अरब लोकांना तीन गुणांचा मोठा अभिमान वाटतो. आपल्या सुंदर भाषेचें पूर्ण ज्ञान असून, तींत अस्खलित वक्तृत्व करतां येणें; युद्धांत अवश्य लागणाऱ्या हत्यारांच्या उपयोगांत प्राविण्य असून घोडयावर उत्तम प्रकारें बसणें, आणि अतिथि–अभ्यागताचें आदरातिथ्य करणें. या तीन गुणांच्या शिवाय कोणताही अरब सुशिक्षित वर्गांत मोडत नाहीं.

अरबाला मुलगा झाला असतां, अथवा अरब जातीच्या घोडीला शिंगरू झालें असतां, जाहीर रीतीनें मोठा सुखसोहाळा करीत असतात. त्यांतून जातिवंत अरब घोडीला शिंगरू झालें असतां त्यांना अत्यानंदच होतो. जातिवंत घोडयांच्या पैदाशीबद्दल त्यांना फारच अभिमान वाटतो. कारण, सर्व जगांत सर्व घोडयांच्या जातींत तो श्रेष्ठ प्रतीचा ठरून, सर्वांत अधिक मौल्यवान ठरतो.

## ६ अरबांचें औदार्य.

एके वेळीं तीन स्नेही एका ठिकाणीं बसून इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत असतां "आपल्या तिघांच्या अरब स्नेह्यांमध्यें खरा थोर अंतःकरणाचा कोण" असा विषय निघाला. वाढतां वाढतां हा वाद बराच वाढला, व शेवटीं एकानें असें सुचविलें कीं, "आपण तिघांनींही आपापल्या मित्राकडे मदतीच्या हेतूनें जावें; व नंतर ज्याचा मित्र सर्वांत जास्त मदत करून आपल्या मित्राचा गौरव करील त्यालाच श्रेष्ठ पदाचा मान द्यावा." तिघांनांही हें मान्य झाल्यावर ते तिघेही आपापल्या मित्राची परीक्षा पाहाण्याकरितां निघाले. त्यापैकीं एकाचा 'अबदुल्ला' या नांवाचा एक स्नेही होता,

त्याच्याकडे तो मदत मागण्याच्या हेतूनें गेला. अब्दुल्ला त्यावेळीं आपलें प्रवासाचें सामानसुमान एका उंटावर लादून प्रवासास निघण्याच्या तयारींत होता. आपला मित्र प्रवास करीत असून त्याला आपल्या मदतीची अपेक्षा आहे असें त्याला समजतांच, तो लगेच आपल्या उंटावरून खालीं उतरला, व सामानसुमानानें लादलेला तो उंट त्यानें मोठ्या प्रेमानें आपल्या स्नेह्याच्या स्वाधीन केला. उंटावर असलेल्या सामानांत त्याची एक तरवार होती. त्या तरवारीवर त्याचा जीवप्राण असे, म्हणून तेवढी त्यानें आपल्या मित्राजवळ परत मागितली. अबदुल्ला व्यापाराकरितां सोन्याचीं चार हजार नाणीं बरोबर घेऊन परदेशांत माल खरेदी करण्याकरितां जात होता; परंतु आपल्या मित्राला उंटाचें दान करतांना या नाण्याकडे त्यानें लक्षही दिलें नाहीं.

नंतर हे तिघेही त्यांतील दुसऱ्या एकाचा 'कैस' या नांवाचा एक अरब स्नेही होता त्याची परीक्षा पाहाण्याकरितां त्याच्याकडे गेले. त्या वेळीं कैस हा घरांत निजलेला होता. त्याच्या गुलामानें आपल्या धन्याचा स्नेही प्रवास करीत असून तो येथें मदतीच्या आशेनें आला आहे, हें पाहून तो प्रथम विचारांत पडला. भर झोंपेंत असलेल्या आपल्या धन्याला त्याच्यानें जागें करवलें नाहीं; परंतु त्या गुलामानें आपल्या धन्याच्या सोन्याच्या नाण्यांनीं भरलेल्या पिशव्या त्याच्या स्वाधीन करून, आणखी प्रवासाला योग्य असा एक चांगला उंट व एक गुलाम त्याला दिला, व त्याची रवानगी केली. थोड्या वेळानें कैस जागा झाला, व त्याला हें सर्व वर्तमान समजलें. गुलामाची त्यानें फारच प्रसंशा केली, व या उत्तम कामगिरीबद्दल त्याला स्वातंत्र्य देऊन संतुष्ट केलें. आपल्याला आपल्या मित्राला भेटावयास मिळालें नाहीं, याबद्दल मात्र त्याला वाईट वाटलें; आणि तो म्हणाला; " मी जर जागा असतों, तर त्याला याच्याहीपेक्षां आणखी कांहींतरी अधिक दिलें असतें. "

आतां राहिला तिसऱ्याचा स्नेही. त्याची परीक्षा पाहाण्याकरितां हे तिघेही त्याच्याकडे गेले. त्याचें नांव 'आरबा' असें होतें. तो वयानें म्हातारा, अशक्त आणि बहुतेक आंधळा होता. तो आपले दोन हात दोन गुलामांच्या खांद्यावर ठेवून नमाज पढण्याकरितां हळूहळू चालला असतां, त्याची व या वरील त्याच्या स्नेह्याची वाटेंत गांठ पडली. दोघांचें थोडें बोलणें झाल्यावर, आरबाला आपला स्नेही प्रवास करीत असून, त्याला आपल्या मदतीची गरज आहे, व त्याकरितां तो येथें आला आहे, असें समजतांच तो मोठ्या दुःखानें म्हणाला; "अरेरे! माझ्याजवळ द्रव्य नाहीं, फक्त हे दोन गुलाम तेवढे आहेत, ते खुशाल घेऊन जा." त्याच्या मित्रानें ही प्रेमाची थोर देणगी स्वीकारली नाहींच हें सांगणें नको; परंतु अरबानें फारच आग्रह करून आपल्या त्या गुलामांची आपल्या मित्राबरोबर रवानगी करून दिली, आणि आपण नुसता काठीचा आधार घेत घेत मोठ्या कष्टानें पुढें पुढें पाऊल टाकूं लागला!

वर सांगितलेल्या तीन स्नेह्यांच्या तीन स्नेह्यांमध्यें मनाचा सर्वांत थोर कोण, हें आतां सांगण्याचें कारण नाहीं. वाचकांच्या परीक्षेंत आमच्याप्रमाणें आरबाच उतरला असेल. पहा बरें, त्या म्हाताऱ्यानें आपल्या मित्राची गरज भागविण्याकरितां त्याच्या संग्रहीं त्याचें स्वतःचें म्हणून जें कांहीं होतें तें देऊन टाकून केवढें मित्रप्रेम दाखविलें?

## ७ अरबांचें काव्य.

अरब लोकांना काव्य फार प्रिय असतें. त्यांच्या देशांतील पूर्वीच्या काळचा सर्व इतिहास काव्यमय आहे. काव्य ही कला त्यांना इतकी प्रिय वाटते कीं, एखादा नवीन कवि दृष्टीस पडला तर ते त्याचें मोठ्या प्रेमानें अभिनंदन करितात. कांहीं कांहीं वेळीं तर कवीच्या गौरवास्तव लोकांनीं मोठमोठे उत्सव केलेले आहेत.

पूर्वीं दरवर्षीं कांहीं कांहीं ठिकाणीं जत्रा भरत असत. अशा जत्रेमध्यें अनेक कवि आपापल्या कविता घेऊन सर्वांत श्रेष्ठ कोणती हें ठरवीत असत. जमलेल्या चांगल्या गुणी लोकांच्या पुढें हे कवि आपापल्या कविता वाचीत, व ज्याची कविता सर्वांत श्रेष्ठ प्रतीची ठरे, ती रेशमाच्या कपड्यावर सोनेरी अक्षरांनीं लिहून ती मक्का येथील सुप्रसिद्ध अशा जुन्या प्रार्थनामंदिरांत टांगून ठेवीत असत. तेथें त्या सर्व लोकांच्या वाचण्यांत येत, व कवीची कीर्ति जिकडे तिकडे पसरे. अरब लोक मूळचे भटकणारे, आडदांड, त्यांना कायद्याचें बंधन नाहीं. अशा लोकांना काव्य इतकें प्रिय वाटावें, हें मोठें आश्चर्य आहे. परंतु काव्यप्रेमाची वृद्धि जितकी सुधारलेल्या व गजबजलेल्या शहरांत होते, त्यापेक्षां मोकळ्या नैसर्गिक वातावरणांत किंवा रानावनांत तसेंच अफाट निर्जल मैदानांत अधिक होते. आपल्या गुराढोरांना रात्रीच्या वेळीं चरवीत असतांना, अरबलोकांना कित्येक रात्री आकाशाकडे पाहात जागत बसावें लागतें. अशा वेळीं आकाशांत दिसणारे तारे व त्यांचा देखावा, हें ईश्वरनिर्मित काव्य त्यांच्या डोळ्यांपुढें असतें व त्यामुळें त्यांच्या नाजुक मनोवृत्ति हालून जातात. अरबस्थानांतील निरभ्र आकाश आणि त्यांतील नक्षत्रांचा देखावा, हेंच या अरबलोकांच्या काव्यस्फूर्तीचें कारण असावें, यांत संशय नाहीं.

तसेंच प्रभातकाळचा थंड व शांत प्रकाश, लतापल्लवरहीत अशा त्या उघडया टेंकडयावरील सूर्य प्रकाशामुळें हिरकण्याप्रमाणें चमकणारे वाळूचे कण, सभोंवार पसरलेला अफाट निर्जन प्रदेश, दोन प्रहरच्या वेळीं रखरखीत सूर्यप्रकाशांत हवेंत तळपणारें मृगजळ, संध्याकाळच्या वेळीं अस्तास जाणाऱ्या सूर्य गोलार्धांतून पडणाऱ्या रक्तवर्ण प्रकाशानें माणकांप्रमाणें आल्हाद देणारा तो वालुकामय भूप्रदेश, इत्यादि प्रकार अरबलोकांच्या काव्यस्फूर्तीला कारण झाले

असावेत असें दिसते. अरबांचें काव्य फार जुन्या काळापासून प्रसिद्ध आहे. जॉबच्या ग्रंथांतील सुंदर काव्याचें चित्र माझ्या वरील म्हणण्याला भरपूर पुरावा आहे. इतकें सुंदर काव्य अद्याप जन्मास आलें नाहीं, असें म्हटलें असतां चालेल.

## ८ ईश्वराची कल्पना.

या भयाण मैदानापासून चांगले असे बरेच गुण शिकण्यासारखे आहेत. या मैदानांतून प्रवास करणारा मनुष्य अन्नाकरितां किंवा आश्रयाकरितां किती दीन होऊन जातो, हें प्रत्यक्ष अनुभवास आल्यानें त्या दयाळु जगच्चालकाची कृति किती अगम्य व अगाध आहे, याविषयीं मनुष्याचे ठायीं श्रद्धा उत्पन्न होते व भक्तिपूर्ण अंत:करणानें तो ईश्वर चरणीं लीन होतो. प्रवाशाची दीन अवस्था पाहून अरबांच्या अंत:करणांत दया, माया, प्रेम हीं उत्पन्न होतात, व तो परदु:ख निवारण करण्यासाठीं आपल्या जीवाची पर्वा करीत नाहीं. ही भयाण भयंकर मैदानें मूर्तिमंत मृत्यूच्या करकर वाजणाऱ्या दाढाच होत. यांमधून निर्विघ्नपणें पार पडून जाणें प्रवाशाला पुनर्जन्मच वाटत असतो. अशा प्रवाशाला या मैदानांतून प्रवास करीत असतां, एका सृष्टिकर्त्याशिवाय आपलें संरक्षण करणारा कोणी नाहीं, असें वाटून, त्याला पदोपदीं ईश्वराचें स्मरण होत गेल्यास आश्चर्य नाहीं. त्याला एका परमेश्वरावरच भरंवसा ठेवावा लागतो. यामुळें त्याचें मन, भक्ति व सद्वासना यांनीं अगदीं नम्र होत जातें. ह्या भयंकर वाळूच्या मैदानांतून इब्राहीम प्रवास करीत असतां, त्याला वाट दाखविणारा फक्त आकाशांतील एक तारा होता. दुसरा कोणी नव्हता. याच आणीबाणीच्या प्रसंगीं ईश्वराच्या अगाध शक्तीचें त्याला यथार्थ ज्ञान प्राप्त झालें. या मृत्युलोकींची सर्व दैवतें त्या एका सर्वशक्तिमान प्रभूपुढें व्यर्थ आहेत; व दैवतांचीं भक्ति ही खरी भक्ति न होतां ती करण्याकरितां मनुष्याचा काल व्यर्थ

जातो, याची त्याला पूर्ण जाणीव झाली. दुसऱ्या एका मैदानांतून मोझेस ( मुसा अ० ) प्रवास करीत असतां एका सर्वशक्तिमान ईश्वराशिवाय आपला पाठिराखा दुसरा कोणी नाहीं, अशी त्याची खात्री झाली. जिवावरच्या अनेक प्रसंगांतून निभावून जाण्याला फक्त एका ईश्वराचीच कृपादृष्टि पाहिजे. मुहम्मद पैगंबर स्वतः जेव्हां ह्या अरेबियाच्या मैदानांतून एकदां भटकत चालले होते, त्यावेळीं सृष्टीचा तो भयाण अक्राळविक्राळ देखावा पाहून, त्यांच्याही मनांत परमेश्वराच्या अगाध सामर्थ्याबद्दल पूर्ण खात्री पटली. " देव एक आहे, तोच नित्य आहे, आणि त्याची बरोबरी करणारें असें दुसरें दैवत नाहीं." वर सर्वमय आकाश, त्यांत चमकणारे तारे, व खालीं वाळुचा अफाट समुद्र, असा भयानक देखावा पाहून प्रवाशाला या ताऱ्यांच्या पलीकडे त्याचा नियंता असा श्रेष्ठ पुरुष असला पाहिजे, असें वाटूं लागतें; आणि मृत्युलोकांतून सुटल्यावर आपल्याला जर अक्षय सुखाचें स्थान पाहिजे असेल, तर तें या ताऱ्यांच्या पलीकडे असलें पाहिजे; व तें प्राप्त होण्यासाठीं आपल्याला त्या सर्वश्रेष्ठ अशा एका परमेश्वरावरच भरंवसा ठेऊन त्याचीच भक्ति केली पाहिजे, अशी सात्विक भावना त्याचे अंतःकरणांत उत्पन्न होते.

ग्रंथ संग्रहालय

# भाग २ रा.

## पूर्ववृत्त.

### विषय.


| | |
|---|---|
| १ मक्का शहरचें वर्णन | २ मक्केंतील व्यापार |
| ३ जमजम विहीर. | ४ काबा मशिद |
| ५ अरबस्थानांतील धर्म | ६ कुरेश घराणें, मूळ पुरुष हाशम |
| ७ हाशमचा धाकटा भाऊ | ८ अबदुल: मुत्तलिब हासमचा मुलगा. |
| ९ नोफल, अबदुल मुत्तलिबचा चुलता. | १० मुत्तलिबला बापाची मिळकत मिळते. |
| ११ जमजम विहिरीचा शोध | १२ विहीरींत सांपडलेल्या वस्तूंची वांटणी |
| १३ मुत्तलिबचा पुत्राकरितां नवस | १४ अब्दुल्लाचा प्राण वांचतो. |


### १ मक्का शहरचें वर्णन.

अरबस्थानच्या पश्चिमेस हिजाझ म्हणून एक देश आहे. त्यांत तांबड्या समुद्रापासून सुमारें पन्नास मैलांवर मक्का या नांवाचें एक शहर आहे. पृथ्वीवर आज जीं जुनीं शहरें म्हणून प्रसिद्ध आहेत, त्यांत याही शहराची गणना होते. हें शहर फार मोठें असून फार प्रेक्षणीय आहे. जेकबच्या कालाच्याही पूर्वींपासून मक्का हें व्यापाराचें मुख्य शहर होतें. कारण सिरिया देशांत जाणारा सर्व व्यापारीमाल, मुशाफर दक्षिणेकडून येथें प्रथम उतरीत, व नंतर येथून जिकडे तिकडे नेत. अरबस्थानच्या नैॠत्य दिशेला 'साबा' या नांवाचें आणखी एक शहर 'यमन' या प्रांतांत होतें. अरबस्थानांत हाच एक प्रांत सुपीक आहे. अरबस्थानच्या याच किनाऱ्यावर प्राचीनकाळीं फार मोठीं मोठीं शहरें होतीं, आणि शेवटची राणी याच प्रांतांतून सुलेमानला भेटावयास गेली होती.

## २ मक्केतील व्यापार.

आफ्रिकेंतून व हिंदुस्थानांतून यमन या प्रांतांत पुष्कळ प्रकारचा व्यापारी माल उतरत असे. यांत सोनें, जडजवाहीर, मसाल्याचे जिन्नस, हा मुख्यत: व्यापारी माल असे. येथून हा सर्व माल उंटाकडून खुष्कीचे मार्गानें सिरिया देशांत व अरबस्थानांतील सर्व मुख्य मुख्य व्यापारी पेठेंत जात असे. केव्हां केव्हां व्यापारी लोक आपला माल खपविण्यासाठीं इजिप्त व भूमध्यसमुद्र यांच्या किनाऱ्यावरील अनेक मोठमोठ्या व्यापारी पेठेंतही नेत असत. त्यावेळीं प्रवास करणें फारच धोक्याचें काम होतें. वाटेंत प्रवाशांना लुटून व वेळप्रसंगीं त्यांना ठारही मारून आपला उदरनिर्वाह चालविणारे चोर, लुटारू, यांची व्यापाऱ्यांना मोठी धास्ती वाटे. म्हणून ते चांगली सोबत मिळाल्याशिवाय एकटे दुकटे कधींच प्रवास करीत नसत. अशा वेळीं पुष्कळ व्यापारी हजार हजार उंटांचा तांडा एकत्र करून प्रवासाला निघत असत.

वर सांगितलेल्या वाळूच्या मैदानांत कांहीं ठिकाणीं लहान मोठे पाण्याचे झरे आहेत. या झऱ्यांच्या बाजूस गवत व खजुरीचीं झाडें होत असतात. अरब लोकांचा सर्व निर्वाह या खजुरीच्या झाडांवर होत असतो. या झाडांची लागवड व त्यांचें रक्षण, ते जिवापलीकडे करीत असतात. ज्या ठिकाणीं असा एखादा पाण्याचा झरा असतो, त्याठिकाणीं झऱ्याचें पाणी वाळूमध्यें जिरून जाऊं नये म्हणून तेथें एक विहीर बांधलेली असते, व त्या विहिरींत झऱ्यांतून वाहून येणारें पाणी मोठ्या काळजीनें व तजविजीनें सांठवून ठेवितात. ज्या ज्या ठिकाणीं असें पाणी असतें, त्या त्या ठिकाणीं खजुरीचीं झाडें थोडीं बहूत असतातच; तथापि कांहीं कांहीं ठिकाणीं तर तीं

पुष्कळ असतात. अशा ओलाव्याच्या ठिकाणीं अरब लोकांची खेडीं वसलेलीं आहेत. वाळूच्या मैदानांतून प्रवास करणाऱ्या मुशाफराबरोबर ज्यांस या ओलाव्यांच्या ठिकाणांची पूर्ण माहिती आहे असे वाटाडे असतात. ते आपल्या बरोबर असलेला उंटांचा तांडा अशा ठिकाणीं उतरवून विश्रांतीकरिता मुक्काम करितात. याठिकाणीं उंटांस विश्रांति दिल्यानंतर पुढील प्रवासाकरितां पाणी भरून घेतात. अशाप्रकारें प्रवासी मंडळी व त्यांचे भारवाहक उंट, विश्रांति घेऊन ताजेतवाने झाले म्हणजे पुन्हा पुढील प्रवासास सुरवात करितात. यमन पासून तों सिरिया देशापर्यंत वाटेंत अशा मुक्कामाच्या जागा सुमारें सत्तर आहेत, व मक्का हें शहर या दोन ठिकाणांच्या मध्यावर आहे.

## २ जमजम विहीर.

मक्का हें पवित्र शहर लांब व अरुंद असून त्याच्या सभोंवार उंच उंच डोंगर आहेत, व तें एका खोलगट जागेवर वसविलेलें आहे. येथील जमीन नापीक असून झाडमाडाचा कोठें वासही नाहीं. पृथ्वीवर नापीक ओसाड म्हणून जीं स्थानें प्रसिद्ध आहेत, त्यांपैकीं हें अरब व मुसलमान लोकांचें एक पवित्र स्थान आहे. असें सांगतात कीं, या प्रदेशांतून अरबलोक भटकत असतांना हाजरा व इस्माइल हीं दोघें हल्लीं मक्का आहे त्या ठिकाणीं आलीं. इस्माईल तहानेनें व्याकुळ झाला असतां, हाजरानें आपल्या मुलाकरितां पाणी शोधण्याची अगदीं पराकाष्ठा केली; परंतु तिला पाणी म्हणून कोठेंच आढळेना. शेवटीं तिनें आपल्या मुलाला जमिनीवर ठेऊन दिलें, व आपण सफा आणि मरवा या डोंगराच्या मधील प्रदेशांत पाणी आढळेल, अशा आशेनें तिकडे धांवत गेली. जेव्हां ती आपल्या मुलाजवळ परत आली, त्यावेळीं मुलाच्या पायाजवळ एक थंडगार स्वच्छ पाण्याचा झरा वाहात आहे, असें पाहिलें. याच झऱ्याला पुढें 'जमजम' नांव प्राप्त होऊन आजपर्यंत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ... क्र. ५१२५

सर्व यात्रेकरूंचे जमजम मोठें पवित्र तीर्थ म्हणून मानलें जात आहे. याच स्थानानजिक मक्का शहर वसविलेलें आहे. पुढें कांहीं काळ गेल्यावर इस्माइलचे त्याच प्रदेशांतील एका सत्ताधारी अशा संस्थानिकाच्या कन्येशीं लग्न झालें. अरबस्थानांत ज्या पुष्कळशा टोळया आहेत, त्या याच इस्माइलला आपला पूर्वज म्हणून मान देतात.

## ४ काबा मशिद.

मक्का शहराच्या मध्यभागीं एक फार जुनी मशीद आहे. तिचा आकार चारही बाजूनें अगदीं सारखाच आहे. परंतु लांबीरुंदीपेक्षां उंची जरा अधिक आहे. मशिदीच्या चारही बाजूच्या भिंतींना कनाती, पडदे वगैरे लाविलेले आहेत. या मशिदीचें नांव 'काबा' असें आहे. हें ठिकाण मुसलमानधर्मांत पृथ्वीवर असलेल्या सर्व पवित्र क्षेत्रांत श्रेष्ठ मानतात. सौंदर्य या दृष्टीनें या मशिदीकडे पाहाल तर तें मुळींच नाहीं. परंतु नैसर्गिक साधेपणामुळें आज पृथ्वीच्या पाठीवर जीं म्हणून रमणीय स्थानें व मंदिरें आहेत, त्यांत याची प्रथम गणना करावी लागेल. या मशिदीच्या आंत प्रवेश केल्याबरोबर मशिदीच्या आग्नेय कोपऱ्यांत एक मोठा काळा दगड बसविलेला दृष्टीस पडतो. हा दगड आज कित्येक शतकें मोठा पवित्र म्हणून मानला जात आहे. अशी आख्यायिका सांगतात कीं, हा दगड फार प्राचीन काळीं स्वर्गांतून खालीं पडला, व त्या वेळीं त्याचा रंग स्वच्छ पांढरा शुभ्र होता. परंतु त्यानंतर पृथ्वीवरील पापांच्या संसर्गानें याचा रंग थोडाथोडा बदलत बदलत सध्याचा काळा रंग त्याला प्राप्त झाला. काबाबद्दल विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं; परंतु अरबलोक असें सांगतात कीं, ऑदमकरितां स्वर्गामध्यें प्रथम काबा बांधण्यांत आला. आज पृथ्वीवर जो काबा आहे, तो त्याच स्वर्गीय काब्याची हुबेहुब नक्कल

आहे. पुष्कळ वेळां तो नादुरुस्त झाला, व प्रत्येक वेळीं तो पूर्ववत् दुरुस्त होत गेला. त्यांत प्रथम इबराहीम व त्याचा मुलगा इस्माईल यांनीं दुरुस्ती केली. अरब लोकांच्या असेंही सांगण्यांत येत असतें कीं, याच ईबराहीमनें प्रथम खऱ्या ईश्वराची भक्ति लोकांना शिकविली, आणि काबा या पवित्र मंदिरासंबंधी कांहीं धार्मिक विधी त्यानेंच यात्रेकरूंना शिकविले.

## ५ अरबस्थानांतील धर्म.

इबराहीमनें एक नवीन धर्मपंथ स्थापन केला. पुष्कळ काळ पर्यंत अरबलोक याच धर्माचे प्रवर्तक व इबराहीमचे अनुयायी म्हणून चालत आले. परंतु क्रमाक्रमानें या पंथावरील त्यांचा विश्वास हळुहळु उठत चालला, व शेवटीं ते मूर्तिपूजक बनले. आम्ही आतां ज्या काळाचा इतिहास सांगणार आहोंत, त्या काळीं सबंध अरबस्थान देश मूर्तिपूजक बनला होता. त्यांच्या आराध्य देवता निरनिराळ्या असत. कांहीं सूर्य, चंद्र व तारे यांची भक्ति करीत; तर कांहीं काल्पनिक देवतांच्या प्रतिमा करून त्यांची भक्ति करीत. पारशी लोक ज्याप्रमाणें अग्नीलाच पूज्य मानून भक्ति करितात, त्याच प्रमाणें अरब लोकांमध्येंही अग्नीची पूजा करणारे कांहीं लोक असत. त्यामुळें दगड, धोंडें, धातू यांच्या अनेक प्रकारच्या मूर्ति घरोघर झाल्या होत्या. अशा रीतीनें काबा हें ईश्वराच्या भक्तीकडे जेव्हां प्रथम अर्पण करण्यांत आलें, त्या वेळीं त्यांत आराध्य देवता म्हणून मूर्तीच स्थापन केलेल्या होत्या. इतिहासाच्या सहाव्या शतकामध्यें वर्षाचे दिवस ३६०, म्हणून प्रत्येक दिवशीं एक नवीन देवता आराधनेकरितां असावी, म्हणून ३६० मूर्ति करून ठेविल्या होत्या. या मूर्ति निरनिराळ्या आकाराच्या असत. कांहींना पक्ष्यांचा आकार तर कांहींना जनावरांचा आकार असे. त्या पैकीं एक तर इबराहीमचीच मूर्ति होती.

सारांश मशिदींत पुष्कळच मूर्ति असत, परंतु प्रत्येक मूर्तीस त्यांच्या मानाप्रमाणें कमी अधीक महत्व देण्यांत येत असे. सर्वांत श्रेष्ठ हुबलची मूर्ति असे. या मूर्तीला एका भव्य मनुष्याचा आकार दिलेला होता. ही प्रतिमा तांबड्या दगडाची कोरून केलेली होती व तिच्या हातांत पंखरहीत सात बाण दिलेले होते. एखाद्या महत्वाच्या प्रश्नाचा निकाल लावण्याच्या वेळीं अरब लोक हे पंखरहित बाण टाकून निकाल लावून घेत असत. हा सर्व खेळ त्या हुबलच्या मूर्तीसमोर होत असे, व बाण टाकण्यानें जो निकाल होई, तो हुबलनें दिला, अशी त्यांची समजूत असे.

त्या काळीं काबा मंदिराची योग्य व्यवस्था ठेवणें, आणि जे यात्रेकरू भक्तिभावानें मूर्तीच्या दर्शनाकरितां व पूजेकरितां येत, त्यांच्या अन्नपाण्याची व्यवस्था लावणें, हें महत्वाचें कर्तव्य मानण्यांत येत असे. आणि सर्वांत मानानें, पराक्रमानें व द्रव्यानें जो श्रेष्ट असेल, त्याच्याकडे तें काम सोंपविण्यांत येत असे. अशा निवडलेल्या पुढाऱ्याला ज्याप्रमाणें धार्मिक बाबतींत श्रेष्ठपणाचा मान असे, त्याचप्रमाणें राजकीय बाबतींत परचक्र निवारण करणें, वेळीं तह करून लोकांत शांतता राखणें, इत्यादि जबाबदारीहि त्याच्यावरच सोंपविलेली असे.

### ६ कुरेश घराणें, मूळ पुरुष हाशम.

'कुरेश' हा शब्द कर्श ह्या शब्दापासून झालेला आहे. कर्श हें समुद्रांतील एका धिप्पाड जनावराचें नांव आहे. हा प्राणी समुद्रांतील सर्व प्राण्याला अंकित करणारा असा समजला जातो. या काळांतील लोकांना 'कुरेश' म्हणण्याचें कारण, ह्या कुळानें अरबस्तानांतील इतर सर्व कुळांना जिंकलें होतें हें होय.

इसवी सनाच्या पांचव्या व सहाव्या शतकामध्यें मक्का शहरीं 'कुरेश' हे घराणें मोठ्या भरभराटीला आलेलें होतें. या वेळीं या

घराण्याकडे जरी राजसत्तेचा मान आलेला होता, तथापि त्या घराण्यांतील कित्येक घरंदाज लोक व्यापार करून आपला चरितार्थ चालवीत असत. या घराण्यांतील जो पुरुष सर्वांत श्रेष्ठ असे, त्याचाच मक्का शहरांतील लोकांवर दरारा, वजन आणि सत्ता असे. या वेळीं कुरेश घराण्यांतील सत्ताधारी ' हाशम ' या नांवाचा एक सन्माननीय पुरुष होता. याचा जन्म इ. स. ४६६ मध्यें झाला. त्यानें प्रथम व्यापार करून अपार संपत्ति मिळविली, आणि नंतर तो मक्का शहर भरभराटीला आणण्याच्या प्रयत्नास लागला. मक्का व मक्केच्या पूर्वे कडील व्यापाराच्या मुख्य पेठा, याच्या दरम्यान व्यापारी मालाची ने आण करण्याकरितां त्यानें लमाणांचे तांडे ( कॅरेव्हान ) तयार केले. प्रत्येक वर्षीं हिंवाळा सुरू झाला म्हणजे हे उंटाचे तांडे यमन प्रांतांत व्यापारी माल घेऊन जात, आणि उन्हाळा सुरू झाला म्हणजे सिरिया देशाकडे सफर करीत. यात्रेच्या दिवसांत मक्का शहरांत येणाऱ्या यात्रेकरूंना राहण्याची व अन्न पाण्याची ददात पडूं नये म्हणून तो फारच काळजी घेत असे. प्रसिद्ध "**जमजम**" विहीर या काळीं साफ बुजून गेलेली होती; इतकेंच नव्हे तर मध्यंतरीचा काळ निष्काळजी पणांत गेल्यामुळें या पवित्र विहीरीचें ठिकाणही लोकांच्या स्मरणांतून गेलें होतें. अशा वेळीं हाशमनें यात्रेकरूंच्या सोईसाठीं जागोजाग पाण्याची मोठमोठीं टांकी बांधिलीं, आणि जिकडून पाणी आणतां येईल अशा सर्व ठिकाणांहून पाणी आणून शहरांत पाण्याची समृद्धि केली होती.

हाशम लोककल्याणाकरितां तन, मन व धन अशा तिनही बाजूनें मेहनत घेत होता; तरि सुद्धां परमेश्वरानें त्यास कसोटीला लावण्याचा एक प्रसंग घडवून आणिला. तो असाः—

एके वर्षीं त्या प्रांतांत मोठा भयंकर दुष्काळ पडला, आणि अन्नपाण्यावांचून लोक मृत्युमुखीं पडूं लागले. जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. अशा प्रसंगीं लोकांच्या रक्षणाकरितां हाशमनें तनमनधनानें

सारखा प्रयत्न चालविला. धान्य संपादन करण्याकरितां तो स्वतः सिरिया प्रांतांत गेला, व तेथें पुष्कळ धान्य खरेदी करून, तें सर्व उंटावर लादून तो मक्केस परत आला, आणि मुक्त हस्तानें त्यानें तें सर्व धान्य दुष्काळपीडित लोकांच्या घरोघर पोंचतें केलें.

धान्याची समृद्धि झाल्यावर मांसाची उणीव भासूं लागली. त्यावेळीं हाशमनें आपले स्वतःचे शेंकडों उंड मारून ती भरून काढली. साराश अशा बिकट प्रसंगीं हाशमनें जें अपूर्व औदार्य प्रगट करून अनाथांस साह्य केलें, त्यामुळें त्याची कीर्ति अजरामर झाली.

### ७ हाशमचा धाकटा भाऊ.

मक्का शहरानजिक 'यसरब' या नांवाचें एक प्रसिद्ध शहर होतें; त्या शहरांत रहाणाऱ्या एका 'बनी नज्जार' नामक सरदाराच्या कन्येशीं हाशमनें लग्न केलें. पुढें थोड्याच वर्षांत त्यांस एक मुलगा झाला; त्याचें नांव त्यानें 'शैबा' असें ठेविलें. शैबा हा मुलगा अल्पवयी असतांच त्याला बरोबर घेऊन हाशमनें सिरिया प्रांतांत व्यापाराकरितां सफर केली. हीच सफर कर्मधर्मानें त्याची शेवटची झाली. मक्का शहरांतून तो जो गेला, तो परत आला नाहीं. तेथें मृत्यूनें त्याला गांठलें व त्याच्या मागें त्याच्या धनदौलतीला मालक म्हणून त्याचा लहान मुलगा शैबा राहिला. हाशमचा धाकटा भाऊ 'मुत्तलिब' या नांवाचा एक होता; त्यानें शैबा जाणता होऊन मक्का शहरची व्यवस्था पाहाण्यास लायक होईपर्यंत त्याचा मुकत्यार म्हणून त्याच्या दौलतीची सर्व व्यवस्था चालविली.

### ८ अबदुलमुत्तालिब हाशमचा मुलगा.

शैबा आपल्या आईबरोबर यसरब शहरीं राहिला होता. पुढें कांहीं काळ लोटल्यावर मुत्तलिब, यसरब शहरीं गेला, आणि शैबास बरोबर घेऊन परत मक्का शहरीं आला. त्यावेळीं या मुलासंबंधानें चमत्कारिक अफवा पसरल्या, आणि मुत्तलिबनें हा कोणाचा तरी मुलगा

धरून आणला, असा पुष्कळ लोकांचा समज होऊन, त्या मुलास–'अबदुल–मुत्तलिब' मुतलिबचा गुलाम, अशा नांवानें लोक त्याला संबोधूं लागले. पुढें त्याचें हेंच नांव जगजाहीर होऊन इतिहासांतही त्याच नांवानें त्याची प्रसिद्धि झाली.

## ९ नोफल, अबदुलमुत्तलिबचा चुलता.

शैबा वयांत आल्यावर मुत्तलीबनें, त्याच्या वडिलांची सर्व मिळकत व धार्मिक व राजकीय अधिकार त्याच्याकडे सोंपवून दिले; व आपल्या बंधूच्या ऋणांतून तो मुक्त झाला. परंतु ही गोष्ट त्याच्या नोफल नांवाच्या दुसऱ्या भावास पसंत पडली नाहीं. त्यानें शैबाचा होईल त्या मार्गानें छळ करण्याचा आणि त्याच्या इतमामास कमीपणा आणण्याचा प्रयत्न चालविला. भावाचें हें कृत्य मुत्तलिब यास आवडलें नाहीं. आपल्या निराश्रित पुतण्याचा आपल्या भावाकडून असा होत असलेला छळ पाहून त्यास फार वाईट वाटलें, आणि त्यानें ती इत्थंभूत हकीकत शैबाच्या आजोळी यसरब येथें कळवून, शैबाच्या हक्काचें वेळींच रक्षण करण्याविषयीं सूचना केली. ही हकीगत पोंचतांच तेथून ऐंशीं हत्यारबंद लोक रात्रीचा दिवस करून मक्का शहरीं येऊन दाखल झाले, व काबामशिदीसमोर आपापलीं शस्त्रें बाहेर काढून ते उभे राहिले. आणि "जीव हवा असेल, तर मुलाच्या हक्काला काडीभर ही धक्का पोंचणार नाहीं, अशी सर्वांसमक्ष शपथ घे नाहीं तर तुझें शिर उडवितो;" अशी त्यांनीं नोफलला धमकी दिली. हा प्रसंग पाहतांच नोफल गर्भगळित झाला. त्यानें लगेच कुरेश घरण्यांतील पुढाऱ्यांसमक्ष "या मुलाच्या द्रव्याला, हक्काला, मानपानाला, किंवा अधिकाराला माझ्यापासून काडीमात्र त्रास पोंचणार नाहीं" अशी शपथ घेतली.

## १० अबदुलमुत्तलिबला बापाची मिळकत मिळते.

शैबा उर्फ अबदुलमुत्तलिब अशाप्रकारें आपल्या चुलत्याच्या जाचांतून मोकळा झाला खरा, तथापि त्यास आपल्या पित्याची सर्व सत्ता व सर्व

वतन पूर्णपणें हातांत येण्याला कित्येक मतलबी, दुष्ट अशा शत्रूंशीं झगडावें लागलें. त्याचे कांहीं शत्रू असे होते कीं, अबदुलमुत्तलिब आपल्यापेक्षां वरच्या दर्जाला पोंचू नये एवढीच फक्त ते इच्छा करीत होते. शेवटीं त्याच्या आयुष्यक्रमांत एकदम क्रांति घडणारी अशी एक गोष्ट घडून आली; ती अशी:—

### ११ जमजम विहिरीचा शोध.

मक्का शहरांतील फार प्राचीन काळच्या विहिरीची जागा कोठें आहे, हेंही कोणाच्या स्मरणांत राहिलें नव्हतें. पण अबदुलमुत्तलिबला या विहिरीची जागा शोधून काढण्याची एक कल्पना सुचली, व तो त्याप्रमाणें ती जागा शोधून काढण्याच्या उद्योगास लागला. तो हारीस या नांवाच्या आपल्या मुलाच्या सहाय्यानें जमिनी उकरण्याचें काम मोठ्या नेटानें व निश्चयानें करूं लागला. सरतेशेवटीं त्याच्या प्रयत्नांस त्याला यश आलें, आणि त्या विहिरींत तीनशें वर्षांपूर्वीं झालेल्या एका मोठ्या लढाईंत पुरून ठेवलेली बरीच धनदौलत त्याला सांपडली. या द्रव्याबरोबर कांहीं तरवारी व चिलखतेंसुद्धां त्याला सांपडली. त्यांनीं ती विहीर अधिक खोल खणण्याचें काम चालविलें, व नंतर त्यांत त्यांना भरपूर पाण्याचा झरा लागला.

### १२ विहिरींत सांपडलेल्या वस्तुंची वांटणी.

अशाप्रकारें हा प्रकार घडताच कुरेश घराण्यांतील कांहीं लोकांनीं ही विहीर व त्यांत सांपडलेलें द्रव्य, हें अबदुलमुत्तलिबच्या एकट्याच्या मालकीचें नसून, त्यावर या सर्व घराण्याचा हक्क आहे, असें भांडण सुरू केलें. या भांडणाचा निकाल सामोपचारानें आपसांत लागेना. तेव्हां बाण टाकून या तंट्याचा निकाल करून घ्यावा असें सर्वांनीं ठरविलें. त्यांत तीन प्रश्नावर बाण टाकण्यांत आले. एक बाण हें नवीन सांपडलेलें द्रव्य एकट्या अबदुलमुत्तलिबच्या मालकीचें आहे काय, असा होता. दुसरा अबदुलमुत्तलिबचें नसेल, तर तें कुरेश

घराण्याचें आहे काय, व तिसरा या दोघांचाही हक्क नसेल तर तें द्रव्य काबा मशिदींतील देवांच्या मालकीचें आहे काय, असा होता. द्रव्याच्या मालकीच्या प्रश्नाचा निकाल देवांच्या तर्फे लागला, व तलवारी, चिलखत या प्रश्नांचा निकाल अबदुलमुत्तलिबच्या बाजूनें झाला. कुरेश घराण्यांतील लोकांना कांहींच प्राप्ति झाली नाही, म्हणून त्यांना वाईट वाटलें. झाला निकाल तो हुबल देवानें दिला, तो सर्वांना मान्य करणें भाग पडलें. हुबल देवानें दिलेल्या निकालाप्रमाणें लोकांनीं सोन्याच्या लगडींचे पत्रे व खिळे पाडिले, आणि ते काबा मशिदीच्या दरवाजावर बसवून दिले, आणि अबदुलमुत्तलिबनें देवांच्या द्रव्याच्या रक्षणाकरितां, त्या सांपडलेल्या तलवारी बाहेरच्या बाजूला टांगून ठेविल्या.

## १३ अबदुलमुत्तलिबचा पुत्राकरितां नवस.

वरील हकीगत घडल्यानंतर हळुहळु अबदुलमुत्तालिबची सांपत्तिक स्थिति सुधारत चालली. त्याच्या संग्रहीं द्रव्य बरेंच राहूं लागलें, आणि द्रव्याच्या वाढीबरोबर त्याची कीर्ति दिवसेंदिवस वाढूं लागली. तो सुद्धां आपल्या बापाप्रमाणें यात्रेकरूंना अन्नदान देऊं लागला, आश्रय देऊं लागला व आपल्या बापाच्या कीर्तीत भर घालूं लागला. "जमजम" या विहिरीवर मुख्य व्यवस्थापक अबदुलमुत्तालिबच होता. अर्थात सर्व यात्रेकरूंना भरपूर पाण्याचा पुरवठा करण्याचें काम त्यालाच करावें लागे. अबदुलमुत्तलिबची कीर्ति व वजन चोहोंदिशांत पसरत गेलें; परंतु या त्याच्या भरभराटीच्या काळांतसुद्धां त्याच्या मनाला दुःख देणारी अशी एक गोष्ट होतीच. त्या काळीं आपल्या कुटुंबाच्या नांवलौकिकाकरितां, तसेंच आपल्या संपत्तीचा वारसहक्क पुढें अव्याहत चालविण्याकरितां, प्रत्येक घराण्यांतील मुख्य पुरुषाला, आपल्याला बरेच मुलगे असावेत असें वाटत असे. अबदुलमुत्तलिब तर त्या काळीं कीर्ति व संपत्ति या दोन्ही बाबतींत मक्काशहरांत सर्वांत श्रेष्ठ होता. तेव्हां आपल्याला

एकापेक्षां अधिक मुलगे असावेत, असें त्याला वाटूं लागलें; आणि त्यानें देवांना असा नवस केला कीं, "मला देवांनीं जर दहा मुलगे दिले, तर त्यांतील एक मी देवांना बळी देईन." हा नवस केल्यावर कांहीं वर्षे लोटलीं, व अबदुलमुत्तलिबला मुली व मुलगे होऊन त्याचा मनोरथ पूर्ण झाला; परंतु आता नवस कसा फेडावा, या विचारानें त्याची छाती धडधडूं लागली. देवांना कांहीं तरी नवस करणें फार सोपें वाटतें, परंतु तो फेडण्याची वेळ आली म्हणजे पुष्कळ धैर्यवान पुरुषांचीही लटपट उडत असते.

### १४ अबदल्लाचा प्राण वांचतो.

अबदुलमुत्तलिबला नवसाप्रमाणें देवानें दहा मुलगे दिले, याशिवाय आणखी मुलीही दिल्या; तेव्हां आतां नवस फेडून आपल्या शब्दांतून मुक्त झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें त्याला वाटूं लागलें. नवस फेडण्याचें त्यानें टाकवेल तेवढें लांबणीवर टाकिलें. कारण त्याला आपल्या या नवसाबद्दल फारच वाईट वाटत होतें; परंतु देवांना केलेला नवस धुडकाऊन देण्याचें त्याला धैर्य होईना. शेवटीं तो चिंतातुर बाप आपल्या दहाही मुलांना बरोबर घेऊन काबा मशिदींत आला, आणि तेथें हुबल देवाचे दहा बाण घेऊन त्यांवर आपल्या दहापुत्रांचीं नांवें लिहिलीं, व ते देवापुढें टाकले; नंतर त्यांपैकीं एक त्यानें उचलून त्यावरचें नांव वांचलें. त्याच्या सर्वांत धाकट्या व अतिशयित लाडक्या मुलाचें नांव त्यावर होतें. अर्थात त्या मुलास बळी देण्याचा दुर्धर प्रसंग त्याच्यावर आला. तेव्हां अबदुल्लाच्या गळ्याला त्याच्या सर्व भावंडांनीं घट्ट मिठ्या मारिल्या, व एकच आकांत केला. त्याचें सर्व कुंटुंब दुःखसागरांत बुडून गेलें. त्यांनीं त्यावेळीं जो आकांत केला, तो ऐकून अबदुलमुत्तलिब देहभान विसरून गेला. तो मोठ्या प्रसंगांत सांपडला, त्यानें "अबदुल्लाच्या ऐवजीं मी दहा उंट देतों, ते देवांनीं मान्य करून घ्यावेत," असें म्हणून पुन्हां बाण टाकिले; परंतु

बाण अबदुल्लाच्याच नांवाचा निघाला. नंतर वीस उंट देऊं केले व त्यांची संख्या एका बाणावर लिहून दुसऱ्या बाणावर अबदुल्लाचें नांव घातलें. काय चमत्कार पहा, याही वेळीं अबदल्लाच्याच नांवाचा बाण निघाला. बापानें वीस उंटाच्या ठिकाणीं पुन्हा तीस उंट देऊं करून, अबदल्लाचा जीव वांचविण्यासाठीं त्यानें मोठ्या कळवळ्यानें देवाची प्रार्थना केली; तथापि निकाल पूर्वीचाच. त्यानें आपल्या त्या परमप्रिय मुलाच्या मोबदला देऊं करावयाच्या उंटांची संख्या दहादहांनीं वाढवून नव्वदांपर्यंत नेली, तरी तें देवाला मान्य झालें नाहीं. देवांचा आग्रह पाहून त्याच्या धैर्यानें ठाव सोडिला; व त्यानें आपल्या आवडत्या अबदल्लाच्या गळ्याला घट्ट मिठी मारिली. पुत्रप्रेमाच्या उमाळ्यानें तो बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. थोड्या वेळानें तो सावध झाला. त्याकाळीं नव्वद उंट देऊं करावयाचे म्हणजे अबदुलमुत्तलिब सारख्या श्रीमंत मनुष्याला सुद्धा हातांत भिक्षापात्र घेण्याची पाळी येणार होती, परंतु त्या गोष्टीची, त्याला अबदल्लाच्या प्राणासाठीं पर्वा वाटली नाहीं. पडलेल्या जागेवरून तो तसाच धडपडत मोठ्या कष्टानें उठला, व देवाच्या पायांवर मस्तक ठेऊन " शंभर, परंतु देवा, माझा अबदल्ला," असें ओरडला. शेवटीं देवांना त्याच्या आरोळ्याची दया आली. मंदिराच्या अधिकाऱ्यांनीं शंभर उंट व अबदल्ला, या दोघांच्या नांवानें दोन बाण शेवटचे म्हणून टाकिले. त्यांत शेवटीं शंभर उंटांचा बाण आला, व अबदुल्लाचा जीव बचावला. सर्वांच्या तोंडून अबदल्ला, अबदल्ला म्हणून आनंदाची आरोळी सुरू झाली, आणि अबदुलमुत्तलिबचें सर्व कुटुंब आपल्या घरीं मोठ्या आनंदानें परत आलें. नवस फेडण्यासाठीं अबदुलमुत्तलिबनें शंभर उटांची कत्तल केली, व तें मांस गोरगरिबांना वांटून टाकिलें. आपल्या मुलाच्या प्राणाचा मोबदला हें मांस आहे, म्हणून त्याच्या कुटुंबांत मात्र त्याला कोणी शिवलें नाहीं.

# भाग ३ रा.

## मुहम्मदाचा जन्म व बाळपण.

विषय


| | | | |
|---|---|---|---|
| १ | अबराह | २ | टायफचा शेजारद्रोह |
| ३ | मक्केवर स्वारी | ४ | चमत्कार |
| ५ | अबदल्लाचें लग्न | ६ | मुहम्मदाचा जन्म |
| ७ | हालीमा | ८ | बाळपण |


### १ अबराह.

अबदुलमुत्तालिबच्या हयातींत अबिसिनिया देशाच्या राजाचा अबराह नांवाचा एक प्रतिनिधी यमन प्रांताचा राज्यकारभार पाहात होता. त्याच्या राजधानीचें शहर साना हें होतें. आपल्या राज्यांत व्यापार धंदा चांगला वाढून प्रजा सुखी असावी, अशी त्याची फार इच्छा होती; म्हणून त्यानें निरनिराळ्या देशांत जाणारे रस्ते बांधिले, आणि व्यापाऱ्यांना जितक्या म्हणून सवलती देतां आल्या तेवढ्या त्यानें दिल्या. सिरिया व इराण या दोन देशांना जोडणारी व्यापारी पेठ त्यानें 'साना' ही केली. साना येथें सर्व प्रकारची व्यापारी देवघेव चालल्यामुळें त्या शहराला व्यापारी महत्व आलें. शिवाय आबराहनें शहरांत अनेक भव्य इमारती, सुंदर बागबगीचे, कारंजी, राजवाडा यांची रेलचेल करून, शहराला फारच उत्तम शोभा आणिली.

अबराहनें ख्रिस्ती धर्म स्वीकारिला होता, व या धर्माप्रमाणें त्यानें तेथें एक भव्य प्रार्थना मंदीरही बांधिलें होतें. मक्केंतील काबा मंदिराची पूर्वापार चालत आलेली कीर्ति त्याच्या कानांवर होती. तेथें मूर्तींची होत असलेली पूजा त्यानें समक्ष पाहिली होती; तेव्हां असा अधर्म करणाऱ्या लोकांचा त्याला फार राग येई, व तो त्यांचा द्वेष करी.

मक्केतील लोकांनीं मूर्तींची पूजा करण्याचें सोडून द्यावें, व आपल्या प्रार्थना मंदिरांत यावें, याकरितां रात्रंदिवस त्यानें अनेक प्रकारचे उपाय सुरू केले. तथापि मक्केतील लोकांचें मन वळेना. इतके अनिवार श्रम करून जेव्हां त्याच्या प्रयत्नांस यश आलें नाहीं, तेव्हां तो त्यांच्यावर अतिशय चिडला, व तलवारीच्या जोरावर त्या लोकांना, साना येथील ख्रिस्ती प्रार्थनामंदीर दाखविण्याचा त्यानें निश्चय केला.

वर सांगितल्याप्रमाणें आबराहाचा विचार ठरल्यावर, त्यानें एक मोठें सैन्य जमविलें, आणि त्याच्यापुढें एक भलें मोठें फडकणारें निशाण धरून, एकदम मक्केचा रस्ता धरिला. वाटेंत कांहीं भटकणाऱ्या टोळ्यांनीं त्याचा मार्ग अडविण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

## २ टायफचा शेजारद्रोह.

मक्केला जात असतांना त्याला वाटेचा जसजसा त्रास होत गेला, तसतसा त्याच्या अंतस्थ रागाला अधिकाधीक उकळ्या फुटूं लागल्या. सानापासून सुमारें चाळीस दिवसांच्या वाटेवर मक्का शहर आहे. मक्केला पोंचण्यापूर्वीं वाटेंत त्याला टायफ येथें मुक्काम करावा लागला. मक्केतील लोकांचे व टायफ मधील लोकांचें कांहीं कारणावरून मोठें हाडवैर पडलें होतें. ही संधी पाहून आबराहानें टायफमधील लोकांची आपल्याला मदत मागितली; व ती देण्यास ते आनंदानें तयार झाले. सैन्यांतील लोकांच्या अन्नपाण्याची व जनावरांच्या चाऱ्यापाण्याची योग्य व्यवस्था त्यानीं लाऊन दिली; आणि शेवटीं वाळूच्या मैदानांतून मक्केला जाणारी वाट दाखविण्याकरितां त्या लोकानीं आबराहाला चांगला माहितगार वाटाड्या आणून दिला.

टायफ व मक्का हीं दोन शहरें एकमेकांचे शेजारी असून, टायफ मक्केच्या नाशाला उद्युक्त झालें, या त्याच्या शेजारद्रोहासारख्या

निंद्य कृत्याबद्दल त्याला पुढें प्रायश्चित भोगावें लागलें, यांत आश्चर्य नाहीं. आबराहाचें सैन्य वाटाड्याच्या मदतीनें मक्केला जात असतां वाटेंत तो वाटाड्या मेला; त्याचें थडगें वाटेवरच बांधण्यांत आलें. मनुष्य मेल्यानंतर त्याचें नांव व त्याचें बरें वाईट कृत्य मागें रहातें, त्या प्रमाणें या वाटाड्यानें आपला दुर्लौकिक तेवढा मागें ठेविला. आबराहाची मक्केवरील ही स्वारी झाली, त्या दिवसापासून तों अद्यापपर्यंत या रस्त्यानें जाणारे येणारे वाटसरू लोक या वाटाड्याच्या थडग्यावर धोंडे फेंकून आपला धि:कार दाखवीत असतात.

त्या प्रांतांत जिकडे तिकडे आबराहाचा दरारा बसावा म्हणून त्याचे शिपायी, वाटेंत कोणीही भेटो, त्याला पिटाळून लावीत, आणि त्याच्या वैभवाची, त्याच्या राजधानीची, त्याच्या राज्यांतील कलाकौश-ल्याची ते रसभरित स्तुति गात असत. आबराहाच्या सैन्यांत इतर अनेक जनावरांबरोबर एक हत्ती होता. अरब लोकांना हत्ती हा प्राणी अगदीं अपरिचित आहे. त्याचें तें भव्य आणि ओबड धोबड शरीर, त्यामानानें बारीक डोळे, फडफडणारे कान आणि तें लांब चित्रविचित्र नाक पाहून अरबलोक भीतीनें गर्भगळित होऊन जात असत.

## २ मक्केवर स्वारी.

आबराहानें टायफ सोडल्यावर दुसऱ्याच दिवशीं अबदुल्लमुत्तलि-बचा व्यापारी माल घेऊन जाणारा दोनशें उंटांचा एक तांडा, व हें मक्केला जात असलेले सैन्य, या दोघांची वाटेंत गांठ पडली. शिपायांनीं त्या तांड्यावर हल्ला केला आणि सर्व उंटांची चार बाजूला दाणादाण उडवून दिली. जे उंट त्यांच्या तावडींत सांपडले त्यांना ते घेऊन गेले.

मक्केला पोचण्यापूर्वीं आबराहानें आपला एक जासूद पुढें पाठवून शहरांतील लोकांना आपल्या स्वारीचा हेतु जाहीर केला. जासूद त्यांना म्हणाला, " अबिसिनिया देशाच्या राजाच्या मुख्य अधिका-

त्याची तुमच्या एका केसालाही धक्का देण्याची इच्छा नाहीं. हे नागरीक जनहो, काबा येथें तुम्हीं मूर्तींच्या पूजा करितां, हा तुमचा अधर्म आहे, म्हणून काबा हें अपवित्र स्थान आहे; तेव्हां असें अपवित्रस्थान असूं नये, हीच फक्त आमच्या वरिष्ठाची इच्छा आहे. एवढें झालें म्हणजे कोठेंही रक्तपात न होतां ते स्वेदशी निघून जाणार आहेत.''

केवळ अशा निरोपानें कार्यसिद्धि होणें शक्य नाहीं, असें अनुमान कोणालाही सहज काढतां येईल. कारण मक्काशहरांत मोठ्या काळजी-पूर्वक संभाळून ठेविलेली, अत्यंत पूज्य अशी, काबा मंदिराशिवाय दुसरी सार्वजनिक वस्तु नव्हती. या पवित्र स्थानाच्या संरक्षणाकरितां ते आज जिवावर उदार झाले होते, तेव्हां अशा स्थानाच्या बचावाकरितां ते आपल्या घरादारावर पाणी सोडण्यास तयार झाले, यांत आश्चर्य कांहीं नाहीं.

अबराहाचा जासूद निरोप सांगून निघून गेल्यावर मक्केंतील सर्व पुढारी काबा मंदीरांत जमले, व जिवावर आलेला हा प्रसंग कसा टाळावा याच्याविषयीं त्यांनीं अनेक प्रकारें वाटाघाट केली. जो तो आपल्या अकलेप्रमाणें उपाय सुचवी. त्यांत जे तरुण होते त्यांनीं जिवंत राहून अपमान सोसण्यापेक्षां लढून मेलेलें बरें, याच्या शिवाय दुसरा मार्ग नाहीं, असें मोठ्या आवेशानें सुचविलें. शेवटीं त्यांनीं "आम्हीं लढण्यास तयार आहोंत" असा शेवटचा सणसणीत निरोप देऊन अबदुल्लमुत्तलिब यास अबराहाकडे पाठवून दिलें.

अबदुल्लमुत्तलिबनें आबराहाला प्रथम सामोपचारानें पुष्कळप्रकारें सांगून पाहिलें, नंतर खंडणीच्या स्वरूपानें द्रव्याचें आमिष दाखवून पाहिलें, परंतु तो आपला दुराग्रह सोडित नाहीं, अशी जेव्हां त्याची खात्री झाली, तेव्हां त्यानें मक्केंतील लोकांचा शेवटचा निरोप सांगितला.

हा लढाईचा प्रसंग टाळवा व आपला इष्ट हेतु सिद्धिस जावा म्हणून आबराहानें अबदुलमुत्तालिबला वश करण्याचा प्रयत्न चालविला. अबदुलमुत्तलिबचे पकडलेले उंट त्याचे त्याला त्यानें परत दिले, शिवाय बरेंच द्रव्यहि दिलें, तथापि सर्व व्यर्थ. "काबाचें संरक्षण अल्ला करणार," असा शेवटीं अबदुलमुत्तलिबनें जबाब दिला व मक्केची वाट धरिली.

अबदुलमुतलिब शहरांत आल्यावर सर्व शहरभर एकच गोंधळ उडून गेला. जे शूर लढवय्ये होते ते आपलीं हत्यारें साफसुफ करण्याच्या उद्योगांत गुंतून गेले, वयोवृद्ध व विचारी होते ते सचिंत विचारांत गढून गेले, बायका मुलें भीतीनें गर्भगळित होऊन जागच्याजागींच स्थब्ध झालीं, व जबाबदार पुढारी होते त्यांची इकडून तिकडे धांवपळ सुरू झाली. असा सर्व मक्केंत एकच गोंधळ उडाला.

अबदुलमुत्तलिबनें काबा मंदिरांत जमलेल्या सर्व नागरिकांना शत्रूकडे झालेली सर्व हकीगत सांगितली, आणि तो म्हणाला, "मी मरणाला भीत नाहीं, लढाईला आमंत्रण दिलेंच आहे, तथापि शत्रू आपल्यापेक्षां फार बलाढ्य आहे, तेव्हां सर्वांनीं मरून जाण्यापेक्षां सर्वांचे जीव वांचावेत या करितां मक्का सोडून आपण निघून जावें, असें मला वाटतें." ही सूचना सर्व विचारी पुढाऱ्यांना पसंत पडली, व त्यांनीं शहर सोडून जाण्याचा विचार ठरविला.

हा विचार जिकडे तिकडे पसरल्यावर अबदुलमुत्तालिब काबा मंदीराच्या मुख्य दरवाजांत जाऊन उभा राहिला आणि म्हणाला, "हे अल्ला, आपलें स्थान तूं राख. एवढ्या मोठ्या सैन्यसमुद्रापुढें हे तुझे सेवक कस्पटाप्रमाणें आहेत, काबाचें संरक्षण आतां तूंच कर"

### ४ चमत्कार.

आबराह आपल्या सैन्यासह हत्तीवर बसून मोठ्या वीरश्रीनें मक्केवर स्वारी करण्याकरितां टायफशहरांतून निघाला; परंतु शहरांतून बाहेर

पडल्यावर असा चमत्कार झाला कीं, त्याचा हत्ती कांहीं केल्या मक्केच्या रस्त्याला पाऊल म्हणून टाकीना; तेव्हां त्यानें दुसऱ्या परंतु लांबच्या रस्त्यानें मक्केला जाण्याचा विचार ठरविला. मक्केला पोंचण्यापूर्वी वाटेंत त्या सैन्यावर एक दैविक आपत्ति येऊन कोसळली. देवीची सांथ त्यांच्यामध्यें इतक्या जोरानें पसरली कीं, प्रत्येकाला त्यांतून निभावणें कठीण दिसूं लागलें. तेथें एक स्मशानभूमीच निर्माण झाली; आणि त्या स्मशानभूमीवरून आपण सुखरूप स्वदेशी परत कसे जाऊं याची प्रत्येकाला काळजी वाटूं लागली.

सैन्यांत एकाएकी उडालेला हाहा:कार पाहून, आबराहानें पुढील स्वारीचा बेत रद्द केला आणि परत जाण्याचा त्यानें विचार ठरविला.

स्वदेशी जात असतांना वाटेंत त्या सैन्याला बरेच ठिकाणीं मुक्काम करावे लागले. त्यांत एका मुक्कामावर त्यांचा तळ ज्या मैदानांत पडला होता, त्याच्या सभोंवार लहान मोठया टेंकड्या होत्या. तेथें एके दिवशीं एकाएकीं पाऊस व वारा यांनीं इतका अनर्थ उडऊन दिला कीं, तळांतील लोकांना आपले प्राण वांचविणें अशक्य झालें. पाण्याचे लोट टेंकड्यावरून उड्या टाकीत खालीं आले. त्यांत कित्येक बुडून मेले, कित्येक थंडीनें कांकडून गेले, तर कित्येक पळतापळतांच अपघातानें मेले. अबराहा स्वतः आजारी पडला व तोहि वाटेंतच मरण पावला. सर्वांना वाटलें, "हा सर्व अल्लाचा रोष,"

इकडे मक्केंतील रहिवाशांच्या आनंदाला सीमाच उरली नव्हती. वर सांगितलेली हकीगत घडल्यादिवसापासून मशिदींमध्यें मुसलमान लोक नमाज पढतांना, " अल्ला किती दयावंत आहे, व तो संकटांत कशी धांव मारतो" हें वरील उदाहरणांनीं सांगत असतात.

ही हकीगत घडून आल्यावर आज कित्येक शतकें होऊन गेलीं, तथापि अबदुलमुत्तलिबनें काबा मंदिराच्या दरवाजांत उभे राहून त्या आणिबाणीच्या प्रसंगीं अल्लाची केलेली प्रार्थना लोकांच्या कानांत अद्याप जशीच्या तशीच गुणगुणत आहे.

### ५ अबदल्लाचें लग्न.

याच वर्षी जगाच्या इतिहासांत एक अत्यंत महत्वाची गोष्ट घडून आली. कोसाई घराण्यांतील आमिना नांवाच्या एका कुमारिकेशीं अबदल्लाचें लग्न झालें होतें. अबदुल्लमुत्तलिबच्या ह्या मुलाची वृत्ति आनंदी व चेहरा मोहक असल्यामुळें, लग्नाच्या वेळीं गांवांतील अनेक तरुण अविवाहित मुलींमध्यें स्पर्धा लागली होती. गोष्टी सांगणारे या विवाहासंबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, आमिनाबरोबर अबदुल्लाचें लग्न झाल्यावर, आपल्याला असा पती मिळाला नाहीं म्हणून गांवांतील दोनशें तरुण मुलींनीं दुःखानें प्राण सोडिले! अबदुल्ला जसा दिसण्यांत सुंदर होता, तसाच तो स्वभावानेंही चांगला होता. लग्न झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तो व्यापार करण्याकरितां सिरिया प्रांतांत गेला. तेथून मक्केला येण्याकरितां परत फिरला, परंतु वाटेंतच आजारी पडून यसरब येथें मरण पावला. त्या प्रसंगीं त्याची स्त्री आमिना किंवा त्याचे आप्तइष्ट कोणीही त्याचे जवळ नव्हते. अबदल्लाच्या मागें त्याच्या तरुण बायकोला तिची स्वतःची अशी फारच थोडी चीजवस्त मिळाली; थोडेसे उंट, एक गुलाम करून आणिलेली मुलगी व एक बकऱ्यांचा कळप, हीच काय ती तिची मिळकत होती.

### ६ मुहम्मदाचा जन्म.

यानंतर थोड्या आठवड्यांनीं उन्हाळा संपण्याच्या सुमारास इ. स. ५७१ तारिख २० एप्रिल सोमवार मु० तारिख ९ रबिउल अव्वल रोजीं, अमिनाला एक मुलगा झाला. अशी दंत कथा सांगतात कीं, ह्या मुलानें जन्मास आल्याबरोबर पुढीलप्रमाणें उद्गार काढिले:—

" अल्ला श्रेष्ट आहे! अल्ला शिवाय दुसरा देव नाहीं. मी त्याचा पैगंबर आहे."

असें सांगतात कीं, या मुलाच्या जन्माच्या शुभ दिवशीं पृथ्वीवर अनेक ठिकाणीं अनेक प्रकारचे चमत्कार लोकांच्या दृष्टीस पडले.

इराणांतील खुसरूच्या राजवाड्यावरील कळस धरणीकंपानें ढासळून पडला; त्या राजवाड्यावर ठिकठिकाणीं बसविलेले उंच उंच मनोरे जमीनदोस्त झाले; एका मोठ्या अधिकाऱ्यानें आपल्या स्वप्नांत एका आरबानें एक रानटी उंट पकडलेला पाहिला. झोरोस्टरच्या अग्निकुंडांत एक हजार वर्षे अव्याहत झळझळत रहाणारा अग्नि एका एकीं पार विझाला; इब्लिसनें समुद्राच्या तळाशीं बुडी मारली; आणि अघोर कृत्यें करणाऱ्या जिन प्राण्यांना देवदूतांनीं हांकून लाविलें.

आपल्याला नातु झाला, अशी आनंदाची बातमी त्या मुलाच्या आज्याच्या कानावर जातांच तो अमिनाच्या घरीं आला, आणि त्याला त्यानें आपल्या हातांत घेऊन आपले दोन्ही हात वर उंच केले, व त्याचें नांव "मुहम्मद" म्हणजे "स्तुत्य" असें ठेविलें.

नंतर त्या वयोवृद्ध आजोबानें त्या आपल्या नातवाच्या जन्माच्या सातव्या दिवशीं कुरेश घराण्यांतील सर्व सन्माननीय आप्तांना एक थाटाची मेजवानी दिली. त्यावेळीं हा मुलगा कुळाचा उद्धार करणारा व मोठा भाग्यशाली निघणार आहे, अशा भावनेनें त्यानें त्या मुलाला आपल्या सर्व नातेवाइकांना दाखविला.

## ७ हालीमा

शहरांतील हवा अशुद्ध, उष्ण आणि शरिराला अपायकारक असते, म्हणून प्राचीन काळीं मक्केंतील श्रीमंत कुलीन स्त्रिया, आपलीं लहान मुलें चांगलीं सुदृढ व्हावींत, म्हणून त्यांना खेड्या पाड्यांत किंवा डोंगराच्या माथ्यावर रहाण्यास पाठवीत असत. अमिनाचा जन्म कुलीन घराण्यांत झालेला होता, आणि तिच्या मुलाचा मुळ-पुरुष तर आदमच होता; परंतु विपरीत परिस्थितीमुळें अमिनाला आपला मुलगा अशा हवेच्या ठिकाणीं पाठविणें अशक्य होतें. अशा प्रसंगी बनुसअद नांवाच्या एका भटकणाऱ्या टोळींतील बुद्दू

जातीच्या एका बाईनें या लहान मुलाला आपल्याकडे नेण्याचें काम आपल्या आंगावर घेतलें. त्या बाईचें नांव हालीमा होतें. हालीमाची ग्रहस्थिति समाधानकारक जरी नव्हती, तरी तिनें आपल्याकडून या लहान मुलाच्या संगोपनांत कांहीं एक कमी पडूं दिलें नाहीं. हें दुसऱ्याचें मूल आहे आणि त्याच्या शारीरिक संपत्तीची ठेव आपल्याजवळ आहे या जबाबदारीची जाणीव तिला पूर्ण पटलेली होती. ती त्या बाल मुहम्मदाला आपल्या पोटच्या मुलाप्रमाणें वागवीत असे. प्रेमल अंत:करण आणि मृदु भाषण यांच्या योगानें तिनें थोडयाच दिवसांत त्याचें मन आपलेंसें करून घेतलें; त्यामुळें मुहम्मदाच्या समोर दिसणारा नैसर्गिक देखावा जरी बदलला तरी हालीमाच्या प्रेमळ स्वभावामुळें त्याला आपल्या पूर्व स्थितीचा व आईचा विसर पडत चालला आणि त्या वाळूच्या रखरखीत मैदानांतील हालीमाच्या लहानशा तंबूंतही त्याला समाधान वाटूं लागलें. तिनें त्याच्या पुढें ठेविलेलें जाडें भरडें अन्न मोठ्या आनंदानें तो खाई आणि मोकळया हवेंत खेळे. अशा प्रकारें बाळमुहम्मदचा आयुक्रम चालू असतां त्याच्या अंगांत असलेला तीव्र बुद्धीचा विकास लोक निदर्शनास येऊं लागला त्याच्या बालपणच्या शारिक वाढीला ती नैसर्गिक शुद्ध हवा चांगल्या प्रकारें मानवत चालली अशा स्थितींत मुहम्मदची चार वर्षे निघून गेलीं व त्याला पांचवें वर्ष लागलें. या वयाच्या इतर मुलांप्रमाणें त्यांचे धावणें पळणें नित्या प्रमाणें आनंदांत चालू असतांना कांहीं कारणानें त्याची प्रकृती एकाएकीं बिघडली व तो आजारी पडला. त्याला बरें वाटण्यासाठीं व त्याची प्रकृती पूर्व स्थितीवर आणण्यासाठीं हालीमानें शक्यतें उपाय करून पाहिले; परंतु कांहीं एक गुण न पडतां दिवसेंदिवस त्याची शरीरप्रकृती क्षीण होत चालली. असा प्रकार पाहातांच हालीमाचें चित्त अस्वस्थ होऊन ती रात्रंदिवस

त्याची काळजी करूं लागली. कांहीं दिवसांनीं जेव्हां त्याच्या प्रकृतीस थोडा आराम पडला, तेव्हां हालीमानें आपल्या नवऱ्याच्या आग्रहावरून मुहम्मदला मक्केंत त्याच्या आईकडे पोंचविला.

मुहम्मदाच्या आयुष्यांतील पहिलीं बाळपणांतील पांच वर्षें, या लोकांच्या बरोबर अफाट वाळूच्या मैदानांतून हिंडावें, त्यांच्याबरोबर जसें मिळेल तसें ओलें सुकें खावें, अशा रीतीनें निघून गेलीं. ह्या स्थितीची आठवण मुहम्मदाला अखेरपर्यंत राहिली होती. तो पुढें जरी भाग्याच्या अगदीं शिखरावर चढला, तरी आपल्या लहानपणच्या दाईला विसरला नाहीं. त्या दाईला आलशयमा या नांवाची एक मुलगी होती. या मुलीबरोबर खेळण्याबागडण्यांत त्याचा वेळ मोठ्या आनंदानें जात असे. त्याची बुद्धि अत्यंत तीक्ष्ण असे, व तो आपल्या बुद्धिप्रभावानें मोठमोठ्या माणसांसही चकित करून सोडीत असे. हालीमा मक्केला आल्यावर तिनें त्याच्या तीव्र बुद्धीचे आपण समक्ष पाहिलेले असे अनेक चमत्कार त्याच्या आईस सांगितले.

मुहम्मद या वेळीं केवळ पांच वर्षांचा होता. परंतु इतक्या लहान वयांतील त्याची आनंदी वृत्ति, उल्हासी चेहेरा, तीव्र बुद्धि, सुंदर कांति व बांधेसुद शरीर पाहून त्याच्या आईस तर यास कुठें ठेऊं आणि कुठें न ठेऊं असें होऊन गेलें. तिनें त्याला आपल्या नातेवाईकांकडे घेऊन जावें, व त्यांनीं त्याच्या बाळलिलांचें कौतुक केलें कीं तिला आपल्या डोळ्यांचें पारणें फिटलें असें वाटावें. त्याच्या बाललिला जसजशा वाढूं लागल्या, तसतसें यसरब येथील आपल्या माहेरच्या सर्व लोकांस त्यास एकदां दाखवून आणावें असें तिला वाटूं लागलें. परंतु यसरब आणि मक्का या दोन शहरांतील अंतर, वाटेची दगदग व सोबतीची उणीव, या गोष्टी तिच्या मनांत आल्या कीं, तिचें मन खिन्न होऊन जाई. तथापि ज्याप्रमाणानें तिच्या मार्गांतील अडचणी

तिला बिकट वाटूं लागल्या, त्या मानानें आपल्या माहेरीं त्याला घेऊन जाण्याचा तिचा निश्चय जास्त दृढ होत चालला. अशा रीतीनें कांहीं दिवस लोटल्यावर दैवयोगानें यसरबला जाणारी सोबत तिला मिळाली व ती आपल्या मुलाला घेऊन माहेरीं जाण्यास निघाली. आमीनाचे स्वतःचे असे दोन उंट होते, त्या पैकीं एकावर ती व मुहम्मद असे दोघे बसलीं, व दुसऱ्यावर उम्मेऐमन नांवाची तिनें गुलाममुलगी दासी म्हणून बाळगिली होती तिला बसविलें. मक्केहून निघाल्यापासून यस-रबला पोहोंचेपर्यंत या प्रवासी मंडळीला विशेष असा कांहींच त्रास झाला नाहीं. मुहम्मदाचें वय या वेळीं सहा वर्षांचें होतें. आजोळीं गेल्यानंतर इकडे तिकडे खेळणें, धांवणें, नानाप्रकारच्या बाल-लिला करणें, यांत केव्हां उजाडलें व केव्हां मावळलें याचेंही त्याला भान रहात नसे. या लहान मुलाला पाहून त्याच्या आजोळच्या मंड-ळीला खरोखरीच फार आनंद झाला. जो तो त्याच्या बाललिलांचे कौतुक करी. आपल्या मुलाचें होत असलेलें हें कौतुक पाहून त्या बिचाऱ्या आईचे नेत्र प्रेमाश्रूंनीं भरून जात, व तिला आपल्या पतीचें स्मरण होऊन ती दुःखानें विव्हल होऊन जाई. अशा सुंदर गुणी मुलाचें कोडकौतुक करण्यास त्याचा बाप जिवंत नाहीं ह्या विचारानें तिचें अंतःकरण दुःखानें भरून जाई.

मुहम्मदनें यसरब येथील आपले दिवस, बरोबरीच्या सोबत्यांच्या संगतींत मोठ्या मौजेनें काढले. प्रत्येक दिवशीं तो आपल्या सोबत्या-बरोबर गांवाबाहेरील उंच उंच टेंकड्यांवर, तर कधीं रानावनांत फिरायला जात असे. निसर्ग सुंदरीचा तो थोर व गंभीर देखावा, त्यांत स्वेच्छेनें बागडणारा पशुपक्षी समूह, अशा या मनोरम वातावरणांत आपल्या सोबत्यांसहवर्तमान मौजेनें सर्व दिवसभर खेळून सायंकाळीं तो आपल्या घरीं येत असे.

अशा रीतीनें आमीना आपल्या मुलासह कांहीं महिने माहेरी राहिल्यानंतर ती मक्केला परत जावयास निघाली. आपलें आजोळ सोडून जाण्याचें मुहम्मदाच्या मोठें जीवावर आलें. परंतु तो बिचारा काय करणार! त्याच्या आयुष्यक्रमणांत ज्या कांहीं इतिहासप्रसिद्ध अशा गोष्टी घडून आल्या, त्यापैकींच ही एक सफर होय. कारण याच सफरींत त्याच्या आयुष्यांतील आणखी एक चिरस्मरणीय गोष्ट घडून आली. त्याच्या नशीबीं ज्याप्रमाणें पितृसुख नव्हतें त्याचप्रमाणें मातृसुखही नव्हतें. आमीनाचा सर्व जीव कीं प्राण त्या एकुलत्या एक मुलावर होता. तोच काय तो तिच्या सर्व सुखांचा, भावि मनोरथांचा आधारस्तंभ होता. पतिनिधनानंतर त्या माऊलीचे सर्व भावि मनोरथ त्या आपल्या एकुलत्याएक मुलावरच अवलंबून होते. परंतु भवितव्य कांहीं निराळेंच होतें. आमच्या चरित्रनायक धर्मसंस्थापकाच्या विरक्त आयुष्यक्रमणांस मातृप्रेमाच्या ऐहिक सुखाचें गालबोट नसावें अशीच परमेश्वराची इच्छा दिसते. यसरबहून मक्केला येत असतांना रस्त्यांतच त्याची आई आजारी पडली. तिला मागें परततां येईना कीं धड पुढेंही जातां येईना. शेवटीं तिला आपल्या सर्व आशा, सर्व मनोदय जागच्या जागीं ठेवून, त्या उजाड भूमातेच्या अंकावर आपल्या एकुलत्या एक मुलास ठेवून स्वर्गाची वाट धरावी लागली! वाचकहो, सहा वर्षांच्या ह्या अर्भकावर आलेल्या त्या प्रसंगाचें वर्णन आम्ही कितीही करण्याचा प्रयत्न केला तरी त्याचें यथार्थ वर्णन होणें शक्य नाहीं. अशा ह्या उजाड प्रदेशांत ममतेनें त्याचें शांतवन करण्यास, प्रेमानें त्यास दोन घास खावूं घालण्यासही जिव्हाळ्याचें असें कोणी नव्हतें. तो जन्मास येण्यापूर्वीच त्याजवर पितृवियोगाचा प्रसंग आला होता. परंतु पितृप्रेम म्हणजे जगांत काय वस्तु आहे, त्याची त्याला कल्पनाही नसल्या कारणानें त्याच्या मनाला त्याबद्दलची कधीं खंत ही वाटली नाहीं. परंतु आतांची गोष्ट तशी नव्हती. खरें, निर्व्याज्य प्रेम ही काय वस्तु

आहे त्याची त्याच्या मनाला ओळख पटलेली होती. या थोर प्रेमाची थोरवी यथार्थ कळण्यालायक त्याचें हें वय नव्हतें, परंतु दैवी प्रेमाची झळ यद्रिच्छेनें दैवी प्रेमास लागल्यावांचून रहात नाहीं. ह्या निसर्ग नियमाप्रमाणें मातृवियोगानें आपल्यावर किती अघोर प्रसंग येऊन पोहोंचला आहे, याची त्याला त्या बालवयांतही पुसट पुसट कल्पना होऊं लागली.

मक्केहून निघताना आमिनानें आपल्या बरोबर उम्मे ऐमन नांवाची जी एक गुलाम बाई आणिली होती, तिनें मात्र या संकटांत या पोरक्या मुलाचें इमानें इतबारें प्राणापलीकडे संरक्षण केलें. मुहम्मदाच्या सुखाकरितां स्वतःस कितीही शारीरिक त्रास पडला तरी तो ती आनंदानें सहन करी. उम्मे ऐमन थोडेच दिवसांत मक्का शहरीं येऊन पोहोंचली. अशा उतार वयांत अबदुल्लमुत्तालिबनें ही दुःखकारक बातमी ऐकून अत्यंत शोक केला. प्रथम पासूनच नातवावर त्याचें अतिशय प्रेम होतें, आणि आतां तर तो पोरका झाला, तेव्हां तो त्यास क्षणभर विसंबत नाहींसा झाला.

आईबापाच्या मागें मुहम्मदाला आतां आजा वांचून जिव्हाळ्याचें असें कोणीही माणूस राहिलें नाहीं. अबदुल्लमुत्तालिबही त्यास अगदीं जीव कीं प्राण करीत असे. दिवसेंदिवस मुहम्मदाला आपल्या आजाचा अतिशय ळळा लागून त्या मानानें मागील दुःखाचा त्याला विसर पडूं लागला. अशा रीतीनें दोन वर्षें निघून गेलीं, व मुहम्मद जरासा जाणताही दिसूं लागला; परंतु त्याची ग्रहदशा अद्याप बदलली नव्हती. त्याच्या बालपणापासून त्याच्यावर एकावर एक अशीं दुःखें कोसळत होतीं; त्याचा त्यास थोडाबहुत विसर पडतो न पडतो, तोंच वात्सल्यप्रेमाचा राहिलेला एकच अंकुर, जो त्याचा आजा अबदुल्लमुत्तालिब तोहि आपल्या लाडक्या नातवास सोडून परलोकीं चालता

झाला. तो जो आजारी पडला त्यांतच त्याचा अंत झाला. मुहम्मद सर्वस्वी उघडा अनाश्रित पडला. बिचाऱ्यानें रडूनरडून भुई थोडी केली. या अनाथ लेंकराला पाहून प्रत्येकाचें अंतःकरण कळवळून गेलें. अबदुलमुत्तालिब ज्यावेळीं आजारी पडला, आणि या दुखण्यांत आपले जमिनीला पाय लागणें शक्य नाहीं अशी त्याच्या मनाची ज्यावेळीं खात्री झाली, त्यावेळीं त्यानें आपला मुलगा अबुतालिब यास आपल्या बिछान्याजवळ बोलाविलें, व मुहम्मदास त्याच्या स्वाधीन करून तो म्हणाला, 'माझ्या पश्चात् मुहम्मदाचा पोटच्या मुलाप्रमाणें प्रतिपाल कर, अशी माझी तुला शेंवटची आज्ञा आहे.' बापाची मरण काळची ही इच्छा अबुतालिबनें तंतोतंत पूर्ण केली. थोड्याच दिवसांत मुहम्मदाचें आपल्या चुलत्यावर अतिशय प्रेम बसलें, व तें चुलत्या पुतण्यांचें प्रेम अखेर पर्यंत कायम टिकलें. बापाला त्याच्या मरण काळीं दिलेल्या वचनाची विस्मृति अबुतालिबला कधींही पडली नाहीं. मुहम्मद वयानें लहान होता, तरी बुद्धीनें अतिशय चपळ असल्याकारणानें तो सर्वांचाच लाडका होऊन बसला होता. त्यांतून तो पोरका असल्या कारणानें सर्व जण त्याचें मोठें कौतुक करीत.

मुहम्मदाचें बाळपण भटकणाऱ्या टोळ्यांच्या सहवासांत गेलें होतें यामुळें स्वभावतःच शारीरिक व्यायामाचें सर्व खेळ त्यास अवगत होते. शरीराच्या जोपासनेस अवश्य लागणारी चपळता त्याचे आंगांत स्वयमेव असून त्यास पोषक अशा निसर्ग सुंदर वातावरणांत तो वाढला होता. त्याचा स्वाभाविकच त्याच्या शरीरावर व मनावर परिणाम घडून तो दिवसेंदिवस शरीरानें मजबूत व मनानें निग्रही, स्वातंत्र्यप्रिय आणि आत्मविश्वासु बनत चालला.

अबदुलमुत्तालिबचे पश्चात वडिलोपार्जित अशी मुहम्मदाच्या वाटयास फारच थोडी मिळकत आली. एक मेंढयांचा कळप पांच

उंट व उम्मे ऐमन नांवाची गुलाम स्त्री, हीच काय ती त्याची वडिलोपार्जित मिळकत होती. त्याचा चुलता अबुतालिब याची स्थितीही कांहीं चांगली नव्हती. आपल्या कुटुंबांचें पोषण करून शिवाय पुतण्यास बाळगणें ही गोष्ट सांपत्तिकदृष्टया त्याच्या आटोक्याबाहेरची होती. या कारणामुळें मुहम्मदाला लहानपणापासून मेंढ्या संभाळण्याचें काम करावें लागलें, व हें काम त्याच्या स्वभावधर्माप्रमाणें त्याला आवडतही होतें.

# भाग ४ था.

## संसारप्रवेश.

विषय

१ जागृति. २ स्वाभिमान.
३ व्यापाराकरितां सफर. ४ यामूड लोक.
५ खदिजाबरोबर लग्न.

### १ जागृति.

अरबस्थानचा पूर्वीचा इतिहास बहुतेक दंतकथेच्या द्वारें सांगण्यांत आलेला आहे. लेखी विश्वसनीय असा इतिहास उपलब्ध नाहीं. यामुळें त्यापैकीं कोणता भाग विश्वसनीय व कोणता अविश्वसनीय याचा निर्णय लावणें मोठें कठीण काम आहे. अशाचपैकीं खालीं दिलेली एक गोष्ट सांगतात. ती खरी असो किंवा खोटी असो, परंतु त्या गोष्टीवरून एक गोष्ट सिद्ध होते, ती ही कीं, त्या वेळचा अरबस्थानचा काळ संक्रमणावस्थेचा असून पूर्वींचा अज्ञानांधःकार नाहींसा होऊन सर्वत्र प्रभातकाळाचीं चिन्हें दृग्गोचर होऊ लागलीं होतीं.

एका सार्वजनिक उत्सवाचे प्रसंगीं चार सुज्ञ अरब मुशाफर एकत्र भेटले होते. ती वेळ शांततेची असून प्रथम त्यांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर त्यांच्यांत धर्मासंबंधीं बोलणें सुरूं झालें. त्या पैकीं एकजण म्हणाला, "धार्मिक बाबतींत आपण कोठच्या कोठें वहात चाललों आहोंत. इब्राहीमचा धर्म कुठें आणि आपण हल्लीं करीत आहोंत काय? आपले समारंभ, हे बलीदान कोणाला पोहोंचतात, ह्या दगडाच्या मूर्ती याच्यांत आपलें बरें वाईट करण्याचें काय सामर्थ्य आहे, असें करण्यांत कांहीं सुद्धां अर्थ नाहीं. सत्यशोधनाचा कांहीं तरी मार्ग आपणास

शोधून काढला पाहिजे. आपणांस परदेशी जाऊन इब्राहिमच्या मार्गाचें संशोधन केलें पाहिजे."

या चौघांपैकीं वारक या नांवाचा जो एक इसम होता, त्याचा ख्रिश्चन लोकांशीं व ज्यू लोकांशीं देवघेवीचा संबंध चालत असे. बाकीच्या लोकांपेक्षां तो जरा सुशिक्षितही होता. सत्यमार्ग दाखविण्यासाठीं लवकरच स्वर्गांतून एक देवदूत या पृथ्वीतलावर उतरणार आहे, अशीही त्याची समजूत झालेली होती. त्याला हिब्रु भाषा येत असे. शेवटीं त्या भाषेचा चांगला अभ्यास झाल्यावर त्यानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला. वर सांगितलेल्या वादविवादांत वारक याचा एक पुतण्या होता. हा वादविवाद मिटल्यानंतर खरा धर्म कोणता, हें पहाण्याच्या उद्देशानें तो प्रवास करीत करीत रोम शहरीं गेला. तेथें ख्रिस्ती धर्माचीं तत्वें त्याला पसंत पडून तो ख्रिस्ती झाला. तिसरा अबदुलमुत्तलिबचा एक नातु होता. त्यानेंही ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. चवथा कुरेश घराण्यांतील झयद या नांवाचा एक इसम होता. त्याच्या मात्र जिवाची तळमळ एकसारखी चालू राहिली. तो म्हणे "देवा, तुझी सेवा आणि भक्ति कशी करावी हें मला जर कळेल, तर त्याप्रमाणें तुझी मी सेवा करीन. परंतु तुझी इच्छा मला कळत नाहीं. तूं मला ज्ञान दे." तो या बाबतींत आपल्या मनाशीं पुष्कळ विचार करी, परंतु ख्रिश्चनधर्म किंवा ज्यू धर्म यापासून त्याला समाधान वाटेना. मनाच्या अशा अनिश्चित स्थितींत तो मोठ्या कळवळ्यानें देवाची करुणा भाकी व आपणांस सन्मार्ग दाखविण्याविषयीं त्याची प्रार्थना करी. अशाप्रकारें मनोभावानें प्रार्थना करीत असतांनां तो असा कांहीं तन्मय होऊन मोठमोठ्यानें परमेश्वराचा धांवा करी कीं, त्याचा तो मुक्तकंठ धांवा अधिकाऱ्यांच्या कानावर जाऊन त्याचा विपर्यास होई, व हा मनुष्य मंदिरांतील देवांचा अपमान करतो असें वाटे. शेवटीं एकदां ह्याच गुन्ह्याबद्दल त्यास

कैदेची शिक्षा झाली. बिचारा कैदेंतून सुटल्यावर पुष्कळ ठिकाणीं भटकला व शेवटीं एके प्रसंगीं वाटेंत त्याची चोरांशीं गांठ पडून त्याचे हातून तो मारला गेला.

वरील गोष्ट खरी असो किंवा नसो, परंतु त्यावरून एक अनुमान निघतें, तें हें कीं, यावेळीं अरबस्थानांत एक धर्म नसून अनेक असंबद्ध धर्मविचारांची खिचडी होती; आणि कांहीं तरी एकच सत्यधर्म असावा अशी विचारी लोकांच्या मनाला तळमळ लागून राहिली होती. मी कोण आहे ? प्राण ही वस्तु काय आहे ? मृत्यु काय आहे ? मी कशावर विश्वास ठेवावा ? मी काय करावें ? ही सृष्टी काय आहे ? अशी गोंधळून टाकणारी विचारपरंपरा विचारी मनुष्यांच्या मनांत रात्रंदिवस घोळून राहिली होती.

## २ स्वाभिमान.

इ. स. ५८० मध्यें ( जेव्हां मुहम्मद नऊ वर्षांचा होता ) मक्का आणि टायफ या दोन शहरामध्यें ओकाझ या नांवांचें एक शहर होतें. या शहरीं जत्रेच्या एका समारंभाचे वेळीं एक कवी आपल्या टोळींतील लोकांचे, पराक्रम, औदार्य वगैरे स्वभावधर्मांचे, मोठमोठ्या गौरवयुक्त शद्बानें आणि इतक्या कांहीं आवेशानें रसभरित वर्णन करीत होता कीं, या सभेंत हजर असलेल्या कुरेश लोकांना हा परोत्कर्ष सहन झाला नाहीं. प्रत्यक्ष आपल्या समोर दुसऱ्या टोळीनें आत्मश्लाघायुक्त कवनें गावीं, हीं गोष्ट कुरेश लोकांना बिलकूल रुचली नाहीं. ते रागानें लाल झाले व असा अपमान सहन करण्यापेक्षां मरण बरें असें त्यांस वाटूं लागलें. त्यांनीं आपल्या तरवारी बाहेर काढल्या व ह्या कवीच्या टोळीस त्यांनीं आव्हान केलें. ते लोकही कांहीं कमी नव्हते. त्यांनींही आपल्या तरवारी काढल्या. उभयतां लढवय्यांनीं एकमेकांवर हल्ले करून उभयतांच्या टोळ्यांतील अनेक तरुणांनीं स्वर्गाचा

रस्ता धरला. उभयपक्षांचें अतिशय नुकसान झालें. नंतर त्यांच्यांत तडजोड होऊन त्यांनीं कांहीं तोंडी अटी ठरविल्या. त्यांनीं ज्या कांहीं अटी ठरविल्या त्यांत या यात्रेस येणाऱ्या प्रत्येक इसमानें आपली हत्यारें तेथील अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करावीं, ही एक अट होती.

या प्रमाणें अटी ठरून तात्पुरता या दोन्ही पक्षांचा मिलाफ झाला, परंतु त्या अटी मात्र उभयतांनीं धाब्यावर बसविल्या. त्यांच्या झटापटी वारंवार होत. माल घेऊन जातांना एका पक्षाचे तांडे दुसऱ्या पक्षांतील लोकांनीं पाहिले कीं त्याजवर हल्ला करावा असा प्रकार सुरू झाला. प्राणहानीचा कोणाला हिशोबच नव्हता. हें उभय पक्षांतील भांडण पसरत पसरत त्याची झळ या दोन्ही पक्षांच्या शत्रुमित्रांच्या घरापर्यंत येउन पोहोंचली. त्याचा परिणाम असा झाला, कीं दोन्ही पक्षापैकीं दोन इसम जर अकस्मात एका रस्त्यांत भेटले तर रक्तपात झाल्या-वांचून रहात नसे. या भांडणांत मुहम्मदानें प्रत्यक्ष भाग असा कधींच घेतला नव्हता, किंवा तसा भाग घेण्याचें त्याचें वयही नव्हतें. परंतु कधीं कधीं तो आपल्या चुलत्याच्या बरोबर बाहेर गेला असतांना जर अशा निकरावर गोष्ट आली, तर तो आपल्या चिमकुल्या धनुष्यास बाण लावीत असे. हें भांडण पुढें पुढें इतक्या विकोपाला जाऊन पोंहोंचलें कीं, उभय पक्षांतील लोकांना त्याचा मनापासून कंटाळा आला. शेवटीं दोन्ही बाजूचे पुढारी एकत्र जमून या दहा वर्षें चाललेल्या भांडणांचीं त्यांनीं तडजोड करून एकदाची उभयपक्षांची एकी केली. भांडणाऱ्या दोन्ही पक्षांमध्यें एक करारनामा होऊन त्याजवर दोन्ही पक्षांतील पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या. अन्याय, अत्याचार, निष्का-रण कुरापत ज्याच्याकडून होईल, त्याचें योग्य पारिपत्य करण्याचा अधिकार एका तिऱ्हाईत मंडळाकडे देण्यांत आला. अशा रीतीनें या जुन्या पुराण्या पिशाच्चाला गाडण्याचा शक्य तितका सफाईनें प्रयत्न

केला खरा, परंतु ज्या प्रमाणें एखाद्या जुनाट झाडाचीं पाळेंमुळें खोल जमिनींत जाऊन बसलीं म्हणजे तें झाड मुळासकट तोडण्याचा कितीही प्रयत्न केला तरी कालांतरानें खोल जमिनींत दडून बसलेलीं मुळें, जीव धरून अल्प काळांतच त्यांचीं रोपें जमिनीवर दिसूं लागतात, त्याचप्रमाणें यत्किंचित् कारणानें हें पिशाच्च वर डोकें काढीत असे. अनेक प्रसंगीं हीं भांडखोर दोन्ही कुळें एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून झालेले करारमदार गुंडाळून ठेवीत असत. यामुळें तिऱ्हाईत मध्यस्थांचा नाइलाज होऊन ते या भांडणांत पडेनासे झाले.

एके दिवशीं एका सणाच्या प्रसंगीं मक्केमध्यें हाशिम [ कुरेश ] घराण्यांतील व कोसाई घराण्यांतील सर्व पुढारी मेजवानीस बसले होते. तेव्हां या दोन घराण्यांपैकीं एका घराण्याचा जो शत्रु अगर मित्र तो दुसऱ्या घराण्याचा शत्रू अथवा मित्र समजावा, अशा भावनेनें वागण्याची त्यांनीं शपथ घेतली. न्यायाचा गौरव आणि अन्यायाला शासन करणें, असें आपलें ब्रीद त्यांनीं जाहीर केलें.

मुहम्मदावर पुढें जेव्हां वर सांगितल्याप्रमाणें प्रसंग आले, त्यावेळीं तो या समारंभाची सर्वांस आठवण देऊन म्हणे "त्यांच्या प्रमाणें मी सुद्धां न्यायाचा पाठीराखा आणि गरीबांचा वाली आहे. तेव्हां माझ्या पक्षांतील लोकांनीं कुरेश व कोसाई लोकांप्रमाणें शपथ पाळावी."

## ३. व्यापाराकरितां सफर.

अबुतालिब हा मक्का शहरांतील एक मोठा धाडसी व्यापारी होता. ज्या देशांत आपला माल खपून विशेष किफायत होण्याचा संभव असेल, तो देश कितीही लांबचा किंवा दगदगीच्या प्रवासाचा असला, तरी तितक्या दूर पल्यावर जाऊन तो आपला माल खपवीत असे. एके वेळीं सिरिया प्रांतांतील बोसरा या शहरीं आपला व्यापारी माल घेऊन जाण्याचा त्यानें निश्चय केला. त्याप्रमाणें बोसरा शहरीं जाण्या-

च्या तयारीला तो लागला असतांना, मुहम्मद त्याच्याबरोबर जाण्याकरितां त्याच्या पाठीस लागला. अनेक प्रकारानें आपल्या पुतण्याची समजूत करण्याचा त्यानें प्रयत्न केला; परंतु कांहीं केल्या मुहम्मद आपला हट्ट सोडीना. शेवटीं निरुपाय होऊन तो त्यास बरोबर नेण्यास राजी होऊन त्या प्रमाणें मुहम्मदास बरोबर येण्याची तयारी करण्यास त्यानें सांगितलें. चुलत्याच्या तोंडून परवानगी मिळतांच मुहम्मदास अत्यानंद झाला, व तो लागलाच तयारीस लागला. प्रवासांत खाण्यापिण्याची आबाळ होऊन प्रकृति बिघडते, या गोष्टीची दरकार त्यांना कधींही वाटली नाहीं. नवीन प्रदेश, नवीन देखावे, नवीन परिस्थिती पहाण्याचा योग स्वाभाविकच मुलांना अतिशय प्रिय वाटत असतो. मुहम्मदाला तर आपल्या चुलत्याबरोबर आपणांस दूरदेशीं जायला मिळणार या विचारानें त्याच्या आनंदाचा अतिरेक होऊन गेला होता. त्या काळचा प्रवास व हल्लींचा प्रवास यांत महदंतर आहे. त्या काळीं सध्याच्या काळासारखीं प्रवासाचीं साधनें अनुकूल नव्हतीं. आगगाड्या, आगबोटी, मोटार यांच्या साहायानें आज आपणांस पृथ्वीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत चुटकी सारखा निर्धास्त प्रवास करतां येतो. निरनिराळ्या देशांमधील अंतर अल्पतासांत करणारीं साधनें त्यावेळीं उपलब्ध नव्हतीं. यामुळें प्रवासास त्यावेळीं निघणें म्हणजे जिवावरची कट्यार वाटत होती. अनक वेळां असें घडून येई कीं, प्रवासास गेलेल्या माणसांचा ठाव ठिकाण आजन्म त्याच्या नातलगास लागत नसे. शिवाय चार चार सहा सहा महिने मुक्कामास पोहोंचण्यास लागत असल्याकारणानें, प्रवासांत लागणारे अन्नवस्त्र वगैरे साधनांचा भरपूर पुरवठा निघण्याचें पूर्वींच करावा लागत असे. त्या वेळचा प्रवास म्हणजे जीवावरील एक प्रसंग, असें लोकांस वाटत असे यांत कांहींच नवल नाहीं.

मक्का आणि सिरिया प्रांतांतील बोसरा या दोन शहरांमध्यें किती तरी अंतर ! एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पोहोंचणें म्हणजे मध्यंतरी अनेक मुक्काम करावे लागतात. पल्ला लांबचा असून अत्यंत त्रासाचा म्हणजे वाळूच्या मैदानांतून करावयाचा असे. प्रवास करीत असतांना कित्येक दिवस एकच देखावा, एकच त्रास आणि एकाच प्रकारच्या अडचणी ! या एकमार्गीपणामुळें प्रवाशास हा प्रवास अत्यंत कंटाळवाणा वाटत असतो. रुची वैचित्र्याला या ठिकाणीं वावही नाहीं. अशा रीतीचा कित्येक दिवसाचा एक मार्गी प्रवास केल्यानंतर वाटेंत मधून मधून कांहीं खेडीं लागतात. त्या ठिकाणचा मनुष्यवस्ती सूचक देखावा पाहून प्रवाशास अत्यंत आनंद होतो, यांत बिलकूल आश्चर्य नाहीं. या खेड्यांच्या सभोंवार असणारीं लहान लहान झाडें झुडपें पाहून प्रवाशांना अत्यंत आनंद होऊन ते त्या ठिकाणीं मुक्काम करून फारा दिवसाचा आलेला शीण मुशाफर लोक घालवीत असतात.

## ४ थामुड लोक

साधारण मनुष्यांच्या वृत्तींना स्थितिवैचित्र्यानें चांचल्य येत असतें, मग जे स्वभावतःच चंचल, चौकस असून ज्यांची वृत्ति नेहेमी विचारांत गढून गेलेली असते, अशा माणसांच्या प्रभावशाली विचारशक्तीला अशा रुक्ष देखाव्यांत सुद्धां विचारांना ठाव मिळत असतो. वर आकाश आणि खालीं वाळूचा प्रदेश अशा एकाकी देखाव्यानें सामान्य दर्जाचा मनुष्य कंटाळून जातो. परंतु मुहम्मद वयानें जरी लहान होता, तरी विचारशक्तीनें जास्त प्रौढ असल्याकारणानें अशा ह्या रुक्ष प्रदेशांतही विधात्याच्या अघटित चातुर्याचीं स्मारकें त्यास ठायीं ठायीं दिसत असत. बोसरा शहरीं जात असतांना विचार करण्यासारख्या ज्या ज्या गोष्टी त्याच्या नजरेस पडत असत, त्या त्या त्यानें आपल्या

स्मृतिपटलावर टिपून ठेवून, त्या तो आजन्म विसरला नाहीं. प्रवाशांचा तांडा ज्या ज्या ठिकाणीं मुक्कामास उतरे, त्या त्या ठिकाणीं रात्रीं जेवणें खाणें अटोपल्यावर स्वाभाविकपणेंच ते इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टींत चारदोन घटका मजेनें घालवीत असत. अशा वेळीं स्वाभाविकपणेंच या प्रदेशांतील प्रसिद्ध भुतांखेतांच्या गोष्टी निघत. त्या सुद्धां मुहम्मद मोठ्या सावधान चित्तानें ऐकत असे. अशा वाळूच्या प्रचंड प्रदेशांत कांहीं कांहीं वेळां तुफानी वाऱ्याच्या योगानें मोठमोठीं शहरेंही गडप होऊन जात, व अशा प्रदेशांत प्रवाशी प्रवास करूं लागले कीं, प्राचीन काळीं या ठिकाणीं अमुक शहर भरभराटीस होतें अशा त्यांच्या गोष्टी निघत, व विधिघटनेच्या अतर्क्य महिम्यानें ते आश्चर्यचकित होऊन जात. अशा ठिकाणीं मोडके भाग जागोजाग दिसत असत, व ते आपल्या पूर्ववैभवाची साक्ष प्रवाशांस देत असत. प्रवासांत असतांना मुहम्मदाचे कानावर ज्या ज्या कांहीं भुतांखेतांच्या वगैरे गोष्टी आल्या, त्यांत "चाद्र हिजिरच्या दरी" विषयीं त्यानें जी हकिगत ऐकली ती अत्यंत महत्वाची होती. प्राचीन काळीं "थामूड" या नांवाचे अति बलाढ्य व शूर असे लोक या ठिकाणीं रहात असत. त्यांनीं आपल्या पराक्रमानें अपार संपत्ति मिळवून, आपली अनेक बाजूनें प्रगती करून घेतली होती. परंतु जसजशी संपत्ति वाढत गेली, जसजसा त्यांचा उत्कर्ष वाढूं लागला, तसतसा त्यांच्या अंगांत ऐषआराम शिरूं लागला. ऐषआरामाच्या योगानें ते आळशी बनत जाऊन, व्यापार धंद्यांतील त्यांचें लक्ष उडत चाललें. ऐषआराम आणि आळस, व त्याबरोबरच अनेक पापें त्यांच्या हातून घडूं लागलीं. गर्व आणि द्रव्यमद यांनीं ते अंध होऊन गेले. जगांत आमच्या सारखे दुसरे कोणी नाहीं अशा अभिमानानें ते सर्व जगास तुच्छ समजूं लागले. कांहीं सच्छील लोक ईश्वराची अगाध शक्ति व सन्मार्गापासून मनुष्य मात्रांचे होणारें कल्याण, याबद्दल त्यास

उपदेश करीत, परंतु ह्या उपदेशाचा यांच्यावर कांहीं सुद्धां परिणाम न होतां असल्या उपदेशकांनां मात्र ते वेड्यांत काढीत असत. अशा उन्माद वृत्तींनां आळा घालण्याचें सामर्थ्य एका निसर्गाच्या आंगांत असून त्या सामर्थ्याचा उपयोग निष्कारणपणानें निसर्ग करीत असतो, याची साक्ष कोणत्याहि देशाच्या इतिहासाची पानें चाळलीं तरीं मिळूं शकते. एके दिवशीं मेघगर्जनेनें टाळ्या वाजल्यासारखा आकाशांत आवाज होऊन त्याच रात्रीं सूर्योदय होण्यापूर्वीं शहरांतील प्रत्येक मनुष्य मरून जमिनीवर पडला. अशा रीतीनें या " थामुड " लोकांचा या जगाच्या पाठीवर नाश झाला, आणि त्यांचे एका काळीं भरभराटीस आलेलें नगर शापभ्रष्ट होऊन स्मशानाप्रमाणें होऊन गेलें. मुहम्मदाचें कानावर वाटेंत ही हकिगत आलेली होती, तेव्हां त्याचा प्रवासी तांडा जेव्हां त्या ठिकाणीं आला, तेव्हां त्या ठिकाणीं फिरून त्यानें त्या प्रदेशाची पहाणी केली. थामुड लोकांनीं डोंगर पोंखरून व खडक फोडून आंत कोरींव काम केलेलीं त्यानें अनेक स्थळें पाहिलीं. थामुड लोकांची त्यानें ऐकलेली ही गोष्ट त्याच्या स्मरणांतून कधींही गेली नाहीं. पाप आणि पुण्य याचा मनुष्याच्या जीविताशीं अन्योन्य संबंध किती निकटचा आहे यांचा तो विचार करूं लागला. पाप व पुण्य यांच्या आधारावर सृष्टीची घडामोड घडवून आणणाऱ्या प्रभूची सत्ता किती अगाध आहे, त्याच्या सतत विचारानें मुहम्मदाच्या निर्मल आणि कोमल मनावर ईश्वराच्या अचाट प्रेमाविषयीं बिजारोपण झालें. या गोष्टीचा त्याचे मनावर इतका कांहीं विलक्षण परिणाम झाला होता कीं, कांहीं वर्षांनी मुहम्मद स्वतः एक वेळ सिरिया प्रांतांत जात असतां ज्या वाटेनें तो आपल्या चुलत्याचे बरोबर त्या ठिकाणीं आला होता, त्याच वाटेनें या खेपेस तो तेथें येऊन त्या ठिकाणीं त्यानें आपल्या बरोबरीच्या लोकांसह मुक्काम केला. थामुड लोकांचा निर्वंश झालेल्या त्या

अशा शापदग्ध भूमीवर पाय ठेवण्यास अज्ञानामुळें लोक कचरत असत, परंतु मुहम्मदानें त्या ठिकाणीं मुकाम केला. इतकेंच नव्हे तर थामुड लोक ज्या विहिरीचें पाणी पीत असत, त्याच विहिरीचें पाणी पिण्यास त्यानें आपल्या लोकांस भाग पाडलें. साधारण प्रवाशी लोकांस या वाटेची अशी कांहीं भीति वाटत असे कीं, बहुधा ते ही वाट चुकवून आपला प्रवास करीत; इतकेंहि करून जर कुणी चुकूनमाकून या वाटेवर मुक्कामाला आलेच, तर होतां होईतों या वाटेवरील आपला मुकाम जितका लवकर संपुष्टांत आणतां येईल तितका ते आणीत असत. ह्यावरून या स्थळाची प्रवासी लोकांना किती धास्ती वाटत असावी याची कल्पना करतां येईल.

कांहीं दिवसांनीं अबुतालिब व मुहम्मद सिरिया प्रांतांतील बोसरा शहरीं येऊन पोंहचले. त्या वेळीं सिरिया, इराण आणि या देशांतील सर्व व्यापार बोसरा शहरामधून चालत असे. वरील देशांतील व्यापारी माल या शहरीं येई व या ठिकाणीं त्या मालाची अदलाबदल होई. अबुतालिबनें थोड्याच दिवसांत आपला सर्व माल या देशांत खपविला व आपल्या देशांस लागणारा माल त्यानें खरेदी केला. प्रवासाला लागणारें अन्नपाणी व प्रवासाची इतर तयारी केल्यावर तो व त्याच्या बरोबरील मक्केचे इतर व्यापारी आपला उंटाचा तांडा बरोबर घेऊन स्वदेशीं जावयास निघाले. कांहीं दिवस प्रवास केल्यावर अबुतालिब मुहम्मदासह मक्केस येऊन सुखरूप पोंचला.

यानंतर पुढें तेरा वर्षें म्हणजे मुहम्मदाच्या वयाच्या पंचविसाव्या वर्षांपर्यंत त्याच्या आयुष्यांत विशेष घडामोडीची अशी कांहीं हकीगत न घडतां शांतपणानें गेलीं. याचवर्षीं म्हणजे आपल्या वयाच्या पंचविसावे वर्षीं मुहम्मदानें बोसरा शहरीं व्यापाराकरितां जाण्याचें ठरविलें. मागील खेपेपेक्षां या खेपेच्यावेळीं मुहम्मदाची परिस्थिती बरीच

बदललेली होती. त्यावेळीं याचें वय दहा बारा वर्षांचें असल्याकारणानें त्यास सर्वथैव आपल्या चुलत्यावर अवलंबून रहावें लागत होतें. परंतु आज तो स्वतंत्र असून खुद्द आपल्या स्वतःच्या हिंमतीवर व्यापारास निघालेला होता.

## १. खदिजाबरोबर लग्न.

मक्का शहरांत खदिजा या नांवाची एक श्रीमंत बाई रहात असे. तिचा बोसरा शहराशीं व्यापारधंद्यानिमित्त बराच व्यवहार चालत असे. ती स्वतः आपल्याकडून होईल तितका कसोशीनें आणि दक्षतेनें व्यवहार करी, परंतु व्यापार परमुलखांत व स्वतः बायकोमाणूस असल्याकारणानें, सदोदित तिला दूरदेशीं जाणाऱ्या येणाऱ्या इसमांवर अवलंबून राहून आपला धंदा करावा लागे. यांत एक तर तिला बराच त्रास पडे व दुसरें तो व्यापार तितका किफायतशीरही होत नसे. इकडील आपला माल नेऊन परदेशीं विकणें व तेथील माल इकडे घेऊन येणें, याकरितां ती कोणीतरी योग्य लायक मनुष्याचा तपास करीत होती. तपास करतां करतां मुहम्मदाची व तिची गांठ पडली, व मुहम्मदाचा निर्मळ स्वभाव, इमानी वृत्ति, काटकसरीचें व ईश्वरपरायण राहणें, तिला पसंत पडून तिनें आपण होऊन त्यास आपल्या नोकरीस ठेविलें. तिनें व्यापारी माल, उंट व प्रवासास लागणारी सर्व तयारी करून त्याची रवानगी सिरिया प्रांतांत केली. बोसरा शहरीं पोहोंचल्यावर मुहम्मदानें मोठ्या कसोशीनें आपल्या मालाची देवघेव केली. आपल्या देशांत ज्या ज्या मालाचा विशेष खप होतो अशा प्रकारच्या वस्तु व माल त्यानें खरेदी केला व स्वदेशीं निघून आला. त्याची धनीण व्यापाराच्या कामांत चांगली अनुभवशीर व मोठी हिशेबी होती. मुहम्मदाच्या अंगावर सोंपविलेलें काम तिला बरेंच किफायतशीर झालें. त्यांत मुहम्मदासारखा हुशार व इमानी मनुष्य तिला नोकर मिळाला, त्यामुळें

३८९

साधारणपणें जो नफा मिळेल म्हणून तिला वाटलें होतें त्याच्यापेक्षां या व्यापारांत तिला दुप्पट नफा झाला. खदिजा मुहम्मदाच्या या प्रामाणिकपणानें अतिशय खुष होऊन गेली व त्याच्या इमानीपणाबद्दल तिनें त्याला जो पगार ठरविला होता त्याच्या दुप्पट पगार दिला. मुहम्मदाच्या इमानीपणाची कीर्ति लवकरच चोहोंकडे पसरून जो तो त्याला 'आमिन्' म्हणजे 'विश्वसनीय' या नांवानें हाका मारूं लागला.

खरोखरीच, या तरुण, सरळ, प्रामाणिक मनुष्याची छाप खादिजाच्या मनावर चांगलीच बसली. मुहम्मद स्वभावानें गोड होता तसाच रूपानें सुंदर होता. खऱ्या अरब मनुष्याप्रमाणें त्याचें शरीर सडपातळ होतें. डोळे काळे भोर असून पाणीदार होते. केंस व दाढी काळ्या रंगाची असून त्यांना विशेष नरमपणा होता. त्याला गप्पा मारण्याचा मोठा कंटाळा असे. त्याची प्रत्येक कृति निश्चय आणि पूर्ण विचारांनीं बनलेली असे. त्याची चालण्याची पद्धत एखादा मनुष्य डोंगरा वरून घाईघाईनें उतरतो त्याप्रमाणें असे.

एके वेळीं असें झालें कीं मुहम्मद व्यापारी माल घेऊन बाहेर गांवीं गेला होता. तो आपला माल विकून ज्या दिवशीं परत मक्केला येण्याचा संभव होता, त्या दिवशीं संध्याकाळच्या सुमारास खदिजा व तिचे कांहीं नोकरचाकर हीं घराच्या गच्चीवर बसून समोरच्या टेंकडीवरून उंटाचा तांडा मक्केला येतो आहे कीं काय हें पहात होतीं. त्या सर्वांचे डोळे रस्त्याकडे लागलेले होते. इतक्यांत त्यांच्या समोर असलेल्या टेंकडीवरून येणाऱ्या उंटाच्या तांड्याच्या अगदीं पुढें मुहम्मद एकटाच उंटावर स्वार होऊन मोठ्या लगबगीनें खालीं उतरतांना त्यांनीं पाहिला. आपल्या यशस्वी सफरीची खबर आपल्या धनीणीच्या कानावर प्रथम आपणच घालावी अशा उत्कंठेनें तो लगबगीनें येत होता.

खदिजानें जेव्हां त्याला डोंगरावरून खालीं उतारतांना पाहिला, तेव्हां सूर्याच्या प्रखर उन्हानें त्यास त्रास होऊं नये म्हणून देवतांनीं आपले पंख पसरून त्याच्या डोक्यावर आच्छादन केलेलें आहे असें खदिजाला दिसलें. ती मनांत म्हणाली "ह्या विश्वासु माणसाच्या पाठीशीं अल्ला उभा आहे." मुहम्मदाविषयींचे तिचे विचार अत्यंत कोमल भावनांनीं तिच्या अंतःकरणाला भिडलेले होते, आणि आजचा हा प्रकार पाहून तर त्याच्या बरोबर लग्नच करावें अशी तिच्या मनांत प्रबळ इच्छा उत्पन्न झाली.

मुहम्मदाची व खदिजाची भेट झाली. त्यानें तिला आपल्या सफरीची इत्थंभूत हकीगत सांगितली. त्यावेळेपासून त्याच्याबरोबरच्या तिच्या वर्तनाची दिशा बदलत जाऊन तिचें या तरुणावर जडलेलें प्रेम चांगलेंच दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें. या गुप्त प्रेमावर झांकण टाकण्याचा तिनें अटोकाट प्रयत्न केला, परंतु त्याचा कांहीं सुद्धां उपयोग झाला नाहीं. हा तरुण पुरुष आपल्या दृष्टिआड होऊं नये म्हणून ती आटोकाट प्रयत्न करी. शेवटीं तिच्या मानसिक वेदना असह्य होऊन तिनें मुहम्मदाबरोबर लग्न करण्याचा आपला विचार ठाम झाला आहे, ही गोष्ट आपल्या बहिणीस सांगितली.

मुहम्मदाप्रमाणें खदिजाचा जन्म उच्च कुळांत झालेला होता. तिच्या पहिल्या नवऱ्याकडून तिला बराच पैसा मिळालेला होता. तिनें तो पैसा व्यापारांत घालून मोठ्या कौशल्यानें व्यापार वाढविला होता. तिच्या वयाच्या इतर स्त्रियांपेक्षां तिचें सौंदर्य फारच वाखाणण्यासारखें होतें. मक्का शहरांत व्यापारधंद्यामुळें तिचें नांव सर्वतोमुखीं होऊन बसलें होतें. शिवाय तिच्या सौंदर्याची कीर्ति सर्वत्र इतकी पसरलेली होती कीं, अनेक गरीब व श्रीमंत तरुण, खदिजानें आपल्या बरोबर लग्न करावें म्हणून शक्य त्या मार्गानें तिचें मन वळविण्याचा

प्रयत्न करीत होते. खदिजा सामान्य स्त्रीयांप्रमाणें चंचल वृत्तीची नव्हती. ती पूर्ण विचारी आणि दृढ निश्चयी होती. तिनें लग्नाकरितां आलेल्या कित्येक मागण्या साफ नाकारल्या होत्या.

तिचें मन आतां मात्र बदललें होतें. नोकरीकरितां ठेवलेल्या मुहम्मदाच्या सच्छील वर्तनानें तिच्या विचारांनां नवीन वळण लागून त्याचें पर्यवसान शेंवटीं प्रेमांत झालें; व वर सांगितल्याप्रमाणें तिनें आपली प्रेमकहाणी आपल्या बहिणीस सांगितली. बहीणीला जी प्रेमकहाणी सांगितली, ती ऐकून तिनें त्या गोष्टीवर कांहीं वेळ विचार करून एके दिवशीं संधी साधून मुहम्मदास विचारलें." काय हो मुहम्मद, तुम्ही अशा वयांत अद्याप लग्न कां करीत नाहीं ?" मुहम्मदानें उत्तर दिलें. " लग्न करावयाचें हें ठीक आहे पण त्यास पैसे आणायचे कोठून ?"

या बाईला जणूं काय हेंच उत्तर पाहिजे होतें. तिनें झटदिशीं जबाब दिला. " कदाचित् एखादी गर्भश्रीमंत कुलीन स्त्री आपणांबरोबर लग्न करण्यास राजी होऊन आपली ही अडचण दूर झाली तर आहे का आपली लग्नास संमत्ति ? "

" अशी गर्भश्रीमंत कोणती कुलीन स्त्री माझ्याबरोबर लग्न करण्यास तयार आहे ? " मुहम्मदानें विचारिलें.

' खदिजा ' तिच्या बहिणीनें जबाब दिला.

' तिच्या इतक्या कृपेला मी लायक आहे का ? ' त्यानें विचारलें.

' तें मी पाहून घेईन. ' असें उत्तर देऊन खदिजाची बहीण त्या ठिकाणाहून निघून गेली.

खदिजा व मुहम्मद यांच्या विवाहाची बातमी खदिजाच्या बापाच्या कानावर गेली. ही बातमी ऐकून खदिजाच्या बापास फार राग आला.

त्यानें अखेरपर्यंत आपली संमत्ति या विवाहास दिली नाहीं. त्यामुळें ह्या लग्नाच्या वेळीं कांहीं भांडणतंटा होऊन कांहीं विघ्न उत्पन्न होतें कीं काय, अशी सर्वांस धास्ती वाटत होती. परंतु ईश्वर कृपेनें तसें कांहीं घडलें नाहीं. या कार्यांत येणाऱ्या अडचणी क्रमाक्रमानें आपोआप दूर होऊन पंचवीस वर्षांचा मुहम्मद व चाळीस वर्षांची खदिजा, अशा प्रकारें हा प्रेमाविवाह यशस्वी रीतीनें पार पडला.

हें लग्न दोघांनांही सर्व बाजूनें सुखकारक असें झालें. मुहम्मदाचें सद्वर्तन, सुस्वभाव आणि तीक्ष्ण बुद्धि यांची ख़री किंमत तिला पटली. तीं दोघे मोठ्या आनंदानें संसार करूं लागलीं. त्यांना एकंदर सात मुलें झालीं; पैकीं तीन मुलगे होते, ते लहान असतानांच मरण पावले. बाकी चार मुली होत्या. त्यांचीं नांवें, जयनब, रुकीय्या, उम्मेकुलथुम, आणि फातीमा. या चार मुलीं पैकीं बापाची अत्यंत आवडती मुलगी फातीमा होती. तीच कायती एकटी बापाच्या मागें जिवंत राहिली. या मुलीबद्दल आपणास पुढें बरेंच वाचण्यास मिळेल.

# भाग ५ वा.

## पारमार्थिक सिद्धि.

विषय.


| | |
|---|---|
| १ काबाची दुरुस्ती | ४ दिव्य प्रकाश |
| २ पवित्र दगडाची स्थापना | ५ आज्ञा |
| ३ मनःस्थिति | ६ धर्मप्रसार |


### १ काबाची दुरुस्ती

मुहम्मद संसारांत पडल्यानंतर त्याची कांहीं वर्षे मोठ्या सुखानें गेलीं. मध्यंतरी विशेष महत्वाची अशी कांहीं गोष्ट घडली नाहीं. नाहीं म्हणायला त्याचें लग्न झाल्यानंतर दहा वर्षांनीं काबा मंदिर दुरुस्त करावें लागलें हीच कायती महत्वाची गोष्ट होय. मक्का शहरांत एकदां इतकें प्रचंड वादळ झालें कीं, त्या वादळानें शहरांतील लहान लहान झोंपड्या, जुन्या इमारती व नवीन किरकोळ इमारती कोसळून जमीन-दोस्त झाल्या. याच वादळांत काबा मंदीर सांपडून तें बहुतेक कोसळून जमीनदोस्त झालें. सभोंवतालच्या भिंती सुद्धां नादुरुस्त होऊन गेल्या होत्या. तेव्हां काबा मंदिराची पुढें व्यवस्था काय करावी हें ठरविण्या-करितां गांवांतील सर्व पुढाऱ्यांनीं एकत्र जमून हें मंदीर पुन्हां नवीन बांधावें असें ठरविलें. जवळपासच्या प्रदेशांतील डोंगरांत खाणी खणून इमारतीला लागणारे रंगीत दगड वगैरे आणवून इमारत बांध-ण्याची सर्व तयारी झाली; परंतु इमारतीस लागणाऱ्या लांकूडकामाचें काय करावें, हा त्यांच्यापुढें मोठा बिकट प्रश्न येऊन पडला.

कोणतीही गोष्ट घडवून आणण्याकरितां मनुष्यमात्र आपणांकडून शक्य तो प्रयत्न करतो, परंतु ती गोष्ट घडण्याची वेळ येईपर्यंत मध्यंतरीं कांही तरी अगांतुक अडचणी उभ्या रहात असतात. तशीच गोष्ट काबा मंदिराच्या दुरुस्तीच्या संबंधानें झाली. इमारत उभी करण्याची सर्व सिद्धता झाली, परंतु तिला लागणारें लांकुड सामान कसें जमवावें याची तोड कांहीं केल्या कोणाच्या लक्षांत येईना. अशा किंकर्तव्य स्थितींत लोक पडून राहिले असतांनां एक मोठी चमत्कारिक गोष्ट घडून आली. ग्रीस देशांतून लांकडानें भरलेलें एक जहाज तांबड्या समुद्रामधून दुसऱ्या एका बंदरांत जात असतांनां वाटेंत तें तुफानांत सापडलें व एका खडकावर आपटून फुटलें. आंत असलेला लांकडाचा सर्व माल पाण्यांत पडून तो वहात वहात एका बंदराला लागला. मक्का शहरापासून हें बंदर फारसें दूर नव्हतें, व बंदरावरून मक्का शहरांत लांकडें उंटावरून आणण्याला रस्ताही चांगला सोईस्कर होता. तेव्हां हीं लांकडें काबा मंदिराच्या दुरुस्तीकरितां आणण्याचा सर्व पुढाऱ्यांचा बेत ठरला. त्या जहाजावरील नाखवाही त्याच बंदरांत उतरला होता. कर्मधर्मसंयोगानें इमारतीच्या बांधकामाची त्या नाखव्यास चांगली माहिती होती, म्हणून कुरेश घराण्यांतील पुढाऱ्यांनीं काबा मंदिराच्या दुरुस्तीचें कामहि त्याच्यावरच सोंपविलें.

## २ पवित्र दगडाची स्थापना.

काबा मंदिराच्या भिंतींचें काम फक्त चार पांच फूट तयार झाल्यावर, एका निराळ्या महत्वाच्या प्रश्नाचा वाद उत्पन्न झाला. तो पवित्र व आश्चर्यकारक काळा दगड पूर्वींच्या जागीं बसवावयाचा होता. कुरेश खानदानींतील प्रत्येक घराण्यांतील मनुष्य हा दगड बसविण्याचा हक्क आपला आहे असें प्रतिपादन करूं लागला. आपसांतील भांडणाचा इतका कांहीं बखेडा पडला कीं, कांहीं काळ काबा मंदिराचें

काम बंद पडून राहिलें. तडजोडीचे सर्व उपाय थकले, परंतु ह्या तंट्याचा निकाल लागेना. शेवटीं एका पुढाऱ्यानें असें सुचविलें कीं, काबा मंदिराच्या पूर्व दरवाजानें जो मनुष्य आंत शिरतांना दिसेल त्याला या तंट्याचा निकाल देण्याचा मान द्यावा, व तो जो निकाल देईल तो निकाल सर्वांनीं मान्य करावा. ही सूचना सर्व पुढारी नागरिकांना पसंत पडून ते लोक मंदिराच्या पूर्व दिशेनें प्रथम कोण शिरतो तें मोठ्या उत्सुकतेनें पहात बसले. थोड्याच वेळांत एक मनुष्य आंत शिरतांना त्यांनीं पाहिला. त्यास पहातांच ते सर्व मोठ्यानें ओरडले, आणि म्हणाले, "ओहो, हा तर अल् आमिन." मुहम्मदाला त्यांनीं आपल्या जवळ बोलावलें व त्यास आपसांत झालेला आपला ठराव सांगून त्याला त्यानें आपल्या तंट्याचा निकाल लावण्याविषयीं सांगितलें.

हें अत्यंत महत्वाचें तंटा मिटविण्याचें कार्य आपल्याकडे आलें आहे असें पाहून मुहम्मदानें आपल्या अंगांतील मोठा झगा काढला आणि तो जमिनीवर पसरला. नंतर तो काळा दगड त्यानें त्या झग्यावर ठेवून मक्का शहरांतील मुख्य चार घराण्यांतील इसमांस बोलाविलें. नंतर त्यानें झग्यांचीं चार टोकें त्या चार इसमांच्या हातीं देऊन त्यांना तो दगड उचलण्यास सांगितलें. अशा रीतीनें तो दगड उचलल्यावर ते काबा मंदिराच्या आग्नेय टोंकास ज्या ठिकाणीं पूर्वी जागा तयार करून ठेविली होती त्या ठिकाणीं आले. नंतर मुहम्मदानें स्वतः हात लावून तो दगड त्या इसमांच्या साहाय्यानें त्या जागेवर ठेविला. वादग्रस्त प्रश्नाचा अशा समाधानकारक रीतीनें निकाल लागल्यावर काबा मंदिराचें अर्धवट पडून राहिलेलें काम पुन्हां सुरू होऊन तें निर्विघ्नपणें पार पडलें.

अशाप्रकारें मंदिराचें काम पुरें झाल्यावर सर्व देवता जागच्याजागीं पुन्हां बसविण्यांत आल्या. स्थापित झालेल्या सर्व देवतांच्या मूर्तींत

हुबल नांवाची सर्वांत मानानें श्रेष्ट अशा देवाची मूर्ति होती. तिची स्थापना सर्व देवांच्या मध्यभागीं व मंदिराच्या मुख्य भागांत करण्यांत आली. ज्यावेळीं हा मूर्ती स्थापनेचा गंभीर समारंभ झाला, त्यावेळीं हें थोतांड अतएव पाप आहे, असें कुरेश धराण्यांतील लोकांस वाटलें तरी असेल का? सत्‌धर्मजागृती मूर्तिपूजेपासून होत नसून, मूर्तिपूजा पापजनक आहे व खऱ्या धर्माचा प्रसार करण्याचा अग्रपुजेचा मान भवितव्यानें आपल्याकडे राखून ठेविला आहे, अशी जागृती शांत आणि व्यवसायाला कंटाळून गेलेल्या आमिनला झाली होती कां? कदाचित् ह्या गोष्टीची जागृती त्यांच्या अंतर्यामी झाली असली तरी ती त्यानें या समारंभाचे वेळीं कोणाच्याही दृष्टोत्पत्तीस येऊं दिली नाहीं.

## ३ मनः स्थिति.

सुस्वभावी, गुणी व पतीसेवापरायण अशा पत्नीच्या सहवासांत लग्नानंतर मुहम्मदाचीं बरीच वर्षें शांततेनें आणि मोठ्या सुखानें गेलीं. त्याचा व्यापारधंदा चांगला चालला होता, व त्यांत त्याला पैसाही पुष्कळ मिळाला. शहरांतील पुढारी लोकांत बसण्याचा त्याला मान मिळत गेला, आणि प्रत्येक सार्वजनिक कामांत त्याच्याच शद्वाचें वजन पडूं लागलें. असें होतां होतां पुढें त्याची वृत्ति बदलत चालली, व त्याला एकांतवास आवडूं लागला. संसारांतील उलाढाली व मनुष्याची गजबज त्याच्या शांत व विचारी वृत्तीला त्रासदायक वाटूं लागली. तो नेहमीं मोठ्या विचारांत गढून गेलेला दृष्टीस पडे. 'मूर्तिपूजा आणि खरा सात्विक धर्म' हा त्याच्या गहन विचाराचा विषय होता. आतां त्याला असें वाटूं लागलें होतें कीं, "मूर्तिपूजा करणें, दगड धांतूच्या नांवाच्या प्रतिमा करून त्यांना भजणें, हा खरा धर्म नसून या धर्मामुळें मनुष्यांना सद्गति मिळणें शक्य नाहीं." पुन्हां त्याचे मनांत

असेंही येईं कीं, आज कित्येक शतकें आपले वाडवडील ज्या मार्गानें चालत आले, तो तरी साफ चुकीचा असा कसा असेल ?

मूर्तिपूजा करणें अयोग्य आहे, असें मानणारा मक्का शहरांत फक्त मुहम्मद एकटाच होता असें नाहीं. घरोघर जरि मूर्तिपूजा चालू होत्या, तथापि इबराहिमनें स्थापन केलेल्या धर्माप्रमाणें एका सर्वशक्तिमान प्रभूची अनन्य भावानें भक्ति करणारे कांहीं विचारी लोकही त्या वेळीं होते. त्या सर्वशक्तिमान प्रभूला ते, "अल्ला हो, त–आला" असे म्हणत, आणि त्याच्या व्यतिरिक्त या सृष्टींत दुसरी शक्ति नाहीं, अशी त्यांची दृढ समजूत असे. त्याकाळींही रमजान महिन्याचे महत्व हल्लीं प्रमाणेंच होतें. हे लोक या महिन्यांत उपास करीत व एकांतात जाऊन त्या सर्वशक्तिमान प्रभूची प्रार्थना करीत. एकांताशिवाय ईश्वरचिंतन होत नाहीं, एकांतांत मनाला स्वस्थपणा येतो, व नंतर एकाग्रता होते, म्हणून एकाग्रता होण्यासाठीं एकांताचीच जरूरी आहे. इबराहिमच्या अनुयायांना एकांताचें महत्व व उपवासाची अवश्यकता पूर्ण पटलेली होती; आणि म्हणून बारा महिन्यांतून एक महिना केवळ ईश्वर भक्तीसाठीं त्यांनीं वेगळा काढून ठेवला होता.

ईबराहीम होऊन गेला त्यास आज कितीएक शतकें झालीं, परंतु त्यानें घालून दिलेलीं धर्मतत्वें आज जशींच्या तशींच प्रचारांत आहेत. रमझान महिन्याच महत्व फार मोठें आहे या महिन्यांत इस्लामधर्मांतील लोक पाहाटेस उठून जें कांहीं खाणें असेल तें खाऊन घेतात, व त्यानंतर सर्व दिवस नमाज पडणें, किंवा शास्त्र वांचणें, किंवा ईश्वर चिंतन करणें, यांत घालवितात. पहाटेस एकवेळ खाल्यानंतर त्या धर्माप्रमाणें दिवसा त्यांना तोंडांत पाणीही घेतां येत नाहीं. सूर्यास्त झाल्यानंतर पुन्हा शुचिर्भूत होऊन नमाज पढून झाल्यावर त्यांना अन्नग्रहण करण्यास मोकळीक होते.

### ४ दिव्य प्रकाश.

मक्का शहरानजीक उंच शिखर असलेली एक टेंकडी आहे. फार प्राचीन काळीं या डोंगराचें नांव " हिरा " असें होतें. ह्याच एकांतमय गिरिशिखरावर प्रथम मुहम्मदाला दिव्य दिसून त्याच दिव्य प्रकाशांत त्यानें " सद्धर्म " पाहिला व तोच धर्म पुढें त्यानें लोकांना शिकविला. म्हणून त्या डोंगराला " जबलनूर " म्हणजे ' प्रकाश पर्वत' असें नांव पडलें. या डोंगरावरून दिसणारा देखावा मोठा भयाण आणि रुक्ष असा दिसतो. एका बाजूला पहावें तों भुरकट पांढरे आणि काळ्या फत्तरानें आच्छादलेले डोंगर, दुसऱ्या बाजूस पहावें तों चित्रविचित्र व मधून मधून तुटलेल्या खडकांचे पर्वतश्रेणी, व आणखी दुसऱ्या बाजूस पहावें तों एकामागें दुसरी अशा गगनचुंबित डोंगराच्या रांगा, अशा या सृष्टिरचनेनें त्या स्थळास एक प्रकारचें रौद्र स्वरूप आलें आहे. जिकडे पहावें तिकडे सर्व प्रदेश उजाड, नापीक व खरखीत दिसतो. ताडमाड, एखादें झुडुप किंवा हिरवें पान शोधूं गेल्यास आसपास कोठें मिळणें शक्य नाहीं. निसर्गानें आपले रौद्र स्वरूप जगाला दाखविण्याकरितांच हें स्थळ निर्माण केलेलें असावें असें वाटतें. एकाद्या वृद्ध मनुष्याच्या अंगाला वार्धक्यामुळें सुरकुत्या पडाव्या त्याप्रमाणें या डोंगराचे नांगराच्या फाळानें ओरबडल्या सारखे उंचसखल भाग बनून त्याच्या पुराणत्वाची साक्ष देत आहेत. ह्याच हिरा डोंगरावर एका उंच उतरणीवर एक गुहा आहे. हिच जागा मुहम्मदानें आपल्या पारमार्थिक एकांतवासाकरितां पसंत केली होती. याच स्थळीं येवून ईशचिंतन आणि पारमार्थिक तत्वविचार तो करीत असे. यावेळीं मुहम्मदाच्या मनाची स्थिति अंमळ अनिश्चित होती. पारमार्थिक तत्वज्ञानाबद्दल त्याच्या विचारांत अद्याप स्थैर्य आलेलें नव्हतें. परंतु मूर्ती पूजा हा ईश्वर प्राप्तीचा खरा मार्ग नाहीं, ही भावना मात्र त्याच्या मनांत दृढमूल झाली होती. मूर्तिपुजेच्या ऐवजीं सत्य

मार्गाचें साधन कोणतें असावें या विषयींच त्याच्या मनाची अनिश्चि-तता होती. या विषयाच्या चिंतनांतच प्रथम प्रथम त्याच्या मनाचा गोंधळ उडून जात असे.

त्या वेळीं खिस्ती धर्मोपदेशक अरबस्थानांतही पसरलेले होते. मुहम्मदाचा व खिस्तीधर्मोपदेशकांचा वारंवार संबंधही येई, परंतु त्या धर्माचीं तत्वें त्या लोकांना पटलेलीं नव्हतीं. शिवाय धर्मप्रसारा-साठीं यूरोपमधून जे लोक तिकडे गेले होते त्यांनींही आपल्या सच्छील वर्तनानें लोकांचा आपल्यावर विश्वास बसवून घेतला नव्हता. यामुळें या धर्मोपदेशकांपासून त्यांना कांहींच ज्ञान प्राप्त झालें नाहीं. मुहम्मदनें आपल्या विचारशक्तीवर " परमेश्वर एक आहे आणि तोच नित्य आहे, त्याच्या सारखा दुसरा जगांत कोणी नाहीं, " ही कल्पना दृढ केली. जेव्हां या महत्वावर त्याचा पूर्ण विश्वास बसला, तेव्हां त्याला सत्याचा मार्ग सांपडला. देव एकच आहे, तोच या सृष्टीचा निर्माण कर्ता व चालक आहे, हेंच " इस्लामी " धर्मांतील महातत्व आहे व त्याच्याच पायावर या धर्माची उभारणी आहे. हें महातत्व मनुष्यप्राण्यांना शिकविण्याचें कार्य घडलें मात्र पाहिजे असें त्यास वाटलें.

ते रमजान महिन्याचे दिवस होते. त्यांत एके दिवशीं नित्याप्रमाणें मुहम्मद ईशचिंतनाकरितां व प्रार्थनेकरितां वर सांगितलेल्या हिरा पर्वतावरील आपल्या आवडीच्या गुहेमध्यें जाऊन बसला होता. त्या वेळीं त्याच्या मनांत कांहीं विचार येऊन त्यायोगें त्याच्या मनांत मोठी कालवा कालव करून सोडली. मनाची स्थीरता होण्याकरितां तो जितका प्रयत्न करी, तितकी त्याच्या अंतरयामीं जास्त गडबड उडून जाई तो मध्येच उठे, इकडे तिकडे फिरे, पुन्हा बसे; परंतु मन स्थीर होईना. असें काय होत आहे याची त्याला अटकळही होईना.

अशा गोंधळलेल्या मनस्थितींत तो असतांना, आपल्या समोर दिव्य प्रकाशांत एक देवदूत उभा असून तो हळुहळु आपल्याकडे येत आहे असें त्यानें पाहिलें. तो देवदूत जिब्रईल होता. त्याच्या हातांत रेशमी कापडाचा एक गुंडाळा होता. तो मुहम्मदापुढें करून तो म्हणाला, "वाच" त्या वेळच्या जिबरईलच्या त्या दिव्य तेजानें मुहम्मद अगदीं गर्भगळित होऊन गेला. "मला वाचतां येत नाहीं" हे शब्द जेमतेम त्याच्या तोंडून निघाले. त्यानें त्याला तीन वेळां वाचण्यास सांगितलें. नंतर त्यानें परमेश्वराची अगाध शक्ति, त्याची थोरवी, त्याची दया व त्याची योग्यता किती मोठी आहे, तें मुहम्मदाला समजावून सांगितलें.

## ५ आज्ञा.

कुराणांतील जो प्रथम भाग पैगंबरावर प्रेषित झाला तो असाः—

"अतिशय दयाळू व मायाळू परमेश्वराचे नांवानें वाच. सर्व वस्तु निर्माण करणाऱ्या आपल्या पालनकर्त्याचें नामोच्चारण कर. त्यानें मानवास एका मांसाच्या तुकड्यापासून उत्पन्न केलें आहे. वाच, पालन कर्ता परमेश्वर दयाळू आहे. त्यानें लेखणीनें मानवास विद्या शिकविली. त्यानें मानवास ज्या गोष्टी माहित नव्हत्या त्या शिकविल्या."

अशा प्रकारें जिबरइलच्या भेटीचा प्रकार ज्या दिवशीं घडून आला, त्या दिवसानंतर मुहम्मदाच्या अस्वस्थतेला सीमा उरली नाहीं. जेवणा-खाण्यांत त्याचें दुर्लक्ष झालें व रात्रीं कांहीं केल्या त्याचा डोळ्यासडोळा लागेनासा झाला. रात्रंदिवस त्याच्या डोळ्यापुढें तो हिरापर्वतावरील देखावा उभा राही. त्याला असा भ्रम पडे कीं, "आपण जें कांहीं पाहिलें, तो सर्व भास असून त्यांत खरेपणा कांहींच नाहीं." पुन्हां कांहीं वेळानें त्या सर्व गोष्टी खऱ्या असाव्या असेंही त्याच्या मनास वाटे. कधीं कधीं आपणास दिसलेला प्रकाश व जें कांहीं जीबरईलनें वांचून दाखविलें तो आपणास दृष्टांत झाला असावा असेंही त्याला वाटे. आपल्या

मनाची शंका निवृत्त व्हावी, या करितां तो हिरापर्वतावर एकटाच कित्येक दिवस भटकला, परंतु कांहीं केल्या त्याच्या मनाचें समाधान न होतां उलट तो अधिक अधिकच क्षुब्ध व साशंक होऊं लागला. अशा वृत्तींत त्यास आपला जीवही नकोसा झाला. "या उंच पर्वताच्या शिखरावरून खालीं दरींत उडी घेतली तर आपल्या या मानसिक वेदना बंद होतील का?" असे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. परंतु दुःखाचा अंत कोठें होतो ही त्याची शंका निवारण होईना. अशा प्रकारच्या स्थितींतून आपली मुक्तता करून घ्यावी अशा उद्देशानें त्या उंच कड्यावरून त्यानें खालीं उडी घेण्याचा प्रयत्नही बरेच वेळां केला, परंतु ज्या ज्या वेळीं त्यानें प्रयत्न केला, त्या त्या वेळीं आपणास कोणी अदृश्य शक्ति हातांनीं मागें ओढल्याचें त्यास वाटे. अशा दुःखदायक परिस्थितींत त्याचीं तीन वर्षे गेलीं.

दुसऱ्या एका वेळीं तो असाच त्या गुहेंत बसला असतां त्याच्यापुढें पुन्हां एकदां जीब्रईल येऊन उभा राहिला, आणि मोठ्या अधिकारयुक्त वाणीनें त्याला म्हणाला, "उठ, धर्मप्रसार कर आणि ईश्वराच्या अगाध लीला जगजाहीर कर." या वेळीं मात्र मुहम्मदाच्या अंतर्यामीं स्वस्थता आली. जें कांहीं त्यानें पाहिलें त्याजवर त्याचा विश्वास बसला. त्याच्या मनांतील शंकाकुशंकांचा लोप होऊन गेला. ईश्वरानें आपल्याला धर्मप्रसाराचें काम हातीं घेण्याची आज्ञा केली आहे, अशी त्याची खात्री झाली. आपण जें कांहीं पाहिलें, अथवा आपण ऐकलें, असें आपल्याला वाटलें त्याचा विचार करण्याचें कांहीं कारण नाहीं. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कीं, जें कांहीं आपण पाहिले तें सत्य होय, आणि परमेश्वराचा उपदेश मनुष्यमात्राला करणें, हेंच काम त्यानें आपणास सोंपविलें आहे, या विषयीं त्याच्या मनांत संशयाला यत्किंचितही जागा राहिली नाहीं. मनुष्य प्राण्यांना त्यांच्या कल्याणासाठीं त्यांनां सदुपदेशानें

योग्य मार्ग दाखविणें ही आपल्याला ईश्वरी आज्ञा आहे, असा जो त्याचा त्यावेळीं ग्रह झाला होता, तो त्यांच्या अंतकाळपर्यंत कायम होता, व तो कधींही डळमळीत झाला नाहीं.

मुहम्मद पैगंबरानें जीवापाड मेहनत करून खऱ्या ईश्वराची भक्ति करण्याबद्दल लोकांनां उपदेश करण्याचा दृढनिश्चय केला. आपण दाखवीत आहों हा नवीन धर्म आहे, असें भासविण्याचा त्यानें कधींही प्रयत्न केला नाहीं. परंतु यालाच तो "इबराहीमचा धर्म" व त्याच धर्माला त्यानें "इस्लाम" असें नांव दिलें. "इस्लाम" या शब्दाचा अर्थ "परमेश्वरी इच्छेस मान तुकविणें," असा आहे. या धर्मांतील लोकांना "मोंहामेडन," असें म्हणतात, परंतु हें नांव या लोकांना मुहम्मद या नांवावरून प्राप्त झालें आहे, आणि या धर्माचे जे अनुयायी त्यांना "मास्लेम" अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. दीर्घ प्रयत्न करून सरते शेवटीं मूर्तीपूजेचें उच्चाटण अरबस्थानांतून झालेंच. परंतु मुहम्मद पैगंबरांना हें यश प्राप्त करून घेण्याकरितां शारीरिक व मानसिक अशी अनेक संकटें सोसावीं लागलीं.

खरोखर पाहिलें तर मुहम्मद पैगंबराच्या वयाचीं बेचाळीस वर्षे म्हणजे कांहीं बालपणांत, कांहीं संसार सुखांत व कांहीं सत्यशोधनांत अशीं निघून गेलीं. खरें पाहिलें तर खरें धर्मप्रसाराचें काम त्यांनीं आपल्या हातांत आपल्या वयाच्या चव्वेचाळीसाव्या वर्षीं घेतलें. पैगंबराचीं पहिलीं हीं त्रेचाळीस वर्षे अत्यंत अनुकरणीय अशा मार्गानें गेलीं, असें कांहीं ग्रंथकारांचें मत आहे. तो त्यांचा लहानपणचा खेळाडु स्वभाव, पुढें त्यांनीं केलेला इमानी धंदा रोजगार, सत्यशोधनार्थ त्यांच्या जिवाला लागलेली तळमळ, यांत मुहम्मद साहेबांच्या आंगीं असलेल्या अनेक सात्विक गुणांचे उद्घाटण होतें. निर्व्याज प्रेम त्यांच्या आंगीं असलेल्या अनेक गुणांतील एक अमोलिक सद्गुण होता. या

बेचाळीस वर्षांच्या वयांत त्यांनीं संसार करून पाहिला, स्नेही सोबती जोडून त्यांचाही अनुभव घेतला, परंतु हंसक्षीर न्यायानें शेवटी त्यांनीं परमार्थिक मार्ग धरला.

## ६ धर्म प्रसार.

### जयद.

धर्मचक्राला गति देण्याचें काम त्यांनीं आपल्या वयाच्या बेचाळ-साव्या वर्षी हातीं घेतलें. सुरवातीस त्यांचें पाऊल फार मंद गतीनें पडत गेलें आणि त्या मानानें त्यांना यशही फारच थोडें येत गेलें. सर्व शक्तिमान प्रभूच्या आज्ञेप्रमाणें ह. मुहम्मदानें हें कार्य हातीं घेतलें आहे, असा विश्वास प्रथम त्यांच्या पत्नीचा म्हणजे बिबी खदीजाचा त्यांच्यावर बसला. धर्मप्रसाराचे कामांत तिच्याकडून त्यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक मदत मिळत गेली, म्हणूनच त्यांना हें महत् कार्य हातीं घेण्याला उत्तेजन व धैर्य झालें. त्यांचा जयद या नांवाचा एक गुलाम होता. बिबी खदिजेनें आपल्या पतीवर धार्मिक बाबतींत जसा पूर्ण विश्वास टाकला होता, त्याचप्रमाणें जयदही आपल्या धन्यावर या बाबतींत पूर्ण विश्वास टाकून त्यांना देवाप्रमाणें मान देत होता. पैगंबरसाहेबानें आपल्या गुलामाच्या सद्गुणाचे चीज चांगलेंच केलें. त्यांनीं त्याला गुलामगिरींतून मुक्त करून स्वातंत्र्य दिलें. एकदां असें झालें कीं, जयद हा लहान असतांना भटकणाऱ्या अरब टोळींतील एका मनुष्याच्या हातांत सांपडला. पुढें खदिजा व पैगंबर यांचें लग्न झाल्यानंतर खदिजेच्या मामानें जयदला खदिजेस बक्षिस दिलें. खदिजेनें पैगंबराच्या सेवेसाठीं जयदला अर्पण केलें, परंतु पैगंबरांनीं त्याला स्वतंत्रता दिली. इकडे जयदचा बाप पुत्राच्या वियोगानें अतिशय विव्हळ झाला, व त्यानें त्या मुलाचा तपास चोहोंदिशेला शक्य त्या उपायानें केला. तो

प्रवासी लोकांच्या भेटी घेई व त्यांना मोठ्या केविलवाण्या मुद्रेनें आपली दुःखदायक हकीगत सांगे. असें होता होता कांहीं यात्रेकरू मक्केहून परत जातांना त्याला अकस्मात् भेटले व त्यांनीं त्या मुलाचा पत्ता जयदच्या बापाला लावून दिला.

जयदचा बाप मोठ्या आनंदानें मक्केला आला व त्याच्याकारितां दिलेली किंमत परत देऊन गुलामगिरींतून त्याला मुक्त करण्याकारितां त्यानें ह० मुहम्मद पैगंबराचे पाय धरले. परंतु ह० मुहम्मद पैगंबरावर जयदचें इतकें प्रेम बसलें होतें कीं, त्यानेंच आपल्या बापाची विनंति अमान्य केली. तो बापाला म्हणाला, " मला माझ्या दयाळु धन्याशिवाय दुसरे आईबाप जगांत नाहींत." त्याचा धनी त्याची ही शुद्ध व निर्मळ स्वामीभक्ति पाहून फार खुष झाला. यापुढें जयदचा बाप तरी काय बोलणार? त्यालासुद्धां अत्यानंद झाला व तो आपल्या मुलाचा निरोप घेऊन स्वदेशीं निघून गेला.

## हजरत अली.

आजाच्या मागें ह. मुहम्मद पैगंबराचा चुलता अबुतालिब हा त्यांचा पालन कर्ता होता, हे मागें आपण वाचलेंच आहे. त्याचा अलि या नांवाचा एक मुलगा होता. हजरत मुहम्मद पैगंबराच्या नवीन म्हणजे 'इस्लामी धर्माचा' स्वीकार करणारा त्यांच्या घरांतील हा तिसरा मनुष्य होता. अबुतालिबची घरची स्थिति चांगलीशी नव्हती, त्यांतून त्याच्या पाठीशीं मुलाबाळांचा परिवारही बराच मोठा होता. अशा स्थितींत आपल्या आश्रयदात्याला आपल्याकडून मदत व्हावी म्हणून अलीला त्यांनीं आपल्या आश्रयाखालीं घेतलें. धर्मप्रसाराचे कामांत अली हा पैगंबराचा उजवा हात होता, व त्यानें अखेरपर्यंत मोठ्या कृतनिश्चयानें पैगंबरांना मदत केली. ही सर्व हकीकत पुढें येणारच आहे. अली मनाचा मोठा दिलदार आणि धाडसी तरुण होता. ह० मुहम्मद

पैगंबरावर पुढें मोठे आणिबाणीचे आणि दीर्घ परिश्रमाचे प्रसंग आले, परंतु त्यांत अलीनें मोठ्या धैर्यानें व स्वधर्माभिमानानें पैगंबराची पाठ सोडली नाहीं.

## हजरत अबुबक्र.

या तीन मनुष्यांशिवाय गांवांतील थोड्याशा लोकांनीं इस्लाम धर्माचा स्वीकार केला होता, परंतु त्यांत अबुबक्र नांवाचा इसम विशेष श्रेष्ठ प्रतीचा होता. तो ह० मुहम्मद पैगंबरपेक्षां वयानें दोन वर्षांनीं लहान होता. मक्का शहरांत तो एक श्रीमंत व्यापारी होता. तो शरिरानें ठेंगणा व पातळ होता. त्याचा चेहरा दयाळु व विचारी दिसे. जात्याच अरब लोक सुंदर असतात, परंतु त्यांत तो विशेष सुंदर होता. त्यानें आपल्या द्रव्याचा सदूपयोग गोरगरिबांना मदत करण्यांत फार केला. जे दारिद्र्यानें गांजलेले होते, अथवा दुर्दैवामुळें द्रव्याच्या अडचणीमध्यें होते, त्यांना या श्रीमंत मनुष्याकडून मोठ्या उदारपणानें मदत मिळत असे. त्याच्या इमानी, उदार, व दयाळु स्वभावावरून त्याचें नांव " अलसिद्दीक " म्हणजे ' खरा ' अथवा ' सत्याचा–विश्वसनीय साक्षीदार ' असें पडलें होतें. हजरत मुहम्मद पैगंबर जिवंत असेपर्यंत त्यांच्या व ह. अबुबक्रच्या स्नेहांत एक तिळभर सुद्धां अंतर पडलें नाहीं. अशा या श्रेष्ठ प्रतीच्या माणसानें इस्लाम धर्माचा स्वीकार केला, व त्या धर्माचा प्रसार करण्यासाठीं त्यानें आपलें तनमनधन अर्पण केलें, त्यायोगें गांवांतील लोकांवर फारच चांगला परिणाम झाला. मानानें, धनानें व स्वभावानें श्रेष्ठ अशा मनुष्याची केव्हांही सर्वत्र वाहवा होते, व त्याचा शब्द मोडण्याचें धैर्य सहसा कोणास होत नाहीं. त्याचा स्वाभाविकच परिणाम असा झाला कीं, ह० अबुबक्रनें इस्लाम धर्माची दिक्षा घेतांच गांवांतील पुष्कळ लोकांनीं या धर्माचा स्वीकार केला. तथापि मक्का शहरांत आपल्या जुन्या पुराण्या धर्माला चिकटून राहणारे लोकहि पुष्कळ होते. अद्याप

इस्लाम धर्माचा प्रकाश कोनाकोपऱ्यांत जाऊन पोहोंचला नव्हता. धर्मप्रवर्तक ह० मुहम्मद पैगंबरावर लोकांचा तितका विश्वास बसला नव्हता. प्रत्यक्ष त्यांचें कुरेश घराणेंच त्यांच्या विरुद्ध होतें. इस्लाम धर्मांतील तत्वें त्यांना मान्य नव्हतीं, व " मूर्तिपूजा त्यांनीं सोडली नव्हती. " पैगंबराच्या उपदेशाकडे ते लक्षही देत नसत. " बाबांनो, मूर्तिपूजा करणें ही खरी ईश्वरभक्ति नाहीं, सृष्टी कर्ता परमेश्वर एक असून तो अनंत आहे; त्याची भक्ति करून सद्धर्मानें वागा, असें न केलें तर तुम्हीं त्या दयाळु परमेश्वराचा अपराध केल्यासारखें होऊन त्याबद्दल तो तुम्हांस शाप देईल, तुम्हीं अधोगतीला जाल. " असा उपदेश ह. मुहम्मद त्या लोकांना करीत असत, परंतु लोक त्यांची थट्टाच करीत. इतकेंच नाहीं, तर त्यांचा उपदेश ग्रहण करणारे जे कांहीं थोडे फार लोक होते त्यांचीही ते थट्टा करीत.

## आक्षेप.

" इस्लाम धर्म मनगटाच्या जोरावर व तरवारीच्या खणखणाटावर स्थापन झालेला आहे, त्याचा पाया मजबूत तत्वज्ञानावर उभारला गेला नाहीं" असा या धर्मावर एक मोठा आक्षेप आहे. इतर धर्मांतील लोक या धर्माकडे याच मुद्यावर दूषित दृष्टीनें पहातात. जो धर्म सात्विक तत्वज्ञानावर उभारलेला नाहीं, तो डळमळित असतो, अशी त्यांची कल्पना असते. जर त्याला पारमार्थिक तत्वांचा आधार असता तर धर्म॰ प्रसारासाठीं पैगंबरांना हातांत तरवार घेण्याचें कारण पडलें नसतें. या आक्षेपाला उत्तर देणें कठीण नाहीं. जे सद्भावनेनें ह. मुहम्मद पैगंबर साहेबांच्या चरित्राकडे पहातील, त्यांना खरी वस्तुस्थिति कळून येईल. पुष्कळ हिंदु लोकांचें या धर्माबद्दल पूर्ण अज्ञान आहे. 'मुहम्मद पैगंबर इस्लाम धर्माचा प्रवर्तक ' या पलिकडे ह. मुहम्मद पैगंबर साहेबांच्या चरित्राची त्यांना यत्किंचितही माहिती नसते. मुलांच्या शाळे-

तील क्रमिक पुस्तकें या विषयासंबंधीं बहुधा मुग्धच असतात. इतिहासांत एखादें पान घालून त्यांतच इस्लाम धर्म, व पैगंबर साहेबांचें त्रोटक चरित्र घालून तेवढें पान पुरें केलेलें असतें. इतक्या अपुऱ्या साधनांनीं एखाद्या धर्माचीं पुरीं तत्वें व त्यांतील रहस्य कळणें फार कठीण आहे.

हजरत मुहम्मद पैगंबर साहेबांना लढाई करून आत्मसंरक्षण कसें व कां करावें लागलें हें आतां आपणास कळेल. त्यांच्या धार्मिक चळवळीस जेव्हां सुरुवात झाली, त्यावेळीं सद्धर्माची स्थापना व प्रसार करण्यासाठीं आपणास रक्तपाताचा मार्ग आक्रमण करावा लागेल याची त्यांना यत्किंचितही कल्पना नव्हती. त्यांच्यासारख्या शांत आणि सात्विक वृत्तीच्या स्वभावाच्या माणसाला लढाईसारखे प्रसंग खरोखरीच दुःसह वाटत होते, यांत मुळींच शंका नाहीं.

परंपरागत चालू असलेल्या धर्माच्या बाबतींत एखाद्यास कांहीं फरक करावासा वाटला, तर वास्तविक त्यांत बिघडलें कोठें ? तो मान्य करणें किंवा न करणें, हे मनुष्यमात्राच्या खुषीवर अवलंबून आहे. परंतु धार्मिक बाबींत बदल केला, हाच एक अक्षम्य गुन्हा मानून त्या माणसाचा नाहक छळ करणें कधींही न्यायाचें होणारे नाहीं. ह० मुहम्मदनें आपल्या धार्मिक मतांचा प्रसार करण्याचें काम सुरू केलें, व त्या मतांना मान देणारे असे कांहीं लोक त्यांना भेटले. शहरांतील उपद्व्यापी लोकांनीं हजरत साहेबांच्या या अनुयायांचा किती प्रकारांनीं छळ केला हें जर पाहिलें तर मतस्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या या लोकांचा विचार केला असतां अगदीं शांत अशा मनुष्याच्या मानसिक वृत्तीची खळबळ उडाल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. ज्यांना नवीन धर्मतत्वें मान्य नव्हतीं ते जर स्वस्थ राहते, किंवा हजरत साहेबांजवळ समक्ष वादविवाद करून वादग्रस्त प्रश्नांचा

निर्णय करून घेते तर अरबस्थानांत धर्माच्या बाबतींत कधींही शांतताभंग पावली नसती. हजरत पैगंबरसाहेब स्वत: अशा शांत मार्गाचे किती चहाते होते हें त्यांच्या त्या वेळेपर्यंतच्या आयुष्यक्रमावरूनच सहज कळून येण्यासारखें आहे. परंतु अरब लोकांनीं आपल्या तामसी वृत्तीला अनुसरून हा राजमार्ग सोडून दिला, व त्यांनींच प्रथम तरवारी बाहेर काढण्याचा प्रसंग आणिला. मक्का शहरांत आपल्या अनुयायांचे होत असलेले शारीरिक हाल पाहून ह. मुहम्मदाला अत्यंत वाईट वाटे परंतु तें सर्व ते शांतपणें सहन करीत. शेवटीं त्यांचाही निरुपाय झाला. त्या दुष्ट कुरेश लोकांनीं हजरत पैगंबरसाहेबांच्या अनुयायांना मक्केंत जिवंत न ठेवण्याचा कट केला. अद्यापपर्यंत हजरतच्या जिवावर कोणी उठलेला नव्हता; परंतु आतां ते दिवस जाऊन यापुढील दिवस मोठे भयंकर दिसूं लागले. इस्लाम धर्माचा कोणीहि मनुष्य कोठेंही भेटो, त्याच्यावर चारदोन कुरेश एकत्र मिळून बेधडक हात टाकूं लागले.

अशा स्थितींत हजरत पैगंबरसाहेबांना " आत्मसंरक्षण करा, " असें मोठ्या दु:खानें आपल्या अनुयायांना सांगणें भाग पडलें. येथें हीहि गोष्ट सांगणें भाग आहे कीं हजरतच्या उपदेशांत वेळ तशीच आली तर शस्त्रांचा उपयोग आत्मसंरक्षणापुरता करण्याचा सल्ला त्यांनीं त्यांना दिला होता.

## गुलामाची स्थिति.

जे लोक गरिब, निराश्रित किंवा गुलाम होते त्यांचां छळ करण्याची सुरवात गावांतील कांहीं लोकांनीं विशेषत: कुरेश घराण्यानें केली. ते या दुर्दैवी लोकांचे हातपाय दोरीनें घट्ट बांधीत, त्यांन अन्नाचा घास किंवा पाण्याचा घोटही न देतां दोनप्रहरीं रखरखित आग भाजून काढणाऱ्या सूर्याच्या आगीमध्यें लाल झालेल्या वाळूवर

अनवाणी उभे करून ठेवीत. बिचाऱ्यांच्या जिवाची जी तळमळ होई ती पाहून दुसऱ्या कोणत्याही पाषाणहृदयी मनुष्याच्या अंतःकरणाला पाझर फोडी परंतु हे राक्षस हा हृदयद्रावक देखावा मोठ्या कौतुकानें पाहात. त्या गरिब प्रॉण्यांना हे शरिरिक हाल केव्हां केव्हां असह्य होत; तरि सुद्धां असे असह्य हाल सोसूनही हे लोक आपला धर्म सोडण्यास तयार होत नसत. गुलामांची स्थिति त्या काळीं किती भयंकर होती याची कल्पना त्या काळच्या अरबस्थानचा इतिहास वाचला असतां सहज करता येण्यासारखी आहे. रानटी जनावरांपेक्षां त्यांना अधिक किंमत देण्यांत येत नव्हती. जे गरीब निराश्रित लोक असत त्यांना पकडून आणून गुलाम म्हणून त्यांची भरबाजारांत विक्री ते करीत असत आणि त्यांची सर्व चीजवस्त जबरदस्तीनें बळकावून घेत असत. इतकेंही करून त्या सत्ताधारी धनिक वर्गाचें समाधान होत नसे. त्यांना पो भर सुक कोरडें अन्न व आंगभर जाडेंभरडें वस्त्रही हे पाषाण हृदयीं लोक देत नसत. गुलाम झालेल्या मनुष्याच्या नशीबीं इतके अवर्णनीय हाल सोसण्याचा दुर्धर प्रसंग जेथें आला, तेथें त्यांच्या बायकामुलांच्या दुर्दशेचे व त्यांच्या विपत्तीचें वर्णन कोण करूं शकेल ? बायकामुलांवर गुलामांचा हक्क रहात नसे. आपल्या धन्याच्या संमतीशिवाय सामाजिक किंवा धार्मिक अशा कोणत्याही कृत्यांत त्यांना भाग घेतां येत नसे. गांवांत तसेंच सार्वजनिक ठिकाणीं त्यांना जाण्यायेण्याची सक्त मनाई असे. पुरुषांची विक्री ज्याप्रमाणें बाजार पेठेंत उघड रीतीनें होत असे, त्याच प्रमाण त्यांच्या बायकामुलांचीही विक्री होत असे. या गरीब दुर्दैवी प्राण्यांच्या हालअपेष्टांना त्याकाळीं मर्यादा नसे. आपल्याच हाडांमांसाच्या प्राण्यांचे हाल पाहून हजरत मुहम्मद पैगंबराच्या अंतःकरणाला भाल्यानें टोंचल्या प्रमाण तीव्र वेदना होत. रात्रीच्या विश्रांतीच्या वेळीं या गुलामांच्या स्थितीचें भेसूर चित्र त्यांच्या नजरे

समोर उभे राही, आणि त्यामुळें त्यांच्या अंतःकरणावर दुःखाचे जबरदस्त घाव बसत. ही स्थिति सुधारते कशी, या दुर्दैवी प्राण्यांचे हाल नष्ट होतात कसे, या विचारांनीं हजरतच्या मनाला एकसारखी तळमळ लागून राहिली होती. समाजाच्या हाडीमासीं खिळलेल्या कांहीं चाली तसेच परंपरागत बनून गेलेले व्यक्तींचे स्वभाव एकदम बदलून त्यांना नवीन दिशा देणें, फार साहसाचें व दीर्घ प्रयत्नाचें काम आहे, याची पूर्ण कल्पना हजरतला होती. गुलामांचा व्यापार तर व्यवहारांतून समूळ नष्ट झालाच पाहिजे, याबद्दल हजरतनें आपल्या मनांत निश्चय करून ठेविला होता; परंतु या कार्याची उभारणी कशी करावी याचा मात्र विचार अद्यापपर्यंत ठाम झालेला नव्हता.

## बिलाल.

हजरत पैगंबरच्या धर्मोपदेशाला मान देणारे जे त्यांचे प्रथमचे अनुयायी झाले, त्यांत बिलाल या नांवाचा एक अबिसिनियन गुलाम होता. तो शरिरानें उंच व शक्तीनेंही दांडगा होता. तो कुरेश लोकांच्या हातांत सांपडला. त्या लोकांनीं त्याचे पराकाष्ठेचे हाल केले. तापलेल्या वाळूंत आणि भरउन्हांच्या ज्वाळांत ते त्याला उभा करीत. पाण्याच्या घोटासाठीं त्याचे प्राण कासावीस झालेले पाहून लोक मोठमोठ्यानें हंसत. ते त्याचे हाल करण्याचें कारण काय, तर त्यानें ह० पैगंबर साहेबांचे धार्मिक बाबतींत शिष्यत्व पत्करिलें हें होय. इस्लाम धर्मतत्त्वांची त्याच्या मनावर इतकी जबरदस्त छाप बसली होती कीं, तो त्या धर्माकरितां आपल्या प्राणाचीही पर्वा करीत नव्हता. त्याचा कुरेश धनी बिलालचा छळ शक्य तितक्या मार्गानें करून आपली शिकस्त करून पहात होता. एके दिवशीं बिलालच्या धन्यानें त्याला भरदोनप्रहरीं तापलेल्या वाळूंत उभा केला असतां कर्मधर्मसंयोगानें हजरत अबुबक्र त्याच रस्त्यानें चालला होता. गुलामाचे हे होत असलेले हाल पाहून त्याच्या अंतःकरणाला पाझर फुटला.

त्याच्यानें एक पाऊल सुद्धां पुढें टाकवेना. त्यानें बिलालच्या धन्याची भेट घेतली, व त्याला त्या गुलामाची किंमत देऊन त्याला स्वातंत्र्य दिलें. बिलाल अबुबक्रचे ते अनंत उपकार जन्मभर विसरला नाहीं.

बिलाल जसा शरीरानें भक्कम होता तसाच त्याचा आवाजही सामान्य लोकांपेक्षां बराच मोठा होता. इस्लाम धर्म स्थापन झाल्यावर पुढें हजरत पैगंबराला नमाज पढण्यासाठीं प्रथम जी मशीद बांधावी लागली त्या मशीदींत त्यांनीं बांग पुकारण्याचें काम बिलालला दिलें होतें.

## हजरत पैगंबर व शहरवासी.

धर्म प्रसार करण्याची आपल्याला ईश्वरी आज्ञा झाली आहे, असा ह. मुहम्मद पैगंबराचा विश्वास ठाम झाल्यावर त्यानें आपलें भाऊबंद, सोयरेधायरे, आणि इष्टमित्र यांना बोलावून त्यांना ते म्हणाले, " खुदातालाचा माझ्यावर अनुग्रह झाला आहे. त्यानें मला पैगंबर करून या सृष्टीवर पाठविलें आहे. त्यानें सांगितलेला पवित्र संदेश मी तुह्मांला सांगत आहे. त्या अमोलिक संदेशाचा तुह्मीं फायदा घ्या, त्यांत तुमचें कल्याण आहे. ऐहिक सौख्य व पारमार्थिक अलभ्य लाभ तुमच्यापुढें आहेत. खुदातालाच्या नांवानें त्याचा संदेश मी तुम्हांला सांगतो. त्याच्या समोर तुम्हांला आणण्यासाठीं त्याचा मला हुकूम झाला आहे. तेव्हां माझ्या सांगण्याप्रमाणें वागण्यास तुह्मी तयार व्हा. मूर्तिपूजा करण्याचें आजपासून साफ सोडून द्या; आणि त्या एका खुदाची भक्ति करा. " हजरत पैगंबरच्या या उपदेशानें त्या ठिकाणीं जमलेल्या सर्व लोकांना या धर्मोपदेशकाचा राग आला. त्यांनीं त्याचा लगेच धिःकार केला व ते सर्व आपापल्या घरीं निघून गेले.

## हजरत पैगंबर व अबुतालिब.

एके दिवशीं हजरत पैगंबर एकांत अशा ठिकाणीं खुदातालाचें ध्यान करीत बसले असतां, अबुतालिब अकस्मात त्या ठिकाणीं आला, व त्यानें

त्यांना प्रश्न केला. " मुहम्मद, तूं हें काय चालविलें आहेस व त्याचा हेतु काय ? " ह. पैगंबरनें सत्य जें होतें तें एकदम सांगितलें. ते म्हणाले, "सृष्टीकर्त्यानें माझ्याकडे धर्मप्रसाराचें काम सोपविलें आहे. मी आतां त्याचेंच ध्यान करीत आहे. स्वर्गांमध्यें हाच धर्म प्रचारांत आहे, आणि पूर्वी होऊन गेलेले पैगंबर व आपले मुळ पुरुष ह.इब्राहिम यांचाहि हाच धर्म होता. मनुष्यप्राण्याला खऱ्या धर्ममार्गाला लावण्यासाठीं परमेश्वराची आज्ञा मला झाली आहे. आपणसुद्धां याच धर्मानें वागत जा. " पैगंबरच्या तोंडून हे शब्द ऐकून अबुतालिब म्हणाला, "माझा आतां वृद्धापकाळ झाला आहे, तेव्हां माझ्या वाडवडिलांनीं आखून दिलेला धर्म मला आतां सोडतां येत नाहीं. तुला जें करणें योग्य दिसेल तें तूं खुशाल कर. "

## सफा पर्वतावर.

आपल्याला आतां धर्मप्रसाराचें महत्कृत्य हातीं घेतले पाहिजे, आणि तें अंधारांत, किंवा एकांतांत बसून करता येणें शक्य नाहीं. असा विचार करून हजरत पैगंबरनें इस्लाम धर्माचीं तत्वें जाहीर रीतीनें लोकांना सांगण्याची सुरूवात केली. एके दिवशीं ते सफा पर्वताच्या उंच शिखरावर गेले आणि तेथून लोकांना " या सब्बाहा, " असें मोठ्यानें ओरडून म्हणाले. हे शब्द अरब लोकांत खून, मारामारी, लूट अशा भयंकर संकटाचे वेळीं वापरीत असतात. ह. पैगंबरच्या तोंडून हे शब्द निघतांच पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या लोकांना कांहितरी भयंकर संकट आलें आहे असें वाटून जिकडून तिकडून हत्यारबंद लोक पर्वताकडे धावूं लागले. तेथें गेल्यावर ह. पैगंबरला त्यांनीं असें ओरडण्याचें कारण विचारलें. हजरतनें जबाब दिला, " पर्वताच्या शिखरावर कांहीं घोडेस्वार आहेत; तुमच्यावर तुटून पडण्याचा त्यांचा विचार आहे; तुमचा बचाव व्हावा या साठीं मी तुम्हांला सदुपदेश

सांगणार आहे, ऐकत असाल तर सांगतो, बोला." जमलेले लोक म्हणाले, " होय; तूं जें आम्हांला सांगशील तें सर्व खरेंच असणार, कारण तुला खोटें बोलणें माहित नाहीं हें आम्हीं जाणतो." तेव्हां पैगंबरानें त्यांना इस्लामधर्मतत्वें समजावून सांगितली आणि ते म्हणाले " या पुढें तुमचा नाश होऊं नये अशी माझी इच्छा आहे तरी तुम्हीं माझ्या सांगण्याकडे लक्ष द्या."

हजरतच्या बोलण्यानें कुरेश मंडळीला फार राग आला. कित्येकांनीं रागानें ओंठ चावले, कित्येकांनीं आपल्या अस्तन्या वर सारिल्या आणि कित्येकांनीं हजरतचा धिःकार केला. त्यामंडळींमध्यें हजरतचा एक चुलता अबु–लहब या नांवाचा होता, तो म्हणाला, " याला वेड लागलें आहे, त्या भ्रमांत तो कांहीं तरी बडबडत आहे." ते हजरतला पुन्हा म्हणाले; "मूर्तींच्या पूजा तर आम्हीं करणारच. आजपर्यंत आमचे वाडवडील ज्या धर्माप्रमाणें वागत आले त्यांच्यावर तूं मात्र धूळ टाकणारा निर्माण झालास." या प्रमाणें बोलून हजरतवर त्यांनीं दगड धोंड्याचा मारा केला आणि ते तेथून निघून गेले.

हजरत पैगंबराचा आत्मविश्वास दांडगा होता. जें कार्य आपण हातीं घेतलें आहे, तें परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणें आहे, तें सत्य आहे, व त्याचा आज नाहीं तरी उद्यां विजय होणारच. जे लोक हजरतवर आज अज्ञानामुळें विश्वास ठेवण्यास तयार नव्हते त्यांच्या अज्ञानाबद्दल त्यांना वाईट वाटे. त्यांची अशी समजूत झाली होती कीं, एक कंगाल मनुष्य आज हजारों वर्षे चालत आलेला धर्म बुडवून टाकून त्या ठिकाणीं एक नवीन धर्म स्थापन करीत आहे; परंतु हें व्हावें कसें? मक्केंतील धर्मोपदेशक आजपर्यंत स्वस्थ राहिले होते. आपण आजपर्यंत पवित्र व पूज्य मानलेल्या मूर्तींच्या अस्तित्वावर आज उद्यां गदाप्रहार होणार आहे याची त्यांनां कल्पनाही नव्हती. हजरतचा उपदेश कर-

ण्याचा क्रम अहर्निश मोठ्या जारीनें सुरू होता. कांहीं लोकांचा विश्वास बसण्याला जरा वेळ लागला, कांहींनीं विचार करण्यासाठीं वेळ पुढें ढकलली, आणि कांहींनीं हजरतचा धि:कार केला. परंतु पैगंबरचा दृढनिश्चय सामान्य मनुष्याप्रमाणें कच्चा नव्हता. शहरांत, जंगलांत, डोंगरावर कोठेंही कोणीही मनुष्य भेटो, त्याला ते उपदेश करून त्याचें अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न करीत. हजरत स्वत:शीं म्हणत कीं, "जे लोक राजमार्ग सोडून अंधकारांत आड मार्गानें चालले आहेत त्यांना मी जर योग्य मार्गाला लाविलें नाहीं, तर जाणून बुजून सत्य सोडून मी असत्याचा मार्ग धरिला असें होईल; व हा ईश्वराचा मोठाच गुन्हा माझ्या हातून होईल."

## मुसलमानांचा छळ.

हजरतनें स्थापन केलेल्या इस्लामधर्मावर ज्या गरीब व निराश्रित लोकांचा विश्वास होता, त्यांचें दु:ख कमी करून त्यांनां हातभार लावण्याचें महत्कार्य ह० अबुबक्रनें केलें. दुष्ट धन्यांपासून अनेक गुलामांना सोडवून त्यांना त्यानें स्वातंत्र्य देवविलें. गुलामांचा छळ कमी व्हावा म्हणून त्यानें अनेक गुलाम स्वत: विकत घेतले व त्यांना गुलामगिरींतून मुक्त केलें. या परोपकारांत त्याची बहुतेक संपत्ति खलास झाली होती. ज्या थोड्याशा श्रीमंत कुरेश लोकांनीं इस्लाम धर्माचा स्वीकार केला होता, त्याच्या मात्र वाटेस कोणी गेले नाहींत. कारण हजरत स्वत: त्याच घरण्यापैकीं एक असून त्यांच्याही हातांत आज बरीच सत्ता होती. शिवाय त्यांचा चुलता अबुतालिब गांवांत मानानें श्रेष्ठ व वडील घराण्यांपैकीं होता. त्यामुळें उपद्व्यापी कुरेश लोकांपासून त्या वरच्यावर्गांतील लोकांस त्रास पोचत नव्हता. परंतु गोरगरीबांचें जे हाल त्या लोकांनीं केले ते पाहून हजरतला आपल्यावर आकाश कोसळतें कीं काय असें वाटे. त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या यमयातना पाहून आपलें शरीर जणुं अग्नीमध्यें होरपळूत जात आहे असें

वाटे. त्यांच्या शरीराचा भडका उडून जाई. आपल्या स्वतःच्या जीवाची पर्वा त्यांनीं तर मुळींच केली नाहीं. धर्माकरितां शारिरीक कष्ट कितीहि तीव्र असोत ते शांतपणें सोसण्यास त्यानीं आपल्या मनाला प्रयत्नानें तयार करून ठेविलें होतें. कुरेश लोकांकडून गोरगरीबांचे होणारे हाल पाहून, आज नाहीं तरी उद्यां आपणांवरही असेच दुर्धर प्रसंग येऊन आपल्यालाही याच यातना सोसाव्या लागणार, अशी जाणीव हजरतलाही झालेली होती. परंतु महत्कार्याच्या सिद्धीचा मार्ग दगड धोंडे काटे यांनीं भरून गेलेला असतो, व तो मार्ग शारीरिक क्लेश सोसूनच आक्रमण करावा लागतो, याचा अनुभव ज्या सत्पुरुषांना या पूर्वी आलेला होता त्यांचा इतिहास हजरतला माहित होता. परंतु कुरेश लोकांच्या दुष्टपणापुढें गरिबांचा निभाव लागतो कसा याचा मात्र मोठा विचार हजरतला पडला. या लोकांच्या मोठ्या जमावापुढें हजरतचें शारिरीक व आर्थिक बल टिकणारें नव्हतें. म्हणून त्यांनीं या गरीब लोकांना धर्मछळ करून घेण्यापेक्षां देशत्याग केलेला बरा, असा सल्ला दिला. सुमारें ऐशीं मुसलमान लोकांनीं पैगंबरच्या हुकमाप्रमाणें अबिसिनिया देशाचा रस्ता धरिला. त्यांत पैगंबरची मुलगी रुकीया व तिचा नवरा उसमान ही सुद्धां होतीं. अबिसिनियाच्या ख्रिश्चन राजानें या देशत्यागी लोकांना चांगला आश्रय दिला.

त्या राजाला या लोकांचें देशत्यागाचें कारण जेव्हां समजलें, तेव्हां या लोकांच्या इस्लाम धर्माचीं तत्वें आपल्या धर्माहून फारशीं भिन्न नाहींत असें पाहून आश्रयाकरितां आलेल्या लोकांबद्दल त्याच्या मनांत दया उत्पन्न झाली. "सजीव प्राण्याविषयीं दया, माया, क्षमा, शांति धरा," हें जें हजरतचें इस्लाम धर्माचें महत् तत्व, तें राजाला मान्य झालें, आणि म्हणून त्यानें या लोकांना आश्रय दिला. तो राजा धर्मशील, न्यायी व दयावंत होता. त्या वेळीं अबिसिनिया देशांत त्याची कीर्ति

सर्वत्र पसरली होती आणि त्याची प्रजा त्याच्यावर संतुष्ट होती. तो व्यापाऱ्यांना "धंदा सचोटीनें व धर्मानें करा." असें सांगे. "भुकेलेल्यांना अन्नदान देण्याचे कर्तव्य करा, अजाऱ्यांची शुश्रुषा करा, आणि गरीब निराश्रितांना आश्रय द्या." असें मोठ्या कळवळ्यानें सांगे.

दिवसेंदिवस या कुरेश लोकांपासून मुसलमान लोकांना अधिकाधिक त्रास होऊं लागला. त्यामुळें हजरत पैगंबरला अधीक वाईट वाटूं लागलें. वारंवार हजरत व हे लोक यांच्यामध्यें बोलाचाली होई. शेवटीं कुरेश लोकांनीं इतके दिवस जो द्वेष दाबून ठेविला होता तो बाहेर पडला, आणि ते हजरत पैगंबरचा उघडपणें द्वेष करूं लागले. हजरतनें मात्र आपली शांतता भंग केली नाहीं. अपशब्द, मारामारी किंवा दंडेली या उपायांनीं त्यांनीं कोणाचाहि समाचार घेतला नाहीं. कुरेश लोकांचे अपमानकारक शब्द ऐकून त्यांनीं त्यांना म्हणावें, "बाबानो, परमेश्वराच्या हुकूमाप्रमाणें इस्लामधर्म तुमच्या पुढें आहे. त्याचा अपमान करून त्या सृष्टीकर्त्याला क्षुब्ध करूं नका. तुम्हांला पुढें पश्चात्ताप झाल्याशिवाय रहाणार नाहीं." मुहम्मद आपल्या वाडवडिलांनीं पूज्य मानलेल्यांचा अपमान करितो म्हणून कुरेश लोक त्याच्यावर फारच चिडले आणि ते त्याच्या चुलत्याकडे—आपल्या पुतण्याचा चांगला बंदोबस्त कर—असें सांगण्यासाठीं गेले.

## अबुतालिबचें प्रेम व ह. पैगंबरचा करारीपणा

हजरत पैगंबरला चांगला मार देण्याचाही त्यांनीं एकदां विचार केला होता. परंतु त्यांत त्याच्या जिवाला जर अपाय झाला तर त्याचें सर्व कुटुंब हातांत तरवारी घेऊन बाहेर पडल्याशिवाय रहाणार नाहींत, आणि त्याचा परिणामांत दोन्ही पक्षामध्यें भयंकर रक्तपात होईल, तेव्हा असें करणें कोणत्याच दृष्टीनें हितकर नाहीं; म्हणून त्यांनीं तो मार्ग

साडून वर सांगितल्याप्रमाणें हजरतचा बंदोबस्त अबुतालिबच्या हातून करविण्याच्या हेतूनें ते त्याच्याकडे गेले. या लोकांना उपदेश करण्याचें काम त्यांनीं सोडून दिलें पाहिजे. तसें त्यानें जर केलें नाहीं, तर अबुतालिबनें पैगंबरला कोणत्याही कामांत आश्रय देतां कामा नये, असा त्यांचा आग्रह होता. अबुतालिब आतां वृद्ध झाला होता, व त्यानें इस्लाधर्माचा स्वीकारही केलेला नव्हता. कुरेश लोकांचें सर्व म्हणणें त्यानें शांतपणें ऐकून घेतलें व "मी बंदोबस्त करतो," असा जबाब दिला. अबुतालिबची स्थिति इकडे आड व तिकडे विहीर अशी झाली. पुतण्यावर त्याचा जीव कीं प्राण होता. स्वतःच्या मुलांवर नाहीं इतकें त्याच्यावर त्याचें प्रेम होतें. हजरत मुहम्मदाला त्याच्या एककल्ली वृत्तीपासून परावृत्त करावा कसा या विचारांत तो बिचारा पडला. त्यानें पैगंबरला बोलावणें पाठविलें व सांगितलें, "प्रिय मुहम्मद, माझें ऐक, तूं आपला जीव धोक्यांत टाकूं नको. अरबांच्या खुनी तरवारी तुझे प्राण घेण्यासाठीं परजु लागल्या आहेत. हट्ट सोड आणि लोकांना उपदेश करण्याचें बंद कर." आपल्या सांगण्याचा कांहीं तरी परिणाम पैगंबरच्या मनावर होईल अशी जी अबुतालिबला आशा होती ती व्यर्थ गेली. पैगंबर धैर्याचा मेरु, एक विचारी आणि कृत निश्चयी ते अशा वारा वावटळांना काय भीक घालणार! ते म्हणाले, "काका, माझा कांहींएक इलाज नाहीं. मी स्वतः कांहींच करीत नाहीं. कर्ता करविता कोणी तरी दुसराच आहे. माझे शत्रू, माझ्या एका हातावर सूर्य व दुसऱ्या हातावर चंद्र देऊन मला म्हणतील, कीं हें काम बंद कर, तरि खात्री असूं द्या कीं, जो पर्यंत परमेश्वराचीच तशी मर्जी असेल, किंवा या कार्यांत माझे प्राण खर्ची पडतील तो पर्यंत मी कोणाचेंही ऐकणार नाहीं. जर आपणास स्वतःबद्दल भय वाटत असेल तर हा मी चाललों पहा. माझा परमेश्वर माझ्या बरोबर आहे." असें बोलून पैगंबरानें तडक आपला रस्ता धरिला वाटेंत

आपल्या प्रेमळ चुलत्याला कठोर शद्बांनीं दुखविल्याबद्दल त्यांच्या मनाला वाईट वाटूं लागलें. इकडे अबुतालिबच्याही मनांत अनेक विचारांचे काहूर माजून राहिलें होतें; परंतु तें सर्व बाजूस सारून पैगंबराला मागें फिरण्यास त्यांनीं हांक मारिली, आणि ते जवळ येतांच अबुतालिब म्हणाला, "मुहम्मद, माझें एकवार तुला सांगावयाचें कर्तव्य होतें तें मीं केलें. आतां तुझें कर्तव्य तूं कर. मात्र मला सोडून जाऊं नको." या वयोवृद्ध प्रेमळ मनुष्याच्या तोंडून हे शद्ब ऐकून हजरतचें हृदयही पार विरघळून गेलें. प्रेम हीच दैविक शक्ति असून महात्म्यांनीं हिच्याच आधारावर स्वर्ग सुद्धां जिंकला आहे, असें जें सांगतात तें अक्षरशः खरें आहे. पैगंबर आपला हट्ट सोडणार नाहीं व त्यामुळें कुरेश लोकांमध्यें आपल्या विरुद्ध अनेक कट्टे शत्रू निर्माण होऊन कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल याचा नेम नाहीं, याची त्या म्हाताऱ्या मनुष्याला मोठी धास्ती वाटू लागली. कांहीं होवो परंतु मुहम्मद जवळचा दूर होतां कामा नये असें त्यानें पूर्ण विचारानें ठरविलें.

## हमजा.

अबदुल मुत्तलिबला त्याच्या वृद्धपकाळीं आणखी दोन मुलगे झाले होते. त्यांतील एकाचें नांव हमजा व दुसऱ्याचे नांव आब्बास असें होतें. हमजा वयानें ह० पैगंबरच्या बरोबरीचा होता. त्याची शक्ति व धैर्य असामान्य होतें. त्याला जगांत भीति अशी कशी ती माहित नव्हती. त्याच्या वरील गुणांमुळें हमजाला गावांत सर्व लोक फार भीत असत. त्याला शिकारीचा फार शोक होता. त्याचा स्वभाव अत्यंत मनामिळाऊ होता. या त्याच्या स्वभावामुळें गावांत त्याच्या जीवाला जीव देणारे स्नेही सोबतीही पुष्कळच होते. एके दिवशीं खांद्यावर धनुष्य टाकून रस्त्यानें तो चालला असतां वाटेंत त्याला समजलें

कीं, हजरतला अबुजेहेलनें फारच शिवीगाळ केली आणि त्यांचा करूं नये इतका अपमान केला. हजरत पैगंबरनें तें सर्व शांतपणानें सहन केलें व तोंडांतून एक शब्दहि काढला नाहीं. ही बातमी ऐकून हमजाच्या पायाची तिडिक मस्तकाला गेली. तो रागानें लाल झाला. तो म्हणाला, "या लोकांना मुहम्मदाचा द्वेष करण्याचें काय कारण? त्यांचा उपदेश त्यांना मान्य नसेल तर त्यानें कधीं कोणावर जुलूम केला नाहीं." हमजा रागाच्या तडाक्यांत तसाच काबेतुल्ला मध्यें आला. तेथें अबुजेहेल पुष्कळशा लोकांत बसून आपण बजाऊन आलेल्या कामगिरीबद्दल मोठ्या फुशारक्या मारीत होता. अबुजेहेलला पहातांच रागाच्या भरांत आपल्या धनुष्याचा एक फटकारा त्याच्या डोक्यावर त्यानें असा जोरानें लगावला कीं तो एकदम जमीनीवर बेशुद्ध पडला. तेथें बसलेल्या सर्व लोकांनीं, "मारा मारा," अशी एकच आरोळी केली. परंतु हमजाच्या पुढें येतो कोण? हमजाची क्रुद्ध मुद्रा पाहून जो तो गर्भगळित झाला. थोड्या वेळानें अबुजेहेल शुद्धिवर आला आणि हमजाचे लालभडक डोळे आणि खुनी मुद्रा पाहून तो लोकांना म्हणाला, "याच्या पुतण्यावर मी हात उचलला, याचा त्याला राग येणें स्वाभाविक आहे, त्याबद्दल त्यानें माझ्यावर आपला हात उचलला." अद्यापपर्यंत हमजाची वृत्ति ठिकाणावर आली नव्हती. तो तिरस्कार मुद्रेनें मोठ्या आवेशानें म्हणाला, "खरा असशील तर पुन्हा माझ्या पुतण्याच्या वाटेस जाशील. आतां येथें तोंड उघडशील तर बघ, बाहेर फेंकून देईन. जा, तुझ्या निर्जीव मूर्तींना मीहि तुच्छ मानतो. काय माझें करतोस तेंहि मी पहातों." त्याच दिवशीं हमजानें इस्लाम धर्म स्वीकारला. हमजाच्या या कृत्यानें गावांत मोठा वचक बसला. दैवयोगानें हजरत पैगंबरला एक मोठा खंबीर आधार मिळाला.

## एक इमानी दुर्दैवी कुटुंब

ज्या लोकांनीं हजरत पैगंबरनें स्थापन केलेल्या नवीन धर्माचा स्वीकार केला होता त्यांचा छळ करण्याची शिकस्त कुरेश लोकांनीं केली. कुरेश लोक मुसलमानांचा इतका द्वेष करीत, कीं त्यांना आपला जीव नकोसा होई. एक यासर नांवाचा इसम होता, त्याची बायको सुमैया आणि त्यांचा मुलगा अम्मार या तिघांनीं मुसलमान धर्मांत प्रवेश केला होता. ही बातमी कुरेश लोकांना समजतांच त्यांच्या आंगाचा रागानें तिळपापड झाला. वरील तीनही मनुष्यांना त्यांनीं पकडून आणिलें आणि त्यांचे मारमारून हालहाल केले. त्या दुर्दैवी नवराबायकोचे अवर्णनीय हाल झाले व शेवटीं त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यांच्या मुलावर सुद्धां असाच जुलूम झाला. " तूं इस्लामधर्म सोडून देशील तर तुला आम्हीं जिवंत ठेवूं, " अशी जेव्हां त्यांनीं त्याला धमकी दिली, तेव्हां तो बिचारा जिवाच्या आशेनें त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास तयार झाला; परंतु त्याच्या कैदेतून मोकळा झाल्याबरोबर त्यानें ह० पैगंबरकडे धांव मारली व त्यांच्यापुढें जमिनीवर धाडकन आंग टाकून दिलें. त्याच्या डोळ्यांतून निघणारे अश्रू पाहून हजरतला अतिशय दुःख झालें. हजरतनें आपल्या हातांनीं त्याचे डोळे पुसले आणि आपल्या गोड शब्दांनीं त्याचा दुःखभार हलका केला.

## एक सत्यप्रिय.

वर सांगितल्याप्रमाणें खुबैब या नांवाच्या एका मुसलमानाचे कुरेश लोकांनीं असेच हालहाल केले. मारमारून त्याच्या आंगाची कातडी त्या दुष्ट मनुष्यांनीं बाहेर काढली. ते त्याला म्हणाले, " तुझ्या प्रमाणें मुहम्मदाची पण जर अशी दशा उडेल तर किती चांगलें होईल. " तो आपले प्राण जाण्याच्या प्रसंगांत असतांहि म्हणाला, " याच्याही पेक्षां माझे, माझ्या मुलाबाळांचे हाल झालेले मला चालतील, परंतु

हजरत पैगंबरच्या पायाला एक कांटा लागलेला माझ्यानें पहावणार नाहीं. ते त्याला इस्लाम धर्म सोडून देण्यास सांगत, परंतु तो ह्मणे, " या पृथ्वीचें राज्य दिलेंत तरी सुद्धां मी इस्लाम धर्म सोडणार नाहीं. " कुरेश लोकांनीं शेवटीं या निरापराधी मनुष्याला त्याचे हालहाल करून ठार मारिला.

## अमानुष छळ.

अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें देऊन कुरेश लोकांच्या द्वेषाचा इतिहास सांगता येईल. त्यांनीं मुसलमानांचा एकाच प्रकारानीं छळ केला नाहीं. दोनप्रहरच्या लाल झालेल्या वाळूंत त्यांना कमरेपर्यंत पुरून ठेवीत, त्यांचे हात पाय तोडीत, डोळे फोडीत, त्यांच्या पोटांत सुऱ्या खुपसून त्यांतील आंतडी बाहेर काढीत, आईबापांच्या पुढें त्यांच्या दुर्दैवी अर्भकांचे तुकडे करून त्यांचे रक्त आईबापांवर फेंकीत. या प्रमाणें हाल सोसून शेवटीं प्राण देणारे कित्येक मुसलमान त्या वेळीं होऊन गेले. ह० पैगंबरवर आणि त्यांच्या शब्दांवर त्यांचा इतका जबरदस्त विश्वास होता कीं, त्यांच्या शत्रूंनीं अनेक वेळां त्यांच्या पुढें शेवटीं हात टेकले, परंतु मुसलमानांनीं आपला धर्म सोडला नाहीं.

" ह० पैगंबरला आणि त्याच्या धर्माला शिवीगाळ कर म्हणजे आम्हीं तुला जिवदान देतो, " असेंही ते मुसलमानांना सांगून पहात; परंतु तसेंही न करणारे कित्येक इसम होऊन गेले. त्या दुष्टांच्या यम यातना चुकविण्याकरितां एकाद वेळीं कोणी तसा कबूलहि होई, परंतु मोकळा झाल्यावर आणि त्याला थोडाफार आधार मिळाल्याबरोबर तो अंतरयामीं दृढ झालेल्या भावनांना घट्ट चिकटून राही.

हजरतचे पाऊल दिवसेंदिवस त्यांच्या महत्कार्यांत पुढें पुढें पडत चाललेलें पाहून शत्रूंना अधिकाधीक चीड येऊं लागली. काबामध्यें त्यांना येण्याला ते प्रतिबंध करूं लागले. ते त्यांच्या अगदीं हात धुऊन

पाठीस लागले. या लोकांमध्यें हजरतचा एक चुलता अबुलहब या नांवाचा होता. हजरतला दे माय धरणी ठाय असें त्यानें करून सोडलें होतें. त्याची बायको उम्म जमील ही प्रत्यही जंगलांत जाऊन कांट्यांचे एक ओझें घेऊन येई आणि तें हजरतच्या जाण्यायेण्याच्या वाटेंत टाकून ठेवी. केव्हां केव्हां हजरतच्या पायांना हे कांटे वोंचत आणि त्यामुळें त्यांना झालेलें दु:ख पाहून तीं नवराबायको आनंद मानीत. पुढें थोड्याच दिवसांनीं या दुष्ट मनुष्यांवर ईश्वरी कोप झाला, व त्यांना जे शारिरिक कष्ट सोसावे लागले त्याचें वर्णन करणें शक्य नाहीं.

## हजरत पैगंबर व एक आंधळा.

एके दिवशीं हजरत मुहम्मद या पुढाऱ्यांबरोबर संभाषण करीत बसला असतांनां एक आंधळा मनुष्य तेथें आला व यांचें संभाषण मोठ्या गंभीरपणानें चालू असतांना मध्येंच म्हणाला, "हे पैगंबरा, जें ज्ञान तुला ईश्वरानें शिकविलें आहे त्यापैकीं मला कांहीं तरी शिकव." या आंधळ्या माणसाच्या त्या मध्येंच बोलण्यानें ह. मुहम्मदाचें व त्या पुढाऱ्यांचें भाषण मध्येंच थांबलें आणि यामुळें ह. मुहम्मदाला या माणसाचा जरासा राग येऊन त्यानें त्याच्यावर डोळे वटारले. व तो आंधळा आला तसाच चालता झाला. कांहीं वेळ गेला, नंतर ह. मुहम्मदसाहेब एकटे बसले असतांना, थोड्या वेळां पूर्वी आलेल्या आंधळ्याचें त्यांना स्मरण झालें. त्या बिचाऱ्या आंधळ्याना विचार मनांत येतांच त्यांचें मन अनेक प्रकारच्या विचारांनीं व्यापून गेलें. संपत्ती, मानमरातब, ऐश्वर्य, या ऐहिक सुखसाधनांच्या गोष्टींचा ईश्वराच्या राज्यांत कांहीं सुद्धां किंमत नाहीं. त्या दयाघन प्रभूची भक्ति करण्याचा अधिकार ज्या प्रमाणें एखाद्या राजाला आहे त्याच प्रमाणें जो अगदीं रंक असेल त्यालाहि आहे. विशेषें करून

ऐश्वर्य, संपत्ति आणि अधिकार ज्यांना सुकृतानें प्राप्त झालीं आहेत त्या लोकांच्या आंगीं बहुतकरून अहंकाराचा मद चढलेला असतो आणि अशा मदाच्या योगानें ते परमेश्वरापासून दूरावत चाललेले असतात-उलट पक्षीं जे लोक साधे भोळे, ज्यांच्या महत्वाकांक्षेच्या सीमा दोन वेळां पोटाला मिळून थंडीवाऱ्यापासून संरक्षण व्हावें या पलीकडे गेलेल्या नसतात, त्यांची वृत्ति राजस असून ते परमेश्वरा सानिध्य असतात. असे लोकच धर्माच्या कार्याला जास्त उपयोगी पडतात. असे अनेक विचार पैगंबराच्या मनांत येऊन त्या आंधळ्याला आपण हांकून लावलें या गोष्टीचा त्यांना अत्यंत खेद झाला. त्यांच्या मनाला या गोष्टीचा किती खेद झाला, ही गोष्ट त्यांनीं ही झालेली हकिगत कुराणांत लिहून ठेविली आहे; या वरून पैगंबर साहेबांच्या मनाचा मोठेपणा, व झालेली चूक कबूल करण्याचा प्रांजलपणा किती होता, हीं गोष्ट लक्षांत येईल.

मुसलमान लोकांना त्यांच्या शत्रू पासून अनेक प्रकारचा त्रास व अपमान होत असे, म्हणून कांहीं दिवस उघडपण नमाज पढण्याचें काम त्यांनीं बंद ठेवलें. अल्–अक्रम या नांवाच्या एका मुसलमानानें आपलें एक घर या लोकांना मोकळें करून दिलें होतें, त्यांत मुसलमान लोक जमत व नमाज पढत. हें घर शहराच्या मध्य वस्तीपासून जरा दूर असलेल्या सफा या टेंकडीवर आहे. त्या वेळेपासून त्या घराची "इस्लाम घर" या नांवानें प्रसिद्धि झाली.

## ह० उमरचा इस्लाम धर्मांत प्रवेश.

हमजानें इस्लाम धर्माचा स्वीकार करून फार दिवस झाले नाहींत तोंच आणखी एका महत्वाचे मनुष्यानें इस्लाम धर्मांत प्रवेश केला. ह० मुहम्मदाचा कट्टा शत्रु अबु जेहेल होता हें मागें सांगितलें आहे. त्याचा उमर या नांवाचा एक नातलग होता. तो यावेळीं वयानें

तेहतीस वर्षांचा होता. तो अत्यंत उंच असून त्याची शारीरिक शक्ति फारच दांडगी होती. शिवाय स्वभावानें तो अतिशय उतावळा होता. या कारणसमुच्चयामुळें त्याचा त्या गांवांत असा कांहीं दरारा असे कीं इतरांच्या तरवारी पेक्षांही त्याच्या हातांतील सोट्याची धास्ती लेकांना जास्त वाटत असे. हा मुसलमान धर्माचा कट्टा शत्रु होता. असें सांगतात कीं, अबु जेहेल व हा उमर यांचें संगन मत होऊन मुहम्मद पैगंबरास संधी साधून ठार करण्याचा यांनीं बेत ठरविला. हत्यारें वगैरे घेऊन तो पैगंबराचा खून करण्यास निघाला. जातांना रस्त्यांत 'काय कुठची तयारी' म्हणून एकानें विचारल्या वरून त्यानें त्यास आपला बेत सांगून टाकला. फातमा या नांवाची उमराची एक बहिण असून तिनें इस्लाम धर्म स्वीकारला होता. तेव्हां प्रश्न करणारा मनुष्य म्हणाला, "प्रत्यक्ष तुझी बहिण फातमा हिनें इस्लाम धर्म स्वीकारला आहे, तेव्हां प्रथम घरचा बंदोबस्त आधीं कर." हे त्या इसमाचें भाषण ऐकून उमरला इतका कांहीं संताप चढला कीं, त्याचे डोळे लाल भडक झाले व त्या रागाच्या भरांत खरा प्रकार काय आहे हें पहाण्याच्या उद्देशानें तो बहिणीच्या घरीं जाण्यास निघाला. मागें पुढें कांहीं न पहातां तो तडक तिच्या घरांत शिरला. त्यावेळीं त्याची बहिण फातमा व तिचा नवरा सईद ही उभयतां कुराण वाचीत होते. बहिणीला 'काय चालले आहे' म्हणून उमरनें विचारलें. त्यावर तिनें "कांहीं नाहीं," म्हणून जबाब दिला. "तुम्हीं मुसलमान झालां आहांत" असें मला कळलें आहें, असें तो आपल्या बहिणीस बोलून लागलाच फिरला. त्याच्या रागाला डोळे नव्हते. एकदम त्यानें आपली तरवार बाहेर काढून एका हातानें आपल्या मेहुण्यास ओढून जमिनीवर पाडलें, आतां हा वार करणार हें जाणून फातमेनें आपल्या नवऱ्याच्या आंगांवर उडी घेतली; उडी घेत असतांना उमरच्या तरवारीच्या टोंकाचा धक्का लागून तिला जबर जखम झाली.

"आम्हीं मुसलमान झालों आहों काय करावयचें तें कर" फातिमा म्हणाली. बहिणीच्या ह्या शद्बाचा उमरच्या मनावर मोठा विलक्षण परिणाम झाला. शिवाय बहिणीचे ते रक्ताबंबाळ झालेलें शरीर पाहून त्याल मोठा कळवळा आला. त्याला आपल्या उतावळ्या स्वभावाची मोठी लाज वाटूं लागली. 'तूं आतां जे कागद वांचित होतीस ते कोठें आहेत', असें त्यानें आपल्या बहिणीला मोठ्या शांतपणें विचारलें. "मुसलमान लोक नमाज पडण्यापूर्वी हातपाय धुवून शुचिर्भूत होतात, त्या प्रमाणें हात पाय तोंड धुवून तूं स्वच्छ झाल्याशिवाय मी तुला त्या कागदांनां स्पर्शही करूं देणार नाहीं." असा तिनें रोकठोक जबाब दिला. उमर आतां शांत झाला होता. त्याची वृत्ति पालटत चालली होती. त्यानें तत्काळ तिचें म्हणणें मान्य केलें. पाणी घेऊन त्यानें आपले हात पाय तोंड स्वच्छ धुवून काढले आणि नंतर ते कागद हातांत घेऊन कुरणांतील विसावा भाग तो वाचूं लागला.

"तुमचे शारीरिक व मानसिक क्लेश वाढावेत म्हणून आम्हीं तुमच्या हातांत कुराण देत नाहीं, तर ज्यांनां परमेश्वराची भीति आहे, त्यांनां सन्मार्ग दाखविण्याकरितां देत आहोंत. तो दयाळु प्रभू आपल्या सिंहासनावर बसलेला असून या भूमंडळांत दिसणाऱ्या प्रत्येक चराचर वस्तूंचा मालक आहे. ईश्वराची प्रार्थना मोठ्यानें करा, किंवा मनांतल्या मनांत करा. कशीहि करा, ती त्या प्रभूला कळल्यावांचून रहात नाहीं. त्या प्रभूला अज्ञात असें या जगतीतलावर कांहींच नाही." कुरणांतील हा एवढाच भाग वांचून उमरच्या अंतःकरणावर स्वच्छ प्रकाश पडला. तो मनाशींच विचार करूं लागला कीं हें शब्द मुर्खाच्या किंवा अडाणी माणसाच्या तोंडून खास येणार नाहींत. तो तसाच पुढें वाचूं लागला; जसेंजसें त्याचें वाचन पुढें पुढें होऊं लागलें तस तसा त्याचा आनंद द्विगुणित होऊन त्याची ज्ञानेंद्रियें विकास पावूं लागलीं. वाचन पुरें झाल्यावर त्यानें वाचलेल्या मजकुरावर पुष्कळ

विचार केला. जसजसा तो विचार करी, तसतसे कुराणांतील सत्यावर त्याचा जास्त जास्त विश्वास बसूं लागला. शेवटीं तो अगदीं अस्थीर होऊन जाऊन ह० मुहम्मदकडे जाण्यास व त्यांच्या धर्माची दिक्षा घेण्यास तयार झाला.

सफा टेंकडीवरील अल–अक्रमच्या घरीं इस्लाम धर्मांतील सर्व लोक प्रार्थनेकरितां जमलेले असतांनां, एकाएकीं बंद केलेल्या घराच्या दरवाजावर कोणी थाप मारली. हमजानें पुढें होऊन पाहिलें तों हा प्रत्यक्ष राक्षस दरवाजाशीं उभा असलेला त्यास दिसला आंतील सर्व लोकांची एकच गडबड उडून जो तो आपआपलीं हत्यारें सावरूं लागला. कांहीं लोक तर दरवाजा उघडूं नका म्हणून म्हणूं लागले. पण ह.मुहम्मद साहेबानें त्यांनां शांत करून दरवाजा उघडण्यास सांगितलें. उमरला आपल्या मागील सर्व अपराधांचा खराखुरा पश्चात्ताप झाला होता. त्याच्या मुखावरील नेहेमीचा उर्मटपणा नाहींसा होऊन त्या ठिकाणीं लज्जेची छाया दिसत असल्याचें पाहून सर्व मुसलमान लोकांना हा प्रकार काय आहे याची जाणिव होईना. उमर जो आंत आला तो एकदम जाऊन त्यानें अत्यंत विनम्र भावानें ह. मुहम्मद साहेबांचे पाय धरले, व त्यांची क्षमा मागूं लागला. खरा प्रकार आतां सर्वांच्या लक्षांत येऊन चुकला. सर्वांच्या तोंडून "वाहवा वाहवा" असे उद्गार बाहेर पडले. उमरनें इस्लाम धर्माचा स्वीकार केला, ही गोष्ट सर्वत्रांस मोठी अजब वाटूं लागली, व त्या दिवसापासून ह. उमर हा ह० मुहम्मदाचा मोठा पाठीराखा झाला. त्यानें इस्लाम धर्म मनापासुन स्वीकारला व तो त्यानें अत्यंत इमाने इतबारे व मोठ्या अभिमानानें आजन्म पाळला. त्याला या धर्माचा अत्यंत अभिमान असून, या धर्माचा कीर्तिध्वज दिगंतरी पसरावा म्हणून कित्येक प्रसंगीं ह्यानें आपल्या जीवाचीहि पर्वा केली नाहीं. एके दिवशीं ह. उमर मोठ्या निधड्या छातीनें काबा मंदिरांत सर्वांसमक्ष प्रार्थनेस गेला.

त्याच्या मागून दुसरेही कांहीं मुसलमान त्याच्या बरोबर तेथें गेले परंतु ह. उमराचा वचक आणि दरारा शहरांत इतका कांहीं होता कीं, त्यास किंवा इतर मुसलमानास प्रतिबंध करण्याची कोणा एकाहि मनुष्याची छाती झाली नाहीं.

अबुबक्र प्रमाणें उमरनेंही ह०मुहम्मद साहेबांची मर्जी सुप्रसन्न करून घेतली व तो त्यांचा एक मुख्य सल्लागार म्हणून ठरला गेला. पुढें तर हे दोघेही पैगंबर साहेबांच्या पश्चात खलीफा झाले. येथें एक गोष्ट मोठी विचार करण्यासारखी आहे. अबुबक्र हा जात्या शांतस्वभावाचा होता. जगांतील उपद्व्याप व उलाढाल्या यांच्या पासून तो नेहमी अलिप्त असे. असें असतांहि इस्लाम धर्माचा प्रभाव असा कांहीं आहे कीं, अबुबक्र सारखा थंडा मनुष्य सुद्धां धर्माकरितां निधड्या छातीनें हातांत तरवार घेऊन बाहेर पडला. तसेंच उमरचेंहि झालें. त्याचा तो उतावळा स्वभाव, दुरभिमान, अनाचार आतां कोंठच्याकोठें निघून गेला. चमत्कार पहा. हाच मनुष्य आतां शांत, पूर्ण विचारी व न्यायी म्हणून प्रसिद्ध झाला. ह. पैगंबराच्या मागें खलीफाच्या जागेवर त्याची नेमणूक झाली. ह्याच्या खिलापतीत इस्लाम धर्म, पूर्वेस इराण व पश्चिमेस इजिप्त पर्यंत पसरला. धर्माची जी विलक्षण कर्तबगारी दृष्टीस पडते ती हीच होय.

हजरत उमरनें इस्लाम धर्मांत जेव्हां प्रवेश केला त्यावेळीं मक्का शहरांत मुसलमानांची संख्या फक्त ३९ होती, ही संख्या शत्रूच्या मानानें फारच कमी होती, म्हणून ते उघडपणें नमाज पडण्याचे कार्य करीत नसत; पण हजरत उमर इस्लाम धर्मांत आल्यावर त्यांना त्याच्या आधारावर प्रसिद्धपणें नमाज पडण्याची हिंमत आली. ह. उमरचें शौर्य व त्याची धडाडी यांचा इस्लामधर्माला मोठा मजबूत आधार मिळाला. ह. उमरची कीर्ति सर्व देशांत पुढें पसरली व थोड्याच काळांत त्यानें आपला अंमल देशोदेशीं बसविला. इस्लाम

धर्मांत आल्यानंतर त्याच्या बिबी हफसा नांवाच्या मुलीबरोबर हजरत पैगंबरनें लग्न केलें. ह. उमरला खोटें कधींही आवडत नसे. तो सत्याचा फार अभिमानी होता; म्हणून लोक, " फारुक " असें बहुमानानें त्याला म्हणत.

याच्या कारकिर्दींत इस्लाम धर्माचा प्रसार जितक्या झपाट्यानें झाला तितक्या झपाट्यानें तो दुसऱ्या कोणत्याही खलिफाच्या कारकिर्दींत झाला नाही. त्यानें आपल्या साडेदहा वर्षांच्या कारकिर्दींत चार हजार पांचशें शहरें जिंकली; आणि चार हजार मशिदी बांधल्या.

# भाग ६ वा.

## तुफानांत हजरत पैगंबर.

(विषय.)


१ चमत्कार. २ हजरत जादुगार.
३ मुसलमानांचा देशत्याग. ४ ज्ञाति बहिष्कृत ठराव.
५ करारनाम्याचा नाश. ६ हजरतवर दुःखाचे पर्वत.
७ दुर्दैवी तायफ. ८ आकाबाची पहिली प्रतिज्ञा.
९ पैगंबरची स्वर्गाला खेप.


### १ चमत्कार.

हजरत पैगंबराचा सदुपदेश न मानणारे आणि त्यांची थट्टा करणारे मक्का शहरांत पुष्कळ होते. शारीरिक क्लेशाशिवाय यालोकांपासून त्यांना अनेक प्रकारचे मानसीक क्लेश सुद्धां सहन करावे लागत. ते त्यांना पैगंबर खरा, असें सिद्ध करून दाखविण्यासाठीं कांहीं अलौकिक चमत्कार करून दाखविण्यास सांगत. ज्याच्यावर ईश्वर प्रसन्न झाला, ज्याला त्यानें आपला पैगंबर बनविलें, आणि जो धर्म स्थापन करण्याला लायक झाला, त्याला सृष्टींत कांहींच अशक्य नाहीं, असें त्यांचें मत होतें. ज्याच्या अंगांत सामान्य लोकांपेक्षां अधिक दैविक सामर्थ्य असत त्यालाच पैगंबर होण्याचा अधिकार प्राप्त होतो. अर्थात् त्याला त्या दैविकसामर्थ्याच्या बळावर प्रतिसृष्टीहि निर्माण करतां आली पाहिजे, अशा तत्वांवर ते हजरतला आडवेतिडेव प्रश्न करून अडवीत असत. पैगंबरनें खाणेंपिणें सोडून निराहार राहिलें पाहिजे; आणि अशा रीतीनें जगांत राहून धर्मोन्नति करण्याचा जो प्रयत्न

करील त्याला यश प्राप्त झालेंच पाहिजे, असें त्या लोकांचें स्पष्ट मत होतें. याच मताला अनुसरून ते हजरत पैगंबर साहेबांना अन्नपाणी सोडून देण्यास सांगत. मृत झालेल्या इसमाला सजीव करणें, कोरड्या ठणठणीत विहिरींत किंवा ओढ्यांत धो धो वाहाणारे पाण्याचे झरे उत्पन्न करणें, देवदूतांना हांक मारून लोकांच्या पुढें त्यांना उभे राहण्यास सांगणें, वाटेल त्या वेळीं आकाशांत पावसाचे ढग निर्माण करून त्यांतून पृथ्वीवर वृष्टि करणें, एखादा पर्वत तेथून उचलून तो दुसरीकडे नेऊन टाकणें, हे व अशाच प्रकारचे चमत्कार करून दाखविल्याशिवाय ते हजरतवर धर्माच्या बाबतींत विश्वास ठेवण्यास तयार नव्हते.

अशा लोकांना हजरत सांगत असत, " कीं ज्यांच्यावर ईश्वराची कृपा असते, त्यांच्याचकडे धर्मोन्नतीचे कार्य तो सोंपवितो. या पृथ्वीवर मानव प्राण्यांची वस्ती आहे, म्हणून येथें निर्माण होणारे पैगंबर मनुष्य प्राणीच असतात. देव दूतांमध्यें संचार करणारे पैगंबर देवदूत असतात. पैगंबराची थट्टा केलेली परमेश्वरालाहि आवडत नाहीं. त्यांची श्रद्धा पैगंबरावर बसावी याकरितां त्यांनीं पैगंबराच्या हातून चमत्कार करविले तर तेच लोक त्या चमत्कारना भूत, जादू, नजरबंदी, अशीं नांवें ठेऊन मोकळे होतात. परमेश्वराचें दर्शन होणें ज्याच्या त्याच्या पुण्याईचें व श्रद्धेचें फळ आहे. सामान्य लोकांच्या समजुतीकरितां तो स्वतः जर प्रगट होऊं लागला, तर तो एक स्वस्त मिळणारी वस्तु आहे असें होईल. त्याच्या प्राप्तीकरितां पाप पुण्य, नीति व अनीति यांचे बिकट मार्ग चोखळावे लागतात, तो जर पैगंबरावर विश्वास ठेवा असें सांगण्यासाठीं लोकांच्यामध्यें प्रगट होऊं लागला, तर पाप व पुण्य, नीति व अनीति, यांच्या भानगडी करण्याचें कारणच उरणार नाहीं. समाजाचे बंधनच नष्ट झालें तर मानवसृष्टी एक भयाण अरण्य होईल. सृष्टी निर्माण करण्याचा ईश्वराचा हेतू हा नव्हे.

लोकांना स्वर्गाचा रस्ता दाखविण्याकरीतां जेव्हां या पृथ्वीवर पैगंबर निर्माण होतात, तेव्हां त्यांच्यावर प्रथम लोकांचा विश्वास बसत नाहीं. हें पाहून ईश्वर पैगंबरांना स्वर्गांत नेतो व धर्मप्रसाराचें कार्य त्यांच्या हातांत देऊन, लोकांना देण्यांकरीतां त्याच्या जवळ तो धर्मपुस्तक देतो. या सर्व गोष्टी लोकांच्या समक्ष घडत असतात, परंतु हे सर्व जादूचे, नजरबंदीचे खेळ आहेत; असें बोलून ते पैगंबराची थट्टा करितात.

मला खाण्यापिण्याचा व्यापार बंद करण्यास हे लोक सांगतात; त्यांवर मी त्यांना असा प्रश्न विचारतो कीं, माझ्यापूर्वी आजपर्यंत होऊन गेलेले पैगंबर खाणेंपिणें सोडून देह रक्षण करून होते किंवा नाहीं? चमत्कार जर पाहावयाचे असतील तर ही सृष्टि हाच मोठा चमत्कार नव्हे काय? आकाशांत सर्वच चमत्कार आहेत. पृथ्वीवर चमत्काराशिवाय दुसरें कांहींच नाहीं. प्रत्येक दिवसानंतर येणारी रात्र, रात्रीं नंतर येणारा दिवस, आकाशांतून होणारी वृष्टी, तिच्या पासून या भूतलावर उत्पन्न होणारें चैतन्य, हे सर्व चमत्कार नव्हत असें कोण म्हणेल? ज्यांना या गोष्टींत विशेष असें कांहींच दिसत नसेल, तर दुसऱ्या गोष्टी तरी त्यांना विशेष अशा कशा दिसतील? अफाट समुद्रावर इकडून तिकडे जाणारी येणारी गलबतें पहा. मनुष्यमात्राच्या कल्याणाकरितां त्यांच्या सुखासोईकरितां नाहीं का त्या महासागराची उत्पत्ति? त्या महासागराकडे पाहून त्या सृष्टीकर्त्याच्या अगाध शक्तीचा व त्याच्या चातुर्याचा चमत्कार नाहीं का वाटत? फार लांब कशाला, आपली मानवांचीच सृष्टी पहा. आपल्या शरीरांची रचना, त्यांत अनेक निरनिराळ्या इंद्रियांची योजना, बुद्धि, विचार, कल्पना, इत्यादि मानसीक देणग्या, वाणीची जोड, या सर्व गोष्टींचा विचार करून पाहिला तर हा केवढा मोठा चमत्कार आहे! अशा प्रकारचे प्रत्येक क्षणोक्षणीं अगणित चमत्कार दृष्टीस पडत असतांना लोक त्यांच्याकडे दुर्लक्ष करून डोळे झांक करितात.

मी फक्त तुम्हांला सद्धर्माचा मार्ग दाखवीत आहे. चमत्कार करून दाखविण्याचें काम माझें नाहीं. ईश्वराच्या अगाध चातुर्यानें व कौशल्यानें निर्माण केलेली सृष्टी हाच चमत्कार पहाण्यासारखा आहे, तो पाहा. मनुष्याच्या अंतःकरणांत दया, माया, क्षमा, शांती, इत्यादि सद्गुणांच्या उत्पत्तीनें मनुष्य प्राण्याला इतर प्राण्यांपासून भिन्नता येऊन त्याला दैविक सौंदर्य प्राप्त झालें आहे. हा केवढा चमत्कार ? ज्यानें त्याला सात्विक गुणांच्या रत्नाच्या खाणी दाखविल्या, त्यानेंच त्याला तमोगुणांचे पर्वतहि दाखविले; परंतु मनुष्य आपल्या अज्ञानामुळें रस्ता भुलून जाऊन त्या हिडिस पर्वतांची दिशा धरतो, व शेवटीं आपल्या अमोलिक जन्मांची मातीमोल किंमत करून टाकतो. थोडा विचार करून पहा, या चमत्कारापेक्षां आश्चर्यकारक चमत्कार दुसरा आहे का ?

मनुष्य प्राणी किती कृतघ्न आहे पाहा. ज्या परमेश्वरानें आपली अलोट संपत्ति, जमीन, हवा, पाणी, प्रकाश, सजीव सृष्टी तुम्हांस वापरण्याकरितां दिली, त्या त्याच्या अनंत उपकाराबद्दल तुम्हीं त्याचे उपकार कधीं मानता का? आपल्या शेजाऱ्याच्या लहानशा उपकाराबद्दल जर त्याचे आभार मानले नाहींत तर त्याला सुद्धां राग येतो, व तो दुसऱ्यावेळीं आपल्या उपयोगी पडण्यास कांकूं करतो; मग त्या सृष्टीकर्त्याला त्याच्या जवळ आपण इतक्या कृतघ्न वृत्तीनें वागतो, त्याबद्दल त्याला कांहींच वाटत नसेल काय ? आपण आड मार्गानें जात आहोंत, आपली भूलचूक होत आहे, हें आपणांस समजतें, परंतु आपल्या हातून चुकीची दुरुस्ती होत नाहीं. हा एक चमत्कार नव्हे काय ?

जो जो तुम्हीं विचार कराल, तो तो तुम्हांला ईश्वराची दया सर्वत्र पसरलेली तुमच्या दृष्टीस पडेल. या वाळूच्या अफाट शुष्क भयाण मैदानांकडे पहा. प्रत्यक्ष मृत्यु आपलें अक्राळ विक्राळ स्वरूप

लोकांना दाखविण्याकरतां उभा आहे, असें तेथें दिसतें ना? घटकेंत आकाश व्यापून टाकणारा तो तेथील भयंकर तुफानी वारा घटकेंत नाहींसा होतो व जिकडे तिकडे शांतता दिसते. हें व्हावें कसें? ज्या ठिकाणीं सृष्टी एक वेळ रौद्र स्वरूप धारण करून मनुष्याला भीतीनें थरथर कांपण्यास लाविते, त्याच ठिकाणीं निरभ्र आकाशांतील अगणीत दैदिप्यमान तारागणांच्या प्रकाशांत ती हंसत मुखानें क्रीडा करते. ज्यांनां या सृष्टीची हीं दोन स्वरूपें पहाण्याचा योग येतो, त्यांनां या दोन्ही प्रसंगीं आपल्या मनाची कशी कशी स्थिति झाली हें चांगलें सांगतां येईल; परंतु या सर्व देखाव्यांच्या दोऱ्या ज्याच्या हातांत आहेत त्याच्याबद्दल त्यांनीं कधी विचार केला आहे काय?

ज्या सृष्टीकर्त्यानें या सृष्टींत पर्वतासारखे प्रचंड चमत्कार करून दाखविले आहेत, ते जर तुम्हांला दिसत नाहींत, तर मी करून दाखविलेले बारिक सारिक चमत्कार तुम्हांला कसे दिसावेत? त्याच्या अजब कौशल्यानें, तुम्हीं आश्चर्यचकित होत नाहीं, तर मग तुमच्या सारख्याच एका मनुष्यानें तुम्हाला आश्चर्यचकित कसें करावें! तुम्हीं आपले अज्ञान पार टाकून द्या, अहंकार सोडा आणि त्या सर्वशक्तिमान प्रभूला शरण जा. तो तुम्हांला आपलें दिव्य तेज व आपलें सामर्थ्य दाखऊन आश्चर्यचकित करील.

हे लहान मुके प्राणीच पहा. हे किती परोपकारी आहेत बरें! रानाडोंगरांत जाऊन हे आपलीं पोटें भरतात आणि तुम्हांला दूध देतात, थंडीपासून तुमच्या देहाचें संरक्षण व्हावें म्हणून तुम्हांला वस्त्र प्रावर्णे करण्याकरितां आपल्या आंगावरची लोंकर देतात. या प्राण्यांच्या ठिकाणीं चमत्कार नाहींका दिसत? तुमची स्वतःचीच गोष्ट घ्या. कांहीं वर्षांमागें तुम्ही बाल्यावस्थेंत होतां, त्यानंतर त्यांतून बाहेर पडून आज तुम्ही तरुण ज्वान दिसत आहांत, पुढें कांहीं वर्षानंतर हें तुमचें

तारुण्य जाऊन तुम्हांला वृद्धावस्था प्राप्त होईल. त्या वेळीं मनुष्यांची कशी दुर्बळ अवस्था असते हें तुम्ही पहातांच. तेथेंही शक्ति दिवसें-दिवस क्षीण होत जाऊन तुमच्यावर मृत्युची झडप पडेल! या सर्व स्थित्यंतराचा विचार करून पाहिलात तर त्या अनंत शक्तिमान प्रभूच्या कृतीचा चमत्कार नाहीं का वाटणार? यापेक्षां आश्चर्यचकित करून स्थब्ध करणारा दुसरा चमत्कार तो कोणता! ही सृष्टी हें एक पुस्तक आहे. त्यांतील प्रत्येक पानांवरील प्रत्येक ओळ चमत्काराच्या वर्णनानीं भरलेली आहे. तुम्हीं आपले ज्ञानचक्षु उघडा आणि हें सुंदर पुस्तक वाचा."

## २ हजरत जादुगार

### अमीन, होता तो जादुगार झाला.

हजरत पैगंबरच्या धर्मप्रसाराच्या कार्यांत दिवसेंदिवस येत चाल-लेलें यश पाहून त्यांच्या दुष्मानांची अस्वस्थता अधिकाधिक होत चालली. त्यांच्या शद्बांत अपूर्व रस भरलेला होता. त्यांच्या शद्बांत दैविक शक्ति भरलेली होती. त्यांचा ऐकणाराच्या मनावर तत्क्षणीं विजे प्रमाणें परिणाम होई. बाहेर गांवाहून व्यापाराच्या निमित्तानें आलेले मुसाफर, यात्रेच्या दिवसांत आलेले यात्रेकरू, किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें मक्केला येणारे जाणारे प्रवाशी, हजरतसंबंधी निरनिराळ्या केळ्या, आणि अनेक प्रकारच्या खऱ्या खोट्या बातम्या ऐकत; व कांहीं लोकांना हजरतला स्वतः पाहून यांत काय तथ्यांश आहे याची खात्री करून घ्यावी असें वाटे. गांवांतील लोकांना हजरतनें उपदेश करण्याचें सोडून दिलें; परंतु बहेर गांवाहून आलेल्या लोकांना भेटण्याची संधी आलीच तर ते ती मात्र वांया जाऊं देत नसत. हजरतचें भाषण ते शांतपणानें ऐकत व त्यांच्यातील भाविक त्याच्यावर विचार करीत.

कुरेश लोकांच्या द्वेषाचें स्वरूप निराळेंच होतें. परक्या लोकांच्या जवळ हजरतनें उपदेश करण्यापुरता ठेविलेला संबंध सुद्धां त्यांना पहावत नसे. गांवांत त्या लोकांनीं शक्य तो बंदोबस्त करून हजरतचे सर्व उपदेश करण्याचे मार्ग बंद करून टाकिले होते; व आतां ते बाहेरून आलेल्या प्रवाशांना हरएकप्रकारें सांगून हजरतचा तोहि मार्ग बंद करण्याचा उद्योग करूं लागले. कुरेश लोक या लोकांच्या भेटी घेत व त्यांना सांगत, "मुहम्मद या नांवाचा एक मोठा ढोंगी मनुष्य या शहरांत आहे. तो जादूटोणा, मंत्रतंत्र जाणतो. भुताखेतांना तो उठवितो. तो चांगला तालिमबाज आहे. त्याला कविता करता येतात. तो असा काय गारुडी आहे कीं ज्याला पाहिजे त्याला तो हूं हूं म्हणतां फसवील. पहा, त्याच्या जाळ्यांत सांपडलांत कीं फसलांत." याप्रमाणें कांहीं तरि खोटेंनाटें बोलून हजरतचे शत्रू, बाहेर गांवाहून आलेल्या लोकांना बाटेला लावीत. हजरत पैगंबर अशा वेळींहि आपली शांत वृत्ति ढांसळूं देत नसत; आणि ज्या ज्या ठिकाणीं त्यांना संधी मिळे त्या त्या ठिकाणीं एका परमेश्वराच्या गुणवर्णनाचा फैलाव करण्यास ते चुकत नसत. त्यानंतर हजरतच्या शत्रूंनीं आपल्या सर्व मंडळीची एक सभा बोलविली. त्यांत त्यांनीं हजरतला सर्वानुमतें "जादुगार" म्हणून जिकडेतिकडे बोलत जावें असें ठरविलें.

कसा कालाचा महिमा आहे पहा. ज्या सत्पुरुषाच्या दानतीवरून, त्याच्या शुद्ध आचरणावरून, व त्याच्या सत्यभाषणावरून त्याला "अमीन" हा बहुमानाचा हुद्दा प्राप्त झाला, त्यालाच कालांतरानें, "जादुगार" असें नाव प्राप्त झालें. हजरतला दोन्ही विशेषणांची किंमत सारखीच वाटत होती; म्हणून पहिल्या बहुमानानें ते कधीं खुष झालेले दिसले नाहींत किंवा दुसऱ्या निंदावाचक विशेषणानें कधीं नाखुश झालेले दिसले नाहींत. या लोकांच्या या विसंगत वृत्तीबद्दल ते म्हणत

"हे, परमेश्वरा, तूं या लोकांना खरा मार्ग दाखव; आपण काय करतो हें त्यांचे त्यांनाच कळत नाहीं."

हजरत पैगंबराला कांहींतरी नांवें-खोड्या ठेवून त्याची अपकीर्ति पसरली असतां त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाहींत; आणि त्यांच्या योगानें त्याचें धर्मकार्य सिद्धिस जाणार नाहीं, अशी त्या लोकांची समजूत होती. एके दिवशीं मक्का शहरांतील एक सभ्य गृहस्थ हजरतचें भाषण ऐकण्यास त्यांच्या येथें आला. कोणी आला गेला तरी हजरतजवळ संभाषणाचा विषय एक. त्याच विषयावर त्यांनीं आलेल्या गृहस्थाजवळ भाषण करण्यास सुरूवात केली. थोड्याच वेळांनीं असा चमत्कार झाला कीं, तो गृहस्थ हजरतसमोर जो एक वेळ दगडासारखा बसला होता, त्यानें बराच वेळपर्यंत डोळ्याची पापणी सुद्धां हालविली नाहीं. तेथून निघून गेल्यावर त्याची पक्की खात्री झाली कीं, मुहम्मदला वशीकरण विद्या अवगत असलीच पाहिजे. त्या विद्येशिवाय मनुष्याला असें गोड, रसदार, व परिणामकारक भाषण करतां येणें शक्यच नाहीं. मुहम्मद खरा खरा जादुगार आहे, असें तो प्रत्येकाला सांगत सुटला. एवढेंच करून त्याचें समाधान होईना. त्याच्या अंतःकरणाला आपल्या शहरच्या अबालवृद्धांच्या कल्याणाची काळजी टोचीत होती. बकऱ्यांच्या कळपांत जसा वाघ तसा मक्केंत मुहम्मद आहे असें तो म्हणे. त्याच्या नाशाचा जर त्वरित उपाय शोधून काढला नाहीं तर मक्केची राखरांगोळी होईल अशा विचारानें त्यानें आपल्या पक्षाचे चांगले चांगले लोक बोलावून त्यांच्याबरोबर तो काबा मंदिरांत गेला. तेथील देवांच्या मूर्तींना सर्व लोकांनीं भक्तिपूर्वक नमस्कार करून व हात जोडून प्रार्थना केली कीं,—

"...हे दयावंत देवा, आम्हांवर कृपादृष्टि असूं दे. आमचें आज एक गाऱ्हाणें आहे, त आम्हीं तुझ्या समोर मांडित आहोंत, त्याच्याकडे लक्ष दे. देवा, आमच्यामधील एका ढोंगी मनुष्यानें गोरगरीबांना

फसवून मोठी उलटापालट करण्याचा उद्योग आरंभला आहे. वाडवडिलांनीं पूज्य मानलेल्या देवांना तो तुच्छ मानतो. आमच्या तोंडावर तो आमच्या देवांचा अपमान करतो. देवा, तो आमच्यानें आतां सहन होत नाहीं. तो जी निंदा करतो ती आमच्यानें ऐकवत नाहीं. आम्हांला वाटतें त्याच्याजवळ कांहींतरी जादु आहे. तशी जर असेल तर जगांत मोठा अनर्थ उडेल. देवा, तुझ्या कृपाछत्राखालीं जर ता वास करीत असेल तर तूं त्याच्या बुद्धीला चांगल्या मार्गाचें वळण लाव. तुझ्या भक्तमंडळींपैकीं तो एक आहे असें कर. हे दयावंत देवा, त्यानें जें करावयाचें योजिलें आहे तें तडीस जाऊं देऊं नको. त्याची बुद्धि भ्रष्ट कर. आम्हीं त्याला ताळ्यावर आणण्यासाठीं जें जें म्हणून करतो तें तें सर्व आमच्याच उलट होतें."

याप्रमाणें सर्व देवांच्या प्रार्थना करून पाहिल्या; परंतु देवांनीं हजरत पैगंबरचें कांहींच केलें नाहीं. हजरतला या लोकांच्या अनेकप्रकारच्या मूर्खपणाच्या गोष्टी समजत तेव्हां ते म्हणत, "खऱ्या देवाला टाकून हे लोक खोट्या देवांच्या मागें लागले आहेत. ते मलाहि आपल्याच सारखा करून आपल्या टोळींत घेण्याचा प्रयत्न करीत आहेत; परंतु ही त्यांची केवढी चूक आहे, आपली चूक सुधारून आपलें कल्याण करून घेण्याचें यांच्या कसें मनांत येत नाहीं!"

## ३ मुसलमानांचा देशत्याग.

धर्मप्रसाराचें कार्य सुरू झाल्यापासून सहाव्या वर्षीं मक्केहून आणखीहि कांहीं लोक कुरेश लोकांच्या छळाला त्रासून अबिसिनिया देशांत जाऊन राहिले. अशा देशत्यागी लोकांची संख्या आतांपर्यंत तेथें जवळ जवळ शंभर झाली होती. या लोकांच्या शिवाय आणखीहि थोडेसे लोक इस्लामधर्माला घट्ट चिकटून मक्केंतच राहिलेले होते. परंतु त्यांचा दर्जा सामान्य लोकांपेक्षां बराच वरच्या प्रतीचा होता, म्हणून इतर लोकांप्रमाणें त्यांचा उघडउघड छळ मात्र होत नसो

शत्रू आपल्या हातांतून निसटून चालले असें पाहून कुरेश लोकांनीं त्यांचा अबिसिनियापर्यंत पाठलाग केला, व तेथील ख्रिश्चन राजास नजरनजराणे देऊन त्यास त्यांनीं सांगितलें कीं, "हे लोक आमच्या शहरांतून पळून आले आहेत, यांना आमच्या ताब्यांत द्या."

राजानें गांवांत आलेल्या सर्व मुसलमान लोकांना बोलाऊन आणलें आणि विचारिलें, " तुम्ही आपल्या गांवांत काय गुन्हा करून येथें आलांत ? " मुसलमान लोकांचा पुढारी जाफर म्हणाला, " महाराज, आम्हीं मुळींच अपराध केला नाहीं. आम्हीं या वेळेपर्यंत अज्ञानानें अंधकारांत चाललेलों होतों; आमच्या हातून नित्यशः अनेकप्रकारचीं कुकर्में घडत असत; पुण्य आणि पाप याची आम्हांला खंती वाटत नव्हती; मनुष्यपणा म्हणजे काय हें आमच्या स्वप्नींहि नव्हतें; कायदा व कानु यांच्या निष्कारण उठाठेवी आहेत, अशी आमची कल्पना होती. यांच्या बंधनानें मनुष्याचे हातपाय बांधले जाऊन तो स्वातंत्र्याला मात्र मुकतो. आमची अशीशोचनीय अवस्था पाहून परमेश्वराला आमची दया आली व त्यानें आम्हांला योग्य मार्ग दाखविण्यासाठीं पैगंबर पाठवून दिला. भलेपणा, इमान, सत्यभाषण, परोपकार, ईश्वरभक्ति, इत्यादि अनेक सद्गुणाचे मार्ग त्यानें आम्हांस दाखविले. सृष्टिकर्ता, सृष्टिचालक एक आहे, ह्याच्याशिवाय दुसरा देव नाहीं, याची सत्यता त्यानें आम्हांस पटवून दिली. रोझा पाळण्यास त्यानें आम्हांस शिकविलें. स्त्रीजातीचा मान राखण्यानें परमेश्वराला आनंद होतो, निराश्रितांवर दया करण्यानें त्याला संतोष होतो, असें त्यानें आम्हांस शिकविलें. आतां या लोकांचा आमच्यावर कसा जुलूम आहे तो पहा. आम्हीं इस्लाम धर्म पाळतो, त्याची त्या लोकांना चीड येते. एका परमेश्वराची भक्ति करणें सोडून द्या आणि अनेक देवांच्या अनुपूजा करा, असें हे आम्हांस सांगतात. आम्हीं त्यांचे ऐकत नाहीं

म्हणून ते आम्हांवर चिडून गेले आहेत. आमची अल्पसंख्या व यांची फार मोठी संख्या, अशा प्रतिकूल समाजांत आमच्या टिकाव लागणें अगदीं अशक्य झालें. तेव्हां आम्हीं निरुपायानें देवावर हवाला ठेऊन घरदार सोडून येथें आलों; परंतु आमची पाठ अद्यापहि हे सोडीत नाहींत."

राजाच्या समोर उभा राहून मोठ्या धैर्यानें, व गंभीरपणानें, परंतु विनयानें संभाषण करीत असतां जाफरला आवेश चढला. निरपराधी मनुष्यांच्या होत असलेल्या छळाच्या विचारानें त्याचे डोळे रागानें लाल होत चाललेले व तें पाहतांच भित्र्या व पापी लोकांच्या अंतर्यामीं भीतीनें गडबड उडाली. जाफरची शांत वृत्ति बदलून ती आतां खवळून गेली. राजाहि मोठ्या विचारांत पडला. तो म्हणाला,–" सर्व गोष्टींचा विचार करून पाहिला तर मक्केंतील लोकांचा मुसलमानांवर जुलूम आहे असें स्पष्ट दिसतें खरें. मक्केंतील लोकांना मुसलमानांचा नवा धर्म पसंत नाहीं आणि म्हणून ते यांचा द्वेष करीत आहेत. काय या लोकांचा जुलूम पाहा ! आपण ज्या रस्त्यानें चाललों त्याच रस्त्यानें सर्वांनीं चालावें ह्मणून दुसऱ्यावर जुलूम करून कसें चालेल ? हा ज्याच्या त्याच्या मर्जीचा प्रश्न आहे."

मक्केंतील लोकांना राजाचा कल काय आहे याचा अंदाज चांगला झाला. लगेच त्यांचा एक पुढारी म्हणाला,–"महाराज, हे आपल्या " इसा पैगंबरलाहि " मानीत नाहींत; याची वाट काय ? " जाफरनें उत्तर दिलें, " महाराज, हें खोटें आहे, आमच्या कुराणांत असें स्पष्ट सांगितलेलें आहे कीं, परमेश्वरानें आपला निरोप घेऊन या पृथ्वीवर इसाला पैगंबर म्हणून पाठविलें." इतकें बोलून जाफरनें आपल्या हातांतील कुराणाचा भाग राजाला वाचून दाखविला. तो ऐकून मुसलमानांच्या शत्रूंच्या कारस्थानांचा व

त्यांच्या हेतूंचा त्याला फार राग आला. मुसलमानांना उद्देशून तो म्हणाला, " माझ्या राज्यांत सद्धर्मानें, नीतीनें आणि एका परमेश्वराला भिऊन जे वागतात त्यांना रहाण्याला पूर्ण मुभा आहे. त्यांत मुसलमान लोकांचा कांहींएक अपराध दिसत नाहीं. तुम्हीं येथें खुशाल रहा, आणि धंदारोजगार करा." राजाच्या तोंडचे हे शब्द ऐकून शत्रूंची तोंडें काळीं ठिक्कर पडलीं. त्यांची इतकी निराशा होईल अशी त्यांची कल्पना नव्हती. मुसलमानांच्या विजयानें त्यांच्या शत्रूंचे हातपाय पार मोडून गेले. राजा त्यांना म्हणाला, " चला, चालते व्हा, तुमचे सर्व खोटें आहे. तुम्हांला माझ्याकडून कांहींएक मदत होणार नाहीं. "

मुसलमानांच्या शत्रूंना मिळालेला जबाब सर्वत्र पसरला; मक्केतील पुढारी लोकांमध्यें या बातमीनें एकच खळबळ उडाली. मुसलमानांचा नायनाट करण्याकरितां जो जो म्हणून उपाय आपण योजतो तो तो सर्व वाया जातो, या विचारानें ते अगदीं विरस झाले. त्यांची अशी मात्र खात्री होऊन चुकली कीं जे लोक धर्मांतर करितात त्यांचा इस्लाम धर्मावर इतका जबरदस्त विश्वास बसतो कीं, त्या धर्मापुढें त्यांना आपले घरदार, धंदारोजगार किंबहुना आपलें कुटुंब व स्वतःचा प्राण यांची किंमत किंचित् सुद्धां वाटत नाहीं. हजरत पैगंबरनें घालून दिलेला धडा हाच आपल्या धार्मिक उन्नतीचा खंबीर आधार आहे, अशी या लोकांच्या मनाची खात्री झाली. सत्य तें अखेरपर्यंत सत्यच. त्याच्या प्राप्तीकरितां या ऐहिक क्षणभंगुर सुखाची काय किंमत आहे ? एका परमेश्वराची भक्ति करावी; त्याला शरण जावें; निरिच्छ मनानें जें आपण करूं तें त्यालाच अर्पण करावें; हें आपलें पवित्र कर्तव्य आपण या जन्मीं बजवावें; यांच्याशिवाय मुसलमानांना जागृत ठेवणारा दुसरा धर्म त्यांच्या ध्यानीं मनीं वास करीत नव्हता. मीं जें

करतों त्याचें फल काय, असें विचारण्याचा आपल्याला अधिकार नाहीं. आपल्या सदिच्छेचें फल देणारा तोच एक मालक समर्थ आहे; आपल्या सत्कृत्यांचा मोबदला देणारा तोच एकटा धनवान् आहे."

वर सांगितलेल्या धर्मतत्वांच्या दैविक बळावर मुसलमानांनीं देश-त्याग करून परदेशाचा रस्ता धरला; त्यांत त्यांनीं किती स्वार्थत्याग केला याची कल्पना त्यांच्या शत्रूंना बरोबर झाली होती. तेव्हां त्यांच्या धर्माचीं व त्यांचीं पाळेंमुळें खणून काढून टाकण्यासाठीं आतां दुसरा कोणता मार्ग काढावा, याचा मुसलमानांच्या शत्रूंना मोठा विचार पडला. अबिसिनिया देशच्या राजानें तर त्यांचे कांहींच पारिपत्य केलें नाहीं, उलट आपल्यालाच त्यानें हांकून लाविलें. अर्थात् ज्या ठिकाणीं राजसत्ताच ढिली पडली त्या ठिकाणीं सामान्य मनुष्यें तरी काय करणार

त्या धार्मिक चळवळींच्या मुळाशीं एकटे हजरत पैगंबर होते; त्या सर्व चळवळींच्या जाळ्याच्या दोऱ्या फक्त त्यांच्या हातांत होत्या; तेव्हां मूळ हालविलें असतां ज्याप्रमाणें संबंध वृक्ष ढासळून पडतो, किंवा त्याच मुळांना पाणी घातले असतां वृक्षाच्या सर्व आंगाला तें पोंचतें, त्या प्रमाणें या मुसलमानांच्या वाटेस न जातां हजरत पैगंबरला लाचलुचपत देऊन त्यालाच यांच्या मधून फोडून बाहेर काढावा, असा कुरेश लोकांनीं विचार ठरविला. त्यांनीं आपसांत निवड करून उतबा नांवाच्या एका सरदाराकडे हजरत पैगंबरकडे जाऊन त्यांच्या जवळ गोडगोड बोलून आपले कार्य करून घेण्याची कामगिरी सोपविली. बोलण्याच्या कामांत उतबा मोठा नांवाजलेला पटाईत होता. संभाष-णांत त्याचीच दुसऱ्यावर छाप पडत असे; आणि वादविवादांत दुसऱ्या पक्षाला चीत कसा करावा याची त्याला चांगली हातोटी साधलेली होती; म्हणून हजरत पैगंबरजवळ आडुमाडु पाठवून त्याचा टिकाव लागणार नाहीं ह जाणून त्यांनीं उतबाला पसंत केलें होतें.

उतबा आपल्या बरोबर संभावीत असे चार पुढारी घेऊन आपण फत्ते करून येणार अशा मोठ्या घमेंडीनें हजरत पैगंबरच्या घरीं आला. त्यावेळीं ते अबुबक्र व उमर यांच्या बरोबर धार्मिकविषयांवर बोलत बसले होते. आलेल्या पाहुण्यांचे योग्य आदरातिथ्य झाल्यावर कुरेश लोकांनीं मुद्दाम येण्याचा आपला हेतु हजरतला कळविला. आपला पूर्वापार चालत आलेला धर्म, त्याला वाडवडिलांची मान्यता, देवतांच्या प्रभावांचा अनुभव, समाजावर त्याचे पडलेलें दडपण, नवीन धर्मामुळें समाजांत होणारा विस्कळीतपणा, इत्यादि विषयावर क्रमाक्रमानें उतबानें हजरत पैगंबर जवळ आपलें वाक्‌पांडित्य सुरू केलें. हजरत पैगंबर जणूं काय ध्यानस्थ अशा स्थितींत उतबाचें भाषण शांतपणानें ऐकत होते. अबुबक्र व उमर यांना हजरत पैगंबरचा शांतपणा व मूकवृत्ति पाहून असें वाटलें कीं, हजरत याला उत्तर देण्यासाठीं ईश्वरी आज्ञेची वाट पाहात असावेत. शेवटीं उतबा म्हणाला, " मुहम्मद, सध्यां तूं जे आरंभले आहेस त्यांत तुझा हेतु तरि काय ? आपल्याला धनदौलत मिळावी अशी जर तुझी इच्छा असेल तर तूं मक्काशहरांत आमच्यापेक्षां श्रीमंत होशील इतकी संपत्ति आम्हीं तुला खुषीनें देतों. शहरांत आपल्याला श्रेष्ठ मानमतराब असावा अशी तुझी इच्छा असेल, तर तसें सांग; आम्हीं तुला आमचा मुख्य सरदार करून तुझा हुकूम आम्हीं मान्य करीत जाऊं. अरे, मुहम्मद, आमचे सामर्थ्य पाहा, आम्हीं सर्व एक होऊन तुझी इच्छा असेल तर अरबस्थानचा तुला बादशाहि करूं. तुझी काय महत्वाकांक्षा आहे तें सांग. तसें झालेंच म्हणून समज.

जर तुला पिशाच्चबाधा झाली असेल आणि त्या बाधेमुळें तुझ्या हातुन जर हा अधर्म होत असेल तर तसें स्पष्ट सांग, आम्हीं चांगले मांत्रिक आणून त्याच्याकडून पिशाच्चाचा पक्का बंदोबस्त करून टाकू; या तुझ्या वेडेचाळ्याला कांहीं अंगरोग कारण असेल तर देशांतील नामांकित राजवैद्य आणून त्यांच्याकडून समूळ रोग नष्ट होईल असे

उपचार करूं. काय असेल तें सांग. त्याप्रमाणें आम्हीं वागण्यास एका पायावर तयार आहोत. मात्र आमच्या पूज्य देवतांना नांवें ठेवण्या ठेऊं नको, त्यांची निंदा करूं नको, त्यांचा अपमान करूं नको. ”

उतबाचें बोलणें संपल्यावर हजरत पैगंबरनें मोठ्या गंभीरपणानें उत्तर दिलें, “मी सर्व तुमचें ऐकिलें, तुम्हीं माझ्याबद्दल जें कांहीं सांगतां तशांतला कांहींच प्रकार नाहीं. मला धनदौलत, मालमत्ता, मानपान, सत्ता, अधिकार यापैकीं कशाचीहि पर्वा नाहीं. मला पिशाचबाधाहि झालेली नाहीं, किंवा तशी कधीं होणार नाहीं. तुम्हीं माझें कुराण वाचा म्हणजे माझ्या स्थितीचें चित्र तुम्हांला चांगलें कळेल. कुराण हें ईश्वरी आज्ञा आहे. हा ग्रंथ आरबी भाषेंत आहे म्हणून तो तुम्हांला सहज समजण्यासारखा आहे. शहाण्या लोकांसाठीं त्यांत सर्व गोष्टी स्पष्ट करून सांगितलेल्या आहेत. परमेश्वराची आज्ञा शिरसावंद्य असणाऱ्या लोकांसाठीं त्यांत भविष्य आहे. जे त्याला अमान्य करितात त्यांना परमेश्वराच्या क्रोधाचें भय आहे.... अहो, पैगंबर, ह्या लोकांना सांगा कीं, “मीहि तुमच्याप्रमाणें एक मानव आहे. परंतु मजवर परमेश्वरी प्रेरणा झाली आहे. सर्वांचा परमेश्वर एकच आहे. त्याचीच भक्ति केली पाहिजे व त्याच्याजवळ पापक्षालनासाठीं प्रार्थना केली पाहिजे. जे लोक परमेश्वरासारखा आणखी दुसरा देव आहे असें मानतात, दानधर्म करीत नाहींत, शेवटच्या दिवसास मानीत नाहींत अशा लोकांबद्दल वाईट वाटतें. परंतु ज्यांनीं परमेश्वरावर विश्वास ठेविला, त्यानें मोठें पुण्य केलें व त्याच्या मोबदल्याबद्दल त्यानें मोठें बक्षीस मिळविलें.

हें ऐकून उताबाच्या मनावर मोठा परिणाम झाला. ज्यांच्या अंगांत आत्मिक बळ नसतें त्यांना ह्या जगांत सर्वांत श्रेष्ठ अशा वस्तु म्हणजे धनदौलत, मानमतराब, लौकिक, सत्ता, अधिकार आहेत अशा समजूतीनें त्यांच्या मागें आपलें आयुष्य घालवितात, व याच गोष्टींची लालूच

दुसऱ्यांना दाखवून ते आपले कार्य साधून घेण्याचा प्रयत्न करितात. परंतु ज्यांचें ध्येय थोर, ज्यांचें आत्मिक बळ हेंच सामर्थ्य, अशा महात्म्यावर या क्षणभंगूर वस्तुंचा काय परिणाम होणार? उतबानें परत जाऊन झालेली सर्व हकीगत कुरेश लोकांना सांगितली, व शेवटीं तो म्हणाला, " हजरत पैगंबरच्या आड कोणी जाऊं नका. विनाकारण त्याचा द्वेष करणें चांगलें नाहीं." तेव्हां कुरेश म्हणाले, "ह्या उतबावरहि हजरत मुहम्मदच्या जादूचा अंमल झाला."

## ४ ज्ञाति बहिष्कृत ठराव

अरब लोकांमध्यें गोत्राभिमान अतिशय असल्याकारणानें, ह. मुहम्मदच्या अबुलहब नांवाच्या चुलत्या शिवाय बाकीचे सर्व नातेवाईक व अनुयायीं लोक त्यांचें संरक्षण करण्यास सिद्ध झाले. विरुद्ध पक्षाची जय्यत तयारी पाहून त्यांच्याही अंगांत विरश्री खेळूं लागली. ह. मुहम्मदाचा पणजा हाशिम याचा बहुतेक सर्व वंश आपल्या वंशाच्या अभिमानाला चिकटून राहिला. या वंशाला आपण या पुढें हाशमी असें म्हणूं. या हाशमी लोकांची संख्या कुरेश लोकांच्या संखेच्या मानानें अत्यल्प होती म्हणून हाशमी लोकांना या कुरेश लोकांपुढें आपला टिकाव लागेलच असा भरंवसा वाटत नव्हता. त्यांच्यावर उघड उघड हल्ले होऊं लागले. एके दिवशीं पैगंबरसाहेबांना काबा मंदिरांत कांहीं लोकांनीं धरले, आणि या आणीबाणीच्या प्रसंगी आबुबक्रनें आपलें क्षात्रतेज दाखविले नसते तर पैगंबरसाहेबांच्या जीवाची मुळींच आशा नव्हती. आबुबक्रला मात्र या झटापटींत जबर जखम झाली.

हजरत पैगंबर जेव्हां घरांतुन बाहेर पडत तेव्हां त्यांच्या एका बाजूला उमर व दुसऱ्या बाजूला हमजा त्यांच्या संरक्षणा करतां रस्त्यानें चालत. या दोन वीरांच्या पुढें गावांतील एकाहि मनुष्याची पाउल टाकण्याची छाती होत नसे. काळ मोठा भयंकर तर खरा!

हजरतच्या जिवाला प्रत्येक क्षणोक्षणी मोठी धास्ती होती, परंतु वर सांगितलेल्या सिंहाच्या गर्जने पुढें कोल्हीं कुत्रीं बिचारी काय करणार एके दिवशीं हजरत पैगंबर, उमर व हमजा याना बरोबर घेऊन चालले असतांना उमरनें " इस्लाम धर्म स्वीकारलेले असे किती लोक येथें आहेत " असा त्यांना प्रश्न केला. पैगंबरने जबाब दिला, " तुझ्या सुद्धा चाळीस. " उमर म्हणाला, " या रसुलिल्लाह, एवढेच ! हे पुष्कळ काफर लोक काबामध्ये बेधडक जाऊन देवांच्या पुजाअर्चा करितात तेव्हां आपण थोडे असूनाहि त्या एका परमेश्वराची नमाज तेथें जाऊन त्यांच्याच प्रमाणें कां पडू नये ? पैगंबरला हा विचार पसंत पडला,व ते काबाशरीफ मध्यें जाण्यास निघाले. त्यांच्या उजव्यीं बाजूला अबुबक्र, डाव्या बाजूला हमजा पुढें अलि व सर्वांच्या पुढें उमर या प्रमाणें मंडळी काबाशरिफकडे जाऊ लागली. त्या वेळीं काबा मध्यें मुसलमानांचे बरेच शत्रू बसलेले होते. परंतु या लोकांना काबाशरिफाकडे येतांना पाहतांच भीतिनें त्यांची पांचावर धारण बसली व जो तो जीव घेऊन तेथून पळुन गेला. हजरत पैगंबर काबा मध्यें दाखल झाले व सर्वजण परमेश्वराच्या नांवानें नमाज पडले.

पुष्कळ दिवस हजरतला दिवसाढवळ्या एवढ्या समारंभानें जातांना कोणी पाहिले नव्हते; तेव्हां या दिवसाच्या समारंभानें सर्व लोकांना मोठें आश्चर्य वाटलें. हा सर्व रंग उमर मुळें आला हे ते जाणून होते, परंतु ते करणार काय ! कुरेश लोक एकत्र जमून त्यांनीं त्या दिवशीं असा ठराव केला कीं जो पर्यंत मुहम्मद आपला दुराग्रह सोडून देणार नाहीं तो पर्यंत हासम आणि मुत्तलिब यांच्या वंशाजवळ आपल्या पैकी कोणीहि कांहीं एक व्यवहार करूं नये, त्यांना शहरांतील कोणत्याहि दुकानदारानें कांहीं एकवस्तु विकत देऊं नये; गावांतील कोणत्याहि इसमानें या लोकांना कसलीहि मदत देऊं नये

व यांच्या जवळ रोटी व बेटी व्यवहार कोणी करूं नये. हे परधर्मी असून त्यांना सर्व शहराचे शत्रू समजावेत.

याप्रमाणें ठराव करून त्याच्यावर पुढाऱ्यांच्या सह्या घेऊन तो ठराव काबाशरिफमध्यें पंचाच्या ताब्यांत म्हणून ठेऊन दिला.

वर सांगितलेल्या ठरावाप्रमाणें मक्का शहरांत कुरेश लोकांनीं हजरतच्या पक्षाचा पक्का बंदोबस्त करून टाकला. हाशमच्या वंशाला शहरांत रहाणें अत्यंत कठीण भासूं लागले. एकतर यांच्यों बरोबर कोणाचाहि देण्याघेण्याचा व्यवहार होईना आणि शिवाय रस्त्यानें हिंडण्या फिरण्यालाहि यांना मोठी धास्ती वाटू लागली. हाशमचा वंश कुरेश लोकांच्या या जुलुमावर चिडून गेला आणि आपण सुद्धां माघार घ्यावयाची नाहीं असा त्यांनीं विचार ठरविला. गांवात राहून प्रत्येक दिवशीं भांडण तंटा करण्यापेक्षां गांवाच्या बाहेर राहून दिवस काढलेले बरे असें सर्वानुमतें ठरले.

मक्केच्या पूर्वेकडील बाजूला उंच पर्वतांच्या रांगा आहेत. त्या रांगा उतरत्या होत होत अगदीं शहराच्या वेशीपर्यंत पोहोंचल्या आहेत. अशा उतरत्या रांगाच्या मध्यें अरुंद व मोठ्या दऱ्या आहेत. या दऱ्यांना आरबी भाषेंत "शअब" असें म्हणतात. अशा एका शअबमध्यें अबुतालिचा एक किल्ला होता. शहरांतून त्या किल्ल्याला जाण्याची फक्त एक चिंचोळी वाट होती. या किल्ल्याच्या नैसर्गिक रचनेंमुळे तो शत्रूंच्या हल्ल्यापासून नेहमीं टिकत असे. कुरेश लोकांनीं मुसलमान लोकांचा छळ करण्यास सुरवात केली तेव्हांपासून हाशमी लोकांनीं या किल्ल्याचा आश्रय केला. गांवांत राहणें अत्यंत धोक्याचें आहे अशी खात्री होतांच, आपल्या घरांदारांवर पाणी सोडून प्राणरक्षणार्थ ते या शअबमध्यें येऊन राहिले. ह. मुहम्मद साहेब व त्यांचे भाऊबंदहि आपलें घरदार सोडून या ठिकाणीं

येऊन राहिले होतें. नाहीं म्हणायला, अबुलहब काय तो गांवांत राहिला होता. सर्वच हाशमी लोकांनीं इस्लाम धर्म स्वीकारला होता अशांतला प्रकार नाहीं. परंतु आपल्या भावाबंदाना सोडून गांवांत राहणें त्यांना धोक्याचें वाटू लागलें, म्हणून तेही हजरत मुहम्मद साहेबांबरोबर शअबमध्यें येऊन राहिले. अरब लोकांत जो एक सद्गुण आहे तो हाच कीं, ज्याला ते आपला म्हणून एकवेळ समजतील त्याला ते सहसा अंतर देत नाहींत. ह. मुहम्मदसाहेबांवर त्यांच्या घराण्यांतील लहान थोर मंडळींचे अतिशय प्रेम होतें. कित्येकांचा तर तो धर्मगुरू झाला होता, म्हणून त्यांच्यावर त्यांचे एकतर प्रेम असून, त्यांच्या बरोबरच त्यांची त्यांच्यावर अनिवार भक्ति बसली होती. ह.मुहम्मदासाठीं त्यांच्या नातेवाईकांनीं आपली घरेंदारें सोडलीं, पाहिजेल तसल्या हालअपेष्टा सोसण्यास तयार झाले, व जीवाची पर्वा न करितां कुरेश लोकांबरोबर लढण्यासहि तयार झाले. यावरून हि. मुहम्मदाचे अंगीं त्यांचे मन आकर्षण करून घेण्यासारखे कांहीं तरी दैवी सामर्थ्य होतें हे कोणालाही कबूल करावे लागेल. इतिहास प्रसिद्ध म्हणून राजकारणी किंवा धार्मिक आचार्य आजपर्यंत जे निर्माण झाले त्यांच्याही अंगीं असेंच सामर्थ्य होतें आणि म्हणूनच त्यांच्या हातून जगानें तोंडांत बोटे घालण्यासारखी कामें पार पडलीं.

अशा रीतीनें या लोकांनीं जवळ जवळ तीन वर्षें वर सांगितलेल्या अबुतालिबच्या शअबमध्यें एकांतवासांत मोठ्या कष्टानें काढिली. त्यावेळीं त्यांचा बाहेरच्या जगाशीं कांहीं संबंध राहिला नव्हता. कुरेश लोकांनीं बाहेरच्या प्रदेशांतील अन्नवस्त्र या शअबमध्यें शिरूं न देण्याचा कडक बंदोबस्त केला होता. तसेंच बाहेरचा मनुष्य आंत व आतील मनुष्य बाहेर येऊं जाऊं न देण्याचा जितका कडक बंदोबस्त त्यांच्यानें करतां आला, तितका त्यानीं केला होता. हाशमी

लोकांच्या अन्न वस्त्राची अशी ती सामुग्री काय असणार कीं, जिचा पुरवठा वर्षोंनुवर्षें पुरूं शकेल ? थोड्याच काळांत त्यांना अन्नवस्त्रांची तूट भासूं लागून, पोरेंबाळें अन्नाकरितां उपाशीं मरण्याची पाळी येऊन ठेपली. अन्नावांचून दीन झालेली बायकामुलें आक्रोश करूं लागलीं. त्यांच्या त्या आक्रोशाचा आवाज रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या कानांवर जाण्यापर्यंत त्याची मजल गेली. शअब-मध्यें एकच हाहा:कार उडाला. या लोकांची अन्नपाण्याविन होऊन गेलेली दैना क्षणोक्षणीं कुरेश पुढाऱ्यांच्या कानांवर जाई, परंतु या पाषाण हृदयी लोकांच्या अंत:करणाला ती हकीगत ऐकून कसा तो द्रव ह्मणून फुटला नाहीं ! लहान, अजाण मुलांचा हा आक्रोश ऐकून कांहीं कुरेश लोकांच्या मनाला पाझर फुटला परंतु अशा सदय अंत:करणाच्या लोकांचीं संख्या अतिशय कमी असल्यामुळें त्याचें ऐकतो कोण ? हाशमी लोक धर्मद्रोही ठरलेले, त्यांचा निकाल देशांतील सर्व लोकांनीं केल्यावांचून त्यांना क्षमा कोण करणार ? कुरेश लोकांच्या दुष्टपणाची, त्यांच्या क्रूर स्वभावाची पराकाष्ठा झाली ! अशा रीतीची कष्टमय जीवितयात्रा चालली असतांना, बिबी खदिजेचा एक भाचा गावांत राहात असे, त्याच्या अंत:करणाला पाझर फुटून, एका अंधाऱ्या रात्रीं एका उंटावर अन्नसामुग्री भरून तो उंट मोठ्या तजवीजीनें त्यानें शअबमध्यें पाठवून दिला. नशीब विचाऱ्याचें ! तो जर कां कुरेश लोकांस सांपडला असता तर याची काय अवस्था झाली असती ती एका परमेश्वरासच माहित !

या हद्दपार झालेल्या लोकांना शहरांत मोकळेपणानें हिंडण्याला व व्यवहार करण्याला वर्षांतून एक वेळ परवानगी असे. काबा मंदिरांत वर्षांतून एक मोठी जत्रा भरत असून, त्या जत्रेस लांबलांबचे यात्रेकरी येत असत. दूरदूरचे व्यापारीही आपला माल घेऊन येत-

या यात्रेंत व्यापारांतही मोठी घडामोड होत असे. अशा प्रसंगीं स्वभावतःच कायद्याची बंधनें शिथील होऊन सर्व लोक, आपआपला आपसांतील वैरभाव विसरून जाऊन सहोदराप्रमाणें प्रेमानें वागत असत. वाळूच्या मैदानांतून प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांना लुटारूंची भीति नसे. मक्केच्या जत्रेला जाणारा येणारा कोणीही असो, त्याला वाटेंत कोणत्याही प्रकारची म्हणून भीति नसे. हा जत्रेचा एक महिना म्हणजे प्रत्येक मनुष्यास मोठा आनंदाचा जात असे. जो तो आपल्या समजुतीप्रमाणें या एका महिन्यांत पुण्यकर्म करून धार्मिक उन्नती करून घेत असे.

जत्रेच्या या दिवसांत चोरांच्या चौर्यवृत्ति, गुंड लोकाच्या हाणामाऱ्या यांना आळा पडत असून, जो तो आपआपल्या धर्माप्रमाणें पूजा अर्चा करण्यांत व पुण्यकर्म करण्यांत गुंग होऊन जात असे. वर सांगितलेल्या या आनंदाच्या प्रसंगीं हाशब मधील लोकांच्यावरचीहि बंदी उठत असे. त्याप्रमाणें एक महिना सर्व लोकांबरोबर स्वातंत्र्य सुख भोगण्यास ते मोकळे झाले. त्यांनीं आपलें लपून बसण्याचें ठिकाण सोडून देऊन ते शहरांत येऊन राहिले. व शहरांत आल्यावर आपले स्वातंत्र्याचे दिवस मोठ्या आनंदानें त्यांनीं घालविण्यास सुरवात केली. परंतु हजरत मुहम्मद साहेबांनीं मात्र आपला मार्ग सोडला नव्हता. त्यांच्या अंतरोस्थित जागृतीनें आपल्या मनाशीं ज्या उच्च ध्येयाचा मार्ग आंखून ठेवला होता, त्या उच्च ध्येयापासून तें रतीभरही ढळलें नाहींत. शहरांत सार्वजनिक ठिकाणीं जाऊन ते सर्व मंडळींशी मिसळत असत; परंतु अशा प्रत्येक प्रसंगीं ते आपल्या इस्लाम धर्माचीं तत्वें सर्व लोकांस समजावून देत असत. बाजार पेठांतून व्यापारी लोक व गिऱ्हाईकें यांची अतिशय गर्दी असली तरी उपदेश करण्याचें आपलें कर्तव्य ते कधींही सोडित नसत, त्यांचा उपदेश शहरांतील लोकांच्या परिचयाचा असल्याकारणानें

ते त्या उपदेशाकडे दुर्लक्ष करीत असत, परंतु बाहेर गांवाहून आलेलें व्यापारी, यात्रेकरूं त्यांचा उपदेश मोठ्या सावधान चित्तानें ऐकत असत. परंतु पुष्कळ वेळां असेंही घडून येई कीं, त्यांचा उपदेश पुरा झाला म्हणजे ते लोक तो थट्टेवारी नेऊन निघून जात असत. कांही कांहीं लोक तर त्यांना उलट सवाल करीत कीं "तूं जर ईश्वर प्रेरित धर्मप्रसारक आहेस तर प्रथम आपल्या गांवांतील लोकांना तो कां शिकवीत नाहींस." अशा रीतीनें स्वभाव आणि संचीतोन्नतींमुळें त्याचा कितीही पाणउतारा झाला, तरी आपली शांतवृत्ति यत्किंचितही ढळुं न देतां मोठ्या धैर्यानें त्यांनी आपला दीर्घोद्योग चालू ठेविला होता. उलट अशा विरुद्ध परिस्थितीनें त्यांच्या मनाची खंबीरता दिवसेंदिवस जास्तच वाढीला लागलेली होती. त्यांनी अशा रीतीनें आपल्या धर्मप्रसाराचें काम मोठ्या नेटानें चालविलें होतें. तूं आपल्या ह्या धर्मप्रसाराचें काम सोडुन दे, म्हणजे मोठ्या प्रेमानें तुझें सर्व तऱ्हेनें स्वागत करण्यास आम्ही राजी आहोत, अशा सूचना कुरेश लोकांनीं त्यास अनेक वेळां केल्या! परंतु त्यानें आपलें धर्मोपदेशाचें काम अव्याहत कोणाच्या कृपेची किंवा अवकृपेची पर्वा न करतां चालू टेविलें होतें. होतां होतां जत्रेचा हा महिना निघून गेला. गांवांत जिकडे तिकडे पुर्वीप्रमाणें व्यवहार सुरूं झाले. आबुतालिबच्या शअ-बमध्यें हाशम लोक पुन्हां रहावयास गेले. बानूचा कडक कायदा पुन्हां सुरूं झाला. हाशमी लोकांविरुद्ध गांवात पुन्हां जिकडे तिकडे कडक बंदोबस्त अमलांत आला. अशा रीतीनें हाशमी लोकांनीं त्या तुरूंगवासांत दोनवर्षे मोठ्या कष्टानें काढल्या नंतर तिसऱ्या वर्षी अकस्मात एक चमत्कारिक गोष्ट घडून आली व त्या योगें हाशमी लोकांच्या पाठची ग्रहदशा एकदम बदलली.

## ५ करारनाम्याचा नाश

एके दिवशीं हजरत मुहम्मद पैगंबर शअबमध्यें बसले असतांना, त्यांच्या कानांवर अशी गोष्ट आली कीं, बानचीं कलमें (करारनामा) ज्या कागदावर लिहून ठेविलीं होतीं तो कागद कसरीनें साफ खाऊन टाकला आहे. ही बातमी ऐकतांच पैगंबरांस मोठा आनंद झाला. आपला पाठीराखा परमेश्वर आहे, यांत बिलकूल शंका नाहीं, अशी त्यांच्या मनाची पूर्ण खातरी होऊन गेली. त्यानें ही गोष्ट आपला चुलता अबुतालिब यांस सांगितली; त्यावरून अबुतालिब व त्यांचे कांहीं स्नेही काबामाशिदींत गेले व अबुतालिब कुरेश घराण्यांतील पुढारी लोकांपुढें येऊन त्यांस ह्मणाला, " मीं असें ऐकिलें आहे कीं, ज्या कागदावर जुलमी बानची कलमें लिहून ठेविलीं आहेत, तो कागद कसरीनें खाऊन टाकला आहे; ही गोष्ट जर सत्य असेल तर यापुढें बानचा कागद रद्द समजावा; व हाशमी लोकांना स्वातंत्र्य मिळावें. उलट ही गोष्ट जर सत्य नसेल, आणि खोटी असेल तर त्याबद्दलचा दंड समजून मी त्याचक्षणीं माझ्या पुतण्याला तुमच्या स्वाधीन करीन.'

अबुतालिबची ही अट सर्वांस मान्य होऊन त्यांनीं तो कागद ताबडतोब काबा मशिदींतून आणविला. गांवांतील सर्व लोकांचे डोळे या निकालाकडे लागून राहिले होते. तो गुंडाळलेला कागद उघडून पाहातात, तों त्याचा बहुतेक भाग कसरीनें खाऊन टाकलेला होता. त्यावरील बानचीं कलमें कोणालाही वाचण्यासारखीं नव्हतीं. यासंबंधीं एका अरब इतिहासकाराचें असें ह्मणणें आहे कीं, त्या कागदाचे सर्व तुकडे तुकडे झालेले होते; त्यांत वाचण्यालायक जो शब्द होता तो फक्त " अल्ला " हाच एक हाय.

केवळ ईश्वरानेंच आपल्या हांकेला धांव मारून आपला शब्द खरा करून दाखविला, याबद्दल अबुतालिबला अत्यानंद झाला. कुरेश लोकांनीं

केलेला जुलूम, त्यांनीं आरंभिलेला अनन्वित छळ, याबद्दल त्यांनीं त्यांची खूप खरडपट्टी काढून आतां ते काय जबाब देतात, याची वाट सुद्धां न पाहातां तो आपल्या स्नेह्यासहवर्तमान शअबमध्यें निघून गेला. इकडे कुरेश लोकांनीं याबद्दल भ्रातिनभवति करून पाहिली, व शेवटीं त्याच्यापैकीं पांच पुढारी उभे राहिले; व आजपासून बानचा कायदा रद्द झणून समजावा, असें मोठ्यानें ओरडून त्यांनीं जाहीर केलें. इतकेंच नाहींतर त्यांनीं आपआपलीं हत्यारें घेऊन, शअबमध्यें ज्या ठिकाणीं हाशमी लोक राहात होते, तेथें जाऊन हाशमी लोकांवरील सर्व निर्बंध काढून टाकलेले आहेत व हाशमी लोकांनीं यापुढें खुशाल आपआपल्या घरीं राहाण्यास जावें, अशी आनंदाची बातमी त्यांना जाऊन सांगितली. हा निर्बंध काढून टाकण्याच्या बाबतींत खुद्द कुरेश घराण्यांतील कांहीं लोक विरुद्ध होते, परंतु या प्रसंगीं त्यांचें कांहींही चाललें नाहीं. त्यांनांहि पुढारी लोकांच्या या ठरावास मान्यता द्यावी लागली. वाचकहो, या तीन वर्षांच्या त्या अकरुण अज्ञातवासांतून सुटका झाल्यानंतर हाशमी लोकांना किती आनंद झाला असेल याची आपणास कल्पना सुद्धां करतां येणार नाहीं. त्या अज्ञातवासांतील त्यांचें घर आद्याप तेथेंच असून, यात्रेकरू लोक मोठ्या भक्तिभावानें त्या घराचें दर्शन घेणें आपल्या यात्रेंतील मोठें पवित्र कर्तव्य मानतात.

## ६ हजरतवर दुःखाचे पर्वत.

पैगंबरसाहेब आपल्या मक्केमधील घरांत येऊन फार दिवस झाले नाहींत तोंच त्यांच्यावर एक मोठा दुःखाचा प्रसंग येऊन कोसळला. त्यांच्या सुखदुःखाची भागीदारीण, त्यांची आवडती पत्नी एकाएकी आजारी पडून मरण पावली. बिबी खदिजेच्या मृत्यूनें हजरत मुहम्मद साहेबांच्या मनाला मोठा धक्का बसला. त्यांनीं शारीरिक सुखाच्या सर्व साधनांचा त्याग

केला; यामुळें त्यांना पुढील आयुष्य कंटाळवाणें वाटूं लागलें. हजरत मुहम्मद साहेबांच्या इतक्या वर्षांच्या चिंतनांत, मननांत, भजनांत आणि उपदेशांत त्यांची प्रिय पत्नी एकाद्या देवदूताप्रमाणें त्यांची पाठीराखीण असे. त्यांचे ठायीं तिची अढळ श्रद्धा असून ते प्रतिपादित असलेल्या मतासंबंधीं स्वप्नांतसुद्धां तिच्या मनाला कधीं शंका आली नाहीं. ज्या निर्गुण निराकार प्रभूचें अस्तित्व त्यांनीं मान्य केलें होतें, त्या एकावर तिचा पूर्ण भरंवसा होता. तिनें आपल्या प्रेमळ सात्विक भावनेनें त्यांना सहाय्य केलें होतें. तिच्या सारखी सद्गुणी स्त्री आपणास मिळाली आहे, हेंच अल्लाच्या भक्तीचे आपणास पारितोषिक आहे, अशी त्यांची भावना झाली होती. हजरत मुहम्मद साहेबांचा त्यांच्या शत्रूंनीं जो कांहीं अकरुण छळ केला, त्या वेळीं त्यांच्या मनाला धीर देण्याचें अत्यंत कठीण काम तिनें मोठ्या चातुर्यानें करून त्यांच्या उपजत धैर्यांत मोठी भर घातली. जरा त्यांच्या मनाच्या विरुद्ध गोष्ट घडली कीं, त्यांच्या विरुद्ध चाललेल्या चळवळीचा तिला सुगावा लागला कीं, तिनें त्यांच्यापुढें भावी आशा-जनक काळाचा आदर्श ठेऊन त्यांना धैर्य द्यावें. अशा या गुणसंपन्न पत्नीच्या वियोगानें त्यांचा धैर्यमेरू कोसळून पडण्याच्या बेताला यावा यांत आश्चर्य नाहीं. इस्लाम धर्माचा ध्वज जो यानंतर अक्षय फडकत राहिला, त्याचें बरेचसें श्रेय या साध्वीच्या प्रोत्साहनाला देणें रास्त आहे.

बिबी खदिजाच्या मृत्यूमुळें ह. पैगंबरला मक्का भयाण दिसूं लागली. सभोंवार शत्रूंनीं पेटवून दिलेल्या वणव्यांत हजरतला शीतळ वारा घाल-णारी त्यांची सहभागीदारीण त्यांना सोडून गेल्याबरोबर या वणव्याच्या झळझळित ज्वाळा त्यांना असह्य भासूं लागल्या. या वेळीं हजरत मुह-म्मदचें वय ५० वर्षांचें होतें. शरीरांत उतरत्या वयाची झांक दिसूं लागली होती. त्यांतच त्यांची घरची प्रापंचिक स्थिति फारच वाईट थराला येऊन पोंचली होती. मात्र या वेळीं त्यांना आपल्या मुलींची

काळजी उरली नव्हती. बिबी फातमा जी सर्वांत लहान होती तिच्या शिवाय बाकीच्या मुली आपआपल्या घरीं होत्या.

/- हजरत मुहम्मद साहेबांच्या तरुण व सुंदर बिबी आयेशा नांवाच्या पत्नीनें एके दिवशीं त्यांना "बिबी खदिजेपेक्षां मी अधीक चांगली नाहीं का ?" असा प्रश्न विचारिला. हजरत मुहम्मद साहेबांनीं उत्तर दिलें, " नाहीं, खरोखर नाहीं. ज्या वेळीं इस्लाम धर्मावर माझ्याशिवाय इतर कोणाचाहि विश्वास नव्हता, त्या वेळीं तिनें माझ्यावर विश्वास टाकिला. मी निराधार दरिद्री होतो, तेव्हां तिनें मला वर आणिलें, आणि जेव्हां सर्वजण माझ्यावर उलटले तेव्हां ती माझ्या पाठीशीं उभी राहिली." मक्केच्या उत्तरेकडील पर्वताच्या एका उतरणीवर एक जुनी स्मशानभूमी आहे, त्या ठिकाणीं बिबी खदिजेचें थडगें आद्याप दृष्टीस पडतें. मक्केला जाणारे यात्रेकरू बिबी खदिजेच्या थडग्याचें दर्शन घेतल्यावांचून आपली यात्रा पुरी करीत नाहींत.

बिबी खदिजेच्या मृत्युमुळें हजरत मुहम्मद अत्यंत अस्वस्थ असतांना एके दिवशीं रस्त्यानें इकडे तिकडे फिरत होते, त्यावेळीं एका बदमाशानें त्यांच्या अंगावर हात टाकिला; त्याबरोबर ते जमीनीवर पडले व त्यांचें सर्व कपडे फाटून त्याच्या चिंध्या झाल्या. तशाच फाटक्या कपड्यांनीं त्यांनीं आपल्या घरचा रस्ता धरीला. इतक्यांत त्यांची लहान मुलगी बिबी फातमा पुढें आली व हजरतच्या कपड्यांच्या चिंध्या पाहातांच तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. " अरेरे, कोणी तरि दुष्टानें माझ्या बापावर हात टाकून त्यांना जमीनीवर पाडलें खास. त्यामुळें हे कपडे फाटले " असे शब्द तिच्या तोंडून निघाले. हजरत म्हणाले, " छे, छे, मुली, रडूं नको. तुझ्या पित्याचा पाठिराखा परमेश्वर आहे. घाबरूं नको. जीं जीं संकटें येतील त्यांना तोंड देण्याला तुझा बाप खंबीर आहे. परंतु तो परमेश्वराची आज्ञा उल्लंघन करणार नाहीं..

त्याच्या हुकुमाचा फैलाव करण्याचें कार्य त्यानें माझ्याकडे दिलें आहे व तें पार पाडण्यासाठीं तोच मला मदत करील."

सर्व प्रकारचा अपमान व छळ हजरत निमूटपणें सहन करीत. मात्र त्यांना ते म्हणत, " अहो, तुह्मीं माझ्या विनाकारण पाठीस कां लागतां ? माझ्या पाठीस लागून तुमचा कोणता स्वार्थ साधणार आहे ? यांतच तुह्मांला संतोष वाटत असेल तर तसेंच चालूं द्या. माझी त्याला ना नाहीं. मात्र एवढी गोष्ट लक्षांत ठेवा कीं, माझ्या उपदेशाला मान द्याल तर तुमचें अक्षय कल्याण होईल."

### अबुतालिबचा अंतकाळ.

बिबी खादिजेच्या मृत्यूची आठवण हजरत मुहम्मद साहेबांच्या मनांतून घड गेलीहि नसेल, तोंच त्यांच्यावर आणखी एक दुःखाचा प्रसंग येऊन कोसळला. मनुष्यमात्रांवर प्रसंग येत असतात, व अशा प्रसंगाची आंच ज्याला लागली नाहीं असा मनुष्य विरळा, किंवा नाहींच म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. परंतु हजरत पैगंबर साहेबांच्या चरित्राकडे आपण जर लक्षपूर्वक पाहिलें, तर आपणांस असें आढळून येईल कीं, ते जन्मास आल्या दिवसापासून त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांचें बहुतेक आयुष्य दुःखांत गेलें होतें. त्यांच्यासारखें आमरण दुःखाचे प्रसंग फारच थोड्याच्या वांट्याला आले असतील.

बिबी खदिजेचा काळ होऊन चारपांच महिने झाले नाहींत तोंच हजरत मुहम्मद साहेबांचा चुलता, केवळ त्यांचा पाठीराखा, त्यांचें छत्र यांस काळाचें आमंत्रण येऊन, हजरत मुहम्मद साहेब या अफाट जगांत उघडे पडले. एवंच चारपांच महिन्याच्या अंतरानें पत्नी व चुलता असे त्यांचे खंबीर आधारस्तंभ एकाएकी नाहींसे झाले. बिबी खदिजेची मदत त्यांना आज सतत पंचवीस वर्षें झाली, तर चुलत्यानें त्यांचें संगोपन केलें. भवितव्यता बलवत्तर असून तिच्यापुढें कोणाचीहि मात्रा चालत नाहीं, हें सर्वथैव खरें.

## ७ दुर्दैवी तायफ

"जागा हो, ऊठ आणि सदुपदेश कर" अशी ईश्वरी आज्ञा झाल्यापासून हजरत मुहम्मद साहेबांच्या आयुष्याची दहा वर्षे निघून गेलीं. आपल्याला धर्मप्रसाराचें काम हातीं घेण्याला ईश्वरानेंच प्रेरणा केली आहे, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती, आणि त्या श्रद्धेप्रमाणें त्या कामाकरितां काया वाचामनानें त्यांनीं आपणांस वाहून घेतलें होतें, यांत तिळमात्र संदेह नाहीं. परंतु गांवांतील लोक त्याची जी कांहीं थट्टा करीत, त्यांचा जो कांहीं अपमान किंवा छळ करीत, तशी थट्टा, अपमान किंवा छळ सोसून, इतक्या एकनिष्ठतेनें आपल्या अंतरोस्थित कार्याला वाहून घेणारे महात्मे या जगांत किती मिळतील हें सांगणें मोठें कठीण आहे. उद्दिष्ट कार्याविषयींची त्यांची श्रद्धा तितकी जाज्वल्य नसती, त्यांचें आत्मिक सामर्थ्य हिणकस असतें, तर असलें बिकट कार्य त्यांचे हातून कधींच पार पडलें नसतें. इस्लाम धर्म हेंच मनुष्यमात्राचें अंतिम ध्येय असून, त्या ध्येयाच्या प्रसाराचें पवित्र कार्य परमेश्वरानें आपणांवर सोंपविलें आहे, ही त्यांची भावना इतकी प्रबळ होती कीं, त्यांच्यावर कितीहि भयंकर संकटें येऊन पोहोंचलीं, तरी त्यांची श्रद्धा लवमात्र कधीं कमी झाली नाहीं. सर्वत्र निराशेचें साम्राज्य पसरलें असतांना, लोक सर्व बाजूनें त्यांचा छळ करीत असतांना, असल्या आणीबाणीच्या प्रसंगीं साहाय्य मिळण्याचा बिलकूल संभव नसतांना, त्यांच्या आंगांत असणाऱ्या असामान्य चिकाटीनें व लोकोत्तर सहनशिलतेनें त्यांनीं आपलें उद्दिष्ट कार्य प्रथम पार पाडण्याचा दीर्घोद्योग सुरू ठेविला. प्रथम मुहम्मद साहेबांची सांपत्तिक परिस्थिति चांगल्या प्रकारची होती. अधिकारी वर्गांत त्यांची मानमान्यताहि श्रेष्ठ प्रकारची होती. यामुळें प्रापंचिक विचारांत त्यांना पडण्याची किंवा चरितार्थाची काळजी करण्याची त्यांना जरूरी नव्हती. त्यानें मनांत

आणलें असतें तर सर्व मक्केच्या अधिकाराचीं सूत्रेंही त्यांना मिळालीं असतीं, परंतु साधारण जनसमुदायाच्या दृष्टीचा हा राजमार्ग त्यांनीं जाणून बुजून सोडून देऊन धर्माची ध्वजा हातीं घेतली होती, आणि त्याच्या परिणामांत सर्व सत्ताधारी वर्ग त्यांनीं आपला शत्रु करून घेतला होता.

मक्केच्या पूर्वेस सुमारें चाळीस मैलांवर तायफ या नांवाचें एक शहर आहे. मक्केमधील नागरीकांनां सद्धर्माचा उपदेश करण्याकरितां परमेश्वरानें पैगंबरास पाठविलें होतें, परंतु मक्केंतील नागरीकांनीं आपण होऊन या आत्मोद्धाराच्या मार्गाकडे पाठ फिरविली ! म्हणून ह. मुहम्मद साहेबांनीं तायफ शहरीं जाण्याचा बेत केला, परंतु तायफ येथील लोक तरी आपला उपदेश ग्रहण करतील कीं नाहीं, या विचारानें त्यांचें मन विषण्ण होऊन गेलें. अबुतालिबच्या मृत्युनंतर सुमारें पंधराच दिवसांनीं ह. मुहम्मद साहेब तायफला जाण्याकरितां निघाले. त्यानें आपल्याबरोबर जैदला घेतलें होतें. जयदला इस्लाम धर्माची दिक्षा देऊन त्यांनीं त्यास आपल्याबरोबर राहण्यास परवानगी दिली होती, ही गोष्ट मागील भागांत सांगितलीच आहे. मक्का सोडून जातांना त्यांच्या जिवाला अत्यंत दुःख झालें. धर्मप्रसाराला मक्का हें शहर फार चांगलें आहे, अशी त्यांची समजूत होती. परंतु आज त्यांच्या मनाची स्थिति मोठी विलक्षण होऊन गेली होती. त्यांचे आप्तेष्ट, व त्यांच्या धर्माचा अंगिकार करणारे मक्केंतील थोडेबहुत जें कांहीं नागरिक होते ते काळाच्या उदरांत गडप होऊन गेले होते, आणि सांप्रतचे त्या शहरांतील नागरीक असहिष्णु, अतएव स्वैर वृत्तीनें चालणारे, अशा परिस्थितीत त्यांच्या मनाची स्थिति किती अनुकंपनीय होऊन गेली असेल याचा विचार कल्पनेनेंच केला पाहिजे. इस्लाम धर्माचा मार्ग मिळेपर्यंत हिरा पर्वतासारख्या शुष्क व भयाण प्रदेशांत आपल्या मनाला नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून ते किती तरी दिवस भटकले. तो मार्ग सांपडल्यानंतर, आपला हेतू, सिद्धीस नेण्याकरितां शारीरिक व मानसिक यातना तुच्छ मानून त्यांनीं आपला पवित्र हेतु

पार पाडण्याकरितां दहा वर्षें अत्यंत श्रम केले, आणि आतां वयाच्या पन्नासाव्या वर्षी त्यांना आपली जन्मभूमी सोडणें भाग पडलें. या परतें दैवाचें भोगतृत्व आणखी तें काय असणार !

मक्केहून तायफला जाण्याचा सुमारें अर्धा रस्ता ओसाड आणि खड-काळ अशा दऱ्याखोऱ्यांनीं भरलेला आहे. तेथून कोरा पर्वताची घाटी सुरू होते. डोंगर चढून प्रवाशी शिखरावर पोहोंचेपर्यंत त्याचा जीव अगदीं नकोसा होऊन जातो, इतका तो रस्ता भयाण आणि कंटाळ-वाणा आहे. वर जाऊन पोहोंचल्यावर पाठीमागचा देखावा पाहून प्रवाशाचें मनाला धस्स झाल्यावांचून राहत नाहीं. एकदां वर जाऊन पोहोंचल्यावर उतरणीला सुरवात होते, आणि त्या उतरणीपुढील देखा-वाहि एकदम बदलून जातो. कोरापर्वताच्या उतरणीच्या त्या भागांतून लहान मोठे पाण्याचे झरे वहात असलेले दिसतात, खालीं पायथ्याच्या आसमंतांत आजुबाजूला हिरवीं झाडें झुडपें, गवत उगवलेलें दिसतें, व पुढें पुढें सखल मैदानांत द्राक्षें, अंजिरें, आक्रोड, बेदाणा यांची भरगच्च गर्दी होऊन गेलेली दिसते. पर्वत उतरतांना हा नयनमनोरम देखावा पाहून, प्रवाशाला आपल्या श्रमाचें चीज झाल्या सारखा आनंद होतो. मक्केच्या सभोंवार पसरलेला तो खडकाळ, निर्जल प्रदेश; आणि कोरा पर्वताच्या उतरणी खालचा तो सुपीक, हिरवागार, पुष्पफल भारांनीं ओथंबलेला प्रदेश पाहून विधात्याच्या घटनाचातुर्यानें प्रवाशी विस्मयानें थक्क होऊन गेला तर त्यांत आश्चर्य कोणतें ?

तायफ शहरांत येऊन पोहोंचल्यावर ह. मुहम्मद साहेबांनीं त्या शहरांतील मुख्याधिकाऱ्यांची गांठ घेऊन, आपण मक्का सोडून तायफला कां आलों, या गोष्टींचा स्पष्ट खुलासा केला; इतकेंच नाहीं तर मूर्तिपूजा हा ईशभक्तीचा खरा मार्ग नसून, खरा ईशभक्तीचा मार्ग म्हणजे अद्वैत परमेश्वराची अनन्य भावानें भक्ति करणें हाच होय, हा आपला धर्म-

प्रसाराचा सुमार्ग आहे, असेंहि त्यांनीं त्यांस सांगून टाकलें. या अधिकाऱ्यांच्या भेटी पासून तादृश्य असा ह. मुहम्मह साहेबांस फायदा कांहींच झाला नाहीं. उलट आपल्या धर्मप्रसाराच्या कार्यास या ठिकाणीं यश येणें दुरापस्त आहे, अशीच त्यांच्या मनाची थोड्याच अवधींत खात्री झाली.

तायफ शहरांत फार पुरातन काळची लॉत या नांवाची एक प्रसिद्ध मूर्ति होती. ती दगडाची देवी असून तिच्या आंगाखांद्यावर अनेक प्रकारच्या जड जवाहिराचे डागडागिने होते. तिच्या तोंडावर जाज्वल्य तेज दिसत असून, ती प्रत्यक्ष बोलत चालत असते, असा त्या शहरांतील लोकांचा ग्रह होता. या देवीला सर्व लोक अतिशय घाबरत असून ते तिची अनन्य भावानें आराधना करीत असत. ह.मुहम्मद साहेबांचा अद्वैतवाद, व मूर्तीपूजेचा तिरस्कार, जेव्हां या शहरांतील लोकांनीं ऐकला, तेव्हां त्या विषयींचा त्यांचा राग इतक्या शिखराला जाऊन पोहोंचला कीं, त्यांनीं त्यांना दगडधोंडें मारून शहराचे बाहेर हांकून लाविलें. या हल्यांत ह. मुहम्मद साहेब व जयद या दोघांना बऱ्याच दुखापती झाल्या. इतक्यानेंच तायफ शहरांतील लोकांची तृप्ति झाली नाहीं. त्यांनीं त्यांचा तीन मैलपर्यंत एकसारखा पाठलाग केला. तेथें एका टेकडीवर जाऊन पैगंबर साहेबांनीं अनन्य भावानें परमेश्वराची प्रार्थना केली. "हे परमेश्वरा, माझी फिर्याद तुझ्याकडे रुजू असो. तूं दयाळू आहेस, तूंच माझा धनी आहेस, तूं मला सोडूं नकोस. तूं मला परक्यांच्या–माझ्या शत्रुच्या हातीं देऊं नकोस. जोंपर्यंत माझ्या हातून तुझा कांहीं अपराध घडला नाहीं, तों पर्यंत मी निर्धास्त आहे. माझ्या अज्ञानंधःकाराचा निरास करणारीं, आणि ऐहिक व परमार्थिक संटकांचा ऱ्हास करणारीं, तुझ्या प्रकाशाचीं किरणें माझ्या अंतःकरणांत अशींच तेजस्वी ठेव. माझ्या स्वतःच्या संकटांचा तूं कसाही निकाल लावलास तरी या लोकांनां सत्यमार्ग दाखव, कारण आपण काय करीत आहों याचें त्यांना पुरेसें ज्ञान सुद्धां नाहीं."

पैगंबरसाहेब व जयद हे चालण्याच्या व पळण्याच्या श्रमानें अत्यंत व्याकुळ होऊन गेले होते. त्यांच्या अंगांत पुढें चालण्याला ताकद उरलेली नव्हती. तहानेनें त्यांचे प्राण व्याकुळ होऊन गेले होते, म्हणून ते एका बागेंत पाणी पिण्याकरितां गेले. कर्मधर्मसंयोगानें ती बाग कुरेश घराण्यांतील एका श्रीमान् मनुष्याची होती. ह. मुहम्मद साहेबांची सर्व हकिगत त्या इसमास गांवांतील लोकांकडून नुकतीच कळली होती. मुहम्मद साहेब पाणी पिण्यास घेणार इतक्यांत बागेच्या मालकानें त्यांना त्यांचें नांव गांव वगैरे विचारलें; कारण त्या मालकानें मुहम्मद साहेबांना अद्यापपावेतों पाहिलें नव्हते. ह. मुहम्मद साहेबांना त्या बागेचा मालक आपल्या शत्रुपक्षापैकीं कुरेश घराण्यांतील इसम आहे हीं गोष्ट माहीत होती. तेव्हां साहजिकच आपलें नांव गांव या गृहस्थास कळलें तर पाणी पिण्यास आपणांस मज्जाव होईल, असा विचार त्यांच्या मनांत आला. इकडे पाण्यावांचून तर त्यांचा जीव तळमळत होता. अशा अडचणीच्या प्रसंगींहि न डगमगतां त्यांनीं आपलें खरें नांव गांव त्या गृहस्थास सांगितलें. याचा परिणाम त्याच्या अपेक्षेप्रमाणें, समोर वहात असलेला झरा असूनहि, प्राण तृष्णेनें व्याकुळ झालेले असतांनां सुद्धां, पाणी मिळाल्यावांचून त्या ठिकाणाहून त्यांना परतें जाणें भाग पडलें.

ह. मुहम्मद साहेब व जयद यांनीं आपला पुढील रस्ता धरला. आतां जाणार कोठें, हा बिकट प्रश्न त्यांच्यापुढें येऊन पडला. तायफ शहरापासून मक्केपर्यंतच्या आर्ध्या प्रवासाचे वाटेवर नाखला नांवाच्या गांवीं येऊन ते पोहोंचले. या ठिकाणीं येऊन पोहोंचल्यावर त्यांनीं, मक्केंतील पुढारी मंडळी आपणांस आश्रय देण्यास कबूल आहेत कीं नाहीं हें पहाण्याकरितां जयदला पुढें रवाना केला. या गांववजा खेड्यांत फारशी वस्ती नव्हती. या खेड्यांत तीन देवतांचें प्राबल्य फार होतें. ह. मुहम्मद साहेब रात्रीच्या वेळीं ज्या वेळीं नमाज पडत व तोंडानें कुराणांतील प्रार्थना म्हणत असत, त्या वेळीं या देवता आपल्या सभोंवती बसून

मोठ्या प्रेमानें आपली प्रार्थना ऐकतात असा त्यांचा समज होऊन गेला होता. अशा वेळीं "मनुष्यांनीं माझा अपमान केला, ह्यांनीं माझा सत्धर्म ऐकला नाहीं, परंतु अग्नि देवतांनीं तो मान मला दिला, यांत माझें समाधान झालें." अशा विचारानें ते आपलें समाधान मानून घेत.

कांहीं दिवसांनीं जयद मक्केहून परत आला. ज्या पुढारी पांच इसमा-पैकीं एका इसमानें बानचा कायदा रद्द केल्याचें जाहीर केलें होतें, त्यानेंच हजरत मुहम्मदाला आश्रय देण्याचें वचन दिलें. हा निरोप ऐकल्यावर ह. मुहम्मदसाहेब मक्केला जाण्याकरितां निघाले. एके दिवशीं या पुढाऱ्यानें आपला सर्व लष्करी पोषाख आंगावर चढविला, शस्त्रास्त्रें घेतलीं व उंटावर स्वार होऊन तो काबा मंदिरांत आला. तेथें जमलेल्या लोकांसमक्ष त्यानें ह. मुहम्मदाचें संरक्षण करण्याची व त्याच्या केसाला धक्का लावणारास कडक शासन करण्याची प्रतिज्ञा केली. या दयाळु गृहस्थानें ह.मुहम्मदाच्या संरक्षणाची इतकी काळजी घेतली खरी तथापि जेथें सर्वच गांव विरुद्ध तेथें तो बिचारा एकटा इसम त्यास जपणार तरी कोठवर ? ह. मुहम्मदाला एकांतांत एकट्याला गांठून लोक मारायला टपलेले होते ! इस्लामधर्म प्रसाराच्या त्यांच्या सर्व आशा निष्फळ झाल्यासारख्या होऊन गेल्या होत्या आणि ज्या थोड्या लोकांनीं त्यांच्या धर्माचा स्वीकार केला होता त्यांना तो पाळणें दुस्तर होऊन बसलें होतें.

## ८ आकाबाची पहिली प्रतिज्ञा

याच सुमारास ह. मुहम्मद साहेबांनीं सवदा या नांवाच्या एका तरुण स्त्रीशीं लग्न केलें. शिवाय मित्र अबुबक्र याची मुलगी आयेशा हिचा विवाहही त्यांच्याबरोबर करण्याचें ठरलें होतें, परंतु ती वयानें अतिशय लहान असल्याकारणानें तो पुढें तीन वर्षांनीं करण्याचें ठरलें.

इस्लामधर्म प्रसाराचा यापुढें रंग दिसत नाहीं असें पाहून ह.मुहम्मद साहेबांच्या मनाला अत्यंत वाईट वाटलें. दिवसेंदिवस त्यांची मानसिक

अस्वस्थता जास्त जास्त वाढत जाऊन त्यांची स्थिति एखाद्या वेड्या-प्रमाणें होऊन गेली. मनाच्या अशा उद्विग्न परिस्थितींत असतांना, मक्का शहरापासून सुमारें २७० मैलांवर असलेल्या यसरब नामक शहरांतील कांहीं व्यापारी मक्का शहरांत वार्षिक यात्रेच्या निमित्तानें आले होते, त्यांच्यापैकीं कांहीं व्यापाऱ्यांची व त्यांची गांठ पडली. अशा या अचानक पडलेल्या गांठीचा फायदा घेऊन ह. मुहम्मद साहेबांनीं त्यांना आपल्या नवमत धर्माचीं तत्वें समजावून सांगितलीं. या शहरांत बरेंच ज्यू लोक स्थाईक होऊन राहिले होते, यामुळें त्या शहरांतील अरब लोक व ज्यूलोक यांचा संबंध अगदीं निराळ्या तऱ्हेचा झाला होता. सर्व सृष्टीचा पालनकर्ता एकच परमेश्वर असून, मूर्तिपूजा करणें धर्मबाह्य गोष्ट आहे, असें ज्यूलोकांच धर्मतत्व आहे. अन्योन्य धर्मांतील मुख्य तत्वांच्या या एकिकरणामुळें व ह. मुहम्मद साहेबांच्या धर्मतत्वांत विरोधाभास नसल्याकारणानें या लोकांनीं त्यांच्या तत्वांचा धिःकार न करितां, त्यांचेविषयीं आपली पूज्यबुद्धि व्यक्त केली. सिरिया प्रांतांतील लोक मक्केला जातांनां येतांनां यसरब शहरीं मुक्काम करीत असत. अशा मुक्कामाच्यावेळीं स्वाभाविक त्यांच्या बरोबर ह. मुहम्मदसाहेबांच्या धर्म-तत्वाविषयीं त्यांचें बोलणें होत असे. नवीन गोष्टींची उत्सुकता वाटणें हा जो स्वाभाविक मानवीधर्म आहे, त्यास अनुसरून ते लोक मक्केला पोहोंचतांच, ह. मुहम्मदसाहेबांची गांठ घेऊन त्यांचीं धर्ममतें समजून घेत असत. अशा लोकांपैकीं बरेच लोक मोठ्या आनंदानें या नवीन धर्माचा स्वीकार करीत असत.

यसरब येथील राजकीय वातावरण यावेळीं बरेंच बिघडलेलें होतें. त्याकाळीं तेथील राजकीय अधिकारांचीं सुत्रें औस आणि खजूरस नामक दोन घराण्याकडे चालू होतीं. राजकीय सत्ता आपल्या हातांत पूर्णपणें असावी अशी उभय पक्षांत नेहेमीं चढावोढ लागून त्याचा परिणाम

रक्तपातापर्यंत पोहोंचत असे. त्या शहरांत ज्यू लोकांची वस्ती बरीच होती ह्मणून वर सांगितलेच आहे; परंतु हे लोक कोणत्या तरी एका पक्षाला चिकटून असे कधींच राहत नसत. ज्या पक्षाची सरशी असेल त्या पक्षाला मिळावयाचें हा त्यांचा नेहमींचा क्रम असे. अशा अस्थिर आणि क्षणभंगुर परिस्थितींत ह. पैगंबर साहेबांनां आश्रय मिळणार तरी कसा? उलट या बिघडलेल्या राजकीय वातावरणांत, धार्मिकक्रांतीची भर पडून कदाचित् त्या क्षोभांत पैगंबरसाहेबांची प्राणाहुती देखील होण्याचा संभव होता !

परंतु ह. मुहम्मदसाहेबांचा आत्मविश्वास आमरण होता. मनुष्य मात्रांच्या सद्गुणाची परिक्षा प्रसंगानें होत असते असें जें ह्मणतात त्याचें प्रत्यक्ष उदाहरण ह्मणजेच ह. मुहम्मदसाहेबांचें चरित्र होय. प्रसंगाच्या कसोटीनें हिणकस माणूस नालायक ठरतो; परंतु सत्वशील माणसें बावन कशी सोन्याप्रमाणें चकाकूं लागतात. पुढल्या वर्षी पुन्हा जत्रेची वेळ आली. यसरब येथील यात्रेकरू दर वर्षाप्रमाणें मक्का शहरांत आले. आदले वर्षी पैगंबरसाहेबांनां भेटलेले यात्रेकरूही त्यांना तेथें भेटले. त्यांची व यात्रेकरू लोकांची भेट मक्केच्या बाहेर उंच पर्वताच्या उतरणीवर अल्–अकाबा नांवाचें एक अरुंद खोरें आहे त्यांत झाली. या खोऱ्याच्या वर उंच तुटलेल्या पर्वताच्यामुळें आंत चांगली सावली झाली आहे. यसरब येथील लोकांची भेट घेण्याकरितां ह. मुहम्मदसाहेबांनी हें एकांत स्थळ शोधून काढलें होतें. या भेटीवर त्यांचें सर्वस्व अवलंबून होतें. यसरबच्या लोकांपैकीं ज्या इसमांची व त्यांची आदले वर्षी गांठ पडली होती, त्या लोकांनीं जर त्यांना नकारात्मक जबाब दिला तर एक संबंध वर्ष फुकट गेलें, असें त्यांना वाटणें स्वाभाविक होतें. मनाच्या अशा उद्विग्न स्थितींत ह. मुहम्मद साहेब इच्छित स्थळीं जाऊन पोहोंचले. त्या ठिकाणीं यसरब येथील औस आणि खजूरस

या दोन घराण्यांतील बारा इसमांची व त्यांची गांठ पडली. या गाठीच्या योगानें पेगंबर साहेबांच्या छातीवरील बरेंच ओझें उतरल्यासारखें झालें; कारण इस्लाम धर्माबद्दल या लोकांची सहानुभूती दिसली इतकेंच नाहीं, तर त्या लोकांनी मोठ्या प्रांजलपणानें यांना आश्रय देण्याचेंही कबूल केलें. सरतेशेवटीं या भेटींत त्यांनीं असें ठरविलें, ह. मुहम्मद साहेबांनी आणखीं एक वर्ष यसरबला येण्याची घाई करूं नये; कारण तितक्या मुदतींत तेथील वातावरण जास्त अनुकूल होऊन, त्यांच्या धर्ममतांशीं सहानुभूती दाखवणाऱ्या लोकांची संख्या वाढून त्यांचा मार्ग त्या मानानें जास्त सुकर होईल.

हे बारा इसम मक्केहून जाण्या पूर्वीं इस्लाम धर्माचे अनुयायी झाले, व त्यांनीं खाली लिहिलेली प्रतिज्ञा पैगंबर साहेबांस लिहून दिली.

### अल–अकाबा येथील प्रतिज्ञालेख

आम्हीं परमेश्वराबरोबर दुसऱ्या कोणासही महत्व देणार नाहीं. आम्ही चोरी करणार नाहीं. आम्ही जारकर्म करणार नाहीं. मूर्तींपूजेपासून दूर राहूं. आपल्या मुलींना ठार करणार नाहीं. निंदा चहाडी यापासून अलिप्त राहूं. जें सत्य असेल त्या बाबतींत आम्हीं पैगंबराची आज्ञा पाळूं आणि सुखदुःखांत त्यांचे वांटेकरी होऊं.

या जगांत न्यायानें व आणि पुण्यमार्गानें कसें वागावें याचे पैगंबर साहेबांनीं त्यांना नियम घालून दिले. या बाराही इसमांचा ह. मुहम्मद साहेबांवर मोठा विश्वास बसला, आणि हे आपले खरेच धर्मगुरू असून त्यांच्या हातूनच आपला आत्मोद्धार होईल, अशी त्यांच्या मनाची दृढ भावना झाली. मक्का शहर सोडण्यापूर्वीं या लोकांनीं पैगंबर साहेबांचा एक शिष्य आपल्याबरोबर धर्मशिक्षणाकरितां म्हणून यसरब येथें नेला.

इस्लामी धर्माचीं पाळेंमुळें जमीनींत नीट रुजल्यानंतर जर या धर्माच्या इतिहासाचें कोणी सिंहावलोकन करूं लागला, तर या बारा इस-

मांच्या धार्मिक प्रवृत्तीचें स्मरण त्यास प्रथम झाल्यावांचून रहाणार नाहीं. कोणतीहि गोष्ट रूढ होऊन त्याच्या अप्रियतेचा काळ निघून गेला म्हणजे त्या गोष्टीचा आंगिकार करण्यांत मोठासा पुरुषार्थ नसतो. मनुष्याच्या धैर्याची खरी कसोटी कोणत्याही नवीन गोष्टीचें सत्यान्वेषण करून त्यांतील ग्राह्यांशाचें रूढ विचाराची पर्वा न करतां ग्रहण करणें यांतच होय. या दृष्टीनें विचार केल्यास या बारा इसमांची स्तुती करावी तितकी थोडीच. हे बारा इसम ज्यावेळीं यसरबला जाण्याकरितां निघाले, त्यावेळीं ह. मुहम्मद साहेबांनीं त्यांच्याबरोबर मुसआब यास दिला. हा हाशमचा पणतु असून, मक्का शहरांत याची सभ्य लोकांत गणना होत होती परंतु इस्लाम धर्माचा ज्या वेळीं त्यानें स्वीकार केला, त्या वेळीं त्याची आई त्याच्यावर इतकी कांहीं रागावली कीं, हा माझा मुलगाच नव्हे, असें तिनें जाहीर करून त्यास घरांतून हांकून लावलें. ह. मुहम्मद साहेबांस गांवांत राहण्याची पंचायत तेव्हां बिचाऱ्या मुसआब यास थारा कुठून मिळणार! प्रत्यक्ष आईनें हाकून दिलें तेव्हां शहरांतील इतर लोकांनां तर काय चांगलेंच फावलें. त्याचा त्यांनीं इतका कांहीं छळ केला कीं, त्या बिचाऱ्यास अखेर प्राणरक्षणाकरितां देशत्याग करणें भाग पडलें. कांहीं दिवस दूर देशीं आबिसिनिया प्रांतांत अत्यंत हाल-अपेष्टांत काढल्यानंतर तो परत मक्केत आला, तेव्हां तो शरीरानें इतका कांहीं कृश होऊन गेला होता कीं, त्यास पाहून प्रत्यक्ष त्याच्या कजाग मायेचें हृदय भरून आलें. धर्मप्रसाराकरितां ज्या आपल्या शिष्यानें इतका स्वार्थत्याग केला होता त्याच शिष्याची पैगंबर साहेबांनीं यसरब येथें रवानगी केली. कांहीं दिवसांनीं ह. मुहम्मद साहेबांनीं आणखीहि कांहीं धर्मोपदेशक यसरब येथें रवाना केले. त्यांत मागील भागांत वर्णन केलेला अबदुल्ला या नांवाचा तो आंधळा इसम होता.

## ९ अल-आकाबाची दुसरी प्रतिज्ञा.

मक्केमध्यें राहून यसरब येथील धर्मप्रसाराचें काम पैगंबर साहेब मोठ्या नेटानें करीत असतां आणखीही एक वर्ष जाऊन पुन्हा जत्रेचा हंगाम आला. ह. मुहम्मद साहेबांनीं उतावीळपणानें धीर सोडला नाहीं, म्हणून त्यांच्या कार्यांत त्यांना यश आलें. सृष्टीक्रमाला अनुसरून जगांतील कार्यें घडत असतात. या नियमाला सोडून त्यांनीं जर उतावीळ पणा केला असता तर कार्याचा कदाचित् नाशहि होऊन गेला असता. उत्कट उल्हासानें मनुष्य एखादें कार्य हातीं घेतो आणि मग त्या कार्याचें फल पदरांत पडावें म्हणून इतका कांहीं तो उतावळा होतो कीं, त्याच्या हातून न कळत अक्षम्य अशा चुका होतात, आणि त्यामुळें त्या कार्याचा नाश होऊन त्यास पश्चात्ताप करीत बसण्याची पाळी येते. परंतु पैगंबर साहेबांस आपल्या कार्याची व्याप्ति किती अवाढव्य आहे व त्या मानानें कार्यांत यश येण्याला दिवसगत लागणार ही गोष्टहि ते जाणून होते. यामुळें त्यांना पश्चात्ताप करीत बसण्याची पाळी आली नाहीं. यसरब येथें पाठविलेले धर्मोपदेशक त्यांनां तिकडील हकिगत वेळोवेळीं साद्यंत कळवीत असत, व दिवसेंदिवस आपल्या कार्याचें पाऊल पुढें पुढें पडत चाललें आहे, हें त्यांना कळून त्यांच्या मनाला मोठें समाधान होई. निराशेची रात्र संपून प्रभातकाळचीं आल्हादकारक किरणें त्यांना दिसूं लागलीं. जत्रेचा महिना उजाडला. यसरब येथील ७२ लोकांनां बरोबर घेऊन मुसाअब मक्का शहरांत पेगंबर साहेबांनां भेटण्याकरितां आला इस्लामधर्माचें बरेच लोक तेथें आले असून ते अल-अकाबाच्या खोऱ्यांत आपली वाट पहात आहेत, अशी आनंदाची खबर पैगंबर साहेबांस देण्याकरितां मुसाअब शहरांत आला.

ह. मुहम्मद साहेबांचे धर्मप्रसाराचें काम इतक्या कांहीं गुप्त रीतीनें चाललें होतें, कीं त्या पैकीं कुरेश लोकांना काडीभरसुद्धां दाद नव्हती.

माध्यान्ह झाली म्हणजे ते आपला चुलता आबास यास बरोबर घेऊन त्या गुहेंत जात असत व आपलें बोलणें चालणें झाल्यावर पुन्हां तें तितक्याच गुप्तपणानें आपल्या घरीं परत येत असत. ह. मुहम्मद साहेबांचा चुलता आबास यानें इस्लाम धर्माची दिक्षा घेतली नव्हती, तथापि तो त्यांच्या संरक्षणा करितां सशस्त्र असा त्यांचे बरोबर जात असे. यसरब येथील मुसलमान लोक सुद्धां दोन दोन तीन तीन असे अलग होऊन माध्यान्ह झाल्यानंतर आपआपल्या मुक्कामामधून बाहेर पडून इच्छित स्थळीं जाऊन ह. मुहम्मद साहेबांची भेट घेत असत. या ठिकाणीं एकंदर जमाव होत असलेल्या लोकांची संख्या शहात्तर पुरुष व दोन बायका इतकी होती. अल्–अकाबाची प्रतिज्ञा लिहून देणारे ते पहिले बारा इसमही यांत होते. जमलेल्या लोकांत कोणी हेर वगैरे आहेत कीं काय याचा चांगला कसून तपास होई. सर्व लोक दगडा प्रमाणें कांहीं गडबड न करितां स्वस्थ बसत असत. एके दिवशीं अशा रीतीनें ही सर्व मंडळी जमल्यावर आबास उठून त्या सर्व लोकांस हळूच परंतु स्पष्ट पणें म्हणाला “ भाईहो, तुम्हीं माझ्या पुतण्यास आपल्या गांवीं नेण्याचें ठरविलें आहे, ही फार उत्तम गोष्ट आहे. परंतु या गोष्टीचा तुम्हीं चांगला पोक्तपणें विचार कराल अशी माझी इच्छा आहे. वचन-बद्ध होण्यापूर्वी दिलेलें वचन आपल्या हातून कितपत पार पाडतां येईल याचा मनुष्यमात्रानेंच पोक्तपणें विचार करणें आवश्यक आहे. एक वेळ वचनबद्ध झाल्यानंतर माझ्या पुतण्याचें संरक्षण करण्याची सर्व जबाब-दारी तुमच्यावर पडेल. ती जबाबदारी अक्षरशः तुमच्या हातून पार पडली नाहीं, तर त्याचा तुम्हीं विश्वासघात केल्यासारखें होईल, ही गोष्ट तुम्हीं विसरून चालणार नाहीं. मी इस्माल धर्माचा स्वीकार केलेला नाहीं, तथापि तो जोंपर्यंत येथें आहे तोंपर्यंत त्याच्या प्राणाची जबाब-दारी माझ्यावर आहे. त्याला येथें शत्रु फार आहेत, परंतु जोंपर्यंत आम्हीं जिवंत आहों तोंपर्यंत त्याच्या केंसालाही धक्का न लागूं

देण्याची आम्हीं खबरदारी घेऊं. पण एक वेळ आम्हीं त्यास तुमच्या स्वाधीन केला कीं, त्याच्या सर्व प्रकारच्या संरक्षणाची जबाबदारी तुमच्यावर येऊन पडेल. तेव्हां ही जबाबदारी तुम्हीं घेण्यास राजी असाल तर आमच्याकडून त्याला घेऊन जाण्यास कांहीं हरकत नाहीं.'

आबास याचें भाषण पुरे होतांच, यसरब येथील लोकांच्या तर्फेनें अबुबारा या नांवाचा एक वृद्ध मनुष्य होता तो पुढें होऊन म्हणाला, "ठीक आहे, त्यांच्या जीवाकरितां आम्हीं आपल्या प्राणाचीहि पर्वा करणार नाहीं."

अबुबाराचें हें भाषण झाल्यावर कांहीं वेळ सर्व शांतता झाली. जो तो विचारांत गढून गेल्या सारखा दिसला. अशा रीतीनें थोडा वेळ विचारांत निघून गेल्या नंतर पैगंबर साहेब म्हणाले, 'इस्लाम धर्माचा पुरस्कर्ता मी आहे. परमेश्वर एक असून तो निराकार आहे. अतएव मूर्तिपूजा हें थोतांड असून तो स्वर्गप्राप्तीचा खरा मार्ग नाहीं. या दोन तत्वांचा प्रसार करण्याकरितां तुमची मला पूर्ण मदत पाहिजे. आपल्या मुलाबाळांचे तुम्हीं ज्या प्रमाणें संरक्षण करतां त्या प्रमाणें माझें संरक्षण करण्यास तुम्हीं तयार असल्याबद्दल तुम्ही शपथ घ्या.' ह. मुहम्मद साहेबांचें हें भाषण ऐकून सत्तर लोक एकदम उभे राहिले व 'आम्हीं तुमचें प्राणापलिकडे संरक्षण करून इस्लाम धर्माच्या प्रसारार्थ मदत करूं' असें प्रत्येक जण तोंडानें म्हणाला, व त्या प्रत्येकानें आपला हात ह. मुहम्मद साहेबांच्या हातीं दिला.

यसरब मधून आलेल्या लोकांची मुहम्मदसाहबासंबंधीची निष्ठा किती जाज्वल्य होती याची कल्पना वरील प्रकारावरून कोणाच्याही लक्षांत आल्या वांचून राहणार नाहीं. साधारण जनसमूह अज्ञानांधःकारांत गुंतलेला, अनेक शतकांची परंपरागत रुढ झालेली धर्ममतें, साधारण जनसमाजाची मूर्तीपूजेवरील श्रद्धा, अशा अगदीं भिन्न परीस्थितींत, समग्र

मनुष्य समाजाची पर्वा न करितां नवीन मताचें ग्रहण करून इतरेजनांत त्या मताचा निर्भीडपणें प्रसार करणें, हें जितकें अलौकिक मानसिक धैर्याचें द्योतक आहे, तितकेंच जातगोत, स्नेहीसोबती, किंबहुना सर्व मनुष्य समाजाच्या रोषास आपलें हें कृत्य कारणभूत होईल याची पर्वा न करतां नवीन धर्माचा अंगिकार करणें असामान्य मानसिक धैर्याचें द्योतक आहे. या दृष्टीनं विचार केल्यास यसरब मधील या सत्तर लोकांची करावी तितकी स्तुति थोडीच होय. यसरब येथील लोकांची धर्मनिष्ट अत्यंत शुद्ध, सात्विक स्वरुपाची आहे अशी पैगंबर साहेबांची खात्री होतांच त्यांना अत्यंत समाधान झालें व ते अत्यंत प्रसन्न मुद्रेनें त्या लोकांनां ह्मणाले, इस्लाम धर्माकरितां तुह्माला कदाचित् मरणही आलें तरी तुह्मी घाबरूं नका, कारण तुमच्या या धर्मशील वर्तनानें अंतीं तुह्माला स्वर्ग-प्राप्ति झाल्यावांचून राहणार नाहीं.

अल्–आकाबाच्या खोऱ्यांतील ही बैठक पुरी झाली. पहाटेचा सुमार झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. जो तो मार्गस्त होण्याच्या तयारीला लागला. इतक्यांत एकाएकीं त्या ठिकाणीं अशी कांहीं एक कर्कश आरोळी झाली कीं, त्या ठिकाणच्या शांततेचा एकदम भंग होऊन सर्वत्र गडबड उडून गेली. हा भयंकर अकस्मित प्रकार काय असावा अशाबद्दल जो तो विचार करूं लागला. कोणास कुरेश लोकांचे हेर या ठिकाणीं असून त्यांनीं हा कांहीं तरी प्रकार केला असावा, कोणी कांहीं, कोणी कांहीं, असे नाना तर्कवितर्क करूं लागले. परंतु ह. मुहम्मद साहेबांनीं हा पिशाच्याचा प्रकार आहे, अशी त्या लोकांची समजूत केली. वरील प्रकार पिशाच्याचा असो कीं दुसरा कसला असो, इतकी मात्र गोष्ट खरी कीं झालेल्या या प्रकारानें सर्व लोक भेदरून गेले व जो तो कांहीं न बोलतां गुपचिपपणें आपापल्या स्थळीं निघून गेला. पुढें एके प्रसंगीं असाच हा पिशाच्याचा प्रकार घडून आला होता.

इतक्या सावधपणानें गुप्तपणानें यसरबचे लोक व पैगंबर साहेब यांच्या गांठी होत असत, तरी सुद्धां जत्रेच्या शेंवटच्या दिवशीं म्हणजे यसरबच्या लोकांच्याबरोबर दुसरी प्रतिज्ञा अल्-अकाबाचे खोऱ्यांत झाली, त्याचे दुसरे दिवशीं, कुरेश लोकांच्या पुढाऱ्यास त्याचा सुगावा लागलाच. त्या दिवशी अगदीं सकाळींच उजाडल्या बरोबर कुरेश लोक यसरबचे लोकांच्या मागें लागले. यसरबचे लोक निरनिराळ्या रस्त्यांनीं पळून जाऊं लागले. कुरेश लोकांनीं त्यांचा पाठलाग केला. त्यांच्या हातांत फक्त एकच काय तो इसम मिळाला. त्या मनुष्याचे त्यांनीं हातपाय बांधले व त्याचे लांब सडक केश धरून त्यांनीं त्यास फरपटत मक्केपर्यंत नेला. त्याचे त्यांनीं करूं नये इतके हाल केले, परंतु मी इस्लाम धर्माचा स्वीकार केला आहे असे त्याच्या तोंडून येईना. इस्लाम धर्माचा स्वीकार करणाऱ्यांचा त्यावेळीं इतका छळ होत असें कीं, सहसा इस्लाम धर्माचा मी स्वीकार केला आहे असें सांगण्याची सामान्य मनुष्याची छाति होत नसे.

अल्-अकाबाची ही दुसरी प्रतिज्ञा झाल्या नंतर कुरेश लोक मुसलमान लोकांच्या अगदीं हात धुवून पाठीस लागले. शेवटीं तो छळ इतका असह्य झाला कीं प्रत्यक्ष पैगंबर साहेबासही तो पहावेना, आणि म्हणून त्यांनीं मुसलमान लोकांस देशत्याग करण्यास सांगितलें.

कांहीं मुसलमान लोकांनां धरून कुरेश लोकांनीं कैदेंत टाकलें होतें; व बाकीचे लोक मक्का सोडून यसरबला गेले. अशा रीतीनें जशी संधी मिळेल त्या प्रमाणें हे लोक दोन महिने यसरबला जात होते. या वेळीं यसरबला इतके लोक गेले कीं कांहीं कांहीं रस्ते व पेठाही ओसाड पडल्या. होतां होतां इस्लाम धर्माच्या अनुयायांपैकीं फक्त कायते पैंगबर साहेब, अबुबक्र व तिसरा अल्लि, इतकेच कायते आपल्या मुलाबाळांसह मक्केंत शिल्लक राहिले.

## ९ स्वर्गाला भेट.

हजरत पैगंबरला ५१ वें वर्ष लागलें. एके दिवशीं ते आपल्या बिछान्यावर स्वस्थ पडले असतांना जिब्राइल, बुराक ( घोड्याप्रमाणें एक वाहान ) घेऊन तेथें आला, व त्या घोड्यावर बसून पैगंबरला स्वर्गांत चलण्यास त्यानें सांगितलें. जिब्राइल आपल्या आकाशमार्गानें जाऊं लागला, व त्याच्या मागोमाग हजरतचा बुराक वायुवेगानें पृथ्वीवरून आकाशांत उंच उंच चढूं लागला. वाटेंत पैगंबरचें सर्व ध्यान परमेश्वराकडे लागलेलें होतें. तरी सुद्धां नमाज पडण्याची वेळ होतांच एका उंच पर्वताच्या शिखरावर पैगंबर आपल्या बुराकावरून खालीं उतरून त्या दयासागर परमेश्वराची नमाज मोठ्या भक्तीनें पडले व पुन्हां बुराकवर स्वार होऊन स्वर्गाचा मार्ग आक्रमण करूं लागले. वाटेंत त्यांच्या कानांवर असा आवाज आला कीं, “ मुहम्मद, तूं माझा प्यार आहेस. मी तुला कांहीं एक सांगणार आहे. ” पैगंबरनें या आवाजाकडे दुर्लक्ष करून आपला पुढील रस्ता धरला. ते तसेच पुढें पुढें चालले असतांना आणखी एक वेळ वरील शब्द त्यांच्या कानीं पडले. पैगंबर थोडा वेळ विचार करून, या निर्वात प्रदेशांत इकडे तिकडे नजर फेंकून व तेथें न थांबतां आकाशमार्गानें जाऊं लागले. या वेळीं हजरत पैगंबरच्या मनांत अनेक प्रकारच्या विचारांची कालवा-कालव चालली होती; त्यांना सन्मार्गापासून भ्रष्ट करण्याचे अनेक मोह वाटेंत पसरलेले होते; परंतु पैगंबरचा आत्मविश्वास त्यांच्या बुद्धीला इकडेतिकडे वळण्यास संधी देत नव्हता. ते आपल्या स्वतःशीं म्हणाले, “ मला परमेश्वराचें दर्शन घ्यावयाचें आहे. त्याच्या हुकमाशिवाय मला कांहीं एक नको. ” दुसऱ्या वेळींहि पैगंबरनें ह्या शब्दांचा अनादर केला. तिसऱ्या वेळीं एक लावण्यवती तरुण स्त्री, आंगावर जडजवाहिरांचे दागदागिने घालून व उंची भरजरी वस्त्रे

परिधान करून पैगंबरच्या समोर येऊन उभी राहिली. आकाशांतील सूर्यप्रभेमध्यें त्या युवतीच्या लावण्यानें पैगंबरचा बुराक दिपून गेला. पैगंबराला ती म्हणाली, "मुहम्मद, माझें ऐक. आज पुष्कळ दिवस मी तुला भेटण्याची संधी पाहात आहे, ती आज अनायासें प्राप्त झाली." पैगंबरचे सर्व तनमन आपल्या कार्याकडे लागलें होतें. त्यानीं या तरुणीच्या बोलण्याकडे लक्ष न देतां बुराकला तसाच पुढें चालविला. पुढें चाललेला जिब्राइल हजरतकडे मागें वळून त्यांना म्हणाला, "मुहम्मद, तूं जो पहिला आवाज ऐकलास तो यहुदि धर्माचा आवाज होता, व त्याच्या मागाहून जो ऐकलास तो खिस्ति धर्माचा होता. त्या शब्दाप्रमाणें तूं जर थांबला असतास तर अरबस्थानांतील कांहीं लोक यहुदी धर्माचे व कांहीं ख्रिश्चन धर्माचे झाले असते. त्यांच्या मोहांतून तूं बाहेर पडलास, चांगलें झालें. यानंतर तुला विषयामध्यें गुरफटून टाकण्याकरितां मोहनी तुझ्यासमोर येऊन उभी राहिली होती. तिच्या जाळ्यांत तूं न सांपडतां बाहेर पडलेला पाहून मला अत्यानंद झाला. तिच्या जाळ्यांत जर कां तूं सांपडला असतास तर तूं अधोगतीला गेला असतास. याप्रमाणें जिब्राइल पैगंबरजवळ संभाषण करीत असतांना पैगंबरचा बुराक जरुसलेमवर यऊन पोंचला. तेथें हजरत ईसा, हजरत मूसा, आणि हजरत इब्राहिम यांची व पैगंबरची भेट झाली. कुशल प्रश्न विचारून झाल्यावर सर्व मिळून नमाज पडले. तेथून पैगंबर तिघांचाहि निरोप घेऊन निघाले व एकामागाहून एक अशा स्वर्गांतून जातांजातां सातव्या स्वर्गांत येऊन पोंचले. त्या ठिकाणची शोभा कोण वर्णन करील ! सृष्टिकर्त्या ईश्वराचें जें स्थान त्या ठिकाणच्या आनंदाला काय सीमा ! पशू,पक्षी,जनावर व मानव, ज्यांना ज्यांना म्हणून त्याच्या यांच्या पुण्याईनें सद्गती मिळाली होती ते सर्व त्या ठिकाणीं सुखसागरांत निमग्न झालेले होते. ज्याच्या प्राप्तीकरितां या जगांतील सर्व व्याप व क्लेश सोसावयाचे असतात, त्याची प्राप्ति झाल्यावर अतृप्त अशी इच्छा कशी रहाणार? स्वर्गाचें सुख, तो आनंद, तेथें वास कर-

णाऱ्या भाग्यशाली पुण्यवंतालाच माहीत! पैगंबरच्या आनंदाला सीमाच उरली नाहीं. सृष्टिकर्त्या प्रभुला त्यानें शिरसा वंदन केलें. प्रभूचें आतां आपल्याला दर्शन होणार या विचारानें त्यांच्या शरीराला हर्षानें कंप सुटला. ध्यानीं मनीं त्याचाच निजध्यास असल्यानें जिकडे तिकडे त्यांना तोच एक दिसूं लागला. थोडें पुढें गेल्यावर हजरत पैगंबर परमेश्वराच्या दिव्य सिंहासनासमोर जाऊन उभे राहिले. ऐहिक सर्वसुख क्षणीक आहे; आपल्याला स्वर्गीय अक्षय लाभ होण्याकरितां परमेश्वराची पर्ण कृपा झाली पाहिजे, याची त्यांना पहिली जाणीव येथें झाली. त्या अनंतशक्ति प्रभूची अपार लीला ह्यांनीं पाहिली. त्या अगम्य प्रभूच्या दर्शनानें त्यांच्या मानवी देहांतील दिव्य ज्ञानज्योत प्रज्वलित केली. परमेश्वरांनीं धर्मप्रसाराचें कृत्य भूतळावर पार पाडण्याची त्यांना आज्ञा केली व पैगंबरानें त्या आज्ञेला शिरसावंदन केलें. इतक्यांत जिब्राइल पुढें झाला व त्यानें ह. पैगंबरचा हात धरून त्यांना त्यांच्या बुराकवर बसऊन आल्या मार्गानें स्वस्थळीं आणून पोचविलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नित्याप्रमाणें पैगंबर आपल्या बिछान्यावरून उठले व त्यानीं रात्रीं झालेली सर्व हकीगत आपल्या स्नेह्याला-अबुबक्रला सांगितली. हं, हं म्हणतां हजरत पैगंबर स्वर्गाहून जाऊन आले असें जो तो बोलूं लागला. पैगंबरच्या शत्रूला त्यांची टवाळकी करण्याला आणखी एक नवीन कारण झालें. प्रत्येक मनुष्य आपापल्या स्वभावानुसार या गोष्टीचा विचार करूं लागला, व चर्चा करूं लागला. अबुबक्रसारख्या शुद्ध अंतःकरणाच्या मनुष्यांचा पैगंबरच्या प्रत्येक शब्दावर पूर्ण विश्वास होता; अर्थात् त्यांना त्यांत सर्वच सत्य दिसलें. अविश्वासी लोकांना ते सांगत, " हजरत पैगंबर कधीं खोटें बोलतात काय? त्यांच्या तोंडून असत्य वाणी निघाल्याचें एक तरि उदाहरण सांगाल काय? तसें उदाहरण देण्याला जर तुमच्याजवळ नसेल तर हें असत्य आहे, असें कसें म्हणतां येईल? पैगंबर सत्याकरितां असतात. त्यांच्या प्रत्येक शब्दांत सत्य भरलेलें असतें, त्यांच्यावर विश्वास ठेवा."

# भाग ७ वा.

## हिजरी सन.

१ ह. मुहम्मद पैगंबरास ठार मारण्याचा कट.
२ कट फसतो.
३ थार पर्वताच्या गुहेंतील वास्तव्य.
४ त्यांचा शोध.
५ कबुतरांची पवित्रता व त्यांची कारणें.
६ मादिना शहराला हिजरत.
७ हिजरी सनाची सुरवात.

### १ ह. मुहम्मद पैगंबरास ठार मारण्याचा कट.

यसरब येथील यात्रेकरू आणि पैगंबरसाहेब यांच्या पुष्कळ वेळां गाठी पडून, यसरब येथील पुष्कळ लोकांनीं इस्लाम धर्माची दिक्षा घेतली, व ते लोक आपल्या हातावर तुरी देऊन पळून गेले, या गोष्टीनें कुरेश लोकांच्या अंगाचा भडका उडून गेला. शत्रू प्रबळ होत चालला, इतोत्तर त्याच्याकडे काना डोळा करण्यांत आत्मघात आहे, अशी त्यांची पूर्ण समजूत होऊन चुकली. परंतु हा कांटा उपटून कसा काढावा, हें त्यांस समजेना. यावेळीं मक्का शहरचा मुख्य अधिकारी अबुसुफयान नांवाचा होता. तो पैगंबर साहेबांचा कट्टा शत्रु होता. आज बारा वर्षे एकेश्वरी मताचा प्रसार चालवून, पैगंबर साहेबांनीं जी कांहीं अशांतता पसरली होती, तिचा समूळ नाश करण्याचा त्यानें निश्चय केला होता. इकडे अबुबक्र यांचें मक्का सोडून जाण्याचे टुमणें पैगंबर साहेबांच्या मागें लागलेंच होतें. परंतु अबुबक्रला “ हिजरत करण्याची आद्यापि ईश्वरी आज्ञा नाहीं,” असा ह. मुहम्मद साहेब जबाब देऊन त्याला गप्प करीत असत.

ह. मुहम्मद साहेबांचा त्रास चुकविण्या करितां काय करावें, हें ठरविण्यासाठीं कुरेश घराण्यांतील लोकांनीं गांवांतील सर्व लोकांची एक सभा बोलाविली. त्यांना हद्दपार करावें, म्हणून कांहीं लोकांनीं सुचविलें; परंतु हद्दपार केल्यास मुहम्मद सारखा मनुष्य हातपाय जोडून स्वस्थ बसणाऱ्यापैकीं नसल्याकारणानें, तो आपल्या कार्यास परक्या लोकांची सहानुभूति मिळवून घेईल व आपली पुरेवाट करील; या धास्तीमुळें ही सुचना कोणासच पसंत पडली नाहीं. त्यांना आजन्म तुरुंगांत टाकावें, अशी आणखी एक सुचना पुढें आली; मुहम्मदाचे स्नेहीसोबती परक्यांची मदत घेऊन त्यांस सोडल्या वांचून रहाणार नाहींत, अशी सभेंतील सर्व माणसांची खात्री असल्यामुळें, ही सुचनाहि नापसंत ठरली. अशा तऱ्हेच्या बऱ्याच सुचनांची भवतिनभवति होऊन अखेर त्यास ठार मारल्यावांचून त्याचा त्रास चुकणार नाहीं, अशी सर्व सभासदांची खात्री होऊन चुकली. परंतु मांजराच्या गळ्यांत घंटा बांधण्याचें हें काम करावें कोणी? घाताबरोबर जसा प्रत्याघात, त्याप्रमाणें खुनाबरोबर सूड हें अरब लोकांतील स्वभाववैशिष्टय आहे. कोणी एखाद्या माणसानें जर अरब लोकांतलि माणसाचा खून केला; तर ज्या घराण्यांतील माणसानें खून केला असेल, त्याच्या घराण्यांतील माणसाचा खून केल्यावांचून ते स्वस्थ बसणार नाहींत. इतकेंच नाहीं, तर या सूडाचे धागेदोरे लांबत जाऊन रक्तपाताला किती कारणीभूत होतात, हें त्यांना पूर्ण माहित असल्यामुळें पैगंबर साहेबांचा खून केल्यास, त्या कृत्याच्या परिणामाचें चित्र प्रत्येकाच्या नेत्रांपुढें उभे राहिले व ते सर्व स्वस्थ बसले. इतक्यांत अबूजहल या नांवाचा पैगंबर साहेबांचा एक कट्टा शत्रु होता, त्यानें या विपरीत परिस्थितींत तोड म्हणून अशी युक्ति सर्व सभासदांस सुचविली कीं, जेणें करून पैगंबराचा खून तर करितां यावा, परंतु या खुनाचा परिणाम मात्र कोणासच भोगावा लागू नये. पैगंबर साहेबांचे पणजे हाशम यांचे कूळ सोडून गांवांतील

प्रत्येक कुळांतील एक, या प्रमाणें त्यानें माणसें निवडून काढलीं. या सर्व माणसांनीं मुहम्मदावर एकदम हल्ला करावा, व असें केलें म्हणजे अमक्याच कुळांतील माणसानें खून केला, असा प्रश्न उद्भवणार नाहीं व सूडाचा प्रश्न राहाणार नाही. सर्वच घराणीं कटांत सामील असल्यामुळें हाशमच्या घराण्यांतील लोकांस सबंध मक्का शहरांतील लोकांचा खून करणें शक्य नाहीं. अबूजहल याची ही युक्ति सर्वत्रांस पसंत पडून कुरेश लोक आपल्या मार्गास लागले.

## २ कट फसतो.

नेमलेल्या दिवशीं प्रत्येक घराण्यांतील एक मनुष्य या प्रमाणें सर्व तरूण सशस्त्र होऊन रात्रीची सामसूम झाल्यानंतर पैगंबरच्या घराबाहेर जमले. पहाटेस ह. मुहम्मद बाहेर पडतांच सर्वत्रांनीं एकदम त्यांजवर हल्ला करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. दरवाजाला असलेल्या फटींतून ह. पैगंबर बिछान्यावर निजलेले असल्याबद्दल त्यांनीं आपली खात्री करून घेतली होती. परंतु परमेश्वराच्या लीला अगाध ! आपणांवर कांहींतरी अकाल्पित संकट येणार आहे, अशी पैगंबर साहेबांस प्रेरणा झाली, व त्यांनीं ताबडतोब देशत्याग करण्याचा निश्चय केला. आपली हालचाल आपल्या शत्रूंस कळूं नये ह्मणून हजरत अली यास त्यानें आपली शाल पांघरून आपल्या बिछान्यावर निजण्यास सांगीतलें, व आपण घराच्या मागच्या दरवाजानें कांहीं हालचाल न करितां निघून गेले. ह. पैगंबर आपल्या घराहून जे निघाले ते अबूबक्रच्या घरीं आले. अबूबक्र आज कित्येक दिवस तयारींत होता. त्यानें दोन शीघ्रगामी उंट तयार करून ठेविले होते. ह. पैगंबर साहेबांची निघण्याची तयारी आहे हें ऐकून अबूबक्रला मोठा आनंद झाला, व ते उभयतः रातोरात मार्गस्त झाले.

पहाट होऊन गेली. पूर्वदिशा फुटण्याच्या बेताला आली. तेव्हां बाहेर वाट पहात असलेले मारेकरी अद्याप मुहम्मद उठून बाहेर येत नाहीं हें

पाहून अस्वस्थ झाले. शेवटीं इतका वेळ मुहम्मद निजून रहाणें शक्य नाहीं, अशी त्यांची खात्री होतांच, त्यांनीं दरवाजा उघडला, आणि पहातात तों पैगंबरांच्या बिछान्यावर हजरत अली निजलेले ! हातांतील शिकार अशा रीतीनें निघून गेलेली पहातांच, कुरेश लोकांचा संताप शिखराला पोंचला. सर्वदिशेनें त्यांच्या शोधाकरितां माणसें धांवलीं. त्यांना पकडून देणारास त्यांनीं बक्षिसें लाविलीं. हजरत अली यांस त्यांनीं अनेक प्रकारें सतावलें. अनेक प्रश्न विचारून विचारून त्यांस त्यांनीं भंडावून सोडलें; परंतु त्या प्रामाणिक मनुष्यानें त्यांच्या अनेक प्रश्नांच्या उत्तराची बोळवण एकदोन उत्तरें देऊनच केली. " मी पैगंबर साहेबांचा चौकीदार नाहीं. तुम्हीं त्यांना जावयास सांगितलें, व ते निघून गेले. " असा त्यानें शेवटीं जबाब दिला.

हजरत अलीसारख्या प्रेमळ बंधूला संकटाच्या तोंडावर टाकून पैगंबरसाहेब आपला जीव घेऊन पळून गेले, असा दोष त्यांना लागण्याचा संभव आहे; परंतु तसें करण्यावांचून त्यांना दुसरा मार्ग नव्हता. एकतर हजरत अली ह्मणजे त्यांचे चुलतबंधु, यामुळें व्यक्तिदृष्ट्या त्यांच्यावर सूड उगवावयाला कुरेश लोकांना कांहींहीं कारण नव्हतें. शिवाय मारेकऱ्यांना कांहीं घंटे असावध ठेवणें हें त्यांच्या स्वतःच्या बचावाच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक होतें; अर्थात् त्याला आपल्या बिछान्यावर त्यांना निजवावें लागलें. या दोन कारणांशिवाय आणखी जास्त महत्वाचें असें तिसरेंहि कारण त्याला मागें ठेवण्यामध्यें होतें. धार्मिक बाबींत कुरेश लोकांचा व इतर जनांचा ह. मुहम्मदसाहेबांशीं कितीहि वाद असला तरी त्यांची सचोटी, त्यांचा प्रामाणिकपणा, सर्वश्रुत असून या त्यांच्या गुणांमुळें लोकांनीं त्यांना ' अल् अमीन ' असें नांव दिलें होतें. या त्यांच्या गुणांमुळें कित्येक लोक आपल्या ठेवी सुरक्षित राहाव्या ह्मणून त्यांच्याजवळ देत असत. अशा अनेक ठेवी देशत्याग करण्याच्यापूर्वी हजरत मुहम्मदसाहेबांच्या जवळ होत्या. त्या ठेवी आपल्या हातानें ज्याच्या त्यास

देण्याच्या योगानें नसत्या संशयाला जागा होऊन, त्यांच्या जीवाला धोका होण्याचा संभव होता; यामुळें हजरत अलीला मागें ठेवण्यावांचून त्यांना गत्यंतर नव्हतें.

ह. मुहम्मद साहेब व अबुबक्र जे निघाले ते जाणार तरी कोठें ? यसरीब शिवाय इतर ठिकाणीं जाण्यास त्यांना सोय नव्हती. यसरीबचे लोक त्यांच्या स्वागताकरितां अत्यंत उत्सुक होते, परंतु ही गोष्ट कुरेश लोकांना माहित असल्याकारणानें, यसरीबच्या सर्व वाटांवरून कुरेश लोकांचें धरणें बसल्याशिवाय राहणार नाहीं व यसरीबच्या रस्त्यानें गेल्यास आपण शत्रुच्या हातीं अचानक सांपडले जाऊं, ही गोष्ट त्यांना पूर्ण माहित होती. या सर्व गोष्टींचा विचार करून यसरीबला जाण्याचा राजमार्ग त्यांनीं सोडून देऊन कुठें तरी आसपास गुप्तस्थळीं कांहीं दिवस काढण्याचा त्यांनीं विचार केला.

## ३ सौर पर्वताच्या गुहेंतील वास्तव्य

यसरीबच्या उत्तरेकडील मार्ग सोडून ते रात्रीच्या अंधारांत दक्षिण दिशेच्या खडकाळ प्रदेशामधून आपला रस्ता काढीत निघाले. अनेक खडक, डोंगराच्या चढणी उतरणी ओलांडून ते सौर पर्वताच्या पायथ्यानजीक येऊन पोहोंचले. मक्का शहरापासून हें ठिकाण साधारण दीड तासाच्या मार्गावर आहे. या पर्वताची वाट उंच, सखल, खडकाळ असल्या कारणानें त्याच्यावर चढण्याचें काम अत्यंत दुष्कर होतें. त्यांतून अंधःकारांतून त्या बिकट प्रदेशांतून प्रवास करणें किती धोक्याचें असेल याचा विचार ज्याचा त्यानेंच केला पाहिजे. परंतु प्रसंग अशा दुर्घट अडचणींना सुकर करीत असतो. जेथं जीव रक्षण करण्याचा प्रश्न पडला तेथें अशा अडचणींची मात्तबरी ती काय असणार ! ह. मुहम्मद व त्यांचा सोबती त्या पर्वतावर येऊन पोहोंचले. त्या पर्वताच्या माथ्यावर आले म्हणजे एक खोल दरी दिसते. त्या दरींत शिरणें हि

मोठ्या मुष्कीलीचें होतें. जेमतेम ते रांगत आंत शिरले. ही जागा पैगंबर साहेबांनीं गुप्तपणें राहण्याला योग्य आहे असें ठरविलें होतें. या गुहेंत ते तीन दिवस लपून राहिले. अबूबक्रचा नोकर या ठिकाणीं त्यांना गांवांतून अन्नपाणी घेऊन येत असे. कुरेश लोकांच्या हालचालीचीहि इथंभूत बातमीहि त्यांना त्या नोकराकडून मिळत असे.

## ४ त्यांचा शोध.

ह. मुहम्मद साहेबांना पकडून आणण्याकरितां कुरेश लोकांनीं सर्व दिशांना हत्यारबंद लोक रवाना केले होते. यसरबला जाणाऱ्या सर्व रस्त्यांचा तपास करून त्यांचे बरेच लोक निराश होऊन मक्का शहरांत परत आले होते. परत येतांच ते कोठें लपून बसले असतील या संशयानें त्यानें दऱ्या, बखळी, गुहा वगैरे लपून बसण्यासारख्या ज्या ज्या जागा त्यांना माहित होत्या, त्या त्या सर्व जागा त्यांनीं शोधून पाहिल्या. या चांडाळांच्या हातीं हे उभयतां सांपडले असते तर त्यांची किती दुर्दशा त्यांनीं केली असती हें सांगणें फार कठीण आहे. शोधास पाठविलेले बरेच लोक हात हालवीत परत आलेले पाहून, कुरेश लोकांचा क्रोधाग्नि जास्तच भडकून गेला, व अबूबक्र व हजरत यांचीं शिरें आणून देणाराला त्यांनीं शंभर उंटांचें बक्षिस लाविलें. बक्षिसाच्या आशेनें अनेक लोक रानावनांतून त्यांचा शोध करीत होते. मनुष्यस्वभावाची घटना अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक बाबतींत विशेषतः सामाजिक आणि धार्मिक बाबतींत परंपरागत आलेल्या विचारांना तो इतका कांहीं चिकटून बसलेला असतो कीं, त्या बाबतीं यत्किंचितही अतिक्रमण त्यास असह्य होऊन जातें. मनुष्यस्वभावाच्या या विशिष्ट घटनेंतच कुरेश लोकांनीं ह. पैगंबरचा असा अमानुष छळ केला त्यांचे इंगित होतें. व्यक्तिस्वातंत्र्य, परमत सहिष्णुतता हे गुण समाजाच्या बाल्यावस्थेंत फारसे आढ-

ळणें शक्य नसल्याकारणानें रक्तपातावांचून घडून आलेल्या धर्मक्रांत्या जगाच्या इतिहासांत फारशा घडून येत नाहींत.

राजमार्गानें तर हजरतसाहेबांचा कुठेंही थांगपत्ता लागत नाहीं, व बक्षिसाची तर हांव सुटत नाहीं, अशा परिस्थितींत कांहीं लोक निर-निराळ्या दिशेनें भटकून भटकून ते ज्या गुहेंत दडून बसले होते त्या गुहेच्या तोंडाशीं आले. त्यांच्या पावलांचा आवाज ऐकतांच अबूबक्रची भितीनें अगदींच तारांबळ उडून गेली. तो केविलवाण्या मुद्रेनें पैगंबर साहेबांस म्हणाला शत्रू पुष्कळ आलेले दिसतात व आपण तर दोघेच ? अशा आणीबाणीच्या प्रसंगींही ह. पैगंबर साहेबांची धर्मनिष्ठा आणि धैर्य कायम होतें. ते चटकन म्हणाले 'नाहीं, आपण दोघेच नाहीं; आपल्याबरोबर तिसरा परमेश्वर आहे.'

## ५ कबुतरांची पवित्रता व त्याचीं कारणें.

ह. मुहम्मद साहेबांना शोधून काढण्यांत कुरेश लोकांनीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त करण्याचें ठरविले होतें. अशा विलक्षण परिस्थितींतही परमेश्वर आपल्या भक्तांचें संरक्षण कसें करतो याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे पैगंबर साहेबांचें या गुहेंतील वास्तव्य हेंच होय. गुहेच्या बाहेर माणसांचा आवाज येत होता, परंतु काय चमत्कार सांगावा ! गुहेचे तोंड कोळ्यांच्या जाळ्यांनीं इतकें कांहीं भरून गेलें होतें कीं, त्याच्या आंत मनुष्यें असतील अशी कोणाला शंका येणें शक्य नाहीं. त्याच प्रमाणें झाडांच्या फांद्यांचें गुहेच्या तोंडावर वेष्टन होऊन त्याजवर रानटी कबुतरांनीं आपलीं घरटीं बांधलीं होतीं. हजरतचा तपास करण्यास आलेल्या टोळीनें स्वाभाविकच विचार केला कीं, गुहेचे तोंड इतकें अरुंद आहे कीं, त्यांत शिरणेंच प्रथम मुष्किलीचें काम आहे, त्यांतून कोणी शिरेलच तर हे कुबुतरांचे घरटे शाबूद व कोळ्याचीं जाळीं शाबूद रहाणें शक्य नाहीं. असा विचार करून हजरतचा तपास करण्यास

आलेले लोक निराश होऊन परत गेले. वरील माणसांचें हें भाषण हजरतनें आंतून ऐकिलें. आपले प्राण आज या प्राण्यांनीं वांचविले म्हणून हजरत साहेबांस त्यांची मोठी धन्यता वाटली, आणि त्या वेळेपासून मक्का आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशांत कबूतरांना फार पवित्र मानतात. काबा मशिदीच्या समोर कबुतरांचे थवेच्या थवे दृष्टीस पडतात, परंतु त्यांना कोणीही दुखवीत नाहींत.

## ६ मदिना शहराला हिजरत.

अशा रीतीनें त्या कष्टमय कारागृहांत त्या दोघांनीं तीन दिवस काढिले. अबुबक्रचा गुराखी शेळ्या चारण्याकरितां त्या पर्वतावर येत असे, व तो त्यांना दूध देत असे. शिवाय जिकडे तिकडे सामसूम झाल्यानंतर अबूबक्रचा मुलगा त्यांना अन्नपाणी आणून देई व तो मक्का येथील कुरेश लोकांची चाललेली हालचालही वेळोवेळीं त्यांच्या कानांवर घालीत असे. सरते शेवटीं त्यानें सांगितलें कीं, मक्का शहरांत जिकडे तिकडे शांतता झाली असून, आतां फरारी लोकांचा तपास करण्यांत कांहींच अर्थ नाहीं; अशी कुरेश लोकांची ठाम समजूत झाली आहे. ते जाऊन इच्छित स्थळीं पोंचलेहि असतील. ' ही बातमी कळतांच हजरत पैगंबर व अबुबक्र यांनीं या गुहेंतून निघण्याचा बेत केला. त्यांनीं आपला वाटाड्या अबदुल्ला यास त्या पर्वताच्या उंच चढणी जवळ उंट आणण्यास सांगितलें. अबूबक्रच्या एका मुलीनें त्यांच्या प्रवासांतील अन्नसामुग्रीची तयारी करून दिली. अशा रीतीनें चवथ्या दिवशीं अंधार पडल्यावर अबुबक्रचा एक नोकर, एक वाटाड्या व दोन उंट अशी प्रवासाची सर्व तयारी त्या पर्वताच्या माथ्यावर गुहेनजीक तयार झाली. सर्व तयारी झाली असल्याचें कळतांच इस्लाम धर्माचा ज्ञानदीप त्या कारागृहांतून बाहेर पडून उंटावर स्वार झाला. तीन दिवसाच्या या कोंदट हवेच्या तुरुंगवासांतून बाहेर येतांच

त्यांच्या जिवाला जरा हुषारी वाटूं लागली. शिवाय अबुबक्रच्या मुलानें कुरेश लोकांच्या हालचालींबद्दल त्यांना जें कांहीं सांगितलें होतें त्यावरून त्या दुष्टांच्या तावडींतून आपण आतां सुटलों अशा भरंवशानें त्यांच्या मनाला आनंद वाटत होता. राजमार्गानें यसरबाला जाणें त्यांना धोक्याचें वाटत असल्यामुळें त्यांनीं तो मार्ग सोडून देऊन, ते पश्चिम दिशेला तांबड्यासमुद्राच्या बाजूला वळले. या रस्त्यानें ते प्रवासी लोकांच्या सिरीयाला जाण्याच्या पाऊल वाटेपर्यंत आले. अशा रीतीनें ते बरेच दूर चालून जात असतांना, लांबून त्यांच्याकडे येत असलेला एक इसम त्यांच्या नजरेस पडला. बाक्षिसाच्या आशेनें या मानसानें पैगंबराचा शोध करण्याचें काम अद्यापि सोडिलें नव्हतें. त्या माणसास ओळखतांच ‘ आपली पुरीं शंभर वर्षे भरलीं ’ ह्मणून अबुबक्र ओरडला. ‘ ईश्वर आपला सहाय्यकर्ता आहे, ’ इतका जबाब मुहम्मद साहेबांनीं दिला. यसरबच्या सिध्या रस्त्याला ते नुकतेच लागले होते. या इसमानें त्यांना ओळखतांच त्यानें आपला घोडा भरधांव फेंकला. त्याचा आनंद यांना पहातांच गगनाला जाऊन पोहोंचला होता; परंतु भवितव्य निराळेंच असतें. इस्लाम धर्माच्या पताकेची मुहुर्तमेढ अद्याप पुरी रोवली गेली नव्हती. अशा वेळीं या धर्माच्या प्रवर्तकावर नसतें संकट आणून परमेश्वर त्याधर्माचें काम अपुरें थोडेंच ठेवणार ? तो घोडेस्वार आनंदोन्मादानें घोडा दौडत आला, पण त्याच्या घोड्यानें एकाएकीं ठोकर खाऊन त्यानें स्वारास जमिनीवर फेंकून दिला. बाक्षिसाच्या अनिवार लालसेनें तो पुन्हां घोड्यावर स्वार होऊन दौड करण्याचा प्रयत्न करूं लागला, परंतु त्या कामांतही त्यास अपशकून होऊन घोड्याचे पाय गुडध्यापर्यंत वाळूंत रुतून बसले. असे एकावर एक अपशकून झालेले पाहून हजरत साहेबांचा सहाय्यकर्ता परमेश्वर आहे, यांत बिलकूल शंका नाहीं, अशी त्याच्या मनाची पुरी खात्री

होऊन गेली, व अशा मनुष्याचा छळ करून आपण परमेश्वराच्या रोषास पात्र होऊं, हें योग्य नव्हे, अशी त्या माणसास उपरति झाली. तो तसाच चालत पैगंबराच्या जवळ आला व मोठ्या विनतभावानें त्यांची करुणा भाकूं लागला. हें पाहून अबुबक्र त्या स्वारास म्हणाला, 'मग तुझें म्हणणें काय आहे ?'

" पैगंबरसाहेबांनीं मला आपल्या धर्माची दिक्षा द्यावी इतकेंच माझें मागणें आहे, " तो स्वार ह्मणाला, या त्याच्या ह्मणण्यास पैगंबरसाहेबांनीं ताबडतोब मान देऊन त्यास त्यांनीं इस्लाम धर्माची दिक्षा दिली. मध्येंच उपास्थित झालेल्या या संकटांतून निभावतांच अबुबक्र व ह. मुहम्मद-साहेब पुन्हा आपल्या प्रवासास लागले. ते उन्हाळ्याचे दिवस होते. वाळू विस्तवाप्रमाणें तापून लाल झालेली, मधून मधून येणारी वायूची झुळुक अग्नीप्रमाणें होरपळून टाकणारी, अशा प्रदेशांतून कोसच्या कोस तुडवीत जाणें किती कष्टाचें होतें, याची कल्पना पैगंबरसाहेबांशिवाय दुसऱ्या कोणास होणें शक्य नाहीं. त्यांना कुठें थांबण्याची सोय नव्हती, कुठें विश्रांती घेण्याला जागा नव्हती, कारण कुरेश लोकांचा ससेमिरा त्यांच्या पाठीमागें असल्यामुळें मुक्काम जितका लवकर गाठतां येईल तितके चांगलें, असा त्यांनीं विचार केला. अशारीतीनें थोडावेळ चालून गेल्यावर अबूबक्रचा एक चुलतभाऊ त्यांना वाटेंत भेटला. तो सिरिया प्रांतांत व्यापाराकरितां गेला होता, तो आतां परत मक्केला चालला होता. त्याच्याजवळ व्यापारी माल बराच होता. त्यापैकीं एकएक पांढरा कपडा त्यानें पैगंबरसाहेब व अबुबक्र यांस दिला. तो निघून गेल्यानंतर पुन्हा त्यांच्या प्रवासाला सुरुवात झाली. आयेशा कशी असेल ! फातीमा व इतर मुली कशा असतील ? बिचाऱ्या अलीची कुरेश लोकांनीं काय वाट केली असेल ? अशा तऱ्हेचे अनेक प्रश्न मनांत उभे राहून त्यांना तो कष्टमय प्रवास अधिकच दुर्घट होऊन गेला होता.

परंतु मनांत उद्भवणाऱ्या या अनेक शंका कुशंकांचें निरसन ते आपल्या परमेश्वरावरील अलौकिक श्रद्धेनें करीत, आपला मार्ग आक्रमीत होते. ज्याप्रमाणें परमेश्वरानें पकडण्यास आलेल्या स्वाराचे अंतःकरणांत सद्बुद्धीची प्रेरणा केली, त्याचप्रमाणें तो कुरेश लोकांचें मनांतही सद्भावनेची प्रेरणा करून आपल्या आप्तइष्टांचे संरक्षण करील, असा त्यांचे मनांत पूर्ण भरंवसा होता. त्यांना मक्केला जाणारे जे लोक रस्त्यांत भेटत असत त्यांचेकडून आपली बातमी कुरेश लोकांना कळण्याचा संभव होता; परंतु मक्काशहराची बातमी आपणास कळण्यास कांहींसुद्धां मार्ग नाहीं, या विचारानें त्यांचें मन अनेक वेळां विषण्ण होऊन जात असे.

यसरब शहराला पोंचण्याला साधारणपणें अकरा दिवस लागतात. परंतु यसरब शहरास वेष्टणाऱ्या पर्वत श्रेणीच्या शिखरावरून त्या प्रवाशांना यसरब शहरचा देखावा बरोबर आठव्या दिवशीं दिसला. यांवरून या प्रवाशांनीं हा प्रवास किती झपाट्यानें केला याची सहज कल्पना होईल. या प्रवाशांचा डोंगर पठारांतील, खडक खोऱ्यांतील, रेताड रखरखीत मैदानांतील प्रदेशांतील प्रवास व यसरबच्या बाजूचा या पर्वतश्रेणीवरून दिसणारा प्रदेश, यांत जमीन अस्मानाचें अंतर होतें. जिकडे तिकडे खजुरीच्या झाडांचें बन असून मधून मधून वाहणारे पाण्याचे ओहोळ पाहून, आमच्या प्रवाशांना अत्यानंद होऊन ईश्वराच्या अतर्क्य कर्तृत्वानें त्यांचीं मनें कृतज्ञ बुद्धीनें भरून गेलीं. होरपळून टाकणारी सूर्याची उष्णता, तहानेनें होत असलेली जीवाची तळमळ, वगैरे अनंत यातना सहन करून अशा रम्य प्रदेशाचें दर्शन होतांच, आठ दिवसांची क्षिणता जणूं काय आपोआप निघून गेल्यासारखें त्यांना वाटूं लागलें.

## ७ हिजरी सनाची सुरवात.

इकडे पैगंबर साहेब मक्का सोडून यसरबला यावयाला निघाले ही बातमी त्यांच्या शिष्य समुदायांत पसरली होती. यामुळें ते त्यांच्या

वाटेकडे डोळे लावून बसले होते. परंतु अदमासानें ते अमक्या दिवशीं येतील अशी त्यांची कल्पना होती ती मुदत टळून गेली, असें त्यांस वाटून ते दिवसेंदिवस अत्यंत अस्वस्थ होऊं लागून ते पर्वताच्या उंच शिखरावर चढून मोठ्या अधिरपणानें त्यांची वाट पहात असत. सूर्यास्तापर्यंत अशा रीतीनें पैगंबर साहेबांची वाट पाहून निराशेनें ते आपल्या घरचा रस्ता धरीत. त्यावेळीं सहाजिक त्यांचे तोंडून " अरेरे आमचा धर्मदीप या डोंगरा खडका मधून आणखी किती दिवस वणवण करीत हिंडणार !," असे शद्ब निघत असत. पैगंबराच्या शिष्यानें ते येत असल्याची बातमी आपणांस वेळेवर मिळावी म्हणून, एका मनुष्याकडे हरहमेश पर्वतावर बसून राहून ते येतांच आपणास कळविण्याविषयीं सांगितलें होतें. त्याच्या नजरेस शेवटीं यसरब शहरापासून दोन मैल असणाऱ्या कुबा नांवाच्या खेड्याच्या बाजूनें दोन उंट येत असल्याचें दृष्टीस पडलें. हं हं म्हणतां ही बातमी यसरब शहरांत जिकडे तिकडे सर्वत्र पसरली. प्रवासाच्या श्रमानें अतिशय थकून गेल्या कारणानें पैगंबरसाहेबानें कुबामध्यें एका झाडाखालीं विश्रांती घेण्याचें ठरविलें. व त्याप्रमाणें तें उंटावरून उतरून एका आंबराईत विश्रांती घेत बसले होते; इतक्यांत यसरब येथील त्यांच्या शिष्य वृंदापैकीं बरींच माणसें त्यांचें स्वागत करण्याकरितां तेथें येऊन पोहोंचलीं.

ते ज्या आंबराईत विश्रांती घेण्यास उतरले होते ती आंबराई मोठी मनोहर होती. सभोंवार घनदाट झाडें झुडपें, वेली पुष्पफळांनीं भरगच्च असलेला तो प्रदेश पाहून मनुष्य कितीही चिंताक्रांत व थकलेला असला तरी त्याच्या मनाची काळजी, शरिराचा थकवा, पार निघून जाणारच. आमच्या या प्रवाशानें गेल्या आठ दिवसांत जे कांहीं कष्ट भोगिले होते, त्यांचा निरास याठिकाणीं होऊन, त्यांचीं मनें आनंदानें प्रसन्न होऊन गेलीं होतीं. मक्का सोडतांना ह. मुहम्मदसाहेबांनीं अल्लीला जरा स्थिरस्थावर होतांच यसरबला येण्याचें सांगितलें होतें; ह्मणून तो तेथें येईपर्यंत त्यांनीं

आपला मुक्काम तेथेंच करण्याचें ठरविलें. त्यांचे डोळे मात्र अलीकडे लागून राहिले होते. ह. मुहम्मद साहेबांची बिनधोक सुटका व्हावी म्हणून प्रत्यक्ष आपला प्राण धोक्यांत घालून ज्यानें आपली स्वामी-निष्ठा दाखविली, त्याचेविषयीं त्यांना कळकळ वाटणें अपरिहार्य होतें. तिसऱ्या दिवशीं अली अचानक कुबा खेड्यांत येऊन दाखल झाला. त्यास पाहतांच ह. मुहम्मद साहेबांस प्रेमाचें इतकें कांहीं भरतें आलें कीं, त्यानें त्याला कडकडून मिठी मारली. अली किंवा ह. मुहम्मद साहेब यांचें कुटुंब यांना कुरेश लोकांकडून कोणत्याही रीतीनें त्रास झाला नाहीं, ही बातमी ऐकून त्यांच्या मनाला मोठें समाधान वाटलें.

इस्लाम धर्मांतील अत्यंत चिरस्मरणीय गोष्ट म्हटली म्हणजे 'हिज-रत' होय. हिजरत या शब्दाचा अर्थ निघून जाणें, देशत्याग करणें, हा आहे. हजरत पैगंबर साहेबांनीं मक्काशहर सोडिलें, या चिरस्मणीय दिवसापासून इस्लाम शकास सुरवात झाली. एका फ्रेंच ग्रंथकाराचें मतानें पैगंबर साहेबानें आपल्या शिष्यवृंदास देशत्याग करून यसरबला जाण्याची परवानगी दिली, या हिजरतची तारीख १९ एप्रिल ६२२ ही असून ज्यादिवशीं अबुबक्र व पैगंबर हे स्वतः मक्काशहर सोडून गेले त्या दिवसाची तारीख २० जून इ. स. ६२२ ही होती. कांहीं ग्रंथकाराच्या मतें पैगंबरनें ता. २५ जून इ. स ६२२ रोजीं मक्का-शहर सोडिलें असेंही आहे.

# भाग ८ वा

## मनःशांति

विषय.

१ इस्लाम नगर.
२ अनसार आणि मुहजरीन.
३ पहिली मशिद.
४ बीबी आयेशा.
५ हजरत पैगंबरची धार्मिक बंधनें.
६ मुसलमानांची स्थिति.
७ औदार्याचें महत्व.

### १ इस्लाम नगर.

आश्रयाकरितां म्हणून हजरत मुहम्मद पैगंबर प्रथम ज्या शहरात शिरले तें यसरब हें होय, परंतु त्यांनीं त्या शहराला स्वस्थानाचा मान दिला म्हणून त्या शहराला पुढें " मदिना " असें नांव पडलें.

जेव्हां यसरब मधील लोकांना हजरत पैगंबर दोन मैलावर असलेल्या कुबामध्यें येऊन दाखल झाले आहेत अशी बातमी लागली, तेव्हां त्यांच्या झुंडीच्या झुंडी पैगंबराचें दर्शन घेण्याकरितां कुबामध्यें आल्या. आपल्या भेटीसाठीं आलेल्या लोकांची विचारपूस ह. पैगंबर यांनीं स्वतः उत्तम प्रकारें केली. त्यांच्या मधूर आवाजानें व प्रेमळ शब्दांनीं आलेल्या लोकांचे फार समाधान झालें. हजरतच्या अंगांत असलेल्या सात्विक गुणाला याठिकाणीं नैसर्गिक प्रफुल्लता आली, व त्यांच्या दैविक सामर्थ्याची छाप या लोकांवर पूर्णपणें पडली. यसरबहून जे जे लोक हजरतच्या भेटीकरितां, दर्शनाकारितां, किंवा त्यांची परिक्षा पाहाण्याकरितां म्हणून आले; ते सर्व आश्चर्यानें थक्क होऊन आपापला हेतु सिद्धीस

गेला म्हणून आनंदानें स्वस्थानीं परत गेले. हजरत पैगंबरनें याठिकाणीं चार दिवस यसरबमधील लोकांच्या सहवासांत मोठ्या आनंदानें काढिले.

आह्मि मक्केहून सुखरूप येथें आल्याची हकीगत मागें आपण वाचलीच आहे. त्या नंतर हजरतनें यसरबला जाण्याचा दिवस मुक्रर केला. तो दिवस शुक्रवार होता. त्या दिवशीं प्रातःकाळीं स्नान करून, त्यानीं कपडे केले आणि आपल्या धर्माप्रमाणें नमाज पढून झाल्यावर निघण्याकरितां ते तयार झाले. यसरबला नेण्यासाठीं तेथील रहिवाशांची फार मोठी गर्दी जमली होती. त्या वेळच्या त्या लोकांचा उत्साह, श्रद्धा व प्रेम पाहून हजरतला अत्यानंद झाला. चार दिवसांपूर्वीं आपल्यावर किती भयंकर प्रसंग आले होते, त्याचें स्मरण त्यांना येथें झालें. आपल्या हातून आपलें इच्छित कार्य तडीस जाणार अशी त्यांना खात्री वाटू लागली. या पूर्वीं आलेल्या प्रसंगाच्या दिवसानंतर आजचा इतका सुखदायक दिवस ज्या परमेश्वराच्या कृपेनें आला, त्याचे त्यानें पुन्हा पुन्हा आभार मानिले. ज्याचा मक्केंतील लोकांनीं धिःकार केला, ज्याचा प्राण घेण्यास ते तयार झाले, त्याच मनुष्याच्या कृपेसाटीं यसरबमधील लोकांना वेड लागावें, या ईश्वरीचमत्काराचें हजरतला राहून राहून मोठें आश्चर्य व कौतुक वाटलें. ते स्वतःशीं ह्मणाले, "संकट हें आकाशांतील ढग. हें जाऊन जिकडे तिकडे निरभ्र स्वच्छ आकाश होईल, असा आपला विश्वास मात्र पाहिजे" मक्काशहरांत हजरतला आपल्या प्राणाची मोठी धास्ती वाटत होती, परंतु येथें तसा कांहीं एक प्रकार नसून हें स्थान अगदीं निर्भय आहे, या विचारांनीं त्यांना अंतरयामीं जो आनंद झाला, तो त्यांच्या मुखांतून शद्वांच्या स्वरूपानें बाहेर पडला. जमलेल्या लोकांना त्यांनीं सदुपदेश केला त्यावेळीं ते ह्मणाले, "सृष्टीकर्ता एकच ईश्वर आहे. त्याचें ध्यान करा. त्याच्याशिवाय दुसरा कोणी तुमचा उद्धार करण्यास समर्थ नाहीं. मनुष्य बळी देणें, व्यभिचार करणें, अबला स्त्रियांवर जुलूम करणें, या गोष्टी सोडून द्या.

त्या निराकार प्रभूची भक्ति करा." या प्रमाणें लोकांना सांगून हजरत आपल्या उंटावर स्वार झाले आणि आस्ते आस्ते रस्ता चालूं लागले.

हजरत पैगंबर ज्या रस्त्यानें चालले होते त्याच्या दोन्ही बाजूला घनदाट वृक्षांची छाया होती. वाटेनें जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांच्या मनाला आनंद देणारीं, फळांनीं व फुलांनीं भरलेली झाडें, त्यांतच मंद वाहणारा वारा, झाडांच्या पलिकडे फळझाडांच्या सुंदर बागा, इत्यादि सृष्टीसौंदर्यांनीं हजरतच्या मनाला आजच आपले सर्व श्रम परिहार झाले असें वाटूं लागलें. हजरत पैगंबरबरोबर चाललेल्या मुसलमानांच्या आनंदाला सीमाच राहिली नव्हती. त्यांच्या त्या वेळच्या हंसण्या खिदळण्यानीं चारी दिशा भरून गेल्या.

यसरब मधील लोकांना हजरत पैगंबर आपल्या गांवांत येत आहेत असें समजतांच त्यांचा एक प्रचंड जमाव त्यांना सामोरा गेला. हजरत पैगंबरला सामोरें जाण्याच्या वेळीं लोकांनीं सणावाराकरितां मुद्दाम ठेवलेले कपडे आज अंगांत घातले. त्यांच्या त्या निरनिराळ्या रंगाच्या पोशाकांनीं समाजाला अवर्णनीय शोभा आली होती. कांहीं तरूण आपला लढाईचा पोशाक करून व हत्यारें घेऊन या समाजा बरोबर चालले होते. त्यांच्या आंगांतील चकचकीत चिलखतावर पडलेल्या सूर्याच्या प्रकाशानें या सर्व देखाव्याला विलक्षण शोभा आणिली होती. हा समारंभ पाहाणाराला हेच हजरत व त्यांचे बरोबर उत्सवानें चाललेले हेच मुसलमान लोक, थोड्या दिवसांपूर्वीं आपल्या जिवाचा बचाव करण्याकरितां स्थानत्याग करून येथें आले आहेत असें न वाटतां, हे एकादा मोठा दिग्विजय संपादन करून त्याच्या हर्षानें उत्सव करीत आपल्या नगराला चालले आहेत असें वाटे.

वाटेंत त्यांना दोन प्रहर झाली. ही मुसलमानांची नमाज पडण्याची वेळ असते. हजरत आपल्या उंटावरून खालीं उतरलें व नित्य क्रमाप्र-

माणें शुचिर्भूत होऊन नमाज पडण्याचें पवित्र कर्तव्य त्यांनीं केलें. बरोबर असलेल्या लोकांनींहि त्यांचें अनुकरण केलें. ज्या जागेवर हजरत पैगंबर नमाज पडले त्याच जागेवर कांहीं काळ लोटल्यावर एक भव्य टोलेजंग मशीद बांधण्यांत आली. तिचें नांव "जुमामशीद" असें आहे.

हजरत पैगंबर पुढें आपल्या मार्गाला लागले. थोड्याच वेळानें यसरब शहरांत त्यानें प्रवेश केला. शहरांतील दुतर्फा असलेल्या घरांच्या रांगामधील रस्त्यानें चालले असतां हजरतनें आपल्या घरीं उतरावें म्हणून प्रत्येकजण त्यांचा उंट अडवूं लागला. शिवाय बरोबर असलेले लोक, या मानाचा हक्क आपला आहे असें जो तो म्हणूं लागला. हजरत थोडा वेळ विचारांत पडले. खुष करावें कोणाला व नाखुष करावें कोणाला, या प्रश्नाचा विचार करीत ते तसेच कांहीं वेळ पुढें चालले. हजरतच्या एवढी गोष्ट ध्यानांत येऊन चुकली कीं, एकाला खुष करण्यानें दुसरा एकजण नाखुष होऊन आपल्या कार्यांत विघ्न मात्र येईल. हें असें करणें शक्य नव्हतें म्हणून त्यांनीं असें सांगितलें कीं, 'माझा उंट ज्या ठिकाणीं उभा राहील त्या ठिकाणीं मी मुक्काम करणार.' हजरतनें हातांतील लगाम सोडून दिली व तो उंट रस्ता चालूं लागला. थोड्याच वेळानें त्या उंटानें पूर्वेकडील रस्ता धरीला आणि मोकळ्या अशा जागेवर जाऊन उभा राहिला. तेथें त्यानें आपले गुडघे टेकिले व पैगंबर साहेब जमिनीवर खालीं उतरले. ते म्हणाले, आमच्या मुक्कामाला हेंच स्थळ परमेश्वरानें स्वतः पसंत केलें आहे.'

हजरत पैगंबर ज्या उंटावर स्वार झाले होते, तो त्यांच्या स्वतःचा आवडता उंट होता. त्याचें नांव 'अल्-कास्वा' होतें. ज्या ठिकाणीं त्या उंटानें आपले गुडघे टेकले, त्याच ठिकाणीं पैगंबराच्या मशिदींतील मुख्य पीठ आहे. ज्या दिवशीं पैगंबर या जागेवर आले त्या दिवशीं ती पडित व ओसाड होती, ठिकठिकाणीं खांच खळगे होते, त्यांतील कांहीं

भाग स्मशानभूमी म्हणून वापरण्यांत येत असे, आणि त्यांत रानटी झाडें झुडपें, इत्यादि असून केरकचऱ्याचे ढीग पसरलेले होते.

हजरत पैगंबरनें आपले रहाण्याचें ठिकाण अबुऐयुब अन्सारी याच्या घरीं केलें होतें. मालक स्वतः त्या घरांत वरच्या मजल्यावर रहात असें, व खालचा भाग त्यानें हजरतला रहाण्याकरितां दिला होता. पुढें त्याच्या मनांत असा विचार आला कीं, हजरत पैगंबरानें खालीं राहून आपण वर रहावें हें विनयाला कमीपणा आणणारें आहे. एके दिवशीं त्यानें आपल्या घरांत वरच्या मजल्यावर रहाण्यासाठीं पैगंबरास विनंति केली. हजरत पैगंबरानें जबाब दिला कीं, ''मला खालींच रहाणें पसंत आहे. कारण पुष्कळ लोक मला भेटण्याच्या उद्देशानें माझ्याकडे येतात आणि मी जर वर राहूं लागलों तर सर्व लोकांना त्रास होईल.' याप्रमाणें सांगून हजरतनें त्याचें म्हणणें अमान्य केलें.

हजरतच्या मागाहून थोड्याच दिवसांनीं हजरतची पत्नी बिबी सौदा मादिना शहरीं आली. बिबीं फातेमा व उम्मे कुल्सुम पैगंबराच्या लहान दोन मुली आणि ह. अबुबक्रची पत्नी व त्यांचीं मुलें, अशीं मक्केहून निघून मादिना शहरीं येऊन पोंचलीं. त्यांच्या नशिबानें कुरेश लोकांनीं मात्र त्यांना जाण्याला प्रतिबंध केला नाहीं. पैगंबर साहेबांची दुसरी मुलगी बिबी रुकय्या आणि तिचा पति उस्मान, अबिसिनिया देशांत गेलीं होतीं म्हणून मागें सांगितलें आहे; तीं दोघें थोडयाच दिवसांनीं मदिना शहरीं आलीं.

एक अबदुल्ला बिन सलाम नांवाचा खानदानी मनुष्य हजरत पैगंबरला भेटण्यासाठीं त्यांच्या येथें आला. यहुदी लोक त्याला फार मान देत असत. हा मनुष्य विचारी व विद्वान होता. तो म्हणतो, 'हजरत पैगंबर साहेब मादिना शहरीं आल्यादिवसापासून रोज लोकांच्या झुंडींच्या झुंडी त्यांच्या दर्शनाकरितां येत होत्या. त्या पाहून मलाहि आपण त्यांची

भेट घेऊन लोक जे त्यांच्याबद्दल सांगतात त्यांत खरेपणा किती आहे हें पाहावें, असें माझ्या मनांत आलें. एके दिवशीं मी त्यांच्या भेटीसाठीं गेलों. त्यावेळीं माझी पूर्ण खात्री झाली कीं लोक सांगतात त्यांत काडी-भरहि खोटें नाहीं. मी जेव्हां त्यांच्या येथें गेलों, त्यावेळीं ते लोकांना उपदेश करीत होते कीं, 'बाबांनो, तुह्माला कोणी भला मनुष्य भेटला तर प्रथम त्याला सलाम करीत जा. जे गरीब, अनाथीं असतील त्यांना अन्नदान द्या. आपले सगेसोयरे, इष्टमित्र यांच्या जवळ प्रेमानें वागा, त्या अनंत प्रभूची भक्ति करीत जा,' इत्यादि. त्यावेळच्या हजरत पैगंबरच्या मूर्तिकडे पाहून मी स्वतः थक्क होऊन गेलों त्यांचा तो गंभीर व मधुर अवाज, प्रेमळ शद्बांचा अस्क-लित ओघ, पाणीदार डोळे आणि रुबाबदार चेहरा, या सर्व गोष्टींचा माझ्या मनावर इतका विलक्षण परिणाम झाला कीं, या दैविक विभूतीनें दाखऊन दिलेला धर्ममार्ग खरा असलाच पाहिजे, अशी माझी खात्री झाली. व तत्क्षणीं मी इस्लाम धर्माचा स्वीकार केला.'

## २ अनसार आणि मुहजरीन.

मादिना शहरांत त्यावेळीं तीन प्रकारच्या लोकांची वस्ती झाली होती. जे लोक हजरत पैगंबर साहेबांचा पक्ष घेऊन मक्का शहर सोडून मादिना शहरीं राहवयास आले होते त्यांना तेथें मुहजरीन असें नांव पडलें. या लोकांची संख्या फार कमी होती. हा एक पक्ष. दुसरा पक्ष ह्मणजे मक्केहून आश्रयाच्या निमित्तानें जे मादिना शहरीं आले त्यांना आश्रय देऊन त्या शहरांत मदत करणारे जे शहरवाशी त्यांना अनसार असें नांव पडलें. या दोन पक्षाशिवाय अगदीं तटस्थ वृत्तीनें राहणारे असेही तेथें कांहीं रहि-वाशी होते; परंतु त्यांची गांवांत कोठेंही चळवळ नसल्यामुळें त्यांना विशेष असें नांव देण्याचें कारण पडलें नाहीं. हजरत पैगंबर बरोबर येणारे जे लोक होते त्यांनीं स्वधर्माकरितां किती छळ सोसला याची कल्पनाहि करतां

येणें शक्य नाहीं. मक्केंतील रहिवाशी त्यांनीं इस्लाम धर्म सोडून द्यावा म्हणून निरनिराळ्या प्रकारांनीं त्यांना छळित होते. मारहाण, कत्तल, माल मिळकतीची अफरातफर, भाउबंद, इष्टमित्र यांची ताटातूट, इत्यादि सर्व असह्य शिक्षा सोसूनहि शेवटीं बिच्याऱ्यांनीं जन्मभूमी सोडून परदेशचा रस्ता धरला, परंतु धर्मांतर म्हणून केलें नाहीं, हें मोठें आश्चर्य. इस्लाम धर्माचें रहस्य म्हणा अगर गूढ म्हणा, जें आहे तें येथें आहे. ज्या तत्वांना आपण सामान्य नीतितत्वें म्हणतो, त्यांची इतकी जबरदस्त छाप लोकांवर कां पडावी हें आश्चर्यकारक नाहीं असें कोण म्हणेल? आजच्या सुधारलेल्या काळांत आपणास हीं सामान्य तत्वें आहेत असें वाटून त्यांचे फारसें महत्व आपणांस वाटत नाहीं. परंतु ज्या काळचा आम्हीं इतिहास लिहित आहोंत, त्या काळची सामाजिक, राजकीय व धार्मिक परिस्थिति पाहिली तर हजरत पैगंबर प्रमाणें लोकांना नीतीचा धडा देऊन त्यांना सन्मार्गानें नेणारा सबंद अरबस्थानांत त्यांच्याशिवाय दुसरा कोणीहि त्या वेळीं झाला नाहीं असें यावरून दिसतें. अरबस्थानांत त्या काळीं ज्या मानानें अनीति, अत्याचार, इ. तमोवृत्ति बोकाळली होती, त्याचप्रमाणें फार थोड्या प्रमाणांत सात्विक वृत्तीहि तमोवृत्तीला कंटाळून, आपलें डोकें वरवर काढींत होती. त्या वृत्तीला योग्य मार्गदर्शक व चहाता उत्पन्न होताच, तिनें आपली दृढता, आपला कृतनिश्चय, व सत्यस्वरूप जगाच्या निदर्शनास आणून दाखविलें. हजरत पैगंबर आपल्या एका हातांत नीतिध्वजा व दुसऱ्या हातांत ईश्वरीआज्ञा घेऊन मक्केच्या बाहेर दिग्विजयाकरतां पडले. त्याच्या मागोमाग वर सांगितलेले मुहजरीन लोक जिकडे हजरत तिकडे ते निघून गेले.

मदिना शहरची सुद्धां विचार करण्यासारखी धार्मिक परिस्थिति झाली होती. मुहजरीन लोकांना आश्रय दिल्यामुळें सर्व अरबस्थान आपल्याला शत्रू होणार याची अटकळ त्या शहरवासी लोकांना पूर्ण झालेली होती.

नवीन धर्म स्वीकारणें जितकें सोपें दिसतें, तें सोपें नाहीं. वंशपरंपरा हाडींमासीं खिळून गेलेल्या समजुती, चालीरीति एकदम पार बदलून टाकून त्या ठिकाणीं अगदीं नवीन स्वरूपाच्या चालीरीति किंवा धार्मिक कल्पनाना स्थानें देण्यांत मनुष्याच्या आंगांत दृढनिश्चय, दोन धर्मामधील मनाला पटलेला अनुभव, सत्याची ओळख, समाजाशीं करावयाला लागणारें युद्ध, व स्वतः कोणताही प्रसंग पडला तरी त्यांतून निभावून जाण्याची तयारी इत्यादि गुण असावे लागतात. हे सद्‌गुण ज्याला म्हणून परधर्माची अवश्यकता खरोखर असते, त्याच्याच आंगांत असलेले दृष्टीस पडतात. परधर्माची खोटी हौस कसोटीच्या वेळीं टिकत नाहीं. कसोटीचा प्रखर अग्नी प्रदिप्त झाल्यावर त्यांत खरें नाणें तेवढेंच टिकाव धरतें. त्याचप्रमाणें हजरतच्या अनुयायांनीं एक वेळ सत्याचा पक्ष जो धट्ट ठरविला, तो त्यांनीं सोडावा म्हणून शत्रूंनीं जंगजंग पछाडिले परंतु त्यांचा सर्व प्रयत्न निष्फळ झाला. त्यांना आज मदिना शहरांत मोठ्या आनंदानें फिरतांना पाहून हजरतच्या मनाला किती समाधान झालें असेल याची कल्पना करतां येणें कठीण आहे. त्यांच्या शुद्ध, निर्मळ, निःस्वार्थी प्रेमानें हजरतचें मन मोहून टाकिलें असेल यांत काडीभर संशय नाहीं. हजरतच्या तोंडच्या एका शब्दासाठीं, त्यांच्या कृपाप्रसादासाठीं, त्यांच्या कृपादृष्टीसाठीं, त्यांनीं आपलें घरदार, वतनवाडी, धंदारोजगार, आप्तइष्ट सोडून निर्जल मैदानाची दिशा धरली, हा त्यांचा असामान्य स्वार्थत्याग जगाच्या दृष्टोत्पत्तीस आणून त्यांनीं इस्लाम धर्माच्या मंदिराचा पाया मदिना शहरीं मजबूत घातला.

आश्रयाकरितां आलेले मुसलमान लोक सर्व देशाचे शत्रू झाले होते, त्यांच्या बद्दलचा द्वेषाग्नि जिकडे तिकडे धुमसत धुमसत चालला होता, त्याची व्याप्ती किती लांबपर्यंत पसरेल व त्यांत कोणाची आहुति पडेल याचा नेम नसतांना, त्या लोकांना आपले समजून त्यांना आश्रय देणें, किती धोक्याचें काम आहे, हें शहरवाशीं लोकांना

चांगलें माहीत असूनहि त्यांनीं निधड्या छातीनें सर्व देशाचा धिःकार केला. ज्या लोकांना अन्सार म्हणतात ते हे लोक, या त्यांच्या कृतीवरून असें स्पष्ट दिसतें कीं, अरबस्थानांत त्या काळीं जागृतीच्या काळाची वाट लोक मोठ्या उत्सुकतेनें पाहात असावेत. सामाजिक परिस्थिती व धार्मिक चालीरीती यांचा मनाला पुरा पुरा कंटाळा आल्याशिवाय या दोहोंमध्यें फेरबदल होणें कधींहि शक्य नाहीं. मदिना शहरांत हीं दोन्हीं बंधनें ढिलीं व त्रासदायक झालीं असावीत आणि म्हणून इस्लाम धर्माला त्या ठिकाणीं आपली मुहुर्तमेढ ठोकण्यास योग्य संधी मिळाली. अन्सार लोकांना इस्लाम धर्माला आश्रय दिला म्हणून यापुढें आपल्याला भयंकर नुकसान सोसावें लागेल हें त्यांनीं जाणून ठेविलें होतें; परंतु कांहीं नुकसान होवो, कितीहि हालअपेष्टा होवोत, याचा परिणाम राजकीयदृष्ट्या कितीहि विकोपास जावो, तें सर्व हे लोक स्वसंतोषानें सोसण्यास तयार झाले ! एक वेळ नवीन धर्म किंवा सामाजिक समजुती दृढ झाल्या, मग पुढें त्याचा अभिमान लोकांत असणें हें सृष्टीक्रमाला अनुसरून आहे. परंतु मदिना शहरांत हजरत पैगंबरनें पाऊल टाकतांच तेथें पहिल्या दिवसापासून त्यांचा व त्यांच्या धर्माचा जो गौरव झाला, त्याच्याबद्दल जो अभिमान लोकांमध्यें पसरला, जो स्वार्थत्याग त्यांनीं केला, याचा जर विचार करून पाहिला, तर धर्म-तत्वांपेक्षां हजरत पैगंबराच्या व्यक्तीतच अशी कांहीं तरी अजब शक्ति, प्रभाव, किंवा दैविक सामर्थ्य असल्याशिवाय असें घडणें शक्य नाहीं. मक्केतील लोकांवर याच शक्तीचा कां उपयोग होऊं नये, हा याच्याच बरोबर दुसरा प्रश्न उद्भवतो; याचें कारण हेंच असावें कीं, हा एक नैसर्गिक चमत्कार आहे; ज्या ठिकाणीं भाऊबंदकी असते अशा ठिकाणीं मनुष्याला वर येण्याला फार प्रयास पडतात. ज्या गांवांत आपण ल्हानाचे मोठे होतों त्याच गांवांत लौकिक, मानमतराब मिळ-

ण्यास जितका त्रास पडतो तितका परमुलखांत पडत नाहीं. अशा ठिकाणीं सद्गुणी मनुष्याच्या गुणाचा प्रकाश पडणें महामुस्किलीचे असतें, असा अनुभव या काळींहि सर्वत्रांना येत असतो.

## ३ पहिली मशिद.

खुदाच्या नांवाचा महिमा सर्वत्र पसरून त्याच्या नांवानें स्थापन झालेल्या इस्लाम धर्माचा जिकडे तिकडे प्रसार व्हावा या सद्हेतूकडे हजरत पैगंबरचें सर्व लक्ष लागून राहिलें होतें. मदिना शहरांत त्यांची सद्गुरु म्हणून कीर्ति पसरली होती. त्यांचा मानमरातब, लौकिक वाढला होता; तथापि हजरत आपल्या जन्माचा मूळ हेतु विसरले नाहींत. इस्लाम धर्माची रूपरेषा आंखतांना पैगंबरनें त्याचें अवडंबर न करतां तें जितकें साधे, सुलभ व सरळ करतां आले तितके त्यानें केले. ईश्वर सर्वत्र भरलेला आहे, त्याची भक्ति कोठेंहि करावी, रस्ता, घर, जंगल, वाळूचें मैदान अथवा डोंगर, कोणतेंहि स्थळ असो, तें अनंत प्रभूला प्रिय आहे. तरीसुद्धां सर्व लोकांकरितां एकादें सार्वजनिक स्थळ असेल तर नमाज पडण्याच्या कार्यांत त्या स्थळाचा उपयोग गरिबापासून तों श्रीमंतापर्यंत सर्व लोकांना होईल, या विचारानें हजरतनें मदिना शहरांत एक मशिद बांधण्याचा निश्चय केला. ज्या ठिकाणीं हजरतच्या उंटानें आपले गुडघे टेकले होते, ती सर्व जागा दोन भावांची होती. हजरतनें त्यांच्याजवळ मशिदीकरितां त्या जागेचें मागणें केलें. हजरतच्या शब्दाला मान देण्यासाठीं ती जमीन ते दोघे कांहींएक मोबदला न घेतां देण्यास तयार झाले, परंतु त्यांची गरिबी पाहून हजरत तसें करण्यास कबूल झाले नाहींत; त्यानें त्यांना जमिनीची किंमत देऊन त्यांच्यापासून ती विकत घेतली. अन्सार आणि महजविन एकत्र होऊन त्यांनीं मशिद बांधण्याचें काम सुरू केलें. मशिदीच्या कामासाठीं लहान मोठ्या, गरिब व श्रीमंत अशा सर्व लोकांनीं हजरत पैगंबराचें अनुकरण

केलें होतें. कारण ते स्वतः मजूराप्रमाणें आपल्या मानापमानाकडे न पाहातां राबत होते. मशिदीच्या चार भिंती विटांच्या केलेल्या होत्या-ताडाच्या झाडांचे खांब व बहालें केलीं होतीं आणि मशिदीच्या छपरावर ताडाचीं पानें घातलीं होतीं. तिला तीन खिडक्या व एक दरवाजा होता. मशिदीचें काम पुरें झाल्यावर हजरत दयावंत प्रभूची थोरवी, त्याचें अगाध चातुर्य व त्याची अपरंपार दया लोकांना समजावून देऊन नमाज पडण्यास सांगत. नमाज पढून झाल्यावर अनाथ विधवा, निराश्रित बालबच्चे, अन्नार्थी, त्यांच्यावर दया करण्याचा उपदेश करीत. मशिदीमध्यें एक भाग हजरतसाठीं आपले घरदार सोडून जे मुसलमान लोक मदिना शहरीं येऊन राहिले होते त्यांना रहाण्याकरितां राखून ठेविला होता. मशिदीच्या दुसऱ्या एका भागाला जोडून हजरतनें आपल्या स्वतःकरितां रहाण्याची सोय केली होती. मशिदीमध्यें येणाऱ्या लोकांना पैगंबरची भेट अडचण न पडतां तत्क्षणी होऊं लागली, यामुळें हजरत व बाहेरच्या लोकांचा विशेष परिचय होऊन त्यांच्यामधील प्रेम-वृद्धीला अनुकूल साधन अनायासें प्राप्त झालें.

एके दिवशीं हजरतनें सर्व लोकांना मशिदीमध्यें जमविलें, आणि त्यांना म्हणाले, "सद्गृहस्थ हो, या दुनियेच्या रचनेचा विचार करा. ज्याप्रमाणें एकादा गुराखी आपल्या गुरांना संध्याकाळीं सोडून आपण एकटाच निघून जातो, त्या प्रमाणें तुह्मांला एके दिवशीं या दुनियेला सोडून जावें लागेल. त्यावेळीं तुमच्या बरोबर कोणीहि येणार नाहीं. या जन्मांत तुह्मीं केलेलीं जीं बरीवाईट कृत्यें तींच तुमच्या बरोबर येतील. त्या सर्वांचा हिशोब परमेश्वराजवळ तुम्हांला द्यावा लागेल. तुमचीं दुष्कृत्यें पाहून तो तुह्मांला जाब विचारील. तो तुह्मांला ह्मणेल, "योग्य मार्ग दाखविण्या-करितां तुमच्यासाठीं मी पैगंबर पाठविला नव्हता काय? माझ्या आज्ञा तुह्मांला त्यानें जाहीर केल्या नव्हत्या काय? मनुष्यमात्रांना ऐहिक सुख मिळावें ह्मणून सृष्टींत सर्व सुखाचीं साधनें निर्माण केलेलीं नाहींत

काय? या सर्व उपकाराची फेड तुह्मी कशी केलीत? तुह्मीं आपल्या-बरोबर कोणकोणतीं व कितीं सत्कृत्यें आणलीं आहांत? पाप व पुण्य यांच्या संग्रहाप्रमाणें शिक्षा किंवा बक्षीस तो सर्वशक्तिमान प्रभू तुह्मांला देईल. परमेश्वराच्या नांवानें एका खजुरीच्या आठीचें केलेलें दान तुम्हांला सद्गति देईल. एवढया क्षुल्लक दानाची ऐपत ज्याच्या आंगांत नसेल त्यांच्या जवळ परमेश्वरानीं दिलेली गोड वाणी तर आहेना? एका-द्याला योग्य सल्लामसलत देण्यांत जर त्यानें आपल्या गोड वाणीचा उप-योग केला तरीसुद्धां त्याच्यावर परमेश्वर प्रसन्न होईल. तुम्हां नीतीनें वागत जा. नीतिनें वागाल तर तुम्हांला ऐहिक व पारमार्थिक सुख मिळेल."

मशिदीमध्यें नमाज पडण्याकरितां जमलेल्या लोकांना तेथील साधेपणा पाहून सत्याला डामडौल किंवा ऐश्वर्य यांची जरूरि नाहीं, याची साक्ष पटत गेली. अंतरयामीं सतत वास करणारे सत्य सुद्धां याच प्रकारचें आहे. त्याचा प्रकाश बाहेर पडण्याला मानवी कौशल्याची गरज नाहीं. बाह्य देखाव्यानें अंतरात्म्याचें स्वरूप कितीहि रंगविण्याचा प्रयत्न केला तरि सत्य हें मूलस्वरूपांतच रहातें, हें तत्व त्या लोकांना मशिदी मधील साधेपणावरून उत्पन्न झालेल्या गंभीरपणानें पूर्ण पटवून दिलें. सत्याचा दिव्य प्रकाश दिसण्यासाठीं हांड्या झुंबराची, रोषजाईची किंवा भपके-बाज थाटाची यत्किंचित् सुद्धां गरज नाहीं. अंतरयामीच्या ज्ञानदीपाच्या प्रकाशांत सत्य दृष्टीगोचर होतें, हें तत्व हजरत पैगंबरच्या पूर्ण अनुभ-वास आलेलें असावें असें त्यांच्या या कृतीवरून स्पष्ट दिसतें. ओंबड-धोंबड दगड, चिखल व माती यांनीं तयार केलेल्या कशातरी भिंती, त्यावर शरीर संरक्षणपुरतें मिकार छपर इत्यादि त्या मशिदीचा देखावा पाहून यांत ईश्वरी ऐश्वर्य, कसें असूं शकेल अशी जर पैगंबर साहेबांना शंका आली असती तर त्यांनीं मशिदीच्या नैसर्गिक साधेप-णाला तुच्छ मानून त्याच इमारतीला कौशल्यानें व राजऐश्वर्यानें जगाला थक करून टाकण्यास खरे मनोहरस्वरूप दिलें असतें. परंतु ईश्वराच्या भक्ति

साठीं या दिमाखाचे कारण नाहीं अशी त्यांची ठाम समजूत झाली होती. मशिदीला उंच उंच मनोरे किंवा घुमटही बांधलेले नव्हते. ह्या काळच्या साध्या भोळ्या लोकांना या मशिदीप्रमाणें असंख्य मशिदी पृथ्वीवर बांधल्या जाऊन त्यांत आज या साध्या मशिदींत निघत असलेल्या पैगंबराच्या तोंडच्या आवाजाचा प्रतिध्वनी उमटत राहील याची कल्पना तरी आली असेल का ? सांप्रतच्या काळांत बांधल्या जाणाऱ्या मशिदीकडे पाहा. ते उंच उंच मनोरे, भव्य घुमट, मनोहर चकचकीत भिंती, स्पटिकाची जमीन, आणि हांड्या, झुंबरे, विजेच्या रोषनाईचा चकभूल करून टाकणारा लखलखाट ! पैगंबर साहेबांच्या पश्चात् मशिदींचे साधें स्वरूप जाऊन त्या ठिकाणीं हे सध्याचे डामडौलाचें स्वरूप आलें आहे ! मात्र मशिदीला चित्रविचित्र रंग दिलेले नसतात; त्यांत चित्रें, मूर्ति, वगैरे कांहींएक असत नाहींत. कारण अशा प्रकारानीं मशिदीला शोभा आणण्याची सक्त मनाई पैगंबरनें स्वतः केली होती.

मशिदीमध्यें प्रथम लांकडे पेटवून त्याचा प्रकाश करीत असत, परंतु त्याचा प्रकाश पुरेसा होत नसे. म्हणून मातीच्या एका भांड्यांत तेलवात घालून त्याचा प्रकाश करूं लागले. या वेळीं हजरत मशिदीमध्यें जमिनीवर उभें राहून लोकांना उपदेश करण्याचें काम करीत असत. त्यांची मधुर वाणी श्रोत्यांची अंतःकरणें हालवून सोडित असत. सामान्य लोकांच्या बरोबर त्यांच्याच जागेवर उभे राहणें उपदेश करण्याच्या वेळीं सोईचे असे दिसेना, म्हणून मशिदीमध्यें एक उंच असे पीठ बांधून त्यावर उभे रहाणें अधिक सोईचें होईल, असें वाटल्यावरून तेथें एक पीठ तयार करण्यांत आलें. हजरत त्यावर पुढें उभे राहून आपल्या उपदेशाचा धडा लोकांना देऊं लागले. प्रेमळ भक्त त्यांच्या उपदेशामृताचे घुटके इतक्या विश्वासानें घेत कीं ह्या वेळीं त्यांना कशाचेंही भान रहात नसे. सच्चिदानंद प्रभूचें दिव्य स्वरूप त्या वेळीं हजरतच्या उपदेशाशीं तन्मय झालेल्या त्यांच्या वृत्तीला सर्वत्र दिसे. विश्वासाची

पूर्णता आनंदांत होते, त्याप्रमाणें हजरतवर टाकलेल्या पूर्ण विश्वासामुळें त्या लोकांना आनंदीआनंद होई.

इस्लाम धर्माचा आस्ते आस्ते जसा फैलाव होऊं लागला तसा व्यवहारांत व खाजगी वर्तणुकींत नीतिचाहि फैलाव होऊं लागला. हजरतनें आपल्या विश्वासु अनुयायांना नीतीचें शिक्षण दिलें. त्यानें त्यांना घालून दिलेले धडे सर्वमान्य होण्याकरितां राजकीय व सामाजिक परिस्थितीचा योग्य विचार करून कोणकोणती बंधनें आज साफ तोडून टाकिलीं असतां समाजांत विस्कळीतपणा न येतां किंवा त्यांत असंतोष न पसरता आपलें कार्य सिद्धिस जाईल याचा खोल विचार त्यानें केला होता. स्वैर वृत्तीनें जाणाऱ्या समाजाला एका मार्गाला वळविणें हें चोहोंबाजूला सैरावैरा पळ काढणाऱ्या शिपायांना एका निशाणाखालीं आणणाऱ्या कुशल सेनापतीच्या चातुर्याप्रमाणें आहे. या कामांत धार्मिक पुढाऱ्याची जर का दिशाभूल झाली तर सेनापतीच्या भुलचुकीची दुरुस्ती जशी परत करता येते तशी ती परत होणें कधींही त्याला शक्य नाहीं. धार्मिक पुढाऱ्याच्या पाउलावर पाउल टाकून विश्वासानें जाणाऱ्या समाजांत जर एक वेळ फाटाफूट झाली, तो जर विस्कळीत झाला किंवा त्यांच्यामध्यें अविश्वास उत्पन्न झाला, तर त्या समाजाची परत घडी न बसतां, तो उन्नतीच्या मार्गाला न लागतां ह्याच्या उलट दिशेला मात्र वळतो. यासाठीं धर्मांचा आधारस्थंभ मोठा मजबूत असावा लागतो. त्यांचीं धर्मतत्वें डळमळीत आधारावर उभारलेलीं असतां कामा नयेत, व तशीं तीं जर असतील तर तो त्यांचा पाया डळमळूं लागल्याबरोबर सर्वच इमारत कोसळून जमीनदोस्त झाल्याशिवाय रहात नाहीं. जगांत पैगंबर म्हणून जे इतिहासांत आज प्रसिद्ध आहेत, त्यांच्या चरित्रावरून त्यांच्या ठिकाणीं केवढा आत्मविश्वास, केवढा स्वार्थत्याग, केवढी धर्माकरितां जिवाची तळमळ, लोककल्याणाची केवढी कळकळ, केवढा कृतनिश्चय दिसून येतो ! अफाट समुद्रांवर प्रचंड तुफानांत सांपडून वर

खालीं हेलकावे खाणाऱ्या गलबताप्रमाणें या वेळीं इस्लाम धर्माची स्थिती होती, परंतु त्या गलबताचा नावाडी पक्का दर्यावर्दी, त्यानें त्या गलबताचें सुकाणू स्वतः हातांत धरून क्षुब्ध झालेल्या पंचमहाभूतांचा धिःकार करून आपलें गलबत सुखरूपपणें सुस्थळीं नेलें. ही अलौकिक कामगिरी दैविक सामर्थ्याची जोड मिळाल्याशिवाय सिद्धिस जाणें शक्य आहे काय ?

हजरत पैगंबरच्या हुकुमाप्रमाणें त्यांचे अनुयायी गोरगरीबांना सहाय्य करणें, गुलामगिरीचा धंदा आस्ते आस्ते कमी करणें, मद्यांचा निषेध करणें, स्त्रियांची स्थिती सुधारणें, आणि देशांत सदाचार वृद्धिं-गत करणें, इत्यादि प्रकारच्या उद्योगास लागले.

पैगंबर साहेबांच्या नेतृत्वाखालीं, सैरावैरा, स्वेच्छेनें जाणाऱ्या समा-जांतील व्यक्तींना, नैतिक संबंधानें एकत्र जमविले आणि त्यांच्यांत बंधुप्रेमाचें बी रुजत घालून त्याची वाढ केली. याच शिक्षणाचा उप-योग त्यांच्यांत संघशक्ति निर्माण करण्यांत फार झाला. हजरत पैगंबरनें यावेळीं आपल्या ध्येयाच्या मार्गाचा नकाशा किती खोल विचारानें आंखला असला पाहिजे, याची कल्पना त्यांच्या पुढील कार्यावरून कळून येईल. पैगंबरने हातांत घेतलेलें कार्य फार बिकट होतें. अशा प्रकारचें कार्य केवळ ज्ञानभांडार किंवा विशालबुद्धी सिद्धिस नेऊ शकतात असें होत नाहीं. ज्या धर्मप्रवर्तकाच्या अंतःकरणांत दैविक शक्तीचें दिव्य तेज झळकत असतें अशाच विभूतींच्या हातून अशीं अलौकिक कृत्यें जगांत घडत असतात यांत संशय नाहीं.

## ४ बिबी आयेशा.

बिबी आयेशा अबुबक्रची मुलगी होय. हिचें सौंदर्य अप्रतिम होतें, व ती स्वभावानें फार आनंदी असे. अबुबक्रचें प्रेम बिबी आयेशावर तिच्या लहानपणापासून फार होतें, त्यांतून ती ज्या मानानें लहानाची

मोठी होत गेली त्या मानानें बापाचें प्रेमहि वाढत गेलें. लहानपणच्या तिच्या खेळाडु व आनंदी वृत्तीचें कौतुक तिचा बापच केवळ नव्हे तर प्रत्येक जण करी. अबुबक्र व हजरत पैगंबर यांच्यामध्यें अकृत्रिम स्नेह-संबंध होता. तो संबंध असाच दोघांच्या हयातीपर्यंतच केवळ न राहातां, तो वंशपरंपरा राहावा म्हणून आयेशाचें लग्न हजरत बरोबर झालें व त्या दोघांच्याहि शुद्ध स्नेहाला या शारीरिक संबंधानें अधिक शोभा आली. लग्नांत बिबि आयेशाचें वय त्या मानानें बरेंच लहान होतें, तथापि जसजसा काळ जात चालला, तसतशी तिच्या खेळाडु वृत्तीला नवीन वळन लागून पुढें ती इस्लाम धर्म दुसऱ्या स्त्रियांना शिकविण्यासारखी योग्य मार्गदर्शक झाली. तिच्या उल्हासी वृत्तिला गांभिर्य आलें, धार्मिक तत्वांच्या खोल विचारांनीं तिची बुद्धि विशाळ झाली. थोड्याच दिवसांत ती इतकी लोकप्रिय झाली कीं मुसलमान लोक तिला " उम्मुल-मोमेनीन " म्हणूं लागले. धर्मशास्त्रांत ती फार प्रवीण होती. हजरत पैगंबरच्या सहवासानें कुराणाचा अर्थ तिला उत्तम प्रकारें अवगत झाला होता. तिची स्मरणशक्ति आश्चर्यकारक होती. धर्माच्या बरोबर तिनें वैद्यशास्त्राचाहि अभ्यास केला होता. हजरत पैगंबरचें तिच्यावर अतिशय प्रेम असे. बिबी आयेशाशिवाय हजरतवर दुसऱ्या कोणत्याहि पत्नीचें वजन पडत नसे. यामुळें तिचा दर्जा जिकडे तिकडे चांगला वाढला व गांवांत तिच्या शब्दाला फार मान मिळत गेला. ती वयानें अठरा वर्षांची असतांना हजरत पैगंबर स्वर्गवासी झाले. पुढें ती आपल्या वयाचीं ६६ वर्षे होईतोंपर्यंत हयात होती व हि. स. ५८ (इ. स. ६७८) रमझान तारीख १७ रोजीं मदिना शहरीं स्वर्गवासी झाली.

हजरत पैगंबरनें स्वतःची किती लग्नें केली होतीं याची नक्की माहिती लागत नाहीं. हजरत ५० वर्षे वयाचे असतांना बिबी खादिजा हा लोक सोडून परलोकास गेली असें मागें आपण वाचलेंच आहे.

त्यानंतर त्यांनीं सर्व लग्नें एकामागून अशी केलीं. त्यांच्या सर्व स्त्रियांमध्यें बिबी आयेशा फक्त लग्नांत कुमारिका होती. बाकीच्या सर्व स्त्रिया पुनर्विवाहाच्या होत्या. पैगंबर साहेबांनीं एकापेक्षां अधिक लग्नें कां करावींत याचें पहिलें कारण असें दिसतें कीं, त्या काळीं अरबस्थानांत पुरुषाला अनेक पत्नि असण्याची चाल सर्वमान्य असल्यामुळें समाजांत आपला दर्जा कायम ठेवण्यासाठीं त्यांना समाजाबरोबर जावें लागलें असावें. याचें दुसरें कारण हें होतें कीं, सर्वांत वडील असलेल्या स्त्रीच्या मुलांशिवाय घरांत विधवा स्त्रियांना कोणीहि आश्रय देत नसत. यामुळें त्या अनाथ बिचाऱ्यांवर मोठा अनर्थ कोसळे. सासरचा आधार सुटतांच त्यांना जगांत आधार नाहीं असें होई. याच कारणामुळें अरबस्थानांत त्यावेळीं मुलगी जन्मास येतांच बाप तिला मारून टाकित असे. विधवा स्त्रियांची संख्या वाढत चालली आणि त्यांच्या हालअपेष्टांना सीमा नाहींशी झाली; तेव्हां हजरत पैगंबरनें त्यांना पुंनर्विवाह करून परत संसार करण्याची परवानगी दिली. हजरत मुहम्मदनें स्वतः अनाथ विधवाबरोबर लग्नें करून समाजांतील स्त्रियांच्या जीविताचें संरक्षण केलें; पुरुषाबरोबर त्यांच्या हक्काला कायद्याचें स्वरूप दिलें.

याशिवाय आणखीही एक तिसरें कारण आहे. हजरत पैगंबरला स्वधर्माचा प्रसार जितक्या मार्गानें होईल तितक्या मार्गानें करावयाचा होता. विधवा स्त्रियांबरोबर पुनर्विवाह केल्यामुळें एक तर इस्लाम धर्माचें शिक्षण घेऊन त्याचा फैलाव शहरांतील इतर स्त्रियामध्यें करण्यास त्या स्त्रियांचा फार चांगला उपयोग होई. चौथें कारण असें होतें कीं, हजरतला आपला संबंध जितका लांबपर्यंत पसरेल असें करणें फार जरूरीचें होतें. विधवा स्त्रिया ज्या कुटुंबांत पूर्वीं होत्या त्या कुटुंबांत अनेक प्रकारचीं भांडणें, तंटे, फार दिवस चाललीं होतीं. त्या कुटुंबांतील एका स्त्रीबरोबर हजरतनें लग्न केल्याकारणानें त्या कुटुंबाचा संबंध हजरत जवळ अनायासें येई; क्रमाक्रमानें त्यांच्या भानगडी कज्जे हजरतसमोर

येत आणि ते आपल्या निस्वार्थबुद्धिनें, परोपकाराच्या दृष्टीनें, आपल्या चातुर्यानें आणि न्यायानें त्यांच्या सर्व भानगडी मिटवून त्यांच्यामध्यें सलोखा उत्पन्न करीत. हजरतला प्रत्येक कुटुंबांत एकीचें तत्व ठाम करावयाचें होतें. त्यानंतर कुटुंबाकुटुंबांत प्रेम वाढवून विस्कळीत समाज मजबूत पायावर उभारावयाचा होता. अर्थात सर्व शहरावर आपली छाप, आपला अंमल चालविण्यासाठीं असे निरानिराळे समाज एकीच्या तत्वानें घट्ट बांधल्याशिवाय होणें शक्य नव्हतें, हें हजरतला पूर्ण अवगत होतें. आपला उद्देश सिद्धिस जावा ही त्यांच्या मनाला रात्रंदिवस तळमळ लागून राहिली होती. ह्याच उद्देशाला आपल्या नजरेसमोर ठेऊन हजरतचे जे अनेक मार्गानें प्रयत्न चालले होते त्या पैकींच हा एक होता.

वर लिहिलेल्या कारणावरून असें स्पष्ट होतें कीं हजरत पैगंबरला संसाराशिवाय या जगांत दुसरें महत्वाचें कार्य करावयाचें होतें. त्यांची सिद्धि हेंच त्यांचें अंतिम ध्येय होतें. संसारसुख हें जर त्यांचें ध्येय असतें, त्यांच्या जिवाची धडपड याच सुखाच्या प्राप्तीकरितां असती, तर मागें आपण त्यांची मक्केंतील जी दुर्दशा वाचली तशी त्यांनीं आपल्या हातानें करून घेतली नसती ! मक्केंतील कुरेश लोक, शहरचे पुढारी त्यांना मक्केचा राजा करण्यास तयार होते. संसारसुखाच्या मागें लागणाऱ्या मनुष्यानें समोर वाढून आलेलें पंचामृताचे ताट लाथेनें कधींहीं उडवून दिलें नसतें.

## ५ हजरत पैगंबरची धार्मिक बंधनें.

इस्लाम धर्मामध्यें प्रार्थना—नमाजला जितकें महत्व आहे तितकें महत्व दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत नाहीं. "नमाजवर ध्यान ठेवा, कारण नमाज पढल्यानें मनुष्य पापापासून विन्मुख होतो. परमेश्वराचा निजध्यास असणें हें मनुष्यमात्राचें आद्य कर्तव्य आहे," असें ह. मुहम्मद

म्हणत असत. प्रत्येक दिवशीं आपल्या अनुयायांनीं पांच वेळ नमाज पडावी असा कडकडीत नियम ह. पैगंबरनें घालून दिला होता; १ सूर्योदयाच्या पूर्वीं. २ सूर्य पश्चिम दिशेला वळतांना. ३ दोन प्रहरनंतर. ४ सूर्यास्तानतर. ५ मध्यरात्रीं प्रत्येक मुसलमानाला दररोज. नमाज पडण्याकरितां या पांच ठरावीक वेळा नेमून दिलेल्या आहेत. ह. पैगंबर आणखी दुसऱ्याहि वेळीं नमाज पडत असत, आणि त्यांचे पुष्कळ अनुयायी त्यांचें अनुकरण करीत. कारण कुराणांत असेंहि सांगितलेलें आहे, " तुम्ही सकाळीं ज्यावेळीं निजून उठाल, रात्रीं केव्हांहि, आणि पाहाटेस आकाशांतील तारे अस्तास जात चालले आहेत अशा वेळीं, त्या सर्वशक्तिमान प्रभूला अनन्य भावानें शरण जा."

वर सांगितलेल्या नमाज पडण्याच्या योग्य वेळीं मशिदींमध्यें लोकांनीं जमावें कसें याचा मोठा विचार पडला. नमाज पडण्याची वेळ झाली असें लोकांना सुचविण्याचा कोणताच मार्ग पसंत होईना. त्याकाळीं यहुदी लोक आपल्या धर्मांतील लोकांना ही सुचना मोठी तुतारी वाजवून देत असत. ख्रिश्चन लोकांना ही सुचना धर्मोपदेशक लोखंडाच्या मोठ्या पऱ्यावर काठ्या वाजवून देत असत. परंतु हे दोन्हीं उपाय मुसलमान लोकांनीं नापसंत केले. काय योजना करावी, याविषयीं, पुष्कळ वादविवाद होऊन. शेवटीं एका मनुष्यानें उंच अशा ठिकाणीं उभें राहून लोकांना ऐकूं जाईल अशा रीतीनें खुल्या आवाजानें " नमाज पडण्याची वेळ झाली चला, " असें अरबी भाषेंत सांगितलें असतां ही अडचण दूर होईल असें ठरलें. या कामावर सर्वांनुमते बिलाल लायक म्हणून ठरला, हें मागें आपण वाचलेच आहे. मशिदीच्या नाजिक एक उंच घर होतें त्या घराच्या छप्परावर उभे राहून बिलाल खालील शब्द माठ्यानें म्हणत असे.

" परमेश्वर मोठा आहे, त्याच्याशिवाय दुसरा देव नाहीं. मुहम्मद ईश्वराचा पैगंबर आहे. प्रार्थनेला चला, मुक्तिकडे चला, परमेश्वर मोठा

आहे, त्याच्याशिवाय दुसरा देव नाहीं." सकाळच्या नमाजच्या वेळीं याच शब्दांत आणखी एक वाक्य असे. "निद्रेपेक्षां नमाज अधिक हितकर आहे."

प्रत्येक मशिदीला जोडून बाग पुरण्याकरितां उंच एक मनोरा बांधलेला असतो. असें सांगतात कीं अलेक्झाड्रिया मधील त्या काळच्या दीपगृहाची हे मनोरे हुबेहुब नक्कल आहेत. मनोऱ्याच्या बाहेरच्या बाजूला चारही दिशांना मोकळी अशी एक गॅलरी असते. या गॅलरीमध्यें बांग पुकारणाऱ्या मनुष्याला जाता यावें म्हणून मनोऱ्याच्या आंत एक जिना केलेला असतो. उंच गॅलेरीमध्यें बांग पुकारणारा मनुष्य नमाज पडण्याची वेळ झाली असें लोकांना ओरडून सांगतो. हल्लींहि बिलालचे त्या वेळचे शब्द बांगी उच्चारीत असतो. त्यांचे घाई करतां उच्चारलेले शब्द शांत पाहाटेच्या वेळीं सभोवारच्या लोकांना ऐकू जातात आणि ते मशिदीमध्यें नमाज पढण्यासाठीं जमतात.

इस्लाम धर्माप्रमाणें जरी मशिदीमध्यें नमाज पडणें हें एक अत्यंत महत्वाचें कर्तव्य मानलेलें आहे तथापि व्यवहारी मनुष्याला वेळीं मशिदीमध्यें जावयास मिळत नाहीं. अशा मनुष्यानें कोणत्याहि स्थळी नमाज पडण्यास धर्मशास्त्रानें मुभा दिली आहे. याच कारणानें एकादा मुसलमान रस्त्यांत, मैदानांत, रेलवे स्टेशनमध्यें अथवा तो नमाज पडण्याच्या वेळीं जेथें असेल, त्या ठिकाणीं भक्तिपूर्वक नमाज पडतांना दृष्टीस पडतो.

## ६ मुसलमानांची स्थिति.

मुहजरिन लोक मक्का सोडून मादिना शहरीं येऊन राहिले खरे, परंतु या शहरांत त्यांच्या उद्योग धंद्याची कांहींच व्यवस्था नसल्यामुळें ते खाण्यापिण्याच्या मोठ्या विचारांत पडले. दुर्दैव त्या बिचाऱ्यांच्या अगदीं हात धुऊन पाठीस लागलें होतें. त्यांचा निर्वाहाचा सर्व धंदा,

घरदार वगैरे, आणि जे जें म्हणून त्यांच्या संग्रहीं होतें तें सर्व मक्केमध्यें टाकून त्यांनीं मदिना शहरचा रस्ता धरिला; येथें आल्यावर त्यांच्या सभोंवार सर्वच नवीन होते. लोक नवीन, रहाणें नवीन, हवा पाणी नवीन. अर्थात् त्यांना खाण्यापिण्याची सोई या नवीन जगांत करून घेण्याला त्यांना प्रथम फार क्लेश सोसावे लागले. ज्या अबुबक्रच्या घरीं आले गेले जेवून तृप्त होऊन जात होते, गोरगरिबांना सहाय्य करण्याला ज्याचा कधींहि हात मागें सरला नाहीं, दुःखिताच्या दुःखाच्या हांकेला हांक देण्याला ज्याचें अंतःकरण कधींहि हाटलें नाहीं, गरिबांवर पडलेले कुरेश लोकांच्या राक्षसी अत्याचारांचे घांव ज्यानें स्वतः आपल्या शरीरावर सोसले, त्या निर्मळ व प्रेमळ, उदार व दयावंत ह. अबुबक्रसारख्या श्रीमान मनुष्याला स्वतःच्या पोटाची विवंचना पडावी ही सुद्धां परमेश्वरी अगम्य लीलेपैकीं एक आश्चर्यकारक लीलाच होय ! ईश्वराचा हेतु अशा घडामोडीत काय असतो, तो आपणांस कळत नाहीं व वेळीं त्याला आपण दोषहि देण्याला मागें पुढें पहात नाहीं. परंतु तो जे करतो तें सर्व मनुष्य मात्राच्या कल्याणाकरितांच असते असा दृढविश्वास ज्यांचा त्याच्यावर आहे त्यांना अशी कितीहि संकटें आलीं, कितीहि शारिरीक क्लेश सोसावे लागले, मानापमानाच्या चिंध्या उडून गेल्या, तरीसुद्धां त्यांच्या शांत अंःतकरणांत यत्किंचितहि अस्वस्थता उत्पन्न होत नाहीं.

ह. अबुबक्रनें आपल्या पोटाचा भार कोणाहि दुसऱ्या मनुष्यावर टाकला नाहीं. तो कापड घेऊन बाजारांत जाई, तेथें तें विकून आणलेल्या मालाचे पैसे चुकवून जें वर मिळे त्यांत तो आपला निर्वाह करी.

पैगंबर साहेबाचा जांवई ह. उस्मान डोक्यावर फळांनीं भरलेली पाटी घेऊन बाजारांत विकावयास जाई आणि ती फळें विकून त्याला जें मिळे त्यावर तो आपल्या कुटुंबाचा निर्वाह करी. पैगंबरच्या स्नेह्यांची व

त्यांच्या अगदीं नजिकच्या नातेवाईकांची जर तेथें अशी विपन्नावस्था होती, तर गोरगरीब मुसलमानांची कशी असेल, याची कल्पना करणें फारसें कठीण नाहीं. त्यांना खाण्यापिण्याची किंमत शरीर रक्षण करण्यापलीकडे यत्किंचितही नव्हती. गांवांत मोलमजुरी करण्यालाही ते मागेंपुढें पाहात नसत. योग्य मार्गानें धंदारोजगार करून त्यांत जे मिळे त्यावर ते संतुष्ट असत. अन्सार लोकांनीं मात्र आपल्या भुकेबंगाल लोकांकरितां शक्य त्या मार्गानें मदत करण्याचा निश्चय केला होता. प्रथम हजरत पैगंबरलाहि निर्वाहाचे कांहींच साधन नव्हतें, म्हणून तयार झालेले अन्न ताटांत भरून तें त्यांच्याकडे पाठवीत. पैगंबर आलेल्या अन्नाचा आनंदानें स्वीकार करीत व मशीदीमध्यें निराधार पडून राहिलेल्या गरीब मुसलमान बंधूंना त्यांतील थोडें फार देऊन झाल्यावर जें शिल्लक उरे त्यावर आपली भूक भागवीत.

या गरीब लोकांना फक्त आपल्या पोटापाण्याची काळजी होती असं नव्हे. या विवंचनेबरोबर मदीना शहरच्या हवापाण्याचा मोठा बिकट प्रश्न त्यांना येऊन पडला होता. तेथील नव्या हवापाण्याचा परिणाम त्यांच्यावर वाईट झाला; आणि ते तापानें आजारी पडूं लागले. मक्केंतील उष्ण, रखरखीत हवेंत जे लहानाचे मोठे झाले, त्यांना सपाटीवर असलेल्या मदीना शहरांवरील पुर्वेकडून येणाऱ्या वाऱ्याची तीव्रता व तेथें वारंवार उत्पन्न होणारी वादळें असह्य भासूं लागलीं. तेथें सहा महिनें पावसाळा सुरू असतो; व त्यामुळें शहराच्या बाहेरील आसपासचा प्रदेश जिकडे तिकडे पाण्यानें तुडूंब भरून गेलेला असतो. जसा तेथें पावसाळा मर्यादेच्या बाहेर असतो, त्याच प्रमाणें तेथें थंडीहि असते. मक्केमध्यें जसा उन्हाळा असह्य भासतो त्याचप्रमाणें मदीनाशहरांत थंडी असते. हवामानाच्या या दोन दक्षिणोत्तर अतिरेकामुळें पैगंबर आपल्या अनुयायांना सांगत, "मक्केंतील झळझळीत ज्वाळा आणि मदीना येथील गारठून टाकणारी थंडी ज्यानें सहन केली, तो स्वर्गीं मिळणाऱ्या बक्षी-

साला पात्र झाला." मुहजरिन लोकांच्या सहनशीलतेच्या कसोटीची खरोखर ही वेळ होती. एका बाजूला अन्नपाण्याचे अकरूण स्वरूप तर दुसऱ्या बाजूला हवापाण्याची क्रुद्धमुद्रा, मागें शत्रूंच्या लखलखीत तरवारीशीं प्रसंग, तर पुढें अरबस्थानांतील भयाण अक्राळविक्राळ स्वरूपाचे वाळूचें मैदान. नाहीं कोठें सत्तेचे घरदार, नाहीं कोणी जिव्हाळ्याचा सोयरा धायरा. ज्याच्या शद्बावर भरंवसा ठेऊन ते घरांतून बाहेर पडले, ज्याच्या आधारावर त्यांनीं ऐहिक सुखावर पाणी सोडलें त्याची तरि काय? परावलंबी स्थिति. अन्सार लोकांनीं आणून दिले तर पैगंबरचा दिवस जाणार!

मदीना शहरांत एकदां तापाची इतकी भयंकर सांथ पसरली कीं, माशिदीमध्यें एकट्या हजरत पैंगबरला नमाज पडण्याच्या वेळीं उभे रहाण्याची पाळी आली. त्यांच्या अनुयायांच्या दृढभावनेंत अशावेळीं काडीभर सुद्धां ढिलेपणा दिसून आला नाहीं. सद्गुणांची हत्यारें सतेज पाणीदार असतील, तर दुर्गुणांचा संहार होईल; परंतु त्यांना विपत्तीच्या शीलेवर घांसावी लागतात, असें जें सांगतात त्याची सत्यता अशा इतिहासावरून अनुभवास येते. हजरत त्या लोकांना तेथून दुसऱ्या गांवीं जाण्यास सांगत; जेणेंकरून जिवाचा बचाव होईल असा कोणताहि मार्ग पसंत करण्यास सल्ला देत; तथापि ज्यांत पैंगबरची ताटातूट होते असा कोणताहि सुखाचा मार्ग त्यांना पसंत वाटला नाहीं. ज्या दिवशीं पैंगबरची भेट नाहीं, तो दिवस व्यर्थ; जेथें पैंगबर हजर नाहीं तें ठिकाण शून्य; ज्या भाषणांत पैंगबरच्या तोंडचा आवाज नाहीं, तें भाषण विरस अशी त्यांची पैगंबरवर शुद्ध भक्ति असतांना ते अशा आपत्तीला कंटाळून कां जावेत! दृढ विश्वासाच्या आधारावर ते पैंगबरच्या मशीदींत अन्न पाणी मिळो अगर न मिळो, शरीरिक भोगतृत्व आहे तें भोगलेंच पाहिजे अशा विचारानें पडून राहिले.

## ७ औदार्याचें महत्व,

प्रत्येक शुक्रवारी मशिदीमध्यें सार्वजनिक नमाज पडण्यांत येत असे; आणि पैंगबरच्या मुखानें उच्चारली जाणारी प्रार्थना ऐकण्याकरितां तेथें लोकांची गर्दीहि बरीच होत असे. निरनिराळ्या पंथाचे लोक, निरनिराळ्या जातींचे लोक, ताडाच्या पानानीं आच्छादलेल्या आणि विटा व मातीनीं ओबडधोबड बांधलेल्या मशिदीमध्यें जमत असत; कारण धर्माच्या बाबतींत अन्सार व मुहजरिन या उभयतांनीं भेदभाव म्हणून बाळगला नव्हता; या लोकांच्या शिवाय ज्याच्या नवीन धर्मानें गांवांत एवढी खळबळ करून सोडली, त्याच्या तोंडचे चार शद्ब आपल्याहि कांनीं पडावेत अशा उद्देशानें तेथें कांहीं जिज्ञासु यहुदी सुद्धां येत. व्यापाराकरीतां तेथें आलेले अबिसिनियामधील लोक, इराण, इराक, अरब-स्थानांत वसाहत करून राहिलले खिस्ती लोक, सिरिया देशाहून आणि पालेस्टाइनहून आलेले मुशाफर, प्रवाशी शुक्रवारच्या नमाज पडण्याच्या वेळीं मशीद भरगच्च भरून टाकीत असत. "अल्ला हो अकबर"–प्रभू सर्व शक्तिमान आहे,–त्याच्याशिवाय जगांत दुसरादेव नाहीं, नमाज पडण्याला चला आणि मुक्त व्हा." असे बिलालच्या तोंडून मोठ्या सुरानें बाहेर पडलेले शद्ब उंच छप्परावर उभे राहून त्या प्रशांत पहाटेच्या वेळीं व दोन प्रहरीं नमाज पडण्याच्या वेळीं लोकांच्या कानांवर येत. जेव्हां सर्व लोक मशिदींत हजर होत तेव्हां, स्वतः हज-रत पैगंबर जमलेल्या लोकांना सलाम करीत मशिदींत दाखल होत. नमाज सुरु होई; त्या वेळीं सर्वांच्या पुढें पैगंबर मक्केकडे तोंड करून उभे रहात; त्यांच्या मागें त्यांचे सर्व अनुयायी रांगे रांगेनें उभे राहून नमाज पडत; गुडघे टेकीत; जमिनीला मस्तक टेकीत व हजरत पैगंबरचे अनुकरण मोठ्या काळजीपूर्वक भक्तिभावानें करीत.

जोंपर्यंत हजरत करितां पीठ तयार केलेलें नव्हतें तोंपर्यंत ते लोकांना उपदेश करण्याकरितां एका खांबाला टेकून उभे रहात; त्या वेळीं त्यांच्या

प्रत्यक्ष तोंडून जो उपदेश लोकांनीं ऐकला होता, तो जशाच्या तसाच पुष्कळ काळपर्यंत बापाच्या तोंडून मुलाला, याप्रमाणें चालत आला; त्या पैकीं "औदार्य," या विषयावर एक आहे त्यांत खालील दृष्टांत दिलेला आहे.

" सृष्टी कर्त्यानें जेव्हां पृथ्वी तयार केली त्या वेळीं तिला स्थीरपणा येण्यासाठीं तिच्या पाठीवर जड पर्वतांचे ओझें त्यानें ठेऊन दिलें. हें पाहून देवदूतांनीं त्याला प्रश्न केला, " हे देवा, पर्वतापेक्षांहि अधिक जड असें एकादें दुसरें कांहीं तुझ्या सृष्टींत आहे काय ?" प्रभूनें उत्तर दिलें, " होय आहे, पर्वताचा भेद लोखंड करतें, म्हणून लोखंड अधिक जड.

" परंतु लोखंडापेक्षां अधिक जड काय आहे."

" अग्नि, कारण अग्नि लोखंडाचा रस करून टाकते.

" तर मग, अग्निपेक्षां या सृष्टींत अधिक जड काय ?

" पाणी, पाण्यानें अग्नि शांत होतो.

" पाण्यापेक्षां जड काय "

" वायु, वायुपुढें पाण्याची मात्रा चालत नाहीं. वायुमुळें समुद्राला अस्थिरपणा येतो.

" ठीक, अशा वायुपेक्षां तुमच्या साम्राज्यांत अधीक श्रेष्ठ काय बरें आहे."

" दान धर्म करणारा सद्शील मनुष्य...."

" दानधर्म अथवा औदार्य," या व्याख्या हजरत पैगंबरच्या उपदेशाप्रमाणें फार व्यापक आहेत. सजीव प्राण्यासंबंधीं मनुष्यमात्राकडून होणारें कोणतेंहि सत्कृत्य, अंध पंगु यांच्यावर दया करणें, लोकांच्या जाणाऱ्या येणाऱ्या वाटेवरील दगड, धोंडे, कांटे बाजूला करून तो

मार्ग सुगम करणें, तहानेलेल्याला पाणी, अन्नार्थि याला अन्न देणें, इत्यादि गोष्टींचा समावेश या " औदार्य " शब्दांत होतो. मधूर भाषण करण्याचा उपदेश हजरत प्रत्येकाला वेळोवेळीं करीत. मुसलमान धर्मांत नवीनच शिरलेल्या एका मनुष्यानें " व्यवहारांत मी कसें वागावें," असा हजरत पैगंबरला एक वेळ प्रश्न केला; त्यावर उत्तर देतांना पैगंबर म्हणाले, " कोणाचीहि निंदा करूं नको. " त्या मनुष्यानें पैगंबरचा उपदेश चांगला ध्यानांत ठेविला व तेव्हांपासून त्यानें आपल्या गुलामालादेखील कठोर शब्दानें कधीं दुखविलें नाहीं.

पैगंबरच्या दयेचें क्षेत्र फार विस्तृत होतें; मनुष्यप्राण्यावर दया करण्यानें त्या क्षेत्राची मर्यादा संपते असें नाहीं; मनुष्यप्राणी जितका दयेला पात्र आहे तितके मुके प्राणीसुद्धां आहेत. कुराणांत स्पष्ट सांगितलें आहे का, " ज्या परमेश्वराचीं आपण लेंकरें आहोंत त्याचीच लेकरें इतर सर्व प्राणीहि आहेत ,' तेव्हां मनुष्यानें जिवंत प्राण्यावर दया करण्याचें कर्तव्यकर्म अव्याहत सारखें बजावीत गेलें पाहिजे. उंटावर त्यांच्या शक्तीच्या बाहेर ओझें लादण्यास पैगंबरची मनाई होती. ते सांगत, " जनावरांवर दया करा; तशी जर तुम्ही करण्यांस चुकलांत तर तुमच्यावर परमेश्वर कोपेल. "उंटांना ताकद असेल तोंपर्यंत त्यांना चालूं द्या, परंतु थकले भागलेले दिसतांच त्यांना विश्रांति घेऊं द्या.

एके दिवशीं एका मनुष्यानें रानांतून कांहीं जिवंत पक्ष्यांचीं पिलें पकडलीं व तीं घरीं आणिलीं. हीं धरून आणलेलीं पिलें पैगंबरच्या सहज दृष्टीस पडलीं. तेव्हां पैगंबरनें त्या मनुष्याला दया म्हणजे काय हें चांगलें समजून सांगितलें, आणि ज्या झाडावरील घरट्यांतून तीं पिलें आणलीं होतीं त्याच घरट्यांत परत नेऊन ठेवण्यास त्याला सांगितलें. ते म्हणाले, ' अरेरे, आपलीं पिलें घरट्यांत नाहींत असें पाहून त्यांच्या आईनें किती बरें टाहो फोडला असेल ! आईची ममता सर्व प्राण्यांत

सारखीच. "जनावरांची कींव करा" यावर बोलतांना एका बाईची त्यांनीं एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "एका बाईला भर उन्हामध्यें एका विहिरीच्या कांठावर तहानेनें व्याकुळ झालेला एक कुत्रा दिसला. त्या कुत्र्याची ती विव्हळ झालेली अवस्था पाहून त्या बाईच्या अंतःकरणाला द्रव आला. परंतु विहिरींतून पाणी काढण्याकारितां तिला कांहींच साधन दिसेना, तेव्हां तर तिला जास्तच वाईट वाटलें. शेवटीं तिला एक युक्ति सुचली, व त्या युक्तिचा कांहीं उपयोग झाला तर पाहावा म्हणून तिनें आपल्या पायांतील जोडा काढला, त्याला दोरीच्या ऐवजीं आपल्या अंगावरचे वस्त्र बांधिलें आणि तो जोडा पाण्यांत सोडला. त्यांत जें कांहीं थोडेंसें पाणी आंत राहिलें तेवढेंच प्रथम त्या कुत्र्याला पाजून तिनें पुन्हां तो जोडा विहिरींत सोडला. अशा रीतिनें त्या दयावंत बाईनें एका मुक्या प्राण्याचा जीव शांत केला. त्या बाईच्या या उपकाराची किंमत एका परमेश्वराशिवाय कोण करील ? आपल्याला अशा गोष्टी क्षुल्लक वाटतात व त्याला आपण महत्व देत नाहीं, परंतु ईश्वराच्या दरबारांत मनुष्य प्राण्याचा प्राण अशाच वेळीं वांचविला असतां पापपुण्याच्या जमाखर्चाचा जो हिशोब होतो, तोच मुक्या जनावर दया केली असतांनाहि होतो.

हजरत मुहम्मद पैगंबराच्या सभोंवार नजर दिली तर आपल्याला रक्तपात म्हणजे कांहींच नाहीं, असा स्वभाव जिकडे तिकडे पसरलेला दृष्टीस पडेल. प्रत्येकाच्या हातांत लढाईचीं शस्त्रें व जो तो प्राण देण्याला व प्राण घेण्याला तयार ! अशा प्रकारच्या तामसी वृत्तिच्या समाजांत हजरत पैगंबरसारखा एकटाच मनुष्य निर्माण झालेला पाहून आश्चर्य वाटतें. नवीन धर्मतत्वें लोकांत पसरण्याला त्यांना जितके आयास पडत तितकेच किंबहुना जास्तच त्यांचें स्वभाव बदलण्यास त्यांना आयास पडत. हजरत पैगंबरच्या अंगांत हा एक विशेष गुण होता कीं, त्यांच्या

तोंडून जो जो म्हणून उपदेश बाहेर पडे त्याचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर काय झाला, व त्या उपदेशाला धरून त्यांचें वर्तन व स्वभाव आहेत किंवा नाहींत हें प्रत्यक्ष ते स्वतः पाहिल्यावांचून राहात नसत. सारांश हजरत जवळ शद्बांचे अवडंबर नव्हतें. ते म्हणत " परमेश्वरानें मनुष्य प्राण्याला दयाकरण्याचा स्वभावधर्म दिला नसता तर हें जग किती भयाण झालें असतें." मनुष्याच्या सर्व सद्गुणामध्यें दया हा सद्गुण सर्वांत श्रेष्ठ आहे. हजरतनें कुराणाच्या प्रत्येक भागाच्या प्रारंभी ईश्वराला, " हे दयावंत, कृपासागरा देवा," अशी हाक मारलेली आहे.

# भाग ९ वा.

## स्वराज्याचा पाया.

विषय.

१ राजकीय सत्तेचे बीजारोपण.
२ जाहीरनामा.
३ धार्मिक सुधारणा.
(१) मशिदींत दिशा समजण्याची योजना.
(२) मद्यपान निषेद.
(३) जुगाराचा प्रतिबंध
(४) मशिदी नजिक पाण्याची अवश्यकता.
(५) पैगंबरचें साधे रहाणें.
४ हातांत शस्त्र घेण्याचीं कारणें.
५ नाखलाचें खोरें.
६ लढाई करणें ही ईश्वरी आज्ञा आहे

### १ राजकीय सत्तेचे बीजारोपण.

पुष्कळ वर्षे मदिना शहरांत सर्वत्र बेबंदशाही पसरली होती. तेथें इतके निरनिराळे पक्ष झालें होते कीं, त्यांच्यावर एकच सत्ता टिकणें अगदीं अशक्य झालें होतें. आपसांत तंटे बखडे नसून शांतता आहे, असा एकहि दिवस जात नसे. वाडवडिलार्जित मिळकतीच्या प्रश्नांचा हक्क आणि जेथें अशा हक्कांचा प्रश्न नसे तेथें हेवा, मत्सर, साधारण बोलाचालीवरून विकोपास जाता जाता दोन्ही पक्षांचे लोक बाहेर पडून तेथें रक्तपात ठरलेलाच. कोणी कुणाचा धनी नाहीं, कीं कोणी कुणाचा चाकर नाहीं, अशी ज्या शहरांत सामाजिक व्यवस्था असते, त्या ठिकाणीं राजसत्ता तरी कशी चालणार ! परंतु सध्यांचा काळ बदललेला होता. हजरत पैगंबरचें धार्मिक वर्चस्व त्या लोकांवर चांगलें बसत-

चाललें होतें. सर्व पक्ष त्यांच्या समोर मौनवृत्ति धारण करून शांतपणानें उभे राहूं लागले होते. त्यांच्या हरएक शब्दाला मान मिळूं लागला. धार्मिक उन्नतीचा मजबूत पाया बसण्याला राजकीय सत्ता किंवा अधिकार असला पाहिजे, राजकीय एक छत्राखालीं धार्मिक चळवळीला सजीवत्व प्राप्त होऊन त्या छत्राखालील प्रजाजनांत राष्ट्रीय भावना जागृत होते, ही जी पैंगबरची प्रथमची कल्पना होती, ती सिद्धिस नेण्यास त्यांनीं आतां प्रारंभ केला. हजरत पैगंबरनें आपल्या मनांत कल्पनेच्या जोरावर आपल्या कर्तव्याचा आणि आपल्या ध्येयाचा फार दिवसापूर्वीं जो नकाशा आंखून ठेविला होता, त्या नकाशाप्रमाणें आस्ते आस्ते परंतु निश्चयानें संकटांना तोंड देत देत ते एक एक पाउल पुढें टाकीत चालले होते. राजकारण जर त्यांनीं आपल्या हातांत घेतलें नसतें तर त्यांचा नवीन धर्म चिरस्थाई झाला असता किंवा नाहीं याचा प्रश्न आहे ! इस्लामधर्म पैंगबर साहेबांच्या पश्चात् पूर्वपश्चिम, व दाक्षिणोत्तर मोठ्या झपाट्यानें कां पसरला याचें कारण हजरत पैंगबरनें स्वतः दोन जबरदस्त शक्तिचे एकीकरण करून आपल्या देशांत प्रथम चैतन्य उत्पन्न केलें हेंच होय. साधारण कलाकौशल्य, विद्या, किंवा व्यापार यांच्या उन्नतिसाठीं ज्या प्रमाणें राजाश्रयाची जरूरी असावी लागते, नाहींतर ते उदयास न येता जागच्या जागीच नाश पावतात, त्याचप्रमाणें धर्माचेंहि आहे. हजरत पैगंबरच्या यशाचा मध्यबिंदु त्यांच्या आंगच्या चातुर्यांत आहे. असामान्य बुद्धिमत्ता या लोकोत्तर श्रेष्ठ पुरुषांत होती, याबद्दल कोणाचाहि मतभेद असणें शक्य नाहीं.

हजरत पैगंबरनें आपल्या धर्मतत्वांची छाप मदिना शहरावर फार मोठी बसविल्यानंतर शहरांत त्यांनीं एकी करून राष्ट्राभिमान जागृत करण्यास प्रारंभ केला. निरनिराळे पक्ष, भांडखोर भटकणाऱ्या

टोळ्या, गांवांतील नावाजलेले तंटेखोर यांना एकत्र करून, प्रथम हज-रतनें त्यांच्यामध्यें एकी केली. कोणत्याहि कारणावरून आम्हीं आपसांत दुही करणार नाहीं, अशी त्या लोकांकडून हजरतनें शपथ घेवविली, आणि ही शपथ मोडणारांला त्याच्या अपराधाप्रमाणें त्याला दंड, किंवा शिक्षा करण्याचा अधिकार आपणाकडे घेतला.

हजरत पैगंबरच्या मनोराज्याचा पाया दृश्य स्वरूपांत येथें घातला गेला, त्यांच्या यशाची मुहूर्त मेढ येथें पुरली गेली ! हजरतच्या पुढील कार्याची उभारणी, त्याच्या कीर्तिमंदिराचा पाया, त्यांच्या ध्येयाच्या रस्त्याची दिशा, त्यांच्या जगड्व्याळ चळवळीचें केंद्र येथें ठाम बसलें ! तंटा, बखेडा कांहीं असो, तो जर आपसांत सामोपचारानें नच मिट-ला तर तो हजरत सामोर आणून त्यावर हजरतचा निकाल सर्वांनीं बिनतक्रार मान्य करावा असें ठरलें. हजरत पैगंबरकडे आतां दोन अधि-कार चालून आले. धार्मिक व्यवसायांत त्यांचा शब्द ह्मणजे जसी ईश्वरी आज्ञा, त्याचप्रमाणें राजकारणांत त्यांचा शब्द म्हणजे देशाचा कायदा ठरला. हजरत समोर गांवांतील तंट्याबखेड्यांना तोटा नव्हता. परंतु त्या थोर विभूतीनें आपले उद्दिष्ट नजरेसमोर कायम ठेऊन त्यांचा निकाल अशा धारवाडी कांट्यानें दिला, कीं भांडणारे दोन्ही पक्ष मोठ्या समाधा-नानें एकमेकांच्या हातांत हात घालून घरीं परत जात. सामोपचारानें तंट्यांचा निकाल अशा रीतीनें होता होता कांहीं कांहीं तंट्यांत हजरतला तंट्याचे मूळ शोधून काढावें लागे, व त्यांत गुन्हेगाराला फार थोडी शिक्षा, किंवा दंड करण्याचा प्रसंग येऊं लागला.

## २ जाहीरनामा.

मदिना शहरांत आतां हजरतला सर्व सत्ताधिकारी म्हणून मानणारा एक पक्ष व दुसरा परधर्मीय ह्मणजे यहूदी लोकांचा एक पक्ष, असे मुख्य दोन पक्ष झाले. हे लोक मदीना शहराच्या बाहेर आसपास रहात. हे

खाऊन पिऊन सुखी, कांहीं कांहीं चांगले श्रीमंत व मजबूत तटबंदीच्या घरांतून रहात. यांचा पैशाच्या देवघेवीचा व्यवहार चाले, त्यामुळें गरीब अरबलोकांचा व त्यांचा वारंवार संबंध येई. गरीब लोकांना हे फार छळीत व वेळीं त्यांशीं मारहाण करून आपला स्वार्थ साधून घेत. मदिना शहरांत थोडी शांतता होताच, हजरतनें या लोकांच्याबद्दल विचार करण्यास सुरुवात केली. त्यानें आपलें पुढील धोरण आंखून एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो असाः–

"एका परमेश्वराचें नांव घेऊन मी मुहम्मद बिन अबदुल्ला, परमेश्वराचा पैगंबर, सर्व लोकांना असें जाहीर करतों कीं, आजपासून सर्व मुसलमान लोक व त्यांना सहाय्य करणारे लोक मिळून त्यांना एक प्रजा समजण्यांत येईल........शांततेच्यावेळीं व लढाईच्या प्रसंगी सर्वांना समान हक्क मिळतील. मुसलमानांच्या शत्रूबरोबर लढाई करण्याचा हक्क किंवा लढाई नंतर त्यांच्याबरोबर तह करण्याचा हक्क कोणलाहि रहाणार नाहीं. ज्या यहुदी लोकांना आमच्या स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यांत मित्राच्या नात्यानें रहावयाचें असेल त्यांनीं येथें खुशाल रहावें. त्यांचा कोणीही कोणत्याहि रीतीनें अपमान करूं नये किंवा त्यांना त्रास देऊं नये. आपल्याला त्यांची जीं मदत होईल त्या मदतीबद्दल त्यांना इतर लोकांप्रमाणें सर्व जातीचे हक्क प्राप्त होतील. यांत कोणीहि हरकत करणार नाहीं. यहुदी लोकांच्या सर्व निरनिराळ्या कुटुंबांना मुसलमानांबरोबर एकच प्रजा समजण्यांत येईल. त्यांनीं आपल्या धर्माप्रमाणें चालावें; त्याला कोणीही हरकत करणार नाहीं. यहुदी लोकांना मदत करणारे व त्यांच्या जवळ मैत्री राखणारे यांना सुद्धां यहुदी लोकांचे हक्क प्राप्त होतील; परंतु मदिना शहरावर शत्रू चाल करून आले तर शहरचें संरक्षण करण्याकरितां मुसलमानांच्या बरोबर यहुदी लोकांनाहि बाहेर पडावें लागेल. कोणत्याहि शहरवासी मनुष्याच्या हातून कांहीं गुन्हा झाला तर त्याची

चौकशी करून गुन्हेगाराला योग्य शासन देण्यांत येईल. जबरदस्ती, मारामारी, लूट, चोरी, खून इत्यादि मुसलमानांच्या अपराधाबद्दल त्यांना जी शिक्षा देण्यांत येईल तीच शिक्षा त्या त्या अपराधाबद्दल यहुदी लोकांना देण्यांत येईल. अपराधी कोणीहि असो त्याला कोणीहि आश्रय देऊं नये. हा जाहिरनामा ज्यांना ज्यांना मान्य होईल त्यांनीं आपल्या सर्व तक्रारी पैगंबराकडे दाखल कराव्या. या जाहिरनाम्याला मान देणाऱ्या लोकांना मदिना शहरांत रहाण्याला कोणत्याहि प्रकारची हरकत होणार नाहीं."

जेव्हां पैगंबर मदिनाशहरांत रहावयास आले, त्यावेळीं यहुदी लोकांना आपल्या पक्षांमध्यें घेण्यासाठीं त्यांनीं सर्व तऱ्हेचे उपाय करून पाहिले. वास्तविक पाहातां धर्माच्या बाबतींत पैगंबर त्यांच्या विरुद्ध मुळींच नव्हते. इतकेंच नव्हे तर ते स्वतः त्या लोकांच्या धर्माला मान देत व त्यांच्या पूर्वीं होऊन गेलेल्या पैगंबराचेच आपण अनुकरण करीत आहोंत असें त्यांचें त्या लोकांना स्पष्ट सांगणें असे. इस्लाम धर्माची उभारणी मुख्यतः मूर्तिपूजा तुच्छ मानण्यावर झाली, आणि यहुदी लोकांना हें तत्व पूर्ण मान्य होतें. सारांश या दोन धर्मांत सामान्य मुख्य तत्व एकच असल्याकारणानें दोन्ही धर्म एकमेकांच्या हातांत हात घालून चालावयास कोणतीच हरकत नव्हती. याच मुद्यावर हजरत पैगंबरनें यहुदी लोकांजवळ सलोखा राखण्याचा प्रयत्न करून पाहिला.

## ३ धार्मिक सुधारणा.

कांहीं इंग्लिश ग्रंथकारांचें असें मत आहे कीं, हजरत पैगंबरनें इस्लाम धर्मांतील कांहीं कांहीं विधी यहुदी धर्मांतून प्रथम घेतले होते. या विधानाला ते असा पुरावा देतात कीं यहुदी लोक जसा आपला पुढा प्रार्थनेच्या वेळीं जरुसलेम शहराकडे करीत, तसाच मुसलमान लोक मदिना-शहरीं आल्यावर प्रथम प्रथम कांहीं महिने नमाज पडतांना आपला पुढा

जरुसलेम शहराकडे करीत असत; परंतु कालांतरानें हजरत पैगंबरनें ही दिशा बदलून तिच्या ऐवजीं मक्केंतील काबा मशिदिची दिशा आपल्या अनुयायांना कायम करून दिली; आणि तेव्हांपासून ती पद्धत जशीच्या तशीच अद्याप चालू आहे.

या विधानांत कितपत तथ्यांश आहे हें पाहाण्याचें काम आम्हीं सूज्ञ वाचकांकडे सोंपवितों. आम्हांला तर असाहि विश्वसनीय आधार सांपडला आहे कीं इस्लाम धर्मतत्वें व त्यांतील धार्मिक विधी यांची परंपरा मूळ पैगंबर इब्राहिम याच्यापासून चालत येऊन त्याच्याच पायावर हजरत मुहम्मद पैगंबरनें इस्लाम धर्माचीं इमारत बांधिली. हा धर्म जगांत अगदीं नवीन असा नव्हता. मात्र त्याची प्रसिद्धि ज्याप्रमाणें व्हावयास पाहिजे होती किंवा त्या धर्माची तत्वें जशीं सामान्य लोकांना पटावयास पाहिजे होतीं तशीं तीं न होतां पुष्कळ काळ तीं अंधारांत पडून होतीं. हजरत पैगंबरच्या पूर्वीं अरबस्थानांत ख्रिस्ती धर्म पुष्कळ ठिकाणीं चालू होता, परंतु हजरतनें त्यांचें अनुकरण केलें असें म्हणतां येत नाहीं.

## ( १ ) मशिदींत दिशा समजण्याची योजना.

प्राचीन काळीं नमाज पडतांना तोंड कोणत्या दिशेला करावें हें दाखविण्यासाठीं प्रत्येक मशिदीमध्यें मक्केची दिशा दाखविण्यासाठीं एक काळा फथ्थर उभा करून ठेवीत असत; भाविक लोक त्या फथ्थराकडे तोंड करून नमाज पडत असत; परंतु फथ्थर ठेवण्याची पद्धत कालांतरानें बंद पडून मशीदींत मक्केची दिशा दाखविण्यासाठीं एका भिंतीला कोनाड्याप्रमाणें एक भाग करून दिशा समजण्याची अडचण दूर करण्याची योजना झाली. ही जागा निरनिराळ्या सुंदर मौल्यवान वस्तूंनीं फारच सुशोभित केलेली असते. सांप्रत काळीं सर्व धार्मिक मुसलमान लोक नमाज पडतांना सर्व पृथ्वीवर अत्यंत पवित्र अशा मक्काशहरांतील काबा मशिदीकडे तोंड करून नमाज पडत असतात.

रमजान महिन्यांत उपवास करण्याची पद्धत आरब लोकांमध्यें फार प्राचीन काळापासून चालू आहे. हजरत पैगंबरनें याच महिन्यांतील धार्मिक विधींना विशेष व्यवस्थीत रूप दिलें. रमजान महिन्यांत जे नियम विशेषतः मोठ्या श्रद्धेनें पाळावयाचे असतात, ते मात्र हजरत पैगंबरनें घालून दिलेले आहेत.

## (२) मद्यपान निषेध.

हजरतनें मुसलमान लोकांना समाजांत वागण्याचे जे नियम घालून दिले, त्यांत मद्याला स्पर्श न करणें हा एक अत्यंत कडक नियम होता. जे मूर्तिपूजक अरब लोक आपल्या जुन्या धर्माला चिकटून राहिलें, ते उघड उघड मद्याचा उपयोग करीत, आणि एका प्रसंगीं तर असें घडून आलें कीं, मुसलमान लोक मशिदीमध्यें नमाज पडण्यासाठीं आले तेव्हां त्यांच्याबरोबर एक मनुष्य दारूच्या अमलांत हजरतसमोर अव्यवस्थीत व घाणेरडे चाळे करीत येऊन उभा राहिला. त्या मनुष्याची ती मनाला किळस येणारी वृत्ति पाहून हजरत पैगंबरला त्याचा राग आला. परमेश्वराची अनन्यभावानें भक्ति करण्याची जी पवित्र वेळ त्यावेळीं मनुष्यानें पशुतुल्य वृत्तींत असणें किती लज्जास्पद आहे, ही गोष्ट हजरतनें आपल्या अनुयायांना स्पष्ट करून सांगितली, व त्या दिवसापासून नमाज पडण्याच्या वेळींच नव्हे तर कोणीहि केव्हांहि मद्याला स्पर्श करूं नये; असा त्यांनीं कडक नियम घालून दिला. हजरत पैगंबरला दारू पिणाऱ्या लोकांबद्दल फार वाईट वाटे. आपल्या अमोलिक आयुष्याचा दुरुपयोग अशा रीतीनें करूं नये; शहाणपण देऊन दुसऱ्यापासून मूर्खपणा विकत घेऊं नये; व अक्षय सौख्याचा मार्ग दाखविणारा ज्ञानदीप आपल्या हातानें मालवून टाकू नये; असा गोड उपदेश करून हजरत पैगंबर कुमार्गाला जाणाऱ्याला उपरतीवर आणीत असत. मनुष्यमात्राचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण ज्या ज्या मार्गानें

होण्यासारखें असेल, असे मार्ग लोकांना दाखवून देण्याची कळकळ हजरतला किती होती, याची कल्पना त्यांच्या समाज बंधनाच्या नियमावरून चांगली होते.

## (३) जुगाराचा प्रतिबंध.

जुगार खेळून एकदम पैसे मिळविणें पैगंबरला मुळींच आवडत नसे. दैवावर हवाला ठेऊन एकानें घटकेंत कंगाल व्हावें व दुसऱ्यानें लक्षापती व्हावें, यानें समाजांत अनीति वाढून समाजाचीं बंधनें विस्कळीत होतात म्हणून हजरतनें अशा प्रकारचे सर्व खेळ खेळण्याची सक्त मनाई केली. निढळाच्या घामानें मिळविलेलें द्रव्य कितीहि अपुरें असो, परंतु त्या द्रव्यानें मनुष्याला समाधान होतें आणि मनामध्यें अस्वस्थता न राहतां मनुष्य शांत रहातो हा जो जगाचा अनुभव, त्याचा धडा हजरत पैगंबरचे अनुयायी त्यांच्या पासून शिकले.

## (४) मशिदीमाजिक पाण्याची आवश्यकता.

हजरतनें मुसल्मानांना घालून दिलेल्या नियमांत शरिराची स्वच्छता राखण्याचाहि नियम महत्वाचा होता. प्रत्येक दिवशीं जितके वेळ नमाज पडावयाची असते अशा प्रत्येक वेळीं शरिराची स्वच्छता राखण्याचा हुकूम करण्यांत आला. याच हुकूमाची पूर्ण अंमलबजावणी होत जावी म्हणून प्रत्येक मशिदीच्या आवारांत पाण्यानें भरलेले एक टाकें तयार ठेवलेलें आपल्या दृष्टीस पडतें. वाळूच्या मैदानांतून प्रवास करणाऱ्या वाटसरूंना पाण्याची अडचण पडूं नये म्हणून तेथें शरीर शुद्धिसाठीं वाळूचा उपयोग करण्याला परवानगी दिलेली आहे. नमाज पडतांना शरीराचे कांहीं भाग जमिनीला लागून त्यांना जमीनीची माती, केर कचरा लागून ते मळीण होण्याचा संभव असतो; तसें न होतां शरीर स्वच्छ रहावें म्हणून मुसल्मान लोक नमाज पडतांना जमिनीवर चटई, सतरंजी वगैरे टाकून त्यावर नमाज पडत असतात. शरीराप्रमाणें

दांत स्वच्छ राखणें हेंहि एक प्रत्येकाचें कर्तव्य आहे असाहि एक नियम आहे.

## (५) पैगंबरचें साधें रहाणें.

मुसलमानी धर्मामध्यें गोरगरिबांना अन्नदान करणें अति श्रेष्ठ प्रतीचें कर्तव्य मानलें आहे. ज्या वस्तूवर आपली विशेष आवड असेल अशी वस्तु दान करणें हेंच खरें औदार्य, असें पैगंबर लोकांना सांगत असत. कांहीं भक्तिमान व श्रद्धाळु, अबुबक्रसारखे मुसलमान यांनीं तर आपली सर्वच संपत्ति आपल्या हातानें गोरगरिबांना वाटून टाकिली होती.

पैगंबर स्वतः अगदीं साधेपणानें रहात असत. त्यांची स्वतःची बसण्या उठण्याची खोली, बारा किंवा चवदा फूट लांबी रुंदीची होती. त्या खोलींत एक लहानशी पडवी होती. त्या खोलीची उंची इतकी ठेंगणी होती कीं, वर असलेल्या छपराला जाणाऱ्या येणाऱ्या कोणत्याही मनुष्याचा सहज हात पोंचे. बिबी आयेशाच्या खोली नजीक असलेल्या एका स्वतंत्र लहानशा खोलींत हजरत पैगंबर रात्रीं, संध्याकाळीं नमाज पढत असत. एक काथ्यानें भरलेली चामड्याची पिशवी चटईच्या ऐवजीं जमिनीवर टाकलेली असे. पैगंबरसाहेबांची विश्रांति घेण्याची परांनीं भरलेली किनखापी गादी हीच होय.

## ४ हातांत शस्त्र घेण्याचीं कारणें.

हजरत पैगंबर, त्यांचे स्नेही आणि त्यांचे अनुयायी मदिना शहरांत आल्यानंतर त्यांना पहिले सहा महिने कुरेशलोक व त्यांचे स्नेही यांच्यापासून कांहींच त्रास झाला नाहीं. परंतु ही त्यांची स्वस्थता फार दिवस टिकणारी अशी त्यांच्या नशिबी लिहिलेली नव्हती. मदिना शहरांतील यहुदी लोकांचा व्यापारी संबंध कुरेश लोकांजवळ होता, आणि जरी यहुदी लोकांनीं हजरत पैगंबर जवळ स्नेहाचा तहनामा केला होता, तरी ते कुरेश लोकांना हजरतचें वजन, मुसलमानांचें प्राबल्य, त्यांची

संख्या वगैरे खडा आणि खडा बातमी पोंचवीत असत. याच सुमारास मक्केतील मुसलमानांच्या शत्रूंनीं सिरिया देशाहून व्यापाराकरितां आलेल्या कॉफल्याबरोबर ते मदिना शहरावरून स्वदेशी जावयास निघाले त्यावेळीं त्यांच्या संरक्षणासाठीं हत्यारबंद लोक पाठविण्याची तयारी केली. इकडे हजरतला या स्वारीची खबर पोंचतांच त्यानें आपल्या स्वतःच्या व अनुयायांच्या बचावासाठीं शस्त्र उचलण्यास आपल्या लोकांना परवानगी दिली. पुढील सर्व लढायांत हजरतनें हें तत्व अखेर पर्यंत पाळलें होतें, असें मार्मिक दृष्टीनें वाचणाऱ्या वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. या व्यापारी तांड्याबरोबर जे हत्यारबंद लढाऊ लोक पाठविण्यांत आले, यांत कुरेश लोकांचा किती शुद्ध हेतु होता हें सांगतां येणें कठीण आहे. पुष्कळ इतिहासकारांचें असेंही मत आहे कीं, कुरेश लोकांनीं मुसलमानाविरुद्ध लढाई पुकारण्याची हीच प्रथम संधी उतावीळपणानें घेतली. मदिना शहरावरून सिरिया प्रांताला जाणारा व्यापारी तांडा हत्यारबंद तयारीनें येत आहे, असें ऐकून मदिना शहरांतील लोकांना स्वाभाविकपणें धास्ती वाटणें साहाजिक आहे. वेळ प्रसंगीं आपला ढिलेपणा आपल्याला नडेल अशाहि विचारानें हजरत पैगंबरनें आपल्या अनुयायांना ' तयार असा, ' असा सल्ला दिला असावा.

हजरत पैगंबरनें प्रथमच्या आपल्या उपदेशांत, सहनशीलता राखण्यासाठीं आपल्या अनुयायांना जो उपदेश केला, त्याच्याकडे लक्ष दिलें तर त्यांची आतांची लढाऊ वृत्ति विसंगत दिसते, असें कोणाला वाटेल. तसेंच शत्रूच्या कशाहि प्रकारच्या शिव्या गाळी झाल्या, अमानुष छळ झाला, तथापि तें सर्व शांतपणानें सहन करणारे हजरत पैगंबर आतां हातांत शस्त्र धारण करण्यास तयार झालेले पाहून कोणालाहि आश्चर्य वाटेल, परंतु या बाबतींत थोडा विचार करणें भाग आहे. मागील एका भागांत या विषयावर आह्मीं थोडें विवेचन केलेंच आहे. तेव्हां आतां विशेष सांगत न बसतां वाचकांना हजरत पैगंबरच्या काळाच्या वातावरणाकडे नजर देण्याची विनंति करतो.

मनुष्याच्या सहनशीलतेला व शांतवृत्तीला तरी नैसर्गिक मर्यादा असते. त्यांच्यावर त्यांच्या शक्तीच्या बाहेर ताण पडला तर सृष्टीक्रमाला अनुसरून त्यांचाहि स्फोट होणार यांत आश्चर्य नाहीं. हजरत पैगंबरच्या सभोंवार सर्वत्र तमोगुणाचें साम्राज्य होतें. त्यांत एकट्याच्या सात्विक गुणाचा निभाव कसा लागावा ! मक्केंत त्यांचें घरदार, सोयरेधायरे, व्यापारधंदा होता. त्या सर्वांची आशा सोडून त्यानें रक्तपात टाळण्याकरितां परदेशाचा रस्ता धरिला, तरीसुद्धां त्यांचे शत्रू त्यांच्या मागें लागलेच ! हा असुरी द्वेष !

मक्केवाल्यांनीं मुसलमानांचा नायनाट करण्याचा निश्चय केला होता यांत मुळींच संशय नाहीं. कारण अरबस्थानांत इस्लाम धर्म स्था न होण्यांत कुरेश लोकांचें सर्वच बाजूनें नुकसान होतें. मक्केला ज आज महत्व होतें, ज्याच्याकारितां यात्रेकरूंच्या झुंडीच्या झुंडी येऊन कुरेश लोकांची पोळी पिके, तें महत्व दवडण्यास कुरेश लोक कसे तयार होणार ! म्हणून ते मुसलमानांना हाणून पाडण्याचा शक्य तो प्रयत्न करूं लागले. कुरेश लोकांच्या प्रयत्नांत मादिना शहरांतील मुसलमानेतरांना चिथविणें, हा एक प्रयत्न होता. त्यांनीं अबदुल्ला इब्ने उब्बी या नांवाच्या एका गृहस्थाला पत्र लिहिलें कीं, पैगंबरास ठार मारावें किंवा मादिना शहरांतून त्याला हांकून लावावें. नाहीं तर आम्हीं मादिना शहरावर स्वारी करूं आणि तुमच्या बायकापोरांना दासी व गुलाम करूं.

पैगंबर मदिनाशहरीं येण्याच आधीं मदिनेवाल्यांनीं अबदुल्ला यास आपला राजा करून त्याला राज्याभिषेक करण्यासाठीं एक मुकुटहि तयार केला होता. परंतु पैगंबरच्या आगमनामुळें हा त्यांचा बेत रहित झाला. अबदुल्ला मनांतून पैगंबरचा द्वेष करीत होता. जेव्हां कुरेश लोकांकडून वर लिहिलेल्या मजकूराचें पत्र आल्याची बातमी पैगंबरला

लागली, तेव्हां ते त्या गृहस्थाकडे गेले व त्याला समजावून सांगितलें कीं "तुला या पत्राप्रमाणें वागावयाचें असेल तर प्रथम तुला आपल्या इष्टमित्र व नातेवाईक यांच्याबरोबर लढावें लागेल, कारण बरेच तुझे नातलग मुसलमान झालेले आहेत व ते तुझी बाजू धरणार नाहींत. याचा चांगला विचार कर." अबदुल्लाच्या लक्षांत ही परिस्थीति एकदम आली व त्यानें आपला बेत बदलला.

ह्याच सुमारास खजरज कुळांतील सआदबिन मआज या नांवाचा एक सरदार मक्केच्या यात्रेस गेला होता. तो तेथें उम्मिया बिन खलफ नांवाच्या आपल्या जुन्या मित्राच्या घरीं उतरला होता. एके दिवशीं काबाच्या दर्शनास तो आपल्या मित्राबरोबर जात असतां, त्याला वाटेंत अबुजहल भेटला, व त्यानें "पाहुणा कोण," म्हणून विचारीलें. उम्मिया म्हणाला, "सआद." उम्मियाच्या तोंडून हें नांव निघतांच अबुजहल रागानें लाल झाला व म्हणाला, "तुमच्यासारखे लोक मुसलमानांना आश्रय देतात हें मोठें आश्चर्य. तुम्हांबरोबर यात्रेळीं हा नसता तर सआद मदिनाशहरीं जिवंत गेला नसतां." यावर सआदनें जबाब दिला, "बरें आहे, तुम्हीं आमची यात्रा अशा रीतीनें बंद कराल तर आम्हीं तुमचा सिरिया देशाचा रस्ता बंद करूं, हें मात्र लक्षांत ठेवा."

हजरत पैगंबरचा जन्म क्षत्रीय जातींत झालेला होता, आणि त्यांच्या अनेक पिढ्या स्वतःचे हक्क फक्त तरवारीच्या जोरावर संभाळण्यांत आलेले होते. अरबस्थानांत सर्वच बेबंदशाही माजलेली होती, आणि प्रत्येक टोळी दुसऱ्याला कायदा तरवारीच्या बळावर दाखवी. अर्थात् क्षुल्लक कारणावरून सुद्धां दोन्ही पक्षांमध्यें रक्तपात होऊन कित्येक मनुष्यांचे बळी पडत असत. अशा वातावरणांत हजरत पैगंबरला आपला धर्म व आपलें अस्तित्व टिकविण्यास इतर लोकांप्रमाणें वागल्याशिवाय दुसरा कोणताच मार्ग मोकळा नव्हता.

मक्केहून सिरिया प्रांताला जाणाऱ्या व्यापारी उंटांच्या तांड्याच्या सफरी पासून आपल्या शहराला किंवा शहराच्या बाहेरील आसपासच्या प्रदेशाला त्रास होऊं नये, म्हणून हजरतनें वेळोवेळीं चांगली सावधगिरी ठेविली होती. मदिना शहरांतून जे हत्यारबंद लोक स्वारीच्या निमित्तानें बाहेर पडत त्यांच्या जवळ पैगंबर एक पांढरें निशाण देत असत. अरबस्थानांतील इतर टोळ्याहून हे लोक या निशाणामुळें वेगळ्या स्वरूपाचे आहेत असें पाहातांक्षणींच समजे.

वर सांगितल्याप्रमाणें मक्केहून सिरिया प्रांताला व्यापारी लोकांच्या तीन सफरी झाल्या व त्यांच्या पासून मुसलमानांना ह्मणण्यासारखा त्रासहि झाला नाहीं.

हिजरी सन २ इ. स. ६२३ च्या जून आणि आक्टोबर पर्यंत हजरतनें स्वतः आपले मुसलमान लढवय्ये घेऊन मदिनाच्या बाहेर मक्केंतील तांड्यांच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठीं तीन स्वाऱ्या केल्या. हजरतच्या तयारीची बातमी कुरेश लोकांना लागत जाई व तेहि व्यापारी तांड्याच्या बरोबर अधिकाधीक शूर ज्वान पाठविण्याची खबरदारी घेत. अशाच प्रकारच्या एका तांड्याचा मुख्य अधिकारी अबुसुफयान हा होता.

## ५ नाखलाचें खोरें.

मदिनाहून आठ मुसलमान लोक याच वर्षी हिंवाळ्यामध्यें मक्का आणि मक्केच्या दक्षिणेकडील प्रांत यांच्या मधील रस्त्याची टेहळणी करण्याकरितां निघालेले होते. त्यांचा मुख्य अबदल्ला या नांवाचा एक मुसलमान होता. हजरत पैगंबरनें अबदल्ला जवळ एक मोहरबंद हुकूम दिला होता; आणि तो हुकूम मक्का शहरापासून एका विशेष ठिकाणीं जाऊन पोचल्यावर तेथें उघडून वाचण्याची ताकीद अबदल्लाला हजरतनें दिली होती. "नाखलापर्यंत पुढें चला आणि तेथें कुरेश लोकांच्या व्यापारी तांड्यावर नजर ठेवा," असा तो हुकूम होता. तायफ शहराला

जाणाऱ्या रस्त्यावर हें खेडें आहे, व त्यामधून यमन प्रांताला जाण्यायेण्याचा मार्ग आहे. वर सांगितलेल्या आठ इसमांना या ठिकाणीं फार वाट पाहात बसावें लागलें नाहीं; कुरेश लोकांचा व्यापारी तांडा अनेक प्रकारच्या मालासहित तेथें येऊन पोंचला. त्यांच्या बरोबर फक्त चार हत्यारबंद लोक होते.

कुरेश लोकांची व या मुसलमान लोकांची गांठ पडतांच कुरेश लोकांचें धाबें दणाणून गेलें. त्यांना या आठ लोकांची फारशी धास्ती वाटली नाहीं, परंतु यांचे आणखी कांहीं साथीदार जवळपास असल्यास, आपल्यावर मोठा भयंकर प्रसंग येईल असें वाटून ते मोठ्या विचारांत पडले. हा रजब महिन्याचा शेवटचा दिवस होता. हा यात्रेचा पवित्र महिना आणि या महिन्यांत यात्रेच्या नियमाप्रमाणें कोणत्याहि प्रसंगीं कोणालाहि हत्यार बाहेर काढण्यास सक्त मनाई होती. आपल्यापासून कोणताहि दगा, किंवा दंगा होणार नाहीं, अशी कुरेश लोकांची खात्री करण्याचा प्रयत्न मुसलमानांनीं करून पाहिला, तथापि त्यांची शशंकवृत्ति पालटलेली त्यांना दिसली नाहीं. मुसलमानांच्या मनांत असाहि विचार आला कीं, या लोकांनींच जर प्रथम हल्ला केला, तर हा जत्रेचा महिना म्हणून आपण सुद्धां हातांत शस्त्र कां घेऊं नये ? याप्रमाणें मुसलमान आपसांत विचार करीत आहेत तोंच कुरेश लोकांमधलि एका रणशूरानें आपल्या धनुष्याची दोरी खेचली व मुसलमानाकडे एक तीक्ष्ण बाण सोडला. एक मुसलमान ठार झाला !

अनेक शतके घट्ट बसलेली धार्मिक गांठ या मनुष्यानें कापून काढिली. परंपरागत चालत आलेली रूढी यानें ढांसळून दिली. रजब महिन्याचे पावित्र्य यानें अपवित्र करून जगाचा अविश्वास संपादन केला. मुसलमानाच्या शांत अरण्यांत या मनुष्यानें विस्तवाची ठिणगी टाकून दिली.

अनेक ऐतिहासिक पुराव्यावरून आम्हीं वर जें विधान केलें आहे, त्याच्या समर्थनासाठीं वरील प्रसंग जसा घडला तसाच येथें दिला आहे.

याच्या पूर्वी मुसलमानांनीं सर्व प्रकारच्या यातना, हाल, अपेष्टा सोसल्या, परंतु कोणाचाहि शस्त्रानें प्रतिकार केला नाहीं. यापुढें मुसलमानांनी तरी स्वस्थ कां बसावें ? येथून आतां जो रक्तपात होईल, त्याला निःपक्ष-पातानें विचार केला तर मुसलमान जबाबदार कसे ?

दोन्ही पक्षांत तलवारी बाहेर पडल्या, आणि मुसलमानांनीं प्रथम शौर्य दाखऊन कुरेश लोकांना कैद केलें. इकडे ही चकमक चालु असतां, त्यांतील एक इसम युक्तीनें निसटला व धूम ठोकीत मक्केला पळाला. अबदल्लानें हा व्यापारी तांडा लुटला व पुष्कळ मौल्यवान माल व लढाईंत कैद केलेले लोक घेऊन त्यानें मदिनाशहराची वाट धरली; अशी मक्केंत त्या इसमानें बातमी पसरविली. इकडे वर लिहिलेल्या चकमकीची हकीगत ऐकून हजरत पैगंबरला वाईट वाटलें. तो पवित्र यात्रेचा महिना होता, म्हणून ह्यांत शस्त्रांच्या बळावर संपादन केलेली लूट स्वीकारण्यास ते तयार झाले नाहींत. अबदल्लाचा फारच हिरमोड झाला. गांवांतील लोकांनीं या मुसलमान लोकांचा धिःकार केला. परंतु कांहीं दिवस गेल्यानंतर हजरत पैगंबरला ईश्वरी प्रेरणा झाली कीं, "या पवित्र महिन्यांत लढाई करणें पाप होय; परंतु ईश्वरीआज्ञा उल्लंघन करणें, आणि त्या आज्ञा शिरसा वंद्य मानणारे यांना वतनभ्रष्ट करणें अधीक मोठें पाप होय."

वरील प्रेरणा झाल्यानंतर पैगंबरनें आणलेली लूट ती संपादन कर-णारांना वाटून दिली, आणि जे कैद करून आणलेले लोक होते त्यांच्या पासून योग्य दंड घेऊन त्यांना सोडून दिलें.

वरील हकीकत घडून आल्यानंतर हजरत पैगंबरनें आपला चुलता हमजा याच्या हाताखालीं तीस हत्यारबंद लोक देऊन मक्का आणि सिरिया या दोन प्रांताच्या मधील वाटेवर कुरेश लोकांच्या हालचालीवर नजर ठेवण्यास पाठऊन दिला. कुरेश लोकांचा पुढारी अबुजहाल आपल्या व्यापारी तांड्यासह येत असतां वाटेंत त्याची व हमजा यांची गांठ पडली

अबुजहाल तीनशें हत्यारबंद लोकांचा अधिकारी होता. या दोन्ही कड्या शत्रूंची गांठ पडतांच ज्यांनीं त्यांनीं आपापल्या तरवारी बाहेर काढिल्या, व एकमेकावर चालून जाणार इतक्यांत त्याच ठिकाणीं रहात असलेला एक बोडोइन टोळीचा नाइक, या दोन हातघाईवर आलेल्या पक्षांमध्यें मध्यस्ती पडला, व त्यानें दोघांचीहि समजूत घालून लढाईचा प्रसंग टाळला. त्यानें दोघांनाहीं दोन दिशेला लाऊन दिलें.

## ६ लढाई करणें ही ईश्वरी आज्ञा आहे.

कुराणांत निरनिराळ्या ठिकाणीं धर्माच्या बावतींत युद्ध करणें सशास्त्र आहे, असें सांगितलेलें आहे. जसें:—

" जे सद्धर्मानें चालणारे आहेत, त्यांच्या करितां शुभवार्ता घेऊन या. सृष्टीचा प्रभू एक आहे, आणि तोच आमचा देव आहे, असें जे सांगतात, त्यांना त्यांच्या वतनांतुन हांकून लावण्याचे ज्यांनीं पाप केलें आहे त्यांच्याशीं युद्ध करण्याला परवानगी आहे. जे त्यांच्यासाठीं लढतात त्यांना तोच मदत करीतो. "

दुसऱ्या एका ठिकाणीं खालीलप्रमाणें सांगितलें आहे:—'युद्ध करणें तुम्हांला पसंत नसेल, तरिसुद्धां ती ईश्वरी आज्ञा आहे ज्यांत तुमचें अक्षय कल्याण आहे, तें कदाचित् तुम्हांला आवडणार नाहीं, आणि ज्यांत तुमचें अकल्याण आहे तें तुम्हांला आवडेल; परंतु ईश्वर हें सर्व जाणतो, व तुम्हीं जाणत नाहीं.

आणखी दुसऱ्या ठिकाणीं:—

" आपलें सर्व सामर्थ्य एकत्र करा, जे परमेश्वराचे व तुमचे शत्रू आहेत त्यांच्या मुलखांत तुमच्या घोडेस्वरांना शिरून त्यांच्या दराऱ्यानें तुमच्या शत्रूंना थरथर कापावयास लावा. परमेश्वराच्या नांवानें तुम्हीं जें जें कराल त्याचा योग्य मोबदला तोच तुम्हांला देईल."

हमजा मदिना शहरीं परत आल्यावर हजरत पैगंबरला त्याच्याकडून कुरेश लोकांची तीव्रता किती आहे, पुढें त्यांचा काय करण्याचा विचार

असावा इत्यादि महत्वाच्या मुद्याविषयीं बरीच माहिती मिळाली. जवळपासच्या आणि समोंवतालच्या प्रदेशांतील लोकांच्या हालचालींवरून हजरत पैगंबरच्या नजरेसमोर पुढील प्रसंगाचें चित्र उभें राहिलें: त्यांच्या मनाची अशीहि खात्री होऊन चुकली होती कीं, कुरेश आपल्या द्वेषाचा भडकाग्नी उडवून दिल्याशिवाय कधींहि राहाणार नाहींत. इतके दिवस कुरेश लोकांचा सर्व राग, द्वेष, फक्त एकटया पैगंबरावर होता, त्यांचा कांटा काढून टाकण्यासाठीं त्यांनीं अनेक उपाय केले, तथापि ते सर्व निष्फळ जाऊन हजरतला त्यांच्या जिवाला जीव देणारे मदिना नगरवासी मिळाले. या नवीन कारणानें कुरेश लोकांना मोरेकऱ्यांच्या ऐवजीं लढाईचा उपाय करणें भाग पडलें.

# भाग १० वा

## बदरची लढाई

जानुआरी इ. स ६ ४

**विषय**


१ मक्केंतील व्यापारी कॉफला.
२ कुरेश सैन्य मक्केंतून निघतें.
३ हजरत पैगंबरची स्वारी.
४ बदरची लढाई.
५ मुसलमानांचा जय.
६ लुटीची वांटणी.
७ सविकची लढाइ.
८ तहाची वाटाघाट.
९ गौरस पेलवान.


### १ मक्केंतील व्यापारी कॉफला

मक्का शहरांतील त्या वर्षांतील अति महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे सिरिया देशांत तेथून जाणाऱ्या ' कॉफल्याची रवानगी ही होय. ह. मुहम्मदचा पणजा हाशम यानें पूर्वीं मक्का व सिरिया या दोन ठिकाणीं व्यापाराचें दळणवळण व्हावें म्हणून एक कॉफला तयार केला होता. मक्केहून विशेषतः चामडें परदेशांत रवाना होई; त्याच्या ऐवजीं सिरिया आणि इराक देशांतून मक्केला, रेशीम आणि दुसऱ्या पुष्कळ वस्तु, व्यापाराचा माल म्हणून येत असे; आणि केव्हां केव्हां हाच व्यापारी कॉफला व्यापारी माल घेऊन इजिप्त आणि मेसापोटेमियापर्यंतहि मजल मारीत असे. व्यापारी मालाची देवघेव करणारे मक्केमध्यें फक्त व्यापारीच होते असें नाहीं, तर तेथील त्या काळचा प्रत्येक रहिवाशी त्याच्याजवळ देण्यासारखें जें कांहीं असे तें तो या कॉफल्याबरोबर परदेशी पाठवीत असे;

कारण मालाच्या सुरक्षितपणाबद्दल या कॉफल्याच्या सोईमुळें कोणालाहि धास्ती वाटत नसे; म्हणून वरील दोन देशाचें दळणवळण मक्केतील लोकांना बरेंच किफायतशीर झालें होतें.

इ. स. ६२३ मधील पावसाळ्यांत कुरेश लोकांचा अबुसुफयान नांवाच्या एका पुढाऱ्याच्या देखरेखीखालीं एक मोठा सिरियन कॉफला व्यापारी माल घेऊन निघाला. अबुसुफयान इस्लाम धर्माचा कट्टा शत्रू असून ह० पैगंबराचे प्राण घेण्याच्या कटांत हा प्रमुख होता. नेहमींपेक्षां यावेळीं या कॉफल्याबरोबर पुष्कळ तऱ्हेचा मौल्यवान् मालहि दिलेला होता. असा हा फार लांब मुशाफरी करणारा कॉफला, त्यांतहि तो लांबच लांब पेसरलला उंटांचा तांडा, जेव्हां तो डोंगरांच्या पायथ्यानें वळणावळणानीं चाले, तेव्हां ती लांबून दिसणारी मौज पाहाण्याकरितां मक्केच्या बाहेरील मैदानांत लोकांची किती गर्दी लोटत असेल याची कल्पनाच करणें योग्य.

एकाद्या अरब टोळीवर लुटारू लोकांचा हल्ला झाला तर त्यांचा सर्व व्यापारी माल लुटारू लुटून फस्त करीत असत. अबुसुफयानें आपल्या कॉफल्यासह मक्का सोडल्यानंतर थोड्याच दिवसांत मदिनेच्या प्रदेशांत आपल्या कॉफल्यावर कांहीं तरी अचानक प्रसंग येईल, अशी त्याला फार मोठी धास्ती वाटत होती; म्हणून तो येथें आल्यापासून फारच काळजीनें आपला वाटेंत मुक्काम करी, व वाट चालू लागल्यानंतर आपल्या बरोबरचे हत्यारबंद लोक नेहमीं तयार ठेवी. एका ठिकाणीं मात्र मुसलमान लोक पाठलाग करीत मागाहून येत आहेत अशी ओरड झाली होती, परंतु ती निराधार होती. शेवटीं हा कॉफला आपल्या इच्छित ठिकाणीं निर्विघ्नपणें जाऊन पोंचला.

इ.स.६२४ च्या उन्हाळ्यांत हा कॉफला आपलें व्यापारी कामकाज आटोपून मक्केस जाण्याकरितां निघाला; परंतु तो सिरियाच्या सरहद्दीवर येऊन पोंचला नाहीं तोंच, शत्रूनें हल्ल्याची तयारी चालविली आहे, अशी

त्याला बातमी लागली. ही बातमी कानांवर येतांच अबुसुफयानला आपल्या बरोबर असलेली युद्धसामुग्री अपुरी वाटल्यामुळें मक्केहून आणखी जास्त मदत आणण्यासाठीं त्यानें एक जासूद तिकडे रवाना केला; आणि आपण आपला कॉफला घेऊन तांबड्या समुद्राच्या किनाऱ्याकडील रस्त्याला वळला. मदीना शहरच्या दक्षिणेस बदर या नांवाच्या एका ठिकाणीं आल्यावर अबुसुफयान, शत्रूचा कोठें वास येतो कीं काय हें पाहाण्यासाठीं आपण पुढें गेला. तेथें एका विहिरीवर दोन उंट विश्रांतिसाठीं सोडून दोन इसम बसले आहेत, असें त्याला समजलें. अबुसुफयानला या बातमीचा संशय आल्यावरून तो स्वतः त्यांच्या तपासासाठीं त्या विहिरीकडे गेला. कर्मधर्मसंयोगानें त्याला वाटेंत खजुराच्या लहान लहान आठ्या पडलेल्या दिसल्या. त्या धूर्त व चाणाक्ष अरबानें ताबडतोब असा तर्क केला कीं, हें मुहम्मदाचेच हेर असले पाहिजेत, व याच इसमांनीं आपल्या बरोबर आणलेला खजूर खाऊन या बिया टाकून दिलेल्या असाव्यात. लगेच तो तेथून आपल्या कॉफल्याकडे वळला व आपला उंटाचा तांडा घेऊन मार्गस्थ झाला. खजूराच्या बिया दृष्टीस पडतांच अबुसुफयानला एवढें भिण्यासारखें त्यांत काय आहे, असा सहज प्रश्न उत्पन्न होतो. याचें कारण हें आहे कीं, अरबस्थानच्या इतर दुसऱ्या भागांत उत्पन्न होणाऱ्या खजूराच्या बिया मदिनाच्या प्रांतांत होणाऱ्या खजूराच्या बियां पेक्षां फार लहान असतात; अबुसुफयानें याच बिया तपासून पाहिल्या आणि त्यावरून हे मदिनाहून आलेले हेर असावेत असें आपलें ठाम मत केलें. अबुसुफयानचा तर्क बरोबर होता किंवा चुकीचा होता, हें आतां आपणास थोड्याच वेळानें समजेल.

## २ कुरेश सैन्य मक्केतून निघतें.

अबुसुफयाननें मक्केमध्यें पाठविलेला मनुष्य मोठ्या झपाट्यानें मुक्काम जाऊन पोंचला. शहराच्या वेशीवर जातांच त्यानें आपल्या

आंगांत घातलेल्या कपड्याच्या फाडून चिंध्या केल्या, शहरांतील रस्त्यानें जातांना तो आपल्या उंटावर उलटा बसला, आणि धांपा टाकीत काबा शरीफच्या दरवाजांत जाऊन दाखल झाला. त्याच्या या विलक्षण तऱ्हे-वरून त्यानें कांहीं तरी अशुभ बातमी आणिली आहे असा सर्व लोकांचा तर्क झाला, व त्यांच्या झुंडीच्याझुंडी काबा शरीफकडे घुसत चालल्या. वर सांगितलेला स्वार त्या लोकांना म्हणाला, "अहो कुरेश, उठा, मदत करा, मुसलमानांच्या तावडींत अबुसुफयान आणि तुमचा कॉफला सांपडला आहे." वरील शब्द लोकांच्या कानांवर पडतांच जो तो मोठ्या विचारांत पडला; परंतु स्वस्थ बसण्याची वेळ नव्हती. कुरेश शिपायांच्या पलटणी एकदम जमा झाल्या, आणि तीन दिवसांमध्यें एक हजार हत्यारबंद ज्वान, शत्रूचा फडशा करून टाकण्याकरितां मक्केच्या दरवा-जांतून बाहेर पडले

## २ हजरत पैगंबरची स्वारी.

### ( ८ जानुआरी इ. स. ६२४ )

याच वेळीं मदिनाशहरीं काय चाललें आहे हें आपण पाहूं. सिरिया देशांतून मक्केला जाणाऱ्या कॉफल्याची तेथून निघण्याची वेळ जेव्हां जवळ येत चालली, तेव्हां ह. मुहम्मदनें आपले दोन हुषार हेर वाळूच्या मैदानांतील वाटेनें या कॉफल्यावर सक्त नजर ठेवण्यास व त्याबद्दल योग्यती खबर देण्यास पाठवून दिले होते. वर सांगितलेले जे हेर अबुसु-फयानला भेटले होते तेच हे दोन हेर होत. एवढेंच करून ह. पैगंबर स्वस्थ बसले नाहींत. त्यांच्या अंतःकरणास कुरेश लोकांनीं केलेला छळ एकसारखा रात्रंदिवस टोंचीत होता. त्यांनीं आपल्या सर्व अनुयायांना एकत्र जमविलें, व आपल्या कट्टया शत्रूंच्या बरोबर लढाई करण्यास सज्ज व्हा, असा त्यांना हुकूम दिला. ह. पैगंबरच्या हुकूमाप्रमाणें सर्व मुसलमान तयार झाले. मदिनाशहरांतील कांहीं परधर्मी लढाईला

तयार झालेल्या मुसलमानामध्यें लुटीच्या आशेनें घुसण्याचा प्रयत्न करीत होते; परंतु ह. पैगंबरनें त्यांना आपल्याबरोबर येण्याची मनाई केली. ते त्यांना म्हणाले, " पहिल्यानें धर्म घ्या, नंतर लढा, जे मुसलमान असतील त्यांना या लढाईंत भाग घेतां येईल. " मदिनाशहरांत या वेळीं जेवढे म्हणून मुसलमान रहात होते ते सर्व ह. पैगंबरबरोबर जाण्यास तयार झाले. फारच थोडे लोक मागें राहिले. त्यांत ह. पैगंबरचा जांवई उसमान हा एक होता. याचें कारण ह. पैगंबरची मुलगी रुकय्या त्याच वेळीं फार आजारी होती आणि म्हणून तिच्या शुश्रुषेकरितां त्याला घरीं राहाणें भाग पडलें. या स्वारीमध्यें ह. पैगंबरच्याबरोबर एकंदर तीनशें लोक, सत्तर उंट, व दोन घोडे मात्र होते. प्रवासाच्या कामांत पुरेशीं जनावरें नसल्यामुळें त्यांना आळीपाळीनें उंटावर बसावें लागे.

आपल्या छोटयाशा परंतु कृतनिश्चयी पलटणीला घेऊन ह. पैगंबर मदीना शहरांतून ज्या दिवशीं बाहेर पडले, त्याच दिवशीं कुरेश लोक मक्केंतून आपलें सैन्य घेऊन बाहेर पडले होते. मुसलमानांपेक्षां हें सैन्य तिप्पट मोठें होतें आणि त्यांच्या जवळ जलद चालणारे सातशें चांगले उंट व शंभर अरबी घोडे होते. कुरेश सैन्यामध्यें वीरांना प्रोत्साहन देण्याकरितां कांहीं गाणाऱ्या स्त्रियाहि घेतल्या होत्या. कुरेश सैन्याचा ज्या ठिकाणीं तळ पडे त्या ठिकाणीं या स्त्रिया युद्धांतील गाणीं म्हणून लढवय्या तरुणांच्या अंतःकरणांत वीरश्री उत्पन्न करीत असत. जेव्हां हें सैन्य बदरकडे जाणाऱ्या रस्त्याला वळलें, तेव्हां त्यांना सिरियाहून निघालेला कॉफला दुसऱ्या एका रस्त्यानें सुखरूप प्रवास करीत चालला आहे, अशी नवी बातमी एका हेरानें आणून दिली. ही बातमी आल्यानंतर सैन्यांतील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांनीं आतां मक्केला परत फिरावें किंवा मुसलमान लोकांच्या पाठीस लागावें, याबद्दल एकत्र वाटाघाट केली. ज्यांनीं त्यांनीं आपल्या सामर्थ्याला अनुसरून सल्ला दिला. त्यांत रक्त

पाताला विशेष तहानेलेले जे तरूण ज्वान होते, त्यांची शेवटीं छाप पडून मक्केला परत फिरावयाचें नाहीं, असा विचार कायम ठरला. ते म्हणाले, ‘ आपण शत्रूचा समाचार घेतल्याशिवाय परत गेलों, तर आपल्याला लोक काय बोलतील ? ते म्हणतील, ‘ याच भागुबाई ? ’ चला, बदरला चला, तेथें सुंदर पाणी आहे, तेथें शत्रूची गांठ पडली तर ठीकच; नाहीं तर हवापाण्याची किती मौज उडेल ?’ सैन्यांतील पुष्कळ लोकांना हा विचार पसंत पडला. जे लोक पुढें जाण्यास नाखुष होते, त्यांनीं मात्र मक्केचा रस्ता धरला. बाकी राहिलेल्या सैन्यांनीं पुढें कूच केलें, व बदर येथें आल्यावर मैदानांतील एका वाळूच्या लहानशा टेकडीच्यामागें त्यांनीं आपला तळ दिला.

इकडे हजरत मुहम्मद व त्यांचे अनुयायी यांनीं तीन दिवस कूच करून, बदरकडे येत असतां, सिरियाहून निघालेला कॉफला, आपल्या तावडींतून निसटला, परंतु कुरेश लोकांचें सैन्य आपल्याशीं युद्ध करण्यासाठीं झपाट्यानें चाल करून येत आहे, अशी त्यांनीं बातमी ऐकिली. लढाईच्या वेळा घरांत न बसतां हातांत शस्त्र घेऊन बाहेर पडलें तर आपल्याला मोठी लूट मिळेल ही जी मदीना शहरांतील शिपायांना आशा होती, ती या बातमीनें पार मावळली. कारण व्यापारी कॉफला दुसऱ्याच वाटेने यांच्या आटोक्याच्या अगदीं बाहेर निसटून गेला होता; तेव्हां आतां लूट मिळण्याची आशा राहिली नाहीं. परंतु कुरेश सैन्य हातांत शस्त्र घेऊन आपली वाट पाहात आहे असें समजतांच त्यांची पांचावर धारण बसली.

ह. पैगंबरनें आपल्या इष्टमित्रांना एकत्र जमविलें आणि आपण आतां पुढें काय करावें, असा प्रश्न त्यांच्यापुढें विचाराकरितां मांडला. अबुबक्र व उमर यांच्यासारख्या मुसलमान पुढाऱ्यांनीं शत्रूवर एकदम हल्ला करावा, असें आपलें मत सुचविलें. ह. पैगंबरनें मदीना शहरांत राहाणाऱ्या कांहीं लोकांच्याजवळ मदीना शहरच्या रक्षणासाठीं जरूर

पडल्यास मदत करण्याचा तह केलेला होता, अर्थात् त्या तहाप्रमाणें त्या लोकांचें कांहींच कार्य यापुढें उरलें नाहीं. म्हणून पैगंबरनें मादिनेला परत जाण्याला यांना परवानगी दिली. ह. पैगंबरबरोबर जे मुसलमानांचे मदतगार म्हणून लोक आले होते त्यांचा पुढारी ह. पैगंबरला म्हणाला, " ह. मुहम्मद पैगंबर तुम्हीं परमेश्वराचे प्रेशित आहांत, आतां तुमच्या मर्जीप्रमाणें कूच करा, लढाई करा, किंवा तह करा. ज्या अल्लानें तुह्माला येथें पाठविलें आहे, त्याची शपथ घेऊन मीं सांगतों कीं, तुह्मीं या पृथ्वीच्या पाठीवर वाटेल तिकडे चला, आम्हीं तुमच्या पाठीशीं आहोंत; आमच्यापैकीं एकहि मागें रहाणार नाहीं. " हें आवेशयुक्त व उत्तेजनपर भाषण ऐकतांच ह. पैगंबरला त्या लोकांचें मोठें कौतुक वाटलें. त्यांच्याहि आंगांत क्षात्रतेज प्रज्वलित झालें, व ते त्यांना म्हणाले, " ठीक आहे, घ्या अल्लाचें नांव आणि चला पुढें. "

## ४ बदरची लढाई

बदरच्या उत्तर आणि पूर्व दिशेला उंच उंच टेंकड्या आहेत, यावरून एक पाण्याचा ओढा वाहात आहे, आणि त्यांच्या पायथ्याच्या जमीनीवर कित्येक विहिरी आणि पाण्याचे झरे आहेत. या टेंकड्यावरून जेव्हां हजरत मुहम्मद खालीं उतरले, तेव्हां ही पाण्याची जागा आपल्या पलटणीच्या छावणीसाठीं त्यानीं पसंत केली; आणि तेथेंच त्यांनीं आपली छावणी ठोकली. रात्रीं प्रवासाच्या त्रासानें मुसलमान लोकांना गाढ झोंप लवकरच लागली. अबुबक्र आणि पैगंबर या दोघांच्या करतां खजूरीच्या पानांचें एक झोपडें तयार केलें होतें. त्यांत ते दोघे विश्रांति करितां जाऊन पडले. एक हत्यारबंद तरूण ज्वान मात्र त्या झोपडीच्या बाहेर रखवालदार म्हणून ठेऊन दिला होता. ज्या रात्रीं हजरत पैगंबरनें आपल्या लोकांसह या बदरच्या खोऱ्यांत तळ दिला, त्या रात्रीं आकाश पावसाच्या ढगांनीं अगदीं कोंदून गेलें होतें, थोड्याच वेळानें पावसाचा

धूमधडाका सुरू झाला, आणि त्या एकांत प्रदेशांत थंडगार वारा मोठ्या सोंसाट्यानें वाहूं लागला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं हजरत मुहम्मदनें आपले लढवय्ये एकत्र जमविले व शत्रूचा हल्ला येईपर्यंत एका जागेवर ठाम उभें रहाण्याचा त्यांना हुकूम दिला.

इकडे कुरेश सैन्यानें शत्रूला तोंड देण्याकरितां निघण्याची तयारी चालविली. त्यांच्यामध्यें जयाबद्दल संशय आणि अविश्वास असल्या कारणानें लढवय्यांची हालचाल जितक्या उत्सुकतेनें व्हावयास पाहिजे होती तशी ती न होतां, जो तो जणूं काय जुलमानें लढाईला आला आहे असा दिसे. मुसलमानांच्या हालचालीची बातमी आणण्याकरितां जो एक हेर रवाना झाला होता, तो याचवेळीं तेथें आला व ह्मणाला, ' शत्रूचें सैन्य लहान आहे, परंतु उंट कितपत टिकतील याचा संशय आहे; त्यांचा सर्व आधार फक्त तरवारीवर आहे, ते मृत्यूला तोंड देण्याला तयार आहेत; आणि शत्रूच्या नरडीचा घोट कधीं घेऊं असे ते उताविळ झाले आहेत. विचार करा ! पाहा. आपल्या हातून त्यांच्यापैकीं एक मेला तर आपल्यापैकीं ते एकाचा तरी बळी घेणार खास. असेंच जर झालें तर जिवंत रहाणाराची काय किंमत उरणार !" वरील शब्द अबुजहलच्या कानांवर पडताच त्यानें या भित्रेपणाबद्दल त्या हेराची खूप खरडपट्टी काढीली; आणि ज्या एका मनुष्याच्या भावाला नाखलाच्या झटापटींत मुसलमानें ठार मारिलें होतें, त्या मनुष्याला जमीनीवर सांडलेल्या त्याच्या भावाच्या रक्ताची आठवण करून दिली. या मनुष्यानें आपल्या आंगांतील कपड्यांच्या फाडून चिंध्या केल्या; डोक्यावर धूळ घातली आणि वेड्या प्रमाणें आपल्या भावाच्या नांवानें मोठमोठ्यानें आक्रोष करूं लागला. या विपरीत देखाव्यानें कुरेश लोकांचें थंड पडलेलें रक्त बरेंच गरम झालें. सूड घेण्याची इच्छा पुन्हां वर डोकाऊं लागली व मागें परतण्याचा विचार त्यांनीं सोडून दिला.

याला फार वेळ झाला नाहीं, तोंच त्यांचें सैन्य टेंकड्यावरून खालीं उतरतांना दिसूं लागलें. जमीन उरणीची होती, यामुळें सर्व लोकांना एकदम टेंकड्यावरून खालीं येतां येईना. यावरून मुसलमान लोकांचा असा ग्रह झाला कीं, शत्रूचें सैन्य आपल्या ऐकिवापेक्षां बरेंच कमी आहे. हा समज चुकीचा आहे हें हजरत पैगंबर पूर्ण जाणून होते. कारण खरी वस्तुस्थिती काय होती हें त्यांच्या कानांवर होतें. हजरत पैगंबर तेथून आपल्या झोंपडींत शिरले आणि आपल्याला जय मिळावा ह्मणून त्यांनीं ईश्वराची प्रार्थना केली. 'हे प्रभो, संकटांत मदत करण्याचें तुझें ब्रीद आहे, आणि त्याचप्रमाणें तूं मला वचन दिलें आहेस, त्याचें स्मरण असूं दे. या माझ्या छोट्या सैन्याचा जर नाश झाला तर तुझी शुद्ध भक्ति करण्याला जगांत कोणीहि मिळणार नाहीं, आणि मूर्तिपूजा मात्र सर्वत्र पसरेल.'

शत्रु, हजरत पैगंबरच्या पाठीवर अगदीं येऊन ठेपले होते, परंतु मुसलमान त्यांच्या हुकुमा प्रमाणें जागच्याजागीं ठाम उभे राहिले होते. विहिरी ताब्यांत घेण्यासाठीं थोड्याशा झटापटी झाल्या, परंतु अद्याप लढाईला प्रत्यक्ष तोंड लागलें नव्हतें. अरब लोकांत द्वंद्व युद्धाची पद्धत अनेक शतकें प्रचारांत होती, व तिला अनुसरून मक्केच्या सैन्यांतील शअबा, उतबा, व वलीद या तीन प्रख्यात योद्धयांनीं तीन मुसलमान बहाद्दरांना द्वंद्व युद्धासाठीं आव्हान केलें. या आव्हानाला उत्तर देण्यासाठीं पुष्कळ तरूण मुसलमान वीर पुढें सरसावले; परंतु हजरत पैगंबरनें त्या सर्वांना मागें सारिलें, व आपल्या भाऊबंदांकडे वळून म्हणाले, "हाशमच्या शूर पुत्रांनों उठा, आणि आपापल्या अधिकाराप्रमाणें युद्धाला पुढें व्हा" हजरत पैगंबरच्या तोंडून हे शब्द निघतांच तीन इसम मोठ्या आनंदानें आवेशयुक्त गर्जना करून पुढें सरसावले. या पैकीं पहिला भर उमेदींत असलेला क्षत्रिय ज्वान, दुसरा पांसष्टवर्षे वयाचा, व

तिसरा आपली निशाणाची खूण शिरस्त्राणांत एक पिसाचा तुरा घातलेला असे होते. या तिघांच्याहि आंगांत चिलखतें व डोकींत शिरस्त्राणें होतीं.

मक्केंतील योद्ध्यांनी सामन्याला आलेल्या आपल्या शत्रुंना त्यांचीं नांवें विचारिलीं. पैगंबरच्या चुलत्यानें उत्तर दिलें, "माझें नांव हमजा, अबदुल मुत्तलिब माझे वडील." म्हाताऱ्या मनुष्यानें आपलें नांव, "उबैदा, असें सांगितलें ! व ज्या तरुणानें आपल्या डोकीवर तुरा लटकाविला होता, तो हजरत मुहम्मदचा चुलतभाऊ अबुतालिबचा मुलगा, त्यानें आपलें नांव "अल्लि," असें सांगितलें. या क्षत्रिय वीरांनीं आपल्या शत्रूवर मोठ्या जोरानें वार केले.

एका झपाट्याबरोबर हमजा आणि अल्ली यांनीं आपापल्या शत्रूंना जमिनीवर लोळविलें, परंतु उबैदाची झटापट बराच वेळ चालली होती. शेवटीं त्यानेंहि आपल्या शत्रुला जमीनदोस्त केलें. त्यांत त्याला बऱ्याच जखमा होऊन तो घायाळ झाला.

आपले तीन रणबहादर पडलेले ऐकतांच कुरेश लोकांचा धीर खचला. त्यांच्या डोळ्यांपुढें मुसलमानांचें सैन्य उभें होतें, परंतु तें या कुरेश लोकांना मृत्युप्रमाणें दिसूं लागलें; तथापि त्यांचा मुख्य अबूजहल खरा चाणाक्ष योद्धा होता. त्यानें आपल्या सैन्यांत पसरलेली निराशा ताबडतोब ओळखून, सर्वांस गंभीर व अधिकारयुक्त वाणीनें "भिण्याचें कारण नाहीं, हल्ला चढवा," असा हुकूम केला. अधिकाऱ्याच्या हुकूमाचा अंमल तत्क्षणीं सर्व सैन्यावर झाला. कुरेश सैन्य हातांत तरवारी घेऊन मुसलमानांवर जाऊन पडलें. इकडे मुसलमान लोक शेवटच्यावेळची वाट पहातच होते. तरवारींवर तरवारी आदळल्या, ढालांवर पडलेले तरवारींचे घाव कानांवर आदळूं लागले. घायाळ शिपायांच्या कर्कश किंकाळ्यांनीं, त्या ऐकणाराचें काळीज प्रतिक्षणीं चरचर होऊं लागलें. अशा प्रकारची धुमश्चक्री चालली असतां अल्लीनें अंगांतील चिलखत फेंकून देऊन, "मरेन किंवा मारीन," अशा कृतनिश्च-

यानें आपल्या शत्रुंमध्यें उडी घेतली. त्यावेळचा अलीचा आवेश, त्याचें शौर्य, आणि त्याचा पराक्रम पाहून मुसलमान वीर देहभान विसरून गेले. त्यांच्या अंगांत असें कांहीं अद्भूत सामर्थ्य आलें कीं, प्रत्यक्ष मृत्युसुद्धां त्यांना कस्पटाप्रमाणें दिसूं लागला.

बदरच्या रणमैदानांवर या थंडगार दिवशीं जें निकराचें युद्ध झालें, त्याच्या अनेक गोष्टी अरब इतिहासांत वाचावयास मिळतात; त्या येथें देत बसणें योग्य होणार नाहीं; कारण त्यांपैकीं खऱ्या किती व खोट्या किती हेंहि निर्णयात्मक सांगतां येणार नाहीं.

## ५ मुसलमानांचा जय.

युद्ध चालू असतांना, पैगंबर आपल्या सैन्यांतील लोकांना धीर देत इकडून तिकडे एकसारखे हिंडत होते. मधून मधून ते त्यांना सांगत, "अल्ला आपल्या पाठीशीं उभा आहे, रणांत पडतील त्यांच्या करित स्वर्गाचें द्वार उघडें आहे." इतक्यांत वाऱ्यानें मुसलमानांचा पक्ष धरिला, आणि पावसाच्या भयंकर तुफानी वाऱ्याच्या वादळांनीं त्या डोंगरांच्या उतरणी झाडून साफ करण्यास सुरवात केली. त्या उतरणीवर उभें असलेलें कुरेश सैन्य पाठीवरील वादळाच्या जोरानें खालीं शत्रूच्या माऱ्यांत घसरत येऊन पडलें. शत्रूची ही दैना पाहातांच पैगंबर म्हणाले, "पहा, जिब्राइल आपले हजार दूत घेऊन हे डोंगर झाडून साफ करीत आहे." यानंतर थोड्याच वेळांनीं दुसऱ्या वादळाला सुरवात झाली. या वेळीं मिकाईल आणि त्याचे दूत मुसलमानांच्या हांकेला धांव मारीत येत होते. सत्याचा पाठीराखा खरोखर ईश्वर आहे, हा सिद्धांत या एका उदाहरणावरून अगदीं स्पष्ट निदर्शनास येतो.

लढाईच्या निकालाचा कांटा अद्याप समतोलच होता, तेव्हां ह. पैगंबरनें आपल्या हातांत एक मूठभर खडे घेतले व ते शत्रूच्या अंगावर

फेंकून दिले. ते म्हणाले, " एकच गोंधळ उडो. " काय ईश्वरी चमत्कार पहा ! मक्केच्या सैन्याची एकच गडबड उडली. समोर उभे असलेल्या शत्रूचें भान ते साफ विसरले, आणि वेडयाप्रमाणें भांबावून गेले. अशा गोंधळांत जो तो आपल्या जीवाच्या बचावासाठीं उपाय शोधूं लागला. मुसल्मान योद्धयाचें पुढें पुढें सरणें चालूच होतें. ह. पैगंबरनें जेव्हां आपल्या शत्रूची उडालेलीं गाळण पाहिली, तेव्हां त्यानें शत्रूवर निकराचा हल्ला करण्याचा हुकूम सोडला. मुसलमानांच्या तीव्र माऱ्यापुढें व नैसर्गिक संकाटाच्या पाठीवरील जोरापुढें कुरेश सैन्य लटपटूं लागलें.

कुरेश लोकांचें सैन्य मुसलमानांच्या सैन्यापेक्षां तिपटीनें मोठें होतें, त्यांच्या जवळ चांगली लढाऊ हत्यारें व घोडे होते, म्हणून शत्रूवर जय मिळण्यासारखी त्यांची वेळ आली असूनहि ऐन प्रसंगीं त्यांच्या कृतकर्मानें डाव साधला, असें म्हटल्याशिवाय राहावत नाहीं. कुरेश लोकांनीं रणक्षेत्राला पाठ दाखऊन पाय काढिला; आणि आपल्या कट्या शत्रूच्या रक्तासाठीं तहानेलेल्या मुसलमानांच्या तरवारी त्यांच्या मागें लागल्या.

कुरेश लोकांचें सैन्य प्राण रक्षणाकरितां सैरावैरा पळूं लागलें. गेल्या रात्रीच्या पावसानें पाण्यानें भरलेल्या वाळूच्या खड्यांत कांहीं लोक पळतां पळतां पडले, कांहींनीं आपल्या आंगावरील चिलखतें, व हातांतील शस्त्रें रस्त्यांत फेंकून दिलीं; व कांहीं तरुण ज्वान पळून जाण्यापेक्षां मेलेलें बरें, अशा विचारानें मुसलमानांच्या बरोबर लढतां लढतां जमिनीवर पडले. त्यांचे बहुतेक मुख्य मुख्य अधिकारी या लढाईंत मारले गेले; त्यांमध्यें त्यांचा प्रसिद्ध सेनापती, मुसलमानांचा कट्टा शत्रू अबुजहल हाहि मारला गेला.

## ६ लुटीची वांटणी.

कुरेश सैन्यांतील एकोणपन्नास लोक धारातीर्थी पडले, आणि पुष्कळ लोक मुसलमानांच्या हातांत सांपडले. मुसलमानांचे फक्त चवदा इसम

रणावर पडले. कुरेश सैन्य जेव्हां प्राण वांचविण्यासाठीं पळूं लागलें, तेव्हां तळ दिलेल्या आपल्या जागेवर आपल्याबरोबर आणलेल्या पुष्कळ तऱ्हेच्या निरनिराळ्या वस्तु त्यांनीं टाकून दिल्या. शत्रूचा बराच लांबपर्यंत पाठलाग करून झाल्यावर मुसलमानांचें सैन्य रणक्षेत्रावर पुन्हां आलें. त्यावेळीं सूर्य अस्तास जाण्याच्या बेतांत होता. आपल्या पक्षाचे आणि शत्रुपक्षाचे जे जे लोक रणांत मरून पडलेले होते, त्यांना मूठमाती देण्याकरितां हजरत पैगंबरनें स्वतः आपल्या नजरे समोर खड्डे खणवून, त्यांत सर्व प्रेतांना व्यवस्थेशीर मूठमाती देवविली. हें कृत्य आटोपल्यानंतर ह. पैगंबर, शत्रूनें आपल्या छावणींत टाकून दिलेल्या व मुसलमानांनीं लूट म्हणून जमविलेल्या मालाच्या तपासाकडे वळले.

कुरेश सैन्याच्या सांपडलेल्या मालांत पुष्कळ मौल्यवान किंमतीचाहि माल होता. धान्याचीं पोतीं, तऱ्हेतऱ्हेचे कपडे यांची तर एक मोठी रासच झाली. त्यांचे दीडशें उंट, चवदा घोडे, लढाऊ हत्यारें, चिलखतें, चामड्याच्या अनेक प्रकारच्या वस्तु, आणि चटय्या वगैरे जिन्नस मुसलमानांच्या हातीं अंदाजापेक्षां अधिक लागल्या.मनुष्य स्वभावाला अनुसरून विजयी सैन्यांतील लोकांना त्या वस्तुंची हांव सुटणें अगदीं स्वाभाविक आहे. लुटीची विभागणी कशी करावी, याबद्दल शेवटीं ह. मुहम्मदच्या लोकांत वाद उत्पन्न झाला. जे लोक फक्त छावणीचे संरक्षणाकरीतां ठेऊन दिलेले होते, त्यांच्या हिश्शापेक्षां लढाईत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्यांनीं अधिक मोठ्या हिश्शावर आपला हक्क सांगितला; परंतु हजरत पैगंबरानें लुटींच्या मालाचे असे लहान मोठे भाग पाडण्याचें नाकारिलें. त्यांनीं सर्वांचे सारखे असे भाग पाडून सर्वांच्या मेहनतीचा गौरव केला. बदरच्या लढाई नंतर मिळालेल्या लुटीची वांटणी ह. मुहम्मदनें घालून दिलेल्या या वेळच्या नियमाप्रमाणें आज तागायत मुसलमान लोकांत लुटीची वाटणी होत असते. धर्माकरितां त्यांतील एक पंचमांश भाग काढून

ठेविला होता. त्याच भागांत हजरत मुहम्मद व त्यांचे कुटुंब. गोरगरीब इत्यादिकांचा समावेश केलेला होता. राहिलेल्या चार पंचमांश लुटीच्या लढाईंत भाग घेणाऱ्या सर्व इसमामध्यें सारख्या वाटण्या करून हजरत पेगंबरनें वांटून दिले.

शत्रूच्या छावणींतून व रणमैदानांतून सर्व लूट एकत्र जमविण्यास ह. मुहम्मदच्या लोकांना एक दिवस लागला. लुटीची व्यवस्था झाल्यानंतर हजरत शत्रूकडील पकडलेल्या सत्तर इसमांच्या व्यवस्थेकडे लागले. या सत्तर इसमापैकीं दोन इसमांचा अपराध, केवळ लढाईला आले त्याच्यापेक्षां विशेष प्रकारचा होता. मुसलमानी धर्माची पाळेंमुळें खणून काढण्याचा ज्यांचा दीर्घोद्योग होता. ह. पैगंबरला मक्केमध्यें ठार मारण्याचा ज्यांनीं कट केला होता, व त्या कटांत ह. पैगंबरचे प्राण घेण्याकरितां जे हातांत तरवारी घेऊन पैगबरच्या दरवाज्यावर टपून बसले होते, त्यांपैकीं हे वरील दोन इसम होते. सर्वांनुमतें त्यांचा देहांत शिक्षेला पात्र असा अपराध ठरला, सबब त्यांना ह. पैगंबरनें फांशीची शिक्षा दिली, व राहिलेल्या कैद्यांना मदिना शहरीं पाठवून दिलें. मदीना शहरांत शत्रूकडील कैद्यांना ममतेनें वागविण्याची व्यवस्था ह. पैगंबरनें चांगल्या प्रकारें केली होती. अरबलोक लढाईंत सांपडलेल्या आपल्या शत्रूला निर्दयपणानें वागवीत असत, तेव्हां हजरतनें या कैद्यांना जी सवलत दिली तीं पुष्कळांना आवडली नाहीं. हजरतच्या हुकुमाप्रमाणें मुसलमान लोक या कैद्यांना इतक्या चांगल्या रीतीनें वागवीत कीं, ते त्यांना आपल्याजवळ जें चांगल्या प्रकारचें खाणेंपिणें असे तें त्यांना देत, आणि वाटेनें चालतांना ते या कैद्यांना बसण्याकरितां आपले उंट देत व आपण पायानें चालत. हे कैदी मुसलमान लोकांचा हा चांगुलपणा विसरले नाहींत. मक्केंतील या कैद्यांच्या नातेवाइकांनीं तसेंच इष्टमित्रांनीं पैसे भरून कांहीं लोकांची सुटका करून घेतली. जे

कैदी इस्लाम धर्मांत शिरले होते, त्यांच्या पासून कशाचीहि अपेक्षा न करितां त्यांना सोडून देण्यांत आलें; आणि ज्यांच्या नातेवाइकांजवळ पैक्यांची सुटका करून घेण्यास पुरेसा पैसा नव्हता त्यांच्यापैकीं प्रत्ये-काला गांवातील दहा दहा मुलांना लिहिणें व वाचणें हें शिकविण्याचें काम देऊन त्यांना सोडून देण्यांत आलें.

जेव्हां हें विजयी सैन्य मदिनेला जाण्याकरितां तेथून निघालें, त्यावेळीं जैद आणि दुसरा एक जासूद विजयाच्या आनंदाची खबर पोंचविण्यास पुढें निघाले. जैद, हजरत पैगंबरच्या आवडत्या अल्-कास्वा उंटावर स्वार झाला होता, आणि तो मोठ्या त्वरेनें मदीना शहरीं जाऊन पोंचला. ह. पैगंबरचा आवडता उंट आपल्या धन्याशिवाय परत आलेला पाहा-तांच ह. पैगंबर लढाईंत खास पडले अशी लोकांची प्रथम कल्पना झाली. व सर्व लोक जैदकडे धाऊं लागले. हां हां ह्मणतां जैदच्या सभोंवार लोकांची गर्दी जमली. तेव्हां जैद मोठ्यानें ओरडून ह्मणाला, "कुरेश लोकांचा पुरा मोड झाला, आणि पापी अबुजहल लढाईंत ठार झाला."

दुसऱ्या दिवशीं हजरत मुहम्मद मदीना शहरीं येऊन पोंचले, परंतु त्यांची मुलगी रुकय्या मरण पावल्याची दुःखकारक बातमी ऐकण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. आदल्या दिवशीं ज्या वेळीं जैद विजयाची बातमी घेऊन शहरांत शिरला, त्याचवेळीं रुकय्याचा अंत्यविधी पुराक-रून लोक माघारी फिरले होते.

इकडे कुरेश लोकांनीं आपलीं तोंडें खालीं घालून, मक्काशहरांत प्रवेश करतांक्षणींच शहरांतील लोकांना जें आश्चर्य, वाटलें आणि त्यांच्या अंगचा जो संताप उडून गेला, त्याची कल्पनाहि करतां, येणार नाहीं. सैन्यांतील लोकांच्या निरनिराळ्या वस्तु, मौल्यवान वस्तुंनीं भरलेली शत्रूंच्या गाडी, शत्रूंच्या ताब्यांत गेलेली बातमी ऐकून त्यांच्या पायाची आग मस्तकाला जाऊन पोंचली. गांवांत एकच हाहाःकार उडून गेला,

आणि लोकांनीं या अपमानाचा भयंकर सूड घेतल्याशिवाय मेलेल्या लोकांचें सुतकसुद्धां कोणी पाळावयाचें नाहीं, अशी प्रत्येकानें शपथ घेतली.

## ७ सविकची लढाई.

वर सांगितलेल्या गोष्टीला तीन महिने झाले नाहींत तोंच अबुसुफयाननें आपल्या हाताखालीं दोनशें हत्यारबंद घोडेस्वार घेऊन, मदिनेच्या सभोंवतालचा प्रदेश उद्ध्वस्थ करून टाकण्याच्या उद्देशानें मक्केंतून बाहेर पडला. मादिनेंतील लोकांना आपली खबर जाऊन पोंचण्याच्यापूर्वीं आपण आपलें कार्य करून घ्यावें अशी त्याची इच्छा होती; त्यानें आपल्याबरोबर सामानसुमानाचे उंट घेतलेले नव्हते. कारण घाईच्या वेळीं त्यांच्यामुळें अडथळा होतो आणि सामानसुमानाच्या आशेनें कार्यांत विघ्न उत्पन्न होतें. याचा अनुभव त्याला मागील स्वारींत चांगलाच आलेला होता; ह्मणून प्रत्येक घोडेस्वारानेंच आपल्या बरोबर आपल्याला स्वारींत लागणारें खाण्यापिण्याचे जिन्नस व सामान घेतलें होतें. मदीना शहरापासून कांहीं मैलावरील एका सुपीक खोऱ्यांत या लोकांनीं शेतांचा अगदीं नाश करून टाकला; खजुरीच्या झाडांच्या आमराई जाळून पोळून टाकल्या; घरेंदारें जमीनदोस्त केलीं, आणि दोन शेतकऱ्यांना ठार मारिलें. या प्रमाणें त्या खोऱ्यांत अनर्थ करून ते लोक परत फिरण्याच्या बेतांत असतांना हजरत पैगंबर आपले हत्यारबंद लोक घेऊन तेथें अचानक दाखल झाले. मुसलमानांना पाहातांच कुरेश सैन्यांची एकच धांदल उडाली आणि जलदीनें पळ काढतां यावा म्हणून त्यांनीं जागच्या जागींच खाण्यापिण्या करितां नेलेल्या वस्तुंच्या थैल्या टाकून दिल्या. पळतां पळतां मुसलमान त्यांच्या मागें लागले, परंतु प्राणहानि मात्र झाली नाहीं. अबुसुफयाननें यावेळीं बराच शहाणपणा केला, नाहीं तर त्याचे येथें किती लोक ठार झाले असते हें सांगतां येणें कठीण आहे. या लोकांनीं ज्या थैल्या जागच्याजागीं टाकून दिल्या होत्या, त्यांत सातूच्या पिठा

भरलेल्या वऱ्याच थैल्या होत्या. अरब भाषेमध्यें सातूला सविक ह्मणतात; व त्यामुळें या झटापटीस सविकची लढाई असें नांव पडलें.

## ८ तहाची वाटाघाट.

हजरत पैगंबरनें ही स्वारी आटोपून आल्यानंतर मक्केंतील कुरेश लोकांनीं यापुढें आपल्याजवळ वैरभाव न ठेवतां मैत्री करावी ह्मणून अनेक प्रयत्न करून पाहिले. आपसांत शांतता असेल तर उभय पक्षाला त्याच्या पासून अत्यंत सुख आहे, ही गोष्ट हजरतनें आपले चांगले हुषार लोक मक्केला पाठऊन पुष्कळ वेळां कुरेश लोकांची कानउघडणी केली. ते ह्मणत, 'अहो, मक्केंतील रहिवाशांनों, शांततेनें वागण्याचा विचार करून आमच्या जवळ तह कराल तर त्यांत दोघांचाहि फायदा आहे. मुसलमानांना विनाकारण छळणें योग्य नाहीं; त्या विचाऱ्यांनीं आपलें घरदारसुद्धां तुमच्या स्वाधीन करून फक्त एक जीव घेऊन परदेशचा रस्ता धरला. त्यांचा वाली फक्त एक 'अल्ला' आहे. त्यांच्या जवळ मांडलेला वैरभाव आतां सोडून द्या, आणि त्यांना कोठेंहि शांततेनें राहूं द्या. इतकें सांगून जर तुह्मीं आपला दुराग्रह सोडणार नाहीं तर त्या बिचाऱ्यांनीं तरी तुमचा जुलुम किती सहन करावा ? ते सुद्धां सामन्याला जे पुढें येतील त्यांचा पुरा फडशा उडवतील, त्यांची काळजी एका अल्लाला आहे; खऱ्या खोट्याची परीक्षा करणारा तोच समर्थ आहे.' याप्रमाणें ह. पैगंबरनें कुरेश लोकांना अनेक वेळां निरोप पाठविले, परंतु त्याचा कोणीहि विचार केला नाहीं.

## ९ गौरस पेलवान,

कुरेश सैन्य केव्हां येईल व आपल्या शहराचा नाश करील याचा कांहींच भरंवसा उरलेला नव्हता; म्हणून मुसलमान सैन्य आपल्या बचावाकरितां नेहमीं सज्ज असे तें वेळोवेळीं मदीनाशहरांतून बाहेर पडून आसपासचा प्रदेश हिंडून माघारें येई. अशी एक स्वारी बाहेरच्या प्रदेशांत फिरत असतां ह. मुहम्मदच्या लोकांनीं एका सुस्थळीं आपली छावणी ठोकली होती. छावणी सोडून जवळच असलेल्या एका झाडा-

खालीं/ ह. पैगंबर एके दिवशीं दोनप्रहरीं एकटेच स्वस्थ विश्रांति घेत पडलेले असतांना, तेथें गौरस नांवाचा एक मोठा प्रसिद्ध पेलवान ह. पैगंबर समोर येऊन उभा राहिला. हजरतला निःशस्त्र व बेसावध पाहातांच त्यानें आपली तलवार झटकन बाहेर काढिली आणि म्हणाला, "अरे, मुहम्मद, बोल, आतां तुला कोण जिवदान देईल?" पेलवानाच्या अरेरावी प्रश्नाला, त्याच्या क्रुद्धमुद्रेला, किंवा त्याच्या हातांतील तरवारीला यत्किंचितहि न डगमगतां, ह. पैगंबरनें छातीठोक उत्तर दिलें, "अल्ला, सर्वांचा रक्षण कर्ता तोच एक आहे, तोच माझें रक्षण करील." पैगंबरच्या तोंडून हे शब्द अशा आविर्भावानें, विश्वासानें, व बेफिकीर वृत्तीनें बाहेर पडले कीं, ते ऐकतांच पेलवानाचे पाय भीतीनें लटलट कापूं लागले. त्याच्या छातींत एकदम धडकी बसली व त्याच्या हातांतील तरवार पटकन जमिनीवर खालीं पडली. ह. पैगंबरनें झटदिशीं त्या तरवारीला आपला हात घातला आणि लगेच उभें राहून, त्यांनीं तीच तलवार पेलवानावर उगारली आणि ह्मणाले, "चल, बोल, आतां तुला कोण वांचविणार?" "ज्याचा प्राण घेण्याकरितां आपण तरवार उचलली, तो आतां आपला काय प्राण ठेवणार!" या विचारानें त्याची बोबडी वळली. तरीसुद्धां अडखळत अडखळत तो ह्मणाला, "मला जिवदान द्या, आपल्याशिवाय माझें संरक्षण कोण करणार? माझी वाट लावण्याचें आपल्या हातांत आहे." पेलवानाच्या या शद्वांनीं हजरतच्या अंतःकरणांत दयेचा पाझर फुटला. ते ह्मणाले, "अरे अधर्मी, अशा आणिबाणीच्याहि प्रसंगीं तुझ्या तोंडून त्या अल्लाचें नांव निघत नाहीं! तुझ्यासारखा हतभागी जगांत दुसरा कोणहि नसेल. जा, कृतकर्माचीं फळें भोग. परंतु आजपासून तरी दया ह्मणजे काय हें शीक." हजरत पैगंबरनें त्या पेलवानाला त्याची तरवार परत दिली! त्यांच्या या सर्व कृत्याचा त्या अडदांड मनुष्यावर इतका चमत्कारिक परिणाम झाला कीं, त्यानें ह. पैगंबरला आपल्याला इस्लाम धर्म देण्याची तेथेंच विनंति केली आणि तो त्या दिवसापासून हजरतचा अत्यंत विश्वासु असा एक नोकर बनला.|

# भाग ११ वा.

## ओहदची लढाई इ. स. ६२५

### विषय.


१ यहुदी लोकांचा बेइमानपणा.
२ बिबी फातमाचें लग्न.
३ आवासचे हजरत पैगंबरला पत्र.
४ ह. पैगंबराचें स्वप्न.
५ ओहदची लढाई.
( १ ) रण क्षेत्र.
( २ ) द्वंद्व युद्ध.
( ३ ) ह. मुहम्मद जखमी.
( ४ ) मुसलमानांचा पराजय.
( ५ ) हिंदबाईचें राक्षसी कृत्य.
६ लढाईचा शेवट.
७ यहुदी लोकांना शेवटचा खलिता.


## १ यहुदी लोकांचा बेइमानपणा.

मनुष्य स्वभावांत एक मोठा नैसर्गिक चित्रविचित्र धर्म परमेश्वरानें निर्माण करून ठेविला आहे. त्याला दुसऱ्याचा उत्कर्ष ऐकून समाधान होत नाहींच, उलट आपल्यापेक्षां कमी दर्जाला तो केव्हां येईल याची तो वाट पहात असतो. दुसऱ्याचा उत्कर्ष ऐकून आपल्या अंतःकरणांत आनंद मानून घेणारे महात्मे जगांत नाहींत असें ह्मणतां येणार नाहीं. परंतु अशा विभूतीं फार विरळा असते, असा जगाचा इतिहास स्पष्ट सांगतो. याचें प्रत्यक्ष उदाहरण मुसलमानांचा व यहुदी लोकांचा कलह हें एक आहे. बदरच्या लढाईंत मुसलमान लोकांना जय प्राप्त झाला याच्याबद्दल यहुदी लोकांना द्वेष वाटण्याचें कांहीं एक कारण नसतां ते ती लढाई झाल्या दिवसापासून मदीना शहरांत मुसलमानांशीं कांहींतरी

कुरापत काढून एखादी क्षुल्लक गोष्ट सुद्धां तंट्यापर्यंत नेत असत. बदरच्या लढाईंत मुसलमान विजयी झाले ही गोष्ट त्यांना नैसर्गिक स्वभाववैचित्र्यामुळें सहन झाली नाहीं! दिवसेंदिवस त्यांचा मत्सर वाढत चालला. मुसलमानाशिवाय जे ह्मणून लोक त्यांना भेटत त्यांना हे यहुदी लोक मुसलमानांच्या विरुद्ध चिथवून बदरच्या लढाईंत झालेला अपमान भरून काढा असा त्यांना सल्ला देत. ‘ बाबांनो, उठा, तुमच्या वाडवडिलांचा अभिमान बाळगा, त्यांच्या धर्माची ध्वजा मुसलमानांच्या पायाखालीं देऊं नका,’ अशा विषयाच्या निरनिराळ्या प्रकारच्या कविता तयार करून त्या ते ह्मणत व जिकडे तिकडे हिंडत. अरब लोकांना काव्य फार प्रिय आहे. ज्या ज्या ठिकाणीं नवीन काव्य ऐकण्याचा योग असतो, अशा ठिकाणीं जाऊन आपल्या मनाची शांतता करून घेण्यास ते कधीं हि चुकावयाचे नाहींत. यहुदी लोकांना अरब लोकांच्या स्वभावाची पूर्ण ओळख झालेली होती, ह्मणून ते मुसलमानांच्या विरुद्ध चळवळ करण्याचा उपदेश अनेक प्रकारच्या काव्याच्या रूपानें करीत. हजरत पैगंबरनें या लोकांना स्वस्थ रहाण्यासाठीं सर्व प्रकारचे उपाय करून पाहिले पण त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. त्यांनीं यहुदीलोकांना आपल्या धर्माप्रमाणें चालण्यास परवानगी दिली होती. आपसांतील तंट्या बखेड्याचा न्याय त्यांचा त्यांनींच करावा, अशी व्यवस्था करून दिली होती; तथापि यहुदी लोकांचें मन शांत म्हणून होईना! मदीना शहरच्या बाहेर असलेल्या मुसलमानांच्या शत्रूंजवळ त्यांनीं स्नेहसंबंध केला, आणि मदीना शहरांत हजरत पैगंबरचा खून करण्याचा एक कट करून त्यांत सर्व सामील झाले!

एकदां असें झालें कीं, एक अरब कुमारिका दूध विकण्याकरितां मदिना शहरांतील एका रस्त्याच्या कडेला बसली होती. त्या तरुणीला दूध विकतांना पाहून कितीएक उमेदवार यहुदी तरुण तिची थट्टा मस्करी करूं लागले. तिनें आपल्या तोंडावरून बुरखा घेतलेला होता.

त्या पोरांपैकीं एकजण हळूच त्या मुलीच्या मागें आला आणि तिच्या तोंडावरून खालीं आलेला पदर तिच्या मागें असलेल्या एका दगडाला बांधून ठेविला. दूध विकण्याचें काम संपतांच ती जाण्यासाठीं उभी राहतांच तिच्या तोंडावरचा बुरखा निघाला. हें पाहतांच यहुदी पोरांनीं हंसून तिची थट्टा करण्यास सुरवात केली. ती बिचारी इतकी लज्जित झाली कीं, तिचा तेथून पायसुद्धां झटकन उठेना. हा सर्व प्रकार जव- ळूनच कांहीं मुसलमान पाहात होते; त्यांना आतां मात्र रहावेना. त्या मुलीची त्यांना दया आली, आणि त्यांनीं त्या मुलांना दरडाविलें. तीं पोरेंहि माथेफिरूच होतीं. त्यांनीं जबाबाला उलट जबाब, अरेस कारे, असा प्रकार चालविला. ह. पैगंबराला ही बातमी जाऊन पोंचली. थोड्याच अवकाशांत दोन्हीं पक्षाला ज्यांचे त्यांचे लोक येऊन मिळाले, आणि हत्यारें बाहेर निघालीं. कापाकापी सुरू होणार, इतक्यांत ह. पैगंबर तेथें येऊन पोंचले. त्यांनीं तत्क्षणीं मुसलमानांना मागें हटविलें, आणि ते यहुदी लोकांना म्हणाले ' मदीना शहरांत आम्हीं शांततेनें राहूं असें कबूल करून आतां असा तुम्हीं दंगा कां करतां ?" आमच्या जवळ एकवेळ झालेल्या ठरावाप्रमाणें तुम्हांला वागणें आतां भाग आहे.' ह. पैगंबरच्या तोंडून निघालेले हे शब्द त्यांना आवडले नाहींत. त्यांनीं जबाब दिला, " तुम्हांला मध्यें पडण्याचें कारण नाहीं. आमचे हितअहित आम्हीं पाहून घेऊं. ज्यांना युद्ध माहीत नसेल तशांना तुम्हीं अक्कल शिकवा, परंतु आमच्याजवळ कांहींएक गडबड चालणार नाहीं. यापेक्षां जास्त कांहीं करणें असेल तर त्याला आमचीहि तयारी आहे." यहुदी लोकांची नजर फांटलेली दिसतांच ह. पैगंबरला वाटलें कीं, या लोकांचा जर चांगला बंदोबस्त झाला नाहीं, तर ते स्वस्थ बसणार नाहींत, व दुसऱ्यांनाहि स्वस्थ बसूं देणार नाहींत; तेव्हां या लोकांना मदीना सोडून दुसऱ्या ठिकाणीं रहाण्यास पाठविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. गांवांतील मुसलमान लोकांना या लोकांपासून पावलों पावलीं त्रास

होऊं लागला व त्याच्या सर्व फिर्यादी ह. पैगंबरकडे येऊं लागल्या. यहुदी लोकांची रग जिरविण्याचें सामर्थ्य मुसलमान लोकांच्या अंगांत भरपूर होतें, परंतु ह. पैगंबरच्या हुकमाशिवाय ते बिचारे करणार काय? ह. पैगंबरनें तरवारी बाहेर काढण्यास त्यांना परवानगी दिली नाहीं. मात्र यहुदी लोकांना शांततेचा तह मोडल्याबद्दल शासन म्हणून गांवांत त्यांना राहूं न देतां त्यांनीं गांवाच्या बाहेर रहावें असा त्यांना हुकूम दिला.

## २ बिबी फातमाचें लग्न.

बदरची लढाई होण्याच्यापूर्वीं थोडे दिवस ह. पैगंबरची मुलगी फातमा हिचें लग्न अलिबरोबर जुळलेलें होतें, परंतु या लढाईच्या कारणामुळें लग्न होण्याचें राहून गेलें. लढाई झाल्यानंतर हें लग्न तीन महिन्यांनीं झालें. लग्नामध्यें अलिचें वय वीस आणि बिबी फातमाचें पंधरा होतें. योग्य वेळीं बिबी फातमाला दोन मुलगे झाले, ह. हसन व ह. हुसेन अशीं त्यांचीं नांवें होतीं. ह. पैगंबरच्या मागें हेच त्यांचे दोन नातु हयात होते. हे पुढें रणशूर वीर म्हणून जगप्रसिद्ध झाले, व त्यांच्या शौर्याच्या गोष्टी जगजाहीर झाल्या. त्यांची हृदयद्रावक गोष्ट अरबस्थानच्या इतिहासांतील करबलाची लढाई हा भाग वाचला असतां कळून येईल.

## ३ आबासचें हजरत पैगंबरला पत्र.

बदरच्या लढाईला एक वर्ष होऊन गेलें तथापि कोठेंहि शांतता म्हणून स्थापन होईना. मुसलमानांनीं एक मोठा दिग्विजय संपादन केला खरा, परंतु शत्रूच्या क्रोधाग्नीच्या ठिणग्या जिकडे तिकडे पसरत चालल्या होत्या. मदिनाच्या बाहेरील प्रदेशांत "सूड सूड" अशी एकच ओरड सर्वत्र सुरू होती. शांत आकाशांत वादळाचीं चिन्हें डोकाऊं लागलीं, आणि त्यांवरून ह. पैगंबरांना असें कळून चुकलें कीं,

आपले शत्रू आपल्या मनाची पूर्ण शांतता करून घेतल्याशिवाय कधींहि स्वस्थ बसणार नाहींत. त्यांच्या मनाला ही जी धास्ती वाटत होती, ती मात्र निराधार नव्हती. ते सुद्धां जसजसा वेळ मिळे व संधि मिळे त्या प्रमाणें मुसलमान लोकांना भावी संकटाची सूचना देऊन त्यांना नेहमीं जागृत करून ठेवीत असत. अशा स्थितीमध्यें मदीनाशहरच्या बाहेरील कूबा खेड्यांत त्यांना कांहीं कारणानिमित्त जाऊन रहाण्याचा प्रसंग आला. तेथें ते असतांना मक्केहून एक जासूद त्यांच्या भेटीसाठीं तेथें आला, व त्यानें एक मोहोरबंद पत्र त्यांच्या हातांत दिलें. हें पत्र पैगंबरचा चुलता आबास याच्या हातचें असून त्यांत त्यानें " मक्केहून तीन हजार कुरेश ज्वान मुसलमानांवर सूड घेण्यासाठीं लवकरच निघणार आहेत तेव्हां तुम्हीं सावध असावें, " असें लिहिलें होतें. आबास यानें मुसलमानी धर्म घेतलेला नव्हता, किंवा त्याला त्या धर्माचा फारसा अभिमानहि नव्हता; तथापि त्याला आपल्या पुतण्याच्या प्राणाची व त्याच्या कल्याणाची जबरदस्त काळजी वाटे; म्हणून त्यानें वर सांगितलेलें गुप्त पत्र एका जासुदाबरोबर पाठविलें होतें. हजरत पैगंबरनें जासुदाबरोबर आलेल्या संदेशाचा गुप्तपणा मोठ्या काळजीनें राखून ठेविला होता. परंतु यहुदी लोकांनीं ही बातमी फोडली; यामुळें गांवांत जिकडे तिकडे भीतीनें एकच धांदल उडाली. मक्केहून आलेल्या बातमीवरून असें प्रसिद्ध झालें होतें कीं, ' कुरेश लोकांची ही पलटण विशेष पराक्रमी व कृतनिश्चयी आहे, मक्केंतील लोकांनीं मुसलमानांचा नायनाट करण्याचा निश्चय केला आहे, आणि अबुसुफयान बरोबर आलेल्या व्यापारी कॉफल्यानें व्यापारांत मिळविलेला सर्व नफा शहरवासी लोकांनीं या सैन्याच्या खर्चाकडे लाविला आहे.' कुरेश लोकांनीं बोडोविन लोकांच्या लढव्या टोळ्यांना या पुढील लढाईच्यावेळीं भाग घेण्याकरितां जासूद पाठवून बोलाविलें आणि चिलखतें वगैरे युद्धसामुग्रीनें सज्ज झालेले सातशे तरुण

घोडेस्वार व बाकीचे हत्यारबंद मिळून तीन हजार तरुण जिवावर उदार होऊन कुरेश लोकांच्या अभिमानानें घरांतून बाहेर पडले ! त्यांत उत्तम अरबी घोडेस्वार दोनशें होते आणि बाकीचे सांडणीस्वार होते. मक्का शहरांतील पंधरा स्त्रिया या योद्धयांना वीरश्री यावी ह्मणून रणांत वीरश्रीची गाणीं ह्मणण्यासाठीं या सैन्याबरोबर निघाल्या होत्या. त्यांत अबुसुफयानची बायको प्रमुख होती. हमजानें आपल्या बापाला बदरच्या लढाईत ठार मारलें याचा सूड घेऊन त्याचें जमिनीवर पडलेलें रक्त डोळ्यांनीं केव्हां पाहीन असें तिला झालें होतें.

हजरत पैगंबरच्या हातांत वरील पत्र पडतांच ते तेथून निघाले व मदीना शहरीं येऊन दाखल झाले. लगेच शहर संरक्षणाची तजवीज करण्याच्या उद्योगास ते लागले. तथापि मक्केंतील सैन्य ओहद पर्वताच्या खालील सपाट मैदानावर तळ देऊन मदिनेच्या आसपासचा प्रदेशातील शेतवाड्यांचा, फळझाडांचा विध्वंस करीपर्यंत आणि जिकडे तिकडे सर्व प्रदेश उजाड होईतोंपर्यंत ह. मुहम्मदची अंतस्थ व्यवस्था ठाकठीक झाली नव्हती. शत्रूसैन्याकडील बातमी वेळोवेळीं आपणास मिळावी ह्मणून ह. पैगंबरनें हुषार हेरांची त्या कामाकडे योजना केली होती. हे हेर शत्रूवर नजर ठेऊन त्यांची इथंभूत बातमी लगेच ह. पैगंबरला देत असत. कुरेश लोकांच्या दुष्टपणाला सीमा राहिली नव्हती. गरीबबिचाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या डोळ्यांदेखत आपल्या शेतवाड्यांचा होत असलेला नाश त्यांच्यानें पाहावेना. अनेक वर्षें काबाडकष्ट करून तयार केलेले बागबगीचे, फळझाडें, इत्यादिकांचा सत्यानाश पाहून त्यांनीं दुःखानें हंबरडा फोडला. काय करतील बिचारे ! त्यांचे सर्व जीवित ज्याच्यावर अवलंबून त्याची अशी दुर्दशा त्यांना कशी सहन होणार ! राहाण्याला त्यांना घरदारसुद्धां राहिलें नाहीं, ह्मणून त्यांनीं आपलीं गुरेंढोरें घेतलीं व मदिनेचा रस्ता धरिला. वास्तविक विचार

केला, तर हे शेतकरी अगदीं निरपराधी होते. त्यांचा कुरेश लोकांनीं द्वेष करण्यासारखें भांडण, तंटा वगैरे कांहीं एक नव्हतें; असें असूनहि त्यांनीं आपल्या नुकसानीची जबाबदारी ह. पैगंबरवर न टाकतां ते इतर लोकांबरोबर ओढवलेलें दुर्दैव भोगण्यास तयार झाले!

## ४ हजरत पैगंबरचें स्वप्न.

हजरत पैगंबरनें आपले क्षत्रीय वीर एकत्र जमविले आणि शहरांत राहून आपण आपलें फक्त संरक्षण करावें किंवा पुढें होऊन आपण लढाई करावी, असा प्रश्न त्यांच्यापुढें ठेविला. त्यांत दोन्ही मतांचे लोक होते. ह. पैगंबरसारखे वयानें व अनुभवानें जे लोक मानमान्यता संपादन करून सामान्य लोकांपेक्षां वरच्या दर्जाला पोंचले होते, त्यांचें मत ह. पैगंबरप्रमाणें ह्मणजे शहर न सोडतां आपला फक्त बचाव आपण करावा असें होतें; परंतु तरुण ज्वानांचें मत त्यांच्या विरुद्ध पडलें. शहरचा बंदोबस्त असो किंवा लढाईचा प्रसंग असो, या दोन्हीं ठिकाणीं तरुण लोकांच्या हिंमतीवर जय किंवा अपजय सर्वस्वी अवलंबून असतो. अर्थात त्यांच्या शद्बाला अशावेळीं मान्यता देणें अगदीं योग्य आहे. ह. पैगंबरसमोर या रणबहाद्दरांच्या वीरश्रीनें दुसऱ्या पक्षाला निस्तेज करून टाकिलें. ह. पैगंबरनें आपण शहरांत राहून आपण शहराचें संरक्षण करावें असें आपलें स्वतःचें मत दिलें, परंतु त्याचा कांहीं एक उपयोग न होतां, बहुमताला त्यांना मान देणें भाग पडलें. त्या रात्रीं मदिना शहरांतील हत्यारबंद तरुणांनीं ह. पैगंबर ज्या घरांत रहात असत त्या घराच्या दरवाजावर सक्त पाहारा केला. हजरत त्या रात्रीं फारच अस्वस्थ होते. स्वस्थपणानें झोंप यावी म्हणून ते अंथरुणावर जाऊन पडले, इतक्यांत त्यांचा डोळा लागला व एक स्वप्न पडलें. ‘ आपल्या आंगांत चिलखत असून आपण एका मेंढ्यावर स्वार झालों आहोंत, परंतु आपल्या हातांतील तरवार खालीं जमिनीवर पडली आणि तिचे तुकडे तुकडे झाले; आणि आपल्यासमोर

एका बैलाला कापण्याचें काम चाललें आहे.' दुसऱ्या दिवशीं त्यांनीं गांवांतील सभ्य व वृद्ध मनुष्यांना बोलावून आणिलें आणि या स्वप्नाचा काय अर्थ होतो असा त्यांना प्रश्न केला. सर्वांनीं विचार करून पाहिला परंतु स्वप्नाचा उलगडा कोणाकडून कांहीं होईना; तेव्हां ह. पैगंबर म्हणाले, " माझी तलवार खालीं पडून तिचे तुकडे झाले यावरून माझ्या शरीराला दुखापत होणार आहे, ठार मारलेला बैल या शहरांतील लोकांचें नुकसान होणार आहे असें सुचवितो. मी मेंढ्यावर स्वार झालेला आहे त्यावरून सैन्यांत कत्तल होणार असें दिसतें, आणि माझ्या आंगांत चिलखत आहे यावरून मदिना शहराला तटबंदीमुळें तें शत्रूपासून सुरक्षित राहील असें भाविष्य दिसतें. तेव्हां शत्रूच्या आंगावर चाल करून जाणें मला धोक्याचें दिसतें." जमलेल्या वृद्ध मनुष्यांना हजरतचा विचार फारच मान्य झाला. तेथें अबदल्ला या नांवाचा एक इसम होता, त्याच्याकडे शहर रक्षणाचें काम सोपविलें होतें. तो म्हणाला, " आपलें शहर अद्याप बाल्यावस्थेंत आहे; शत्रूचे निकराचे हल्ले सोसण्याची आज शहरची स्थिति नाहीं. आपण शहर सोडून गेलों तर आपलें फार मोठें नुकसान होईल. कुरेश लोकांना तेथेंच बसूं द्यावेत, लढाई न करितां स्वस्थ बसण्यांत त्यांचेंच नुकसान आहे. आपण लढाईकरितां पुढेंच गेलों नाहीं. तर ते आज नाहीं तर उद्यां कंटाळून निघून जातील." अबदल्लाच्या सल्याप्रमाणें शहरच्या बाहेरील रहिवाशांना आंत बोलवावें आणि शत्रूंनीं शहरावर हल्ला केलाच तर भिंतीवरून आणि घरांच्या छपरावरून त्यांच्यावर बाण, धोंडे वगैरे मारून हल्ला परतवावा असें ठरलें. म्हाताऱ्या म्हाताऱ्या लोकांनीं हा ठरविलेला विचार तरूण पिढीला काय मान्य होणार ! त्यांतील एक जण पुढें झाला आणि म्हणाला, " व: आणि आम्हीं काय घरांत बसून भाकऱ्या भाजाव्या ? आणि शत्रूनीं आमच्या घरादारांची लूट

करावी ? अरबस्थान आमच्या तोंडावर थुंकेल! तें कांहीं नाहीं, पुढें व्हा, शत्रूचा फडशा करा, आणि तेथें दुसरें बदर करा."

वर लिहिलेल्या एका ठिणगीनें जिकडे तिकडे भडका उडाला. ज्याच्या त्याच्या तोंडून, "वाहवा, वाहवा," असे उद्गार मोठ्या आवेशानें बाहेर पडले. तरुणांच्या तरवारी झपाझप म्यानांतून बाहेर निघून सूर्य प्रकाशांत चमकूं लागल्या. बिचारे हजरत पैगंबर थंडगार बसले. आपल्या स्वप्नाचें भविष्य स्पष्ट दिसत असतांना या लोकांच्या बरोबर आपल्याला वागणें भाग पडणार आहे, या विचारानें त्यांचें मन त्रिस्त झालें. परंतु एवढ्या लोकांच्यापुढें ते काय करणार! तो शुक्रवारचा दिवस होता व मशीद लोकांच्या गर्दीनें चिकार भरून गेली होती. ह. पैगंबर आपली आठवड्याची नमाज पढून स्वकर्तव्यांतून मोकळे झाले. नंतर ते पीठावर उभे राहून सर्व लोकांना, "युद्धाविषयीं पुन्हां पुन्हां विचार करण्याचें कारण नाहीं, तुम्हां सर्वांना युद्ध करणें मान्य आहे, त्याला मीहि आपली अनुमती देतों. हें धर्माकरितां युद्ध आहे, हें मात्र लक्षांत ठेवा." असें म्हणाले.

## ५ ओहदची लढाई.

संध्याकाळ झाल्यावर हजरतनें आपलें शिरस्त्राण व चिलखत चढविलें, कमरेला तरवार व पाठीवर ढाल लटकावली, व ते घरांतून बाहेर पडले. त्यांच्याबरोबर त्यांचे छोटेसें मुसलमान सैन्यहि शहरच्या बाहेर पडलें. हजरत पैगंबरची शस्त्रास्त्रांनीं सज्ज झालेली भव्य व सुंदर मूर्ति पाहून अशा अलौकिक विभूतीला आपण आपल्या दुराग्रहानें इरेस घातलें, याबद्दल पुष्कळ तरुणांना पश्चाताप होऊन ते हजरतला ह्मणाले, "आपल्या सल्ल्याप्रमाणें आह्मी वागण्यास तयार आहोंत." परंतु ही वेळ परत विचार करण्याची नव्हती. ते ह्मणाले, "माझ्या शब्दाला मान द्या, असें मी तुह्मांस सांगितलें; परंतु तें तुह्मांस रुचलें नाहीं. पैगंबरनें

एक वेळ अंगावर चढविलेला संग्राम पोषाख खालीं उतरणें त्याला शोभत नाहीं. आतां त्याचे शत्रू व पैगंबर यांच्या कलहाचा निकाल ता एक अल्ला करणार ! चला, धैर्य धरा. तोच एक तुह्मांला विजयी करील." असें ह्मणून त्यानें आपल्या सैन्याचे तीन भाग केले व प्रत्येक भागावर एक एक अधिकारी नेमला. इस्लाम धर्माची पांढरी तीन निशाणें या प्रत्येक भागांत फडकत होतीं.

## ( १ ) रण क्षेत्र.

मुसलमानांचे सर्व मिळून एक हजार सैन्य होतें. त्यांत तीनशें बाजारबुणगेच होते, परंतु तेहि रणक्षेत्रापर्यंत जाऊन पोंचण्याच्या आधींच हळुहळु मागें रहात चालले; ह्मणजे खरे लढवय्ये फक्त सातशेंच होते. कुरेश लोकांच्या तीन हजार लोकांबरोबर हे सामना करण्यास तयार झाले ! कुरेश सैन्यानें आपला तळ ओहद पर्वताच्या पायथ्याखालीं दिला होता. हजरत पैगंबरनें आपल्या सैन्याच्या तळाकारितां त्याच पर्वताची दुसरी बाजू पसंत करून पर्वताच्या पायथ्याशीं आपला तळ दिला. खरोखर दोन्ही सैन्यें एकमेकांच्या इतकीं नजीक होतीं कीं त्यांना शत्रूसैन्यांतील घोड्यांच्या खिंकाळण्याचा आवाज स्पष्ट ऐकूं येत होता.

दुसऱ्या दिवशीं सूर्योदय झाल्याबरोबर मुसलमान लोक बाहेर पडले. त्यांना जवळची वाट दाखऊन एक वाटाड्या पर्वताकडे घेऊन गेला. सूर्य आकाशांत वर आला आणि ह. पैगंबरचें सैन्य आपल्या कडव्या शत्रूसमोर जाऊन उभें राहिलें. ती नमाज पढण्याची वेळ होती. बिलालनें खालीलप्रमाणें बांग पुकारली. "परमेश्वराची शक्ति आगाध आहे, त्याच्या वांचून दुसरा देव नाहीं. हजरत मुहम्मद ईश्वराचा प्रेशित-पैगंबर आहे. नमाज पढण्यास चला. मुक्तिच्या मार्गाकडे चला. परमेश्वर सर्वशक्तिमान आहे आणि त्याच्याशिवाय दुसरा देव नाहीं." पैगंबर नमाज पढले; आणि सर्व मुसलमान सैन्यानें त्यांचें अनुकरण केलें. मुसलमान

लोकांचे नमाज पडण्याचें कार्य सुरू असतांना, अबदल्ला व कांहीं यहुदी लोक यांचे आपसांत कांहीं खलबत होऊन ते व मुसलमान सैन्यांतील आणखी कांहीं लोक रणक्षेत्र सोडून मदीना शहरच्या रस्त्याला लागले! उरलेले मुसल्मान अल्लाचें नांव घेऊन हजरत पैगंबराच्या हुकुमाला शिरसावंदन करून मृत्यूला तोंड देण्यास तयार झाले.

ओहद पर्वत मागें घेऊन पुढील एका उंच जमीनीवर ह. पैगंबरनें आपलें सैन्य उभें केलें. त्याच्या डावीकडे खडकांची एक भिंत लागून गेली होती, आणि तिच्यामध्यें शत्रूला बाहेर पडण्यासारखे एक भगदाड पडलेलें होतें. या भगदाडाचा उपयोग शत्रूला करून घेतां येऊं नये म्हणून ह. पैगंबरनें आपले उत्तम तिरंदाज शेजारच्या टेकडीवर ठेऊन दिले होते, आणि लढाईचा शेवट कांहीं होवो, त्यांनीं आपली जागा न सोडतां शेवटचा हुकूम होईपर्यंत तेथेंच ठाम रहावें अशी सक्त ताकीद ह. मुहम्मदनें त्यांना देऊन ठेविली होती.

ह. पैगंबरच्या सैन्याचे जसे तीन भाग केलेले होते. त्याचप्रमाणें कुरेश अधिकाऱ्यानें आपल्याहि सैन्याचे तीन भाग करून ते तीन अधिकाऱ्यांच्या हाताखालीं दिले होते. लढाईंत निशाण धरण्याचा अधिकार ज्या कुळाकडे पूर्वींपासून चालत आला होता, त्याच कुळांतील प्रसिद्ध योद्धा तालहा यानें यावेळीं निशाण आपल्या हातांत धरलें होतें. सैन्याची डावी बगल अबुजहलच्या मुलाच्या देखरेखींखालीं आणि उजवी खालीदच्या देखरेखीखाली दिली होती. तो धाडशी, शूर, आणि कोणत्याहि प्रसंगी न डगमगणारा योद्धा होता.

## (२) द्वंद्वयुद्ध.

अरब लोकांच्या त्या वेळच्या संग्रामच्या पद्धतीप्रमाणें युद्धाला प्रारंभ द्वंद्व युद्धानें झाला. सैन्याबरोबर आलेल्या गाणाऱ्या स्त्रिया प्रथम आघा-

डीला होत्या, परंतु प्रत्यक्ष जेव्हां युद्धाला प्रारंभ झाला, तेव्हां तेथून त्या पिछाडीला बंदोबस्ताच्या ठिकाणीं गेल्या. या ठिकाणीं त्या अनेकप्रकारचीं गाणीं व वाद्यें वाजवून योद्धयांना उत्तेजन देत होत्या. कुरेश सैन्यांमधून प्रथम निशाण धरणारा तालहा सिंहासारखी गर्जना करून आपल्या तरवारीचे हातवारे करीत पुढें सरसावला. त्याला पाहातांच अलि वीरश्रीनें बेहोष होऊन शत्रूच्या रक्तासाठीं तहानेलेली आपली पाणीदार तरवार हवेंत फिरवीत फिरवीत शत्रू समोर दाखल झाला. दोघांचेहि युद्धकौशल्य अवर्णनीय होतें. मृत्यूचा धिःकार करणारे हे रणबहादर एकमेकांवर वार करीत, व ते शिताफीनें चुकवीत. शेवटीं तालहाची नजर चकली व अलिच्या वज्राघाताखालीं तो जमिनीवर ठार होऊन पडला. तालहाच्या भावानें लगेच भावाच्या पश्चात् आपल्याकडे निशाण धरण्याचा मान घेतला, व तो युद्धाला तयार झाला. या वीराचा समाचार घेण्यासाठीं हमजा पुढें सरसावला. दोन्हीं वीरांच्या तरवारी एकमेकांच्या तरवारींवर मोठ्या आवेशानें आदळल्या, परंतु दोघेहि वांचले. हमजाच्या दुसऱ्या वाराचा तडाका शत्रूच्या शिरावर असा जोराचा बसला कीं, त्याला देवाचें नांव घेण्यालाहि फुरसत न मिळतां त्यानें आपला प्राण सोडला! निशाण धरणाऱ्या घराण्यांतील एका मागून एक असे आणखी तीन वीर धारातीर्थीं पडले. कुरेश सैन्यांतील हे नांवाजलेले, रणबहादूर थोड्याच वेळांत जमीनदोस्त झालेले पाहातांच, त्या सैन्यांत एकच खळबळ उडून गेली, व प्रत्येक मनुष्य भीतिनें गर्भगळित होऊन गेला. इकडे मुसलमान वीर हर्षानें डुलूं लागले. अबुसुफयान आपल्या सैन्यांत इकडून तिकडे एकसारखा फिरत होता, त्याच्या लक्षांत आपल्या सैन्याची ही स्थिति येतांच, त्यानें मुसलमानांवर एकदम हल्ला चढविण्याचा हुकूम दिला; तेव्हां दोन्ही सैन्यें तरवारी बाहेर काढून एकमेकांवर निकरानें घसरलीं.

बेदरच्या लढाईंत मुसलमान ज्या वीरश्रीनें, आवेशानें व अभिमानानें लढले, त्याच वीरश्रीनें आतांहि लढले. त्याचा परिणाम लगेच दिसूं लागला. कुरेश सैन्य मुसलमान सैन्यापेक्षां मोठें असून सुद्धां तें त्यांच्यापुढें फिकें पडूं लागलें. मुसलमानांचा क्रोधाग्नी त्यांच्या स्वाभिमानानें व आवेशानें इतका भडकून गेला कीं, त्याच्या धगधगींत ज्वाळांत कुरेश सैन्य जळून भस्म होऊं लागलें ! मारूं किंवा मरूं अशा कृतनिश्चयानें युद्धाच्या ज्वाळा ज्या ठिकाणीं भडकलेल्या दिसत, त्या ठिकाणीं अलीच्या डोक्यावरील पांढरा आणि हमजाच्या शिरस्त्राणावरील शहामृगाच्या पिसाचा तुरा दृष्टीस पडे. या अतुल पराक्रमी वीरांच्या तलवारींनें कित्येक कुरेश वीरांना कंठस्थान घातलें ! मुसलमान सैन्याला आपलाच जय होणार अशी खात्री वाटूं लागली; त्यांच्या आंगांत वीरश्री खेळूं लागली, व तत्क्षणीं त्यांनीं शत्रूची फळी फोडून ते त्यांच्यावर जाऊन तुटून पडले. त्यांनीं शत्रू सैन्याची दाणादाण करून सोडिली, व ते जीव बचावण्यासाठीं जिकडे वाट फुटेल तिकडे धांऊं लागले. शत्रूंनीं रणांतून पाय काढतांच मुसलमान वीर हातांत तरवारी घेऊन त्यांच्या मागें लागले ! परंतु दुर्दैव म्हणतात तें हें. जे मुसलमान कुरेश सैन्याला पिटाळून लावीत होते, त्यांना मध्येंच दुर्बुद्धि आठवली ! त्यांनीं शत्रूचा पाठलाग करण्याचें सोडून देऊन लूट मिळविण्याच्या आशेनें ते शत्रूच्या छावणीकडे वळले ! इकडे समोरच्या टेंकडीवर जे तिरंदाज शत्रूचा दरवाजा धरून ठेवण्यास उभे करून ठेविले होते, ते लढाईचा सर्व प्रकार पाहात होते. आपल्या सैन्यानें दाखविलेल्या पराक्रमानें त्यांनांहि अनिवार हर्ष झाला. मुसलमान सैन्य शत्रूच्या मागें लागून त्यांना हांकून लाविल्यावर ते लुटीकरितां छावणीकडे वळलेले पाहातांच, त्यांच्याहि तोंडास पाणी सुटलें व आतां येथें थांबण्याचें कारण नाहीं, अशा समजुतीनें त्यांनीं आपली जागा सोडून लूट मिळविण्याकरितां शत्रूच्या छावणीकडे

घुसले. विनाश काळे विपरीत बुद्धि म्हणतात तें अक्षरशः खरें. दरवाजा मोकळा होतांच खालिद लगेच आपले घोडेस्वार घेऊन खिंडींतून बाहेर पडला आणि त्यानें मागच्या बाजूनें मुसलमान सैन्यावर निकराचा हल्ला चढविला. आपल्याला मागें चांगली मदत आहे हें पाहातांच पुढें पळण्याचें सोडून ते मागें वळले व त्यांनीं समोरून मुसलमानांवर हल्ला केला. झालें. मागें पुढें शत्रू व मध्यें हे आशेखोर, उतावळे मुसलमान सांपडले. हं, हं, म्हणतां कर्माचें पारडें फिरलें व लढाईचा रंग बदलला. मुसलमानांची कत्तल सुरू झाली. कुरेश सैन्य हुबल आणि ऊझा या देवतांच्या नांवानें रणगर्जना करीत हातांतील आपल्या तलवारीना मुसलमानांच्या रक्ताचें स्नान घालीत चालले. धैर्यमेरु हमजा आपल्या लोकांना अशा आणीबाणीच्या प्रसंगींसुद्धां धैर्य देत असतां, एका अबिसिनियन शिपायानें संधी साधून हमजाच्या छातींत कट्यार खुपसून त्याला ठार मारिलें. हमजा जमिनीवर पडतांच मुसलमानांचें धैर्य पार खचलें.

## ( ३ ) ह. मुहम्मद जखमी.

इकडे ह. पैगंबर तिरंदाजानें आपला हुकूम मोडलेला पाहातांच " आपले नशीब फिरलें " असें म्हणाले. मुसलमानांची होत असलेली कत्तल पाहून त्यांना आपल्यावर आकाश कोसळलें असें वाटलें. हा वेळ होईतोंपर्यंत ते पिछाडीलाच होते; परंतु जेव्हां मुसलमानांचे लोक एकसारखे कापले जाऊं लागले व त्यांचा सर्वस्वी आधार जो हमजा तोहि जमीनदोस्त झाला, तेव्हां ते रणाला पाठ दाखऊन जीव बचवण्यासाठीं पाय काढूं लागले. ह. पैगंबरनें या पळून जाणाऱ्या लोकांना मागें परतण्याचा हुकूम केला, परंतु अशावेळीं त्यांचें काय चालणार ! ह. पैगंबर पिछाडी सोडून आघाडीला आले, तथापि सैन्य मागें म्हणून हटलें नाहीं. शत्रूचें सैन्य सपाटीवर उतरलें आणि त्यानें ह पैगंबरला वेढा देऊन बाणांची वृष्टि सुरू केली. दुर्दैवानें त्यांतील एक बाण

त्यांना लागलाच. तो त्यांच्या ओठावर लागला आणि त्यामुळें त्यांचा एक दांत पडला. या बाणाच्या दुखापतीनें ते जमिनीवर घायाळ होऊन पडले. त्यांचे स्नेही सोबती त्यांच्याजवळ जमले, आणि मोठ्या प्रयत्नांनीं त्यांना त्यांना एका पर्वताच्या एकांत अशा गुहेंत नेऊन ठेविलें.

मक्केतील लोकांना ह. मुहम्मद मरण पावले असें वाटलें. “ मुहम्मद मेला, मुहम्मद मेला, ” अशी त्यांनी एकच कोल्हेकुई केली. या अशुभ ओरडण्यानें आकाश भरून गेलें, आणि त्याच आवाजांत तीन वर्षांच्या मागें अल्–आकावा नांवाच्या भूतानें मक्के नजिकच्या डोंगरांतील गुहेंत सत्तर लोकांना, ज्या शब्दानें भिवविलें होतें, तेच शब्द पुन्हा मुसलमानांच्या कानांवर येथें पडले.

## ( ४ ) मुसलमानांचा पराजय.

हजरत पैगंबरला त्यांच्या स्नेह्यांनीं गुहेंत नेल्यानंतर त्यांच्या जखमा त्यांनीं धुऊन काढल्या व त्यांना जरा आराम वाटेल, असे उपाय केले. ह. पैगंबरचा क्रोध अद्याप शांत झाला नव्हता; अस्वस्थ स्थितींत त्यांच्या तोंडून असा शाप निघाला. “ पैगंबरचे रक्त त्याच्याच अंगावर शिंपडणाऱ्या पापी चांडाळांचा नायनाट होवो. ” थोड्या वेळांनीं त्यांना जरा बरें वाटलें, व ते आपल्या लोकांची काय हालहवाल आहे हें पहाण्यासाठीं गुहेंतून बाहेर पडले. आपला सेनापती पडला, म्हणून हात पाय गाळून गर्भगळित झालेल्या मुसलमान लोकांनीं मागें लागलेल्या शत्रूच्या पुढें पळतां पळतां सभोंवतीं असलेल्या टेकड्या, डोंगर यांचा आश्रय धरिला आणि तेथें ते लपून बसले. लढण्याच्या श्रमानें ते थकून गेले होते. त्यांपैकीं बरेच गाढ झोंपी गेले. ओहद पर्वताच्या आसपासच्या सर्व देखाव्याला भयाण, स्मशानाचें स्वरूप प्राप्त झालें होतें.

कुरेश सैन्य रणमैदानांवर जमलें आणि तेथें मरून पडलेल्या शत्रू-कडील शिपायांची जनावरांप्रमाणें झालेली स्थिती पाहून त्यांना कृतकृत्य

झाल्याचा आनंद झाला. ह. पैगंबरचें प्रेत यांत कोठें तरी सांपडेल, या आशेनें त्या लोकांनीं पुष्कळ तपास केला; कारण ते मरण पावले अशी त्यांची ठाम समजूत होती. अबुसुफयानच्या आनंदाला सीमाच उरली नव्हती. आपल्या जन्माचें आज सार्थक झालें इतकी धन्यता त्याला वाटली. गर्वानें मत्त झालेला तो सेनापती, 'अरे मुहम्मद, अरे अबुबक्र, अरे उमर,' अशीं नांवें घेऊन त्या पर्वताच्या पायथ्याशीं मोठमोठ्यानें हाका मारी. यावेळीं जिकडे तिकडे शांतता पसरली होती. आपल्या हांकेला कोणीहि जबाब देत नाहीं असें पाहून तोच ओरडला, "तो मेला, चला, पाठीची ब्याद एकदांची सुटली." अबुसुफयानचे चाललेले चाळे उमर त्याच पर्वताच्या उतरणीवर उभा राहून पाहात होता; त्यानें आपल्या दुष्मानाच्या तोंडचे हे शेवटचे शब्द ऐकतांच उत्तर दिलें, "अरे, परमेश्वराचा दुष्मान, आम्हीं जिवंत आहोंत; आजच्या दिवसाचा भरपूर मोबदला तुम्हांला मिळेल, घाबरूं नका." अबुसुफयाननें उत्तर दिलें, "ठीक, तयारी आहे. बदरच्या लढाईचा मोबदला आज तर हा घे. रणांवर काय पडलें आहे, हें डोळ्यांनीं नीट पाहा. हा आमच्या हुबल आणि ऊझाचा पराक्रम आहे; समजलास. धन्य आहे त्यांची." उमरच्या पाठीमागें ह. पैगंबर होते, त्यांच्या सुचनेवरून पुन्हा तो म्हणाला, "अरे, तुम्हीं परमेश्वराचे शत्रू. तो आमचा वाली. पुन्हां वर्षानें आपण बदर येथें भेटूं. विसरूं नको." उमरच्या निर्भिड शद्बानें अबुसुफयान जरा थबकला. तो उमरला प्रत्यूत्तर न देतां तसाच मागें वळून चालूं लागला. रणांगणावर मरून पडलेल्या कुरेश लोकांच्या प्रेतांना मूठमाती देण्याची त्यानें नंतर व्यवस्था केली; व ती सर्व पुरी झाल्यावर सूर्यास्ताच्या सुमारास त्यानें आपल्या सैन्याला कूच करण्याचा हुकूम दिला.

## ( ५ ) हिंदबाईचें राक्षसी कृत्य.

मदीना शहरांतील लोकांना या अपजयाची बातमी पोंचतांच पुष्कळ लोकांनीं रणमैदानाकडे धूम ठोकली, आणि जो तो आपला नातेवाइक शोधूं लागला. या लोकांच्या बरोबर शहरांतील कांहीं बायकाहि आल्या होत्या, त्या सर्व जखमी लोकांच्या शुश्रुशेकडे लागल्या. खडकावर, दगडावर व वाळूंत पडलेल्या आपल्या नातेवाइकांना पाहून बायकांनीं आकांत केला; त्यांतून मरून पडलेल्या मनुष्यांना शत्रूनीं निर्दयपणानें छिन्नविछिन्न केलेलें पाहून तर त्यांच्या अंतःकरणाचें पाणी झालें. कुरेश सैन्यांतील हिंद नांवाच्या एका बाईनें मरून पडलेल्या मुसलमान लोकांचे कान व नाकें कापून त्यांची एक माळ बनविली, व ती तिनें आपल्या गळ्यांत घातली ! तिनें हमजाचे पोट फाडून व काळीज बाहेर काढून तें तोंडांत घातलें! परंतु तिला तें गिळवेना ह्मणून तिनें तें थुंकून टाकिलें! अरब लोकांमध्यें रणांगणावर मरून पडलेल्या शत्रूला अशा प्रकारें छिन्न विछिन्न करून टाकण्याची चाल फार प्राचीन काळापासून चालत आलेली होती, परंतु ह. पैगंबरनें ही अमानुष चाल बंद करून टाकण्याचा भलेपणा घेतला.

मुसलमान लोकांकडील मृत्युमुखीं पडलेल्या लोकांची संख्या सत्तर होती. बदरच्या लढाईंत सुद्धां कुरेश लोक सत्तरच मेले होते, हें आपण मागें वाचलेंच आहे. मुसलमान लोकांत जे जखमी झाले होते, त्यांमध्यें अबुबक्र, अल्लि व उमर हेहि होते. हजरत पैगंबरची मुलगी बिबी फातमा, हमजाची बहिण सफिय्या हिला बरोबर घेऊन तेथें आली. हजरत पैगंबरच्या जखमा तिनें आपल्या हातानें पुन्हा साफ धुतल्या व त्या बांधल्या. हमजाला जमिनीवर पडलेला पाहून त्याच्या बहिणीनें आकांत केला. तिचे त्या वेळचे दुःख पाहून हजरत पैगंबरच्या आणि बिबी फातमाच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा लोटल्या.

या लढाईचा असा दु:खकारक शेवट झाला ! जे रणांवर मृत्युमुखीं पडले त्यांच्या बायकांनीं कितीतरी शोक केला. हमजा आपल्या आंगच्या शौर्यानें, पराक्रमानें, सरळ स्वभावानें गांवांत ज्याला त्याला प्यार झालेला होता; त्याच्या आंगच्या सद्गुणानें त्याच्या जीवाला जीव देणारे असे त्याचे स्नेही सोबती पुष्कळ होते. त्याच्या मृत्युमुळें ज्याला दु:ख झालें नाहीं, ज्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा लोटल्या नाहींत, असा मनुष्य विरळा. ज्या रणक्षेत्रावर त्यानें आपले प्राण सोडले व ज्या ठिकाणीं प्रेताचा अंत्यविधी झाला, त्याच ठिकाणीं कालांतरानें या थोर पुरुषाच्या सन्मानार्थ एक मशिद बांधण्यांत आली. पुढें मक्केला जाणारे येणारे यात्रेकरू या मशिदींतील कबरीचें दर्शन घेऊं लागले. कालांतरानें सर्व यात्रेकरूंना हीच चाल पुढे चालवावी लागली व ती तशीच आज तागायत चालू आहे.

## ( ६ ) लढाईचा शेवट

ओहदच्या लढाईत जे धारातीर्थीं पडले, त्यांच्याबद्दल कुराणांत असें सांगितलें आहे. " अल्लाच्या मार्गांत मेल्याप्रमाणें जे पडलेले दिसतात त्यांच्याबद्दल दुसरा विचार करूं नका. स्वर्गांत अल्लाच्या सानिध्यांत ते आनंदानें रहात आहेत. त्यानें जी त्यांच्यावर कृपादृष्टी केली आहे, त्यांत ते राजी आहेत, आणि जे त्यांना अद्याप जाऊन मिळाले नाहींत, परंतु त्यांचे अनुकरण करणार आहेत, त्यांच्याबद्दल त्यांना आनंद वाटत आहे. संकटांची त्यांना पर्वा नाहीं किंवा दु:ख त्यांना शिवत नाहीं. "

ओहदची लढाई झाल्यानंतर दुसरे दिवशीं ह. पैगंबरनें आपल्या सैन्यांतील शिल्लक राहिलेले लोक एकत्र करून त्यांस कुरेशसैन्य मदीना शहरावर चाल करून जातें कीं काय हें पहाण्यासाठीं शत्रूच्या मागोमाग पाठविलें. यावेळीं अबुबक्रनें मुसलमानांचे शुभ्र निशाण हातांत धरलें होतें. तो लढाईत झालेल्या जखमानें आजारी होता, तथापि मोठ्या कष्टानें

घोड्यावर स्वार होऊन शत्रूच्या सैन्याची टेहळणी करण्यास निघाला. जरी मुसलमान सैन्याचा यावेळीं पराभव झाला होता, तरी आपल्या शहरचा बंदोबस्त करण्यास आपल्या अंगांत सामर्थ्य आहे, हें कुरेशलोकांना समजावें हा या स्वारीचा हेतू होता. कुरेश लोकांनीं मदीना शहरावर स्वारी करावी कीं काय, याचा विचार करण्याकरितां एका ठिकाणीं त्यांनीं वाटेंत मुक्काम केला; तेथें या प्रश्नाविषयीं अधिकारी वर्गांत बरीच वाटाघाट होऊन स्वारीचा बेत तहकूब करून स्वदेशीं परत जाणें योग्य असें त्यांच्यामध्यें ठरलें; कारण त्यांचे लोक चालण्यानें व लढाईच्या त्रासानें अतिशय कंटाळून गेले होते. ह. पैगंबर आणि त्यांचे लोक आपल्या छावणींत पांच सहा दिवस राहिले; आणि मक्केंतील सैन्य खरोखर स्वदेशीं परत गेलें आणि आपलें शहर आतां निर्भय आहे, अशी खात्री झाल्यावर ह. पैगंबर आपलें छोटें सैन्य घेऊन मदीना शहरीं निघून गेले.

ओहदच्या लढाईंत ह. पैगंबरला आपलाच जय होणार अशी खात्री होती, म्हणून त्यानें लढाईला आपली अनुमती दिली. त्यांच्या सैन्याची मांडणी वगैरे गोष्टी पाहिल्या तर ह. पैगंबर रणक्षेत्रावर जरूर असणाऱ्या कौशल्यांत किती वाकबगार होते याची खात्री पटते. दूरवर विचार करून त्यांनीं आपल्या सैन्याला जे हुकूम दिले होते, ते जर त्यांच्या लोकांकडून अमान्य झाले नसते, तर विजयाची माळ त्यांच्याच गळ्यांत बिनतक्रार पडली असती. तिरंदाजानां ऐन आणिबाणीच्या वेळीं लुटीचा मोह कां बरें सुटावा ? परंतु भवितव्यापुढें कुणाचे कांहिंएक चालत नाहीं, असें या वरून स्पष्ट दिसतें.

इकडे कुरेश सैन्याला आपण मुसलमानांची खोड चांगलीं जिरवली म्हणून अत्यानंद झाला होता. मक्का शहरांत दाखल होतांच अबुसुफयान प्रथम काबा मंदिरांत गेला आणि हुबल देवाची त्यानें अनन्यभावानें प्रार्थना करून आभार मानले. तेथून तो घरीं गेला व मुसलमानांचे

पारिपात्य होई तों पर्यंत ज्या ज्या गोष्टी त्यानें करण्याचें वर्ज केलें होतें त्या त्या करण्यास सुरूवात केली.

ओहदच्या लढाईंत झालेला पराजय ह. पैगंबरला अनेक मार्गानें दुःखदायक झाला. लोकांवर त्याचें जें एक प्रकारचें वजन बसलें होतें तें या आपत्तीमुळें बरेंच कमी झालें. मैदानांतून भटकणाऱ्या कित्येक टोळ्या पूर्वी ह.पैगंबरच्या विरुद्ध होत्या, त्यांतील कांहीं बदरच्या लढाईमुळें ह.पैगंबरला सामील झाल्या होत्या. परंतु कुरेश लोकांच्या चिथावणीवरून ओहदच्या लढाईनंतर त्याहि आतां त्यांच्यावर फिरल्या. मदीनाच्या बाहेरील प्रदेशांत असलेल्या फळझाडांचा व शेतवाड्यांचा नाश या टोळ्या करून सोडीत असत, म्हणून ह. पैगंबर त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं वारंवार आपले हत्यारबंद लोक निरनिराळ्या ठिकाणीं पाठवीत असे. एकवेळ मक्केनजिक असलेल्या राजी नांवाच्या खेड्यामध्यें वर सांगितलेल्या टोळ्यांच्या बंदोबस्तासाठीं पाठविलेल्या सहा मुसलमान लोकांची व एका भटकणाऱ्या टोळीची गांठ पडली. मुसलमानांना पाहातांच त्या टोळींतील लोकांनीं आपलीं हत्यारें बाहेर काढून चार मुसलमान ठार केले; जिवंत राहिलेल्या दोन इसमांना कैद करून मक्केंत पाठवून दिलें, व तेथें बदरच्या लढाईंत ज्या कुटुंबांतील इसम मेले होते, त्या कुटुंबांना हे दोन इसम गुलाम म्हणून विकून टाकिले. कांहीं दिवस त्या बिचाऱ्यांनीं तुरुंगांत काढिले, आणि नंतर त्यांना मक्केच्या बाहेर नेण्यांत आलें. तेथें पुष्कळ लोकांसमक्ष त्यांना ठार मारण्यांत आलें. मारण्यापूर्वी "इस्लाम धर्म सोडून द्याल तर तुह्मांला आह्मीं सोडून देऊं," असें कुरेश लोकांनीं त्यांना सांगून पाहिलें, परंतु त्या लोकांचा धर्मावर इतका जबरदस्त विश्वास बसला होता कीं, त्यांना आपल्या जिवाची काडीभरसुद्धां किंमत वाटली नाहीं. त्यांना जेव्हां खांबाला बांधिलें, तेव्हां त्यांनीं परमेश्वराची प्रार्थना केली! "या लोकांच्याकडे पाहा, यांना याच यातना भोगूं दे, यांच्या पैकीं एकहि सोडूं नको." त्या दोन मुसलमा-

नांच्या सभोंवती ज्या लोकांचा गराडा पडला होता, त्यांची छाती वरील शापानें धडधड करूं लागली; व आपल्याला हा शाप बाधू नये, ह्मणून ते जमीनीवर सपशेल उपडे पडले. आपल्या पाठीवरून शाप निघून गेला व आपण त्याच्यापासून मुक्त झालों, अशा समजूतीनें ते परत या मुसलमानांचे हाल करूं लागले. शेवटीं जे लोक बदरच्या लढाईंत मुसलमानांकडून मारले गेले होते त्या लोकांचीं मुलें तेथें आणून त्यांच्या हातांत कुरेश राक्षसांनीं कट्यारी दिल्या व त्या पोरांच्या हातून त्या दोन इसमांना हालहाल करून ठार मारविले.

## ७ यहुदी लोकांना शेवटचा खलिता.

वर लिहिलेल्या हकीगतीला फार दिवस झाले नाहींत तोंच आणखी एक असाच प्रसंग मुसलमांनावर ओढवला! बेनी आमीर या नांवाची एक प्रख्यात टोळी मक्का व मदिना या दोन शहराच्या मधील नेझिद प्रदेशांत विशेष प्रबळ झाली होती. ही टोळी आपण आपल्याला सामील करून घ्यावी अशा इच्छेनें ह. पैगंबरनें आपले सत्तर लोक त्या टोळीच्या नायकाकडे सामोपचाराचें बोलणें चालणें करण्याकारितां पाठवून दिले. बेनी आमीर टोळीच्या नायकानें आलेल्या लोकांना मान तर दिला नाहींच उलट शेजारच्या प्रांतांत असलेल्या बेनी सुलैम या नांवाच्या एका टोळीला ह. पैगंबरचा पुरा मोड करून टाकण्यासाठीं आपल्याला मदत देण्याची त्यानें खटपट केली. बेनी आमीरच्या खटपटीला चांगलेंच स्वरूप आलें. दोन्ही टोळ्या एक झाल्या व त्यांनीं मदीनाहून आलेल्या सत्तर लोकांवर अचानक हल्ला केला. सत्तर मुसलमानांपैकीं फक्त दोन इसम जिवंत राहिले; बाकीच्या सर्वांना त्यांनीं कापून काढिलें. राजीच्या अनर्थानंतर झालेल्या या प्रसंगानें ह. पैगंबरला अत्यंत दुःख झालें. हा विश्वासघात झाला. अशा रीतीनें विश्वासघात होत चालले तर जग तरि चालावें कसें ? असे विचार ह. पैगंबरच्या मनांत रात्रंदिवस येऊं लागलें.

ते ह्मणाले, " झालें तें ठीक झालें. या लोकांच्या पापाचे घडे भरावयाचे होते, ते हे आतां भरीत आहेत. मुसलमान धर्माची इभ्रत तो एक अल्ला राखणार " !

बेनी अमिर टोळीच्या नायकाचें बेनी नादिर नांवाच्या यहुदी टोळीशीं सख्य जुळलें होते. ह. पैगंबरजवळ या यहुदी लोकांचा पूर्वी स्नेहाचा तह झालेला होता; आणि त्या तहान्वयें जरूर पडल्यास यहुदी लोक ह. पैगंबरला लढाईच्या वेळीं मदत करण्याला बांधलेले होते; ह्मणून ह. पैगंबर आपले कांहीं लोक बरोबर घेऊन या यहुदी लोकांकडे त्यांची मदत घेण्याच्या हेतूनें गेले. यहुदी लोकांचें ठिकाण चांगलें मजबूत तटबंदी केलेल्या किल्ल्याप्रमाणें होतें. तेथें ह. पैगंबर स्वतः गेल्यावर यहुदी लोकांनीं त्यांचें योग्य आदरातिथ्य केलें व त्यांना जेवणाचें आमंत्रण दिलें. जेवणाची वेळ झाल्यावर ह. पैगंबर आपल्या लोकांसह जेवावयास जाऊन बसले, परंतु लगेच तेथून उठून बाहेर आले व उंटावर स्वार होऊन त्यांनीं मदीनाचा रस्ता धरिला. ह. पैगंबर इतक्यांतच येतील अशा आशेनें जेवणार मंडळीनें जागच्या जागीं कांहीं वेळ त्याची वाट पाहिली; परंतु ते येत नाहींत, असें पाहून सर्व लोक बाहेर येऊन तपास करतात तों ह. पैगंबर मदीनाला निघून गेल्याचें त्यांना समजलें. ह. पैगंबर आपल्या लोकांना मागें टाकून एकटेच पुढें कां आले, याचें सर्वांना आश्चर्य वाटलें; परंतु हजरतनें कोणालाहि कारण सांगितलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नमाज पडण्याची वेळ झाली व लोकांची गर्दी मशिदींत चिकार भरली. तेव्हां हजरत पैगंबर ह्मणाले, " हे देवाधिदेवा, कृपासागरा, काल यहुदी लोकांच्या येथें जेवणाच्या वेळीं माझ्यावर छप्परावरून खालीं मोठमोठ्या धोंडी टाकून मला ठार मारण्याची त्यांनीं तयारी केली होती, परंतु तूं मला तेथून उठून जाण्याची प्रेरणा केली, ह्मणून मी हा वांचलो. "

मदिना शहरांत आल्यानंतर दोनचार दिवसांनीं ह. पैगंबरनें या यहुदी लोकांना निर्वाणीचा खलिता पाठविला; त्यांत असें लिहिलें होतें कीं, " परमेश्वरानें या पृथ्वीवर पाठविलेल्या पैगंबरचें सांगणें तुह्मां लोकांस असें आहे कीं, तुम्हीं सर्वांनीं आजपासून दहादिवसांच्या आंत माझ्या मुलखांतून निघून गेलें पाहिजे; या मुदती नंतर जो यहुदी येथें आढळेल त्याला देहांत शासन होईल. " हा खलिता पाहून यहुदीलोकांना फारच आश्चर्य वाटलें, व त्यांना ह. पैगंबरचा फार राग आला. रागाच्या आवेशांत खलिता आणणाऱ्या इसमाला त्यांनीं शिवीगाळ करून हांकून लाविलें. खलित्यांत दिलेली मुदत टळतांच ह. पैगंबर कांहींलोक घेऊन यहुदी लोकांच्या तटबंदीच्या बाहेरील प्रदेशांत येऊन दाखल झाले. यहुदी लोकांच्या आमराई, शेतवाड्या व फळझाडांचे बगीचे साफ तोडून भाजून टाकण्याचा त्यांनीं हुकूम दिला. अरब लोकांचा सर्व प्राण, त्यांचें जीवित म्हणजे त्यांचे झाडमाड. घरादाराचा नाश झालेला ते स्वतःच्या नजरेनें एकवेळ पाहातील, परंतु झाडामाडाला झालेली दुखापत त्यांच्यानें सहन होत नाहीं. मुसलमानांनीं तटबंदीबाहेर चालविलेला धुमाकूळ पाहून यहुदी लोकांच्या काळजाचें पाणी झालें. "आमचे झाडमाड ठेवा, आम्हीं निघून जातो," असा निरोप ह. पैगंबरला येऊन दाखल झाला. यहुदी लोकांनीं आपल्या बरोबर घेतां येईल ती चीजवस्त घेऊन, उंट, घोडे यांच्यावर ती सर्व लादून, कांहीं खैबरकडे व कांहीं जुडियाकडे चालते झाले.

यहुदी लोकांनीं आपलें फार दिवसांचे ठिकाण सोडून दिल्यामुळें मुसलमानांना तेथें विपुल लुट मिळाली. हत्यारें, चिलखतें, धान्य, नाना प्रकारच्या वस्तु त्यांच्या हातास लागल्या. सर्व यहुदी लोकांपैकीं फक्त दोन इसम इस्लाम धर्मांत शिरले; त्यांना मदीना शहरांत रहाण्यास परवानगी मिळाल्यावरून ते तेथें रहिवाशी झाले. ही हकीगत हिजरी सन ४ इ. स. ६२५ मध्यें घडली.

# भाग १२ वा.

## खंदकाची लढाई.

विषय

१ अरब स्त्रीसमाज व त्याची सुधारणा. २ जैयनबचें लग्न.
३ बिबी आयेशावर एक प्रसंग. ४ मदीना शहरावर स्वारी.
५ खंदकाची युक्ति. ६ मदीना शहराला वेढा.
७ लढाईचा शेवट

### १ अरब स्त्री समाज व त्याची सुधारणा.

याच सुमारास मदीना शहरांतील ओहदच्या लढाईंत मरण पावलेल्या एका मुसलमानाच्या विधवा स्त्रीनें हजरत पैगंबरकडे फिर्याद आणिली. तिला दोन मुली होत्या व तिच्या दीरानें वाडवडिलार्जित मालमत्तेपैकीं तिला कांहीं एक न देतां तिला घरांतून हाकून लाविलें होतें. अरब लोकांच्या वहिवाटीप्रमाणें तिच्या दिराचें वर्तन कोणत्याहि प्रकारें दोषास पात्र नव्हतें; कारण अरब समाजांत पुरुषाच्या पश्चात् त्याच्या पत्नीला किंवा त्याच्या मुलींना कोणत्याहि मिळकतीवर आपला हक्क सांगता येत नसे. परंतु अशी चाल समाजांत असणें हजरत पैगंबरला असह्य झालें होतें. स्त्रियांच्या विपन्नावस्थेनें त्यांच्या मनाला अत्यंत दुःख होई. शेवटीं वर सांगितलेल्या बाईच्या तक्रारीचा निकाल त्यांनीं वडिलार्जित मिळकतीवर तसेंच पतीच्या स्वसंपादित धनावर त्याच्या पश्चात् त्याच्या पत्नीचा व मुलींचा मुलाप्रमाणें हक्क आहे, असा कायदा करून टाकीला. अरब समाजांतील स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठीं ह. पैगंबरनें अनेक कायदे करून आपल्या मनाची थोरवी जमाच्या निदर्शनास आणून दिली!

कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं, " इस्लाम धर्मांत स्त्रियांना आत्मा नाहीं असें मानतात." ज्या मुसलमान व्यतिरिक्त समाजांची अशी समजूत आहे, त्यांची ही चूक आहे. उलट हजरत पैगंबरापूर्वीं स्त्रियांची स्थिती शोचनीय होती, व त्यांनीं ती सुधारून त्यांचा दर्जा थोर आहे हें जगास दाखविलें. ही गोष्ट स्पष्टपणें समजावी म्हणून पूर्वींच्या काळांत स्त्रियांची कशी स्थिती होती व नंतर कशी झाली, याबद्दल येथें थोडा उहापोह केल्यास तो अप्रस्तुत होणार नाहीं, अशी आशा आहे.

प्राचीन काळाच्या इतिहासावरून असें दिसून येतें कीं, त्या काळाच्या सुधारलेल्या राष्ट्रांत सुद्धां स्त्रियांना पुरुषापेक्षां गौण मानण्यांत येत असे. प्रसिद्ध इतिहासकार गिबन म्हणतो कीं, प्राचीन काळीं सामाजिक कायद्यांचें स्वरूप असें उद्धट व जुलमी होतें कीं, त्यांच्या योगानें स्त्रियांना आपलें आयुष्य, उपाध्याय, पति किंवा पालक, यांच्या पूर्ण गुलामगिरींत कंठावें लागे. पुरुषवर्गाचें मनरंजन करणें, त्यांच्या आज्ञा पाळणें, याच्या शिवाय स्त्रियांना दुसरें पवित्र कर्तव्य त्यांच्या कायद्यानें दिलेलें नव्हतें. रोमन कायद्याप्रमाणें पतीची अप्रतिबंध सत्ता पत्नीवर असे. कुमारिका आपल्या पित्याच्या पूर्ण अंकित असत. मुलीचें लग्न झाल्यावर ती व तिची मालमत्ता तिच्या नवऱ्याच्या ताब्यांत जात असे, व तेथें तिला तो एखाद्या निर्जिव वस्तुप्रमाणें वागवीत असे. लग्न झालेल्या स्त्रियांना सुद्धां विकत घेतलेल्या गुलामाप्रमाणेंच वागविण्यांत येत असे. एकाकाळीं हाच रोमन कायदा इतका जुलमीं झालेला होता कीं, त्याच्या बळावर पतीला आपल्या पत्नीला एकाद्या क्षुल्लक कारणावरूनसुद्धां ठार मारतां येत असे. सर्व युरोपियन राष्ट्रांनीं प्रथम ज्याप्रमाणें सुधारणेचा ओनामा रोम, ग्रीस, या राष्ट्रापासून घेतला, त्याचप्रमाणें त्यांनीं आपले सामाजिक कायदेकानुसुद्धां रोमन कायद्याला धरूनच केले. अर्थात् स्त्रियांचा दर्जा त्या काळीं युरोपियन राष्ट्रांत एकसारखाच होता, असें इतिहासावरून स्पष्ट

दिसतें. पांपे शहरांतील हल्लीं खणलेल्या इमारती पाहाणारास, सुखवस्तु असणाऱ्या लोकांच्या वाड्यांत असभ्य पुतळे व लज्जा उत्पन्न करणारीं कारंजी दिसून येतात. मोठमोठ्या दिवाणखाण्यांच्या भिंतीवर लज्जास्पद व घाणेरडीं चित्रें दिसून येतात. यावरून असें अनुमान निघतें कीं, रोमन राज्यांत स्त्रियांना गोषांत ठेऊन त्यांना पुरूषासाठीं राखून ठेवलेल्या जागीं जाण्याची सक्त मनाई असेल; किंवा स्त्रियांच्या मनोविकारांची, त्यांच्या विनयाची पुरुषवर्ग मुळींच पर्वा करीत नसतील ! एम्. गुस्तेव्ह लेबा हा असें सांगतो कीं, पूर्वीच्या रोमशहरांत पत्नीवर पतीचें पूर्ण जुलमी राज्य होतें. त्यांना सामाजिक बाबतींत मुळींच हक्क नव्हते. पतीशिवाय दुसऱ्या कोणासहि तिच्या आचरणाबद्दल मत देतां येत नसे, व वाटल्यास तिला जिवें मारण्याचा हक्क पतीला होता. बहुपत्नित्व रोमन राज्यांत चालू होतें. मार्क अँन्टनीला दोन बायका होत्या हें आपणास माहित आहे. बाप जरि वेडा असला तरी त्याच्या परवानगी शिवाय त्याच्या मुलीचें लग्न होत नसे. बापास आपलीं मुलें विकण्याचा अधिकार असे व बायकोसहि मुलाप्रमाणें मानण्यांत येत असल्या कारणानें तिचीहि त्यांच्याप्रमाणें विल्हेवाट त्याला लावता येत असे. जेव्हां या प्रमाणें सामाजिक कायद्याचे स्वरूप सुधारलेल्या रोमन राष्ट्रांत होतें तेव्हां खरोखर मागसलेल्या राष्ट्रांत त्याकाळीं हे कायदे कसे असतील याची बरोबर कल्पना करणें सुद्धां कठीण आहे.

ग्रीस देशांतहि स्त्री वर्गाची हीच अवस्था होती. स्पार्टांत रोगट व अशक्त मुलांच्या आयांना ठार मारून टाकीत असत. याचा परिणाम असा झाला कीं, समाजांत बायकांची संख्या फार कमी झाली, व त्यामुळें बहुपति करण्याची चाल प्रचारांत आली. अथेनियन लोकांत आरंभीं स्त्री ही एकाद्या वस्तुप्रमाणें बाजारांत विकत मिळत असे. मृत्युपत्रांत मालमत्तेच्या यादींत बायकोची विल्हेवाट कशी लावावी याचाहि स्पष्ट उल्लेख करण्यांत येत असे. हे सुधारलेले लोक होते; त्यांचें कलाकौ-

शल्य उच्चप्रतीचें असे, परंतु मनानें ते इतके हलके होते कीं ते स्त्रियांना अपशकुनी समजत. सुधारणेच्या शिखराला जाऊन पोंचलेल्या ग्रीस देशांत वेश्या शिवाय दुसऱ्या स्त्रियांना मान मिळत नसे, ह्मणून शिक्षण व सुधारणा फक्त वेश्यामध्येंच होत असे. युरीपाईडीसचें असें मत आहे कीं, " कोणतेंहि सत्कृत्य करण्याला स्त्रिया नालायक व दुर्बल आहेत, परंतु सर्व दुष्कृत्यांचे मोहरघर मात्र त्या आहेत. " चौथ्या शतकांत जेव्हां ख्रिस्ती धर्माचा पगडा युरोपवर बसला, त्या वेळीं त्यानें ग्रीक व रोमन सुधारणा आपल्या बरोबर जिकडे तिकडे नेल्या. या नवीन सुधारणांनीं तिकडील स्त्रियांच्या हक्काची पायमल्ली करून स्त्रियांना जमीनदोस्त करून टाकिलें ! यानंतर सुमारें दीड हजार वर्षे युरपमध्यें स्त्रियांची स्थिती अतिशय केवीलवाणी झाली होती. आतां अरबस्थानांत स्त्रियांची काय स्थिती होती हें पाहूं.

आह्मी ज्या कालाला उद्देशून हें लिहीत आहों, त्या काळीं अरबस्थानांत स्त्रिया व पाळीव जनावरें यांच्यामध्यें काडीभरसुद्धां फरक नसे. अरबलोक मुलगी जन्मास येणें अशुभ समजत असत. मुलगी आपल्या कीर्तिला कलंक लावणारी आहे, अशी त्यांची समजूत मुलीच्या जन्मापासून झालेली असे. यामुळें देशांत प्रसिद्ध असलेली सन्माननीय घराणीं मुलींना लहानपणींच जिवंत पुरून टाकीत असत, किंवा अन्य तऱ्हेनें तिचा कांटा घरांतून काढून टाकीत असत; त्यांतून जर एकादी मुलगी चुकून जिवंत राहिली तर तिला अगदीं जनावराप्रमाणें वागवीत असत. लग्न झाल्यानंतर ती आपल्या पतीच्या ताब्यांत जाई व त्याच्या पश्चात् त्याच्या वारसांच्या वाट्यास जनावरें, घरदार, चीजवस्तु यांच्याबरोबर घरांतील स्त्रियाहि जात. सावत्र आईवर मुलाचा पूर्ण अधिकार असे व तो तिला आपल्या मर्जीला येईल तशा रीतीनें वागवीत असे. तो तिला वाटेल तर आपली पत्नी म्हणूनहि तिला बाळगीत असे. यावरून असें दिसून येतें कीं, इस्लाम धर्म प्रचारांत येण्यापूर्वीं अरबस्थानांत स्त्रियांना जनावरांपेक्षां अधीक

मानण्यांत येत नव्हतें. त्यांना धार्मिक कृत्यांत भाग घेण्याचा अधिकार नव्हता. इस्लाम धर्मानें स्त्रियांची ही शोचनीय स्थिती सुधारली. आत्मिक उन्नति व नैतिक जबाबदारीच्या दृष्टीनें पुरुष व स्त्री हीं दोन्हीं सारखींच आहेत हें तत्व इस्लाम धर्मानें लोकांना शिकविलें. पुरुष असो अगर स्त्री असो, स्वतःची उन्नति ज्याच्या त्याच्या पाप व पुण्य यांच्या संचयावर अवलंबून असतें. धार्मिक कृत्यें करण्यांत व नैतिक कर्तव्याची अंमलबजावणी करण्यास स्त्रियांना व पुरुषांना आपल्या मानसिक शक्तीचा सारखाच उपयोग करावा लागतो. म्हणून दोघांचे समाजांत हक्क सारखेच आहेत असें इस्लाम धर्म प्रतिपादन करितो.

इस्लाम धर्मानें प्रथम बालहत्या बंद केली व मुलींची योग्यता मुलांच्या बरोबरीनें वाढविली. “ ज्या कोणाच्याहि येथें मुलगी जन्मास आली असेल त्यानें तिला जिवंत पुरूं नये, तिचा अपमान करूं नये व मुलास तिच्यापेक्षां जास्त दर्जा देऊं नये, अशा माणसास परमेश्वर स्वर्गसुख देईल.” ( अबु दाऊद ).

शिक्षणासंबंधीं पुरुष व स्त्री असा भेद भाव इस्लाम धर्मांत नाहीं. दोघांनींहि सुशिक्षित असणें जरूर आहे म्हणून मुलांना व मुलींना सारखेंच शिक्षण मिळूं लागलें. तसेंच पती व पत्नी या दोघांत उच्चनीच असा भाव न राहतां दोघांनाहि समसमान हक्क संसारांत मिळत गेले. बापाच्या पश्चात मुलीला त्याच्या मिळकतींत मुलाप्रमाणेंच हक्क प्राप्त झाला. धार्मिक असो, अगर सामाजिक असो, पुरुषा इतकाच मान स्त्रियांना प्रत्येक बाबतींत मिळत आहे. पुरुषाला आपली पत्नि निवडण्याचा जसा अधिकार आहे, तसाच स्त्रियांनाहि आपला पति निवडण्याचा अधिकार आहे. लग्नाचे वेळीं मुलीची पसंति नसेल तर तें लग्न कायदेशीर होत नाहीं, व कारणपरत्वें तिला आपल्या पतीपासून अलिप्त रहाण्यालाहि धर्मानें परवानगी दिली आहे. “ जसे पतीचे हक्क पत्नीवर असतात, तेच पत्नीचे हक्क पतीवर आहेत. ”

यावरून असें स्पष्ट होतें कीं, इस्लाम धर्मानें पुरुष व स्त्री या दोघांचाहि दर्जा प्रत्येक बाबतींत सारखाच ठरविला आहे.

## २ जैयनबचें लग्न.

याच सुमारास ह. पैगंबराचा एक जैयद नांवाचा फार दिवस जवळ बाळगलेला गुलाम होता, त्याच्या जैयनब नांवाच्या बायकोनें ह. मुहम्मद पैगंबर जवळ लग्न लाविलें. या लग्नासंबंधी अनेक ग्रंथकाराच्या निरनिराळ्या स्वरूपाच्या टीका आहेत; परंतु त्यांत खऱ्या व खोट्या अशी निवडानिवड करणें फार कठीण आहे. एके दिवशीं ह. मुहम्मद सहज फिरता फिरतां झैयद याच्या घरीं आले, त्यावेळीं जैयद घरांत नव्हता. बंद असलेल्या दरवाजावर ह. मुहम्मदनें बाहेरून थाप मारिली व तो आवाज ऐकून जैयनबनें बाहेर कोण आहे हें न ओळखून एकदम दार उघडलें. पाहाते तों ह. मुहम्मद साहेब स्वतः दरवाजांत उभे. त्यांच्या त्या भव्य व तेजदार सुंदर मूर्तिकडे पाहून ती आश्चर्यानें थक्क झाली. जैयद घरांत नाहीं असें पाहून ह. मुहम्मद तसेच परत फिरले, परंतु जैयनब मात्र त्या वेळेपासून अस्वस्थ झाली. जैयनबची अंतरव्यामीं उडालेली गडबड लपून राहिली नाहीं. झैयद हा शरीरानें ठेंगणा, रंगानें काळा, व दिसण्यांत कुरूप होता. जैयनबला तो मनापासून आवडत नसे. नवरा घरीं आल्यावर ह. मुहम्मद आपल्या घरीं आल्याचें तिनें त्याला कळविलें, व सांगतांना त्यांच्या स्वरूपाचें तिनें असें काय वर्णन केलें कीं, त्यावरून जैयनबला यापुढें आपली पत्नी म्हणून ठेवणें हितकर होणार नाहीं, असें त्याला वाटून तो तसाच ह. मुहम्मदकडे गेला व त्यांना जैयनबशीं लग्न लावण्यास सांगितलें. ह. मुहम्मदनें तसें न करण्याबद्दल पुष्कळ प्रकारें सांगितलें, परंतु तोहि आपला दुराग्रह सोडीना. एके दिवशीं बिबी आयेशाच्या घरीं ह. मुहम्मद असतांना जैयनबच्या अस्वस्थतेच्या कांहीं गोष्टी त्यांच्या कानावर आल्या. तेव्हां ते म्हणाले,

"असें असेल तर पैगंबर तुझ्या बरोबर लग्न करण्यास तयार आहेत, असें जैयनबला कोण जाऊन सांगेल?" ह. मुहम्मद जवळ सल्मा नांवाची एक दासी उभी होती, तिनें झटकन धांवत जाऊन जैयनबला ही बातमी सांगितली. जैयनब ही आनंदाची बातमी घेऊन येणाऱ्या दासीवर इतकी प्रसन्न झाली कीं, त्यावेळीं तिनें आपल्या आंगावरचे सर्व दागदागीने तिच्या आंगावर बक्षिस म्हणून फेंकून दिले. जैयनबला हर्षानें स्वर्ग दोन बोटें उरला. झैयदनें लगेच आपल्या बायकोला काडी मोडून दिली व तिला दुसरें लग्न करण्याला परवानगी दिली. थोड्या दिवसांनीं ह. मुहम्मदचे जैयनबबरोबर यथाविधी लग्न झालें व तिला त्यांनीं आपल्या घरीं आणलें.

## ३ बिबी आयेशावर एक प्रसंग.

ओहदच्या लढाई नंतर मुसलमानांना जिकडे तिकडे कुरेश लोकांशिवाय अनेक शत्रू उत्पन्न झाले होते. त्यांतील कांहीं कुरेश लोकांच्या चिथावणीवरून, व कांहीं यहुदी लोकांच्या चिथावणीवरून मुसलमानांना त्रास देत असत. मदीनाच्या आसपास शत्रूंच्या टोळ्या वारंवार धिरट्या घालून गरीब शेतकरी लोकांची तसेंच त्यांच्या जनजनावरांची जितकी नासधूस, व नुकसानी होईल तितकी करीत असत. यांच्या या उपद्रवाचा बंदोबस्त न केला तर तो अधीक वाढत जाईल, या धास्तीनें हजरत पैगंबर जवळपास नेहमी स्वाऱ्या करून या भटकणाऱ्या टोळ्यांना पिटाळून लावीत असत. असें होतां होतां एक बेनी मुस्तलिक नांवाच्या टोळींतील लोक मदीनावर स्वारी करण्याच्या वेळीं कुरेश लोकांना मदत करण्याकरितां मदीना व मक्का यांच्या दरम्यान कुरेश लोकांची वाट पहात राहिली होती. नेहमीच्या त्यांच्या वृत्तीप्रमाणें सभोंवतालच्या मुलखांत त्या लोकांचा धुमाकूळ चालला होता. ह. पैगंबर या लोकांचा बंदोबस्त करण्यास आपल्या हत्यारबंद लोकांना बरोबर घेऊन निघाले

मक्केपासून कांहीं अंतरावर असलेल्या एका पाण्याच्या ठिकाणीं त्यांनीं आपला तळ दिला. हजरत पैगंबरनें बिबी आयेशा व उम्मे सल्मा या दोघींना रहाण्याकरितां एक चामड्याचा तंबू ठोकला होता. बेनी मुस्तलिक टोळीवर एक अचानक छापा घालून ह. पैगंबरनें त्यांना चीजवस्त टाकून पिटाळून लाविलें. या स्वारींत ह. पैगंबरला फार मोठी लूट मिळाली. दोन हजार उंट, पांच हजार मेंढ्या, आणि पुष्कळ प्रकारच्या संसारोपयोगी वस्तु त्यांनीं आपल्या सर्व लोकांना वांटून दिल्या.

हजरत पैगंबरवर आद्यापपर्यंत जीं संकटें येत गेलीं त्यांच्यापेक्षां अधिक कठीण व तीव्र असें संकट बिबी आयेशाच्या नशिबीं याच वेळीं उभें राहिलें. तिच्या पातिव्रत्याची कसोटी पाहाण्याची ही वेळ होती. हजरत पैगंबरच्या बायकांना जेव्हां प्रवास करावयाचा असे, त्या वेळीं त्या उंटावर ठेवण्यासारख्या पालख्यामधून त्या प्रवास करीत. प्रवासांत या पालख्यांना चारहि बाजूला पडदे लाऊन त्या बंद केलेल्या असत. प्रवासास निघतांना तंबूच्या दरवाजांत पालखी नेऊन ठेवीत, आणि आंत हजरत पैगंबरची पत्नी बसल्यानंतर बाहेरचे पडदे सोडून पालखी बंद करीत; व हमाल तेथें येऊन ती उंटावर नेऊन बांधीत असत. उतरण्याच्या वेळीं याचप्रमाणें व्यवस्था होत असे. वर सांगितलेल्या स्वारीचें सर्व काम आटोपून हजरत पैगंबर मदीना शहरीं जात असतांना वांटत बिबी आयेशाच्या कर्मानें शेवटच्या मुक्कामीं धांव घेतली. सर्व फौज मदिना शहरीं जाऊन पोंचली आणि बिबी आयेशाची पालखी तिच्या दरवाजांत नेऊन ठेविली, परंतु त्यांत कोणीहि नव्हतें. या चमत्काराची सर्व हकीगत तिच्या तोंडून जी बाहेर आली, ती अशी आहे. शेवटच्या मुक्कामाला निघण्याच्यावेळीं बाहेर अंधार पडला होता, त्यावेळीं पालखी दरवाजांत आणून ठेवलेली होती, परंतु तिच्या गळ्यांतील एक हार इतक्या दरम्यान कोठें पडला होता तो शोधीत असतां, हमालांनीं बिबी आयेशा पालखींत आहे, अशा समजूतीनें त्यांनीं ती तेथून उचलून उंटावर बांधली, व उंट

चालू केला. हाराचा तपास करून ती पाहाते तो पालखी दरवाजांत नाहीं व जवळपासचे लोकहि तेथें नाहींत. बिबी आयेशा शरीरानें सडपातळ व वजनानें फार हलकी असल्यामुळें हमालांना उचलतांना आंत कोणी नसेल अशी शंका आली नाहीं. फौजेचा मुक्काम हालल्यानंतर तंबु उपटण्यांत आले व जिकडे तिकडे भयाण वाळूचें मैदान दिसूं लागलें. झालेली चूक कोणाच्या तरी लक्षांत येतांच आपल्याला परत नेण्याकरितां उंट येईल, अशा आशेनें बिबी आयेशानें आपले कपडे आपल्या आंगाभोंवती गुंडाळून ती उंटाची वाट पाहात बसली. थोड्या वेळांत तिला गाढ झोंप लागली. उजाडल्यावर साफवान नांवाचा एक मुसलमान रस्त्यानें चालला असतां बिबी आयेशाला एकटी पाहून तो फार आश्चर्यचकित झाला. त्यानें खालीं मान करून कांहीं प्रश्न तिला केले, परंतु त्याला तिच्याकडून कांहींच जबाब मिळाला नाहीं. शेवटीं त्यानें आपला उंट तेथें आणून उभा केला, व त्यावर बसण्यासाठीं त्यानें तिची विनंति केली. पुढें गेलेल्या फौजेला गाठण्यासाठीं त्यानें शक्य तितकी त्वरा केली, परंतु मदीना शहरांत त्याचा उंट येईपर्यंत, वाटेंत कोणाचीहि गांठ पडली नाहीं. शहरांतून साफवानबरोबर उंटावरून जात असांना बिबी आयेशा सर्व लोकांच्या दृष्टीस पडली.

अरबलोक कुचेष्टेखोर फार असतात. क्षुल्लक गोष्टींचा संबंध आपल्या कल्पनेनें लांबपर्यंत नेऊन त्याच्यावर कशी इमारत रचतील याचा कांहींच नेम नाहीं. अशा वृत्तींच्या लोकांना बिबी आयेशा परक्या मनुष्याबरोबर एकटी आली, ही गोष्ट चर्चेला किती तरी मोठी झाली ! गांवांत सर्वांच्या तोंडीं ही एकच गोष्ट झाली. त्यांतल्यात्यांत हजरत पैगंबरच्या शत्रूनें तर हजरतची टवाळकी करण्याची शिकस्त केली. दिवसेंदिवस ही टवाळकी वाढता वाढता अगदीं असह्य अशा थराला जाऊन पोंचली. तेव्हां हजरत पैगंबरनें या लोकनिंदेचा एकदां शेवट करून टाकण्याचा निश्चय केला ! एके दिवशीं नमाज पडण्याच्या वेळीं मशीदींत लोकांचा जमाव

जमला असतांना हजरत पैगंबर पीठावर उभे राहिले व पैगंबरच्या खाजगी व्यवहारांत कोणालाहि कांहीं एक बोलण्याचा अधिकार नाहीं, असें अधिकारयुक्त वाणीनें ते सर्वांना म्हणाले. तेथून ते अबुबक्रच्या घरीं आले व त्यांनीं या विषयावर आपल्या स्नेह्याचा विचार घेतला. नंतर ते बिबी आयेशाच्या खोलींत शिरले. गांवांत उत्पन्न झालेल्या लोकनिंदेला ती टिकणारी अशी पटाइत स्त्री नव्हती. तिला लागलेला डाग इतका असह्य झाला होता कीं, त्याच्या वेदनानें तिच्या अंतःकरणाचे शतशः तुकडे करून टाकिले होते. ती अन्नपाणी सोडून रात्रंदिवस दुःखानें अश्रु ढाळीत दिवस ढकलीत होती. तिच्या आईनें तिची सर्व बाजूनें समजूत केली, परंतु तिचा हृद्रोग कांहीं केल्या सुटेना. हजरत पैगंबर तिला ह्मणाले, 'आयेशा, लोक काय बोलतात हें तूं ऐकलें आहेस ? परमेश्वराची धास्ती मनांत बाळग. जर खरोखर तुझ्या हातून पाप घडलें असेल तर त्याला पश्चात्ताप हाच एक उपाय. परमेश्वर ज्याला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला त्याचा कधींहि अव्हेर करीत नाहीं.' आयेशानें आपल्या आईबापाकडे हजरत पैगंबरला उत्तर देण्याच्या आशेनें पाहिलें. सरते शेवटीं तिला दुःखाचा उमाळा आला; तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या, आणि ती म्हणाली, "मी निराधार आहे, माझें मन जाणणार तो एक समर्थ आहे. मी निष्पाप आहे असें मीच ह्मणालें तर माझ्यावर कोणीहि विश्वास ठेवणार नाहीं. परमेश्वराची शपथ घेऊन मी सांगते, आलेला प्रसंग मला काढला पाहिजे, माझा वाली परमेश्वर.' हजरत मुहम्मद कांहीं एक न बोलतां स्वस्थ राहिले. अशा स्थितींत त्यांना जरा झोंपेची गुंगी आली, तेव्हां त्यांच्या अंगावर वस्त्र घालून त्यांच्या डोक्याखालीं एक उशी ठेविली. थोड्या वेळानीं ते जागे झाले व उठून बसले, आणि आपल्या कपाळावरचे घामाचे बिंदु पुसून ते ह्मणाले, 'आयेशा, आनंद कर. परमेश्वरानें तूं निष्पाप आहेस असें मला स्पष्ट सांगितलें.' बिबी आयेशाच्या आनंदाला पारावार नाहींसा झाला. तिच्या तोंडून 'परमेश्वरा तुझी धन्य आहे' असे उद्गार मात्र निघाले.

## ४ मदीना शहरावर स्वारी

तुह्मांला स्मरण असेलच कीं, ओहदच्या लढाईंत अबुसुफयान यानें आपण पुन्हा एका वर्षांच्या आंत असेच रणांगणावर भेटूं असें मुसलमान लोकांना आश्वासन दिलें होतें. तो ठरलेला काल जसा नजीक येत चालला, तसा हजरत पैगंबरनें आपल्या अनुयायांना हातांत शस्त्रें घेऊन आपल्या बरोबर बाहेर पडण्यास सांगितले; परंतु ओहदच्या लढाईचें चित्र त्यांच्या नजरे समोर आद्याप जसेंच्या तसेंच उभें होतें, त्यामुळें पुष्कळांनीं त्यांचा शब्द मान्य केला नाहीं. हजरत पैगंबरनें त्यांच्या भित्रेपणाबद्दल त्यांची रखडपट्टी काढिली, आणि त्यांना ह्मणाले, ' बरें आहे, तुह्मीं कोणी येत नसाल, तरी मला पर्वा नाहीं. मी एकटा बदरला जाणार.' हजरतच्या या शब्दांचा परिणाम त्यांच्यावर विजेप्रमाणें झाला. त्या दिवसापासून पंधरा दिवसांच्या आंत पंधरा हजार तरुण योद्धे हजरत पैगंबर बरोबर रणक्षेत्रावर जाण्यास तयार झाले ! याच्यापूर्वीं हजरतनें एवढ्या मोठ्या स्वारीची तयारी केलेली नव्हती. परंतु जेव्हां ते बदरला आले, तेव्हां कोणीहि शत्रू सामन्याकरितां उभा राहिलेला त्यांना दिसला नाहीं. इकडे मक्केहून दोन हजार पायदळ, पन्नास घोडेस्वार व पुष्कळ उंट शत्रूच्या भेटीकारितां बाहेर पडले होते. ते कडक उन्हाळ्याचे दिवस होते. घोडे, उंट वगैरे जनावरांना चारा पाण्याची मोठी अडचण पडली. त्यामुळें कुरेश सैन्याला मक्केचा रस्ता धरणें भाग पडलें.

याचवेळीं बदरला वार्षिक जत्रा भरत असे, आणि मुसलमान लोकांनीं तेथें तंबु ठोकून शत्रूची आठ दिवस वाट पाहिली. ही लढाईच्या श्रमाची तहान त्यांनीं जत्रेमध्यें व्यापारी देवघेव करून घालविली. त्यांच्या जवळ असलेल्या पुष्कळ तऱ्हेच्या मालापासून त्यांना चांगला नफा झाला, व त्याबद्दल त्यांनीं आपल्याला पाहिजे तो माल घेऊन मोठ्या आनंदानें मदीना शहरीं जाण्याकरीतां त्यांनीं कूच केलें. ही बदरची दुसरी स्वारी ह्मणून इतिहासांत प्रसिद्ध आहे.

अबुसुफयानला अन्य कारणानें जरी आपला शब्द राखता आला नाहीं, तथापि आपल्या आयुष्यांतील एक मोठें कर्तव्य पार पडलें पाहिजे या विषयीं रात्रंदिवस त्याच्या मनांत विचार घोळत होते. ज्यांनीं आपलें घरदार सोडून दिलें, पळपुट्याप्रमाणें जे मक्केंतून जीव घेऊन पळून गेले व आतां राजाप्रमाणें अनुयायांवर सत्ता गाजवून जिकडे तिकडे अंमल बसवीत चालले आहेत, अशा मुसलमानांची पुरी खोड मोडून त्यांना नामशेष कधीं करून टाकीन असें त्याला झालें होतें. शेवटीं त्यांना तोंड देण्याचा त्यानें निश्चय केला.

ओहद्‌ची लढाई झाल्यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे इ. स. ६२७ मधील वसंत ऋतुपर्यंत अबुसुफयाननें आपल्या भावी लढाईचा नकाशा आंखण्याचें व स्वारीच्या तयारीचें काम चालविलें होतें. याच वर्षाच्या उन्हाळ्याच्या प्रारंभीं दहा हजार कुरेश सैन्य व कित्येक भटकणाऱ्या टोळ्या बरोबर घेऊन तो मक्केंतून बाहेर पडला.

## ५ खंदकाची युक्ति.

या स्वारीची बातमी मदीना शहरीं पोंचतांच लोकांचे हातपाय बसले. आश्चर्य व भीतीनें ते अगदीं गर्भगळित होऊन गेले. आणिबाणीच्या प्रसंगीं स्वस्थपणानें न डगमगतां विचार करण्याची देणगी हजरत पैगंबरला नैसर्गिक होती, असें दिसतें. कारण अशा प्रसंगीं शहर संरक्षण करण्याचे उपाय ते ताबडतोब योजूं लागले.

सुलैमान या नांवाच्या एका परशियन मनुष्यानें दुसऱ्या एका देशांत लढाईच्या प्रसंगीं अरब लोकांना आपल्या सभोंवार कोट किल्ल्याचा बंदोबस्त करून संरक्षण करण्यासाची युक्ति सुचविली होती. तोच अनुभविक मनुष्य या वेळीं मदीना शहरांत होता. त्यानें मुसलमानांना आपला मागील अनुभव दिला. मदीना शहरांत एकमेकांना लागून असलेल्या दगडी घरांच्यामुळें त्यांचा एका बाजूला

एक मजबूत तटच झाला होता. दक्षिण व पूर्व या दिशांकडे शहराला लागून मोठमोठ्या मोकळ्या जमिनी होत्या, व त्या बाजूनें शहराचें संरक्षण होण्यासारखें नव्हतें. सर्वांनुमतें त्या बाजूला शहराच्या बाहेर मोठमोठे खंदक खणण्याचें ठरलें व लगेच ते खणण्याचें काम सुरू झालें. गांवांतील टिकावांच्या, पावड्यांच्या व खणलेली माती बाहेर टाकण्याकरितां जमाविलेल्या टोपल्यांच्या राशी पडल्या. मदीना शहरीं ज्याप्रमाणें मशीद बांधण्याच्या कामीं सर्वांनीं एक दिलानें मदत केली, त्याचप्रमाणें याहि प्रसंगीं उच्चनीच, गरीबश्रीमंत हा भाव मनांत न आणतां खंदक खणण्याचें काम जारीनें सुरू झालें. मुसलमान लोक जेव्हां हें काम करीत, तेव्हां हजरत पैगंबर आपलें नेहमींचें सूत्र म्हणून त्यांना उत्तेजन देत असत.

" हे परमेश्वरा, स्वर्गसुखासारखें दुसरें सुख नाहीं. आम्हां इस्लाम लोकांवर कृपादृष्टी ठेव."

तेथें काम करणारे लोक म्हणत, " धर्मसंबंधीं आमचा पूर्ण विश्वास हजरत पैगंबरावर आहे. आतां ते सांगतील त्या शत्रुजवळ मरेपर्यंत लढण्याची व रणावरून पळून न जाण्याची आम्हीं शपथ घेतली आहे."

सहा दिवस अहोरात्र काम करून मदीना शहरच्या मोकळ्या असलेल्या जागेवर त्यांनीं खोल खंदक खणले; आणि या खंदकाच्या बाहेर जीं घरें होतीं त्यांचें संरक्षण होण्यासारखें नव्हतें म्हणून त्या घरांतील लोकांना तेथून काढून त्यांना शहरच्या किल्ल्यांत ठेवण्यांत आलें. मदीना शहरच्या संरक्षणाची तयारी मोठ्या जारीनें चालली असतांना शत्रू अचानक शहराच्या बाहेर येऊन थडकला.

शहरसंरक्षणाची ही नवीन योजना पाहून शत्रूकडील लोकांना फार मोठें आश्चर्य वाटलें, व त्यांचें सगळें अवसान गेलें. हातांत तरवार घेऊन शत्रूंची खोड जिरविण्याची त्यांची धम्मक, शहरांत शिरण्याचा मार्गच अशा रीतीनें बंद पडलेला पाहून बहुतेक तेथेंच जिरली. खंद-

काची कल्पना अगदीं नवीन होती. यामुळें हातांतील शस्त्रें निकामी पडलीं. ते असेंहि म्हणूं लागले कीं, अरब लोकांच्या युद्ध पद्धतीला सोडून ही युद्ध पद्धत आहे. शहरावर निकराचा मारा करण्याचे मार्ग शोधून काढण्यासाठीं त्यांनीं सर्व बाजूनें विचार करून पाहिला, परंतु त्यांचा कांहींच उपाय चालेना. प्रथम त्यांनीं तिरंदाजाकडून शहरावर मारा चालविला. उंच उंच ठिकाणीं उभे राहून, दगड धोंडे मारून, शहरांतील लोकांना त्रास देण्याचा उद्योग करून पाहिला; परंतु त्यापासून शहरांत म्हणण्यासारखें नुकसान झालें नाहीं. एका खंदकाच्या बाजूला खंदक थोडा अरुंद असून तेथें बंदोबस्तहि जरा ढिला होता. त्या बाजूनें शत्रूनें आंत शिरून हल्ला करण्याचा विचार केला, व त्या मार्गानें कांहीं शूर घोडेस्वार आंत घुसले; परंतु हातांत तलवार घेऊन त्यांचा समाचार घेण्यास अलि तेथें तयार होता. त्यानें एका फट-काऱ्याबरोबर एका घोडे स्वाराला जमिनीवर लोळविलें. त्याबरोबर बाकीचे घोडेस्वार मागें हटून पळूं लागले. अशा रीतीनें कुरेश लोकांचा पहिल्या दिवसाचा सर्व प्रयत्न निष्फळ झाला. मक्केंतील लोकांनीं युद्धकला प्रवीण अशा अधिकारी वर्गाची एक सभा भरविली. त्यांत सर्व सैन्यांनीं शहरा-वर चोहोंबाजूनें हल्ला करीत पुढें पुढें घुसत जावें असा बहुमतानें विचार ठरविला. या हल्लयामुळें मदीना शहरचें संरक्षण करणारे तीन हजार लोक फार थकून गेले. शहरच्या सर्व बाजूला सारखा पाहारा करण्यापुरते लोक त्यांच्याजवळ नव्हते. आणि त्या थकून गेलेल्या लोकांना पुढील हल्ला कोणत्या मार्गानें येणार आहे त्याचा बरोबर तर्क करण्याला कांहींच साधन नव्हतें. परंतु मुसलमान लोकांच्या पाहाऱ्याचीं ठिकाणें इतकीं दक्ष व सावध होतीं कीं, त्यांना चुकवून हल्ला चढविणें शत्रूला अगदीं अशक्य झालें होतें. रात्रींच्या वेळीं पाहाऱ्याच्या ठिकाणीं हाल्लयाची चिन्हें दिसतांच भयाच्या सूचना होत असत. ओहदच्या लढाईंत प्रसिद्धीस आलेला योद्धा खालिद यानें शत्रूवर अचानक हल्ला करण्याचा

घाट घालून शूर असे कांहीं शिपाई रात्रींच्या वेळीं घेऊन तो मुसलमानावर जाऊन पडला. तेथें त्याची निराशा झाली. त्याला तो खंदक ओलांडणें अशक्य झालें. दुसरा शूर योद्धा उमर यानें पुष्कळ प्रकारच्या युक्त्या व धाडस करून शहरांत घुसण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु त्यानेंहि आपले हात टेंकले.

## ६ मदीना शहराला वेढा.

मदीना शहराच्या सैन्यानीं शहर संरक्षणासाठीं आपल्या जिवाकडे न पाहातां अत्यंत परिश्रम करून टिकाव धरला. त्यांत त्यांना अत्यंत हाल सोसावे लागले. शत्रूनीं शहराच्या बाहेर शेतवाड्यांचा व बागबगीच्यांचा पुरा नाश करून टाकिला. जिकडे तिकडे रानमाळ दिसूं लागलें. शेतकरी लोकांना आपल्या जमीन जुमल्याची अशी झालेली दुर्दशा पाहावेना. ते हजरत पैगंबरजवळ शहरच्या बाहेर जाऊन आपल्या शेतवाड्यांचें संरक्षण करण्यास परवानगी मागूं लागले. शहरच्या सभोंवार शत्रूंचा पडलेला वेढा, शहर संरक्षणाचे सैनिक थकून गेलेले, गांवांत शेतकऱ्यांचा हाहाःकार, अशा जिकडू तिकडून पेंट घेणाऱ्या वणव्यांत हजरत पैगंबर सांपडले. कुराणांत या वेळचें असें चित्र दिलें आहे. "शत्रू शहरावर वरून खालून येत होते, दृष्टी मंद झाली, आणि अंतःकरणानें ठाव सोडला. मुसलमानांची ही आणीबाणीची वेळ होती, आणि ते या प्रसंगीं थरथरून गेले." अशी भयंकर स्थिती दहा बारा दिवस राहिली होती. इतक्यांतच कुरेश लोकांना सामील असलेल्या बदुइन टोळीला वश करून घेऊन शत्रूकडून त्या टोळीला फोडावी, असा विचार हजरत पैगंबरच्या मनांत आला. त्याप्रमाणें त्या टोळीचा पुढारी व हजरत पैगंबर यांच्यामध्यें कांहीं तडजोडीची भाषा सुरू झाली. त्या टोळीचा पुढारी, हजरतचें ह्मणणें मान्य करण्यास कबूल झाला; परंतु त्याबद्दल त्यानें मदिना शहरच्या उत्पन्नांतील अर्धे उत्पन्न मोबदला ह्मणून मागितलें. हजरत पैगंबर त्याला एकत्रितियांश उत्पन्न देण्यास तयार होतेच;

तेव्हां पैगंबरनें आपल्या शहरांतील सर्व समंजस लोकांना बोलाऊन आणिलें आणि त्यांना यावेळीं काय करावें असें] विचारिलें. ते ह्मणाले, " आपल्याला ज्याप्रमाणें अल्लाचा हुकूम झाला असेल त्याप्रमाणें आपण करावें " हजरत पैगंबरनें उत्तर दिलें, " नाहीं, जर मला अल्लाचा हुकूम झाला असता, तर मी तुमचें मत विचारलेंच नसतें. तेव्हां आतां काय करणें उचित आहे असा माझा तुह्मांला प्रश्न आहे." ते लोक ह्मणाले, " ठीक, असेंच जर असेल तर तरवारी शिवाय त्यांना कांहीं एक मिळणार नाहीं." ही गोष्ट पुढें येथेंच थांबली खरी; तथापि या एका गोष्टीवरून पैगंबरवर मुसलमान लोकांचा किती दृढ विश्वास होता हें सिद्ध होतें.

मदीना शहराला वेढा देण्याच्या प्रारंभीं अबुसुफयाननें यहुदी लोकांच्या मुख्य पुढाऱ्याकडे आपला वकील पाठविला होता, आणि हजरत पैगंबर जवळ केलेला तह मोडून टाकून त्यानें मक्केतील लोकांना सामील व्हावें, अशी त्यानें त्याच्या जवळ मागणें केलें होतें. यहुदी लोकांना वाटलें कीं, कुरेश व त्यांचे स्नेही यांचा भरणा व शक्ति मुसनापेक्षां फार मोठी आहे, अर्थात आज नाहीं तर उद्यां त्यांनांच जय प्राप्त होणार. तेव्हां याप्रसंगीं आपण कुरेश लोकांचाच पक्ष धरणें अधीक श्रेयस्कर आहे. त्यांनीं त्या वकीलाचें बोलणें मान्य केलें आणि हजरत पैगंबरला अशा आणीबाणीच्या वेळीं सोडून देऊन त्यांच्या शत्रूचा रस्ता धरिला. या यहुदी लोकांनां असा विश्वासघात केल्याबद्दल योग्य शासन मिळालें.

## ७ लढाईचा शेवट.

मादिना शहरांत वेढ्यांत सांपडलेल्या सैन्याची फारच वाइट स्थिती झाली; शहरांत जिकडे तिकडे विश्वासघात पसरला होता, आणि मक्केतील सैन्याला या मुसलमानांची फळी फोडून शहरांत घुसतां

आलें असतें तर यहुदी लोकानीं मागच्या बाजूनें हल्ला करून मुसलमानांचा धुव्वा उडवून दिला असता. कारण ते लढाईचा रंग कोणत्या बाजूला आहे हें पाहात बसले होते. रात्रंदिवस पाहारा करून व शत्रूजवळ युद्ध करून मुसलमान सैन्य अगदीं थकून गेलें होतें, आणि ह्मणून त्या सैन्याचे ह. मुहम्मदला दोन भाग करणें भाग पडलें. त्यांतील एका तुकडीनें झोंप घेऊन विश्रांति घ्यावी व दुसऱ्या तुकडीनें पहारा व युद्धाचें काम करावें, व नंतर पहिल्या व दुसऱ्या तुकड्यांनीं आपापलीं कामें बदलावींत; अशी योजना करून दिली होती. अचानक हल्ला कोठें व केव्हां होईल याचा कांहींच नेम नव्हता, ह्मणून मुसलमान सैन्याला रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून आपलें कर्तव्य करावें लागलें. मक्केंतील लोकांनीं ह्मणजे दहा हजार शूर शिपायांनीं शहरांत घुसण्यासाठीं आपले जंग जंग पछाडिले, परंतु या थोड्याशा लोकांनीं त्यांची वीस दिवसपर्यंत डाळ ह्मणून शिजूं दिली नाहीं. या एकाच गोष्टीवरून मदिना शहरांतील लोकांच्या सावधगिरीचें आणि त्यांच्या शौर्याचें केवढें आश्चर्य आहे !

एवढा दीर्घ प्रयत्न करून त्यांत यश आलें नाहीं, म्हणून कुरेश लोकांची उमेद खचून गेली; थंडगार हवेच्या सोंसाट्यानें त्या मोकळ्या जागेवर लोक आंकडून गेले; आणि उंट व घोडे यांची चाऱ्याशिवाय उपासमार होऊं लागली. एके दिवशीं रात्रीं एकाएकीं भयंकर वादळ सुरू झालें, आंगाला झोंबणारा वारा जिकडून तिकडून सोंसाट्यानें वाहून तें वाळूचें मैदान झाडीत चालला, आणि नंतर आधींच थंडीच्या कडाक्यानें गारठून गेलेल्या लोकांवर आकाशांतून पावसाची मुसळधार सुरू झाली. पूर्वीच्या वाऱ्याचें स्वरूप पालटून त्याला तुफानी वाऱ्याचें स्वरूप प्राप्त झालें, छावणींतील विस्तव, दिवे, विझून गेले, आणि जिकडे तिकडे छावणींत एकच गोंधळ उडाला. पंचमहाभूतांचा हा कोप आहे

असें पाहून अबुसुफयाननें एकदम तेथून छावणीचा व घरचा रस्ता धरण्यांचा हुकूम केला. सेनापतीच्या या हुकमाची छावणींतील सर्व लोक वाटच पाहात होते. त्यांचा हुकूम सुटल्याबरोबर ज्यांनीं त्यांनीं कशीबशी निघण्याची तयारी मोठ्या त्वरेनें केली. या तुफानानें लोक इतके भेदरून गेले कीं, हें अरिष्ट आपल्या नाशाकरितां मुसलमान लोकांनींच कांहीं तरी मंत्र तंत्र, जादुटोणा करून आणिलें असलें पाहिजे, असेंहि ते म्हणूं लागले. दुसरे दिवशीं उजाडतें न उजाडतें तोंच या ठिकाणीं कोणीही चिटपांखरूं शिल्लक म्हणून राहिलें नाहीं. याप्रमाणें मदिनाच्या वेढ्याची हकीगत झाली. पुढें वेढ्याला खंदकाची लढाई असें नांव मिळालें.

# भाग १३ वा.

## विजयाचीं पूर्व चिन्हें.

विषय

१ मक्केला हज करण्याची तयारी
२ हुदेबिया येथील मुक्काम
३ वृक्ष प्रतिज्ञा
४ शांततेचा तह
५ हजरत पैगंबरचे परराष्ट्रांना खालिते
६ खैबरवर मुसलमानांची स्वारी
७ मुसलमानांचा मक्केंत प्रवेश

### १ मक्केला हज करण्याची तयारी.

मदिनेच्या वेढ्यानंतर मुसलमान लोकांना एक वर्ष फार त्रास दायक गेलें. मक्केंतील लोकांबरोबर या वर्षांत प्रत्यक्ष अशी लढाई झाली नाहीं, परंतु आजुबाजूच्या प्रदेशांतील लुटारू टोळ्यांनीं गांवांत शिरून लोकांना अनेक प्रकारें त्रास देण्यास मात्र कमी केलें नव्हतें. त्या गांवांत शिरत, लोकांची सांपडेल ती चीजवस्त लांबवीत, किंवा वेळ प्रसंगीं जाळपोळ करून चालत्या होत. निरपराधी शेतकरी लोकांना, तसेंच हातांत शस्त्र न घेणाऱ्या लोकांना, या अरब टोळ्यांपासून फारच त्रास होई. लुटीच्या आशेनें दया माया पार झुगारून देऊन त्यांची झडप ज्यांच्यावर पडे त्यांच्या जवळ शिल्लक असें कांहीं एक रहात नसे. हजरत पैगंबरच्या स्वाभावाचें चित्र मात्र याच्या अगदीं भिन्न असे. त्यांच्या आयुष्यांत दया, क्षमा व शांति, या सद्गुणांची अनेक उदाहरणें आहेत. लढाईच्या प्रसंगीं सुद्धां शूर शिपायांना “ अंतःकरणांत पूर्ण दया असूं द्या, ” असा मोठ्या कळकळीनें त्यांनीं उपदेश केलेला आहे.

एकदां बदुइन टोळीचा बंदोबस्त करण्याकरितां हजरत पैगंबरनें आपल्या एका अधिकाऱ्याला पाठविलें; तो आपल्या लोकांना घेऊन जेव्हां स्वारीला निघाला, तेव्हां हजरत पैगंबर त्याला म्हणाले, "कसाहि प्रसंग पडला तरी भलेपणा सोडूं नको, लहान मुलें व स्त्रिया यांच्यावर शस्त्र उगारूं नको, क्षमा आणि दया या दोन सद्गुणांना कधींहि विसरूं नको." जे देश स्वतः जिंकून घेत असत, त्यांतील रहिवाशांच्या घरादारांना हात न लावण्याची सक्त ताकीद ते आपल्या अधिकाऱ्यांना देत असत. ख्रिस्ती लोकांच्या जवळ जो त्यांनीं सलोख्याचा तह केला होता, त्यांत त्यांच्या देऊळांना व मठांना मुसलमानांनीं हात लावूं नये, असा एक करार होता हा करार ह. पैगंबरनें किती अक्षरशः पाळला होता हें युरोपीयन इतिहासकारांनीं लिहिलेल्या इतिहासावरून स्पष्ट कळून येतें. ख्रिस्ती धर्माप्रमाणें शांततेनें वागण्याला त्यांनीं परवानगीहि दिलेली होती. हीहि गोष्ट विशेष आहे.

मक्का शहर सोडून मुसलमानांना सहा वर्षें पूर्ण झालीं होतीं, आणि इतक्या वर्षांत त्यांना आपली जन्मभूमी पहाण्याचा योग आला नव्हता; म्हणून ते अलिकडे फार उत्सुक झाले होते. कुरेश लोकांच्या दुष्टपणाचीं ढळढळीत उदाहरणें त्यांच्या जरी नजरेसमोर होतीं, तरी आपल्या जन्मभूमीची आठवण त्यांना अत्यंत प्रिय वाटे. तीनशें साठ देवांच्या मूर्तींनीं व्यापून टाकलेलें काबा शरीफ त्यांना अद्याप पवित्र व प्रिय वाटे; याचें कारण तें स्थान ह. इब्राहिमच्या काळापासून सर्वांनीं पवित्र मानलेलें होतें, आणि हजरत पैगंबरनें तर ह. इब्राहिमनें स्थापन केलेल्या धर्माला पुन्हां पुनर्जिवन केली; ह्मणून मुसलमान लोकांना तें स्थान पवित्र वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. शिवाय मक्केला हज ( यात्रा ) करणें हें प्रत्येक मुसलमानाचें आद्य कर्तव्य आहे, ह्याला अनुसरून मक्केला हज आपण करावा, असें त्यांना साहाजिकच वाटे. पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीप्रमाणें हज करण्याच्या वेळीं शत्रू व मित्र

याच्यामध्यें भेदभाव न राहातां सर्वांना जर हज करतां येतो, तर मग आपल्याला तसा कां करता येऊं नये असें त्यांना कां वाटू नये ?

मुसलमान लोकांच्या या उत्कृष्ट इच्छेकडे हजरत पैगंबरचें दुर्लक्ष होतें असें ह्मणतां येत नाहीं. कारण त्याच्यावर फार मोठ्या जबाबदारीचें ओझें पडलेलें होतें. स्वधर्म व स्वराज्य हे दोन हेतु त्यांना सिद्धीस न्याव-याचे होते. तेव्हां या दोन हेतूंच्या मार्गांत कोणकोणत्या अडचणी येण्याचा संभव आहे याचा खोल विचार करून ते कोणतेंहि कार्य करण्याला आपल्या लोकांना परवानगी देत असत.

मक्केला हज ( यात्रा ) करण्याची चाल फार पुरातन काळापासून चालू आहे. तेथील काबा हें एका ईश्वराचें पवित्र स्थान ह्मणून जेव्हां प्रसिद्ध झालें, तेव्हां ह. इब्राहिमनें यात्रेसंबंधीं कांहीं धार्मिक विधी लोकां-ना ठरवून दिले. त्यानंतर त्या ठिकाणीं मूर्ती स्थापन झाल्या. तथापि सर्व देशांतील अरबलोक पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीला अनुसरून मक्केची हज ( यात्रा ) करीत असत. जेव्हां यात्रेकरू मक्केंत पाय ठेवितो, तेव्हां त्याला एक प्रकारचा विशेष पोषाक करावा लागतो. त्याला " येहराम " अथवा यात्रेकरूचा पोषाक असें ह्मणतात. याला दोन कापडाचे मोठाले तुकडे असतात, त्यांतील एक कमरेच्या खालीं नेसाव-याचा असतो, आणि त्याला जोडलेला दुसरा डाव्या खांद्यावरून घेऊन त्याची उजव्या खांद्यावर गांठ मारावयाची असते. यात्रेकरूला डोक्यांत कांहीं एक घालावयाची परवानगी नसते. ही पुरातन काळापासून पोषाकाची चालत आलेली पद्धत अद्याप तशीच चालू आहे.

हजरत पैगंबरनें लोकांच्या इच्छेला मान देण्याचें शेवटीं ठरविलें. यात्रेचा महिना जवळ येत चालला तेव्हां त्यानें आपल्या लोकांना मक्केला हज करितां जाण्याची तयारी करण्यास सांगितलें. हजरत पैगंबरच्या स्वभावांत विशेष एक तत्व असें होतें कीं, ते आपल्या मनांतील कोणतीहि

गोष्ट योग्य वेळ असल्याशिवाय कोणाजवळ बोलत नसत. तेव्हां या वेळीं मक्केला जाण्याची तयारी करा असे शब्द त्यांच्या तोंडून निघतांच लोकांना अत्यानंद झाला. त्यांनीं यात्रेकरूंचा पोषाक केला आणि आपल्या आवडत्या अल्–कास्वा उंटावर स्वार होऊन मदीना शहरांतून बाहेर पडले. त्यांच्याबरोबर चौदाशें मुसलमान मातृभूमीचें दर्शन घेण्यास निघाले. मक्केंत पोंचल्यावर यात्रेच्या नियमाला अनुसरून तेथें द्यावे लागणारे बळी ह्मणून गळ्यांत फुलांच्या माळा घातलेले उंट त्यांनीं आपल्याबरोबर घेतले होते. देवांच्या नांवानें बळी देण्याच्या विधीला " कुरबानीं," असें ह्मणतात. याबद्दल अशी एक आख्याइका आहे कीं, परमेश्वरानें हजरत इब्राहिमला त्याची अत्यंत प्राणप्रिय वस्तु आपल्याला अर्पण करण्यास सांगितलें. या जगांत मनुष्याला जडजवाहीर, सोनेंनाणें फार प्रिय असतें; त्यापेक्षां स्वतःची पत्नी प्रिय असते व सर्वांत प्रिय मुलें बाळ असतात. हजरत इब्राहिमचा मुलगा इस्माइल याच्यावर बापाचें प्राणापलीकडे प्रेम होतें. तेव्हां सर्वांस आवडती वस्तु ईश्वराला अर्पण करण्याकरितां त्यानें व आपल्या मुलाला बळी देण्याचें ठरवून त्याप्रमाणें त्यानें आपल्या मुलाची परवानगी घेतली. ईश्वरा प्रीत्यर्थ आपला देह खर्चीं पडणार या विचारानें इस्माइलला संतोष झाला. नेमलेल्या दिवशीं मुलाला बळी देण्याची सर्व तयारी झाली व हजरत इब्राहिमनें आपल्या मुलाचा वध आपल्या डोळ्यांनीं पाहावणार नाहीं यासाठीं अपाले दोन्ही डोळे कापडानीं बांधून घेऊन आपल्या हातांतील झळझळीत सुरा मुलाच्या मानेवर फिरविला. इकडे परमेश्वर हें सर्व कृत्य पाहात होता. त्यानीं देवदूताला इस्माइलला वांचविण्याचा हुकूम दिला. चमत्कार असा झाला कीं, सुरा मानेवर फिरताच, एकदम मेंढ्याच्या ओरडण्याचा आवाज उत्पन्न झाला, मनुष्याच्या ऐवजीं असा आवाज कसा झाला याचें ह. इब्राहिमला आश्चर्य वाटून त्यानें आपले बांधलेले डोळे सोडले; व पाहतो तों, मुलाच्या जागेवर एक मेंढा पडलेला त्याला दिसला व त्याच्या बाजूला

इस्माइल सुखरूप उभा! परमेश्वर बळी घेऊन संतुष्ट होतो ही जी त्या काळापासून लोकांची भावना झाली ती अद्याप तशीच आहे. या बळी देण्याच्या विधीला कुरबानी ह्मणतात. हजरत इब्राहिमच्या हातून एकदम त्या प्राण्याचा प्राण त्या वेळीं गेला नाहीं, ह्मणून मुसलमान लोक मेलेला प्राणी खात नाहींत; व तेव्हां पासून हालाहाल करण्याची चाल मुसलमान लोकांत पडून गेली आहे.

हजरत पैगंबर मक्केला येत आहेत, अशी बातमी शहरांत येऊन पोंचतांच कुरेश लोक मोठ्या विचारांत गढून गेले. चौदाशें मुसलमान मक्केकडे काय निमित्तानें येत आहेत, याचा त्यांना कांहींच तर्क होईना! हजरत पैगंबर यात्रेकरितां येत आहेत असें नक्की कळूनसुद्धां त्यांच्या मनाची शांति होईना. ह्मणून त्यांनीं हजरत पैगंबरला मक्केच्या आसपास येऊं द्यावयाचें नाहीं असा विचार ठरवून त्यांनीं आपली हत्यारबंद फौज शहराच्या बाहेरील प्रदेशाचें संरक्षण करण्याकरितां पाठवून दिली. मुसलमान लढाईच्या उद्देशानें सशस्त्र बाहेर पडलेले नव्हते, तेव्हां कुरेश फौजेच्या स्वारीची बातमी हजरत पैगंबरला पोंचताच; त्यानीं मक्केला जाणारा राजमार्ग सोडून दिला; आणि खडकाळ, अवघड असा प्रदेश ओलांडून ते मक्केपासून आठ मैलावर असलेल्या हुदेबिया नांवाच्या ठिकाणीं येऊन पोंचले.

## २ हुदेबिया येथील मुकाम.

वर सांगितलेल्या टिकाणीं ते येऊन फार दिवस झाले नाहींत तोंच, एके दिवशीं मक्केच्या दिशेकडे एक धूळीचा लोट वाऱ्यानें वर उडतांना त्यांनीं पाहिला. थोड्याच वेळांनीं एक घोडेस्वाराची पलटण जवळ जवळ येत चालली; कुरेश लोकांनीं आपला एक अधिकारी, बरोबर एक घोडेस्वाराची पलटण देऊन, हजरत पैगंबरचा मक्केला येण्याचा

काय उद्देश आहे याचा तपास करण्याकरितां पाठवून दिला होता. हजरत पैगंबरनें आपला यात्रा करण्याचा हेतु असून यात्रा पुरी होतांच आपण परत निघून जाणार, असें त्या अधिकाऱ्याला समजावून सांगितलें. हजरतच्या या उत्तरानें कुरेश लोकांचें समाधान झालें नाहीं; आणि "मक्केंतील रहिवाशी तुझ्या या येण्यामुळें फारच खवळले आहेत, व ते तुला मक्केच्या हद्दींत पाऊल टाकूं देण्यास मुळींच कबूल नाहींत," असा त्यांनीं दुसऱ्या अधिकाऱ्याबरोबर पुन्हां निरोप हजरत मुहम्मद-कडे पाठविला. शहरांत शिरण्याला आपल्याला हरकत होऊं नये, म्हणून हजरतनें सामोपचारानें कुरेश लोकांचें मन वळविण्याचा प्रयत्न करून पाहिला. कुरेश लोक व हजरत पैगंबर यांच्या ज्या वाटाघाटी होत, त्यांची ने आण करण्याकरितां कुरेश लोकांनीं एक हुषार वकील नेमला होता. हजरतची भेट घेतल्यावर तो कुरेश लोकांकडे जेव्हां परत गेला, तेव्हां तो त्यांना म्हणाला, "कॉन्स्टन्टीनोपल मधील राजविलासी व थाट-माटांनीं भरून गेलेल्या रोमन राजाच्या दरबारीं मी वकील म्हणून गेलों होतों, त्याचप्रमाणें पराशियन व अबिसिनियन राजांचें ऐश्वर्य, त्यांचा राजकीय डोळे चक्क करून सोडणारा थाटमाट, मी स्वतः पाहिला आहे. परंतु हजरत पैगंबरला त्यांच्या प्रजेकडून जो मानपान मिळतो, त्यांचा हुकूम जसा शिरसावंद्य मानला जातो, तसा मानपान दुसऱ्या कोणत्याहि चक्रवर्ती राजाला मिळालेला मी पाहिला नाहीं."

## ३ वृक्ष प्रतिज्ञा

सरते शेवटीं हजरत पैगंबरनें आपला जांवई उस्मान याला मक्केंतील कुरेश पुढाऱ्यांच्या जवळ यात्रेकरितां परवानगी मागण्यासाठीं व त्या संबंधीं वाटाघाट करण्यासाठीं वकील या नात्यानें पाठवून दिलें. उस्मान मक्केंतून काय निरोप घेऊन येतो हें ऐकण्यासाठीं मुसलमान लोक फार उत्सुक झाले होते. उस्मान मक्केला जाऊन तीन दिवस झाले तथापि

त्याचा कांहींच पत्ता लागेना; तेव्हां त्याच्या जिवाबद्दल मात्र सर्वांना काळजी वाटू लागली. इतक्यांत मक्केंत उस्मानचा खून झाल्याची बातमी मुसलमानांत दाट पसरली. हजरतच्या कानांवर ही बातमी जातांच ते आपल्या लोकांना ह्मणाले, 'ही बातमी जर खरी असेल तर लढाई शिवाय आपल्याला दुसरा मार्ग नाहीं. हा विश्वासघात झाला. याला लढाई हेंच प्रायश्चित्त. अशा विश्वासघातानें वकीलांच्या सुरक्षितपणाचें तत्व नष्ट होईल.' पैगंबर साहेबांच्या तोंडच्या शब्दांत किती जादु भरलेली होती! तत्क्षणीं मुसलमान लोक लढाईची आरोळी करीत सुटले! त्यांचे रक्त वीरश्रीनें आंगांत खेळूं लागलें; व जिकडे तिकडे सर्व लोकांत एकदम चैतन्य उत्पन्न होऊन तें ठिकाण हर्षानें डुलूं लागलें! हजरत त्यावेळीं एका झाडाखालीं उभे होते. त्यांच्या जवळ मुसलमान लोक आले आणि त्यांना ह्मणाले, 'हजरत, आह्मांला लढाईचा हुकूम द्या. आह्मीं मरू परंतु तुह्मांला आह्मीं अंतर देणार नाहीं. हें घ्यां आमचें वचन.' असें बोलून सर्व लोकांनीं हजरतच्या हातावर हात दिला. या वचनाला 'वृक्ष प्रतिज्ञा' असें ह्मणतात.

## ४ शांततेचा तह

वर सांगितलेल्या वचनाचें स्मरण हजरत पैगंबर कधींहि विसरले नाहींत. त्या वचनावरून त्यांना आपल्या लोकांचा आपल्यावर किती विश्वास, किती प्रेम आणि किती श्रद्धा आहे हेंहि कळून आलें. त्याच दिवशीं संध्याकाळीं उस्मान मक्केहून परत आला. हजरत पैगंबरनें त्याला ज्या कामाकरीतां कुरेश लोकांकडे पाठविलें होतें, त्या कामांत त्याला पूर्ण यश आलें नाहीं, तथापि मुसलमानांच्या जवळ कुरेश लोकांनीं शांततेचा तह करण्याकरितां त्यांचीं मनें त्यानें मोठ्या प्रयत्नानें वळवून घेतलीं. विचार केला तर उस्मानची ही लहान-सहान कामगिरी झाली असें ह्मणतां येत नाहीं; कारण त्याच्याच योगानें या दोन पक्षांमध्यें

येणारा लढाईचा प्रसंग टळून कित्येक लोकांचे प्राण बचावले. कुरेश लोकांनीं सुहेल या नांवाचा आपला एक पुढारी हजरतकडे तहाच्या वाटाघाटी करण्याकरितां पाठविला. दोन्ही पक्षाच्या लोकांनीं तहाचीं कलमें लिहून तीं एकमेकांकडे दिलीं. दोन्हीं पक्षाला मान्य झालेल्या कलमापैकीं खालील मुख्य होतीं:—

१ आजपासून दहा वर्षे मुसलमान व मक्केंतील रहिवाशी यांच्यामध्यें लढाई होणार नाहीं.

२ इकडून तिकडे भटकणाऱ्या टोळ्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे; त्यांनीं कोणत्याहि पक्षाचा स्नेह बाळगावा.

३ पुढल्या वर्षीं मुसलमान लोकांना हज करण्यास परवानगी आहे.

४ यात्रेच्या दिवसांत मुसलमानांना मक्केंत तीन दिवस रहाण्यास परवानगी आहे.

५ या तीन दिवसांत मक्केंतील लोकांनीं शहर सोडून बाहेर कोठेंहि रहावें.

६ या तीन दिवसांत बाहेर जाणाऱ्या कुरेश लोकांनीं आपल्या बरोबर मक्का शहरांत पूर्वींपासून रहात आलेल्या मुसलमानांपैकीं कोणालाहि नेऊं नये. जे कोणी मुसलमान मक्केंत रहाण्याला खुषी असतील त्यांना कुरेश लोकांनीं प्रतिबंध करूं नये.

ही तहाची वाटाघाट सुरु असतांना मक्केंतील एक मुसलमान कैदी धांवत येऊन सर्वांसमक्ष जमिनीवर हजरत पैगंबर पुढें धाड्कन पडला. हा सुहेलचा मुलगा होता. त्यानें इस्लाम धर्माचा स्वीकार केला होता, यामुळें कुरेश लोकांनीं त्याला कैद करून त्याचे हालहाल चालविले होते. सुहेल आपल्या मुलास पाहून ह्मणाला, ‘ या तहनाम्याच्या अटीप्रमाणें माझा मुलगा माझ्या स्वाधीन करा. ’ हजरतनें त्याला जबाब दिला, ‘ तहाच्या अटी अद्याप ठरलेल्या नाहींत. ’ या जबाबानें सुहेलचे समाधान

झालें नाहीं व तो तह करण्याला हरकत घेऊं लागला, ह्मणून त्या गरीब बापुड्यास त्याचे स्वाधीन करणें हजरतला भाग पडलें.

शेवटीं अलिनें तहनामा लिहिण्याला सुरवात केली, व हजरत पैगंबर मजकूर सांगूं लागलेः—

"जो सर्वांत दयावंत व कृपासागर आहे, अशा परमेश्वराच्या नांवानें" इतक्यांत कांहीं लोक ओरडून ह्मणाले, 'परमेश्वर ह्मणाल तर आह्मीं त्याला ओळखतो, परंतु हीं त्याचीं दुसरीं नांवें आह्मांला मान्य नाहींत.'

हजरत पैगंबर ह्मणाले; "बरें आहे, तर मग लिहा, हे परमेश्वरा, तुझे पवित्र नांव घेऊन आह्मीं तहाच्या अटी ठरवितो कीं, तुझा प्रेशित मुहम्मद पैगंबर आणि........" कुरेश पुढारी पुन्हा मोठ्यानें ओरडून ह्मणाले, "बस, बस, तूं ह्मणतोस असा जर तूं असतास तर तुझ्या जवळ युद्धाला आह्मीं उभे राहिलों नसतों. नेहमींच्या पद्धती प्रमाणें आपलें आणि आपल्या बापाचें नांव घाल."

हजरत पैगंबरनें शांतपणानें उत्तर दिलें, "तर मग लिहा, अबदल्लाचा मुलगा मुहम्मद आणि आमरचा मुलगा सुहेल यांच्यामध्यें."

या प्रमाणें तहनाम्याचा प्रारंभ करून वर सांगितलेल्या अटी त्यांत लिहिल्यावर त्या कागदावर अबुबक्र, उमर आणि उस्मान, या तिघांनीं साक्षी ह्मणून आपल्या सह्या केल्या. अलीनें लेखक ह्मणून आपली सही केली व त्या कागदाची एक नक्कल शत्रूपक्षाला देऊन अस्सल प्रत पैगंबरनें आपल्या स्वतः जवळ ठेविली.

अशा रीतीनें हुदेबिया स्वारीचा शेवट झाला.

## ५ हजरत पैगंबरचे परराष्ट्रांना खलिते.

वर सांगितलेल्या तहामुळें ह. पैगंबरला फार आनंद झाला. कारण त्यांत मुसलमान लोकांचाच जय स्पष्ट झालेला त्यांच्या शत्रूंनीं कबूल केला होता. ह. पैगंबरचे लोक मात्र जरा विरस झाले. कारण, आपली मक्केंमधील

घरें दारें डोळे भरून पाहाण्याची जी फार दिवसांची त्यांची इच्छा होती ती या तहनाम्यावरून अतृप्त राहिली.

पुढल्या वर्षी ( इ. स. ६२८, हिजरी सन ७ ) ह. पैगंबरच्या कारकीर्दीमधील सर्वांत महत्वाची गोष्ट घडून आली. त्यानें एकाच दिवशीं सहा वकील पृथ्वीवरील मुख्य सहा सत्ताधीशांकडे आपल्या स्वदस्तुरची पत्रें घेऊन पाठवून दिले. त्यांतील एक रोमचा बादशहा हेराक्लिअस याच्या नांवाचें होतें; दुसरें इराणच्या राजाच्या नांवाचें, आणि बाकीचीं इजिप्तचा मुख्य अधिकारी, अबिसिनियाचा राजा आणि घासान व यनामा या प्रांताच्या अधिकाऱ्यांच्या नांवाचीं होतीं. या पत्रांत ह. पैगंबरनें आपण ईश्वराचे प्रेशित म्हणून सर्व राष्ट्रांना "इस्लाम" धर्माचा स्वीकार करून त्या धर्मांतील तत्वें मान्य करण्यास आव्हान केलेलें होतें. "ईश्वराचा प्रेशित म्हणून जे मुहम्मद पैगंबरवर विश्वास ठेवून चालतील त्यांचें कल्याण प्रभू करील, आणि जे त्यांचें वचन अमान्य करतील, त्यांच्यावर सर्व रयतेच्या पापाचें ओझें पडेल," असें त्या पत्रांत लिहिलें होतें.

रोमच्या बादशहानें जेव्हां हें पत्र पाहिलें, तेव्हां तो फक्त हांसला, आणि हें कोणत्या तरि निरुपद्रवी माथेफिरूनें केलेले चाळे आहेत, असें समजून तें पत्र टाकून दिलें. त्यावेळीं घासन हा प्रांत रोमन साम्राज्यांतील एक मांडलिक संस्थान होतें. तेथील राजाला जेव्हां त्याचें पत्र गेलें, तेव्हां राजानें ते हेराक्लिअसकडे पाठवून हा कोण ढोंगी आहे, त्याला ताळ्यावर आणण्यास मला परवानगी मिळावी अशी विनंती केली. बादशहानें या राजाला असा जबाब पाठविला कीं, "आम्हीं जरुसलेमला जात आहोंत, तरी आम्हांला येऊन मिळावें." "कोण असेल वेडगळ अरब, त्याचें काय मनांवर घ्यावें," असें म्हणून घासनच्या राजाच्या विनंतीचा उल्लेखसुद्धां त्यानें आपल्या उत्तरांत केला नाहीं. इराणच्या बादशहानें तर या पत्रांची फारच थट्टा केली. बादशहानें हें पत्र पाहून त्याचे फाडून तुकडे करून फेंकून दिले. अप्रतिबंध सत्तेच्या गर्वानें ते आज डुलत होते, ऐश्वर्य मदानें

त्यांची दृष्टी मंद झाली होती, आणि राजविलासी ख्यालीखुशालीनें त्यांची सारासार विचारशक्ति मावळली होती. अरेरे, मनुष्य प्राण्याची किती शोचनीय स्थिती आहे पाहा! आतां थोड्याच वर्षांनीं याच माथेफिरूचें नांव, याच भटकणाऱ्या अप्रसिद्ध गांवढळ अरबाचें नांव, याच चक्रवर्ती सार्वभौम बादशहांना थरथर कांपावयास लावील याची त्या बिचाऱ्यांना आज कल्पनाहि झाली नाहीं. "हा कालाचा महिमा," म्हणतात तेंच खरें. आफ्रिकेच्या उत्तर भागापासून तों जिब्राल्टरच्या सामुद्रधुनी पर्यंतचा सर्व मुलुख मुसलमान म्हणजे या भटकणाऱ्या टोळ्यांच्या सत्तेखालीं येणार हे त्यांच्या आज ध्यानींमनींहि नव्हतें.

जिब्राल्टरला अरब लोकांनीं "जेबेल-अल्टारिक," हें नांव दिलें होतें. त्या नांवाच्या अपभ्रंशावरून सध्यांचें नांव पडलें आहे. यूरोपमधील स्पेन हाहि देश एकाकाळीं मुसलमानांच्या अमलाखालीं होता! या सर्व गोष्टी पुढील काळांत घडून येणाऱ्या आहेत. आजची वस्तुस्थिती मात्र निराळी आहे. ज्या काळाचा आम्हीं हा इतिहास लिहित आहोंत त्या काळीं मदिना शहर आणि मदिना शहरच्या आसपासचा मुलुख यांच्यावर फक्त मुसलमान लोकांची सत्ता चालत होती. मुसलमानांचें राज्य असेंच म्हणावयाचें असेल तर वर सांगितलेल्या प्रदेशांस म्हणतां येईल. पृथ्वीवरील देश पादाक्रांत करून तेथें आपलें राज्य स्थापन करावे असाच हजरत पैगंबरचा हेतु असावा, असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं; कारण परदेशाशीं लढाई करण्यासारखीं साधनें व अनुकूलता त्यांच्या जवळ कांहींच नव्हती. फक्त शत्रूपासून आपल्या शहराचें संरक्षण व्हावें, एवढीच तयारी त्यांच्या जवळ होती. तेव्हां रोमच्या बादशहा सारख्या महाबलाढ्य राजांना खलिता पाठविण्याचा हजरत पैगंबरचा हेतु आपल्या "इस्लाम" धर्माचा प्रसार व्हावा, त्या धर्माची माहिती सर्व देशांत पसरावी, व खऱ्या धर्मावर लोकांचा विश्वास बसावा, हाच असावा, असें स्पष्ट दिसतें. अरबस्थानांतच नव्हे, तर सर्व पृथ्वीवर आपल्या धर्माचा पगडा बसावा, अशीहि त्यांची महत्वाकांक्षा असावी!

## ६ खैबरवर मुसलमानांची स्वारी.

यहुदी लोक मुसमानांच्या अगदीं विरुद्ध होते. ते त्यांचा मनापासून द्वेष करीत आणि त्यांच्या प्रत्येक प्रयत्नांत कोठेंना कोठें कांहींतरी विघ्न उत्पन्न करीत. हजरत पैगंबरचा प्राण घेण्याचा प्रयत्न त्यांनीं अनेक वेळां करून पाहिला. मदिना शहरापासून सुमारें शंभर मैलांवर खैबर म्हणून एक खेडें गांव आहे. त्या ठिकाणीं पाणी विपूल व जमीन सुपीक आहे. यहुदी लोकांनीं या खेड्याला तट बांधून बरेंच बंदोबस्ताचें ठिकाण केलें होतें. तेथील यहुदी लोकांनीं मदिना शहरावर स्वारी करण्याचा बेत केला; परंतु त्यांचा हा बेत सिद्धीस जाण्याच्या पुर्वींच हजरत पैंगबरला तो कळ ल्यावरून त्यानें या यहुदी लोकांच्या तटबंदी गांवावर स्वारीकरून त्या गांवाला वेढा दिला. या वेढ्यामुळें यहुदी लोकांना बाहेरून मिळणारा दाणा बंद झाला, आणि त्यांची उपासमार होण्याची वेळ आली. हा वेढा दोन महिने उठला नाहीं. लढाई करून वेढा उठविण्याचा प्रयत्न यहुदी लोकांनीं करून पाहिला, परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. हजरतच्या सैन्यांत मुख्य निशाण धरण्याचा बहुमान अलिला दिला होता. असें सांग तात कीं, या स्वारीचें शुभ्र निशाण बिबी आयेशाच्या आंगावर घेण्याच्या वस्त्राचें केलेलें होतें. यहुदी लोकांच्या बरोबर मुसलमानांच्या ज्या वारंवार चकमकी होत, त्यांत अलिनें आपलें खरें क्षात्रतेज त्यांना चांगलेंच दाखविलें. त्याची ती प्रचंड शक्ति, अलोट धाडस, जाज्वल्य धर्माभिमान, अनेक गोष्टींच्या रूपानें वाचावयास मिळतात. एका प्रसंगीं त्याची ढाल ऐन वेळीं हरवली, परंतु तो रणबहाद्दर डगमगला नाहीं. त्यानें लगेच एक मोठी दरवाजाची फळी उपटून हातांत घेतली, व त्या फळीवर ढालेचें कार्य करून आलेल्या प्रसंगांतून तो पार पडला!

पडलेल्या वेढ्याला न डगमगतां यहुदी लोकांनीं दोन महिने टिकाव काढिला; परंतु शेवटीं त्यांनीं हात टेकले; आणि ते एकामागून एक हज-

रत पैगंबरला शरण गेले. खैबर हा गांव व त्याच्या आसपासचा सर्व मुलुख या स्वारींत मुसलमानांना मिळाला. हजरत पैगंबरनें वार्षिक कांहीं ठराविक खंडणीच्या करारावर, यहुदी लोकांना तेथेंच रहाण्याला व जमिनीवर उत्पन्न करण्याला परवानगी दिली.

खैबर या खेड्यांत पैगंबर असतांना त्यांच्या जिवावरचा प्रसंग एकदां मोठ्या सुदैवानें टळला. ते जेवावयास बसले असतांना एका यहुदी बाईनें एक मांसाची बशी त्यांच्या पुड्यांत आणून ठेविली; पैगंबरनें त्यांतील एक घास तोंडांत घातला, परंतु त्यांना यांत कांहीं तरी दगा आहे, असा संशय आला; आणि तो त्यांचा संशय खरा ठरला ! त्यांच्या बरोबर दुसरा एक इसम जेवावयास बसला होता, त्यानें हें विषारी मांस खाल्लें होतें, तो थोड्याच वेळांनीं मरण पावला. पैगंबरच्या पोटांत या विषाचा फारच थोडा भाग गेलेला होता, तथापि त्याचा परिणाम त्यांना अखेर पर्यंत सोसावा लागला.

## ७ मुसलमानांचा मक्केंत प्रवेश.

मुसलमानांच्या बरोबर मक्केंतील लोकांनीं जो मागें तहनामा केला होता, त्यांतील एका कलमाची अंमलबजावणी करण्याची वेळ येत चालली होती. मक्केच्या वार्षिक जत्रेचा काळ जसा जसा जवळ येत चालला, तसेतसे मुसलमान लोकांना आपल्याला घरींदारीं जावयास मिळतें केव्हां असें त्यांना झालें होतें. घरें दारें सोडून आज त्यांना सात वर्षें झालीं होतीं. हजरत पैगंबर ज्यावेळीं मदिना शहरांतून यात्रेकरितां बाहेर पडले, त्यावेळीं दोन हजार मुसलमान त्यांच्या बरोबर मक्केला जावयास निघाले. कांहीं उंटावर बसले होते, व कांहीं पायानें चालले होते त्यांच्या जवळ फक्त तलवारी होत्या. त्या शिवाय कोणतेंहि हत्यार नव्हतें. मक्केची यात्रा करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला आपल्या बरोबर स्वसंरक्षणाकरितां तलवारी शिवाय दुसरें कोणतेंहि हत्यार जवळ बाळ-

गण्याची परवानगी नव्हती. मागील तहाच्या कलमान्वयें ह. पैगंबर मक्केनजिक जसे येत गेले, तसे मक्केतील रहिवाशी शहरांतून बाहेर पडत चालले. त्यांनीं गांवाबाहेर तंबू ठोकून वगैरे साधनांनीं आपली रहाण्याची तजवीज केली होती. ज्यावेळीं पैगंबर शहरांत शिरले त्यावेळीं तेथें जिकडे तिकडे भयानक देखावा दिसूं लागला. घरें बंद, व्यापार बंद, दुकानें बंद, व रस्ते साफ ओसाड! भररस्त्यानें जाणारी ह. पैगंबरची स्वारी पाहाण्याला गात्रांत एकहि चिटपाखरूं राहिलें नव्हतें !

शहरांतील रस्त्यानें मुसलमान जेव्हां चालले होते, तेव्हां त्यांच्या पायांचा जो काय आवाज उत्पन्न होई, तेवढाच काय तो त्यांच्या कानांवर येई. जे मुसल्मान लोक आपलीं घरेंदारें सात वर्षांच्या मागें सोडून ह. पैगंबर बरोबर मादिना शहरीं रहावयास गेले होते, त्यांनीं वाटेनें जातांना आपलीं घरेदारें डोळ्यांनीं पाहिलीं. दोन हजार मुसलमान लोकांबरोबर जेव्हां हजरत पैगंबर अल्‌–कास्वा उंटावरून चालले होते, तेव्हां मक्केचा हा भयाण देखावा पाहून त्यांच्या मनांत काय बरे विचार आले असतील! अबुबक्र आणि हजरत पैगंबर आपल्या जिवाच्या आशेनें मक्केतील छळाला त्रासून गुहेंत लपून बसले होते आणि तेथून कोणाच्याहि दृष्टीस न पडतां हळूच निघून गेले; तेव्हां पासून यावेळपर्यंत कित्येक महत्वाच्या गोष्टी घडून आल्या. कित्येक लढाया झाल्या, व नवीन विचारांना वावरण्याला नवीन वातावरण उत्पन्न झालें. जिवाची अनिवार धडपड करतां करतां मक्केतून निघून गेल्याला पुरीं पुरीं सात वर्षें झालीं होतीं, तथापि त्यांच्या मनाची अद्याप शांतता झाली नव्हती. पुष्कळ गोष्टी अद्याप घडून यावयाच्या होत्या. मक्केतील मूर्तिपूजा साफ बंद व्हावयाची होती, आणि एका ईश्वराचा भक्तिमार्ग स्थापन व्हावयाचा होता

हे यात्रेकरू काबाच्या आवारांत येऊन पोंचल्यावर ते सर्व एकदम "लब्बैक लब्बैक," ह्मणजे, "हे ईश्वरा मी येथें आहे, तुझ्या सेवेला हजर आहे," असें मोठ्यानें ओरडले. हजरत पैगंबर आपल्या

उंटावरून न उतरतां त्यानें काबा मंदिराला सात प्रदक्षिणा घातल्या आणि प्रत्येक खेपेला आपल्या हातांतील दंडानें त्या काळ्या दगडाला स्पर्श केला. फार पूर्वीं पासून काबामंदिराला सात प्रदक्षिणा घालण्याची चाल पडलेली होती, आणि ती चाल अद्याप यात्रेकरूंना संभाळावी लागते. काबामंदिरांतील कर्तव्य पुरें झाल्यानंतर या यात्रेकरूंनीं सफा टेकडीचें दर्शन घेतलें. ही टेंकडी व मारवा टेकडी यांच्या मधून यात्रेकरूंनीं सात खेपा घातल्या. आरब लोकांत अशी एक गोष्ट सांगतात कीं, हाजेरानें आपल्या तहानेलेल्या मुलाकरितां पाणी शोधण्यासाठीं या दोन टेंकड्यांमध्यें खेपा घातल्या होत्या. याच हाजेराच्या स्मरणार्थ आरबलोक यात्रेच्या वेळीं वरील दोन टेंकड्यांमधून सात खेपा घालीत असतात. हो आद्याप चाल प्रचारांत आहे. हजरत पैगंबर ज्या ज्या ठिकाणीं गेले त्या त्या ठिकाणीं सर्व लोक नमाज पडले आणि सर्व क्षेत्र फिरून झाल्यावर त्यांनीं बळी देण्याचा विधी करून यात्रा पुरी केली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं एक चमत्कारिक देखावा दृष्टीस पडला. काबामंदिराच्या छपरावर बिलालनें उभे राहून "अल्ला हो अकबर" परमेश्वर श्रेष्ठ आहे, असें मोठ्यानें ओरडून सर्व लोकांना नमाज पडण्याकरितां जागें केलें. बिलालचा आवाज कानीं पडतांच जो तो मुसलमान धर्माप्रमाणें हातपाय तोंड धुऊन नमाज पडण्याकरितां त्या पवित्र मंदिराच्या मोकळ्या जागेंत गेला, आणि तेथें ह. पैगंबर नेहमींच्या आपल्या रिवाजाप्रमाणें सर्वांच्या बरोबर नमाज पडले.

काबा मंदिर हें मूर्तिपूजेचें स्थान होतें, परंतु त्या ठिकाणीं ह. पैगंबर यावेळीं खऱ्या ईश्वराप्रीत्यर्थ नमाज पडले. मंदिरांत जिकडे तिकडे एकशें आठ मूर्ति स्थापन केलेल्या होत्या. त्यांतील कांहीं दगडाच्या ओभडधोभड अशा होत्या; एक घोड्याच्या आकाराची होती, दुसरी गरुड पक्षाच्या आकाराची होती, आणि त्या सर्वांच्या मध्यभागीं हातांत सात बाण घेतलेली भव्य प्रचंड हुबलची मूर्ति होती.

मक्केच्या बाहेर एक उंच टेंकडी आहे, तिची पूर्वेकडील एक बाजू मक्केवर जणूं काय लोटत आहे, असा भास होतो. त्या टेंकडीवर उभें राहिलें असतां मक्का शहरांतील प्रत्येक रस्ता व कोन आणि कोंपरा स्पष्ट दिसतो. काबा मंदिराचा देखावा व सर्व शहरचा एकदम देखावा ज्याला पाहावयाचा असेल त्याला या टेंकडीच्या पूर्व शिखरावर उभे राहिलें असतां फारच चांगला पाहावयास मिळतो. मुसलमान लोक नमाज पडण्यासाठीं काबा मंदिराच्या पटांगणांत जेव्हां जमा झाले, तेव्हां मक्केंतील अनेक रहिवाशी या लोकांचें इकडे काय चाललें आहे, हें पाहाण्यासाठीं याच टेंकडीच्या शिखरावर चढले होते. मुसलमानांच्या धर्मपद्धतीचा या लोकांवर चांगला परिणाम झाला असावा, कारण मक्का सोडून जाण्याच्या वेळीं यांच्यापैकीं बरेच लोक हजरत मुहंम्मद जवळ आले व त्यांनीं इस्लाम धर्मांत प्रवेश केला.

शूर कुरेश खालिदचे तुम्हांस स्मरण असेल; त्याला हजरत पैगंबर मक्केंत शिरतांना पाहून मरणप्राय दुःख झालें, तेव्हां तो यापुढें आपल्या मुलींच दृष्टीस पडूं नये म्हणून मक्केपासून बराच दूर चालता झाला. सर्व मक्का शहरांत खरा कट्टा असा इस्लाम धर्माचा शत्रू म्हटला म्हणजे खालिद हा होता; परंतु चमत्कार कसा आहे, तो पहा. खालिदचा एक भाऊ होता, त्यानें बदरच्या लढाईनंतर इस्लाम धर्मांत प्रवेश केला होता, त्यानें ह. पैगंबर मादिनाला परत गेल्यानंतर खालिदचें मन इस्लाम धर्माकडे बळवून घेतलें. पुढें तो मादिना शहरीं गेला आणि ज्या धर्माला हाणून पाडण्यासाठीं, त्यानें जिवापाड मेहनत घेतली होती, त्याच इस्लाम धर्माचा त्यानें शेवटीं स्वीकार केला!

# भाग १४ वा.

## विजय.

### विषय.

१ मूटाची लढाई २ मक्केवर स्वारी
३ कावा मंदिर काबा शरीफ झालें

## १ मूटाची लढाई.

सर्व राष्ट्रांनीं इस्लाम धर्माबद्दल सहानुभूति दाखवावी, सर्व राष्ट्रांत या धर्माला मान मिळावा, या हेतूनें हजरत पैगंबरनें आपले वकील पाठवून त्यांच्याबरोबर निरनिराळ्या राष्ट्रांच्या बादशहांना जे खलिते पाठविले होते, त्यांतील एक खलिता घासान म्हणून रोमच्या पादशाहींतील एक मांडलिक संस्थान होतें, त्याच्या मुख्य अधिकाऱ्याकडे पाठविला होता. खलिता घेऊन जाणाऱ्या वकीलाचा खून मूटा नांवाच्या एका ठिकाणीं कोणी एकानें केला. या खुनाची बातमी हजरत पैगंबरांना समजली. पर-राष्ट्रांतून आलेल्या वकीलाच्या जीवाचें संरक्षण करणें हें प्रत्येक राष्ट्राचें पवित्र कर्तव्य आहे, व असें जर होणार नाहीं, तर हें कार्य करण्यास कोणीहि कबूल होणार नाहीं; हें तत्व जगजाहीर होण्याकरितां मंदीना शहरांतील तीन हजार मुसलमान जैयदच्या हाताखालीं देऊन ह. पैगंबरनें त्यालाही खून करणाऱ्यांना शिक्षा करण्याकरितां मूटाकडे पाठवून दिला.

मागील इतिहासावरून आपली अशी खात्री झालेलीच आहे, कीं या काळापर्यंत मुसलमानांना जेव्हां जेव्हां लढण्याचा प्रसंग आला तेव्हां तेव्हां ते आपल्याच लोकांबरोबर लढत गेले. अर्थात् लढाई म्हणजे काय याची

कल्पना फक्त त्यांच्याच देशापुरती होती. प्रस्तुत प्रसंगीं या कल्पनेची मर्यादा त्या लोकांना बरीच विस्तृत करावी लागली. यामुळें त्यांच्यामध्यें आजपर्यंत झालेल्या स्वाऱ्यांत दिसून आलेला उत्साह दिसला नाहीं. मदिना शहरांतून निघण्याच्या पूर्वी आपण आतां कोणत्या दिशेला जाणार याचा त्या लोकांना वासमुद्धां लागलेला नव्हता. परंतु जेव्हां ते सिरिया प्रांताच्या सरहद्दीवर जाऊन पोंचले, तेव्हां त्यांच्या समोर लढाईचें सैन्य उभें राहिलेलें त्यांनीं पाहिलें. परक्या राष्ट्रांतील लढवय्ये, त्यांच्या युद्ध सामुग्री, आणि त्यांच्या युद्धपद्धति या वेळीं त्यांच्या डोळ्यांसमोर दिसूं लागतांच त्यांचे डोळे उघडले. रोमन सैन्य आणि मुसलमान सैन्य यांची गांठ मूटा या ठिकाणीं पडली. मुसलमान लोकांची जुनीपुराणी जंगली युद्धसामुग्री आणि युद्धकला; त्यांचा सुधारलेल्या रोमन राष्ट्राबरोबर निभाव कसा लागावा? मुसलमानांचा सेनानायक जैयद यानें आपलें सैन्य रोमन सैन्यावर घातलें. लढाई जुंपली, व दोन्ही बाजूचे रणशूर योद्धे जमीनदोस्त झाले. त्यांत जैयद व जाफर हे दोन मुसलमानांचे वीर रणांवर पडल्याकारणानें त्यांचें फार नुकसान झालें. रोमन सैन्याचा जोर विशेष झाला आणि एक वेळ तर अशी आली, कीं मुसलमान सैन्याचा अधिकार खालिदकडे त्यावेळीं आला नसता तर रोमन सैन्य मुसलमानांची फळी फोडून त्यांच्यामध्यें घुसलें असतें, व त्यांनीं मुसलमानांची एकजात कत्तल केली असती. तो प्रसंग शूर खालिदमुळें टळला. तथापि पराभवाचा वांटा मुसलमानांच्या पदरीं पडावयाचा होता तो शेवटीं पडलाच. या युद्धांत मुसलमानांचे बरेच लोक मेले; व शिल्लक उरलेले कसेबसे मदिनाशहरीं जाऊन पोंहोंचले. या लढाईत ज्या घरांतील कोणीहि मेला नाहीं, असें घर शिल्लक राहिलेलें नव्हते. हजरत मुहम्मदचे जीवाचे दोन स्नेही हरवले; त्यांच्या दुःखानें ते विव्हळ झाले; ते जाफरच्या घरांत शिरले व त्याच्या मुलांना त्यांनीं पोटाशीं घट्ट धरिलें. मुलांच्या आईचें दुःख तर

त्यांच्यानें पाहावेना. कसेंबसें मुलांचें सांतवन करून ते आपल्या घरीं आले व घरांत अन्न तयार करून तें या मुलांच्याकरितां त्यांनीं पाठवून दिलें! नंतर ते जैयदच्या घरीं गेले; तेथें हजरत मुहम्मदला पाहातांच जैयदच्या मुलीनें त्यांच्या गळ्याला एकदम घट्ट मिठी मारिली, व ती मोठमोठ्यानें रडूं लागली. जैयदच्या दुःखानें हजरत मुहम्मदच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या!

मूटाची लढाई झाल्यानंतर सिरियाच्या हद्दीवर कांहीं अरब टोळ्यांमध्यें मुसलमान लोकांविरुद्ध बरीच अस्वस्थता उत्पन्न झाली होती. त्यांनीं मदीना शहारावर स्वारी करण्याची तयारी चालविली. मूटाच्या लढाईंत गमाविलेलें नांव परत मिळविण्याच्या हेतूनें या लोकांचा बंदोबस्त करण्याकरितां हजरत मुहम्मदनें आपलें सैन्य तिकडे पाठविलें. त्यावेळीं त्यांच्या सैन्याचा मुख्य अधिकारी उमर होता. त्यानें तेथें जाऊन लढाईचा प्रसंग न आणतां त्या अरब टोळ्यांचा स्नेह संपादन करून मोठ्या सन्मानानें मदिना शहरचा रस्ता धरिला.

हुदेबिया या ठिकाणीं मुसलमान व मक्केंतील लोक यांच्यामध्यें, दहा वर्षें दोन्ही पक्षांनीं लढाई करण्याचा प्रसंग आणूं नये असें एक कलम घालून शांततेचा तह झालेला होता, हें मागें आपण वाचलेंच आहे. या तहाप्रमाणें दोन्ही पक्षांमध्यें दोन वर्षें अगदीं शांततेनें गेलीं. असें असतां कुरेश लोकांच्या तर्फेची बानु बकर या नांवाची एक भटकणारी टोळी होती, तिनें एकदां मुसलमान लोकांवर हल्ला करून त्यांचे कांहीं लोक ठार मारिले! असेंहि म्हणतात कीं, कुरेश लोकांच्या चिथावणीवरून बानु बकर टोळीनें हें कृत्य केलें. हल्ल्यांतून जिवंत सुटलेले चाळीस इसम उंटावर स्वार होऊन मोठ्या त्वरेनें मदीनाशहरीं आले, व हजरत पैगंबरच्या कानांवर झालेली सर्व हकीगत त्यांनीं घातली. तेव्हां हजरत पैगंबर म्हणाले, "झालेला शांततेचा तह कुरेश लोकांनीं मोडिला, यांत

अन्याय कोणाचा हें अल्ला पाहातो. ज्याचा अन्याय असेल त्याला तो शिक्षा करील."

हजरत पैगंबरजवळ झालेला शांततेचा तह कुरेश लोकांनीं मोडिला, याचें प्रायश्चित् त्यांना भोगावें लागेल यांत काडीभर संशय नाहीं, अशी अबुसुफयानला धास्ती बसली; तेव्हां याला उपाय म्हणून नवीन तह करण्याच्या इरावानें तो मदिनाशहरीं हजरत पैगंबरच्या भेटीसाठीं आला. हजरत पैगंबरनें त्याचें सर्व म्हणणें ऐकून घेतलें. परंतु त्याला स्पष्ट असें कांहींच वचन त्यांनीं दिलें नाहीं. अबुसुफयाननें नंतर उमरला मध्यस्ती घातला; परंतु त्यानें तर आपल्या कानांवर हात ठेविले. नंतर तो आलि आणि बिबी फातमाकडे गेला, परंतु त्यांनीं सुद्धां उमरचेंच अनुकरण केलें. अबुसुयानला आपल्या मोठेपणाची मोठी घमेंड होती, आणि तो त्या घमेंडीवर मदिना शहरांत आपल्याला मोठा मानपान मिळेल अशी आशा करीत होता. पण त्याला शहरांत कोणीहि विचारलें नाहीं. बिचाऱ्याची सर्व बाजूनें पूर्ण निराशा होऊन तो मक्केला निघून गेला.

## २ मक्केवर स्वारी.

इकडे मदिना शहरांत एका लढाईच्या तयारीची खटपट जारीनें चालली होती. लढाईचीं हत्यारें पाजविण्याचें काम, चिलखतांची दुरुस्ती, वगैरे गोष्टी मोठ्या झपाट्यानें चालल्या होत्या. ही तयारी कोणत्या दिशेला जावयाची आहे याचा तर्क गांवांत कोणालाहि करतां आला नाहीं. हजरतचे जिवाचे स्नेही अबुबक्रसारखे जे होते तेहि विचारांत गर्क होऊन गेले, तथापि या तयारीचा कांहीं एक सुगावा त्यांना लागेना. बिबी आयेशाकडे पैगंबराच्या चिलखताच्या दुरुस्तीचें काम सोंपविलेलें होतें. तें तिनें हुकुमाप्रमाणें तयार करून दिलें, तथापि तिलाहि हुकमाच्या पलिकडे एक शद्बहि माहित नव्हता.

हजरत पैगंबरच्या मर्जीप्रमाणें सैन्याची ठाकठीक व्यवस्था झाल्यावर दहा हजार मुसलमान योद्धे नाना प्रकारची शस्त्रास्त्रें घेऊन मदीना

शहरांतून योग्य वेळीं एके दिवशीं बाहेर पडलें. या सैन्याला वाटेंत जेथें म्हणून दोन रस्ते लागत, तेथें फक्त अमुक रस्ता, असा हुकूम हजरत पैगंबर स्वतः सांगत. अशा रीतीनें मार्ग चालून झाल्यावर हें मक्केच्या समोर असलेल्या पर्वतावर येऊन दाखल झालें. ज्या दिवशीं हें सैन्य त्या पर्वतावर येऊन पोंचलें, त्या रात्रीं हजरत पैगंबरनें प्रत्येक मुसल्मानाच्या हातांतील मशाल पेटविण्यास हुकूम दिला. दहा हजार मशालींचा प्रकाश व त्या प्रकाशांत दिसणारा सैन्याचा तो देखावा पाहातांच मक्केंतील लोकांची पांचावर धारण बसली. प्रथम तर त्यांना हा कांहीं तरी ईश्वरी कोप पृथ्वीचा संहार करण्याकारितां आकाशांतून पृथ्वीवर अग्नीच्या रूपानें प्रकट झाला आहे असें वाटलें. पण हें सैन्य हजरत पैगंबरचें आहे, असें जेव्हां त्यांना समजलें, तेव्हां त्यांची वरील धास्ती जाऊन त्यांना फक्त मक्का शहरावर हें अरिष्ट आहे, असें कळून आलें.

दहा हजार लोकांनीं पेटवलेल्या मशालीनें मक्केंतील लोकांवर हजरत पैगंबरच्या मनाप्रमाणें कार्य केलें. या एवढ्या प्रचंड लढवय्यांच्या समुदायापुढें आपला निभाव लागणें मुळींच शक्य नाहीं, या बद्दल त्यांना काडीभरहि शंका वाटली नाहीं. कुरेश लोकांचा सेनानायक अबुसुफयान भीतीनें गर्भगळित झाला व तो शहरांतून रात्रीं अंधारांतून बाहेर पडला. हजरत पैगंबरचा चुलता आबास याची मात्र या मनुष्याच्या प्रत्येक हालचालीवर फार बारीक करडी नजर असे. अबुसुफयान मक्केंतून बाहेर पडला आणि त्याच्या मागोमाग आबास निघाला. कांहीं अंतर चालून झाल्यावर आबासनें अबुसुफयानला हांक मारिली व तो त्याला म्हणाला, “ अरे, अबुसुफयान, तो पाहा, माझा पुतण्या, दहा हजार तरुण ज्वान वीर घेऊन तुझ्यासमोर तळ देऊन बसला आहे. माझें ऐक. त्यांत तुमचें कल्याण आहे. त्याच्याजवळ तह कर, आणि त्याच्या धर्माला मान दे ”

एका अर्थी घाबरून गेलेल्या त्या क्षत्रीय वीराला या आबासच्या भेटीनें पुष्कळ तऱ्हेनें धीर दिला. त्याची धडधडणारी छाती जरा शांत झाली व त्याला आपल्या जीवाची आशा वाटूं लागली. आबासच्या बोलण्याकडे त्यानें चांगलें लक्ष दिलें आणि तो त्याच्याजवळ कांहीं वेळ बोलत उभा राहिला.

दुसऱ्या दिवशीं अबुसुफयान आबासला घेऊन हजरत पैगंबरच्या तंबूंत त्यांच्या भेटीसाठीं गेला. यावेळीं त्या मानी कुरेश पुढाऱ्याच्या मनाच्या स्वरूपाचें चित्र कसें वरें असेल ? हजरत पैगंबरला क्षुब्ध करण्याचें धैर्य आतां त्याच्या आंगांत राहिलें नव्हतें; आपला पूर्ण पराजय झाला आणि पैगंबर विजयी झाले, असा त्यानें कबुली जबाब दिला; अबुसुफयानचें सैन्य मोठें, त्याला बाहेरची मदत मोठी, असें असून सुद्धां पैगंबराच्या गळ्यांत जयाची माळ पडते, यावरून ईश्वर त्याचा पाठीराखा खरोखर आहे, असें त्याला वाटलें असावें. पैगंबरच्या सांगण्याप्रमाणें खरा ईश्वर त्याच्या शत्रूंना या पृथ्वीवर टिकूं देणार नाहीं; आणि त्यांचा फडकणारा झेंडा शत्रूच्या किल्ल्यावर तळपत रहाणार, यांत संशय नाहीं, असें त्याच्या मनाला पटलें असावें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कुरेश लोकांचा सर्वमान्य अभिमानी पुढाऱ्यानें इस्लाम धर्माचा श्रेष्ठपणा कबूल करून त्या धर्माचा त्यानें अंगिकार केला. ज्या मुहम्मदचा पळपुट्या म्हणून अबुसुफयानें एक वेळ धिःकार केला होता, त्यालाच आतां ईश्वराचा प्रेशित म्हणून त्यानें मोठा मान दिला ! ह. पैगंबरनें शरण आलेल्या शत्रूवर मोठें औदार्य दाखविलें, व त्याला मक्केला परत जाण्याला परवानगी दिली; जातांना त्याला एवढें मात्र सांगून ठेविलें कीं, मक्केंतील जे रहिवाशी मुसलमान लोकांच्या कोणत्याहि प्रकारें आड येणार नाहींत, किंवा त्यांना दुखविणार नाहींत, व जे आपआपल्या घरीं स्वस्थ राहातील, किंवा काबामंदिरांत स्वस्थ बसून राहातील, त्यांना मुसलमान लोकांपासून काडीभरहि त्रास होणार नाहीं;

त्यांच्या केसालाहि धक्का पोंचणार नाहीं. अबुसुफयान तेथून निघून गेल्यावर हजरत पैगंबरनें आपल्या सैन्यासह शहरांत प्रवेश करण्याचें ठरविलें. मुसलमान सैन्यांतील शीस्त व अंमलदारांचा दरारा पाहून अबुसुफयानला पैगंबराच्या कर्तबगारीचें मोठें आश्चर्य वाटलें. त्या भटकणाऱ्या टोळींतील कंगाल अशा एका मुलाचें हें वैभव व त्याचा श्रेष्ठपणा पाहून तो आबासला म्हणाला, " खरोखर, तुझा पुतण्या हा या राष्ट्राचा राजा आहे. " यावर, आबास म्हणाला, " मानवी राजापेक्षां त्याची योग्यता अधिक आहे. कारण तो परमेश्वराचा प्रेशित आहे. " हजरत पैगंबराचा निरोप मक्केतील लोकांना सांगण्यासाठीं अबुसुफयान तडक तिकडे चालू लागला.

हजरत पैगंबरनें आपल्या सैन्याचे चार भाग केले. प्रत्येक भागाला शहरांत शिरण्याला चार दिशा नेमून दिल्या; व प्रत्येक भागावरील सेनानायकाला प्रत्यक्ष कोणी हल्ला केल्याशिवाय म्यानांतून तलवार बाहेर काढावयाची नाहीं, असा त्यांनीं सक्त हुकूम देऊन ठेविला. हजरत पैगंबर ज्या रस्त्यानें चालले होते, तो रस्ता बिबी खदीजा आणि अबुतालिब यांच्या थडग्यावरून चालला होता. शहराकडे येणाऱ्या सैन्याला कोणत्याच बाजूनीं कोणीहि हरकत केली नाहीं; आणि मक्केंत आपला प्रवेश मोठ्या शांततेनें व आनंदानें होत आहे, हें पाहून त्यानें अल्लाचे आभार मानिले.

नाहीं म्हणण्याला ज्या कुरेश तुकडीचा खालिद हा पूर्वीं अधिकारी होता, त्या तुकडीनें मात्र जरा गडबड केली. हजरत पैगंबराचा द्वेष करणारे असे त्यांचे कांहीं शत्रू अद्यापि शहरांत होते, त्यांनीं आपला दुराग्रह न सोडण्याचा कृतनिश्चय करून ते एका पर्वताच्या धारेवर जमा झाले आणि तेथूनच ते हातपाय झाडण्याचा प्रयत्न करूं लागले. प्रथम त्यानें खालिदवर हल्ला केला, नंतर त्याचे मदतगार बोडोइन लोक यांच्यावर बाणांचा वर्षाव केला, परंतु थोडीशी चकमक होतांच त्यांना पळ काढणें

भाग पडलें. रक्तपात न होण्यासाठीं हजरत मुहम्मदनें आपल्याकडून शिकस्त करून पाहिली तथापि जें होणार तें होणारच. या चकमकींत झालेल्या थोड्याशा रक्तपाताबद्दलहि त्यांना वाईट वाटलें, तथापि मक्का शहर कोणत्याहि मार्गानें बिन हरकतीशिवाय शांततेनें ह. मुहम्मदचें श्रेष्ठत्व कबूल करीत स्वाधीन झालें.

## ३ काबा मंदिर काबा शरीफ झालें.

ह. मुहम्मदच्या मनाप्रमाणें मक्का शहरांत त्यांचा प्रवेश तर झाला. आंत शिरल्यावर त्या पवित्र काबा मंदिराच्या सभोंवार नेहमींच्या रिवाजाप्रमाणें त्यानें सात प्रदक्षिणा घातल्या. आणि यानंतर त्यांच्या आयुष्यांतील जें मुख्य ध्येय तें सिद्धीस नेण्याच्या ते मार्गाला लागले. मक्केंतील मूर्तींचा विध्वंस होण्याची वेळ नजिक येत चालली होती. ह. मुहम्मदनें या मुर्तींच्या पूजेबद्दल धिःकार केला होता, त्यावेळीं त्यांचा अनेक प्रकारें छळ झाला, त्यांना हद्दपार व्हावें लागलें, त्याच मूर्तींचा नाश करून टाकण्याचा त्यानें एकदम हुकूम दिला! आज त्यांचा केवढा मान, त्यांचा केवढा पराक्रम आणि त्यांचा केवढा दरारा! गांवांतील लोक या विजयी पराक्रमी वीराकडे टक लावून बघत बसले. त्यांच्या वाडवडिलांच्या देवतांच्या नाशिवीं आज जें भोग-तृत्व आलें तें निमुटपणें पाहाण्याची वेळ त्यांच्यावर आली! "सत्याचा जय, असत्य मावळलें, असत्य चंचल व क्षणिक," असें ते मोठ्यानें म्हणाले. हजरत पैगंबरनें हातांतील सोटा हुबल मुर्तीकडे करून त्या मूर्तींचे तुकडे तुकडे करण्याचा हुकूम केला. हुकूम होण्याचा अवकाश! तत्क्षणीं त्याची अंमलबजावणी झाली! काबा मंदिरांतील तीनशें साठ मूर्तींचे तुकडे तुकडे झाले! भिंतीवर ह. इब्राहिम आणि कांहीं देवदूतांचीं चित्रें काढिली होतीं ती सर्व उमरनें आपल्या हातानें पुसून टाकिलीं.

झालें ! आज अनेक शतकें जें काबा मंदिर होतें तें काबा शरीफ झालें. काबा शरीफच्या अंतर भागांत निराकार प्रभूची मानसीक एकाग्रतेवर स्थापना झाली ! ईश्वर एक, देव एक, प्रभू एक, परमेश्वर एक— त्याची प्रतिमा, त्याचें स्वरूप, त्याची मूर्ति दुसरी नाहीं—तो सृष्टीचा कर्ता, पालनपोषण कर्ता, संहारकर्ता, हें जगड्व्याळ सृष्टीचें स्वरूप म्हणजे तोच एक—हजरत पैगंबरच्या हृदयांत वास करणाऱ्या त्या महातत्वाला आज मूर्त स्वरूप प्राप्त झालें, काबा शरीफ रिकामें झालें, व अदृश्य स्वरूपांत कोंदून गेलेला " तो एक, ही भावना जागृत झाली."

हजरत पैगंबरच्या अंतिमध्येयाच्या दिव्य पताका काबा शरीफच्या कळसावर ज्या दिवशीं फडकूं लागल्या, त्याच दिवशीं इस्लामधर्म आपलें स्वरूप दाखविण्यास पृथ्वीच्या पाठीवर हिंडण्यास बाहेर पडला.

वर सांगितल्याप्रमाणें मूर्तिपूजेची व्यवस्था लागल्या दिवसापासून अरबस्थानांत इस्लाम धर्मातील " एक अल्ला, " हें महातत्व स्थापन झालें. दुसऱ्या दिवशीं काबा शरीफमध्यें नमाज पडण्याकरितां बिलालनें आपल्या उंच सुरांत बांग पुकारली, आणि ती ऐकतांच हजरत पैगंबरचे सर्व अनुयायी तेथें एकदम जमा झाले. हजरत पैगंबर आपल्या नेहमीच्या प्रेमळ अंतःकरणानें नमाज पडले व ज्या परमेश्वराच्या कृपेनें आपलें उद्दिष्ट सिद्धिस गेलें, त्याचे त्यानें मोठ्या सद्गदीत अंतःकरणानें आभार मानिले. नमाज पडण्याचें कार्य पूर्ण झाल्यावर सर्व लोकांना त्यांनीं आपल्या गोड शद्बांनीं सदुपदेश केला. नंतर तेथें जे कुरेश लोक जमले होते त्यांना उद्देशून ते म्हणाले, " हे कुरेश सद्गृहस्थ हो, यापुढें मी तुमच्याजवळ कसें वागावें, अशी तुमची इच्छा आहे ?" त्या सर्वांनीं एकदम जबाब दिला, " क्षमा, शांति, दया अंतःकरणांत ठेवून आम्हांला वागवावें, बंधु !" या त्यांच्या शद्बांनीं पैगंबरच्या हृदयाला दयेचा पाझर फुटला व ते म्हणाले, " जोसेफ आपल्या नातेवाईकांजवळ

जसा प्रेमानें वागत गेला, तसा मीहि तुमच्याजवळ प्रेमानें वागेन... मी तुमचें मन शद्वांनीं दुखवीत नाहीं. परमेश्वर दयाळु आहे, क्षमा करण्यास तो समर्थ आहे, तो तुम्हांला क्षमा करील." जीं जीं शहरें ह. मुहम्मदनें जिंकिलीं त्यांतील पराभव पावलेल्या लोकांवर आणि तेथील रहिवाशांवर मोठें औदार्य दाखवून त्यांची मर्जी त्यांनीं संपादन करून घेतली. याची इतिहासांत अनेक उदाहरणें आहेत.

एका काळीं सर्व मक्का शहरानें ह. मुहम्मदला हद्दपार केला होता, त्याला बदमाश ठरविला होता, परंतु तो काळ आतां बदलला; आतां तें मक्का शहर त्यांच्या पायाजवळ हात जोडून उभे राहिलें. ह. मुहम्मदनें त्यांच्यावर सूड घेण्याचें सर्व विचार सोडून दिले व त्यांनीं आपल्या शत्रूंना क्षमा केली! त्यांच्या सर्व शत्रूंमध्यें दोन इसम मात्र असे निघाले कीं, त्यांच्या अनेक अपराधांमुळें व त्यांच्या हातून घडलेल्या अनन्वित कृत्यांमुळें त्यांच्यावर दया करणें हजरत मुहंम्मदला पाप दिसूं लागलें; कारण कित्येक वेळां शत्रूवर दया केल्यानें मोठमोठाले अनर्थ गुदरतात व एका दोघांच्या जिवंत राहाण्यानें हजारों लोक प्राणास मुकतात. असे जे दोन इसम महा अपराधी होते, त्या दोघांना मात्र देहांत शिक्षा सोसावी लागली.

मक्का शहरावर पैगंबरचें इतकें अलोट प्रेम होतें कीं, त्यानें या पृथ्वीवर हेंच एक ठिकाण पुण्यभूमी म्हणून ठरविली; आणि हें पाहून मदिनांतील लोक ह. मुहम्मद मदिना शहर सोडून आपलें वसतिस्थान मक्का करतील कीं काय आशा विवंचनेंत पडले; परंतु त्या लोकांना त्यानें असें अश्वासन दिलें कीं," ज्या वेळीं माझ्यावर सर्व जग फिरलें होतें, मी निराधार निराश्रित होतो, त्या वेळीं तुम्हीं मला आश्रय दिला; मला आपला असें तुम्हीं समजलां; तेव्हां मी तुम्हांला केव्हांहि सोडणार नाहीं, जेथें तुम्हीं, तेथें मी, आणि तेथेंच मी आपला देह ठेवीन."

संध्याकाळीं जिकडे तिकडे निरवानिरव झाल्यावर हजरत मुहंम्मद विश्रांति घेण्यासाठीं आपल्या तंबूंत बसले असतांना, अबुबक्र आपल्या बापाला घेऊन हजरत मुहंम्मदच्या भेटी करितां तेथें आला. अबु कुहाफा, डोळ्यांनीं अंध, वयानें जर्जर झालेला आणि केंस तागासारखे पिकून सफेत झालेला, असा पैगंबराच्या समोरा जाऊन बसला. हजरत मुहंम्मदनें त्याचा हात धरिला आणि त्याला आपल्या जवळ बसविलें. हजरत मुहंम्मद अबुबक्रला ह्मणाले, " तुझे वृद्ध वडील घरींच असते तर बरें झालें असतें, मी त्यांची भेट घरीं घेतली असती. " अबुबक्रनें इस्लाम धर्माचा त्या पुर्वींच अंगिकार केला होता, अर्थात् त्याच्या बापाचें मन त्या धर्माकडे वळविण्यास त्याला फारसे आयास पडले नाहींत. पुढें अबुबक्रची नेमणूक इस्लाम धर्माचा खालिफा म्हणून झाली आणि त्याच्या वृद्ध बापानें आपल्या मुलाचें तें वैभव स्वतः डोळ्यानीं पाहिलें. त्यावेळीं त्याचें वय नव्वद वर्षांचे होतें.

मक्का शहर हजरत मुहम्मदच्या स्वाधीन झाल्यावर तेथील राहिवाशी त्यांच्या जवळ स्नेहाची शपथ घेण्यास व इस्लाम धर्म स्वीकारण्यास आले. या वेळीं जे लोक वरील निमित्तानें आले त्यांनीं हजरत मुहम्मदच्या हातावर हात देऊन " अल्-अकाबाची मोठी शपथ, " घेतली. या लोकांच्या बरोबर ज्या बायका येत, त्यांना सुद्धां "खऱ्या परमेश्वराशिवाय दुसऱ्या देवांना भजणार नाहीं, शुद्ध आचरण ठेवीन, आणि पैगंबरच्या शद्वावर विश्वास ठेवीन, " अशी शपथ घ्यावी लागे. उत्तरादाखल हजरत मुहंम्मद नंतर ह्मणाले, " जा, ही शपथ तूं स्वसंतोशानें घेतली आहेस, " ते बायकांच्या हाताला मात्र हात लावीत नसत.

मक्केंतील लोकांवर धर्माचा जुलूम हजरत मुहंम्मदनें केला नाहीं. तेथील सर्वच राहिवाशी या धर्मांत शिरलेहि नव्हते. हजरत मुहंम्मदनें त्यांना नवीन धर्मतत्वें चांगलीं समजावून दिलीं, व त्यांना योग्य विचार करण्यास चांगली सवड दिली. कांहीं राहिवाशांना या बाबतींत विचार

करण्याचे कारणच नव्हतें. आज रंग कोणत्या बाजूला आहे हें पाहून त्या बाजूला जाऊन ते मिळाले. तथापि हजरत मुहंम्मद मदिनाला गेल्या पासून सतत आठ वर्षांच्या अवधींत त्यानें सांगितलेल्या धर्मतत्वांवर बऱ्याच लोकांनीं विचार केला होता आणि त्या तत्वांतील तथ्य त्यांना पटलेंहि होतें. या लोकांना यावेळीं आढेवेढे घेण्याचें कारण पडलें नाहीं. पैगंबरच्या आयुष्यांतील मुख्य हेतु सिद्धीस गेला, त्यांच्या जन्माचें सार्थक झालें; मूर्तिपूजेचें उच्चाटण झालें; आणि इस्लाम धर्माचा झेंडा मक्का शहरावर फडकत राहिला !

# भाग १५ वा.

## जन्मसाफल्य.

### विषय.

१ हुनेनची लढाई.
२ लुटीची वांटणी.
३ परराष्ट्रांशीं तह.
४ टायफमधील लोकांचा ह. पैगंबरच्या कृपेकरितां प्रयत्न.
५ अल–लाट् मूर्तीचा नाश.

## १ हुनेनची लढाई.

हजरत पैगंबर मक्केंत असतांना सभोंवतालच्या प्रदेशांतील मूर्तिपूजा बंद करून टाकण्यासाठीं अनुयायांना त्यांनीं हुकूम दिले. त्यापैकीं खालिदनें आपल्याबरोबर हत्यारबंद लोकांची एक तुकडी घेऊन नाखलाच्या एका खोऱ्यांत एक पुरातन काळचें देवाचें देऊळ होतें तें पाडून टाकिलें. ह. मुहम्मदनें कांहीं लोकांना जे मुसलमान झाले होते, त्यांच्या गावांत जाऊन मूर्तिचा नाश करून टाकण्यास पाठविलें. टायफ या शहरांत थोड्या वर्षांमागें ह. पैगंबरनें आपला नवीन धर्म स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता, त्या शहरांतील लोकांची "अल्–लाट्," या नांवाच्या एका देवाची भव्य मूर्ति आराध्य देवता होती. ह. मुहम्मदचा मूर्ति विध्वंश करण्याचा तडाखा पाहून या शहरांतील लोकांची छाती धडधडूं लागली. आपल्या आवडत्या मूर्तीचें रक्षण कसें करावें, हा त्यांना मोठा विचार पडला. पूर्वापार चालत आलेल्या धर्माचें संरक्षण करण्याचा त्यांनीं निश्चय केला, आणि त्यांनीं आपल्या सर्व स्नेही सोबत्यांना बोलावून मक्का आणि टायफ या दोन शहराच्या दरम्यान ते सर्व जमा झाले.

मदीना शहरांत ह. मुहम्मदच्या हातांत दहा हजार हत्यारबंद लढवय्ये तयार होते. त्यांत मक्केंतील नवीन मुसलमान झालेले दोन हजार येऊन मिळाले; ते सर्व हुनेन लोकांचा समाचार घेण्यास मक्केंतून बाहेर पडले. कारण ह्या लोकांनीं मक्काशहर पडल्यामुळें दुसऱ्या अरब लोकांना पैगंबराच्या विरुद्ध उठण्यासाठीं उत्तेजन देऊन लढाईस तयार केलें होतें. एवढें मोठें सैन्य असून सुद्धां ह. मुहम्मदचा पराभव होण्याची वेळ आली होती. हे शत्रूकडील लोक हुनेन खोऱ्याच्या दरवाजांत जाणाऱ्या अरुंद वाटेवरील उंच उतरणीवर लपून बसले आणि तेथें लपून राहून त्या अरुंद वाटेवर जेव्हां मुसलमान लोक आले तेव्हां एकाएकीं त्यांच्यावर हल्ला करून त्यांना अडवून धरिलें. पहाटेच्या सुमारास अंधारांतून या अचानक झालेल्या हल्लयामुळें मुसलमान लोकांची दाणादाण उडाली. पळण्याला वाट नाहीं, दोन्हीं बाजूला उंच पर्वत, आणि रस्ता अरुंद ! अशा या तीन अडचणींत तें सैन्य येऊन पडलें. मरतां मरतां जे सुटले ते जीव घेऊन उतरणीवरून पळत चालले; उंटांची मात्र दुर्दशा उडाली. त्यांना पळण्याला वाट न मिळाल्यामुळें जागच्या जागींच त्यांची मरण्याची वेळ आली. त्यांच्यांत एकच गोंधळ व आरडाओरड सुरू झाली. हजरत मुहम्मदच्या शब्दांच्या आवाजानें त्यांना थोडा धीर येई, तथापि जिवावरचा प्रसंग पडल्यावर ते तरी काय करणार ! आब्बास, आलि, उमर आणि अबुबक्र, हे मात्र ह. मुहम्मदच्या बाजूला उभे होते. आब्बास आपल्या मोठ्या आवाजानें ओरडून म्हणाला, “ अरे मदिनाच्या रहिवाशांनों, त्या झाडाखालीं घेतलेल्या शपथेची आठवण करा. ” आब्बास हे शब्द पुन्हां पुन्हां ओरडून म्हणाला, व ते त्या पळून जाणाऱ्या लोकांच्या कानांवर पडल्यावर त्यांना आपल्या मागील शपथेची आठवण झाली. ह. मुहम्मदच्या बाजूला शंभर एक लोक जिवावर उदार होऊन ह. मुहम्मदचें संरक्षण करण्यास तयार होते, त्यांचें अनुकरण दुसऱ्यांनीं केलें; असें होतां होतां सर्व सैन्य ठाम झालें व तें शत्रूवर तुटून पडलें.

नंतरची लढाई मोठ्या निकराची झाली. दोन्ही पक्षांनीं जिवाची आशा सोडून शत्रूवर हल्ले चढविले. शेवटीं लढाईचा रंग बदलला, व मुसलमान त्या रणक्षेत्रावर विजयी झाले.

हुनेन लोकांची पळापळ सुरू झाली व मुसलमान लोकांनीं त्यांची पाठ धरिली. शत्रूची छावणी, त्यांतील बायकामुलें, सर्व चीजवस्त मुसलमानांच्या हातांत सांपडली ! त्यांनीं सहा हजार लोक कैद केले, पुष्कळ लूट जमा केली, चोवीस हजार उंट आणि चाळीस हजार मेंढ्या मिळविल्या. कैद केलेले लोक आणि ही सर्व लूट "जिरान्हा" या नांवाच्या ठिकाणीं हजरतनें पाठवून दिली.

मध्यंतरी पैगंबर आपलें सैन्य घेऊन टायफवर चाल करून गेले, व त्या शहराला वेढा दिला. या शहरची तटबंदी चांगली मजबूत केलेली होती, आणि शहरांत अन्नपाण्याचा सांठा भरपूर होता. शहराचें संरक्षण करणारे चांगले पटाइत तिरंदाज होत; ते मुसलमान लोकांवर बाणांचा असा पाऊस पाडीत कीं, पाहाणाराला आकाश ढगांनीं जणुं काय व्यापून गेलेलें आहे असें दिसे. मुसलमान लोक तटबंदीला सुरूंग लावून उडवून देण्याचा जेव्हां प्रयत्न करीत, तेव्हां तटावरील तिरंदाज त्यांच्यावर तापलेले लोखंडाचे गोळे तटावरून खालीं टाकून त्यांचें काम बंद पाडीत. ह. मुहम्मदचा सर्व उपाय हरला; वेढ्यांत सांपडलेले लोक शरण म्हणून आले नाहींत. टायफ शहराला ह. मुहम्मदचा वेढा एक महिना पडून सुद्धां आंतील लोकांनीं त्याची पर्वा केली नाहीं, किंवा ते शरण आले नाहींत, म्हणून ह. मुहम्मदनें तेथून आपला वेढा काढिला आणि सैन्य घेऊन निघाले.

## २ लुटीची वांटणी.

टायफ सोडल्यानंतर ह. मुहम्मद आपल्या सैन्यानिशीं हुनेन लढाईंत सांपडलेले कैदी व मिळालेली लूट ज्या एका खोऱ्यांत पाठवून दिली

होती त्या गांवीं गेले. या कैद्यांपैकीं कांहीं लोकांच्या ह. मुहम्मद लहान असतांना बरेच परिचयाचे झाले होते. ते लहान असतांना त्यांना वाढविण्याचें काम एका भटकणाऱ्या टोळींतील एका बाईकडे सोपविलें होतें; तिची अल्-शाइमा नांवाची ह. मुहम्मदच्या बरोबर रात्रंदिवस खेळणारी व बागडणारी मुलगी या कैद केलेल्या बायकांमध्यें होती. तिला पाहातांच ह. मुहम्मदला आपल्या बाळपणची आठवण झाली. अल्-शाइमा हिच्याबरोबर खेळलेले खेळ, वगैरे लहानपणच्या सर्व गोष्टींचें चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. ह. मुहम्मदनें मोठ्या प्रेमानें तिची विचारपूस केली; व त्यानें तिला आपल्या लहानपणची सर्व आठवण करून दिली. तिला त्यानें कैदेंतून मुक्त केलें आणि तिला चांगलें बक्षिस देऊन तिच्या नातेवाईकाकडे तिची रवानगी केली.

अल्-शाइमा हिच्यावर ह. मुहम्मदनें जी कृपादृष्टी केली तिची सर्व हकीगत कैद केलेल्या लोकांमध्यें पसरली. त्यांनीं आपल्यालाहि असेंच स्वातंत्र्य द्यावें, अशी त्यांच्याजवळ मोठ्या नम्रतेनें विनंति केली. ते म्हणाले, " तूं लहान असतांना आम्हीं तुला ओळखीत होतों, नंतर तुझ्या तारुण्यांत तुझा व आमचा परिचय होता आणि आतां तर तूं वैभवाच्या शिखरावर जाऊन पोंचला आहेस, तेव्हां आह्मांवर कृपादृष्टी कर, आह्मांवर आतां दया कर." ह. पैगंबरच्या अंतःकरणापर्यंत हे शब्द जाऊन पोंचले, त्याच्यानें त्यांची विनंति अमान्य करतां येईना; लगेच त्यानें सर्वांना सोडून दिलें!

उंट, मेंढ्यांचे कळप व इतर सांपडलेली लूट त्यानें आपल्या शिपायांना वांटून दिली. मक्केंमधील वजनदार लोकांना त्यानें सुंदर वस्तुंच्या भेटी दिल्या, त्यांतील कांहीं लोकांना तर शंभर शंभर उंट मिळाले. आपल्या जुन्या कट्टया शत्रूंवर त्यानें इतका उदारपणा दाखविला कीं, तो पाहून मदिनांतील रहिवाशांना आपला हा अपमानच आहे, असें वाटलें; व ते

आपसांत ह्मणूं लागले; " मुहम्मदनें आपल्याला सोडलें आणि तो त्यांना मिळाला. " त्या लोकांची ही कुजबूज त्यांच्या कानांवर गेली व त्यामुळें त्यांना बरेंच वाईट वाटलें. ते त्यांना ह्मणाले, " अरे माझ्या मित्रांनों, मक्केंतील लोकांना बरें वाटावें व त्यांचा ओढा आपल्याकडे लागावा या साठीं मी प्रयत्न कारितों; त्यापासून तुह्माला दुःख कां होतें? त्यांना थोड्याशा जनावरांचे कळप मिळाले, आणि तुह्मांला ईश्वराचा प्रेशित स्वतः पैगंबर लाभला असतां तुह्मांला त्याचें समाधान नसावें? मी तुह्मांला कधींहि सोडणार नाहीं. सर्व जग एका दिशेला जाऊं लागेल आणि मदिनांतील माझे मित्र दुसऱ्या दिशेला जाऊं लागतील तर मी माझ्या मित्रांच्या मागोमाग चालेन. परमेश्वर तुमचें अखंड कल्याण करो." ह. पैगंबरचे वरील शद्ब ऐकून कांहीं लोकांचे डोळे पाण्यानें भरून आले व ते मोठ्यानें ओरडून ह्मणाले; " अहो, पैगंबर, आह्मीं संतुष्ट आहोंत. " वर सांगितलेली हकीगत घडून आल्यानंतर ह. पैगंबरनें मक्केमध्यें आपला एक प्रतिनिधी नेमून त्याच्याकडे सर्व अधिकार सोंपवून दिला आणि ते सैन्य घेऊन मदिना शहरीं निघून गेले.

## ३ परराष्ट्रांशीं तह.

मक्का शहरावर हजरत पैंगबरचें निशाण लागल्यामुळें अरबस्थानांत तोच राजा असें ठरून गेलें, आणि भटकणाऱ्या टोळ्यांनीं, अरबस्थानांतील लांबलांबच्या भागावरील प्रांतांनीं आपले वकील त्यांच्याकडे पाठवून दिले. दाक्षिणेकडील येमेन प्रांतांतील, ओमन प्रांतांमधून व सरिया आणि पराशियाच्या सरहद्दीवरील प्रांतांमधून ज्या पैगंबरची एवढी मोठी किर्तीं दिगंत पसरली त्यांच्याबरोबर तह करण्याकरितां वकील आले. कारण पैगबरनें फक्त धर्मस्थापना केली एवढेंच नव्हे, तर त्यानें मुसलमानी साम्राज्याची स्थापनाहि केली; सर्व देशभर पसरलेल्या अनेक टोळ्यांच्यामध्यें एक राष्ट्रीयतत्व निर्माण करून त्या तत्वानें त्या सर्वांना त्यानें

बांधून टाकिलें, आणि त्यांचें एक राष्ट्र बनविलें. आणि याच महातत्वाच्या आधारावर सारसन लोकांच्या बलाढ्य साम्राज्याचा पाया घातला. आज जगाच्या इतिहासांत मुसलमानांचें नांव गाजत आहे, त्याचें सर्व श्रेय त्या महा विभूतीकडे आहे.

मदिना शहरीं निरनिराळ्या देशांतून जे वकील लोक पैगंबरच्या भेटी करितां येत त्यांची भेट ते मशिदीच्या उघड्या पटांगणांत घेत असत. हजरत पैगंबरची सत्ता, व त्यांचे वैभव आतां राजकीयदृष्ट्या अपरंपार होतें; तथापि त्यानें आपली साधी रहाणी कधींहि बदलली नाहीं.

मशिदीच्या पूर्वेस त्यानें आपल्या बायकाकरितां ज्या लहान लहान साध्या झोपड्या बांधिल्या होत्या, तोच त्यांचा शेवट पर्यंत राजवाडा होता, आणि त्यांचे ते डोक्याला गुंडाळलेले पागोटें हेंच त्यांचा मोठ्या ऐश्वर्यांत राजमुकुट होता ! राजवाड्याशिवाय भूपति, राजमुकुटाशिवाय सार्वभौम राजा, अंगांत फाटका तुटका झगा, डोकीला वेडेवांकडे कसें तरि एक गुंडाळलेले वस्त्र, अशा पोशाकांत रस्त्यानें पायानें चाललेल्या राजाकडे पाहून लोकांच्या मनाला काय बरें वाटलें असेल ! त्यांच्या इतका दुसरा कोणताहि राजा प्रजेच्या अंतःकरणांत पूज्य म्हणून झाला नाहीं. ह. पैगंबर जवळ तहाच्या वाटाघाटी करण्याकरितां निरनिराळ्या देशांतून वकील लोक येत, त्यांच्या भेटी घेतांना पैगंबरनें राजकीय पोशाक करावा, असें उमरला वाटून अशा पोशाकाकरितां एक रेशमी झगा विकत घ्यावा, असें त्यानें हजरतला सुचविलें; परंतु आपल्या पोशाकांत किंवा रहाणींत बदल करण्याचें त्यानें नाकारिलें. ह. पैगंबरचें त्या वेळचें साधें राहाणें, साधा पोशाक, आणि त्यांच्या मागाहून होणाऱ्या त्यांच्या अनुयायी खलिफांचा डामडौल, वैभव, भपका यांच्यामध्यें केवढें मोठें अंतर आहे !

अरबस्थानांत पसरलेल्या बहुतेक टोळ्यांनीं व देशांनीं पैगंबरचें श्रेष्ठत्व मान्य केलें; त्यांतील कांहींनीं इस्लाम धर्म घेतला, आणि कांहींनीं ह.

पैगंबर हे परमेश्वराचे प्रेशित आहेत, म्हणून त्यांना वार्षिक खंडणी देण्याचा ठराव करून तह केले. मक्केतून मदीनास येऊन मुसल्मानांना नऊ वर्षें झालीं होतीं, आणि त्या वर्षीं जिकडून तिकडून ह. पैगंबरच्या भेटीकरितां इतके वकील व इतकी शिष्ट मंडळी आली कीं, त्या वर्षाला " शिष्टांचे वर्ष," हें नांव प्राप्त झालें.

टायफ शहर मात्र ह. पैगंबरच्या ताब्यांत अद्यापपर्यंत आलेले नव्हतें.

## ४ टायफमधील लोकांचा ह. पैगंबरच्या कृपेकरितां प्रयत्न.

ह. पैगंबर मदिना शहरीं परत आल्यावर थोड्याच दिवसांनीं, टायफ शहरांतिल एक उर्वा या नांवाचा पुढारी इस्लाम धर्मांतील नवीन तत्वांची समजूत करून घेण्यासाठीं पैगंबरकडे आला. पैगंबरच्या सर्व तत्वांची समजूत करून घेतल्यावर त्याची त्याबद्दल खात्री झाली व त्यानें तो धर्म घेतला. आपल्या शहरांतील लोकांची या धर्माबद्दल खात्री पटवावी, व त्यांना इस्लाम धर्म स्वीकारण्यास लावावें, अशा उद्देशानें तो आपल्या गांवीं निघून गेला. अल्–लॅट या देवतेच्या मूर्तीवर गांवांतील लोकांची अलोट भक्ति होती; त्याभक्तीपासून ते पराङ्मुख होणें अगदीं अशक्य होतें. उर्वाच्या धर्मत्यागामुळें त्यांना त्याचा अत्यंत राग आला व ते खवळून जाऊन त्यांनीं त्याला धोंड्यानीं चेंचून ठार मारिले. उर्वाला ठार मारल्याबद्दलच्या पश्चात्तापामुळें म्हणा अगर सभोंवारच्या प्रदेशांत एकच विरुद्ध शहर असल्यामुळें त्यांच्यापासून होणाऱ्या त्रासामुळें म्हणा, ह. पैगंबर जवळ तह करून त्यांचा स्नेह मात्र राखण्याचे गांवांतील पुढाऱ्यांनीं ठरविलें. या तहाच्या वाटाघाटी करण्याकरितां त्यांनीं गावांतील सहा मुख्य पुढाऱ्यांना मदिनाशहरीं पाठवून दिलें.

टायफ शहरांतून हे सहा इसम जेव्हां मदिना शहरीं आले, त्याच वेळीं ह. पैगंबर सिरियावरील स्वारी करून परत आले होते. रोमच्या राजानें एक मोठें सैन्य आपल्याशीं लढाई करण्याकरितां

पाठविलें आहे, अशी त्यांना बातमी लागली होती, म्हणून ते आपलेंहि मोठें सैन्य घेऊन सिरिया देशाच्या सरहद्दीवर असलेल्या ताबुक शहरावर चाल करून गेले होते; परंतु शेवटीं ही बातमी खोटी ठरली आणि ह. पैगंबर मदिना शहरीं परत आले. या स्वारींत उष्णतेच्या असह्य ज्वाळांनीं व अन्नापाण्याच्या तुटवड्यांनीं ह. पैगंबरच्या सैन्याचें अतोनात हाल झाले. पैगंबरची ही शेवटची स्वारी होय.

टायफ शहराच्या तर्फेनें जे सहा लोक मदिना शहरीं ह. पैगंबरच्या भेटीकरितां आले होते, त्यांचे हजरत मुहम्मदनें चांगल्याप्रकारें आदिरातिथ्य केलें. त्यांच्याकरितां मशिदिच्या बाहेर एक तंबु तयार केला आणि संध्याकाळीं जेवणखाण आटोपल्यावर ते त्यांच्या तंबूत जाऊन बसत व धर्माविषयीं चर्चाकरीत. त्यांच्या मनांवर इस्लाम धर्म तत्वांचा प्रकाश पाडण्यास ह. पैगंबरला फारसा वेळहि लागला नाहीं, किंवा त्रासहि पडला नाहीं; तथापि टायफचे रहिवाशी आपल्या देवतांच्या मूर्तींचा नाश करण्यास तयार होणार नाहींत, अशी जी त्यांना धास्ती वाटत होती ती मात्र कमी झाली नाहीं. ह.पैगंबरच्या या एका तत्वाच्या हे अगदीं विरुद्ध होते. मुसलमानी धर्माला जर त्या लोकांची मान्यता होती, तर त्याच्याच बरोबर मूर्तींच्या पूजाअर्चा तेथें चालणें, हें पैगंबरला कसें आवडावें. या दोन निरनिराळ्या मार्गांचे धर्म त्यानें एकाठिकाणीं चालु ठेवण्यास साफ नाकारिलें. ह. पैगंबरनें त्या लोकांना मुसलमानी धर्माचा अंगिकार करावयाचा असेल तर मूर्तिपूजा एकदम बंद झाल्या पाहिजेत असे स्पष्ट सांगितलें. टायफच्या लोकांना नवीन धर्मतत्वें शिकविण्यास आणि त्या धर्मावर त्यांचा पूर्ण विश्वास बसविण्यास तीन वर्षांची मुदत त्यांनीं ह. पैगंबर जवळ मागितली; व तोंपर्यंत शहरांत अल्-लाट्‌ची भव्य मूर्ति असूं देण्याची परवानगी मागितली. परंतु पैगंबरनें हें त्यांचें मागणें साफ झिटकारून टाकिलें. नंतर त्यांनीं दोन वर्षांची मुदत मागितली, परंतु.

तिचीहि वाट पहिल्याच प्रमाणें लागली. " निदान एक वर्ष तरि, साहा महिने–एक महिना " अशी त्यांनीं मुदत मागितली; परंतु ह. पैगंबरच्या तोंडून एक "नाहीं" या शिवाय जबाब त्यांना मिळाला नाहीं. ह. पैगंबरचा अगदीं कृतनिश्चय झालेला पाहून, टायफच्या लोकांचाहि नाइलाज झाला व आपल्या गांवांतील ती "अल्–लाट" ची पुरातन काळापासून वाडवडील पूजित आलेली ती भव्य मूर्ती फोडून टाकण्यास मोठ्या दुःखानें ते कबूल झालें ! टायफच्या लोकांना दिवसांतून पांच वेळ प्रार्थना करण्याला व वारंवार तितक्या वेळां हातपाय व तोंड धुण्याच्या त्रासानें कंटाळा येईल, याकरितां त्यांत कांहीं तरि सवड असावी, अशी नंतर त्यांनीं मागणी केली. " प्रार्थनेशिवाय खरा धर्म नाहीं, आणि मुसलमानी धर्म स्वीकाराल तर त्या धर्माप्रमाणें टायफच्या लोकांनींहि वागलें पाहिजे," असा ह. पैगंबरनें जबाब दिला. शेवटीं मदिनाशहरांतून निघून जाण्याच्या पूर्वीं आणखी एक विनंति त्यांनीं पैगंबरजवळ करून पाहिली ते म्हणाले, "आमच्या त्या आवडत्या मूर्तीचा नाश आमच्या हातानें तरि होऊं नये अशी आमची इच्छा आहे." तेव्हां अबुसुफयान आणि टायफमधील लोकांनीं ठार मारलेला उरवा त्याचा पुतण्या, या दोन इसमांना टायफच्या देवीचा भंग करून टाकण्यास ह. पैगंबरनें पाठवून दिलें.

## ५ अल्–लाट् मूर्तीचा नाश

टायफला हे सहा इसम आले, त्यावेळीं मोठा हृदयद्रावक देखावा घडून आला. मुघिरानें आपल्या हातांत एक भली मोठी कुऱ्हाड घेतली आणि सभोंवार हत्यारबंद लोकांचा कडक पाहारा ठेऊन त्यानें त्या देवीच्या देवळांत प्रवेश केला. गांवातील लोकांची देवळासभोंवती एकच गर्दी झाली आणि त्यांच्या बायकांनीं दुःखाच्या आरोळ्यांनीं दशदिशा व्यापून टाकिल्या. " अल्–लाट," च्या मूर्तीचा भंग झाल्यास शहरावर कांहीं तरि आपत्ति कोसळणार, अशी त्यांची समजूत होती. मूर्तीच्या

आंगावर दाणकन पडलेल्या कुऱ्हाडीच्या आवाजानें लोकांच्या छातींत धस्स झालें; त्यांचा श्वासोच्छ्वास बंद पडला. थोड्याच वेळांत त्या मूर्तीचे तुकडे तुकडे झाले! व ते जेव्हां लोकांच्या दृष्टीस पडले, तेव्हां त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा लोटल्या.

अशा रीतीनें टायफच्या लोकांना शरण येणें भाग पडलें. हें शहर मूर्तिपूजेचें मुख्य ठिकाण होतें; परंतु शेवटीं त्या लोकांनीं मुसलमान धर्म नाखुषीनें पत्करिला; यांत त्यांचा धार्मीक हेतु कांहींच नव्हता; अरबस्थानांत ह. पैगंबरचें राजकीय वर्चस्व स्थापन झाल्यामुळें त्यांना इस्लाम धर्माला मान देणें भागच पडलें. जसा जसा काळ लोटत गेला, तशा तशा जुन्या देवतांच्या स्मृती कमीकमी होत गेल्या, आणि शेवटीं तेच लोक इस्लाम धर्माचे अभिमानी म्हणून प्रसिद्धीस आले.

# भाग १६ वा.

## स्वर्गारोहण.

विषय

१ ह. पैगंबरची शेवटची यात्रा    २ ह. पैगंबरचा शेवटचा उपदेश

३ अंतकाळ

इस्लाम धर्मांत प्रत्येक मुसलमानाला पांच कर्तव्यें सांगितलेली आहेत,

१ कलमा-परमेश्वर एक आहे व मुहम्मद त्याचा पैगंबर आहे

२ नमाज़-दिवसांत होणाऱ्या पांच प्रार्थना.

३ रोजा-रमज़ान महिन्यांतील तीस उपवास.

४ जकात-गोरगरिबांना अन्न व वस्त्रदान.

५ हज-मक्केची यात्रा.

ज्या मनुष्याला अनुकुलता असेल व ज्याच्यानें मक्केपर्यंतचा प्रवास होण्यासारखा असेल त्यानें मक्केची यात्रा आयुष्यांत एकदां तरी जरूर केली पाहिजे. यात्रेमध्यें सर्वांत श्रेष्ठ अशी एक यात्रा असते, ती " धूल हिजा," ही यात्रा रमजान महिन्यांत करावयाची असते; या यात्रेंत धार्मिक सर्व विधी करावे लागतात. बाकी साधारण यात्रा वर्षांत केव्हांहि करतां येतात व त्या यात्रेंत करावयाचे विधीहि बेताबाताचे असतात. मक्केला यात्रेकरितां जाण्याची चाल फार प्राचीन काळीं सुरू झाली होती; व तीच पैंगबरनें आपल्याहि धर्मांत अवश्य कर्तव्य म्हणून पुढें चालविली. ह. पैंगबरला एकीचे तत्व पूर्ण पटलेलें होतें, आणि यात्रेच्या निमित्तानें निरनिराळ्या देशांतून मक्केला येणाऱ्या मुसलमान लोकांत संघशक्ति दृढ व्हावी याच हेतुनें त्यानें ही चाल पाडली असावी. हिंदुस्थानच्या सुपीक मैदानांतून, अफगाणिस्थान व बलुचिस्थानच्या बर्फमय डोंगरावरून, तसेंच परशिया, सिरिया, तुर्कस्थान, आणि एशिया मायनर, इजिप्त आणि

आफ्रिकेच्या निरनिराळ्या प्रदेशांतून, तों अटलान्टिक महासागराच्या किनाऱ्या पर्यंतच्या सर्व प्रांतांतून यात्रेकरूंचे थेवच्या थवे "बैतुला" परमेश्वराचे वसतिस्थान म्हणजे इस्लाम धर्माचा मध्यबिंदु जी काबा मशीद तिच्याकडे पाण्याच्या लोंढ्याप्रमाणें एकसारखे येत असतात. काबा मशीदीला हें नांव मुसलमान लोकांनीं दिलें. याच अर्थाचा हिब्रु भाषेंत "बेयेल," हा शब्द आहे, त्यावरून हें नांव पडलें असावें, असें कांहीं इतिहासकारांचें मत आहे.

इस्लामधर्माच्या नवव्या वर्षी अबुबक्र तीन हजार यात्रेकरू बरोबर घेऊन मक्केला "श्रेष्ट यात्रा," करण्याकरितां गेला. अरबस्थानांत आद्याप सर्व ठिकाणीं मूर्तिपूजा बंद झालेली नव्हती; त्या ठिकाणाहूनसुद्धां अशा "श्रेष्ट यात्रेकरितां" कांहीं मूर्तिपूजकहि मक्केला आले होते. त्यांच्या पुष्कळशा चालीरीती जुन्यापुराण्या व मूर्तिपूजकांच्या चालीरीतीप्रमाणेंच होत्या; तेव्हां ह. पैगंबरनें अशा मूर्तिपूजकांचे सर्व धार्मिकविधी काबा-मशिदींत न होऊं देण्याचा हुकूम दिला. जेथें जेथें यात्रेकरू उतरले होते अशा प्रत्येक ठिकाणीं आलिला एक जाहीरनामा देऊन तो वाचावयास त्यानें पाठवून दिला. त्या जाहीरनाम्यावरून कोणत्याहि मूर्तिपूजकाला मक्केच्या हद्दींत पाय ठेवण्यास सक्त मनाई आहे, असें जग जाहीर रीतीनें सर्वांना कळून आलें !

पुढल्या वर्षी ह. पैगंबर स्वतः यात्रेकरूंच्या प्रचंड घोळक्यानिशीं मक्का शहरीं गेले. या खेपेला त्यानें आपल्या मागें इस्लाम धर्मीयांनीं यात्रा कशी करावी, त्यांत कोणकोणते अवश्य विधी आहेत, हें स्वतः दाखवून दिलें. या वेळीं ते जसें जसें करित गेले, त्याची स्मृती त्यांच्या अनुयायांनीं उत्तम ठेविली, आणि ह. पैगंबरच्या मागें आद्याप प्रत्येक यात्रेकरू त्याच विधीप्रमाणें आपलें यात्रेचें धर्म कर्तव्य करीत असतो. "श्रेष्ट यात्रे" ला एकंदर तीन दिवस लागतात. त्यांत मक्केच्या पूर्वेस बारा मैलावर असलेल्या "अराफट

पर्वता" चें दर्शन घेणें, हा एक जरूरीचा विधी करावा लागतो. अराफट् आणि मक्का यांच्या दरम्यान मिना नांवाचें सभोंवार वाळुच्या टेंकड्यांनीं वेढलेलें एक खोरें आहे; त्यांत हजरत पैगंबर आपले हजारो यात्रेकरू घेऊन उतरले होते. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं नमाज पढून झाल्यावर ते आपल्या उंटावर स्वार झाले व अरफात पर्वताच्या दर्शनाला निघाले. मक्केंतून निघून मदिनाला जातांना ज्या इमानी अल्-कास्वा उंटानें आपल्या जित्राकडेहि न पाहातां आपल्या धन्याला मुक्कामाला सुखरूप पोंचविलें होतें, तोच आतां ह. पैगंबरच्या शेवटच्या यात्रेच्या प्रसंगीं आपल्या धन्याला पाठीवर घेऊन चालला होता. अरफातहि एक ओबड-दोबड दगडांची टेकडी आहे; ती एका वाळूच्या मैदानावर असून तिची उंची दोनशें फूट आहे. या पर्वताच्या शिखरावर ह. आदम एकाकाळीं नमाज पढले होते, अशी आख्याइका आहे. नमाज पढण्यांत व दुसरे कांहीं धार्मिक विधी करण्यांत ह. पैगंबरचा तो दिवस गेला. दिवस मावळल्यावर ते आपल्या उंटावर स्वार झाले आणि मिनाला जाणाऱ्या रस्त्यावर "मुजदलफा" या नांवाचें एक ठिकाण आहे, तेथें ती रात्र काढण्याकरितां गेले. अरफात सोडण्यास व या ठिकाणीं पोंचण्यास ह. पैगंबरला त्वरा करावी लागली. शिवाय सर्वांचा मुक्काम एकदम हलवाव-याचा ह्मटला ह्मणजे त्यांत धांदल स्वभाविकपणें होणारच; त्याप्रमाणें हजरत पैगंबरच्या यात्रेकरूंना घाईघाईनें आपला मुक्काम उचलावा लागला, असें जरी आहे, तथापि त्या धांदलीची आठवण मात्र मागें राहून त्यांच्यानंतर अद्यापर्यंत सर्व यात्रेकरू अरफात सोडून जातांना मोठी धांदल करीत असतात ! अरफात सोडून मुजदलफा येथें पोंचण्याला त्यांना बराच त्रास सोसावा लागतो, व केव्हां केव्हां तर वाटेंत अपघातहि होत असतात.

यात्रेच्या दुसऱ्या दिवशीं यात्रेकरू आपल्या मिना मुक्कामीं येण्यास परत फिरले. या दिवशीं एक चमत्कारिक विधी करावयाचा

असतो. त्याला " सैतानाला दगड मारणें " असें ह्मणतात. अशी एक आख्यायिका सांगतात कीं, एकदां ह. इब्राहिम "मिना पर्वताच्या खोऱ्यांतून चालला असतां त्याची व एका सैतानाची भेट झाली; त्या सैतानाला पाहातांच ह. इब्राहिमनें धोंडे मारून त्याला पिटाळून लाविलें." तेव्हांपासून सर्व यात्रेकरू येथें आल्यावर त्या पर्वताच्या पुढें आलेल्या खडकाकडे जमीनीवर पडलेले धोंडे उचलून फेंकित असतात! अशा रीतीनें ही यात्रा ह्मटली ह्मणजे खरी भक्ति, आणि पूर्वापार चालत आलेल्या चमत्कारिक चालीरीतींचे एक मिश्रण आहे. तिसऱ्या दिवशीं यात्रा पुरी करण्याची असते. त्याचा शेवटचा विधी " मिना " पर्वतावर एक बळी देऊन करावा लागतो. हीं बळी देण्याची चाल ह. पैगंबरच्या इस्लाम धर्मांत नवीन नाहीं. मुसलमान लोकांत ज्या अरबलोकांच्या जुन्या चाली चालत आल्या आहेत, त्या पैकींच ही एक आहे.

पैगंबरच्या आयुष्यांतील महत्कार्य सिद्धीस गेलें; त्यांचा हेतु पूर्ण झाला. हिरा पर्वताच्या एकांत वासांत ते भटकत असतां त्यांच्या मनांत केवढी अस्वस्थता, चिंता, संशय यांचें काहूर माजून राहिलें होतें! त्यानें आपलें ध्येय ठरवून ठेविलें होतें आणि त्याच्या प्राप्तीकरितां त्यानें आपल्या जिवाची प्रचंड धडपड मोठ्या दृढनिश्चयानें केली; व शेवटीं ते आपल्या मनोरथांत बसून सिद्धीच्या उंच पर्वतावर जाऊन बसले! ते केवढे विचारी असतील, याची कल्पना करणेंहि फार कठीण आहे. ते जेव्हां अगदीं निराधार होते; त्या वेळीं त्यानें आपल्या कार्याचा नकाशा आंखून ठेविला; व तोच त्यानें पुरा करून दाखविला! याला ह्मणतात "निश्चय." हातांत घेतलेलें कोणतेंहि कार्य त्यानें अपुरें असें सोडून दिलें नाहीं. मक्केला आपली हीच आतां शेवटची खेप, असें त्यांना वाटलें असावें, कारण मिना पर्वताच्या खोऱ्यांतून निघून जाण्याच्यापूर्वीं त्यानें आपल्या अनुयायांना शेवटचा उपदेश केला, व तो सर्वांनीं चांगला हृदयांत सांठवून ठेविला.

## २ ह. पैगंबरचा शेवटचा उपदेश.

सूर्य आकशांत पश्चिमेकडे वळत असतां त्याच्या प्रकाशानें समोरच्या टेंकड्या अतिशय चमकु लागल्या होत्या. त्या वेळीं ह. पैगंबर आपल्या अल्–कास्वा उंटावर बसले आणि आपल्या प्रचंड समुदायाला उद्देशून ह्मणाले, " बाबारे, माझे शद्ब लक्षपूर्वक ऐका, कारण यापुढें मला आज-च्याप्रमाणें तुह्मांला भेटण्याचा योग येईल, असें सांगतां येत नाहीं." नंतर त्यानें आपण घालून दिलेल्या आज्ञा बरोबर पाळण्यास, सैतानाच्या मोहा-पासून अलिप्त राहाण्यास व मूर्तिपूजेचे पाप न करण्यास मोठ्या कळ-कळीनें व प्रेमानें उपदेश केला; स्त्रियांना ममतेनें वागविणें, आयुष्याचा यथार्थ उपयोग करणें, व संपत्तीचा सद्व्यय करणें, याही विषयांवर त्यानें आपल्या शिष्यवर्गाला समाजावून उपदेश केला. ते पुढें ह्मणाले, " बाबारे, तुह्मीं स्वतः जें अन्नपाणी घेतां, स्वतः जें वस्त्रप्रावर्ण पांघरतां त्या अन्नापेक्षां निराळें अन्न किंवा निराळें वस्त्र तुह्मीं आपल्या गुलामांना देऊं नका. तेसुद्धां तुमच्याचप्रमाणें एकाच ईश्वराचीं लेकरें आहेत, ह्मणून त्यांना दुखविणें योग्य नाहीं." इस्लाम धर्माचा प्रसार होण्यासाठीं व त्याला चांगली बळकटी येण्यासाठीं समाजांत संघशक्ति निर्माण झाली पाहिजे, या विषयावर त्यानें सुंदर भाषण करून त्यांच्या मनावर विलक्षण छाप बसविली. ते त्यांना ह्मणाले; " बाबारे, माझे शद्ब चांगले ऐका, आणि ते समजून घ्या. मुसलमान धर्मांतील प्रत्येक इसम एकमेकाचा बंधु आहे, तुम्हीं सर्व एकाच दर्जाचे असून कोणी तुमच्यामध्यें उच्च नीच नाहीं. तुम्हीं सर्व बंधुत्वाच्या नात्यानें एकमेकांशीं घट्ट बांधलेले आहांत." पैंगबरनें आपलें संभाषण संपविल्यावर त्यानें वर आकाशाकडे उंच हात केले आणि ते म्हणाले " हे देवाधि देवा, तुझा प्रेशित म्हणून तुझा जो निरोप या पृथ्वीवर आणावयाचा होता तो आणून मी आपल्या कर्तव्यातून कार्यसिद्धि करून आज मुक्त झालों." सर्व जम-

मेल्या लोकांनीं एकाच आवाजानें उत्तर दिलें, "खरोखर, तुमची पवित्र कामगिरी शेवटास गेली !" नंतर जमा झालेले सर्व लोक जिकडे तिकडे निघून गेले. मक्केंत आल्यावर ते काबामशिदींत शिरले आणि तेथें मोठ्या भक्तिभावानें नमाज पडले. ह. पैगंबर मक्केंत तीन दिवस राहून मदिना शहरीं निघून गेले.

## ३ अंतकाळ.

हजरत पैंगबरला आपला अंतकाळ समीप येत चालला आहे याची जरी जाणीव झाली होती तथापि त्यांची शरीरप्रकृति खंगलेली नव्हती; किंवा त्यांच्या दैनिकव्यवहारांत कोणत्याहि प्रकारें कमतरता आली नव्हती. ते आपले नित्यक्रम व्यवस्थीत रीतिनें करीत. अबुबक्रला आपला गुरु आतां उतरत्या वयाच्या मार्गाला लागला आहे, असें वाटूं लागलें होतें, कारण एके दिवशीं मोठ्या दुःखानें तो त्यांना म्हणाला, "अरेरे, हे तुझ्या डोक्यावरिल केंस पांढरे तागासारखे झाले." ह. पैंगबरचें वय या वेळीं त्रेसष्ट वर्षाचें होतें.

" श्रेष्ठ यात्रा, " करून फार दिवस झाले नाहींत तोंच पैगंबरला तापानें पछाडिलें. कांहीं दिवस त्यानें तापाला दाद दिली नाहीं, आणि ते रोजच्याप्रमाणें मशिदींत जात, व नमाज पडत; तथापि दिवसेंदिवस त्यांची शक्ति क्षीण होत चालली व त्यांना कांहीं नित्यक्रम सोडून देणें भाग पडलें. त्यांची आवडती पत्नि बिबी आयेशा त्यांच्या आजारीपणांत उत्तम प्रकारें त्यांची शुश्रुषा करी. त्यांच्या शरीराला व मनाला जेणें-करून बरें वाटेल, असे सर्व उपाय ती करी. मशीदींत आपल्या गैर हजेरींत नमाज पडण्याचें काम अबुबक्रकडे सोंपवून ते आयेशाच्या घरीं रहावयास गेले.

मशिदीच्या आवारांत जिकडे तिकडे शांतता पसरली होती; नमाज पडण्याच्या वेळीं प्रत्येक दिवशीं मशिदींत लोकांची गर्दी जमे किंवा

पैगंबरची प्रकृती कशी काय आहे हें पाहण्यासाठीं त्यांची गर्दी जमे. ह. पैगंबरला तापापासून फार त्रास झाला. त्यांची प्रकृती क्षीण होत चालली. एके दिवशीं त्यानें बिबी आयेशाला जवळ बोलाविली, आणि तिच्या जवळ ठेवण्यासाठीं दिलेले पैसे मागितले. तिनें ते आणिले व ते त्यानें गरिब लोकांना वांटून टाकिले! " स्वर्गांत ईश्वराची व माझी भेट होईल, त्यावेळीं माझ्या संग्रहीं माझें संचित आहे, हें मला शोभणार नाहीं, " असें त्यानें उद्गार काढिले.

मरणाचे पूर्वी थोडे दिवस तापाची तीव्रता कमी झाली आणि त्यांची प्रकृती सुधारेलल, अशी आशा वाटू लागली. पैगंबर आजारी असतांना त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठीं लांबलांबचे लोक येत आणि नमाज पडण्याच्या वेळीं मुसलमान लोकांनीं मशीद भरून जाई. एके दिवशीं दोन प्रहरीं अबुबक्र नमाज पडण्याच्या कामांत गुंतला असतां बिबी आयेशाच्या घराचा दरवाजा हळुच उघडला आणि पैंगबर स्वतः मशिदीमध्यें आले. हजरत पैंगबरची शांत, गंभीर, तेजस्वी आणि प्रसन्न मुद्रा सर्वांनीं पाहिली. कदाचित् इस्लाम धर्मावर ज्यांचे पूर्ण प्रेम, दृढ विश्वास, अशा इस्लाम धर्मांतील, खऱ्या ईश्वराच्या भक्तांचा जमाव पाहून, आपलें पवित्र कर्तव्य संपलें. आणि आपण आतां अक्षय विश्रांति घ्यावी असेंहि त्यांना त्या वेळीं वाटलें असावें. आबासचा एक मुलगा तेथें जवळच उभा होता, त्याच्या खांद्यावर हात टेंकून चार पाउलें ते पुढें चालले आणि अबुबक्र ज्या ठिकाणीं बसला होता, त्याच्या शेजारी जाऊन बसले. जमलेल्या लोकांच्या बरोबर ते नमाज पडले आणि नंतर त्यांतील कांहीं स्नेही सोबत्यांजवळ थोडें त्यानें संभाषण केलें. पैंगबरची प्रकृती जरा बरी आहे, असें पाहून त्यांना अत्यानंद झाला. मशिदीच्या बाहेर असलेल्या लोकांचीहि त्यानें मधूर शब्दांनीं विचारपूस केली; परंतु या थोड्याशा बोलण्यानें त्यांना श्रम झाले म्हणून ते बिबी आयेशाच्या घरीं विश्रांति घेण्याकरितां

निघून गेले. त्यांना पाहातांच बिबी आयेशा लोच पुढें झाली व तिनें आपल्या हातांचा आधार देऊन त्यांना आंत नेलें. आपल्या पतीचे थंडगार पडत चालले हात पाय आणि बेशुद्ध पडत चाललेली अवस्था पाहून ती फारच घाबरून गेली. तिनें त्यांचें मस्तक आपल्या मांडीवर ठेविलें आणि सर्व अवसान एकत्र करून आजारी मनुष्य असतांना त्याला आराम वाटावा याकरितां ईश्वराची जी प्रार्थना करावयाची असते ती तिनें या प्रसंगीं केली. " हे सृष्टीच्या देवाधिदेवा, माझ्या पतिवरचें सर्व अरिष्ट व दुर्दैव दूर कर; त्यांना आराम पडूं दे, असा उपाय कर, कारण तुझ्या सारखा उत्कृष्ट दुसरा वैद्य नाहीं. " मशिदींतून आल्यानंतर फक्त दोन तास झाले असतील किंवा नसतील इतक्यांत हजरत पैगंबरनें, त्या अलौकिक मानवश्रेष्ठांनीं आपली इहलोकची यात्रा शांतपणें संपविली.

अशी एक दंतकथा सांगतात कीं, पैगंबरच्या मरण समयीं जिब्रईल त्यांना भेटण्यासाठीं पृथ्वीवर खालीं उतरला; त्याच्या बरोबर मृत्यूचा राजा यम हाहि होता, परंतु तो आंत न शिरतां बाहेर उभा राहिला, व त्यानें पैगंबरची आंत येण्याकरितां परवानगी मागितली. पैगंबरनें त्याला आंत येण्याला परवानगी दिल्यावर तो त्यांच्या समोर उभा राहिला आणि " आत्म्याला स्वर्गांत घेऊन जाण्याला परवानगी आहे काय ?" असें त्यानें त्यांना विचारिलें. " सृष्टि निर्माण झाल्यापासून आजपर्यंत यमानें कोणत्याहि मानवाला असा प्रश्न विचारिला नाहीं. मरण पावणें हा कोणाच्याहि खुषीचा प्रश्न नाहीं, असें असतांना पैगंबरला मात्र यमानें हा प्रश्न विचारिला ! ईश्वराला, अनंतशक्ति प्रभुला आपली भेटण्याची तयारी आहे, असें दर्शवून ते ह्मणाले, " जशी तुला आज्ञा असेल तसें कर. " जिब्रइलनें शेवटचा निरोप घेतांना त्यांना आशिर्वाद दिला, " शांति, शांति, शांति, हे ईश्वराचा पैगंबर. " नंतर हजरत पैगंबरनें आपला देह विसर्जन केला.

पैगंबरच्या मृत्युची बातमी हं हं ह्मणतां गांवांत पसरली; ती ऐकून लोकांना पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें ! " पैगंबराला मृत्यु !" या कोड्याचा त्यांच्यानें उलगडा होईना. ज्या पैगंबरला नुकंताच माशिदींत नमाज पडताना त्यांनीं पाहिला त्याला आपल्यामधून काळानें ओढून नेलें, या बातमीवर लोकांचा विश्वास बसेना. कांहीं लोकांना तर असेंहि वाटलें कीं, "पैगंबराला मृत्यु शिवणें मुळींच शक्य नाहीं." कांहीं लोकांना ही बातमी ह्मणजे राष्ट्राची भयंकर हानी व आपत्ती अशी वाटली. खरा प्रकार काय आहे हें जगजाहीर करण्याला दुःखामुळें उमर पुढें झाला नाहीं. त्याच्या तोंडून शद्बसुद्धां निघणें मुष्किल झालें. तथापि तो एवढें मात्र ह्मणाला; "पैगंबरला मृत्यु नाहीं, त्याला फक्त मुर्च्छा आली आहे, तो आपल्याकडे परत येईल. चाळीस दिवस जसा हजरत मूसा या पृथ्वींवर निच्चेष्टित पडला होता, तसा पैगंबर प्रभुला भेटून परत येईल." उमर अतिशय खवळून गेला, त्याचें डोकें फिरून गेलें, लगेच त्यानें आपली चकचकीत तलवार बाहेर काढिली आणि मशिदींतील जमलेल्या लोकांना दाखवून तो ओरडला " पाहा, ही पहा, पैगंबर मेला, असें जो बोलेल, त्याचे तुकडेच झाले समजा." अबुबक्र पुढें आला व तो त्या लोकांना ह्मणाला, " खरोखरच पैगंबर मरण पावले तर ह्या इस्लाम धर्माला तुह्मीं सोडून देणार काय ? हजरत पैगंबरावर तुमची निष्ठा आहे काय ! तर खरी गोष्ट ही आहे कीं हजरत पैगंबरला काळ घेऊन गेला. परंतु त्यांचा सर्वशक्तिमान प्रभु सर्वत्र भरलेला आहे आणि त्याचा कधींहि अंत होणार नाहीं. "

---

वय ... ६३ - मृत्यु...
३. श्री. + ५७१ - जन्म

# भाग १७ वा.

## मधुपान.

No ordinary mortal ever exercised such an immeasurable influence upon the human race, in a religious, moral, and political point of view and this during a period of twelve centuries.

John Muhleisen Arnold.

रंकाचे राव झालेल्यांच्या ज्या अनेक गोष्टी आपण ऐकतों त्यापैकीं प्रस्तुतचें चरित्र ही एक गोष्ट मोठी आश्चर्यकारक आहे ! हजरत पैगंबरचा जन्म गरीब कुळांत झाला, त्यावेळीं त्यांना पोटभर सुकेंकोरडें अन्नहि मिळण्याची मोठी पंचाइत असे, म्हणजे घरांत अठरा विसवे दारिद्य, सर्व गांव प्राणावर उठलेला, अशा भयंकर परिस्थितीला तोंड देऊन जे शेवटीं धार्मिक व राजकीय साम्राज्याच्या सिंहासनावर विराजमान झाले, त्यांच्या आंगच्या कर्तबगारीचें केवढें आश्चर्य ! हजरत पैगंबरांच्या चरित्राकडे निःस्पृह बुद्धीनें पाहिल्यास या विभूतीच्या आंगांत कांहीं तरी अगम्य, गूढ असें महा तत्व खात्रीनें असलेंच पाहिजे, असें आपल्या मनाला पटल्याशिवाय रहात नाहीं. कोणी म्हणेल, यांत काय आहे, त्यांनीं हें सर्व तरवारीच्या जोरावर केलें ! परंतु असें कसें म्हणतां येईल ? कारण त्याच्याचबरोबर असाहि प्रश्न निघतो कीं, हजरत मुहम्मदसारख्या कंगाल, निराश्रित, निराधार, यःकश्चित् प्राण्याला पुढें त्याच्या शब्दाला शिरसावंदन करून मृत्युमुखांत उड्या घेणारे लाखो इसम कसे मिळावेत ! मक्का शहर सोडून मदिना शहरीं जेव्हां ते गेले, त्या वेळची त्यांची दुर्दशा ज्यांनी वाचली असेल, त्यांची अशी नाहीं का खात्री होणार, कीं हजरतनें

आपल्याबरोबर आपल्या एका अंतःकरणाशिवाय दुसरें कांहींहि घेतलेलें नव्हतें. ऐहिक व पारमार्थिक वैभव संपादन करणारें जें त्यांचें अतुल पराक्रमी सैन्य, त्यांनीं या त्यांच्या अंतःकरणांत तळ दिलेला होता ! तें हुकूमाची वाट पाहात होतें व त्याला अनुकुल क्षेत्र मिळतांच आपलें स्वरूप जगाच्या निदर्शनास दाखविण्यास तें बाहेर पडलें ! हजरतच्या यशाची गुरुकिल्ली येथेंच आहे. ज्याप्रमाणें रात्रींच्या अंधकारांत कांहीं मनोहर पुष्पें विकास न पावतां सूर्योदयाची वाट पाहात मिटून असतात, त्याचप्रमाणें हजरत पैगंबरचें अंतःकरण योग्य काळाची अपेक्षा करीत स्वस्थ होतें; परंतु तें प्रकाशांत येतांच खालील सुवास त्यांतून बाहेर पडून त्यांनीं अरबलोकांना मोहून टाकिलें ! असे जे त्यांच्या अंगचे सद्गुण त्यापैकीं खालीं लिहिलेले हे कांहीं आहेत.

## क्षमा.

अरबस्थानांत क्षमा हा मनाचा सद्धर्म प्रथम जर कोणी प्रचारांत आणला असेल तर तो हजरत पैगंबरनेंच होय. अरब लोक मूळपासून लढवय्ये क्षत्रिय ! त्यांनीं ज्याला एक वेळ शत्रू म्हणून मानला तो त्यांचा वैरभाव फक्त त्यांच्या हयातींतच नव्हे, तर त्याच्या पश्चात् ऐकमकांच्या पिढ्यांत सुद्धां टिकत असे. अनुकूल काळ येतांच नातु आपल्या आजापणजाच्या वेळीं झालेले तंटे उकरून काढून त्याच्या नुकसानीचा सूड घेत असे. अर्थात् क्षमा हा शब्दच त्यांना माहीत नव्हता; परंतु हजरत पैगंबरनें आपल्या शत्रूंना त्यांच्या हातून झालेल्या अनेक अपराधांना क्षमा करून चिरकालचें ऋणी करून ठेवल्याचीं त्यांच्या चरित्रांत अनेक उदाहरणें आहेत. हजरतच्या बिबी जेयनब नांवाच्या मुलीच्या मृत्यूला सर्वस्वी कारणीभूत व जबाबदार असलेला हबर–बिन–अल्‌अस्वाद जेव्हां हजरतनें मक्काशहर काबीज केलें तेव्हां जिवाच्या आशेनें परमुलखांत पळून जाण्याचा विचार करूं लागला, इतक्यांत त्याला तसें न करतां

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
भाग ... मधुपान ... दि: ...

हजरतची क्षमा मागण्यासाठीं कोणी एकानें सल्ला दिला; तेव्हां तो पैगंबरपुढें गेला व त्यांना म्हणाला, "अहो, पैगंबर जीव वांचविण्यासाठीं मी इराण देशांत पळून जात होतों, परंतु आपल्या अंतःकरणांत वास करणारी दया, क्षमा आणि शांति, यांनीं मला येथें आपल्या समोर आणिलें. मी महा अपराधी आहे, आपण जें जें माझ्याविषयीं ऐकिलें आहे, तें सर्व सत्य. माझें स्वतःचें सर्व कृत्य माझ्या नजरेसमोर उभें आहे. आतां आपल्या जवळ मी केलेले सर्व अपराध कबूल करण्याकरितां आलों आहे."

हजरतनें या मनुष्याला सर्व अपराध माफ केले ! मागील भागांत मुसलमानांचा कट्टा दुष्मन अबुजहाल याची आपण हकीगत वाचलीच आहे. त्याचा मुलगा इक्रम या नांवाचा होता. राग, द्वेष, मत्सर, इत्यादि मनोविकारांत बेटा बापाच्या सवाई होता. हजरतच्या ताब्यांत मक्का शहर येतांच हा आपलें घरदार सोडून येमेन प्रांतांत पळाला. त्याची बायको मात्र विचारी होती, ती तेथें गेली व आपल्या नवऱ्याला घेऊन हजरत पैगंबरकडे आली. आपल्याकडे इक्रम येतांना पाहून पैगंबर आपल्या स्थानावरून उठून सामोरे गेले, व आपल्या कट्टया शत्रूला म्हणाले, "तुमच्या आगमनानें मला किती आनंद झाला म्हणून सांगूं ! या,"

वर सांगितलेली एक दोनच उदाहरणें हजरत आपल्या शत्रूंना त्यांचे महान महान अपराध कसे माफ करून त्यांना जन्माचें ऋणी करीत असत, हें दाखविण्यासाठीं येथें देणें भाग पडत आहे. त्यांच्या चरित्रांत अशीं उदाहरणें असंख्य आहेत.

## एक वचन.

हजरत पैगंबरच्या पूर्ववयांत त्यांच्या इमानी स्वभावावरून आणि त्यांच्या सत्यभाषणावरून "अल-आमिन" हें बहुमानाचें नांव त्यांना प्राप्त

झालें होतें. त्यांनीं आपल्या सर्व आयुष्यांत मिथ्या भाषण किंवा दुटप्पी भाषण कधींहि केलें नाहीं. त्यांच्या कट्टया शत्रूंना हजरतच्या नैतिक उपदेशाचा जो मोठा वचक बसे; याचें कारणही हेंच आहे कीं, त्यांनीं आपल्या मुखांतून निघालेला शब्द प्रत्यक्ष आकाश कोसळलें, मृत्यु समोर उभा राहिला, किंवा पृथ्वीचें राजवैभव प्राप्त झालें, तरी परत घेतला नाहीं. काय हा प्रचंड आत्मविश्वास! सामान्य लोकांच्या बरोबर चालविलेल्या व्यवहारांत त्यानीं आपलें नैतिक वर्चस्व स्थापन केलें होतें, इतकेंच नव्हे, तर परराष्ट्राशीं केलेल्या तहाची अंमलबजावणी त्यांनीं इतक्या कडकडीत रीतीनें शब्दशः केली कीं, ज्या ज्या वेळीं तह मोडल्यामुळें नुकसानीची किंवा रक्तपाताची जबाबदारी कोणावर पडते हें पाहाण्याची वेळ आली, त्या त्या वेळीं हजरत पैगंबर स्वाभिमानानें बेजबाबदार म्हणून जगजाहीर झाले!

हिजरी सन ६ मध्यें हुदेबिया येथें कुरेश लोकांच्या बरोबर झालेल्या तहांतील एका कलमान्वयें अबुजंडालला हजरत पैगंबरनें परत आपल्या शत्रूंच्या स्वाधीन केला! मक्केंतून जीव बचावण्यासाठीं कुरेश लोकांच्या तुरुंगांतून सुटून आलेल्या अबुजंडालची हृदयाद्रावक हकीगत ऐकून मुसलमान रागानें लाल झाले, परंतु हजरत त्याला म्हणाले, " अबुजंडाल, धैर्य धर, आम्हांला तुला आश्रय देतां येत नाहीं. आम्हांला शब्दांची किंमत राखली पाहिजे. याच प्रसंगांत अल्ला तुला हात देईल."

पैगंबरच्या चुलत्याला ठार मारणारा वाशी बरेच दिवस परमुलखांत जाऊन बसला होता. हजरतच्या हातांत आपण सांपडलों तरी आपला प्राण घेतल्याशिवाय ते रहाणार नाहींत, अशी त्याची खात्री होती. पुढें कांहीं दिवस लोटल्यानंतर टायफ शहरांतून हजरत पैगंबरकडे जें शिष्टमंडळ तहाच्या वाटाघाटीकरितां आलें होतें त्यांत हाहि एक आला होता. या वेळीं त्याचें केवढें धैर्य! याचें कारण तो या वेळीं टायफ शहरातर्फे

वकील या नात्यानें हजरतपुढें आला होता, आणि हजरतकडे वकील ह्मणून येणाऱ्या इसमाच्या स्वातंत्र्याला किंवा त्याच्या प्राणाला काडी-भरहि धक्का पोंचावयाचा नाहीं, अशी त्यांची पूर्ण खात्री होती, हेंच होय.

बदरची लढाई झाल्यानंतर हजरत आपलें सैन्य घेऊन मदीना शहरीं परत आले; परंतु त्यांचे दोन इसम बदर येथें मागें राहिले. हे इसम शत्रूंच्या हातांत सांपडले. आपली त्यांच्या हातून सुटका व्हावी ह्मणून त्यांनीं पैगंबराच्या पक्षाला सामील होणार नाहीं, असें शत्रूजवळ कबूल करून ते मदीना शहरीं आले. हजरतनें या दोन इसमांना आपल्या शत्रू-कडे त्यांनीं दिलेल्या वचनाप्रमाणें परत पाठवून दिलें !

## निःपक्षपात.

एकाद्या राजाला आपल्या प्रजेला न्याय देण्याच्या वेळीं हातांत न्यायाचा धारवाडी कांटा धरून निःपक्षपातानें न्याय देतां येईल, परंतु त्याच राजाला अपल्या शत्रूच्या अपराधाचा निकाल तितक्याच निःपक्ष-पातानें देतां येणें फार कठीण आहे.

मदीना शहरांत रहाणाऱ्या एका बाईनें चोरी केली, व त्या चोरीबद्दल हजरत पैगंबरकडे फीर्याद आली. हजरत पैगंबर आपल्याला आतां शासन करतील, अशी तिला भीति वाटत होती. तिनें हजरतला आपल्या तर्फे चार शब्द सांगण्यास जैयदला सांगितलें. जैयदचें बोलणें ऐकून घेतल्यावर हजरत जमलेल्या लोकांना म्हणाले, " अरे, जैयद, परमेश्वरानें घालून दिलेल्या नियमांचें उल्लंघन करण्यास मी तयार व्हावें काय ? आजपर्यंतचा या पृथ्वीवर चाललेला न्याय पाहा ! हीं सर्व राष्ट्रें गरीबांना न्याय देतांना कायद्याप्रमाणें त्यांना शिक्षा देतात; परंतु श्रीमंतांना त्याच कायद्याची ओढाताण करून त्यांना दोषमुक्त म्हणून सोडून देतात. परमे-

श्वराची शपथ घेऊन मी सांगतो, माझी मुलगी फातमा जर चोरी करील, तर तिचेहि हात तोडून टाकण्यास मी कमी करणार नाहीं."

## स्वार्थत्याग.

ज्या वेळीं हजरत अत्यंत वीपन्नावस्थेंत होते, त्या वेळीं कुरेश लोकांनीं त्यांना मक्केचें राज्य देऊं केलें, अनेक प्रकारें आमिष दाखवून त्यांना या ऐहिक जगांत सामान्य लोकांच्या दर्जाला आणण्याचा त्यांनीं प्रयत्न करून पाहिला, असें आपण मागें वाचलेंच आहे. हजरत पैगंबर या बाबतींत निरिच्छ होते. त्यांनीं कुरेश लोकांच्या सर्व देणग्यांचा धिःकार केला. अरबस्थानचें राज्य पद मिळून सुद्धां त्यांनीं ऐश्वर्य, वैभव, डामडौल, विलास, यांचा धिःकार करून स्वतःसाठीं दैन्यावस्था पसंत केली! शारिरीक सुख हें त्यांचें ध्येय नव्हतें. ज्या अंतिम ध्येयाकरितां त्यांच्या जिवाची धडपड चालली होती, तें ध्येय हेंच त्यांचें अमर्याद सौख्य होतें.

हजरत पैगंबराची सत्ता वाढली, त्यांचा लौकिक चोंहो दिशेला पसरला, त्यांच्या पुढें निरनिराळ्या राष्ट्रांतील वकील तहाच्या वाटाघाटी करण्याकरितां बसूं लागले; तथापि त्यांच्या प्रापंचिक व्यवस्थेंत कांहीं एक फरक झाला नाहीं. त्याची मुलगी बिबी फातमा हजरतच्या भरभराटीच्या काळांत सुद्धां घरांतील सर्व प्रकारचें काम स्वतः हातानें करी. घरांतिल बारिकसारीक काम करण्यासाटीं आपल्याला एकादा नोकर असावा, अशी तिची फार दिवस इच्छा होती. हजरतचा जांवई अलि याला आपल्या पत्नीला घरांत एकाद्या हलक्या नोकरा प्रमाणें राबावें लागतें, हें पाहून फार वाईट वाटे. एके दिवशीं अलीनें योग्य संधी पाहून आपल्याला एक नोकर असावा, अशी गोष्ट हजरत जवळ काढिली. हजरत पैगंबर ह्मणाले, माझे अनुयायी मुसलमान अद्याप अन्नाच्या विवंचनेंत आहेत, माझ्या मनाप्रमाणें यांची व्यवस्था झाल्याशिवाय मला अशा गोष्टीकडे लक्ष देतां येणार नाहीं."

ऐहिक वैभवाची त्यांना किंमत वाटत नव्हती. ते स्वतः शेळ्यांचे दूध काढीत, घर साफसूफ करीत, आपले कपडे स्वतः शिवीत; किंवा पायांतील जोडा फाटला असेल, तर त्यालाहि टांके मारीत. द्रव्याचा संचय त्यांनीं कधींच केला नाहीं. प्रपंचासंबंधीं बोलतांना बिबी आयेशा म्हणे, "आमच्या घरीं पुष्कळ वेळां अन्नहि नसे. कित्येक वेळीं चूल पेटली नाहीं. हजरत पैगंबरांनीं खजुराच्या एक दोन आठ्या खाऊन त्यावर दोन दोन तीन तीन दिवस काढिले होते".

अरबस्थानांतील एका श्रीमंत गृहस्थानें हजरत पैगंबरला त्यांच्या खासगी उपयोगासाठीं आपल्या उत्तम अशा सात बागा अर्पण केल्या. हजरतनें त्यांचा स्वीकार केला; तथापि त्यांचें उत्पन्न आपल्याकडे न घेतां तें सर्व धर्मादाय खातीं अर्पण केलें!

## इमान.

हजरत पैगंबरच्या उदार स्वभावामुळें त्यांना वारंवार कर्ज काढण्याचा प्रसंग येई. याचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्याजवळ त्यांच्या मृत्युसमयीं सावकाराच्या कर्जाशिवाय स्वतःचें असें म्हणण्यासारखें कांहींएक नव्हतें. ते जेव्हां मरण पावले तेव्हां त्यांचे स्वतःचे चिलखत साठ पौंड धान्याकरितां सावकाराकडे गहाण पडलें होतें. हजरत पैगंबरच्या देवघेवींत इमान हा मोठा सद्गुण होता.

मदीना शहरांत हजरत असतांना त्यांच्याकडे गांवांतील लोक एक श्रीमंत व्यापारी इस्लाम धर्माची दिक्षा देण्याकरितां घेऊन आले. अशा मोठ्या मनुष्याला आपण हजरत पैगंबरकडे आणला, याचा जो तो मोठेपणा घेऊं लागला, आणि त्यांच्या जवळ त्या व्यापाऱ्याची फाजील स्तुति करूं लागला. तेव्हां त्यांना पैगंबर म्हणाले, "अहो, थांबा, तुमच्यापेक्षां मी त्यांना अधिक ओळखतों." त्यावर तो व्यापारी म्हणाला, "माझे प्राण पैगंबर प्रीत्यर्थ खर्चीं पडोत. धंद्यांत ते माझे भागीदार होते, त्यांचा व्यवहार, त्यांचा धंदा, किती निर्दोष होता म्हणून सांगूं?"

## विनय व लोकलज्जा.

अबुदाउद म्हणतो ! " अविवाहित कुमारिकेपेक्षांहि अधिक विनय हजरत पैगंबरच्या अंगांत होता. त्यांच्या तोंडून कधींच उद्धट शद्ब कोणालाहि निघत नसत. रस्त्यानें जातांना कोणाच्या दृष्टीस पडूं नये, अशा रीतीनें ते चालत असत. त्यांचें हांसणें स्मित असे. कोणतीहि गोष्ट त्यांना पसंत नसेल तर ती ते शद्बानें दाखवीत नसत. त्यांच्या मनाच्या स्वरूपाचें चित्र म्हणजे त्यांचा चेहेरा असे.

पूर्वीं अरब लोकांत सार्वजनिक स्नानाच्या जागा असत. तेथें पुरुष व स्त्रिया वस्त्ररहित स्नान करीत असत. हजरत पैगंबरला अशा सार्वजनिक ठिकाणीं स्त्रियांनीं स्नान करणें मुळींच पसंत नव्हतें. त्यांनीं अनेक मार्गानें ही चाल मोडून टाकिली. स्त्रियांना वस्त्राशिवाय शरीराचा कोणताहि भाग उघडा ठेवणें, हें मोठें पाप होय, असा उपदेश करून त्यांनीं समाजांत नितीचा प्रकाश पाडिला.

## प्रेम.

सृष्टी म्हणजे प्रेम, स्वर्ग म्हणजे प्रेम, देव म्हणजे प्रेम, अशी ज्या सत्पुरुषांची वृत्ति असते त्यांना प्रेमासाठीं ही सृष्टी निराळी धुंडाळावी लागत नाहीं. व्यवहारांत ज्याच्या जवळ त्यांचा संबंध येतो त्याच्या ठिकाणीं तो त्या दृष्टीनें पाहातांच त्याला आपल्या स्वतःचेच प्रतिबिंब त्या मनुष्याच्या हृदयांत दिसून तो एकरूप होतो. भेदभाव नष्ट होतो आणि व्यक्तिविषयक मनोविकार लय पावतात. या सौख्याचा अनुभव घेणारे महात्मे व्यवहारांत नेहमीं मुग्ध असतात. त्यांच्या हालचाली आणि त्यांचे व्यापार हेंच त्यांच्या अंतर्यामींच्या मनोविकारांचें मूर्त स्वरूप असतें.

हजरत पैगंबरनें सर्व अरबस्थान आपल्या आंगच्या शुद्ध प्रेमानें काबीज केला; ही गोष्ट प्रमाणसिद्ध आहे. हां हां म्हणतां त्यांना लाखों

अनुयायी मृत्युमुखांत उड्या घेणारे मिळाले. या एका गोष्टी वरून त्यांच्या जवळ मनुष्याला आपलासा करून घेण्यास प्रेमाशिवाय दुसरें साधन असेल असें म्हणतां येत नाहीं. त्यांचे कट्टे शत्रू त्यांच्या जवळ क्षमेकरितां आले, आणि ते हजरत पैगंबरच्या प्रेमानें त्यांचे जिवाला जीव देणारे स्नेही झाले ! ही एकच गोष्ट त्यांच्या अंतःकरणाची साक्ष देतें.

## ईश्वरी निष्ठा.

प्रत्येक धर्मांतील मनुष्याची ईश्वरावर निष्ठा असते. त्याची भक्ति तो मोठ्या प्रेमानें करितो, अनन्य भावानें त्याला शरण जातो, आणि त्याच्या अगाध महिम्याचें वर्णन करितो. ज्याच्या अंतःकरणांत ईश्वराबद्दल पूज्य भाव नाहीं, असा मनुष्य सांपडणें दुर्मिळ आहे. मानव प्राण्याला ज्या वेळीं विचार करण्यासारखी अवस्था प्राप्त झाली, तेव्हां पासून तो या सृष्टीचा कर्ता कोणी तरि अगम्य, साकार, निराकार, असा असला पाहिजे अशी त्याच्या मनाची ठाम समजूत होऊन तो नीतीच्या मार्गाला लागला. अशा या अवस्थेच्या काळाची मोजदाद करतां येणें मात्र शक्य नाहीं. त्यामध्यें संसारापासून पराङ्मुख होऊन जे अनेक सत्पुरुष ईश्वर चिंतनांत निमग्न होऊन गेलेले आपण वाचतों व ऐकतों, त्यांमध्यें हजरत पैगंबरचें जीवन विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याचें पूर्ववय, ही सृष्टी हें काय आहे, यांतील व्यापार कोणत्या तत्वावर चालतात, सुख आणि दुःख यांचें पर्यवसान कशांत आहे, आणि मनुष्याला कोणतें अंतिमध्येय सुखावह होण्यासारखें आहे, यांच्या विचारांत निघून गेलें. मनामध्यें एक शंका उत्पन्न झाल्यावर त्या शंकेचें निरसन करण्याचा जों जों प्रयत्न करावा, तों तों एका शंकेला लागून एका मागून एक त्याचीच परंपरा लागत जाते; हा अध्यात्मिक विषयाचा धर्म आहे. परंतु शेवटीं एक महातत्व मग तें काल्पनिक ह्मणा अगर प्रत्यक्ष अनुभवसिद्ध म्हणा, असें मनाला पटल्यावर त्या सर्व शंका त्या तत्वांत लय

पावतात. असेंच हजरत पैगंबरच्या निजध्यासाचें झालें. हें वादळ कोठून आलें ? तें कां आलें ? तें येण्याचें कारण काय ? असे अनेक प्रश्न मनाला विचारतां विचारतां या पंचमहाभूतांच्या कोड्यांत त्यांचें मन गुरफटून गेलें. इकडे मनुष्य प्राण्याच्या सुखदुःखाच्या संबंधाचे एकमेकांत गुरफटून गेलेले धागे सोडवितांना त्यांचा जीव हैराण झाला. मनाची शांति होईना; यामुळें त्यांना हा देह सुद्धां जड ओझ्याप्रमाणें भासूं लागला. मनाला वेड लागलें, आणि या जड देहाचा अंत म्हणजे शांति असेल काय, अशा विचारांनीं कड्यावरून खालीं उडी घेण्याचाहि त्यांनीं विचार केला. शेवटीं मानवी सृष्टीच्या पलीकडे एक सृष्टी असून तिचा स्वामी एक प्रभू आहे, तो या सृष्टीच्या घडामोडीच्या मुळाशीं असून त्याचे सानिध्य हें मनुष्यमात्राच्या सर्व सुखाचे अंतिम ध्येय आहे, असें जेव्हां त्यांना प्रत्यक्ष पटलें, तेव्हां त्यांची शांतता झाली. नंतर ईश्वरावर त्यांचा पूर्ण विश्वास बसला, व तो इतका दृढ झाला कीं, मोठ्या भयंकर संकटांत सुद्धां ते त्यावर सर्व भार टाकून अचल राहिले !

## सत्पात्रीं दान.

हजरत पैगंबरांच्या गुणांची ख्याति चोहों दिशेला होत चालली आणि लांबलांबचा प्रवास करून परमुलखांतूनहि लोकांच्या झुंडीच्या झुंडी मदिना शहरांतील मशिदीच्या आवरांत जमूं लागल्या. हजरत जवळ द्रव्याची याचना करण्याकरितां आलेले असेहि कित्येक लोक त्यांत सामील झालेले असत. आलेला मनुष्य विन्मुख न दवडण्याचें जरी त्यांचें ब्रीद होतें, तथापि धट्टेकट्टे भिक्षा मागतांना पाहून त्यांच्या मनांला दुःख होई. एक वेळ दोन वेळ ते त्यांनांहि मदत करीत, परंतु त्याच्याहि पलिकडे तो मनुष्य गेला, तर मात्र ते त्याला सांगत, " जा, रानांत जा, लांकडांची एक भारी आणून बाजारांत वीक. यांत तुझ्या स्वतःचा जो मान राहील, तो भिक्षा मागण्यानें रहाणार नाहीं. "

एकदां एक गरीब मनुष्य त्यांच्या जवळ भिक्षा मागूं लागला. आपल्या जवळ एक पाणी पिण्याचा पेला व एक घोंगडी याच्याशिवाय कांहीं एक चीजवस्त आतां शिल्लक राहिली नाहीं; म्हणून मी भिक्षा मागतो, असें त्यानें हजरतला सांगितलें. हजरतनें त्या दोन वस्तु त्याच्याकडून आणविल्या, आणि त्या दोन दिनारला विकल्या. त्यांतील एक त्यांनीं त्या मनुष्याला खावयास दिला, आणि दुसऱ्या दिनारची एक रशी विकत घेऊन ती त्याला दिली, आणि रानांत जाऊन त्या रशीनें बांधून एक लांकडाचे ओझें आणण्यास व तें बाजारांत विकण्यास सांगितलें. हजरत पैंगबरच्या हुकुमाप्रमाणें तो प्रत्येक दिवशीं बाजारांत एक एक मोळी विकूं लागला. पंधरा दिवसांनीं त्याचा रोजचा खर्च बाहेर पडून त्याच्या जवळ पंधरा दिनार शिल्लक राहिले! या पंधरा दिनारच्या भांडवलावर त्यानें थोडा थोडा धंदा करण्यास प्रारंभ केला आणि थोड्याच दिवसांत तो मनुष्य आपला प्रपंच चांगल्या रीतीनें करूं लागला.

एका मशिदीमध्यें एक इस्लाम धर्माधिकारी कुराणांतील मोठमोठे भाग वाचून ऐकणाऱ्या लोकांना कंटाळा आणित असे. ही तक्रार हजरत पैगंबरच्या कानांवर गेली, तेव्हां ते त्याला म्हणाले, "बाबारे, पवित्र कुराण ऐकण्यासाठीं जे लोक येतात, त्यांत कांहीं म्हातारे, कांहीं अशक्त, कांहीं आजारी असेहि असतात. त्या सर्वांना फार वेळ तिष्ठत ठेवणें बरें नाहीं. यासाठीं लहान लहान भाग वाचून त्यांना जाऊं दे."

एखाद्या मनुष्याला शिक्षा, दंड, किंवा प्रायश्चित सांगतांना हजरत पैगंबरच्या मनाची नम्रता किती असे ती पाहा.

एका मनुष्याला त्याच्या पापाबद्दल दंड देववितांना ते त्याला म्हणाले:—
"बरें तर मग, आजपासून दोन महिने उपवास कर"
"नाहींरे, बाबा, माझ्यानें तें कसें होणार! माझी ही अवस्था पाहा!"
"जा तर मग, साठ गरीब लोकांना अन्न घालून तृप्त कर."

"आणि अन्न कशाचें करूं? घरांत काय आहे?" या मनुष्याकडे पाहात पैगंबर स्तब्ध राहिले.

इतक्यांत त्यांच्या एका स्नेह्यानें खारकानें भरलेली टोपली त्याच्याकडे पाठवून दिली. त्या टोपलीकडे बोट दाखवून ते त्या मनुष्याला म्हणाले, "ही उचल, आणि गरीबांना वांटून टाक."

"अहो, पैगंबर, मक्केंत माझ्या इतका कोणीहि दरिद्री नाहीं."

पैगंबर हांसले, आणि म्हणाले, "असं काय? तर मग तूं आपल्या बायकोला व मुलांना देऊन टाक!"

## स्तुतीची अप्रीयता.

एकदां एका विद्वान मनुष्यानें परमेश्वरावर व पैगंबरवर कांहीं स्तुतिपर कविता रचून त्या हजरतला वांचून दाखविण्यासाठीं आणिल्या. परमेश्वरावर जितक्या कविता होत्या, तेवढ्या सर्व पैगंबरनें शांतपणानें ऐकून घेतल्या. परंतु दुसऱ्या कवितांना प्रारंभ होतांच त्या त्याना बंद कराव्या असें वाटलें. इतक्यांत बाहेरून एक मनुष्य आंत आला; त्याच्या जवळ बोलण्याच्या निमित्तानें त्यांनीं त्या कवीला जरा थांबविला; तो मनुष्य बाहेर गेला पुन्हां आंत आला. हजरतनें पुन्हां त्या कवीला थांबविला. तो मनुष्य बाहेर गेला परंतु पुन्हां आंत आला. तेव्हांहि कवीला थांबावें लागलें. हजरत पैगंबर अशा महत्वाच्या वाचनाचे वेळीं ज्याच्यासाठीं थांबून रहातात, असा हा आहे तरी कोण, अशी स्वाभाविक जिज्ञासा कवीच्या मनांत उत्पन्न होऊन त्यांनीं त्याप्रमाणें पैगंबरला प्रश्न केला. पैगंबर म्हणाले, "ज्यांना बाष्कळ भाषण आवडत नाहीं, अशापैकीं तो एक आहे." कवी बिचारा खजिल झाला.

एकदां एका बोडोइन अरबापासून हजरत पैगंबरनें एक पैशाची रक्कम उसनी घेतली होती. स्वभावानें हा मनुष्य अगदीं रानटी वृत्तीचा होता. कांहीं दिवस लोटल्यावर तो आपल्या रकमेची मागणी करण्याकरितां हजरतकडे येऊन त्यांना गैरशिस्त भाषा वापरूं लागला. ही भाषा ऐक-

णारे जे इसम तेथें होते, त्यांना या आडदांड मनुष्याचा राग आला व ते त्याला म्हणाले, "अरे, तूं हें कोणाला बोलतो आहेस? डोळे उघड?" त्यावर त्या मनुष्यानें उत्तर दिलें, "काय झालें, राग येत असेल तर पैसे देऊन टाका." हजरत शांतपणें हें संभाषण ऐकत होते. ते या लोकांना म्हणाले, "अहो तुम्हीं चुकतां, त्या बिचाऱ्यानें आपली गरज केली, आणि त्यालाच तुम्हीं अक्कल शिकवितां! वास्तविक तुम्हीं त्याच्या तर्फे बोलणें हेंच योग्य."

मृत मनुष्याच्या आत्म्याला शांति मिळावी म्हणून त्याच्या अंत्यविधीच्यावेळीं जी ईश्वरीप्रार्थना करावी लागते, ती प्रार्थना करण्याच्या पूर्वीं तो मनुष्य कोणाचा ऋणी होता कीं काय, अशी हजरत पैगंबर चौकशी करीत; व तो सावकाराच्या ऋणातून मुक्त झालेला नाहीं, असें त्यांना आढळलें तर त्याच्याविषयीं करावी लागणारी प्रार्थना आपण स्वतः न करतां दुसऱ्या कोणास तरी ती करावयास सांगत!

## निगर्व.

गरीबीमध्यें मनुष्य स्वाभाविकपणें मनमिळाऊ, निगर्वी, शांत असा असतो; त्यावरून त्याची स्थिती बदलून तो वरच्या पायरीला गेला तर त्याचे हे गुण असेच राहातील असें मात्र खात्रीनें सांगतां येत नाहीं. कारण ऐश्वर्य जसें जसें वाढत जातें, तशी तशी मनुष्याला त्या ऐश्वर्याचा मद येऊन त्याची दृष्टी अंध होत जाते; असा मनुष्य-स्वभाव-धर्म आहे. हजरत पैगंबर या नियमाला अपवाद आहेत. जे मानव प्राणी मनुष्य वर्गाच्या उच्च कोटींत जन्मास आलेले असतात त्यांचे स्वभाव कोणत्याहि स्थितींत बदलत नसतात.

मदीना शहरांत मशीद बांधण्याच्या वेळीं अगदीं गरीब मजूराप्रमाणें हजरत पैगंबर स्वतः काम करीत होते. मदीना शहरला कुरेश लोकांचा वेढा पडला; तो वेढा शहराच्या सभोंवार खंदक होता, त्यामुळें वेढा

देऊन तो निष्फळ झाला. परंतु तो खंदक हजरतनें स्वतः मजूर लोकांबरोबर रात्रंदिवस राबून खणलेला होता, हें विसरतां कामा नये!

एका लढाईच्या प्रसंगीं हजरतच्या सैन्याला अन्न शिजविण्याची वेळ आली. त्या कामाकडे निरनिराळे लोक हजरतनें नेमून दिले होते, परंतु आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, आपण स्वतः तंबूंत स्वस्थ बसून न राहातां, लांकडे जमविण्याकरितां ते रानोमाळ हिंडले. लोक म्हणाले, "अहो, पैगंबर, हें आमचें काम आहे." पैगंबरनें उत्तर दिलें, "हें खरें, परंतु या वेळीं तुमच्यामध्यें व माझ्यामध्यें उच्चनीच भाव मुळींच नाहीं. परमेश्वराच्या दृष्टीनें आपण सर्व सारखेच."

## सौजन्य.

हजरतच्या एका मित्राच्या घरीं पैगंबरला लग्नाच्या निमित्तानें जाण्याचा प्रसंग आला. तेथें प्रथम मुली नवऱ्यामुलीवर गाणीं म्हणत होत्या. हजरत पैगंबरनें त्यांची कांहीं गाणीं ऐकिली; नंतर त्या मुलींनीं हजरत पैगंबरवरून त्यांची स्तुतिपर गाणीं म्हणण्यास सुरवात केली; त्यांतील एका गाण्यांत असें म्हटलें होतें कीं, "आम्हांकरितां ईश्वरानें पाठवून दिलेल्या पैगंबराला उद्यां काय घडणार आहे, हेंहि आज समजतें!" हजरत पैगंबर त्या मुलींना म्हणाले, "अशी गाणीं बंद करा; नवऱ्यामुलीवरूनच फक्त गाणीं म्हणा."

एक बडा मनुष्य एकदां हजरतच्या भेटीकरितां आला; तो निरनिराळ्या राष्ट्रांतून हिंडून आलेला होता; व त्यानें बरेच मोठमोठे राजे, महाराजे पाहिले होते. तो हजरत पैगंबरला म्हणाला, "आपल्या समोर येणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें जमिनीवर सांष्टाग नमस्कार आपल्याला घालावा;" हजरतनें उत्तर दिलें, "मी जिवंत असतांना तुम्हीं मला नमस्कार घालाल, परंतु माझ्यामागें माझ्या कबरीला असाच घालाल काय?"

## उदात्त जीवन.

परमेश्वर प्राप्ती हें मनुष्यमात्राचें अंतिम ध्येय आहे, हें पूर्ण ओळखून त्यानीं या जगांत राहिलें पाहिजे, असा हजरत पैगंबरांचा सर्वांना उपदेश असे.

एक दुर्वर्तनी मनुष्य हजरतला भेटावयास आला. त्या मनुष्याच्या दुर्वर्तनाची सर्व माहिती हजरत पैगंबरला होती; तथापि त्यांनीं त्या मनुष्याला आंत येऊं दिला, आणि त्याच्या जवळ गोड भाषण करून त्याला रजा दिली. तो मनुष्य निघून गेल्यावर बिबी आयेशा, हजरत पैगंबरांना म्हणाली, " हा मनुष्य कसा आहे हें आपणांस माहित असून त्याला एवढा मान कां ? " पैगंबरनें उत्तर दिलें, " जे आपल्या कठोर वाणीनें परमेश्वरापासून लोकांना परांङ्मुख करितात, परमेश्वराच्या दृष्टीनें ते खरे खरे पापी होत. "

## परोपकार.

आत्मोन्नतीला नेऊन पोंचविणारा सर्वांत जवळचा मार्ग परोपकार हा होय.या मार्गानें जाणारे जे सत्पुरुष असतात त्यांना ऐहिक सुखाची किंमत नसते; स्वार्थाचा ते धिःकार करीतात, आणि विश्व हेंच आपलें कुटुंब मानून या जगांत संचार करीत असतात. हजरत पैगंबरची परोपकार बुद्धि किती श्रेष्ट, किती विशाळ, व किती शुद्ध होती, याची खात्री पटण्यास इतिहासांत हजारों उदाहरणें दिलेलीं आढळतात. त्यांच्या सर्व चारित्रांतील मुख्य रहस्य या सद्गुणांत आहे. कोणीहि गरजू मनुष्य त्यांच्याकडे आला असतां तो विन्मुख परत गेला, असें एकीहि उदाहरण प्रत्यक्ष त्यांच्या कट्या शत्रूंनां देखील दाखवितां आलें नाहीं.

हजरत पैगंबरला त्यांच्या भरभराटीच्या काळांत निरानिराळ्या देशांतील राजेरजवाड्याकडून खंडणी, मौल्यवान वस्तुंच्या देणग्या, भेटी वगैरे येत. त्यांचा ते स्वीकार करीत, परंतु त्या सर्व मशिदीच्या आवारांत ठेवून

त्यांची यथायोग्य वांटणी करून ते मोकळे होत. एका राजाकडून अशीच त्यांना नव्वद हजार दिनारची खंडणी आली. या सोन्यांच्या नाण्यांची रास मशिदींत एका चटईवर ठेवून त्यांतील शेवटच्या नाण्याचीहि वाट त्यांनीं आपल्या नजरेसमोर लाविली व नंतर ते आपल्या घरीं गेले.

बेहरिन स्टेट मधून अशीच एक मोठी खंडणी आली होती. हजरतनें ती सर्व मशिदीच्या पटांगणांत ठेवविली आणि जे जे म्हणून कोणी त्यांच्याकडे द्रव्य मागावयास येत, त्यांना ते आपल्या हातानें देत सुटले. त्यांचा चुलता आब्बास यानें तर त्याला उचलतां आलें, एवढें ओझें आपल्या डोक्यावर घेऊन रस्ता चालूं लागला.

बिबी उम्मे सल्माच्या तोंडून ऐकलेली अशी एक गोष्ट सांगतात कीं, एके दिवशीं संध्याकाळीं हजरत पैगंबर घरीं नेहमींपेक्षां उशिरां परत आले. त्यावेळीं त्यांचा चेहरा जरा उदास होता. बिबी उम्मे सल्मानें "आज वृत्ति अशी कां?" म्हणून प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले, "काल संध्याकाळीं मला सात दिनार मिळाले होते, आणि त्यांचा सद्व्यय न होतां अद्याप ते माझ्या बिछान्यावर पडून आहेत."

एके दिवशीं ते मशिदमध्यें नमाज पढण्यासाठीं येऊन उभे राहिले, इतक्यांत त्यांना कशाची तरि आठवण पडली, व लगेच तेथून ते घरीं जाऊन परत माघारे फिरले. जमलेल्या लोकांना या त्यांच्या येण्याजाण्याचें कारण समजलें नाहीं. त्यांच्यापैकीं एकानें शेवटीं त्यांना विचारिलेंच; त्यावर ते म्हणाले. "माझ्या घरांत थोडेसे दिनार होते. त्यांची मला आठवण येथें होतांच घरीं परत जाऊन त्यांची व्यवस्था करून आलों."

हजरत पैगंबरच्या आंगच्या परोपकाराची कीर्ति सर्वत्र पसरली; ती ऐकून जो तो काहीं ना कांहीं तरी मागण्यासाठीं पैगंबरकडे येऊं लागला. एकदां एक बेडोइन टोळींतील एका मनुष्यानें हजरत पैगंबरचा झगा धरून तो त्यांना म्हणाला, "एक फार क्षुल्लक माझें मागणें आहे. मी जर

विसरून गेलों तर तेवढीच माझी इच्छा अतृप्त राहील." पैगंबर या वेळीं मशिदीमध्यें नमाज पडण्यासाठीं उभे राहिले होते; तथापि ते जमलेल्या सर्व लोकांना सोडून त्या मनुष्याच्या मागोमाग गेले. त्यांनीं त्या मनुष्याला जें पाहिजे होतें तें देऊन परत मशिदींत आले, व नमाज पडले !

एकदां ते अबु जहरला म्हणाले, " हा समोरचा ओहद पर्वत उद्यां माझ्यासाठीं सोन्याचा झाला, तथापि तो माझ्या स्वतः जवळ तीन रात्रीं सुद्धां शिल्लक उरणार नाहीं."

यावेळीं आपण ही ही गोष्ट विसरतां कामा नये कीं, हजरत पैगंबर स्वतः दान धर्म करीत; परंतु आपल्या करितां किंवा आपल्या कुटुंबाकरितां धर्म किंवा दान म्हणून कांहींहि घेत नसत. दान धर्म घेण्याला त्यांच्या कुळाला सक्त मनाई आहे. हा नियम अद्याप त्यांच्या वंशांत पाळला जातो.

त्यांचा लहान नातु हजरत हसन एकदां एक खजुराची आंठी हातांत घेऊन ती त्यानें आपल्या तोंडांत घातली. हजरत पैगंबर तेथें उभे होते, त्यांनीं ती आंठी त्या लहान मुलाच्या तोंडांतून काढवून टाकिली; तेव्हां ते त्याला म्हणाले, "बाळ, लक्षांत ठेव, हाशमच्या कुळांत धर्माचें खाण्याला सक्त मनाई आहे."

## सत्य भाषण.

मनुष्य गरीब असो अगर श्रीमंत असो, समाजांत त्याचें वजन त्याच्या अंगच्या नैतिक बळावर अवलंबून असतें. असें जें नैतिक बळ त्यांत सत्यभाषण हें मुख्य बळ आहे. इतिहासांत आजपर्यंत जे जे म्हणून अलौकिक महात्मे होऊन गेले, त्यांच्या तोंडून निघालेला प्रत्येक शब्द कायदा म्हणून लोक त्याला मान देत गेले आहेत. हजरत पैगंबरच्या ओंठाबाहेर पडलेला शब्द कधींहि निष्फळ गेलेला नाहीं. अबुसुफयानला आपण येथें वर्षानें भेटूं असें हजरत पैगंबरच्या शब्दावरून उमर म्हणाला

होता. त्या शद्वाची आठवण ठेऊन शत्रू रणांवर येवो अगर न येवो याची वाट न पाहातां पैगंबर आपण आपलें सैन्य घेऊन उभे राहिले ! इकडे अबुसुफयाननें त्या शद्वांची आठवण चांगली ठेविली; कारण हजरत पैगंबरचे ते शद्व होते हें त्याला माहीत होतें.

## शौर्य.

अलि म्हणतो:—हजरत पैगंबर लढाईंत जेव्हां लढवय्ये तलवारीचाच मारा करीत, तेव्हां ते आपल्या लोकांमध्यें निधड्या छातीनें उभे असत. ज्या ज्या वेळीं आम्हांला लढाईचें स्वरूप अक्राळ विक्राळ दिसे त्या त्या वेळीं आम्हीं हजरत पैगंबरच्या मागें जाऊन उभे राहात असूं.

## कुलाभिमान.

हजरत पैगंबरच्या अंतःकरणांत गोरगरिबांविषयीं दया पूर्ण वास करीत होती. ते सढळ हातानें सर्वांना मदत करीत, परंतु स्वतः मात्र दानधर्म मुळींच घेत नसत. इतकेंच नव्हे तर आपल्या वंशांत आपल्या पश्चात् भिक्षा, दान किंवा धर्म कोणीहि घेतां कामा नये, अशी कुराणांत त्यांनीं आज्ञा करून ठेविली आहे. त्यांच्या वंशांत आद्याप हजरत पैगंबरच्या आज्ञेला पूर्ण मान मिळत आहे.

## सामाजिक सुधारणा.

मद्यपान निषेध, जुगाराला प्रतिबंध, गुलामांची मुक्तता, स्त्रीस्वातंत्र्य, इत्यादि महत् सत्कृत्यांच्या योगानें अरब समाज रानटी अवस्थेंतून बाहेर काढून त्याला पृथ्वीवरील इतर राष्ट्राच्या पंक्तीला हजरत पैगंबरनें बसविलें. या एका श्रेष्ट पुरुषानें आपल्या राष्टाला धार्मिक व राजकीय दृष्टीनें सजीव व आणून तें राष्ट्र थोड्याच दिवसांत पृथ्वीवर एक बलाढ्य म्हणून त्याला योग्यता आणून दिली. हजरत पैगंबरनें आपल्या समाजसुधारणानीं जें सदृकृत्य केलें तें त्यांच्या पूर्वीं त्यांच्या देशांत कोणालाहि करण्याची बुद्धि

झाली नाहीं. परंतु या नवीन सुधारणांना हात घालून त्यांनीं अरबस्थान अखंड आपला ऋणी करून ठेविला यांत काडीभरहि शंका नाहीं.

## ज्ञानाची योग्यता.

जे शहाणे आहेत त्यांच्या शब्दाला मान देणें, आणि भौतिक शास्त्र दुसऱ्यांना पटवून देणें, हें धार्मिक धडे तोंडपाठ करण्यापेक्षां अधिक श्रेष्ठ होय.

विद्वान मनुष्याच्या दऊतींतील शाई, लढाईंत मरून पडलेल्या रण-वीराच्या रक्तापेक्षां अधिक मौल्यवान आहे.

जो ज्ञानार्जनाकरितां स्वगृह सोडून बाहेर पडला, तो अल्लाकडे जाणाऱ्या रस्त्याला लागला.

पुरुष असो, अगर स्त्री असो, प्रत्येकानें ज्ञान संपादन करणें हें त्याचें आद्य कर्तव्य आहे.

ज्ञानाच्या मागें लागा. कारण नीति व अनीति, न्याय व अन्याय, पाप व पुण्य, हा फरक ज्ञान सांगतें. स्वर्गाला जाणाऱ्या मार्गांत ज्ञानदीप प्रज्वलित असतो, भयाण वाळूच्या मैदानांत आपला ज्ञान हा सखा, एकांतांत तोच सर्व समाज, व निराश्रित असतांना तोच सर्व आधार; ज्ञान सौख्याचा मार्गदर्शक, दुःखाचा वांटेकरी, मित्रांत भूषण, आणि शत्रूसमोर अंगांत चढविलेलें चिलखत आहे.

## समदृष्टी.

मागें आपण हजरत पैगंबर मूर्ति विध्वंसक होतें, असें वाचलेंच आहे. त्यांचे सर्व अंतिमध्येय मूर्तिपूजा बंद करणें हें होते, असें जर खरें आहे, तर त्यांनीं आपल्या देशांतील परधर्मांना आपल्या धर्माप्रमाणें वागण्यास पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें हें कसें? इराणी लोकांना पाठविलेल्या स्वद-स्तूरच्या खलित्यांत त्यांनीं म्हटलें आहे कीं,–

"परमेश्वराचा प्रेशित याच्या कडून फरुक बी. शाखसन यांस, त्यांच्या कुटुंबास किंवा त्यांच्या वंशास ते आपल्या धर्माला धरून असोत अगर इस्लाम धर्माला धरून चालोत, त्यांना कोणत्याहि परिस्थितींत स्वातंत्र्यानें चालण्यास पूर्ण अधिकार दिलेला आहे.

हा माझा स्वदस्तूरचा लेख तुमच्या वतनवाडीचे, घरादाराचे, स्थावर व जंगम मिळकतीचे इ. एका परमेश्वराच्या आधारावर संरक्षण करील. तुमच्या मिळकतींवर कधींहि अन्याय अथवा जुल्म होणार नाहीं. जे कोणी हा माझा लेख वाचतील त्यांनीं त्याला पूर्ण मान दिला पाहिजे." इ.इ.

त्यांना आपल्या धर्माप्रमाणें आपल्या देवळांत वागण्यास पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यांच्या धर्माप्रमाणें त्यांना सर्वव्यवहार चालविण्यास पूर्ण अधिकार आहे. इ. इ.

हजरत पैंगबरच्या चरित्रावरून ते परधर्माचा अत्यंत द्वेष करणारे होते, असें अनुमान कोणी काढल्यास तें चुकीचें होणार आहे. ख्रिश्चन, यहुदी, आणि झोरोष्ट्रियन या निरनिराळ्या धर्मांना आपापल्या धर्माप्रमाणें वागण्यास त्यांनीं परवानगी दिली होती. त्यांनीं आपल्या आयुष्यांत परधर्मी म्हणून एकाहि मनुष्याचा द्वेष किंवा छळ केलेला नाहीं.

एक वेळ कांहीं ख्रिश्चन लोक तहाच्या वाटाघाटी करण्याकरित हजरत पैंगबरकडे आले. तो रविवारचा दिवस होता. ख्रिश्चन धर्माला अनुसरून त्यादिवशीं प्रार्थना करणें त्यांना भाग पडलें; परंतु जागेच्या अडचणीमुळें ते लोक विचारांत पडले. हजरत पैंगबरला जेव्हां त्यांची अडचण समजली; तेव्हां त्यानीं त्या लोकांना आपल्या माशिदींत ख्रिस्तीधर्माची प्रार्थना करण्यास परवानगी दिली!

हजरत पैंगबरच्या हुकुमाची अंमलबजावणी त्यांच्या मागें त्यांचे अनुयायी अक्षरशः करीत गेले; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या मतांना, त्यांच्या विचारांना सुद्धां इतका मान मिळत गेला कीं, त्यावेळचे त्यांचे स्नेही,

आप्तइष्ट व सोयरेधायरे ज्यांच्याजवळ हजरत पैगंबरचा प्रत्यक्ष, किंवा अप्रत्यक्ष संबंध होता, अशा प्रत्येक मनुष्यानीं हजरतविषयीं सांगितलेला स्वानुभव याला सुद्धां कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें. सारांश हजरतच्या हयातींत त्यांच्या सानिध्यांत असणारे पहिले चार खलिफा हजरतच्या आज्ञांच्या प्रत्यक्ष प्रतिमा होत्या, असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं.

त्यांच्या मागाहून होणारा खलिफा ह. अबुबक्र यानें ख्रिश्चन लोकांकरितां एक जाहिरनामा प्रसिद्ध केला होता. त्यांत असें म्हटलें होतें कीं, "ख्रिश्चन लोकांना (त्यांच्या प्रार्थनेच्या वेळीं) घंटा वाजविण्याला तसेंच सणावारांच्या दिवशीं (सार्वजनिक रस्त्यानें) आपले क्रास घेऊन जाण्याला बिलकूल प्रतिबंध होणार नाहीं. त्यांच्या नंतर होणाऱ्या कांहीं खलिफांनीं वेळोवेळीं झोरोष्ट्रियन लोकांना जाहीरनामे प्रसिद्ध करून त्यांच्या धार्मिक मतांना उत्कृष्ट मान दिला.

हजरत पैगंबरनें इतर धर्मांचा छळ केला नाहीं. त्यांनीं इस्लाम धर्माला उत्तेजन देतांना परधर्माचा द्वेष केला नाहीं. परधर्म ज्या ज्या ठिकाणीं प्रचारांत होता, अशा प्रत्येक ठिकाणीं रहाणाऱ्या लोकांचें, त्यांच्या मालमत्तेचें संरक्षण इस्लाम धर्मांतील लोकांप्रमाणें केलें. त्या लोकांना आपल्या धर्माप्रमाणें वागण्यास पूर्ण स्वातंत्र्य दिलें. ख्रिश्चन लोकांना त्यानें अनेक सवलती दिल्या. खालील त्यांच्या शद्बांत किती अश्वासन भरलेलें आहे तें पाहा.

"नज्रान आणि त्याच्या सभोंवती असलेल्या मुलखांतील ख्रिश्चन लोकांचे प्राण, त्यांचा धर्म, आणि त्यांची मालमिळकत, ज्या प्रमाणें यापागें सुरक्षीत राहिली, त्याचप्रमाणें पुढेंहि सुरक्षीत राहील; असें त्यांना परमेश्वराचें व त्याच्या पैगंबरचें अश्वासन आहे. ते ख्रिश्चन धर्माप्रमाणें चालतात म्हणून त्यांच्या आड कोणीहि येणार नाहीं. किंवा त्यांच्या

हक्कांना कोणीहि हरकत करणार नाहीं. धर्माधिकाऱ्यांच्या वतनवाडींत कोणीहि हात घालणार नाहीं. त्यांचें वतन अबाधित राहील; कोणतीहि मूर्ति किंवा क्रास भंग केला जाणार नाहीं. ते स्वतः कोणावर जुल्म करणार नाहींत, किंवा त्यांच्यावर जुल्म होणार नाहीं. अधर्माच्या दिवसांत रक्तपात करून ते सूड उगवून घेत असत, त्याप्रमाणें यापुढें त्यांनीं वागता कामा नये. त्यांच्यापासून धार्मिक कर वसूल करण्यांत येणार नाहीं; किंवा सैन्याला लागणारी अन्नसामुग्रीहि त्यांना पुरवावी लागणार नाहीं.

If religious tolerance must be a necessary article of faith in the Religion of Humanity, it is surely yet another cogent justification for Muhammad's claim to the name of Ideal Prophet.

The Ideal Prophet. (Page 138).

# SOME OF THE VIEWS OF THE EMINENT EUROPEAN AND OTHER WRITERS CONCERNING MOHAMAD PROPHET.

" Head of the State as well as of the Church, he (Mohamad) was Caesar and Pope in one, but he was Pope without the Pope's pretentions and Caesar without the legions of Caesar. Without a standing army, without a body-guard, without a palace, without a fixed revenue if ever any man had the right to say that he ruled by a right Divine, it was Mohamad ; for he had all the power without its instruments and without its support. He rose superior to the Titles and ceremonies, the solemn trifling and the proud humility of Court etiquette. To hereditary kings, to prince born in purple, these things are, naturally, enough, as the breath of life ; but those who ought to have known better, even self-made rulers and those the foremost in the files of time—a Caesar, a Cromwell, a Napoleon—have been unable to resist their tinsel attractions. Mohamad was content with the reality ; he cared not for the dressing of power. The simplicity of his private life was in keeping with his public life, the contemporaries of Mohamad, his enemies who rejected his mission, with one voice extol his piety, his justice, his veracity, his clemency, his humility. By a fortune absolutely unique in History, Mohamad is three-fold, —founder of a nation, of an empire and of a religion.

Illiterate himself, :scarcely able to read and write, he was yet the author of a Book which is a peom, a code of laws, book of common prayer and a Bible in one, and is reverenced to this day by a sixth of the whole hnman race as a miracle of purity of style, of wisdom and of truth. It was the one miracle claimed by Mohamad—his standing miracle he called it ; and a miracle indeed it is. What more crowning proof of his sincerity is needed ? Mohamad to the end of his life claimed for himself that title only with which he had begun, and which the highest of phylosophy and the truest Christianity will one day, I venture to believe, agree in yielding to him—that of a Prophet, a very Prophet of God "

—Bosworth Smith, M. A., (Cantab) in his " Mohamad and Mohamadanism."

" There is something so tender and womanly and withal so heroic, about the man (Mohamad) that one is in peril of finding the judgment unconsciously blinded by the feeling of reverence and well-high love that such a nature inspires. He who, standing alone braved for years the hatred of his people, is the same who was never the first to withdraw his hand from another's clasp ; the beloved of children, who never passed a group of little ones without a smile from his wonderful eyes and a kind word for them sounding all the kinder in that sweet-toned voice The frank friendship, the noble generosity, the dauntless courage and hope of the man, all tend to melt criticism into admiration.

"He was an enthusiast in that noblest sense when enthusiasm becomes the salt of the earth, the one thing that keeps men trom rotting whilst they live Enthusiasm is often used despitefully, because it is joined to an unworthy cause, or falls upon barren ground and bears no fruit. So was it not with Mohamad. He was enthusiast when enthusiasm was the one thing needed to set the world aflame and his enthusiasm was *noble for a noble cause.* He was one of those happy few who have attained the supreme joy of making one great *truth* their very life-spring *He was the messenger of the One God* and never to his life's end did he forget who he was, or the message which was the marrow of his being. He brought his tidings to his people with a grand dignity sprung from the consciousness of his office together with a most sweet humility, whose roots lay in the knowledge of his own weekness."

Stanley Lane Poole.

"If ever man on this earth found God, if ever man devoted his life to God's service with a good and great motive, it is certain that the Prophet of Arabia was that man"

Leonard.

"A life full of tender grace and beauty is Mohamad's. In his heart is humility and tenderness and deep love for humanity. "I am no more than man" he says; "call me a servant of Allah". A disciple asks him to curse those who do not believe in him. "No" he says, "I am not sent to curse; I am sent as a mercy for Mankind."

Prof. T. L. Waswani.

"The heart of Mohamad? Have you ever paused to think of it? How blind and mistaken we have been picturing to ourselves Mohamad as one whose only talk was of Jehads, Kafirs, of vengence and of death. The heart of Mohamad, tender and playful like a mother was indeed a Divine gift of God. Just think that each of the 113 out of 114 suras or chapters of the Koran begins with the words – In the name of the Merciful, the Compassionate! Turn from Mohamad the thunderbolt of heaven, the apostle of Ekamebadwithyam, the Rasul ( Prophet ) commissioned of God to hew down idols and all make-beliefs, to Mohamad the man. Follow him into the thresh-hold of his home, watch him play with children, address his friends or console the erring and the fallen and you will see the man of heart, the heart of the man."

J. K. Kore.

"Mohamad set a shining example to his people. His character was pure and stainless. His dress, his food, they were characterized by a rare simplicity. So unpretentious was he that he would receive from his companions no special mark of reverence nor would he accept any service from his slave which he could do himself. Often and often was he seen mending his clothes in his room or milking a goat in his court-yard. He was accessible to all and at all times. He visited the sick and was full of sympathy for all. Unlimited was his benevolence and so was his anxious care for the

welfare of the community. Despite innumerable presents which from all quarters poured in for him, he left very little behind and even that he regarded as State property."

Dr. Gustave Weil.

"He ( Mohamad ) was a man of truth and fidelity, true in what he did, in what he spake, in what he thought; he always meant something; a man, rather taciturn in speech; silent when there was nothing to be said, but pertinent, wise, sincere, when he did speak, always throwing light on the matter."

Thomas Carlyle

"He ( Mohamad ) is the greatest of all reformers."

Bosworth Smith, M. A.

„He ( Mohamad ) is the most successful of all Prophets and religious personalities."

Encyclopeadia Britanica.

# सनावळी.

| | | | |
|---|---|---|---|
| | इ. स. | ५७१ | मुहम्मद पैगंबरचा जन्म ( एप्रिल ता. २० ) |
| | ,, | ५८० | तुर्कस्थानचा इराण घेण्याकरितां प्रयत्न. |
| | ,, | ५८०–५९० | धर्मसंबंधी युद्ध. |
| | ,, | ५९५ | हजरत मुहम्मद पैगंबरचें खादिजाबरोबर लग्न. |
| | ,, | ६१० | ह. मुहम्मद पैगंबर आपल्या धर्मकार्यास सुरूवात करतात. |
| | ,, | ६१३ | कुरेश लोकांना प्रतिबंध. |
| | ,, | ६१५ | मुसलमानांचा स्वदेशत्याग |
| | ,, | ६१७–२० | ह. पैगंबर साहेबांवर कुरेश लोकांचा बहिष्कार. |
| | ,, | ६१९ | बिबी खदिजेचा मृत्यु. |
| हिजरी | ,, | ६२० | अबुतालिबचा मृत्यु |
| सन | ,, | ,, | ह. पैगंबर साहेब तायफला जातात |
| १ | ,, | ६२२ | पैगंबर साहेब मक्का सोडून मदिनेला जातात. |
| २ | ,, | ६२३ | अबुसुफयानची बदरवर स्वारी. त्यांचा पराभव. |
| ३ | ,, | ६२४ | ओहदची लढाई, मुसलमानांचा पराभव. |
| | ,, | ,, | अलि व बिबो फातमा यांचें लग्न. |
| ६ | ,, | ६२७ | खंदकाची लढाई. |
| ९ | ,, | ६३० | मक्का शरण येते. |
| | ,, | ,, | मूटाची लढाई. |
| | ,, | ,, | तायफ शहराला वेढा. तायफ स्वाधीन होते. |
| ११ | ,, | ६३२ | पैगंबर साहेबांची मक्केला शेवटची यात्रा. |
| | ,, | ,, | पैगंबर साहेबांचा मृत्यु ( जून ता. ८ ) |
| | ,, | ,, | हजरत अबुबक्र खलिफा निवडून येतो. |

# निवडक आभिप्राय.

## MOHAMED PAIGAMBER.

This is a very bright and intelligent biography of the great personality who laid the foundation of one of the most popular religions of the world. The author MR. M. V. Pradhan has brought to bear upon it not only his whole skill of penmanship, but his scholarship, and extensive reading. The task was by no means easy, particularly in the present times when religious feelings are easily roused. But the impartiality with which the author has aquitted himself of his responsibilities is very commendable. I have every hope that the book will find its way to the library of every Mohamedan, Hindu and Christian.

*Bombay*
*30th September* 1928.

A. B. Kolhatkar,
Editor Sandesh.

---

I have gone through Mr. Pradhans' book entitled "Mohamed Paigamber" written in Marathi. I whole heartedly recommend the book to every one anxious to know the true worth of the Prophet of Islam. The book is sure to impress every reader of it with the greatness of the Prophet's mission, and message. The facts mentioned therein are indisputable and the style is simple but appealing.

D. G. KULKARNI, (B. A. HONRS)
***Persian Teacher St. Xavier's High School, Bombay.***
(*Persian Examiner for Matric in 1928.*)

---

'NAWA KAL' Office,
Khatav Makanji Wadi, BOMBAY NO. 4.

Many books about the life of the great prophet of Arabia have appeared in different vernaculars of India, but so far none is worth the

name published in Marathi. Mr. Pradhan's book seems to me the just book on this topic in Marathi. Recently the Hindu population has begun to take interest in the life and work of the great prophet; but in several books biassed account is given. Mr. Pradhan, though a Hindu, has kept himself severly aloof from prejudices and has narrated as far as possible full account of the prophets' life. The book is very valuable addition to Marathi language. Mr. Pradhan deserves to be congratulated on this Score.

N. R. PHATAK.
*Chief Assistant Editor*, NAWA KAL
*Bombay 27th September* 1928.

---

## मि. एम. व्ही प्रधान, मु॥ परेल यांसी,

वि. वि. आपण लिहिलेलें "मुहम्मद पैगंबर" हें पुस्तक वाचून पाहिलें. पुस्तकाची भाषा सोपी, सरळ, व भारदस्त असून परिणामकारक आहे. ऐतिहासिक कथाभाग वर्णन करण्यांत बरेंच कौशल्य दृष्टीस पडतें. कथाभागाचें वर्णन पौराणिक पद्धतीवर नसल्यामुळें हकिगतीची सत्यता मनाला पटल्याशिवाय रहात नाहीं. सारांश इतिहास या दृष्टीनें हें पुस्तक वाचनीय आहे व मननीय आहे, असें माझें मत आहे. मराठी भाषेंत लिहिलेलें हें चरित्र पहिलेंच होय; ह्मणून या चरित्राला फार महत्व आहे. परधर्माचें पुस्तक ह्मणून ग्रंथकारानें त्यांत परधर्माची निंदा किंवा त्यावर टीका केलेली नाहीं; किंवा हिंदुधर्माची स्तुति किंवा त्यावर टीकाहि केलेली नाहीं. यामुळें हें चरित्र दोन्हीं धर्मांतील लोकांना प्रिय झाल्याशिवाय रहाणार नाहीं. नैतिक, सामाजिक व राजकीय शिक्षण देणारा हा ग्रंथ आहे, ह्मणून तो सर्व मराठीं वाचकांनीं वाचण्यास मी मोठया आनंदानें शिफारस करितों.

आपला
**सयाजी लक्ष्मण सिलम, बी. ए., एल.एल, बी.**
कार्पोरेटर व, मुंबई इंप्रूव्हमेंटट्रस्टचे ट्रस्टी.

२१ कामाठीपुरा
२७-९-२८

Lawaji Castle, Govt. Gate Road Parel
1 st October 1928.

श्रीयुत एम्. व्ही. प्रधान यांनीं मुहम्मद पैगंबर या महापुरुषाचें चरित्र लिहिलें आहे. मी तें पुस्तक वाचून आपला अभिप्राय द्यावा, व तो सुद्धां त्यांच्या हातांत २।४ दिवसांत मिळाल्यास बरें, असा लेखकाचा आग्रह पडल्यावरून, मी तो ग्रंथ विशेष खोल न जातां वाचला, व माझा अभिप्राय अनुकूल देण्यास मला आनंद वाटला.

जगांत वावरत असलेले निरनिराळे धर्म हे एका विश्व धर्माचीं अंगें आहेत, अशा दृष्टीनें प्रत्येक धर्माकडे पाहिले म्हणजे हा धर्म चांगला व हा मोठा ही भाषा राहात नाहीं. प्रत्येक धर्माचें ईश्वराच्या रचनेंत विशिष्ट कालीं विशिष्ट प्रकारचें कार्य असतें, व तें कार्य घडवून आणणें ऐवढाच त्या धर्माचा उद्देश असतो असें मानलें म्हणजे मुहम्मद पैगंबरांचा इस्लामी धर्म कशा रीतीचा आहे; हें विस्तारशः सांगण्याची जरूरी नाहीं.

क्रिस्ती धर्म ज्याप्रमाणें येशुक्रिस्त या महाभागाच्या चरित्राशीं निगडीत आहे, त्याप्रमाणें इस्लामी धर्म हा मुहम्मद पैगंबराच्या चरित्राशीं पूणपणें संलग्न झालेला आहे. अर्थात पैगंबराचें चरित्र आपणांस माहित असणें अवश्य आहे. उर्दु, परशियन, अरेबीक, इंग्रजी वगैरे भाषांतून पैगंबराचें चरित्र अनेकांस वाचण्यास मिळतेंच, परंतु मराठीच केवळ जाणणाऱ्या जनतेला पैगंबराचें चरित्र उपलब्ध नव्हतें. तें उपलब्ध करून श्री. प्रधान यांनीं पुष्कळांस उपकृत केलें आहे.

चरित्र सुव्यवस्थित रीतीनें मांडलेलें असून, भाषा साधी, सरळ व सुबोध आहे. अनेक प्रसंग वाचीत असतांना, मनाची करमणूक होऊन उत्सुकता वाढत जाते, व त्या थोर महाभागाबद्दल अत्यंतिक आदर उत्पन्न होतो. श्री. प्रधान यांचा ग्रंथ आदरास पात्र आहे. या खेरीज इतर शिफारस पत्र नको.

( सही ) **मोरेश्वर वासुदेव दोंदे**, बी. ए.

प्रिन्सिपाल गोखले एजुकेशन सोसायटी

Examiner for Matric in Marathi in 1927.

३८९

( ३३२ )

श्री. एम्. व्ही. प्रधान यांनीं लिहिलेलें मुहम्मद पैगंबर यांचें चरित्र समग्र वाचून पाहिलें. चरित्रासंबंधाची माहिती लेखकानीं काळजी पूर्वक मिळविलेली असून ती संगतवार मांडलेली आहे. मुसलमानी धर्माच्या स्थापनेपूर्वीची अरबस्थानांतील धार्मिक व सामाजिक स्थिति, त्या काळच्या तेथल्या चालीरीति या विषयीं या पुस्तकावरून बरीचशी विश्वसनीय माहिती मिळते. मुहम्मद पैगंबर यांनीं कोणत्या दृष्टीनें जगाच्या इतिहासांत कामगिरी बजाविली, धर्म स्थापनेंत कोणकोणत्या गोष्टींवर त्यानीं विशेष भर दिला, धर्मस्थापनेच्या कामीं त्यांना कशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावें लागलें, त्यांतून पार पडून त्यांनीं इस्लामची ध्वजा कशी फडकत ठेवली, त्यांच्या आंगीं कोणते विभुतिगुण होते, इत्यादि गोष्टींची या पुस्तकावरून चांगली कल्पना येते. मराठींत मुहम्मद पैगंबर यांच्या अशा चरित्राची उणीव होती ती या पुस्तकानं भरून काढली आहे. भाषा सरळ व सुबोध असून पुस्तकांतील विषयाकडे वाचकांचें लक्ष शेवटपर्यंत वेधून राहातें. लेखकांनीं प्रतिपाद्य विषयाशीं समरस होऊन पुस्तक लिहिलेलें असल्यामुळें पुस्तक वाचतांना तें एखाद्या श्रद्धाळु मुसलमानानें लिहिलें आहे असा भास होतो. लिहिण्यांत चिकित्सकपणाचा उपयोग केलेला नसल्यामुळें श्रद्धाळु मुसलमानांना आक्षेपार्ह वाटण्यासारखें असें त्यांत कांहीं नाहीं. मुसलमानेतर वाचकांना पुस्तकांतील सर्व गोष्टी पटल्या नाहींत तरी मुहम्मद पैगंबरांच्या शिकवणीसंबंधाचें कित्येक गैरसमज दूर होतील. या पुस्तकामुळें महाराष्ट्रांतील हिंदुमुसलमानांच्या ऐक्याला सहाय्य होईल असें वाटतें. कारण हिंदूंचे कित्येक गैर समज जसे या पुस्तकाच्या वाचनानें दूर होतील, तसेंच मुसलमांनानांहि पैगंबराचें चारित्र्य व उपदेश हीं ध्यानांत ठेवून, हिंदूशीं शेजारधर्मानें वागणें हेंच आपल्या धर्माला अनुसरून आहे असें वाटेल. मुद्रणदोषांमुळें पुस्तकाच्या सौंदर्याला गालबोट लागलें आहे याबद्दल मात्र वाईट वाटतें. श्री. प्रधान यांच्या श्रमाचे सार्थक्य होवो असें मी इच्छितों.

ता. १०-१०-१९२८ शारदाश्रमवासी.